।। श्रीगुरुदेव दत्त ।।

ॐ श्रीनरसिंव्हसरस्वती सद्‌गुरुभ्योनमः ।

# 'श्री आळंदीचे स्वामी'

महाराज परब्रह्ममूर्ती । त्यांची दिगंतरी किर्ती ।
सद्‌गुरुज्ञानाचा सागर । दत्ताचाही तो अवतार ।
मोठे मोठे जन हे येती । स्वामीची ही जाणूनी किर्ती ।
नाव नृसिंव्ह सरस्वती । दर्शन घेता मनोरथ पुरती ।
क्षेत्र आळंदी हे जाणा । भक्त घाली लोटांगणा ।

—भिकुबाई पुरंदरे-धुळे

लेखक : बाळ पाळेकर

*

शके १८८४

प्रकाशक :
**वि. श्री. गोखले**
अध्यक्ष,
श्रीअप्रबुद्ध विचार साधना,
३५०, हनुमाननगर, नागपूर ४४०००९

**लेखनारंभ**
श्रीगुरुपौर्णिमा आषाढ शु. १५ शके १८८२
शुक्रवार दि. ८-७-१९६०

★

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन
प्रथमावृत्ती : १९६२
द्वितीयावृत्ती : १९८५
द्वितीयावृत्तीची किंमत रु. ३०

**लेखनसमाप्ति**
बलिप्रतिपदा कार्तिक शु. शके १८८३
गुरुवार दि. ९-११-१९६१

★

मुद्रक :
**म. पां. बनहट्टी**
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर ४४००१२

। श्रीमन्नरसिंव्हसरस्वती गुरुदेवदत्त ।

# अर्पण व प्रार्थना

श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामीमहाराज यांचे नित्य चिंतन व सेवा घडावी या हेतूने केलेली ही अल्पशी कृती त्यांचे चरणी अर्पण करून अंगी कोणताही अधिकार किंवा पात्रता नसता हे साहस केल्याबद्दल श्रीतुकाराम महाराजांच्या वचनांची उसनवारी करून महाराजांची क्षमायाचना करतो.

बोलिलीं लेकुरें । वेडीवांकडीं उत्तरें ॥१॥
क्षमा करा अपराध । महाराज तुम्हीं सिद्ध ॥२॥
नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥३॥

शेवटी, श्रीमहाराजांनी ही सेवा गोड करून घ्यावी अशी त्यांच्या चरणीं प्रार्थना आहे.

☆

श्री

मार्गशीर्ष शु. ३, शके १८८४

पोस्ट आळंदी–देवाची
जिल्हा पुणे

श्री. जनार्दन पुरुषोत्तम पाळेकर उपाख्य श्री. बाळ पाळेकर मुक्काम आकोला, यांना आशीर्वाद

श्री. पाळेकर घराण्याची आळंदी–देवाची येथील श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामीमहाराजांचे ठिकाणी श्रद्धा असलेमुळे श्रीकृपेने आपणाला काही वर्षांपूर्वी इच्छा उत्पन्न होऊन श्रींच्या लीलेची माहिती फार प्रयत्न करून मिळाली. केवळ "श्री आळंदीचे स्वामींची सेवा घडावी" हाच शुद्ध हेतु असलेमुळे पूर्वजांचे पुण्याईने व श्री आळंदीचे स्वामींचे कृपेनेच हे लेखनाचे काम पूर्ण होऊन श्रींचे चरित्र, छापील प्रत जनतेला दिसणेचा योग येत आहे.

हल्लीचे काळात हे चरित्र वाचून लोकांनी ज्याला जशी अनुकूलता असेल तशा रीतीने श्री परमेश्वराची सेवा करून कृतार्थ व्हावे अशी श्रीचरणी प्रार्थना आहे. कळावे.

आपला

**माधव गोविंद गोडबोले**

सरपंच, श्रीनसिंव्हसरस्वती स्वामीमहाराजांचे
संस्थान, आळंदी–देवाची, जिल्हा पुणे.

# अनुक्रमणिका


प्रकाशकाचे निवेदन नऊ

प्रस्तावना— ले. श्रीअप्रबुद्ध, नागपूर दहा

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना सोळा

लेखकाचे मनोगत सतरा

१. संकल्प; २. चरित्रसाधने; ३. संशोधनशास्त्र आणि संतचरित्रे; ४. साधुसंत आणि चमत्कार; ५. श्रीगुरुचरित्र व श्रीमहाराज; ६. आभारप्रदर्शन; ७. विनंती.


## श्री आळंदीचे स्वामी


**प्रकरण १ : साक्षात् श्रीदत्तावतार** पृष्ठे १–२२

हे नरसिंव्हसरस्वती स्वामी कोणते १, चरित्रलेखनाचे पूर्व प्रयत्न २, पूर्ववृतान्त व व्यक्तिदर्शन ४, महाराजांचा बहुरंगीपणा ५, काही गैरसमज व त्यांचे निराकरण ६, साक्षात् श्रीदत्तावतार १८.

**प्रकरण : २ श्रीगुरुचरित्र आणि महाराज** पृष्ठे २३–५०

श्रीगुरुचरित्राचे कथासूत्र २३, श्रीदत्तावतार २४, श्रीदत्तात्रेय हेच श्रीपाद श्रीवल्लभ २५, श्रीपाद श्रीवल्लभ हेच श्रीनरसिंव्हसरस्वती २६, श्रीनरसिंव्हस्वामींचे लीलाचरित्र २६, श्रीगुरूंची श्रीशैलयात्रा २८, श्रीअण्णासाहेब व इतर कांही लोकांची श्रद्धा २९, महाराजांच्या स्वमुखातील माहिती ३१, महाराजांनी सांगितलेली आपल्या मातृत्वाची खूण ३३, श्रीगुरूंनी देहविसर्जन केले काय ? ३५, परि ते स्वरूपी मिळले ४७.

**प्रकरण ३ : आयुर्मान** पृष्ठे ५१–६७

पाचशे वर्षांवर आयुष्य ५१, पाश्चात्यांचे निष्फळ प्रयत्न ५३, आयुर्मर्यादा आणि तिचे मापन ५५, मृत्यूला जिंकणारा योग ५८, प्राणायामाने आयुष्यवृद्धी ६१, महाराजाची यौगिक क्रिया ६४.

**प्रकरण : ४ गुरुपरंपरा** पृष्ठे ६८–७०

प्रकरण : ५ भ्रमण पृष्ठे ७१–९६

नैमिषारण्यांतील गुहेत ७२, श्रीचिदंबर दीक्षित यांचे यज्ञात ७२, वीस वर्षांनी आठवण दिली ७२, लोकविलक्षण याचना ७३, प्रतिजालंदरनाथ ७४, ब्रह्मास्त्राची कथा ७५, पिठले भाकरीच्या पंगतीत ७६, गाविलगड किल्ल्यातून मुक्तता ७७, ज्ञानेश्वरीवर प्रवचन ७८, श्रीऋणमोचनस्तोत्र रचना ७९, महाराजांना ओळखणे कठीण ७९, श्रीमद्भागवताची अमोल देणगी ८०, ही पोरगी आम्हाला आवडते ८१, समदृष्टी ८३, तीन दिडक्यांची दत्तोपासना ८३, आज्ञापालनाने महाराजास संतोष ८६, श्रीराममंदिरातून गुप्त ८६, चार गहू चार मुलगे ८७, आजोबांची परीक्षा पास ८७, ब्रह्मचारी बुवाश्री बुवा-साहेबाच्या जागेत राहावयास आले ८८, प्रसादवीणा ८८, विलक्षण गैरसमज ८९, सात दिवस एकच पुराण ९०, अडखळल्या देवास दंडवत कशाला ? ९०, प्रसादाचा अर्थ ९१, साताऱ्याच्या किल्ल्यातून सुटका ९२, काही कमी पडले नाही ९२, कृष्णाबाईचा पूर ९३, विठूरायाच्या नगरीत ९४.

प्रकरण ६ : आळंदीतील बारा वर्षे पृष्ठे ९७–१३३

श्रीक्षेत्र आळंदी महीमा ९७, आळंदीत प्रवेश ९८, आळंदीक्षेत्रास उजाळा ९९, महाराजांचे भजनप्रेम १०१, निंदकांचे हृदयपरिवर्तन १०१, १४ ऋषींची स्थापना १०४, श्रीज्ञानेश्वर महाराजांचा रथ १०५, महाराजांचे भोजन १०५, विठोबाचे दर्शन १०६, लक्ष्मी-नारायण दर्शन १०७, आबाकाकाशी विनोद १०८, महाभूतांवर ताबा १०९, डोळ्यावाचून पाहणे १०९, नाडी परीक्षा ११०, अदला-बदल ११०, पिशाच्चास जलसमाधी १११, सातशे वर्षांचा ब्रह्मसमंध काढला ११२, कोटीतीर्थ ११४, श्रीगुरुचरित्रातील ३८ व्या अध्यायाची पुनरावृत्ती ११५, चिंतामणशास्त्री व ज्ञानयक्षिणी ११७, धोंडोपंत सहस्रबुद्धे यांच्या प्रश्नांची उत्तरे ११८, एकाच वेळी आळंदीत व परळीत ११९, खानदेशात पुडीला ११९, त्रिकालदर्शित्व १२०, सर्वसाक्षित्व १२१, काळबुवा १२२, काका महाराज पुराणिक १२३, विकटोपर्यंत शिकलेला उत्तम पुराणिक झाला १२३, अलौकिक शक्तिपात १२४, रामभाऊ हवेलीचा पुनर्जन्म १२५, जन्मभूमीकडील धर्मपत्नी १२५, भीमाबाईने वाचविले १२६, प्रत्यक्ष नागरूपाने परीक्षा १२८, सदाशिवाची मौंज १२८, अंगारा कोणी लावला ? १२९,

महाराजांनी ओटी भरली १२९, रूळ मारला पण बढतीच झाली १२९, आंतरसाक्षित्व १३०, कुटुंबास दागिने व दर्शन १३१, ती मुलगी आमची आहे १३१, आळंदीची महामारी गेली १३२, भागुबाईचे हीव १३२.

**प्रकरण ७ : महानिर्याण (?)** पृष्ठे १३४–१४६

प्रत्यक्ष श्रीदत्तमूर्ति म्हणून प्रगट १३४, पूर्वसूचना १३५, समाधी १३६, आवेश १३८, स्वप्नमंत्रोपदेश १३८, गुराख्यास दर्शन १३९, दशमीच्या नैवेद्याची आठवण १३९, दहीकण्या खाल्ल्या १४०, प्रज्ञावर्धनस्तोत्राची दुरुस्ती १४१, प्लेग व देवाची खोली १४४.

**प्रकरण ८ : संप्रदाय व सांप्रदायिक ग्रंथ** पृष्ठे १४७–१५७

संप्रदायाचे स्वरूप १४७, उत्तराधिकारी १४९, श्रीस्वात्मसौख्य–ग्रंथ-परिचय १५०, श्रीस्वात्मसौख्य व श्रीबुआसाहेब, धुळे १५३, श्रीबोआसाहेब रुद्र यांच्या तीन जन्मांचे रहस्य १५४, श्रीस्वात्मसौख्य व श्रीअण्णासाहेब १५५, 'अंतरानुभव'–ग्रंथ परिचय १५६, इतर १५७.

**प्रकरण ९ : मुक्ताफळे** पृष्ठे १५८–१६०

वेदान्तसार प्रश्नोत्तरमाला १५९, श्रीनृसिंहसरस्वतीकृत तीन वेडे १५९, श्रीनृसिंहसरस्वतीकृत तीन शहाणे १६०.

**प्रकरण १० : संस्थान** पृष्ठे १६१–१६६

संस्थानचा ठराव १६१, मठवर्णन १६१, महाराजांचे गादीवरील अधिकारी १६२, मठांतील उत्सव व नित्यक्रम १६५.

**प्रकरण ११ : प्रभावळ** पृष्ठे १६७–१९७

(१) ब्रह्मर्षि श्री. अण्णासाहेब पटवर्धन १६७, (२) श्रीनारायणबोवा रुद्र, धुळे १७१, (३) श्रीयशवंतराव महाराज देवमामलेदार १७६, (४) श्रीराधाकृष्ण स्वामी, रहिमतपूर १७७, (५) श्रीविष्णु महाराज, रहिमतपूर १८०, (६) श्रीपादस्वामी, पुणे १८२, (७) श्रीसच्चिदाश्रम स्वामी, लोणार १८३ (८) श्रीमंत सरदार तात्यासाहेब रायरीकर, पुणे १८६, (९) श्रीभक्त भाऊसाहेब गणपुले, धुळे १८७, (१०) श्रीभक्त दादा दांडेकर १८८, (११) श्रीभक्त श्रीधरपंत पोस्टमास्तर १९०, (१२) श्रीआपदेव महाराज, नागपूर १९२, (१३) श्रीभक्त बापुसाहेब गाडगीळ १९४, (१४) श्रीनारायणानंद सरस्वती स्वामी, गव्य लोदीपूर १९६.

**प्रकरण १२ : साधुसंतांची देशभक्ती** पृष्ठे १९८–२०८

देशभक्तीची कल्पना १९९, धर्मभक्ती हीच देशभक्ती २००, संतांवरील काही आक्षेप २०२, संतकार्याचा संक्षिप्त आढावा २०५.

**परिशिष्ठ** पृष्ठे २०९–२१४

(१) आरती श्रीमहाराजांची २०९ (२) श्रीज्ञानेश्वराष्टकं स्तोत्रम् । २०९, (३) श्रीऋणमोचनस्तोत्र २१०, (४) श्रीगोविन्दाष्टकम् । २१२, (५) श्रीगुरुपरंपरा स्तोत्र २१३.

**संदर्भ साहित्य** पृष्ठे २१५–२१७

# प्रकाशकाचे निवेदन

प. पू. श्रीमाधवबुवा यांची आज्ञा झाल्याप्रमाणे चि. बाळ पाळेकर याने परिश्रमपूर्वक तयार केलेल्या या श्रीचरित्रास, ' इतो इतो भवान् ' म्हणून साहित्यक्षेत्रात नेऊन बसवण्याची सेवा करण्याचे कामही, त्यांच्याच आज्ञेने मजकडेच आले आहे. त्याप्रमाणे मोठ्या आनंदाने मी ते करीत आहे. नित्य व्यवहारांतील स्वाभाविक सरळ सुलभ भाषा आणि विषयाचा जिव्हाळा यामुळे पुस्तक वाचकांस चटका लावील असा विश्वास वाटतो.

प्रकाशकाचे काम जरी मजकडे आले असले तरी याही पुस्तकाच्या प्रकाशनाचे सारे श्रेय ' सार्थ श्रीस्वात्मसौख्या'प्रमाणेच श्रींचे भक्त प्रा. डॉ. दि. का. गर्दे यांचे आहे. प्रकाशनाची मुख्य जबाबदारी त्यांनी उचलली नसती तर आज हे लोकांपुढे येणे कठीण होते. ग्रंथ मुद्रित करावयाचा म्हटले तरी ती काही थोडी यातायात नसते. मुद्रिते तपासणे, मुद्रणालयात खेटे घालणे इत्यादि सारे परिश्रम येथील ' नवयुग विद्यालया'चे मुख्याध्यापक श्री. प्र. दे. कोलते यांनी आपले बहुविध व्याप सांभाळून मोठ्या आस्थेने केले. श्री. पांडुरंगपंत बनहट्टी आणि नारायण मुद्रणालयांतील कर्मचारी यांनी ' सार्थ श्रीस्वात्मसौख्या '-प्रमाणेच हेही काम ठराविक वेळांत मोठ्या तत्परतेने आणि आपलेपणाने करून दिले. चरित्रातील छायाचित्रे चांगली झाली आहेत हे त्यांच्याच परिश्रमाचे फळ आहे. ही सर्व मंडळी आणि आर्थिक बाजू सांभाळून धरणारे प्रा. भा. ह. मुंजे, एम्. ए. व श्री. वा. पु. दामले, ॲडव्होकेट, बुलढाणे, हे सर्वच भक्त धन्यवादास पात्र आहेत.

ग्रंथास विस्तृत अनुक्रमणिका दिली असल्यामुळे संपूर्ण अशी सूचि दिली नाही. काही महत्त्वाच्या व्यक्ती आणि संदर्भ ग्रंथ यांचीच फक्त यादी दिली आहे. त्याचप्रमाणे महत्त्वाची अशी अशुद्धे नसल्यामुळे शुद्धिपत्रही दिले नाही. अशा रीतीने प. पू. श्री. माधवमहाराज यांच्या प्रेरणेने हाती घेतलेली आणि आज त्यांच्याच आशीर्वादाने पूर्ण होत असलेली चि. बाळ याची ही चरित्ररूप सेवा श्रीसद्गुरुदेवास संतोष देऊन भक्तजनांना कल्याणप्रद होवो येवढीच श्रीचरणी प्रार्थना आहे !

नागपूर, भौमवासर<br>
मार्ग. शु।। १५, शके १८८४

श्रीचरणरजांकित<br>
**अप्रबुद्ध**

॥ श्री ॥

# प्रस्तावना

श्रीनरसिंव्हसरस्वती सद्गुरुदेवाच्या चरित्राची प्रस्तावना मी काय लिहि-णार ? परंतु संस्थानाधिपती प. पू. श्री. माधवबुवासाहेब यांची आज्ञा मीच ती लिहावी अशी आहे. त्यामुळे यथामती थोडा प्रयत्न करीत आहे. सांप्रदायिकांच्या तर ही भाग्याचीच गोष्ट आहे की हे चरित्र प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे. आजपर्यंत असे चरित्र प्रसिद्ध करण्यास श्रींची आज्ञा नव्हती हे सर्वश्रुतच आहे. ही स्वल्पशी गोड सेवा चि. बाळ पाळेकर यांचेकरिताच जणू काही राखून ठेविली होती हे त्याचेही महत्‌भाग्यच म्हटले पाहिजे !

महाराष्ट्र म्हटले की पुण्याची आठवण होते; आणि पुणे म्हटले की आळंदी आलीच. श्रीज्ञानेश्वर माउलीच्या नित्य अधिवासाने पवित्र झालेल्या ह्या भूमीत पाऊल ठेवणाऱ्यास या क्षेत्रात माऊलीच्या दर्शनाबरोबरच जर कोणाच्या दर्शनाचा लाभ घडत असेल तर तो सद्गुरुदेवांच्या समाधीचाच. गेल्या शतका-मध्ये, पाश्चात्यांच्या संघर्षात वैदिक धर्म आणि भारतीय संस्कृती या केवळ इतिहासजमा होतात की काय असा घोर प्रसंग आला असता ज्या कित्येक लहान थोर महात्म्यांनी बहुजनसमाजाला वाहून न जाऊ देता जागच्या जागीच डांबून ठेवण्याचे कार्य बिनबोभाट केले. त्यांत श्रीनरसिंव्हसरस्वती या विभूतीचा फार मोठा वाटा होता. थोडी आश्चर्याची गोष्ट आहे की, असे असूनही आणि त्यांच्या भक्तवृंदात सुविद्य म्हणविणारांचाच भरणा विशेषतः असूनही त्यांच्या-विषयी संगतवार माहिती फारच थोडी अशी उपलब्ध आहे. याला कारण थोडेसे, त्यांची स्वतःचीच, प्रगट न होता निमूटपणे कार्य करण्याची इच्छा हे आहे हे खरे, तरीही परंपरेतील मंडळींची उपेक्षा ही त्याला फार प्रमाणात जबाबदार आहे. असे चरित्र लिहिले जाऊ नये अशी जी आतापर्यंत त्यांची इच्छा होती त्यामुळेही असे घडले असेल. ते काही असले तरी आता चरित्र लिहिण्याची आज्ञा झाली आहे हे फार मोठे सुदैव आहे.

आज्ञा झाल्याप्रमाणे चि. बाळ पाळेकर यांनी ही सेवा किती तत्परतेने उचलली आणि कोणत्याही प्रकारची वंचकता न करता तिच्या करिता परिश्रम केले ते प्रत्यक्ष चरित्रावरून दिसून येईल. चरित्र लिहिताना त्यांच्यापुढे मुख्य दोन मोठे प्रश्न पडले होते. एक प्रश्न असा होता की, अशी चरित्रे लिहावी कशी ? म्हणजे प्राचीन परंपरेप्रमाणे केवळ भाविकपणाने लिहून त्यांचा मुख्य

संदेश काय आहे हे पाहावे किंवा ऐतिहासिक पद्धतीप्रमाणे सर्वप्रकारे चिकित्सा करून लिहावे, असा प्रश्न होता. तसाच सुमारे साडेचारशे वर्षांपूर्वी गाणगापूर येथे अवतार–लीला केलेले श्रीगुरु नरसिंव्हसरस्वती ते हेच अशी जी भाविकांची समजूत आहे तिच्यासंबंधी विचार कसा करावा, यासंबंधी त्यांनी, माझ्याप्रमाणेच इतर संबंधी जनांशी चर्चा करून काही धोरण ठरविले आहे. चरित्र वाचल्या-नंतर तेच योग्य आहे असे वाचकांना पटेल असे मला वाटते.

सर्व आयुष्य इतिहासाच्या संशोधनात घालवून त्या विषयावर बोलण्याचा अनुभवसिद्ध अधिकार ज्यांनी संपादन केला त्या रा. सा. सरदेसायांनी आपल्या अनुभवाचे सार म्हणून या संशोधनाचे अंतरंग उघडे केले आहे. समजले जाते त्याप्रमाणे त्यांत सत्य नावापुरतेच असून कल्पनेचा बाजारच जास्त असतो. "लेखनांतील मते ही नेहमीच ज्याची त्याची असतात. म्हणूनच व्यक्तींनी लिहि-लेल्या इतिहासात निर्भेळ सत्य मनुष्याला अवगत होतच नाही." (गो. स. सरदेसाई, केसरी, २५ मे १९५८.)

थोडा विचार जो करील त्याच्या सहज लक्षात येईल की या म्हणण्यात अतिशय सत्य आहे; आणि कल्पनेचाच विलास म्हटला म्हणजे त्याचे सहजच दोन प्रकार होतात. कल्पना जशी उदार असते तशीच ती करंटीही असते. भगवंतांनी म्हटल्याप्रमाणे* 'अशेष विमर्ष' करून निर्णय घेणारी कल्पना ही उदार कल्पना. या कल्पनेत तर्कशुद्धता, विषयाचे संपूर्ण आकलन, संबंधित असलेल्या अनेक शास्त्रांचे आणि विषयांचे अनुसंधान ठेवलेले असते आणि कितीही तीव्र असली तरी मनुष्याची बुद्धी अखेरीस लंगडीच पडते, याची जाणीव असते. याच्या उलट अथवा प्रचाराच्या मगरमिठीत सापडलेली ती करंटी. न्या. वुड्रॉफने म्हटल्याप्रमाणे आपल्या पसंतीत अथवा आकलनात जे येणार नाही, ते एक तर केवळ मिथ्या अथवा असंभाव्यच, असे या कल्पनेचे जणू काही महावाक्यच आहे. अलिकडचे पुष्कळसे संशोधन या करंट्या कल्पनेचे असते, असा अनुभव आल्यामुळेच इतिहासाचार्यांनी असे उद्‌गार काढले असावे. या कल्पनेचे औद्धत्य अंगी असलेल्यांना कल्पना करताना सामान्य बुद्धीही जागेवर ठेवण्याची गरज नसते. किंबहुना ती गहाण ठेवून काढलेले निर्णयच सत्य असतात अशीच त्यांची समजूत असते. कालाच्या ओघात या कल्पनांचे सत्य स्वरूप केव्हाना केव्हा तरी प्रगट होतेच. परंतु त्यांच्यामुळे झालेल्या इतिहासविकृतीमुळे समकालीन समाजाचे मात्र अपरिमित नुकसान होते.

या गोष्टीची साक्ष पटण्याकरिता दूरवर जाण्याचेही कारण नाही. श्रीनरसिंव्हसरस्वती संबंधीही जे काही थोडे ऐतिहासिक लिखाण आज आहे

* विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु । श्रीगीता, अ. १८.

त्याच्यावरून हे सहज लक्षात येते. " द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंव्हसरस्वती " या माझ्या पुस्तकात श्री. ढेरे यांच्या त्याच विषयावरील पुस्तकाचे मी थोडेसे परीक्षण केले आहे. या पुस्तकातही लेखकाने त्याच्याच अनुरोधाने थोडा विचार केला आहे. वस्तुत: श्री. ढेरे यांच्या नाथसंप्रदायावरील आणि श्रीगुरूंच्या चरित्रावरील अशा दोन्ही पुस्तकांचे सविस्तर परीक्षण करून श्री. सरदेसाई यांच्या विधानाची सत्यता पटवून देणे हितावह होईल. परंतु प्रस्तुत प्रस्तावनेत ते अर्थातच करता येणार नाही. उदाहरण म्हणून मी एक लहानसे उदाहरण देतो. मदोन्मत्त विप्रांचा उन्माद जिरविण्याकरिता एका मातंगाच्या मुखातून वेदोच्चार केल्याची कथा सुप्रसिद्धच आहे. अर्वाचीन लोकांना ती रंजविणारीही आहे. तेव्हा तिचा यथातथ्याने विचार करण्याचे काय कारण आहे ? या प्रसंगाचे निवेदन करीत असता श्री. ढेरे यांनी असे म्हटले आहे की, " त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी श्रीगुरूंनी एका मांगाला विप्रत्व देऊन त्याच्या करवी त्या पंडितब्रुवांचा मद उतरविला." श्री. ढेरे यांच्या लेखनचातुर्याचे कौतुक करावे की कल्पनाचातुर्याची तारीफ करावी हे सांगणे कठीण आहे ! असाच प्रकार त्यांच्या सर्व ग्रंथांत दिसून येतो. थोडक्यांत बोलावयाचे म्हणजे आपल्या विवेचक बुद्धीला घटकाभर फाटा देऊन ऐतिहासिक संशोधनाच्या ते सर्वस्वी आहारी गेले आहेत. ' तरुण भारतात ' त्यांच्या पुस्तकाचे परीक्षण करणारे प्राध्यापक श्री. भा. श्री. परांजपे यांनी तर त्यांच्यावरही ताण केली आहे. ते म्हणतात, या महत्त्वपूर्ण घटनेचे मर्म श्री. ढेरे यांच्याही लक्षात आले नाही. म्हणूनच त्यांना भाबड्या सरस्वतीगंगाधराची विसंगती लक्षात आली नाही. बरोबरच आहे. पाश्चात्य विद्येच्या निरंकुशतेने पुनीत झालेल्या प्राध्यापकांचा उदारपणा त्या मंदबुद्धी भोळ्याभाबड्याला कोठून येईल ! तत्कालीन परिस्थितीप्रमाणे चमत्कारावर त्याचा विश्वास होता. आणि पुढे, ऐतिहासिक पद्धतीने आपले परीक्षण होणार आहे, याची त्याला कल्पना नव्हती. इतिहासापुरतेच पाहिले तर चमत्कार खरे का खोटे या प्रश्नाला जागाच नाही. असे चमत्कार होतात अशी लोकांची प्रामाणिक श्रद्धा होती, आणि तिला अनुलक्षूनच ते आपले स्थूलसूक्ष्म व्यवहार करीत होते किंवा नाही, हे ठरविणे एवढीच गोष्ट इतिहासाच्या कक्षेतील आहे आणि त्या दृष्टीने पाहिले तर त्या ' भाबड्याने ' एक चमत्कार म्हणून ही घटना सांगितली आहे, हेच महत्त्वाचे आहे. त्या प्रसंगाची त्याने जर काही मीमांसा केली असेल तर ती काय आहे. हे सांगणे इतिहासाचे कार्य आहे. तिच्या यथातथ्याचा विचार इतिहासाच्या कक्षेच्या बाहेर आहे.

सरस्वतीगंगाधराच्या म्हणण्याप्रमाणे, मातंगाला विप्रत्व दिले नाही. जन्मांतरीच्या विप्रत्वाची स्मृती दिली आणि आता विप्र झालो असा आग्रह तो धरू

लागला तेव्हा, त्याचा अध:पात झाल्यामुळे तो उत्तरोत्तर खाली जाऊन मातंग कुळात कसा जन्माला आला ते समजावून सांगितले. तू विप्र झालास असे कोठेही म्हटले नाही. आणि इतरही कोणी तसे समजले नाही. आणि शेवटी जेव्हा तो फार आग्रह धरू लागला तेव्हा त्याला पुन्हा जन्मांतराची विस्मृती दिली. हा एक सिद्धीचा चमत्कार होता. सिद्धीच्या बलाने अशा प्रकारचे ज्ञान देता येते आणि काढूनही घेता येते. या गोष्टीची थोडी साक्ष विवेकानंदांच्याच चरित्रात* दिसून येते. परंतु या गोष्टीचा विचार करण्याचे इतिहास संशोधकांना काहीच कारण नाही. आजचा सिद्धान्त आहे ना की वर्णव्यवस्था ही दुष्ट आहे आणि मूळ शास्त्रात नसून अज्ञानाने अथवा दुष्टपणाने मागून प्रचारात आली आहे ! याला पुरावा कोठे इतिहासात मिळाला तर, ऐतिहासिकांना, 'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवमन्यते' अशा वैयाकरणापेक्षाही जास्त आनंद होतो. तेव्हा सिद्धान्त ठरला. ही घटना खरी परंतु अर्वाचीनांचा उदारपणा त्या भाबड्या सरस्वतीगंगाधरात नसल्यामुळे त्याने त्या घटनेला विकृत स्वरूप दिले. आणि असे करताना जी विसंगती झाली ती समजण्याचीही त्याला अक्कल नव्हती. तेव्हा त्याची कीव करावी तितकी थोडीच ! वेद शिकणे ही काही साधी गोष्ट नाही. परंपरेने तयार झालेल्या पिंडात देखील ते ज्ञान ओतावयास कमीत कमी बारा वर्षे तरी लागतात. नाथांनी नुसते महारांना खाऊ घातल्याबरोबर ज्या ब्राह्मणांनी त्याना नाक मुठीत धरावयास लावले त्या ब्राह्मणांनी श्रीगुरू बारा वर्षे मांगाला वेदाध्ययन करवीत असतांना त्या घटनेचे अभिनंदन केले, ही गोष्ट किती तरी कौतुकाची आहे ! वास्तविक, सरस्वतीगंगाधराने हिचेच कौतुक करावयास पाहिजे होते. परंतु त्याला अक्कल नव्हती. परंतु तसेही म्हणता येत नाही. त्या घटनेला महत्त्व आहे असे म्हटले तर अर्वाचीन प्राध्यापक सोयीवारपणे ती विसरतात. आणि अशी ती विस्मरणीय असल्यामुळे सरस्वतीगंगाधराच्या डोक्यात हा प्रश्नच यावयाचे कारण नव्हते किंवा त्या मांगाच्या विप्रत्वाचा वाद असण्याचेही कारण नव्हते. त्यामुळे त्याला भय वाटून श्रीगुरूंनी त्याची सिद्धी काढून घेतली अशी एक थाप त्याने अनुदारपणा आणि विसंगती पत्करूनही ठोकून दिली आहे ! भाबडा बिचारा !! "दत्तात्रेय हे शाक्तमार्गी होते," " 'सुफी संप्रदाय' हे एक स्वतंत्र प्रकरण असून त्यांची छाप वाङ्मयावर पडली आहे, " इत्यादि श्री. ढेरे यांचे संशोधन बहुमोलाचे आहे !!!

* पुढे विवेकानंद झालेल्या नरेंद्राच्या एक दोन खेपा दक्षिणेश्वरी होताच एक वेळ श्रीरामकृष्णांनी त्याच्या खांद्यावर पाय देऊन त्याची बाह्य संज्ञा नाहीशी केली व तो कशाकरिता जन्माला आला आहे वगैरे माहिती त्याच्याच मुखांतून काढून घेतली वगैरे वृत्तांत स्वामींच्या चरित्रात आहेच.

बेदरच्या यवन बादशहाच्या मांडीवरील जीवघेणा फोड श्रीगुरूंनी केवळ अमृतदृष्टीने पाहून बरा केल्याचा कथाभाग श्रीगुरुचरित्रांत आहे. त्या संबंधात प्रा. परांजपे यांनी एक असा युक्तिवाद केला आहे की त्या काळी अशा कल्पनांची टूमच होती. कारण दोनतीन उल्लेख अशा प्रकारच्या चमत्काराचे इतर संतांविषयीही आढळतात. कोणत्याही काळी अशा तऱ्हेची एखादी टूमच असते हे खरे आहे. प्रा. परांजपे यांचे लिहिणे हीही या काळची एक टूम आहे! परंतु चमत्कारांत सारखेपणा असणे यात काहीच विलक्षण नाही. शास्त्रांशी ती गोष्ट सुसंगत आहे. शास्त्रसंमत जे चमत्कार होतात त्यात दोन प्रकार असतात. एक समर्थ विभूती आपले कार्य साधण्याच्या दृष्टीने प्रसंगानुरूप करतात ते. यात फरक असू शकतात. कारण ते प्रसंगास धरून असतात. दुसरा प्रकार लोकांच्या भावनेचा असतो. म्हणजे आर्ततेमुळे अथवा हौशीमुळे भक्त कल्पना करतात ती पुरविण्याकरिता केलेला असतो. यांच्यात साम्य असते. कारण सामान्यत: मनुष्याच्या अपेक्षा एकसारख्याच असतात. ज्या काळी अतींद्रिय सामर्थ्याच्या मागे लागण्याची लाट उसळली होती त्या काळी एका विशाल भूप्रदेशात एक दोन शतकांत असे दोन तीन चमत्कार आढळणे यात विलक्षण असे काहीच नाही. विलक्षण वाटते ते आज. आजच्या कल्पनांवरून प्राचीन कल्पनांची संगती लावण्याची आणि वुड्रॉफने म्हटल्याप्रमाणे "जे माझ्या लक्षात येत नाही ते मूर्खपणाचेच" (What I do not understand is absurd) असे समजण्याची जी टूम आहे तिच्यामुळे! चतु:सहस्र भोजनाची गोष्ट बायबलवरून घेतली आहे, असे प्राध्यापकांनी सुचविले नाही ही मेहरबानीच म्हटली पाहिजे!

सुप्रसिद्ध न्या० वुड्रॉफने अर्वाचीन इतिहासाचे दोष दाखविताना असे मार्मिकपणे म्हटले आहे की अर्वाचीन घटनांवरून ऐतिहासिक घटनांचा बोध करून घेऊ पाहणे म्हणजे इतिहास लिहिणेच नव्हे. (History cannot be written if we exclude from it what we do not personally like.– Shakti and Shakta) खेदाची गोष्ट ही आहे की आजचे अनेक बाबतीतील इतिहाससंशोधक बहुतांशी या वर्गातले आहेत. शिवाजी महाराजांना आवेश होऊन भवानीचा साक्षात्कार होत होता, ही एक त्यांनी लोकांची फसवणूक करण्याकरिता काढलेली युक्ती होती, असा शोध इतिहासाचार्य परलोकवासी राजवाडे यांनी लावला आहे! आणि शिवाजी महाराजांनी पुन्हा तांत्रिक अभिषेक करून घेतला तो बायकोचे मरण, मातोश्रीचा मृत्यू, दारुखान्याला आग लागणे, हत्ती मरण पावणे इत्यादी तात्कालीन घटना अपशकुनी वाटल्यावरून नव्हे, तर मूर्ख ब्राह्मणांची कशीतरी समजूत घालून त्यांना गप बसविण्याची युक्ती म्हणून केला, असे रहस्य इतिहासांतील अधिकारी श्री. वा. सी. बेंद्रे आणि श्री. ब. मा.

पुरंदरे सांगत आहेत. आजचा काळ नसला म्हणून काय झाले ! शिवाजीसारखा थोर पुरुष ! त्याची काय आजच्या माणसाइतकीही प्रगती झाली नसेल !

ऐतिहासिक क्षेत्रांतील अशा अद्‌भुत चमत्कारांनी गोंधळून जाऊन प्रस्तुत चरित्र, त्याचा खरा उपयोग ज्यांना व्हावयाचा आहे, त्या श्रद्धाळू जनतेच्या भाविक दृष्टीनेच लिहावे, असे लेखकाने धरलेले धोरण योग्यच आहे असे मला वाटते. ही गोष्ट वाचकांच्या लक्षात आणून देण्याकरिताच ठिकठिकाणी त्याने थोडीशी संशोधनात्मक चर्चाही केली आहे. परंतु एकंदर त्याने भाविक दृष्टीच स्वीकारली आहे; आणि अवतार–विभूतीकडे पाहण्याची आमची जी शास्त्रीय दृष्टी आहे तिला अनुसरून तेच बरोबर आहे.

दुसरा प्रश्न जो श्रीगुरुचरित्राचे नायक आणि आळंदीचे स्वामी हे एकच किंवा दोन, त्यासंबंधी त्याने स्वीकारलेले धोरण सर्वस्वी योग्यच आहे. त्याने एवढे दाखविले आहे की, काही झाले तरी त्या दोघांचा संबंध होता एवढे खास. त्या संबंधाने त्याने तीन मते मांडली आहेत. श्रीगुरुचरित्राचे नायक तेच आळंदीचे स्वामी, आळंदीचे स्वामी हे, अंतरानुभवात सच्चिदाश्रम स्वामींनी म्हटल्याप्रमाणे त्यांचाच अवतार होते म्हणजे चतुर्थ दत्तावतार होते, आणि आळंदीचे स्वामी ही फार मोठी व्यक्ती असून दत्तसंप्रदायी होते, अशा तिन्ही दृष्टींचा त्याने योग्य तो परामर्ष घेतला आहे. परंतु याविषयी त्याचा आग्रह नाही. स्वतः त्याची श्रद्धा ते दोघे एकच अशी आहे, व तिला अनुसरून त्याने, शरीर अशा रीतीने अनंतकाल टिकविता येणे शक्य आहे, याविषयी थोडी शास्त्रीय चर्चाही केली आहे. परंतु त्याचा आग्रह नाही. **"मानेल तरी पाहिजे घेतले ॥ कोणी एकें !"**

याप्रकारे भाग्यवंशात उपलब्ध झालेल्या या सद्‌गुरुसेवेच्या संधीचा उपयोग त्याने खरोखरच चांगला केला आहे. सद्‌गुरूंचा भक्तगण आजही फार मोठा असून सर्व महाराष्ट्रभर दूरवर पसरला आहे. त्यांना तर या स्वल्प सेवेने निःसंशय अतिशय आनंद होईल. प्रस्तावनालेखकाचे काम, साहित्याच्या भाषेत बोलावयाचे तर प्रियाची आणि प्रेयसीची गाठ घालून देऊन स्वतः बाजूला होणाऱ्या दासीसारखी आहे. चि. बाळ पाळेकर यांनी हा कल्याणविषय भाविकांपुढे ठेवला आहे, त्याच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहिले असता सद्‌गुरूंची आणि भाविकांची निदान मनोमय तरी ओळख पटेल, एवढेच सुचविण्याचे माझे काम होते. तेवढे करून निवृत्त होताना श्रीतुकाराम महाराजांचा अभंग मला आठवत आहे—'कळावया वर्म । हा तो पायाचाची धर्म ॥' तेव्हा त्यांच्याच शब्दात 'तुका म्हणे सिद्धि । हेंचि पाववावी बुद्धी ॥' अशी मनापासून प्रार्थना करून मी विराम करतो.

कार्तिक शुद्ध पौर्णिमा<br>शके १८८३

**'अप्रबुद्ध'**

ॐ श्रीनरसिंहसरस्वती सद्गुरुभ्योनमः ।

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

श्रीअप्रबुद्ध यांच्या निर्याणानंतर त्यांच्या ग्रंथांची व लेखांची व्यवस्था करण्याचे काम आपआपल्यापरी अनेकांनी केले. परंतु त्या कामाला व्यवस्थित व टिकावू स्वरूप येणे अवश्य होते, त्यासाठी 'श्रीअप्रबुद्ध विचार साधना' या संस्थेची निर्मिती झाली व आता ती पंजीबद्धही झाली आहे.

'श्री आळंदीचे स्वामी' या प्रासादिक ग्रंथाचे प्रकाशक कै. प. पू. श्रीअप्रबुद्ध होते त्यामुळे त्याचे पुनर्मुद्रण करण्याची जबाबदारी ओघानेच या संस्थेवर आली. ती यथामती, यथाशक्ती पार पाडण्याचा प्रयत्न केला आहे. हल्लीच्या काळात ग्रंथ प्रकाशनाचे हे खर्चाचे व जिकीरीचे कार्य श्रीकृपेनेच पार पडू शकत आहे यात शंका नाही.

ज्या अनेकांचे साहाय्य झाले त्या सर्वांचा ऋणनिर्देश करणे शक्य नाही. परंतु नारायण मुद्रणालयाचे मधुसूदन पांडुरंग बनहट्टी व श्रीकृष्ण पांडुरंग बनहट्टी यांनी अत्यल्प वेळात हे काम, स्वतःचेच समजून अतिशय परिश्रमाने सुबकपणे करून दिले याचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. त्याचप्रमाणे श्री. रा. पां. लिमये, मुंबई यांनी मुखपृष्ठाचे व आतील अनेक ब्लॉक उत्कृष्टपणे तयार करून दिले आहेत. त्यांनी हे काम सेवा म्हणून केले आहे तरी त्यांचेही आभार मानायलाच पाहिजेत.

ग्रंथ प्रकाशनामध्ये सर्वात जिकीरीचे काम प्रुफे तपासणे; ते श्री. भालचंद्र मधुकर वर्तक व सौ. अपर्णा यांनी अंगावर घेतले म्हणूनच इतक्या लवकर प्रकाशन होऊ शकले. त्यांना हा नामनिर्देश केलेला आवडणार नाही असे असले तरी तो अवश्य आहे.

मागील आवृत्तीप्रमाणेच या ग्रंथाचे जे उत्पन्न येईल ते श्रीनरसिंव्हसरस्वती-स्वामीमहाराज संस्थान, श्री आळंदी (देवाची) यांचेकडे श्रीसेवा म्हणून अर्पण केले आहे.

श्रीअप्रबुद्ध विचार साधनेच्या कार्याचा श्रीगणेशा या ग्रंथप्रकाशनाने होत आहे हे सर्वच तऱ्हेने औचित्यपूर्ण झाले आहे. आमच्या सर्वांच्या अल्प मर्यादित शक्ती लक्षात घेता, असा श्रीगणेशा, आम्ही श्रीस्वामींचा या कार्याला आशीर्वादच समजतो. यापुढेही अशीच सेवा आमचेकडून श्रीस्वामींनी करून घ्यावी ही नम्र प्रार्थना.

नागपूर
कार्तिक शु. प्रतिपदा शके १९०७
बुधवार दि. १३–११–८५

**वि. श्री. गोखले**
अध्यक्ष
श्रीअप्रबुद्ध विचार साधना, नागपूर

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

॥ श्रीनरसिंव्हसरस्वती सद्गुरुभ्योनमः ॥

# लेखकाचे मनोगत

## १. संकल्प

**' न होय तें कार्य अंगिकारी । आतां पडिलों चिंता–सागरीं । '**

शके १८८१ चे ज्येष्ठ महिन्यात श्रीक्षेत्र आळंदी ( देवाची ) निवासी श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामीमहाराज यांचे मठात आठदहा दिवस राहण्याचा योग काही कारणाने आला. त्या वेळी श्रीमहाराजांचे गादीवरील विद्यमान अधिपती श्रीभक्त माधवबुवासाहेब यांनी अशी प्रेरणा केली की, महाराजांचे चिंतन व सेवा करण्याचा एक मार्ग म्हणून, महाराजांबद्दल जी जी माहिती मिळेल ती गोळा करावी. त्याच दिवशी, मठात असलेल्या ग्रंथांतून आढळलेली माहिती व ऐकावयास मिळालेली माहिती यांची टिपणे करावयास सुरुवात केली. पुढे हळूहळू जास्त माहिती मिळविण्याची इच्छा उत्पन्न झाली, व ती सर्व चरित्ररूपाने संकलित करण्याचा मनाशी संकल्प केला. पण नुसता संकल्प करून कार्य होते का ? माहिती मिळविण्यासाठी जसजशी खटपट सुरू केली, तसतसा अनुभव येऊ लागला की, हे काम फार कठीण आहे. संदर्भ ग्रंथ—ज्यांत महाराजांबद्दल उल्लेख आहेत––मिळविण्यासाठी फार प्रयत्न करावे लागले. महाराजांच्या शिष्यमंडळींना किंवा त्यांच्या वंशजांना पत्रे पाठविणे वगैरे काम फारच बिकट होऊ लागले. संकल्पाप्रमाणे कार्य आपल्या हातून कसे पार पडेल याविषयी मनाला एकसारखी चिंता लागून राहिली. त्यामुळे वर म्हटल्याप्रमाणे **' न होय ते कार्य अंगिकारी । आतां पडिलों चिंता–सागरीं । '** अशी मनाची स्थिती झाली.

कोणत्याही महान पुरुषाचे चरित्र योग्य, ज्ञानी व अधिकारी व्यक्तीकडून लिहिले जावे अशी बहुजनसमाजाकडून अपेक्षा असते. या दृष्टीने पाहता लोकांचा माझ्या बाबतीत अपेक्षाभंग होईल. श्रीमहाराजांचे लीलाचरित्र इतके व्यापक, अगम्य व अद्भुतरम्य आहे की, **' दैवी विभूति–सेवा–महति । वर्णितां शिणले महामती ॥ '** किंवा श्रीविष्णुमहाराजांनी महाराजांचे आरतीत म्हटल्याप्रमाणे **' वेद शेषा मौन पडे । वर्णितां तव यशा । '** अशी जेथे ज्ञानवंतांची स्थिती होते तेथे माझ्यासारख्या मंदमतीची वाणी ते वर्णन करून सांगण्यास असमर्थ ठरेल यात नवल ते काय ?

चरित्रलेखकाला लागणारे गुण किंवा चरित्रलेखनाच्या तंत्राचे ज्ञान यांचा पूर्णपणे माझ्या ठिकाणी अभाव आहे हे प्रांजळपणे कबूल करावेसे वाटते. आयुष्यात केवळ उदरभरणाच्या उद्देशानेच विद्यार्जन केलेले; शास्त्रे, संतवाङ्मय यांचा अभ्यास नाही; साधू, सत्पुरुष यांचा सहवास किंवा त्यांच्या कृपेचा अनुभव नाही; वाडवडिलांच्या पुण्याईचा वारसा सांभाळण्याची पात्रता अंगी नाही, अशाप्रकारे गुणापेक्षा अवगुणांचा साठा ज्याचे ठिकाणी आहे, अशा व्यक्तीने श्रीमहाराजांचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करणे म्हणजे एक मोठेचे साहस आहे. त्यामुळे या चरित्रात अनेक दोष आढळून आल्यास त्यात आश्चर्य ते काय ? संत तुलसीदासासारख्याने देखील रामायण लिहून झाल्यावर 'लडके लडकेपन करतेहि है' असेच उद्‌गार काढले ! तेव्हा विद्वान व अधिकारी लोकांना हे चरित्र म्हणजे एक पोरखेळ वाटेल. तरी 'वेडेंवाकुडें गाईन परी तुझा म्हणवीन' या संतवचनाप्रमाणे केलेला हा एक अल्पसा प्रयत्न आहे व त्या दृष्टीनेच या प्रयत्नाकडे पाहावे अशी नम्र विनंती आहे. श्रीसंत दासगणूमहाराजांची सुद्धा **'स्वामीची ती अगम्य लीला । मी न समर्थ वर्णण्याला । पाकोळीने नभोमंडळा । कैसें आक्रमण करावे ।।'** असेच उद्‌गार त्यांनी रचलेल्या ओवीबद्ध श्रीमहाराजांचे त्रोटक चरित्रात काढले आहेत. हे चरित्र म्हणजे माझा काहीच पराक्रम नाही. बुद्धिदात्या महाराजांनी जशी बुद्धी दिली किंवा विचार सुचविले त्याप्रमाणे लिहिले आहे. तेव्हा **'ग्रंथकर्तृत्व नव्हे माझें । मग दूषणांचें कायसें ओझें ।।'** असे म्हटल्यावाचून राहवत नाही.

## २. चरित्रसाधने

अनेक साधुसंत व सत्पुरुष याचा महाराजांशी संबंध आला आहे. अशांच्या चरित्रात महाराजांबद्दल काहीना काही उल्लेख अथवा माहिती दिलेली आढळते. या बहुतेक सर्व ग्रंथांतील माहितीचा मी मुक्तपणे उपयोग केला आहे. विशेषतः करून ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या श्रीअप्रबुद्धांनी लिहिलेल्या चरित्रात महाराजांबद्दल पुष्कळच माहिती दिलेली आहे. त्या सर्व माहितीचा मी आयतोब्यासारखा सर्रास उपयोग केला आहे.

महाराजांचा ज्यांना सहवास लाभला किंवा ज्यांच्यावर महाराजांनी अनुग्रह केला व ज्यांनी महाराजांना प्रत्यक्ष पाहिले आहे अशी मंडळी आज तुरळकच सापडतील. एक दोन व्यक्ती अशा भेटल्या, पण आज त्यांनी वयाची इतकी मर्यादा गाठली आहे की त्यांना महाराजांविषयी माहिती सुसंगतपणे सांगता येणे शक्य नाही. स्मरणशक्तीला ताण देऊनही त्यांना फारच थोडी माहिती देता आली. भ्रमधर्माप्रमाणे ! त्यांनी दिलेल्या माहितीत विसंगती दिसून येते यांत

काहीच आश्चर्य नाही. सेवानिवृत्त पोस्टमास्तर नारायणराव भावे यांची गेल्या वर्षी नागपूरला भेट झाली होती. नारायणराव भावे हे अगदी लहान असतानाच त्यांचे आईवडील वारले. त्या वेळी ते इतके लहान होते की त्यांच्या आई-वडिलांची नावे सुद्धा त्यांना माहित नव्हती. केवळ पूर्वपुण्याईनेच महाराजांची व त्यांची गाठ पडली. महाराजांनी त्यांचा लहानपणापासून प्रतिपाळ केला. महाराजांनीच सांगितले म्हणून त्यांना आपले नाव व उपनाव तरी माहित झाले. महाराजांनी त्यांची मुंज लावली व त्यांच्याच कृपेने नारायणरावांना पोष्टात नोकरी लागली व पुढे संसार केला. आज नारायणराव भावे शंभराच्या घरात आहेत. कोणत्याच इंद्रियावर त्यांचा ताबा नाही. मग सुसंगत माहिती ते कोठून सांगणार ! महाराजांचा शिष्यसंप्रदाय फार मोठा आहे. शिष्यांच्या विद्यमान वंशजांना पत्रे पाठवून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या वाड-वडिलांच्या तोंडून ऐकलेल्या हकिकती किंवा आख्यायिका काहींनी लिहून कळविल्या. आपल्याकडे आठवणी, आख्यायिका किंवा अनुभव यांची नोंद करून ठेवण्याची पद्धत नाही. त्यामुळे कितीही काळजी घेतली तरी अशा माहितीत चुका किंवा विसंगती असण्याचा बराच संभव आहे. अशा तऱ्हेने मिळविलेली माहिती म्हणजे केवळ स्मृतीचा खेळ. शिवाय, श्रद्धा आणि उत्साहाच्या भरांत अतिशयोक्ती करण्याच्या स्वभावधर्माला अनुसरून काही माहितीत हाही दोष आढळल्यास नवल ते काय ? काही मंडळींनी विनंतीपत्राची बिलकूल दखल घेतली नाही. महाराजांची स्वतःची इच्छा त्यांचे चरित्र कोणी लिहू नये किंवा छापू नये अशी होती, ही गोष्ट पुष्कळांच्या ऐकिवात असल्यामुळे कित्येक शिष्यांच्या वंशजांनी माहिती पुरविण्यास नकार दिला. त्यांच्या श्रद्धेला धक्का देण्याची माझी इच्छा नाही. महाराजांचे एकनिष्ठ भक्त कै. हरी उद्धव धोत्रे यांचे नातू श्रीभक्त वि. वि. धोत्रे, नारायण पेठ, पुणे २ यांनी मात्र महाराजांच्या इच्छेच्या व अप्रत्यक्ष परवानगीच्या 'शकुन चिन्हाची' खात्री घेऊन त्यांचे आजोबा व तीन चुलते यांचे अनुभव व आख्यायिका मोठ्या आनंदाने कळविल्या. शिवाय चरित्रलेखनकार्याला महाराजांचा आशीर्वाद आहे असे स्पष्ट कळविले.

आळंदीत येऊन स्थिर होण्यापूर्वी महाराज इतक्या ठिकाणी फिरले की, त्या सर्व ठिकाणी स्वतः जाऊन माहिती गोळा करणे अशक्य आहे. तसेच त्यांच्या सर्व शिष्यांचे अनुभव व हकीकती गोळा करणे शक्य नाही. त्यामुळे महाराजांच्या परिवारांतील काही निकट शिष्यांचा नामनिर्देश सुद्धा या चरित्रात आढळला नाही तर त्यांत आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. वर्तमानपत्रात जाहिरात देऊन माहिती मागविता आली असती, पण कोणत्याही प्रकारचा विशेष गाजावाजा न करता हे काम करण्याचे प्रथमपासून ठरविल्यामुळे वर्तमानपत्राचा या कामात

आश्रय घेतला नाही. या चरित्रात संकलित केलेली माहिती ही महाराजांच्या समग्र चरित्राचा कितवा हिस्सा आहे हे सांगणे फार कठीण आहे; कारण त्यांचे संपूर्ण चरित्र कोणालाच माहीत नसावे. महाराजांची लीला अनंत आहे. अनंत सागरांत अनेक रत्ने असूनही ती प्राप्त व्हावीत या हेतूने बुडी मारणाऱ्याच्या हातास फारच थोडी लागतात, त्याप्रमाणे या लीलारूपी रत्नाकरांतून जी थोडी रत्ने हाती आली ती शब्दरूपी कोंदणांत बसवून त्यांना चरित्राचा आकार देण्याचा प्रयत्न केला आहे.

एखाद्या श्रेष्ठ व्यक्तीचे चरित्र लिहिताना लागणारी माहिती गोळा करण्याचे काम वाटते तितके सोपे नाही. त्या व्यक्तीच्या वंशजाजवळसुद्धा माहिती उपलब्ध नसते. एखाद्या लहानशा कुटुंबाचा इतिहास लिहावयाचा तर कुटुंबियांना आजोबा किंवा पणजोबाच्या नावापलीकडे बाकीच्या पूर्वजांच्या नावाबद्दल माहिती नसल्याचे आढळून येते. आपल्याकडे माहिती मिळण्याची साधने फारशी उपलब्ध नसतात. अशा परिस्थितीत पाश्चिमात्यांशी तुलना करणे अयोग्य होईल. इंग्लंडमध्ये राणी एलिझाबेथच्या झग्याची मापे काय होती व ती कोणत्या प्रसंगाला कोणता पोषाख करीत होती याची तपशीलवार माहिती एखाद्याला मिळावावयाची असल्यास ती मिळविण्याची साधने तिकडे उपलब्ध असतील. हस्तलिखित ग्रंथ, बाड, दप्तरे, इत्यादि यांची आपल्याकडे दुर्दशा असलेली आढळून येते. ती सांभाळून ठेवण्याबद्दल एक प्रकारची अनास्थाच दिसून येते. ज्योतिर्पंत महाभागवतांच्या 'भागवताचे' दोन अध्यायांची हस्तलिखिते भ. भा. भू. कै. आजगावकरांना बोहऱ्याच्या दुकानात सापडावी हे ह्याच अनास्थेचे उदाहरण होय. श्रीगुरुचरित्र कथानायक श्रीनरसिंव्हसरस्वती यांचा जन्म कारंजा (वऱ्हाड) येथे ज्या वाड्यात झाला तो वाडा ७०–७५ वर्षांपूर्वी कै. श्रीमंत बापूसाहेब घुडे यांना विकण्यात आला. त्या वेळी जितक्या किंमतीला तो वाडा विकला तितक्याच किंमतीची काळे घराण्यातील जुनी कागदपत्रे वाण्याच्या दुकानात रद्दी म्हणून गेली; आणि उरलीसुरली कागदपत्रे रेल्वेने नागपूरला एका इतिहाससंशोधकाकडे रवाना झाली. त्याबरोबरच श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामी व त्यांचे घराणे याबद्दलची महत्त्वाची माहिती व पुरावे नष्ट झाले असतील. यावरून प्रत्येक घटनेला किंवा आख्यायिकेला लेखी पुरावे गोळा करण्याचे काम किती अवघड आहे याची कल्पना येईल.

## ३. संशोधनशास्त्र आणि संतचरित्रे

भारतवर्षावर आजपर्यंत अनेक संकटे आली आणि ती निघूनही गेली. परंतु या सर्व संकटात इंग्रजी राजवटीचे संकट फारच मोठे आणि बिकट होते याविषयी

काही दुमत होईल असे वाटत नाही. कारण या संकटाचे स्वरूप इतके मायावी होते की, त्याची जाणीव अजूनही चांगल्या चांगल्या विद्वानांनाही होत नाही. ही गोष्ट आता आबालवृद्ध जाणतात की, राष्ट्राचे राष्ट्रत्व जर कशात असेल तर ते त्याच्या 'अस्मितेत' असते; आणि ही अस्मिता ज्या अनेक मूलभूत तत्त्वांवर राष्ट्रातील लोकांचे जीवन आधारलेले असते, त्यांत असते. ती अस्मिताच जर नष्ट झाली म्हणजे राष्ट्राची तिच्यावरील निष्ठा नाहीशी झाली आणि समज तोच राहिला तरी ते राष्ट्र नष्ट होईल व तेथे दुसरे राष्ट्र उत्पन्न होईल. इंग्रजांनी पहिल्यापासूनच असे धोरण ठेवले होते की, लोकांच्या लक्षात न येऊ देता, त्यांच्या भावनांवर प्रत्यक्ष आघात न करता, युक्तिप्रयुक्तीने आणि धीमेपणाने त्यांची 'अस्मिता'च नष्ट करावयाची, आणि हे काम त्यांनी किती कौशल्याने केले हे आता स्पष्ट करून सांगण्याचीही गरज नाही इतकी त्याची जाणीव आबालवृद्धांस झाली आहे. आणि या त्यांच्या प्रयत्नास केवढे यश आले आहे हे सर व्हॅलेंटाईन चिरोल सारखे हिंदुद्रोही आणि सर जॉन वुड्रॉफ सारखे हिंदुप्रेमी यांच्यासारख्यांच्या स्पष्टोक्तीवरून दिसून येईल.

खरे पाहिले तर या काळामध्ये, घटोत्कचाच्या मायावी बाजाराने यादव नागवले गेले तसे, नुसते नागवलेच न जाता आमचे संपूर्ण ख्रिस्तीभवनच व्हावयाचे. परंतु विश्वाच्या रंगभूमीवर भारतीय राष्ट्राचे अजून काही तरी कार्य उरलेले आहे असे दिसते. त्यामुळे अशाही अवस्थेत या कालनेमींना आपले कार्य पूर्णपणे झाल्याचे समाधान न मिळता थोडे तरी आम्ही ते केलेच असे मानण्यावर समाधान मानावे लागले. ('Out of the ancient world of India, we have raised a new Indian middle class, with one foot, perhaps still lingering in Indian civilization, but with the other certainly planted in Western civilization.' — Sir Valentine Chirol.) इंग्रजांच्या कुटिल नीतीचा असा परिणाम होण्यास ज्या काही गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांत गेल्या शतकात ज्या कित्येक थोर संतविभूती होऊन गेल्या त्यांचे अस्तित्व हे एक प्रमुख कारण आहे. सामान्य जनतेची तर गोष्टच सोडा, परंतु इंग्रजी शिक्षणाने भारावलेल्या फार मोठ्या जनसमूहाचाही एक पाय त्यांनी स्वसंस्कृतीत डांबून ठेवला, या ऐतिहासिक कामगिरीस क्वचितच कोठे तोड सापडेल.

महाराष्ट्रात ही गोष्ट अर्थातच काही अपूर्व नाही. ती महाराष्ट्राची परंपराच आहे. ही परंपरा ज्यांनी फार मोठ्या प्रमाणात चालविली त्यात श्रीआळंदी येथे ज्यांची समाधी आहे त्या श्रीसद्गुरु नरसिंव्हसरस्वतींचेही फार मोठे स्थान आहे. किं बहुना त्याकाळी हुमणाबादचे श्रीमाणिकप्रभु, अक्कलकोटचे श्रीनरसिंव्हभारती आळंदीचे श्रीनरसिंव्हसरस्वती, भोरचे दत्तंभटजी, राजापूरचे काका पुराणिक

इत्यादि संतदिग्गजांनी सावरून धरले नसते तर धर्म आणि संस्कृती ह्या गोष्टी आज प्राचीन इतिहासात जमा झाल्या असत्या. (हे अर्थातच मी महाराष्ट्रापुरते लिहीत आहे. इतर प्रांतातही भगवान रामकृष्णांसारखे ईश्वरी पुरुष होऊन त्यांनीही तेच कार्य केले.) विशेष आश्चर्याची गोष्ट ही आहे की, पुण्यासारख्या महाराष्ट्राच्या केंद्रस्थानाच्या अत्यंत सन्निद्ध असूनही श्रीनरसिंव्हसरस्वती यांच्या कार्याची कोणास विशेषशी माहिती असलेली आढळून येत नाही. आणि दिवसेंदिवस तर ती लुप्तच होत आहे. पौष शु॥ पौर्णिमेस पुण्यतिथीला मोठ्या भक्तिभावाने त्यांचा प्रसाद घेणाऱ्या हजारो पुणेकरांना देखील आज त्यांची किती माहिती असेल कोण जाणे !

असे होण्याचे मुख्य कारण हेच आहे की, त्यांचे स्वतंत्र चरित्र असे आजपर्यंत लिहिण्यात आलेच नाही. संत दासगणूंनी आपाततः लिहिलेला एक अध्याय, श्रीशाळिग्राम यांनी केलेला थोडासा प्रयत्न अथवा श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्रात श्रीअप्रबुद्धांनी दिलेली थोडी माहिती किंवा अलिकडे श्रीपादबुवा गांधी यांनी प्रसिद्ध केलेल्या आठवणी यांच्यापलीकडे जवळ जवळ काही नाही म्हटले तरी चालेल. असे का व्हावे याची कारणमीमांसा पुढे केली आहे.

श्रीनरसिंव्हसरस्वतींच्या या त्रोटक चरित्रावरून अर्वाचीन माणसाचे समाधान होण्याच्या ऐवजी त्याची जिज्ञासाच जास्त जागृत होते. विशेषतः त्यांच्यासंबंधी दोन प्रश्न फार घोटाळ्यात टाकतात. याचे कारण Sir Charles Elliot ने म्हटल्याप्रमाणे श्रीमहाराजांसारख्या विभूतीपासून अथवा त्यांच्या चरित्रापासून आपणास प्रत्यक्ष काय मिळविता येईल असा विचार त्यांच्या डोक्यात फारसा येत नाही. म्हणून ते युरोपियन लोकांच्या पद्धतीप्रमाणे महाराज खरोखर कोठले, कोणच्या प्रांतातले, त्यांचे वय काय, इत्यादि अवांतर गोष्टींचेच फाजील स्तोम माजवितात. (The Hindus want to know whether a man can make use of them in his religious experiences and aspirations. They care little for the date, authorship, unity and textual accuracy of the Bhagwat Gita. They simply ask is it true, what can I get from it ? The European critic who expects nothing of the sort from the work, racks his brains to know who wrote it and when, who touched it up and why.) खरे पाहिले तर श्रीमहाराजांसारख्या सिद्ध पुरुषाचे बाबतीत Sir Charles च्या म्हणण्याप्रमाणे धारणा असली पाहिजे. परंतु पाश्चात्यांच्या अनुनयाने संशोधन म्हणून अलीकडे जे एक शास्त्र उत्पन्न झाले आहे त्याचा पगडा काही केल्या विद्वान म्हणविणारांच्याही अंतःकरणांतून जात नाही. आणि म्हणून पुष्कळ आस्थे-

वाईक, लोकही महाराजांच्या आयुष्यातील जे दोन मोठे कूटप्रश्न म्हणजे ते मूळ कोणत्या प्रांतातले आणि गाणगापूरच्या नरसिंव्ह सरस्वतींशी त्यांचा खरोखर संबंध काय, याचा संशोधन करून छडा लावू पाहतात. म्हणून त्या दृष्टीने थोडासा विचार करणे आवश्यक आहे.

परंतु त्यापूर्वी असल्या संशोधनाचे खरे स्वरूप काय असते हे थोडे लक्षात आणून देणे भाग आहे. या संशोधनशास्त्रावर भरवसा असणाऱ्या विद्वानांचे एकंदर लिखाण पाहिले म्हणजे स्वत:चे ऐतिहासिक लेखन जाळून टाकणारा Sir Walter Raliegh हा मोठा शहाणा होता असे म्हणावेसे वाटते. प्रसिद्ध इतिहासाचार्य प. वा. श्री. सरदेसाई यांनी म्हटल्याप्रमाणे 'लेखनांतील मते ही नेहमी ज्याची त्याची असतात. म्हणूनच व्यक्तींनी लिहिलेल्या इतिहासात निर्भेळ सत्य फारच अल्प असते. तसे पाहिले तर निर्भेळ सत्य मनुष्याला अवगत होतच नाही.' (केसरी २५ मे १९५८) आणि पुष्कळ लेखकांचे ऐतिहासिक लेखन पाहिले म्हणजे यात फार सत्य आहे असे वाटू लागते.

याचे कारण उघड आहे. कारण असल्या तऱ्हेच्या लेखनांत तर्कशास्त्रापेक्षा तर्कशक्तीलाच जास्त वाव असतो. प्रत्यक्ष पुरावा असा फारसा उपलब्ध नसतो. पुरावा म्हणून ज्या काही गोष्टी गोळा केलेल्या असतात त्या अर्थातच फार थोडया, संदिग्ध, तुटपुंज्या आणि अव्यस्थित अशा असतात. त्यामुळे भगीरथ प्रयत्न करूनही त्यांची एकजात एकसारखी साखळी बनविता येत नाही. तिच्यात खिंडारे ही राहतातच. आणि डॉ. आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे ती खिंडारे लेखक स्वत:च्या कल्पनेप्रमाणे भरून काढतो. त्यामुळे त्याच्या समजुतीतील दोष जसेच्या तसेच त्यांच्या तर्कातही उतरतात. येथे संशोधनशास्त्राचा जास्त विचार करावयाचा नाही. तरी देखील त्याचे काही थोडे नमुने दाखविणे क्रमप्राप्त आहे. कारण श्रीमहाराज हे प्रत्यक्ष दत्तच होते, ते दत्तावतार होते अथवा सिद्धपुरुष होते या साऱ्या कल्पनांचा ऐतिहासिक पद्धतीने थोडाबहुत विचार केलेला आढळतो.

यापैकी दशावतारासंबंधाने पुष्कळशी चर्चा श्री. ढेरे यांच्या दत्तसंप्रदायाच्या इतिहासामुळे आणि श्रीअप्रबुद्ध यांच्या 'द्वितीय दत्तावतारा'च्या चरित्रामुळे जनतेपुढे आलेली आहे. तेव्हा त्याचा जास्त विचार करण्याचे कारण नाही. असल्या प्रकारच्या साऱ्या संशोधनात, भगिनी निवेदिताने म्हटल्याप्रमाणे लेखकाचे ग्रहच कसे प्रभावी ठरतात ते थोडक्यात पाहू. उदा० जनार्दनस्वामींचे गुरु कोण हा मोठाच वाद आजकाल उत्पन्न होऊ पाहात आहे. आजपर्यंत अशी समजूत होती की, जनार्दनस्वामींना प्रत्यक्ष दत्तात्रेयांचा अनुग्रह होता. अलीकडच्या संशोधनाने या समजुतीस धक्का देण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्ण व्हावयास

मनुष्याला गुरूची आवश्यकता आहे किंवा नाही या वादात येथे शिरावयाचे नाही. मनुष्याला पूर्ण होण्यास मानवी गुरूचीच आवश्यकता आहे, प्रत्यक्ष ईश्वरही गुरु होऊ शकत नाही असाही एक वाद आहे, त्या वादात येथे जास्त शिरण्याचे कारण नाही. श्रीरामकृष्ण म्हणत असत त्याप्रमाणे काही झाडांना ईश्वरकृपेने आधी फळ येऊन मागाहून फुले येतात, त्याप्रमाणे ईश्वरकृपेने परिपूर्णता झाली असतांनाही एक प्रारब्धाचा भाग म्हणून मानवी गुरु केल्याचीही उदाहरणे आहेत. त्याप्रमाणे जनार्दनांचा कोणी मानवी गुरु उल्लेखिलेला असला तरी प्रत्यक्ष दत्तात्रेयाचा त्यांना अनुग्रह होता ही गोष्ट असंभाव्य नाही.

गुरुपदेशासंबंधी काही गोष्टींकडे अर्वाचीन संशोधनात अगदीच दुर्लक्ष केलेले आढळते. भागवतांतील अवधूतांचे चोवीस गुरु अथवा श्री समर्थांची 'जेथें कांही विशेषगुण । तें तें सद्गुरुचे अधिष्ठान ।।' ही व्याख्या बाजूस ठेविली तरी गुरु म्हटला म्हणजे तो एकच असला पाहिजे अशी कल्पना फारच दृढ दिसते. वैदिक धर्मातील साधनांची अनेकता लक्षात न घेता या कल्पना केल्या जातात. विद्यागुरु म्हणजे शास्त्रासारख्या व्यावहारिक विद्यांचे गुरु, योगविद्येचे गुरु, मंत्रविद्येचे गुरु, मोक्षगुरु, दीक्षा देणारे गुरु असे कित्येक गुरु साधकास असतात आणि प्रसंगानुसार यांचे उल्लेख सारख्याच आदराने येतात. उदाहरणार्थ श्रीनरसिंहसरस्वती यांचे कृष्णसरस्वती हे संन्यास देणारे गुरु होते. श्रीमहाराजांच्या या चरित्रात सांगितल्याप्रमाणे गुरुपरंपरा सांप्रदायस्तोत्रांत वासुदेव म्हणून कोणी गुरु सांगितले आहेत. परंतु यामुळे घोटाळण्याचे काही कारण नाही. कारण ते योगपट्टाचे गुरु आहेत. जनार्दनस्वामींसंबंधी जो वाद निघाला आहे, त्यासंबंधीही हीच गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. या वादात काही काही गोष्टी लक्षात घेतलेल्या नाहीत आणि जे आपल्या तंत्रांत बसत नसेल ते खुशाल प्रक्षिप्त म्हणावे या शिष्टाचाराचा फार अवलंब केला आहे. असे करीत असताना तात्कालीन लोकसमजुती तर मुळीच लक्षात घ्यावयाच्या नसतात ! उदाहरणार्थ, श्रीनरसिंह सरस्वती, गोरक्षनाथ अथवा दत्तात्रेय यांच्यासारख्या विभूती या चिरंजीव असून स्वेच्छेने हवे तेव्हा भक्तास दर्शन देऊ शकतात अशी दृढ श्रद्धा आहे. तिला अनुसरून जर काही उल्लेख असतील तर ते अप्रमाण का मानावे ? लोकांच्या श्रद्धा हेहि एक ऐतिहासिक सत्य नाही काय ? जनार्दस्वामींचे अभंग बारकाईने पाहून दुसऱ्याचे मानण्याची आवश्यकता का पडते तर त्यात दुर्वर्तनाचे वर्णन आहे म्हणून. असे करताना हे जन्मांतरी केलेल्या कर्मांचे वर्णन आहे असे त्यांनी स्वत: म्हटले असले तरी त्यांची श्रद्धा म्हणूनही ते प्रमाण मानता येत नाही ! कारण अर्वाचीन संशोधकाचे बुद्धीत ते बसत नाही आणि गोल्ड स्टकरने (Gold Stucker) त्यांच्या विषयी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या

कल्पनांना तर शास्त्रीय सत्याची किंमत असते! (As if their personal feelings had all weight of scientific arguments.) जनार्दनस्वामींनी आपले अभंग नरसिंव्हसरस्वतींना उद्देशून लिहिलेले आहेत. परंतु ते त्यांचे असणे शक्य नाही. का तर स्वामींच्या निर्याणात आणि जनार्दनांच्या जन्मात ४५ वर्षांचे अंतर आहे. तेव्हा तो जनार्दन दुसरा कोणी असला पाहिजे. आजही वासुदेवानंद सरस्वतींनी नरसिंव्हसरस्वतींच्या साक्षात्काराची वर्णने लिहिली आहेत. आणि त्यांच्या काळात पुष्कळच अंतर आहे. तेव्हा हे वासुदेवानंदसरस्वती कोणीतरी वेगळे असले पाहिजेत असे हे संशोधक न म्हणोत म्हणजे झाले ! तरी बरे आहे. नरसिंव्ह सरस्वतींच्या निर्याणाचा काल अजून अनिर्णित आहे. श्री. ढेरे यांनी आपल्या पुस्तकात श्रीअप्रबुद्धांच्या मतांचा विचार करण्याचा घाट घातला आहे. परंतु जे त्यांनी म्हटले नाही त्याचाच आरोप त्यांच्यावर केला आहे. शके १४४० तला बादशहा विजापूरचा आहे, असे अप्रबुद्धांनी कोठेही म्हटले नाही. इतकेच नाही तर ती घटना बेदरास घडली असे त्यांचे स्पष्ट लिहिणे असूनही (महाराष्ट्र, दिवाळी अंक १९५१) त्याच्या अगदी उलट सिद्धान्त त्यांच्या गळयात अडकविला आहे. याला म्हणावे संशोधन !

हे काही असले तरी असल्या विभूती चिरंजीव असून केव्हाही दर्शन देऊ शकतात अशी दृढ श्रद्धा आज देखील आहे.* आणि तिला अनुसरून जनार्दनांनी

* वऱ्हाडातील मेहकर येथील सुप्रसिद्ध श्री. दादासाहेब सोमण यांना गुरुस्थानी असलेले व तेथे ज्यांची समाधी आहे, त्या श्री. नथ्थुसिंग दादांची हकीकत, या संबंधात, लक्षात ठेवण्याजोगी आहे. श्री. नथ्थुसिंग दादा हे एक झाकले माणिक होते. भगवान रामकृष्ण परमहंसांनी नरेंद्राची ज्याप्रमाणे स्पर्शाने समाधी लावून दिली तशी लावून देण्याइतका त्यांचा अधिकार असून त्यांनी प्रगट न होण्याची पराकाष्ठा केली. लहानपणी हे आकोला येथील कोर्टात प्रोसेस सर्व्हेअरचे कामावर काही काळ होते. त्यांच्या कुटुंबास पिशाचबाधा झाली म्हणून त्यांनी पुष्कळ उपाय केले. परंतु त्यांचा काही उपयोग झाला नाही. तेव्हा शेवटचा उपाय म्हणून ते गाणगापुरास जावयास निघाले. त्यावेळी हल्लीचे गायगाव स्टेशन नसून डाबकी हे स्टेशन होते. डाबकी आणि पारस ह्या दोन स्टेशनांच्या मध्ये कोठेतरी आगगाडीतच त्यांना श्रीगोरखनाथांचे दर्शन झाले व "गाणगापुरास जाण्याचे कारण नाही. परत जावे. पादुका स्थापन करून त्यांची पूजाअर्चा करावी आणि परमामृत वाचीत जावे." असा आदेश झाला. 'पादुकांच्या तीर्थाने बाधा दूर होईल' असे सांगण्यात आले. पारस स्टेशनावर उतरून नथ्थुसिंग आकोल्यास परत आले आणि आज्ञेप्रमाणे त्यांनी कार्यक्रम सुरू केला. पिशाचबाधा दूर झाली. असा काही काळ गेल्यावर त्यांच्या मनात असे आले की, आपण परमामृत रोज वाचतो तेव्हा त्याचा अर्थ कळला पाहिजे. ते स्वतः कान्यकुब्ज ब्राह्मण असून मराठीचे ज्ञान त्यांना व्यवहारापुरतेच होते. आणि परमामृत म्हटला म्हणजे तर शास्त्रीय विषय. तेव्हा कसे काय व्हावे या चिंतेत ते बाहेर उभे असता पुन्हा गोरक्षनाथांनी दर्शन दिले आणि कसली चिंता म्हणून विचारले. त्यावर दादांनी

(पुढील मजकूर पुढच्या पानावर)

नरसिंव्ह–सरस्वतीचे वर्णन केले असले तर त्यावरून ते अभंग दुसऱ्याचे कसे काय ठरतात ?

जनार्दनांचे गुरु चांदबोधले होते असे मानण्यास योग–संग्रामांतील उल्लेख, शेख महंमदाचा अभंग आणि कोणा मुकुंदराजाचे लिहिणे याशिवाय दुसरा काही आधार नाही. चतुःश्लोकी भागवताची स्फूर्ती चंद्रभटापासून मिळाली असेल तर त्यात काहीच वावगे नाही. आणि कदाचित चंद्रभटांनी उत्तरवयात सुफींची दीक्षाही घेतली असेल अथवा योगासारख्या काही विषयांचा अभ्यासही जनार्दनांनी त्यांच्यापाशी केला असेल, पण तेवढ्यावरून श्रीनरसिंव्हसरस्वती हे त्यांचे गुरू नव्हते अथवा दत्तात्रेयाचा त्यांना अनुग्रह नव्हता हे कसे काय अनुमान निघते हे कळत नाही. भगवान श्रीरामकृष्णांचे उदाहरण पाहिले तर असे दिसते की जिज्ञासेने अशा गोष्टी करूनही त्यांचे गुरु तोतापुरी हेच होते आणि त्यांच्या उपास्यदैवतांचा त्यांना नित्य सहवासही होता. तशीच गोष्ट जनार्दनांची आहे

---

(मागील पानावरून पुढे चालू)

परमामृत समजावून द्या म्हणून विनंती केली. तेव्हा सांगण्यात आले की 'चांगली इच्छा आहे. मला स्वतःला तर वेळ नाही, परंतु तुझी सोय करतो.' त्याच वेळी पलीकडे एक कुणब्याची वृद्ध बाई शेतात काम करीत बसली होती. 'तिला जवळ ठेव, ती तुला अर्थ सांगेल,' असे सांगून गोरक्षनाथ गुप्त झाले. दादांनी त्या बाईला पुढे जवळ ठेवले. रात्री पादुकांची पूजा होऊन आरती झाली म्हणजे ती बाई परमामृताचे विवरण करीत असे. तेवढी वेळ गेली म्हणजे आपण काय बोललो हे तिचे तिलाच आठवत नसे. वर सांगितल्याप्रमाणे दादांना जो अधिकार प्राप्त झाला तो त्या बाईच्या विवरणाप्रमाणे अभ्यास करूनच झाला.

आता येथे महत्त्वाची गोष्ट ही आहे की, ही गोष्ट संशोधनशास्त्राच्या सारणीत कशी बसवावयाची ? काही प्राचीन काळची गोष्ट नाही. दादांचा आणि त्या बाईचा परिचय असलेले लोक आजही हयात आहेत. हिच्यावरून गोरक्षनाथांचा काळ ठरवावयाचा का नथ्थुसिंग दादांना अभिनवगुप्ताचा समकालीन बनवावयाचा ? ते गोरक्षनाथ वेगळे आणि हे गोरक्षनाथ वेगळे, का सर्व भोळसटपणाचा आणि थापेबाजीचा प्रकार समजावयाचा ? श्रीअप्रबुद्ध यांनी म्हटल्याप्रमाणे असे चमत्कार खरे का खोटे हा ऐतिहासिकांचा प्रश्न नाही. असे अनुभव येतात आणि त्याप्रमाणे माणसाच्या जीवनावर परिणाम घडतात, असे सांगणारे प्रामाणिक लोक जगात आहेत हीच गोष्ट महत्त्वाची आहे; आणि मनुष्याच्या चरित्राला इतिहासात जितके स्थान आहे तितकेच स्थान त्या चरित्राची घडण घडविणाऱ्या घटनांनाही आहे. अशा स्थितीत अजून अज्ञात असलेल्या अतींद्रिय अशा शास्त्रांचा तो विषय असेल असे म्हणून त्या घटना जशाच्या तशाच देणे एवढ्या-पुरतीच जबाबदारी ऐतिहासिकांची आहे. असे करतांना कित्येक गोष्टींची संगती लावता येत नसेल तर डॉक्टर विंटरानत्झने म्हटल्याप्रमाणे त्या बाबतीतील आपली असमर्थता उघड उघड कबूल करणे हीच खरी शास्त्रसेवा आहे. गोल्ड स्टकरने वेबरच्या बाबतीत म्हटल्याप्रमाणे आपल्या टीचभर माहितीप्रमाणे वाटेल तशी तर्कटे करून न्यायमूर्ती कुड्राफने म्हटल्याप्रमाणे स्वतःला जे समजत नाही ते नसलेच पाहिजे असली विधाने करून वाचकांची दिशाभूल करणे हे नुसतेच इतिहासाचे शास्त्र नाही तर राष्ट्रद्रोहही आहे.

असे म्हटले तरी तेवढ्यावरून परमार्थाच्या क्षेत्रात जनार्दन हे भेदांना (म्हणजे अर्थातच वर्णभेदांना) थारा देणारे नव्हते आणि नाथ साहित्यावर सुफी सांप्रदायाचा उभयविध प्रभाव जाणवतो तो कसा काय हे समजत नाही. या प्रभावाचे श्री. ढेरे जास्त स्पष्टीकरण करतील तर फार बरे होईल.

या सर्व बाबतीमध्ये जो खरा पुरावा आहे तो अगदीच नजरेआड केला जातो. या बाबतीत सर्वात प्रमाण नाथमहाराजच धरले पाहिजेत. त्यांच्या वाङ्मयांत याचा कोठेही ओझरता उल्लेख कां नाही ? चांदबोधला हेच दत्तात्रेय असा जर उभयतांचा अनुभव होता तर तसा स्पष्ट उल्लेख त्यांच्या वाङ्मयात येण्यास काय हरकत होती ? त्यांच्या वाङ्मयावरून तर तसा काहीही संबंध दिसत नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की चंद्रभटाची गाठ नाशीकच्या परिसरात झाल्याचे स्पष्ट आहे. आणि दत्तात्रेयाचे दर्शन देवगिरीस सूर्यकुंडावर झाले हेही स्पष्ट आहे. तेव्हा दोघे एक कसे ? नाथभागवतामध्ये दत्तात्रेयांचे कलियुगांतील प्रमुख शिष्य म्हणून जनार्दनांचा उल्लेख आहे. तो दत्तात्रेय म्हणजे हा चांदसाहेब कादरी कां ? सहस्रार्जुन, यदु हे जनार्दनाचे गुरुबंधु म्हटले आहे. त्यांना उपदेश देणारा हा चांदबोधलाच काय ?

> **ब्रह्मा अत्रीते सांगत । ब्रह्मज्ञान हृदयीं भरित ।**
> **अत्रीपूर्णकृपें-स्थित । दत्तात्रेया सांगतसे ॥**

चांदबोधल्याला अत्रीचा उपदेश होता काय ?

यावर अशी एक शंका येते की मग, 'चांदबोधला मूळ । जनार्दन खोड ।' असा तरी समज कसा रूढ झाला ? येथे एक गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की नरसिंव्हसरस्वती आणि जनार्दन यांच्या काळातला फरक श्री. ढेरे यांच्या लक्षात आला आहे. परंतु मुकुंदराज अथवा शेख महंमद आणि चांदबोधले यांच्या काळातला फरक त्यांच्या लक्षात आलेला नाही. त्यांनी तरी का असे लिहावे, याचे उत्तर सरळ आहे. चांदबोधल्याचा आणि जनार्दनांचा संबंध असल्यामुळे आज ज्याप्रमाणे अक्कलकोटच्या स्वामींचे भक्त श्रीनरसिंव्हसरस्वती त्यांचेच शिष्य होते, असे आपल्या गुरूच्या भक्तीमुळे प्रतिपादतात, तशीच ती गोष्ट असण्याचा संभव आहे. यापलीकडे तर्कशुद्ध आधार काहीही नाही. इतर कोणच्याही प्रमाणापेक्षा नाथांना जास्त प्रमाण मानावे हे बरे.

श्री. ढेरे यांचा नाथ-संप्रदायावरील ग्रंथ वाचला असता देखील असेच चमत्कार त्यात आढळतात. प्रथमतः त्या संबंधी लक्षात येत असेल, ते हे की, प्रमाण व्यवस्था अशी त्यात काहीच नाही. नरसिंव्हसरस्वती ह्यांच्या कालातले अंतर त्यांना जाणवते परंतु त्यांनी आधारास घेतलेल्या ग्रंथांचे काल पाहिले

म्हणजे मन आश्चर्याने थक्क होते ! मत्स्येंद्र आणि मीन या नावासंबंधीही झालेला घोटाळा पाहून बेटी हेमान या पाश्चात्य लेखिकेची आठवण होते. तिने असें म्हटले आहे की, भारतीय ग्रंथात मुख्य कल्पना कायम ठेवून समानार्थी विशेषणांचा उपयोग केलेला असतो व ती पाहिली की युरोपियन लेखक गोंधळून जातात. (A synonym may be inserted in proper names also.) यांचे उदाहरण म्हणून तिने कणाद, कणभुक, कणभक्ष, कणभक्षण या एका व्यक्तीस अनुलक्षून असलेल्या संज्ञेचे दिले आहे. परंतु हा स्वतंत्र लेखाचा विषय असल्यामुळे श्री. ढेरे यांची येथेच रजा घेऊन आपल्या विषयाकडे वळू.

एवढा सारा प्रपंच करण्याचे कारण हेच की श्रीनरसिंव्हसरस्वती काय आणि अक्कलकोटचे स्वामी काय या लोकोत्तर विभूतींचे सर्वच काही अलौकिक असते. म्हणून त्यांच्या बाबतीत लौकिक नियमांची चौकट लावून पाहणे व्यर्थ आहे. तशी चौकट लावून जे काही निष्पन्न होईल त्याने फार झाले तर एखाद्या संशोधकाला समाधान होईल; परंतु ते सत्यच असेल असे नाही. श्रीमहाराज ज्याप्रमाणे बहुरंगी होते तसे फक्त तेच होऊन गेले असे मानण्याचे कारण नाही. त्यामुळे इतिहासशास्त्राची कसोटी त्यांना लावण्याच्या भानगडीत न पडता त्यापासून काय आनंद व लाभ घेता येईल त्याकडेच लक्ष द्यावे हे बरे. नाहीतर आपल्या क्षुद्र कल्पनांनी त्या थोर पुरुषांचाही अवमान होतो. उदाहरणार्थ, आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ श्रीनाथांनी चांदभटाचे गुरुत्व मुद्दामच लपवून ठेवले असे म्हणणे जे आत्मधैर्य आजकालच्या एखाद्या स्वयंसेवकात असते अथवा रिडले लॅटीमर सारख्या एखाद्या पाद्रयात असते ते देखील श्रीनाथांजवळ नव्हते, म्हणजे ते भित्रे असून लबाड होते, असे म्हणण्यासारखे आहे. नाथ संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यांची ऐतिहासिक चर्चा करताना देखील कित्येक वेळा असे प्रकार घडतात. आज, मागे सांगितलेल्या नथ्थुसिंग दादाप्रमाणे गोरक्षांचा किंवा गहिनीनाथांचा आपल्याला अनुग्रह असल्याची श्रद्धा असलेले प्रामाणिक सत्पुरुष सापडतात. म्हणून त्या श्रद्धेचा कालनिर्णयास उपयोग होईल काय ? इतिहासांतील आणि वाङ्मयातील नवनाथांसंबंधाचे अनेक उल्लेख या वर्गातील असण्याचा संभव आहे. इतकेच नाही तर 'नाथ' या उपाधीने मिरविणारेही काही संप्रदाय आहेत आणि त्यांचा नवनाथांशी काही संबंध नाही. उदाहरणार्थ वऱ्हाडातील सुप्रसिद्ध मारकीनाथ घ्या. त्यांच्या संप्रदायाचे मुंबईच्या सुवर्ण प्रिंटींग प्रेसने छापलेले "वेदान्त रत्नमाला" म्हणून जे पुस्तक आहे, त्यात असे स्पष्ट म्हटले आहे की, तो शुद्ध भागवत सांप्रदाय आहे. नाथसंप्रदायाशी त्याचा काहीही संबंध नाही. '**त्या ग्राम संबंधे करून । मारकी नाथ हे अभिधान । प्रसिद्ध झाले म्हणून जन । मारकीनाथ जल्पती ॥**

**या रूढीस्तव शिष्यजन । हा नाथ संप्रदाय म्हणोन । गुरुनामी नाथाभिधान । आवडीने योजिती ।। परी हा भागवत सांप्रदाय । परंपरा श्री नारायणान्वय । '***
अशी एकंदर परिस्थिती पाहिली म्हणजे डॉ० विटरनित्झचे म्हणणे शहाणपणाचे वाटू लागते. तो तर प्रांजळपणे असे म्हणतो की अशा प्रकारची अचाट तर्कटे करून लोकांची व स्वतःची दिशाभूल करण्यापेक्षा काही गोष्टींचा उमज पडत नाही, असे प्रामाणिकपणे म्हणणे हेच शास्त्रास खरोखरच उपकारक आहे. ( It is better service to science to confess our ignorance than to deceive ourselves & others by producing dates which are no dates. )

श्रीमहाराजांच्या कालनिर्णयासंबंधी हेच धोरण पुढे ठेवले आहे. गाणगापूरचे श्रीनरसिंव्हसरस्वती तेच हे असून त्यांनी योगबलाने आपला देह ठेविला होता, अशी अनुभविक श्रद्धा असलेले धुळचाचे श्रीबुवासाहेब, श्रीअण्णासाहेब पटवर्धन, यांच्यासारखे त्यांचे अधिकारी शिष्य होते एवढे येथे नमूद करून ठेवतो. त्याबद्दल आग्रह असण्याचे कारण नाही. वाटल्यास त्यांना चतुर्थ श्रीदत्तावतार म्हणावे अथवा सिद्ध पुरुष समजावे.

त्यांचे जन्मस्थान व प्रांतीयता इत्यादि संबंधाने एवढे मात्र म्हणता येते की स्वात्मसौख्यातील एक दोन पारिभाषिक शब्द अथवा स्वतःस वाटणारी त्यांची ठेवण, यापलीकडे त्यांना द्राविडी अथवा कानडी म्हणण्यास काही पुरावा

---

* मारकीनाथ—वेदान्तरत्नमालेच्या 'उपदेश सार लहान' या विषयाच्या आठव्या प्रकरणात मारकीनाथांचे अल्प चरित्र वर्णन करून सांगितले आहे. वऱ्हाडात चंद्रभागा नदीच्या तीरी दर्यापूर म्हणून एक गाव आहे. तेथे बाबाजी नांवाचे कण्व शाखेचे एक ब्राह्मण वैश्य वृत्तीने उदरभरण करीत असत. त्या योगे ते धनसंपन्न झाले. वृद्धपणी त्यांना एक मुलगा झाला पण तो बाळपणीच मरण पावला. या घटनेमुळे बाबाजींच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले. घरादाराचा त्याग करून ते पयोष्णी म्हणजे पूर्णा नदीच्या तीरी असलेल्या स्थूलग्रामाजवळील मारकी या गावी आले. बारा वर्षे मौन धरून त्यांनी मारकी येथे तप केले. मारकी हे बाबाजींच्या गुरूचे स्थान. मारकी या ग्रामाच्या संबधावरून बाबाजींचे नांव मारकीनाथ असे पडले. श्रीमारकीनाथांच्या प्रीत्यर्थ चैत्र शु॥ पौर्णिमेस मारकी येथे अजूनही मोठी यात्रा भरत असते.

श्रीमारकीनाथ हे नाथसंप्रदायांतले नाहीत. श्री ढेरे यांनी मात्र त्यांचा नाथ संप्रदायाशी संबंध जोडला आहे. अर्थात् तो कसा चुकीचा आहे हे वर दाखविले आहेच पूज्य गोविंदाचार्य यांचे दोन शिष्य झाले. कलियुगात संन्यास प्रतिपादन करणारे श्रीशंकराचार्य एक व दुसरे 'विवर्णाचार्य.' विवर्णाचार्यांनी भागवत संप्रदाय चालविला. मारकीनाथ या भागवत संप्रदायातले. वरील उपदेशसार प्रकरण ८ मध्ये या संप्रदायाची गुरुपरंपरा दिली आहे. 'मध्ययुगीन चरित्र कोश ' पृष्ठ ६३४ वर मारकीनाथ म्हणजे वरील बाबाजी नामक कण्व शाखेच्या गृहस्थास वृद्धपणी झालेला सुपुत्र असे म्हटले पण ते चुकीचे आहे. बाबाजी हेच स्वतः मारकीनाथ या नावाने उदयास आले.

नाही. जी काही माहिती उपलब्ध आहे ती सर्व एकजात एकूण त्याविरुद्ध आहे. तिच्यावरून ते महाराष्ट्रीय असून विदर्भातलेच होते, असे आज तरी म्हणण्यास हरकत नाही. 'श्रीस्वात्मसौख्य' ग्रंथासंबंधी पुढे लिहावयाचे आहे. त्यावरून दिसून येईल की त्या ग्रंथाची भाषा अगदी स्वतंत्र असून पारिभाषिक आहे. त्याप्रमाणे व्यंकटेश, व्यंकटरमण या शब्दांचा अर्थ सद्गुरु असा आहे. श्रीज्ञानेशांनी 'व्यंकटी' शब्द दुष्टपणाच्या अर्थाने योजला आहे. तोच महाराजांनी मुमुक्ष या अर्थाने योजला आहे. मुमुक्षूंचा जो ईश अथवा आनंद देणारा तो व्यंकटेश किंवा व्यंकटरमण. मुमुक्षूचे हेच लक्षण आहे की त्याची सर्व क्रिया बद्धाप्रमाणे असली तरी चालणारा मनुष्य आंग मोडून मागे पाहतो त्याप्रमाणे त्याला थोडी अंतर्मुखता आली असते. म्हणून महाराजांनी त्यांना 'व्यंकटी' असे म्हणून सद्गुरूंना 'व्यंकटेश' असे म्हटले आहे.

जाता जाता आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. श्रीस्वात्मसौख्य हा ग्रंथ केवळ सांप्रदायिक आहे. माझ्या वडिलांकडून तो, त्यांना ज्येष्ठ बंधूसारखेच असलेले रावबहादुर स. मा. परांडे यांना मिळाला, आणि तेथून तो सहजच गोस्वामी पृथ्वीगीर हरिगीर यास मिळाला. आणि त्यांनी त्याचा उपयोग आपल्या 'गोसावी व त्यांचा संप्रदाय' या पुस्तकात केला आहे. त्यांनी त्याचे नाव 'स्वात्मबोध' लिहिले आहे ते चुकीचे आहे. त्याचप्रमाणे गौडाचार्यांचे शिष्य शंकराचार्य म्हटले आहे. तेव्हा छापतांना गोविंदाचार्यांचा विसर पडला हे उघड आहे. या ग्रंथाची साक्ष त्यांनी कशाकरिता काढली आहे हे समजणे कठीण आहे. अद्वैत मताला अनुसरणारा प्रत्येकजण मठाम्नायाप्रमाणे गिरी, भारती, पुरी, आनंद, स्वरूप, चैतन्य इत्यादि उपपदे धारण करतो हे खरे आहे. परंतु ही उपपदे धारण करणारा प्रत्येक इसम आचार्यांच्या परंपरेतला आहे असे म्हणणे तर्कदुष्ट आहे. उदाहरणार्थ, श्रीरामकृष्ण मिशनचे संन्याशी 'आनंद' ही उपाधी लावतात. परंतु आचार्यपरंपरेतील संन्याशांशी तिचा काही संबंध नाही. भगवान रामकृष्ण हे मात्र तोतापुरींच्यामुळे शृंगेरी परंपरेतील असून रामकृष्णपुरी आहेत. त्याचप्रमाणे "श्रीनसिंव्हसरस्वती यांचे शिष्य कृष्णचैतन्य– त्यांचे व्यंकटेशचैतन्य–त्यांचा स्वानंदचैतन्य– त्यांचा कृष्णानंद. हा कृष्णानंद वऱ्हाडातील कारंजाचा राहणारा. याने स्वात्मबोध नामक वेदान्तपर ग्रंथ लिहिला आहे." म्हणून लिहिले आहे, ते सर्वस्वी कपोलकल्पित आणि अयथार्थ आहे.

## ४ साधुसंत आणि चमत्कार

महाराजांच्या या चरित्रात चमत्कार आणि आख्यायिका यांची रेलचेल आढळेल. कोणत्याही देशातील, धर्मातील किंवा समाजातील साधुसंतांचे जीवन पाहिल्यास ते अद्भुत घटना किंवा अलौकिक चमत्कार यांनी नटलेले दिसेल.

साधुसंतांना चमत्कार मुद्दाम करावे लागत नाहीत तो त्यांचा सहजगुण असतो. लोकांनी वाहवा करावी किंवा मान द्यावा म्हणून 'चमत्कारावाचून नमस्कार नाही ' या न्यायाने त्यांचे हातून चमत्कार घडत नाहीत. गारुड्याप्रमाणे चमत्कार दाखविणाऱ्या साधूंबद्दल विदर्भस्थ सत्पुरुष श्रीरंगनाथ महाराज तर असे म्हणत असत की, " चमत्कार दाखवील तो डुकराच्या पोटचा. स्वतः अधोगतीला जाते व दुसऱ्यालाही नेतो. गोरक्षानं मुतता मुतता सोन्याचा डोंगर केला, तरी पण कच्चाच ठरला." साधुसंतांच्या चरित्रातून चमत्काराचा भाग वगळला तर त्यांचे चरित्र थोडेसे नीरस वाटण्याचा संभव आहे. हल्लीच्या वैज्ञानिक युगात चमत्कार म्हणजे सब झूट असे म्हणण्याकडे बुद्धिवादी माणसाची प्रवृत्ती झाली आहे. अर्थात एक गोष्ट कबूल करावयास पाहिजे की सर्वच चमत्कारात तथ्य असेलच असे नाही. काही अनुयायी आपल्या गुरूची प्रतिष्ठा वाढविण्याकरिता त्याच्या नावावर अनेक खोटे चमत्कार दडपून देत असतात. अशा भोंदू गुरुशिष्यांपासून लोकांनी सावध राहिले पाहिजे. चमत्कार खरेच होतात की नाही, हाही मोठा वादाचाच प्रश्न आहे आणि त्याचा सर्वमान्य असा निकाल केव्हाच लागणे शक्य नाही. चमत्कार होणे शक्य आहे की नाही, याचे उत्तर फक्त ज्याचे अंगात चमत्कार दाखविण्याचे सामर्थ्य आहे तोच देऊ शकेल. महाराष्ट्रभाषाभूषण कै. आजगांवकर यांच्या म्हणण्याप्रमाणे एखाद्या वांझ स्त्रीने स्त्रियांना संतती होणे शक्य नाही, असे कितीही ओरडून सांगितले तरी ते कोण मान्य करणार ! तसेच चमत्कार करणारे लोक आजही आढळून येत असता चमत्कार होणे शक्य नाही, असे कोण कबूल करील ! पाश्चात्य देशात या विषयावर पद्धतशीर व अभ्यासपूर्वक संशोधन होत आहे. तसे आपल्याकडे होत नाही ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

चमत्कार म्हणजे सर्व थोतांड आहे अशी आपल्याकडील संशोधकांची समजूत होऊन बसली आहे व त्यामुळे इकडील ' साधुसंतांची चरित्रे हरदासी ढंगानी लिहिलेली, स्तोत्र पुराणांच्या अनुकरणांनी भरलेली व चिकित्सेचा अभाव असणारी आहेत व त्यांत वास्तवता नाही ' अशी संशोधकांची ओरड आहे. कदाचित् ऐतिहासिकदृष्टचा पूर्वीच्या संतचरित्रकारांनी कसोटचा लावून पाहिल्या नसतील, पण त्यांत आलेल्या कथा किंवा वर्णन केलेले अद्‌भुतरम्य चमत्कार यांत अगदीच सत्यांश नसेल असे म्हणणे धाडसाचे होईल. पाश्चात्यांचे अनुकरण आपण आंधळेपणाने आजपर्यंत करीत आहोत पण त्यांच्या शोधक बुद्धीचे अनुकरण मात्र करीत नाही. चमत्कार कसे घडले असतील याचा उलगडा करणे आपल्याकडील संशोधकांच्या आवाक्याबाहेरचे असते आणि म्हणून जे स्वतःला पटत नाही ते सर्वथा असत्य, असे म्हणण्यास ते मागेपुढे पाहत नाहीत.

सर्व देशात आणि सर्व समाजांतील लोकांत, क्षेत्राच्या ठिकाणी किंवा मंत्र, स्तोत्रे किंवा प्रार्थना यामुळे, असाध्य वाटणारे रोग बरे झाल्याच्या कथा आपण नेहमी ऐकतो. सर्पदंश किंवा वृश्चिकदंश यामुळे होणरी विषबाधा मंत्राने दूर केल्याची किती तरी उदाहरणे दाखवून देता येतील. श्रीगुरुचरित्रात कुष्ठनिवारणाची किंवा वंध्या स्त्रीला संतती झाल्याची वर्णने आहेत. अर्धशिशी म्हणजे अर्धे डोके दुखण्याची व्यथा दीड दिवसात, तीन वेळा मंत्र टाकल्याने नाहीशी करता येते, हे मी स्वानुभवाने सांगू शकतो. हे सर्व कसे शक्य आहे ह्यांचा सांगोपाग विचार न करता त्यावर 'सब झूट'चा शिक्का मारणे आहे योग्य होणार नाही.

मानवी मन म्हणजे शास्त्रज्ञांना न उकललेले एक कोडे आहे. 'Man' and 'Matter' या शब्दावरील कोटिक्रमापलिकडे पाश्चात्य शास्त्रज्ञांनी फारच थोडी प्रगती केली आहे. आता त्यांना पटावयास लागले आहे की मनुष्याच्या शारीरिक प्रक्रिया (Physical activities) आणि मन:स्थिती यांचा फार घनिष्ट संबंध आहे. Dr. Alexis Carell याने आपल्या 'Man the Unknown' या पुस्तकात Mental activities (मानसिक प्रक्रिया) या प्रकरणात याचे फार सुंदर विवेचन उदाहरणासहित केले आहे. शृंगारिक चेष्टांमध्ये स्त्रियांच्या चेहऱ्यावर लाली उत्पन्न होते किंवा भय उत्पन्न झाल्यावर मनुष्याचा चेहरा पांढराफटक पडतो. बेल्जममधील एका स्त्रीला फाशीची शिक्षा सुनविण्यात आली. फाशी जाण्याच्या पूर्वी रात्री तिचे सर्व केस एकाएकी पांढरे झाले. अति दु:खद बातमीने मनुष्य मृत्यू पावू शकतो. अशी अनेक उदाहरणे या संबंधात त्यांनी दिली आहेत. आध्यात्मिक प्रक्रियांनी (Spiritual activities) सुद्धा मनुष्याच्या शरीरात काही बदल होऊ शकतात. या संबंधात Dr. Alexis Carell म्हणतो, "Certain spiritual activities may cause anotomical as well as functional modifications of the tissues and the organs. These organic phenomena are observed in various circumstances, among them being the state of prayer." प्रार्थनेचे विषय कसे असले पाहिजेत याविषयी तो पुढे म्हणतो, "Prayer should be understood not as mere mechanical recitation of formulas, but as a mystical elevation, an absorption of conciousness, in the contemplation of a principle both permeating and transcending our world. It is incomprehensible to philosophers, and scientists, and inaccessible to them. But the simple seem to feel God as easily as the heat of the sum or the kindness of a friend. The prayer which is followed by organic effects is of a special nature. First it is entirely disintersted. Man offers himself to God. He stands

before Him like the canvas before the painter or the marble before the sculpter. At the same time, he asks for His grace, exposes his needs and those of his brother in suffering. Generally the patient who is cured is not praying for himself, but foranother. Such a type of prayer demands complete renunciation that is, a higher form of asceticism. The modest, the ignorant and the poor are more capable of this self—denial than the rich and the intellectual. When it possesses such characteristics, prayer may set in motiona strange phenomenon, the miracle.' प्रार्थनेमध्ये किती शक्ती असते हे वरील अवतरणावरून सहज लक्षात येईल. भारतीयांना वरील विचारसरणी नवीन नाही. पण भौतिकशास्त्रात पाश्चात्यांनी केलेल्या प्रगतीमुळे ज्यांचे डोळे दिपून गेलेले आहेत अशा लोकांना, एका पाश्चात्य शरीरशास्त्रज्ञाची विचार-प्रणाली कशी आहे हे कळून यावे एवढ्या उद्देशानेच वरील लांबलचक अवतरण दिले आहे. फ्रान्समधील लार्डेस (Lourdes) येथे बरे होणाऱ्या असाध्य रोगाच्या हकीकती आता सर्वश्रुत आहेत. त्याविषयी नव्याने सांगण्याची आव-श्यकता नाही. लार्डेस येथे रोग बरे होण्याच्या चमत्कारासंबंधी Dr. Alexis Carell म्हणतो, "The miracle is chiefly characterised by an extreme acceleration of the process of organic repair. There is no doubt that the rate of cicatrisation of the anotomical defects is much greater than the normal one. The only condition indis-pensable to the occurrence of the phenomenon is prayer. But there is no need for the patient himself to pray, or even to have any religious faith. It is sufficient that some one around him be in a state of prayer. Such facts are of profound significance. They show the reality of certain relations, of still unknown nature, between psychological and organic processes. They prove the objective improtance of the Spiritual activities, which hygienists, physicians, educators and sociologists have almost neglected to study. They open to man a new world.' आपल्या इकडील साधुसंतांनी अनेक लोकांना रोगमुक्त केल्याच्या हकीकती आहेत. मंत्रजप, स्तोत्रपठण किंवा ईश्वराची प्रार्थना यांनी रोग नाहीसे होण्याचे चमत्कार कसे होऊ शकतात हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. 'योगसिद्धि आणि ईश्वरसाक्षात्कार' या ग्रंथाचे कर्ते डॉ. वि. म. भट, पुणे ४, यांचा हृदयरोग घालविण्याकरिता श्रीअक्कलकोटच्या स्वामींनी 'ललिता स्तोत्र' वाचण्यास त्यांच्या भक्ताला स्वप्नदृष्टान्त देऊन सांगितले. किंवा 'मनुष्य काय

देईल ?' असा संदेह मनात धरून येणाऱ्या नंदी नामक ब्राह्मणाच्या जंघेवरील शेष राहिलेले कुष्ठ श्रीगुरुंची स्तुती करून नष्ट झाले, यांतील रहस्य प्रार्थना आणि शारीरिक प्रक्रिया यांचे संबंध लक्षात घेता समजून येईल.

मंत्रतंत्रावर आधारलेल्या व्रतवैकल्यात किंवा अनुष्ठानात प्रार्थनेचा भाग असून अनुष्ठानकालात मनावर व आचरणावर विशेष ताण पडत असल्यामुळे इष्ट गोष्टींची प्राप्ती साधकाला होऊ शकते. वर श्रीगुरुचरित्रातील ३९ व्या अध्यायात वर्णन केलेला वृद्धवंध्या संतानप्राप्तीच्या चमत्काराचा उल्लेख आलेला आहे. या चमत्कारावर, महाराष्ट्रात एका काळी लोकप्रिय झालेल्या 'बुवाशाही विध्वंसक संघाचे' संस्थापक व हिंदुसमाजसेवक श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनी आपल्या 'ब्रह्मज्ञान व बुवाशाही' या पुस्तकात पुढीलप्रमाणे कठोर टीका केली आहे. 'श्रीगुरुचरित्रातील चमत्कारही असेच प्रज्ञाहत करणारे आहेत. साठ वर्षाच्या वांझ स्त्रियेला म्हणे गुरुकृपेने पुत्र झाला ! साठ वर्षाची स्त्री झाली व ती वांझ असली तरी तिला पुत्र होणार नाही असे नाही. तिचा विटाळ थांबला नव्हता. तिचा नवरा जिवंत होता आणि त्या उभयतांमधील प्रजननशक्ती प्रबळ असल्यामुळे साठ वर्षानंतर सुद्धा मूल होणे मुळीच अशक्य नव्हते. बोलाफुलाला गाठ पडली म्हणजे भोळ्या माणसांना ते चमत्कार वाटतात, तसाच तो गुरुचरित्रातील चमत्कार होय !' दिवेकरशास्त्री भोळे नाहीत. चांगले शास्त्री पंडित आहेत. पण त्यांनी श्रीगुरुचरित्र तरी नीट वाचले आहे की नाही याविषयी शंका येते. यातील अचाटपणा असा आहे की वरील चमत्काराशी संबंध असलेल्या वांझ स्त्रीचा विटाळ थांबला नव्हता असे जे त्यांनी विधान केले आहे ते साफ खोटे आहे. कारण खुद्द श्रीगुरुचरित्रात यासंबंधीचा उल्लेख पुढील ओव्यात आहे. श्रीगुरूंनी जेव्हा त्या वांझ स्त्रीला '**इह जन्मीं तूं तें जाण। कन्यापुत्र सुलक्षण। होतील निर्गुंति म्हणोन।**' असा आशीर्वाद दिला त्या वेळी ती वांझ स्त्री हात जोडून श्रीगुरूला म्हणाली, '**साठी वर्षे जन्मासी। जाहली स्वामी परियेसी। होत नाहीं विटाळसी। मातें कैंचे पुत्र होती।**' म्हणजे तिने स्पष्टच सांगितले की मी विटाळशी होत नाही. असे असता शास्त्रीबोवांनी तिचा विटाळ थांबला नव्हता असे विधान ठोकून दिले ! विटाळशीच होत नाही तर प्रजननशक्ती कोठून प्रबळ असणार ! एकदा दूषित दृष्टिकोण झाल्यावर सत्य दडपून टाकून असत्य विधान करण्याची बुद्धी विद्वान लोकांनाही कशी होते याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. कावीळ झालेल्या माणसाला सर्व जग पिवळे दिसते त्यातलाच हा प्रकार ! अश्वत्थ वृक्षाचे आयुर्वेदात फार महत्त्व आहे. तसेच पुंसवन संस्काराशी या वृक्षाचा महत्त्वाचा संबंध आहे. हे लक्षात घेतल्यास श्रीगुरूंनी सांगितलेली अश्वत्थसेवा व त्यामुळे झालेला पुत्रप्राप्तीचा

चमत्कार यात शास्त्रीयता नाही असे कसे म्हणता येईल ? श्रीगुरूंच्या आज्ञ-प्रमाणे तीन दिवस अश्वत्थसेवा केल्यावर त्या वांझेला स्वप्न झाले. त्याप्रमाणे तिने मठात जाऊन श्रीगुरूंनी दिलेली दोन प्रसादफळे भक्षण केली. चवथे दिवशी संध्याकाळी ती विटाळशी झाली. '**व्रत संपूर्ण करोनि । केलें दान तें भामिनी । तेचि दिवशीं अस्तमानीं । झाली आपण विटाळशी** ।' अश्वत्थसेवा केल्यामुळे प्रजननास आवश्यक अशी शरीरधारणा प्रथम निर्माण झाली आणि मग तिला कन्यापुत्र लाभ झाला. सर्वच चमत्कार 'झूट' मानण्याच्या उत्साहात शास्त्रीबोवा घसरले आणि सत्य गोष्टही लपवून वरील चमत्कार म्हणजे 'बोलाफुलाला गाठ' यांतला हा प्रकार असे त्यांनी ठरविले ? न्या. वुड्रॉफ ज्याला क्षुद्र मनोवृत्ती म्हणतो तिचा हा मासला आहे ! (I find a lower mind, everywhere, which says what I do not understand is absurd !)*

अलौकिक चमत्कार करण्याचे सामर्थ्य सिद्धीमुळे प्राप्त होते. 'सिद्धी आत्मसाक्षात्काराला विघातकच असतात' असे पतंजली म्हणतात. सिद्धी ही परमार्थाच्या मार्गातील धोंड आहे व सिद्धीच्या मागे लागणारे खऱ्या परमार्था-पासून वंचित होतात व शेवटी त्यात त्यांचा अधःपात होतो असे नेहमी अधिकारी लोकांच्या बोलण्यात येते. तरी सिद्धीपासून काही फायदे आहेत ही गोष्ट नाकबूल करता येणार नाही. डॉ. दाते म्हणतात त्याप्रमाणे, "सिद्धि म्हणजे यशाच्या पताका." साधकाचा आत्मविश्वास वाढविण्याच्या कामी त्यांचा उपयोग होतो. या विषयावर 'योगसिद्धि आणि ईश्वर साक्षात्कार' हे डॉ. वि. म. भट, पुणे, यांचे पुस्तक वाचनीय आहे.

ब्रह्मर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या म्हणण्याप्रमाणे चमत्कारांचा मुख्य उपयोग, 'मनुष्याच्या मनात ईश्वराच्या सत्तेची खात्री पटून विश्वास उत्पन्न व्हावा व धैर्य यावे एवढाच आहे.' या विषयावर चिदंबरदास राजारामकृत 'पंचपदी अभंग' नामक पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रकाशकाने केलेले विवेचन फार चिंतनीय आहे. ते म्हणतात, "अद्भुत चमत्कार हे सिद्धीच्या योगे होत असतात

---

* श्रीगुरुचरित्र या ग्रंथात काही अद्भुत सामर्थ्य आहे ही गोष्ट 'प्रबोधन'कार ठाकऱ्यां-सारख्या गृहस्थांनीही मान्य केली आहे, हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की या ग्रंथात वाईट करण्याचे तेवढे सामर्थ्य आहे. 'असे का होते ते मला सांगता येणार नाही.' असे ते म्हणतात. बरोबरच आहे. एका स्वतंत्र शास्त्राचा विषय आहे. त्याचा गंधही नसता ते कसे सांगता येईल ? मंत्रशास्त्रात 'सिद्धारीचक्र' म्हणून काही प्रकरण आहे हे त्यांच्यासारख्या विद्वानांना माहीत नसेल असे थोडेच आहे ! 'पण लक्षात कोण घेतो !' एकच औषध काही रोग्यांना अचुक गुण देते तर काहींना अपाय करते. तशीच गोष्ट ही आहे. वाईट का होईना, परिणाम करण्याचे सामर्थ्य श्रीगुरुचरित्रात आहे एवढा अनुभव ते सांगतात हे काही थोडे नव्हे ! ('मार्मिक' साप्ताहिक, वर्ष १ अंक ३१. 'जुन्या आठवणी' क्रम २१.)

आणि सिद्धी म्हटल्या म्हणजे ज्ञानाला प्रतिबंधक होत असे म्हणून काही ज्ञानी लोक व त्यांचे अनुयायी सिद्धींची व सिद्धींची थोडीशी अवहेलना करीत असतात. सिद्धि ज्ञानाला प्रतिबंधक आहेत ही गोष्ट खरी, पण त्या कोणाला ? ज्याचे ज्ञान अपरिपक्व असून देहात्मभाव पूर्णपणे नष्ट झालेला नाही अशा कच्च्या मनुष्याला त्या बाधक होतील. निःसंदेह झालेल्या पूर्ण ब्रह्मनिष्ठास तपाने प्राप्त झालेल्या सिद्धी ह्या लोककल्याणार्थ उपयोगी पडून त्यापासून जनतेचे पुष्कळ हित होते. अवतारिक पुरुषांना तर सिद्धी या नैसर्गिकच असतात. वास्तविक पाहता थोर महात्म्यांच्या या अमानुष सामर्थ्यास 'सिद्धी' म्हणणेच अयोग्य आहे. उज्ज्वल उपासनेने अपेक्षा नसताही प्राप्त झालेले व होणारे हे 'अनंताशी साधर्म्य' होय. प्राकृत महत्त्वाकांक्षा अंतरी धरून केलेल्या योगाभ्यासाने प्राप्त होणाऱ्या योगसिद्धी व निष्काम पण उत्कट प्रेमळ उपासनेने प्राप्त होणारे 'अनंताशी साधर्म्य' अथवा आत्मसिद्धी अगर ईश्वरप्रसादाने प्राप्त होणाऱ्या 'देवसिद्धी' यामध्ये महदंतर आहे. चांगदेवाचे 'चमत्कार' व तुकाराम रामदासादिकांच्या 'लीला' यांचे स्वरूप बहिर्दृष्टीस एकच दिसते पण त्या त्या महात्म्यांच्या योग्यतेत जमीन अस्मानचे अंतर आहे.'

चमत्कारासंबंधी स्वत: महाराजांनी एका ठिकाणी विचार प्रगट केले आहेत, ते सारांशरूपाने पुढे दिले आहेत. सृष्टीचे कल्याण व्हावे ही साधूंची इच्छा असते. साधूंचा स्वभाव असा असतो की, केवळ '**त्याची जाती । करी लाभाविण प्रीति।**' त्यांचे जवळ ज्ञान असते. ज्ञान म्हणजे चैतन्य. आत्मस्वरूप ते ज्ञान. जे एकसारखे प्रकाशक सूर्यासारखे असते ते. ज्ञानाचे ठिकाणी सिद्धीचा उपयोग अगदी नाही. शुद्ध ज्ञानाचा बोध अज्ञानी जनाच्या अंगात अगोदर होत नाही, म्हणून लेकरू अज्ञान आहे. त्याला व्याधी होते. ती व्याधी जाण्यास त्यास औषध देतात. पण ते लेकरू औषध घेत नाही व त्या औषधापासून ते व्याधिमुक्त होईल हे त्या लेकरास समजत नाही. यास्तव थोडी गोड साखर अथवा मध लावून मागून कडू औषध देतात. तसे अज्ञानी जनास शुद्ध ज्ञानाचा बोध लवकर होत नाही. यास्तव साधु मायासिद्धीचे चमत्कार कुपथ्यक आहेत तरी दाखवून नंतर ती सिद्धी मिथ्या आहे असा बोध करतात. जन्म–मरण हीच कोणी व्याधी आहे त्यापासून ते दूर करतात.

गुरूची खरी योग्यता न ओळखता त्याच्या चमत्कारावर लक्ष ठेवून व चमत्कारांचाच बडेजाव करणारे अनेक अनुयायी आढळतात. प्रसंगविशेषी ते आपल्या गुरूच्या नावावर खोटेनाटे अनेक चमत्कार पिकवितात. श्रीरामदासस्वामींनी 'जनस्वभाव गोसावी' म्हणून एक ओवीबद्ध प्रकरण लिहिले असून त्यात अनेक साधुसंतांनी केलेल्या चमत्कारांचा उल्लेख आहे. ते प्रकरण वाचताना असा

भास होतो की श्रीसमर्थांनी असल्या चमत्कारांवर अविश्वास दाखविला आहे. पण ते खरे नाही. त्यात त्यांनी फक्त एवढेच दर्शविले आहे की 'गुरूने केलेले अलौकिक चमत्कार किंवा त्याच्या अमानुष सामर्थ्याच्या गोष्टी सांगून कोणी उद्धरत नाही. निष्काम भजनाने देव प्राप्त होतो व ब्रह्मज्ञानानेच मुक्ती मिळते.'

## ५. श्रीगुरुचरित्र व श्रीमहाराज

श्रीमहाराजांचा सरस्वतीगंगाधराने रचलेल्या श्रीगुरुचरित्राशी फार फार निकट संबंध आहे. श्रीगुरुचरित्रात यांचेच वर्णन आहे अशी सांप्रदायिक श्रद्धा आहे. श्रीगुरुचरित्र म्हणजे महाराजांच्या चरित्राचा पूर्वार्ध आहे. म्हणून श्रीगुरुचरित्राचे कथासूत्र, घटना वगैरे दृष्टीसमोर असल्याशिवाय महाराजांच्या चरित्रातील कित्येक गोष्टींचा बोध होणे शक्य नाही. श्रीगुरुचरित्र व महाराजांचे चरित्र यातील साम्यस्थळे शक्य तेथे स्पष्ट करून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीगुरु नरसिंव्हसरस्वतींच्या अवताराला पांचशे वर्षे होऊन गेली आहेत. इतक्या दीर्घ कालानंतर लेखी पुरावे सादर करणे हे फार कठीण काम आहे. म्हणून काही ठिकाणी श्रद्धाभाव ठेवूनच तर्क किंवा अनुमाने काढावी लागतात. श्रद्धा म्हटली की, ऐतिहासिक संशोधकाच्या दृष्टीतून पाहणाऱ्यांच्या पोटात कळ उठण्याचा संभव आहे. ऐतिहासिक संशोधनाचा विचार मागे या प्रकरणात स्वतंत्रपणे केलाच आहे. सर्वच गोष्टी 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' या सडेतोड तत्त्वाने सिद्ध करता येतीलच असे नाही. तसेच म्हटले तर कोणत्या महाभागाने आपला बाप तरी पाहिला असतो. कायदा सुद्धा हेच तत्त्व मान्य करतो की मातृत्व हे सत्य आहे, पण पितृत्व ही कायद्याने ठरविण्याची गोष्ट आहे. आई मुलाला अमुक तुझा बाप आहे असे सांगते व मूल त्यावर श्रद्धा ठेवते इतकेच. असल्या नाजुक बाबतीत श्रद्धाभंग झाल्यास आयुष्याचा कसा सर्वस्वी नाश होतो याचे एक उत्तम उदाहरण ज्योतिषशास्त्रावरील 'दैवविचार' या पुस्तकात आढळेल. विषयांतराचा दोष पत्करूनही उदाहरण देण्यासारखे वाटले म्हणून मुद्दाम पुढे देतो. 'एका गावात नवराबायको राहत असत. त्यांच्या घरी एक तरणा जवान स्वयंपाकी होता. त्या नवराबायकोस बरीच वर्षे संतती झाली नव्हती. कालांतराने त्या स्वयंपाक्याचा व तिचा संबंध जमला व त्या स्वयंपाक्यापासून त्या बाईस एक मुलगा झाला. पुढे तो मुलगा मोठा होऊन बी. ए. झाला. त्या वेळेस त्या मुलाच्या मनात आपण कोणता कोर्स घ्यावा हा विचार येऊन त्याबद्दल विचारपूस करण्याकरता ज्योतिषाजवळ त्याने आपली पत्रिका नेऊन दाखविली. ज्योतिषाने हा मनुष्य काय विचारतो आहे याचा विचार न करता पत्रिका पाहिल्याबरोबर तुझा पितृपश्चात जन्म झालेला आहे असे सांगितले. त्याने उत्तर दिले की माझा बाप अद्याप जिवंत आहे. ज्योतिषाने

सांगितले की ही गोष्ट शक्य नाही. तुझा जन्म दुसऱ्या पुरुषाकडून झालेला आहे. ही गोष्ट सिद्ध झाली नाही तर ज्योतिष सांगणेच सोडून देईन. हे ऐकल्यानंतर हा गृहस्थ बुचकळ्यात पडला. घरी जाऊन आईला भयंकर त्रास देऊ लागला. त्याळेस त्याच्या आईला खरी गोष्ट सांगणे भाग पडले. आपण स्वयंपाक्याच्या पोटचे आहोत एवढे समजल्यावर वैतागाने निघून जाऊन तो इसम आजपर्यंत बेपत्ता आहे. ती बाई गरोदर असतांनाच तो स्वयंपाकी अपघाताने मयत झाला होता.' श्रद्धाभंग झाल्यामुळे त्या मुलाचा व पर्यायाने त्या घराण्याचा शेवट वाईट झाला. या गोष्टीवरून अनेक तर्क निघू शकतील. तात्पर्य इतकेच की कोणताही मनुष्य मग तो कितीही नास्तिक किंवा बुद्धिप्रामाण्यवादी असो त्याची कोणत्या ना कोणत्या ठिकाणी श्रद्धा ही असतेच. गणितासारख्या अचूक शास्त्रात सुद्धा काल्पनिक संख्यांचे (Imaginary quantities) अस्तित्व स्वीकारलेले आढळते. किंवा विज्ञानासारख्या प्रायोगिक शास्त्रात ईथर (Ether) सारख्या माध्यमाचे अस्तित्व गृहित धरून कित्येक घटनांचे स्पष्टीकरण केलेले आढळते. एखाद्या ऋणकोने मी काही देणे लागत नाही असे विधान केले तर त्याचाच अर्थ देणे त्याला कबूल आहे असा अर्थ कायदा करतो. त्याप्रमाणे नास्तिकाने माझी कशावरही श्रद्धा नाही असे म्हणणे म्हणजे ही सुद्धा त्याची एक श्रद्धाच आहे असा अर्थ होत नाही काय ? तात्पर्य, प्रत्येक मनुष्याच्या जीवनात श्रद्धास्थाने ही असतातच. नास्तिक मनुष्याच्याही हृदयात अगदी कानाकोपऱ्यात श्रद्धा असतेच. फक्त अहंकाराने तो ती कबूल करीत नाही इतकेच. प्रसिद्ध गणिती केरूनाना छत्रे हे नास्तिक होते हे सर्वश्रुत आहे. परंतु त्यांच्या आजीने लहानपणापासून लावून दिलेले तीन नियम—विष्णुसहस्रनाम म्हणणे, शाळिग्रामास तुलसीदल वाहणे व गंध लावणे—त्यांनी अखेरपर्यंत श्रद्धेने पाळले. रोज रात्री निजण्यापूर्वी ते विष्णुसहस्रनाम म्हणत असत. एका प्रसंगी ही गोष्ट नानांचे शिष्य श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या लक्षात येऊन त्यांनी त्याबद्दल नानांजवळ पृच्छा केली. त्यावर नानांनी सांगितले की, देव आहे की नाही या प्रश्नाचा विचार करण्यास त्यांना वेळ कधीच सापडला नाही; व त्या प्रश्नाच्या मागे लागण्याची गरजही त्यांना भासली नाही. परंतु जर खरोखरच देव असला आणि आयुष्याबद्दल मनुष्य त्याला जबाबदार असला तर मात्र मेल्यावर, तो 'आयुष्यात माझ्याकरिता काय केलेस ?' म्हणून विचारील व त्यावेळेस जर काही उत्तर देता आले नाही तर माझी दशा काय होईल ? केरुनाना छत्रे यांच्यासारख्या एका नास्तिकाने दिलेले उत्तर, अहंकारामुळे कशावरच श्रद्धा न ठेवणाऱ्या माणसाची मनोभूमिका कशी असते हे दाखववयास पुरे आहे. श्रद्धेतून अनुभव व अनुभवांतून ज्ञानप्राप्ती होते. म्हणून 'श्रद्धावान लभते ज्ञानम्' असे गीता म्हणते.

पंढरपूर, आळंदी, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर इत्यादि पवित्र स्थळी अशिक्षित पण भाविक लोकांप्रमाणेच सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी जाताना पाहिल्या म्हणजे, किंवा शिर्डी येथील श्रीसाई महाराज किंवा वऱ्हाडातील शेगावचें श्रीगजानन महाराज किंवा अन्य विद्यमान अथवा दिवंगत साधुसंतांच्या भजनी आंग्लविद्याविभूषित लोक लागलेले पाहून निदान महाराष्ट्रांत तरी हल्लीच्या नास्तिकपणाच्या काळातही, श्रद्धेचे बीज चांगलेच रुजते व वाढीला लागते असे कोण म्हणणार नाही ?

## ६. आभारप्रदर्शन

प्रस्तुत चरित्रग्रंथ तयार करतांना अनेक ग्रंथांचा व अनेक विद्वान लोकांच्या वचनांचा आधार घ्यावा लागला आहे. त्या सर्व ग्रंथकर्त्यांचा व विद्वानांचा मी अत्यंत ऋणी आहे. महाराजांचे प्रत्यक्ष शिष्य आज फार थोडया संख्येने विद्यमान आहेत. परंतु त्यांच्या शिष्यांच्या पुत्रपौत्रादिकांनी हकीकती, आठवणी किंवा आख्यायिका पाठवून महाराजांची सेवा करण्यात अमोल साह्य केले आहे. अशा व्यक्तींच्या नावांची यादी करू म्हटल्यास ती फारच मोठी होईल व शिवाय स्मृतिधर्माला अनुसरून एखादे नाव कदाचित राहून जाईल. म्हणून नामनिर्देश न करता मी इतकेच म्हणतो की मी त्यांचा फार आभारी आहे. लहान गावात संदर्भ ग्रंथ मिळविणे फार कठीण. अशा परिस्थितीत काही स्नेह्यांनी संदर्भ-साहित्य मिळवून देण्यात फार परिश्रम केले आहेत, त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

प. पू. श्रीभक्त माधवबुवासाहेब गोडबोले यांनी तर हे चरित्र तयार करण्यास प्रेरणाच दिली आहे. श्रीअप्पबुद्धांनी हस्तलिखित वेळोवेळी नजरेखाली घालून सर्व दृष्टीने मार्गदर्शनही केले. शिवाय त्यांनी प्रस्तावनाही लिहून दिली आहे. त्याबद्दल मी उभयतांचे आभार मानले पाहिजेत; पण त्यांच्याशी असलेला ऋणानुबंध लक्षात घेता मी तसल्या औपचारिकपणांत शिरत नाही.

मुद्रणसोयीकरता चरित्राची स्वतंत्र व सुवाच्य अशी हस्तलिखित प्रत तयार करावी अशी पुष्कळांनी सूचना केल्यावरून ते काम करण्याचे ठरले. या कामात माझे एक स्नेही व सहाध्यायी यांनी मित्रप्रेम व सेवाभाव यांनी प्रेरित होऊन संसारातील व नोकरीतील अनेक अडचणी सहन करून मला बहुमोल मदत केली. त्यांच्या स्वभावानुरूप त्यांनी आपला नामनिर्देश करण्यास संमती न दिल्याने इच्छा असूनही त्यांचा नामोल्लेख टाळावा लागत आहे.

## ७. विनंती

महाराजांचे चरित्र पांडित्यप्रदर्शनाकरिता लिहिलेले नाही. यांत आलेल्या हकिकती, किंवा माहिती शंभर टक्के अधिकृत असे म्हणणे धाडसाचे होईल,

विशेषत:, अलीकडे ऐतिहासिक संशोधनशास्त्र म्हणून जे एक शास्त्र नव्याने निर्माण होऊ पाहत आहे त्याच्या कसोटीला यातील गोष्टी कितपत उतरतील हे सांगणे कठीण आहे. सांप्रदायिक श्रद्धा डोळ्यापुढे ठेवून मिळालेल्या माहितीला चरित्राचा आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांच्या पूर्व वृत्तांताविषयी अजूनही विश्वसनीय माहिती उपलब्ध होत नाही. कोणाजवळ अशी माहिती असेल तर ती त्यांनी जरूर पुढे आणावी अशी त्यांना आग्रहाची विनंती आहे. त्यायोगे महाराजांच्या चरित्रांत जे अनेक कूटप्रश्न आहेत त्यांवर प्रकाश पडून सर्वांसच मोठा लाभ होईल.

लेखक या दृष्टीने माझी स्थिती तर **'न कळे ग्रंथ प्रकार । नेणें शास्त्रांचा विचार ।'** यासारखी आहे. म्हणून प्रस्तुत ग्रंथ चरित्र या संज्ञेस पात्र होईल किंवा नाही याविषयी शंकाच आहे. गेल्या पाऊणशे वर्षांपासून महाराजांबद्दलची माहिती दिवसेंदिवस लुप्त होऊ पाहत आहे. ती तशी होऊ नये म्हणून केलेले हे एक संकलन आहे, एवढे तरी खास म्हणता येईल. दुसरे असे की विद्वत्ता किंवा अधिकार यांचे भांडवल मजजवळ नाही. त्यामुळे कित्येक विषयांची चर्चा करतांना अनेक विद्वानांच्या विचारांचा आणि मतांचा आधार घेतला आहे. स्वत:च्या पदरचे असे काहीच सांगितले नाही. तेव्हा अधिकारी लोकांनी माझी वरील स्थिती लक्षांत घेऊनच या चरित्रग्रंथाकडे पाहावे अशी नम्र विनंती आहे.

या ग्रंथांत अनेक न्यूने आहेत याची मला पूर्ण जाणीव आहे. तरी 'न्यून ते पुरते' करून घ्यावे अशी सर्वांस विनंती करून हे लांबलेले मनोगत पूर्ण करतो.

**—बाळ पाळेकर**

---

टीप— प्रस्तुत ग्रंथांत एक सविस्तर सूची द्यावी, अशी मूळ योजना होती; परंतु स्थलसंकोचास्तव ती रहित केली आहे.

**—लेखक**



' आनंद-स्वरूप ' श्रीमहाराज




श्रीमहाराजांचे हस्ताक्षर



श्रीनरसिंव्हसरस्वती समाधिदर्शन



श्रीअण्णासाहेब पटवर्धन

# श्री आळंदीचे स्वामी

प्रकरण पहिले

## साक्षात् श्रीदत्तावतार

### हे नरसिंव्हसरस्वती स्वामी कोणते ?

श्री क्षेत्र आळंदी–देवाची येथे श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधिस्थानापासून थोडया अंतरावर, गोपाळपुऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर, डाव्या बाजूस श्रीनरसिंव्ह-सरस्वती स्वामींचा मठ लागतो. प्रवेशद्वारातून मठात शिरल्यावर समोरच समाधिमंदिर दिसते. श्रीविठ्ठलरखुमाईच्या मूर्तीसमोर मध्यभागी एक समाधी असून तिच्यावर गुरुवारी त्रैमूर्तीचा व अन्य दिवशी संन्याशी चेहऱ्याचा रजत मुखवटा ठेवलेला दिसेल. ही समाधी श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामींचीं असून तेच प्रस्तुत चरित्राचे नायक आहेत. हे स्वामी अनेक वेळा आसेतुहिमाचल संचार करून शके १७९६ चे सुमारास आळंदीस आले. आळंदीच्या लोकांत भजनप्रेम उत्पन्न करून स्वामींनी 'आळसलेल्या आळंदी क्षेत्राला' उजाळा दिला. स्वामी स्वतः भजनात इतके रंगून जात की, त्यांची वारंवार भावसमाधी लागत असे. ज्ञानेश्वरी नाथभागवत इत्यादि ग्रंथांवर नित्य प्रवचने करून त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. प्रसंगविशेषी आपल्या वास्तव्यात त्यांनी अनेक चमत्कार करून लोकांना मुग्ध करून सोडले. स्वामींनी शके १८०७ मध्ये जिवंत समाधी घेतली. प्रतिवर्षी पौष शुद्ध पौर्णिमेस स्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो.

स्वामींचा शिष्यवर्ग फार मोठा आहे. पुण्याचे ब्रह्मर्षि श्री. अण्णासाहेब पटवर्धन, धुळ्याचे श्रीपद्मनाभ स्वामी वगैरे अधिकारी सत्पुरुष त्यांच्या परिवारात अग्रगण्य आहेत. केवळ मुमुक्षु साधकच त्यांचेकडे आकर्षित झाले असे नसून, त्या काळात विद्वान व सुधारक म्हणून गणली गेलेली काही मंडळीही त्यांना शरण गेली. पुण्याचे धोंडोपंत सहस्रबुद्धे आधी सुधारक म्हणून प्रसिद्ध होते; पण

स्वामींच्या सामर्थ्याने प्रभावित होऊन पुढे त्यांच्या भजनी लागले. वडिलांच्या श्राद्धदिनी आईच्या नवऱ्याची चौकशी करणारे कट्टर सुधारक महादेव मोरेश्वर कुंटे पायात चाळ घालून देवाचे भजन करू लागले. कै. चिं. गं. भानू यांनी 'श्रीमद्भगवद्गीता-प्रथम षडाध्यायी' या आपल्या पुस्तकात (पृ. १४०) चवथ्या अध्यायाच्या उपसंहारात केलेल्या विधानाच्या अनुरोधाने असे म्हणता येईल की, ऐतिहासिक कालात अनाचारभंजनार्थ थेट श्रीमुकुंदराजांपासून जी एक संतमालिका निर्माण झालेली दिसते. त्या मालिकेतीलच स्वामी हे एक होते.

स्वामींच्या जन्मस्थानाची किंवा पूर्वाश्रमीची माहिती मिळत नाही. त्यामुळे त्यांच्याविषयी सर्व प्रकारच्या विपरीत भावना बाळगणारे लोक आजही आढळतात. सांप्रदायिकांमध्ये स्वामी हे साक्षात दत्तावतार असून श्रीगुरुचरित्र कथानायक नरसिंव्हसरस्वतीस्वामी व हे एकच, अशी श्रद्धा आहे. स्वामींचे चरित्र अत्यंत गूढ असून प्रस्तुत चरित्रग्रंथात ते गूढ उकलण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

## चरित्रलेखनाचे पूर्व प्रयत्न

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीनरसिंव्हसरस्वतीस्वामी यांना शांत होऊन यंदाचे (शके १८८२) पौष पौर्णिमेस ७५ वर्षे पूर्ण होतात. इतका दीर्घ काळ लोटला तरी महाराजांचे समग्र व दृढ अभ्यासपूर्वक लिहिलेले चरित्र उपलब्ध नसावे हे एक मोठेच गूढ आहे. सांप्रदायातील अधिकारी लोकांकडून असे ऐकण्यात आहे की, महाराजांची स्वतःचीच अशी इच्छा, नव्हे आज्ञा होती की, त्यांचे चरित्र कोणी लिहू नये किंवा छापू नये. चरित्रलेखनाचे पूर्वप्रयत्न अर्थात् झाले, पण महाराजांचे इच्छेपुढे कोणाचे चालणार ! महाराजांचे कट्टर भक्त कै. रंगनाथ हरी धोत्रे यांना, त्यांच्या समाधीचा विरह असह्य होऊन, त्यांनी जवळजवळ तीन वर्षे एकांतवास पत्करून, महाराजांचे बावन अध्यायी सुमारे सातहजार ओव्यांचे म्हणजे जवळजवळ श्रीगुरुचरित्राइतके मोठे चरित्र लिहून तयार केले. ही गोष्ट १९१० सालची असावी. कै. रंगनाथपंत धोत्र्यांनी ह्या चरित्राचा पहिला अध्याय ब्रह्मर्षि श्री. अण्णासाहेब पटवर्धनांना वाचून दाखविला होता. चरित्र तर लिहून झाले. प्रसिद्ध करण्यापर्यंत वेळ आली. तोच एके दिवशी महाराजांनी स्वप्नात येऊन कै. रंगनाथपंतांना सांगितले, "रंग्या, श्रीज्ञानेशो-भगवान विष्णु यांच्या मध्ये मला न पाहता माझे स्वतंत्र चरित्र करतोस ? जळून जाईल ते चरित्र. असा हट्ट करू नकोस." झाले. प्रसिद्धीचे वेळी राहत्या घरास आग लागून इतकी महान कृती नेमकी जळून गेली ! ज्यांच्या इच्छेखेरीज झाडाचे पानसुद्धा हलणार नाही, तेथे चरित्र कोण प्रसिद्ध करणार ?

महिपती बाबा ताराबादकरांप्रमाणे ओवीबद्ध संतचरित्रे लिहिणारे श्रीसंत दासगणु यांनी आपल्या "अर्वाचीन श्रीभक्तलीलामृत" या ग्रंथांत तिसाव्या अध्यायात अवघ्या एकशेपंधरा ओव्यांमध्ये महाराजांचे चरित्र सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे समशेरपूर ग्रामनिवासी श्री. विनायक सीताराम शालिग्राम यांनी 'श्रीनवसंतचरित्र' या ग्रंथात तीन अध्यायात महाराजांचे चरित्र वर्णन केले आहे. चरित्र ओवीबद्ध असून जवळजवळ तीनशे ब्याण्णव ओव्यांमध्ये समग्र चरित्र कोंबण्याचा प्रयत्न केला आहे.

ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धनांच्या निकट सहवासात ज्यांचा काही काळ गेला आहे अशा श्रीअप्रबुद्धांनी ब्रह्मर्षि यांच्या चरित्रात महाराजांच्या चरित्राचे एक स्वतंत्र प्रकरण घातले आहे. महाराजांचे खरे स्वरूप म्हणजे पूर्णत्वाचे स्वरूप हे फारच थोडयांना कळले होते. त्या शेलक्या लोकांपैकीच प्रमुख ब्रह्मर्षि अण्णासाहेब हे होत. महाराजांच्या ज्या ज्या लीला अण्णासाहेबांनी निकट सहवासातील लोकांना मधून मधून सांगितल्या त्या लिहून ठेवण्याचा उपक्रम श्रीअप्रबुद्धांनी केला आहे. या अप्रकाशित कथा-संग्रहाचा प्रस्तुत चरित्र लिहितांना भरपूर उपयोग झाला आहे.

पुष्कळ वर्षांपूर्वी धुळे येथे राहणारे व हल्ली व्यवसायनिवृत्त झालेले श्री. ल. ह. उर्फ दादासाहेब सावजी वकील यांच्या मनात महाराजांच्या कथा, आख्यायिका वगैरे छापण्याचे विचार आले. त्यावेळी महाराजांची प्रथम निंदा करणारे पण पुढे एकनिष्ठ भक्त झालेले कै. बापू जोशी हे आळंदीस हयात होते. प. पू. श्रीभक्त माधवबुवासाहेबांनी दादासाहेब सावजींची व बापू जोश्यांची गाठ घालून दिली व दादासाहेबांच्या इच्छेबद्दल गोष्ट काढली. तेव्हा बापू म्हणाले, "श्रीमहाराज म्हणत होते की जो माझे चरित्र लिहून छापील त्याचा सत्यानाश होईल, निर्वंश होईल." हे शब्द ऐकून दादासाहेबांनी नाद सोडला. असा आहे महाराजांच्या चरित्रलेखनाच्या प्रयत्नांचा इतिहास.

प. पू. श्रीभक्त माधवबुवासाहेब यांनी प्रेरणा दिली. त्यांनी दिलेली प्रेरणा म्हणजे श्रीमहाराजांची इच्छा व संमती असे समजून चरित्रविषयक माहिती गोळा करण्यास सुरवात केली. पुण्याचे श्री. वि. वि. धोत्रे (कै. रंगनाथपंत धोत्र्यांचे पुतणे) यांनी आपल्या घरची तर हकीकत कळवलीच, पण त्याबरोबर महाराजांची 'अप्रत्यक्ष परवानगी' व चरित्रकार्याला 'आशीर्वाद' असल्याचे कळविले.

शेवटी श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामीस्वरूपी श्रीदत्तप्रभु यांचे चरणकमली मस्तक ठेवून, तसेच सांप्रदायातील अधिकारी व्यक्ती ब्रह्मर्षि श्री. अण्णासाहेब

पटवर्धन, श्री. पद्मनाभस्वामी धुळे, प. पू. श्रीभक्त माधवबुवासाहेब गोडबोले, प. पू. श्रीअप्रबुद्ध, विद्वान व अधिकारी वाचकवृंद आणि ज्यांचे उदरी जन्म घेतल्यामुळे महाराजांची सेवा करण्याचा हा अपूर्व योग आज येत आहे, त्या मातापितरांना नमन करून महाराजांच्या कृपेने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे त्यांचेच चरित्र कथन करण्याचा प्रयत्न करतो.

## पूर्ववृत्तान्त व व्यक्तिदर्शन

श्रीमहाराजांचा पूर्व इतिहास कोणालाच माहीत नाही. त्यांचे स्वतःचे पूर्वाश्रमीचे नाव, आईवडिलांची नावे, कोण कोठले, वगैरे चरित्रविषयक माहिती कोणासच नाही. महाराजांनी स्वतः होऊन तसे कोणास सांगितल्याचे दिसत नाही. चतुर्थाश्रमातील नाव तरी त्यांनी कसे कळू दिले हे एक आश्चर्यच आहे. श्रीसंत दासगणूंनी '**हे ब्राह्मण आश्वलायन। गोत्र तयांचे कौंडिण्य।**' असे अर्वाचीन श्रीभक्तलीलामृतात महाराजांबद्दल म्हटले आहे. पण ही माहिती बरोबर नाही असे वाटते. प्रस्तुत चरित्र लिहिण्याकरिता माहिती गोळा करीत असता महाराजांच्या पूर्व वृत्तान्ताबद्दल जे काही धागेदोरे हाती आले, त्याबद्दल विशेष विवेचन पुढे येणार असल्यामुळे या ठिकाणी जास्त उहापोह करीत नाही.

महाराजांच्या देहयष्टीचे वर्णन त्यांना पाहिलेल्या मंडळींच्या सांगण्यात नेहमी येते. त्यावरून त्यांचा मूळ बांधा मजबूत, धिप्पाड व उंचापुरा होता. त्यांची उंची पुरेपूर सहा फूट होती असे सांगतात. ते आजानुबाहु होते. वर्ण काळसर होता. शरीरावर मस्तक म्हणजे एक लहानसा चेंडूच ठेवला आहे असा भास होई. यावरून महाराजांच्या शरीरयष्टीची कल्पना येते व म्हणून अशा देहधारी प्राण्यास पक्का दीडशेर वजनाचा चांदीच्या पादुकांचा जोड नेहमी उपयोगात आणणे कसे साहजिकच होते हेही स्पष्टपणे लक्षात येते.

नाशिकजवळ ओढा नावाचे एक स्टेशन आहे. सदर स्टेशनपासून दीड मैलांवर लाखलगांव म्हणून एक गाव आहे. तेथे बाबासाहेब पाटील (ब्राह्मण) निरूपण करणारे राहत असत. बाबासाहेब पाटलांनी महाराजांना पाहिले होते. त्यांच्याही सांगण्यात महाराज हे आजानुबाहु, तेजस्वी, एक छाटी परिधान केलेले व एक छाटी डोक्यावर व सहज बोलत असता त्यांची समाधी लागत असे, असे वर्णन येत असे. काही लोकांच्या सांगण्यात असेही येते की, महाराजांचा चेहरा कधी ऐन तारुण्याचा दिसे तर कधी त्यावर वृद्धत्वाची छटा आढळे.

महाराजांची वृत्ती लीन व स्वभाव विनोदी परंतु अतिशय गंभीर होता. त्यामुळे एखाद्याचे काम करावयाचे किंवा त्यावर कृपा करावयाची म्हणजे गुरु,

गुरुबंधु किंवा वेळ पडल्यास शिष्याच्या नात्याने त्याच्याशी वागून त्यास शिकवावे व कृतार्थ करावे. महाराज हे पूर्णपणे निःसंग व निःस्पृह होते. मानसन्मान करून घेणे किंवा लोकांनी फार देव्हारे माजवून ते उपभोग घेत, चैनीत आयुष्यकाल घालविण्याचा त्यांस अत्यंत कंटाळा होता. म्हणूनच अवतार कार्य—म्हणजे जगदुद्धार—करण्याकरता एकसारखे भटकत होते. विद्वत्ता, योगसामर्थ्य, भजन-प्रेम, इत्यादि सर्व प्रकाराने प्रसंग पडेल तसे लोकांपुढे यावयाचे. परंतु आपणच त्यांचे काम केले असे मात्र त्याला कळू द्यावयाचे नाही, असा त्यांचा स्वभाव होता. दोन व्यक्तींवर यांनीच अनुग्रह करून त्यांना कृतार्थ केले असले व ते दोघे अगदी जवळजवळ राहत असून त्यांच्या वेळोवेळी भेटीगाठी होत असल्या तरी, किंवा बैठक एक असली तरी, आपण गुरुबंधु आहोत ही मात्र जाणीव त्यांना होत नसे. याचेच नाव योगमाया! महाराजांची लीला ती हीच!

महाराजांच्या श्यामसुंदर मूर्तीचे भावपूर्ण छायाचित्र, त्यांतील सहज ध्यानात येणारे सदय, धवल, सुहास्य किंवा वात्सल्यपूर्ण दृष्टी पाहून अश्रद्ध माणसाचेही मन प्रफुल्लित झाल्याशिवाय राहणार नाही.

## महाराजांचा बहुरंगीपणा

महाराजांच्या लीलाचरित्रात अद्‌भुतरम्यपणा, गूढता, वैचित्र्य आणि परस्पर विरोधी गोष्टींचे मिश्रण इतके आढळून येते की, सामान्य माणसाला तर कोणत्याही घटनेची उकल होणे फार कठीण आहे. ते परमहंस दीक्षेचे संन्यासी होते व भोजनोत्तर तांबूल सेवन करीत. त्यामुळें कै० बापू जोशीसारख्या भक्तांनी सुद्धा सुरुवातीस महाराजांची निंदा करावी व त्यांना रंगेल म्हणावे. संन्याशी असून दंडकमंडलूचा केव्हाच त्याग केलेला; निःसंग, निस्पृह असून भजनप्रेम कमालीचे होते व विठ्ठलनामाच्या गजरांत त्यांची वारंवार भावसमाधी लागत असे. छायाचित्रांत दिसून येते त्याप्रमाणे भालप्रदेशावर वैष्णवसंप्रदायाची द्योतक काळी रेघ व गळ्यांत वारकरी सांप्रदायाचे बोधचिन्ह असलेली तुळशीची माळ होती. ते मुद्राही लावत असत.

आळंदीत येऊन स्थिर होण्यापूर्वी जगदुद्धार करण्याकरिता महाराज सतत फिरत असत. या संचारात महाराज एका रूपाने किंवा एकाच पोषाखाने फिरत होते असे नाही. कधी जटाभार वाढविलेला, तर कधी मुंडदंडी वेष. कधी कधी फकिरी बाण्याने, तर कधी डोक्यावर भरजरी मंदील, बोटात रत्नजडित अंगठ्या, गळ्यात मोत्यांचा कंठा, अंगावर भरजरी वस्त्र व नेसावयास तसेच भारी रेशमी वस्त्र अशा राजभूषणांनी युक्त असा वेष असावयाचा. चेहरा कधी ऐन तारुण्याचा तर कधी त्यावर वृद्धपणाची छटा.

अशा बहुरंगीपणामुळे कोणी त्यांना जाडे विद्वान समजत तर कोणी त्यांना उत्तम योगी, दांडगे मंत्रशास्त्री किंवा व्यवहारतज्ञ व अतिशय धूर्त असा सामान्य माणूस समजत. कित्येकांच्या मते ते उत्तम भगवद्भक्त होते. असे अनेक तर्क त्यांच्याविषयी लोकांच्या मनात वसत होते. त्यामुळे महाराजांच्या खऱ्या स्वरूपाविषयी मात्र सामान्य लोकांना कधीच कल्पना आली नाही. उलट त्यांच्याबद्दल वाटेल तसे गैरसमज व विकल्प मात्र बाळगताना आजही लोक आढळतात.

## काही गैरसमज व त्यांचे निराकरण

वेषवैचित्र्य व बहुरंगीपणामुळे महाराजांबद्दल निरनिराळे तर्क लोक कसे करीत याबद्दल उल्लेख वर आलेला आहेच. महाराजांच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना न झाल्यामुळे लोकांनी आपापल्या परीने त्यांच्या स्वरूपाविषयी तर्क बसविले. अर्थात् त्यातील काही तर्क अज्ञानजन्य असले तरी काही मात्र बुद्धिपुरस्सर किंवा एखाद्या सांप्रदायाचीच प्रतिष्ठा वाढविण्याच्या दृष्टीने केलेले दिसतात, असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते. अशा काही गैरसमजांचा परामर्ष घेऊन त्यांचे निराकरण करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

महाराजांचे लांब हात, चेहऱ्याची ठेवण व विशेषत: कान यांवरून पुष्कळ लोक असा वाद घालतात की महाराज हे मूळ महाराष्ट्रीय नसून द्राविडी ब्राह्मण असावेत. ही कल्पना मूळ लोकमान्य टिळकांनी काढली. टिळक हे 'लोकमान्य' असल्यामुळे त्यांनी बोलून दाखविलेली कल्पना लोकमान्यता पावली. हा केवळ तर्क आहे. यापलीकडे त्याला काहीच आधार नाही व अशी माहिती देणारा आजपर्यंत कधीच पुढे आला नाही. महाराजांच्या कर्नाटकातील वास्तव्याबद्दल माहिती कळविताना एका विद्वान गृहस्थाने अशी माहिती कळविली आहे की 'श्रीनरसिंव्हसरस्वती हे महाराष्ट्रीय नव्हते, हे त्यांच्याच ग्रंथावरून कळून येते.' या ठिकाणी उल्लेखिलेला महाराजांचा ग्रंथ म्हणजे 'स्वात्मसौख्य' हा होय. या ग्रंथांत लेखक आणि ग्रंथवक्ता यांना उद्देशून वापरलेले 'कृष्णचैतन्य', 'कृष्णानंद', 'निरंजन', 'रामचंद्र' किंवा नमनातील ओव्यात व ज्ञानकांड ओवी क्रमांक २४२ मध्ये आलेले 'व्यंकटरमणा' इत्यादि शब्द विशिष्ट अर्थाने वापरले आहेत व त्यांची परिभाषा न समजल्यामुळे त्या ग्रंथाबरोबर महाराजांबद्दल पुष्कळच गैरसमज दिसून येतो. व्यंकटरमणा या शब्दाचा विशेष अर्थ पूर्वीच स्पष्ट करून सांगितला आहे. 'व्यंकटरमणा'सारख्या एकुलत्या एका शब्दावरून प्रो. द. रा. बेंद्रे सारखे विद्वान लोक 'आळंदीचे नरसिंव्हसरस्वती कर्नाटकातून गेले असावेत' असा तर्क बोलून दाखवितात. (तरुणभारत, नागपूर १-४-६०) तूर्त इतकेच सांगता येईल की, महाराज हे अस्सल महाराष्ट्रीय

होते. इतकेच नव्हे तर त्यांचा परिचय महाराष्ट्राला गेल्या ४–५ शतकांपासून आहे. ईश्वरी माया अशी की लोकांना त्यांच्या खऱ्या स्वरूपाबद्दल कल्पना होणे कठीण आहे.

आळंदीत वास्तव्य करण्यापूर्वी महाराजांचे भारताच्या निरनिराळ्या भागातून अनेक वेळा भ्रमण झाले होते. खानदेशांतील मालेगावी महाराज फिरत फिरत येत असत व त्या वेळी तेथील एखाद्या मंदिरात उतरत असत. मालेगावात त्या वेळी श्री. बल्लाळेश्वर बाबा जामखेडकर नावाचे वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण राहत असत. त्यांचा नित्यनेम असा होता की सायंकाळी सर्व देवस्थानांतून एक फेरी मारावयाची व देवतांचे दर्शन घ्यावयाचे. उद्देश हा की कोणी अतिथी, अभ्यागत, संन्यासी किंवा तसाच योग्य माणूस उतरलेला दिसला तर त्यास मानाने घरी भोजनास बोलवावयाचे. महाराजांची भेट झाली म्हणजे बल्लाळेश्वर बाबांनी त्यांना पुढीस बोलवावे. महाराजांची शरीरयष्टी बळकट, चेहरा ऐन तारुण्याचा व नेत्र आरक्त पाहून बल्लाळेश्वर बाबांनी कल्पना करावी की, हा कोणी तरी ऐन तारुण्यात अविचाराने संन्यास घेतलेला प्राणी आहे. काहीतरी सत्कर्म घडावे या हेतूने ते त्यास हात धरून आपल्या बरोबर सर्व देवळे हिंडवून आणावयाचे व वेळोवेळी घरी पुढीस न्यावयाचे. महाराजांना योगशास्त्राचे पूर्ण ज्ञान होते व शरीर जीर्ण झाल्यास ते विशेष योगक्रिया करून सर्प कात टाकतो त्याप्रमाणे शरीरावर आलेली जरा नाहीशी करीत व पुन्हा तारुण्यसंपन्न होत.

आळंदीत आल्यावर महाराजांनी श्रीज्ञानेश्वरांसमोर दररोज रात्री भजन करण्याचा कार्यक्रम सुरू केला. हाती तंबोरी घेऊन ते स्वतः मध्यभागी उभे राहून भजन करीत. सुरुवातीस भजनास फारशी मंडळी जमत नसत. आळंदीतील टारगट मंडळींनी महाराजांची प्रथम प्रथम हेटाळणी करावी. महाराजांना हा प्रकार काय आहे याची पूर्ण जाणीव होती. महाराज भजन समाप्त झाल्यावर भजनास उपस्थित असलेल्या मंडळीस प्रसाद म्हणून पेढे, बर्फी, कलाकंद वगैरे वाटीत. महाराजांच्या शिष्यमंडळीत सांगलीकर, बडोदेकर वगैरे ऐश्वर्यसंपन्न लोक असल्यामुळे या कार्यक्रमात खंड पडत नसे. परंतु एखादे वेळी प्रसाद वाटण्यास शिल्लक नाही अशी वेळ येत असे. अशा प्रसंगी लक्ष्मणबुवा किंवा दत्तोपंत आठवले यांना जवळचे हलवायाच्या दुकानातून तयार असलेले पदार्थ आणून प्रसादाची पूर्तता करावी लागे. त्या वेळी महाराज सांगत असत की, पैसे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात चुकते मिळतील व त्याप्रमाणे महाराजांचे एकनिष्ठ भक्त श्रीधरपंत पोष्टमास्तर यांची रुपये पाचची मनीऑर्डर आली की त्यांचे पैसे दिले जात. त्यामुळे दुकानदारांना आपले पैसे बुडतील अशी शंका कधीच येत नसे. दुकानदार व क्षेत्रस्थ लोकांची अशी समजूत

होती की, स्वामी महाराज पूर्वाश्रमी कोठे तरी होते व त्याचे हे पेन्शन येत आहे व सरकारचे हे पेन्शनर असल्याशिवाय नेहमी बिनचूक प्रत्येक महिन्यास मनी-ऑर्डरचे पैसे येणे शक्य नाही. अवतारी पुरुषाबद्दल **'अज्ञानी जीवासीं विपरीत हा भास ।'** अशी स्थिती होते याबद्दल आश्चर्य ते काय ? श्रीधरपंत पोस्ट-मास्तरांची अगदी त्रोटक हकीकत पुढे परिशिष्टात दिली आहे. ती वाचल्यावर दर महिन्यास न चुकता येणाऱ्या पाच रुपयांच्या मनीऑर्डरीचे रहस्य वाचकांस कळून येईल.

आळंदीत महाराज आल्यावर त्यांनी श्रीज्ञानेश्वर महाराजांकरिता रथ तयार करून शके १८०३ पासून कार्तिकांत रथोत्सव सुरू केला. त्याबद्दल विशेष हकीकत पुढे येईलच. प्रचंड वजनामुळे या रथाची चाके इंद्रायणीच्या वाळवंटात रुतू लागली व रथ हालेना. हे वर्तमान मंडळींनी महाराजांना कळविले. महाराज त्या वेळी ज्ञानोबा माऊलीच्या भावावेशात बेहोष होते. महाराजांनी ताबडतोब उद्गार काढले, "पूर्वी कृष्णावतारी आमचे (अर्जुनाचे) सारथ्य करून दमून गेल्यामुळे आपण रुसलेले दिसता भगवन् ! आपले मनोगत समजतो. हे पहा, आम्ही आलोच आपले सारथी होऊन–' असे म्हणून महाराज रथावर चढले आणि सारथ्याच्या जागी बसले. 'पुंडलीक वरदा हारि विठ्ठल' 'श्रीज्ञानदेव तुकाराम' अशी गर्जना करताच तो प्रचंड पण जड व अचेतन रथ हालला व वाळवंटातून रस्त्यावर आला. या प्रसंगानंतर महाराज हे अर्जुनाचा अवतार आहेत अशी श्रद्धा आळंदीकरात उत्पन्न झाली. महाराजांची अगम्य लीला ती हीच ! अविचाराने संन्यास घेतलेला तरुण, सरकारचे पेन्शनर, रथोत्सव प्रसंगी काढलेल्या उद्गारामुळे अर्जुनाचा अवतार ! खरे स्वरूप काय ? कोणाला कळणार !

श्रीक्षेत्र आळंदीला श्रीज्ञानेश्वरांच्या दर्शनास येणाऱ्या यात्रेकरूंना ज्ञानोबा माऊलीच्या जीवनाशी निगडीत असणारी स्थळे व त्यावेळचे अवशेष यांची 'अधिकारयुक्त वाणीने माहिती सांगणारा व दाखविणारा वाटाड्या' म्हणून उपयोगी पडणाऱ्या मार्गदर्शक पुस्तिका 'चित्रमय आळंदी' 'आळंदी दर्शन' प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यातील माहितीच्या आधाराने थोडा फेरफार करून श्री. रा. चिं. ढेरे यांनी 'ज्ञानोबा माऊली'–ज्ञानेश्वरांची आळंदी ही स्थलवर्णनात्मक पुस्तिका गेल्या चार वर्षापूर्वी म्हणजे सन १९५८ मध्ये प्रसिद्ध केली. या तिन्ही पुस्तिकांमधून श्रीनरसिंव्ह सरस्वती महाराजांबद्दल थोडीशी माहिती दिलेली आढळते. त्याप्रमाणे 'महाराज हे शंकराचार्यांच्या परंपरेतील शृंगेरी मठाचे अधिपती होते. बद्रिकाश्रमी दीर्घकालपर्यंत तप करून पुढे तीर्थयात्रा करीत पंढरपुरास आले' असे दिसते. महाराजांचे हिमालयात बद्रिकाश्रमी दीर्घकालपर्यंत

वास्तव्य होते ही गोष्ट सत्य आहे पण ते शृंगेरी मठाचे अधिपती होते या माहितीला तर्कापलीकडे काहीच आधार नाही.

आद्य शंकराचार्य धरून सन १९१२ पर्यंत शृंगेरीचे गादीवर तेहतीस पुरुष झाले. श्री. म. रा. बोडस यांनी आपले शंकराचार्यावरील पुस्तकात–'श्रीशंकराचार्य व त्यांचा संप्रदाय'–आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या निरनिराळ्या चार याद्यांचा तौलनिक अभ्यास करून शृंगेरी पीठावरील गुरुपरंपरेची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यात महाराजांचे नाव व काल कोठेच आलेले आढळत नाही. तसे जर आढळते तर महाराजांच्या पूर्व इतिहासावर केवढा प्रकाश पडला असता ! श्री. बोडसांनी प्रसिद्ध केलेल्या या यादीत नरसिंह तीर्थ, नरसिंह भारती, अभिनव नरसिंह भारती अशी नावे आढळतात. पण नरसिंव्ह सरस्वती असे नाव मात्र आढळत नाही. याचाच अर्थ असा की, नरसिंव्ह सरस्वती या नावाचे कोणीही संन्यासी पुरुष शृंगेरीचे गादीवर आरूढ झाले नाहीत.

श्रीशंकराचार्यांनी धर्मरक्षणार्थ चार दिशास चार मठ स्थापिले असे मानण्यात येते. श्री. बोडसांच्या मते शृंगेरी मठ प्रथम स्थापन झाला असावा व बाकीचे तीन मठ क्षेत्राचे ठिकाणी मागाहून स्थापन झाले असावेत. मठस्थापनेच्या इतिहासात या ठिकाणी शिरण्याचे काहीच प्रयोजन नाही. या चारी मठांची परंपरा, त्यांची वैशिष्टये व रचना निरनिराळी आहेत. शृंगेरी मठाच्या परंपरेतील संन्याशांच्या नावापुढे 'सरस्वती', 'भारती' व 'पुरी' ही उपपदे जोडतात. ही उपपदे असलेले संन्यासी शृंगेरीच्या परंपरेत अनेक झाले असतील; पण त्याचा अर्थ असा नाही की ते सर्व शृंगेरीमठाचे अधिपती होते. महाराजांच्या नावामधील 'सरस्वती' या उपपदामुळे हा काहीतरी गैरसमज झाला असावा असे वाटते.

वरील तिन्ही वर्णनात्मक पुस्तकांवरून महाराज हे श्रीशंकराचार्यांच्या परंपरेतील शृंगेरी मठाचे अधिपती होते व त्यांनी बद्रिकाश्रमी दीर्घकाल तप आचरले व पुढे ते आळंदीत स्थायिक झाले अशी जी माहिती दिलेली आढळते, त्याला आणखी आधार एका दंतकथेचा घेतला असावा असे दिसते. ती दंतकथा अशी आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी शृंगेरीचे मठातून एक पीठस्थ आचार्य गुप्तपणे श्रीपीठाचा व ऐश्वर्याचा त्याग करून हिमालयात बद्रिकाश्रमी तपश्चर्येस निघून गेले. ही दंतकथा आजही शृंगेरीस गेल्यास ऐकावयास मिळेल. महाराजांच्या 'श्री स्वात्मसौख्य' ग्रंथांतील कर्मकांडाच्या नमनाच्या पहिल्या ओवीनंतर लगेच दुसऱ्या ओवीत '**दक्षिण दिशा दक्षिणाम्नाय । शृंगेरी मठ अभिप्राय**' असा शृंगेरी मठासंबंधी उल्लेख आलेला आहे. तसेच पुढे उपासना कांड ओवी क्रमांक १०२ मध्ये '**पूर्वाध्यायीं प्रारंभ । दक्षिणाम्नाय केला स्तंभ । परि आनंदाचा हा**

**कोंभ । निजारंभ ओपिला ॥**' असा शृंगेरी मठाचा पुन्हा उल्लेख आलेला आहे. महाराजांच्या काही पत्रातील उताऱ्यांचे पुस्तक छापून प्रसिद्ध झाले आहे. त्यात पृ. २९ वर 'अंतरानुभव' प्रकरणाच्या प्रारंभी 'अधुना शुकवामदेवादि बसिष्ठ-श्रीशंकराचार्यादि – परंपरागत – श्रीबदरिकाश्रम प्रांतवासिनाम्…इत्यादि 'मध्ये बद्रिकाश्रमाचा उल्लेख आहे. किंवा महाराजांची योगपट्टाची परंपरा सांगणारे म्हणून जे एक 'श्रीगुरुपरंपरा स्तोत्र' (परिशिष्ठ पहा) उपलब्ध झाले आहे, त्यातही अगदी प्रारंभीच 'हिमाचल समीपस्थं बदर्याश्रमवासिनं' असा बद्रिकाश्रमाचा निर्देश आलेला आहे. शृंगेरी मठाचे किंवा बद्रिकाश्रमाचे वरील उल्लेख पाहून वरील दंतकथेतील शृंगेरीच्या गादीचा त्याग करणारे व बद्रिकाश्रमी तपश्चर्येस जाणारे पीठस्थ आचार्य म्हणजेच महाराज असा ग्रह झालेला दिसतो. अर्थात याला तर्काशिवाय काहीच आधार नाही. शृंगेरी परंपरेत 'नरसिंह सरस्वती' या नावाचे कोणी स्वामी मुळीच नसता महाराजांचा संबंध या दंतकथेशी कां जोडला जावा, हेच समजत नाही.

वरील दंतकथा व करवीर–संकेश्वर मठाच्या निर्मितीच्या संबंधी प्रसिद्ध असलेल्या हकीकतींत आलेली दंतकथा एकच असावी असे वाटते. इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड ६ मध्ये किंवा श्री. म. रा. बोडस यांनी 'श्रीशंकराचार्य व त्यांचा संप्रदाय' या पुस्तकाच्या पाचव्या अध्यायात ही दंतकथा दिली आहे. त्यावरून ही दंतकथा बरीच जुनी असावी. शृंगेरीच्या गादीवरील श्री विद्या नरसिंह भारती बद्रीकेदारच्या यात्रेला गेले होते. बरोबरच्या शिष्यमंडळींना काशी क्षेत्रात सहा महिने वाट पाहण्यास सांगून स्वामी एकटेच हिमालयात गेले. ठरल्याप्रमाणे शिष्यांनी सहा महिने वाट पाहिली. पण गुरू परत न आल्यामुळे शिष्य दक्षिणेत परत आले व त्यांनी शृंगेरीच्या गादीवर एका 'पुस्तक संन्याशी' शिष्याची स्थापना केली. पुढे काही कालाने विद्या नरसिंह भारती हिमालयातून खाली उतरून कुडलगी या गावी आले. तेव्हा त्यांना शृंगेरीच्या गादीवर दुसराच कोणी बसल्याचे वर्तमान कळले; म्हणून त्यांनी शृंगेरीस निरोप पाठविला. शृंगेरीहून नरसिंह भारतींना कळविण्यात आले की 'तुम्ही आश्रमविरुद्ध वर्तन केले. सबब आम्ही दुसरा पीठाधिकारी केला. तुम्ही इकडे येऊ नये.' म्हणून नरसिंह भारती कुडलगीसच राहिले. तेथे त्यांनी शंकरभारती शिष्य केला. शंकरभारतींनी पुढे करवीर–संकेश्वर मठ स्थापन केला, असे उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसते.

वरील हकीकत कधी घडली व तिला काही ऐतिहासिक पुरावा आहे की नाही की केवळ ती एक दंतकथाच आहे, हे ठरविणे फार कठीण. तसेच दंतकथेतील नरसिंह भारती शृंगेरीच्या परंपरेतील नरसिंह भारती पांचवे (पीठस्थ

काळ इ. स. १५७६ ते १५९९) की नरसिंह भारती सहावे (पीठस्थ काळ इ. स. १५९९ ते १६२२) हेही अजून निश्चित झाले नाही. केवळ श्रुत माहितीच्या आधारावर हिमालयांत बद्रीकेदारच्या यात्रेला गेलेले 'नरसिंह भारती' म्हणजेच 'आळंदीचे स्वामी' असे समजावयाचे काय ? तसे मानले तर त्यांनी 'भारती' या संन्यासनामाचा त्याग करून 'सरस्वती' हा संन्यासपट्ट कां लावला ? भोळ्या भाबड्या भाविक लोकांना फसविण्याकरिता तर केले नसेल ना ? असे अनेक गोंधळात टाकणारे प्रश्न उत्पन्न होतात. एका नावाचा त्याग करून दुसरे नाव धारण करण्याची धूर्त लोकांची जी एक वर्तमानकाळची टूम आहे त्यांतलाच हा प्रकार असावा, असे संशोधक लोक बेधडकपणे म्हणतीलही ! पण असा आरोप स्वामींवर करणे म्हणजे आपल्या क्षुद्र मनोवृत्ती त्यांच्यावर लादणे होय. आळंदीचे स्वामी व वरील दंतकथेतील नरसिंह भारती—पांचवे किंवा सहावे—हे एकच म्हटल्यास महाराजांच्या प्रदीर्घ आयुष्यमर्यादेचा जो पुढे विचार केला आहे त्याला एक पुरावा व होईल.

शृंगेरी मठाविषयी जी काही माहिती आज उपलब्ध आहे ती कितपत विश्वसनीय मानावयाची हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. या संबंधात श्री. म. रा. बोडस यांनी आपल्या पुस्तकाच्या उपन्यासात (पृ. ७) केलेले विधान लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते म्हणतात, "निरनिराळ्या मठाच्या गुरुपरंपरा किती परस्परविरोधी आहेत हे पुढे दाखविण्यात येईल. त्यावरून व कोणत्याही स्वामींच्या नावावरून ऐतिहासिक अनुमान काढणे धोक्याचे आहे."

हिमालयातून खाली उतरल्यावर फिरत फिरत महाराज पंढरपुरास आले व तेथे त्यांनी विचारपूर्वक दंडकमंडलूचे चंद्रभागेत विसर्जन केले व गळ्यात तुळशीमाळ घालून वारकरी सांप्रदायाची दीक्षा घेतली, असेही त्यांच्याबद्दल सांगण्यात येते. आळंदीत आल्यापासून महाराज एखाद्या सामान्य वारकऱ्याप्रमाणे राहत असत ही गोष्ट खरी, पण त्यांनी खरोखरच त्या सांप्रदायाची दीक्षा घेतली किंवा नाही, की या घटनेमागे काही तसेच कारण होते याचा विचार केला पाहिजे.

श्रीज्ञानेश्वर महाराज हे स्वतः नाथसांप्रदायी. त्यांचे ज्ञानेश्वरीचे लेखन त्यांचा वारकरी सांप्रदायाशी संबंध येण्यापूर्वीच झालेले. त्यामुळे वारकरी सांप्रदायाचे दैवत याचा त्यात कोठेच उल्लेख आढळत नाही. वारकरी सांप्रदायाची जबाबदारी त्यांच्यावर आल्यावर त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने अभंगरचना केली व त्यात त्या सांप्रदायाचा अध्यक्ष जो पांडुरंग त्याचेच गुणगान केले. त्यामुळे संशोधकासमोर मात्र ज्ञानेश्वर हे एक की दोन असा विवाद्य प्रश्न उभा राहिला. स्वतः नाथसांप्रदायी असून सर्व देव एकच आहेत हे तत्त्व ते

पूर्णपणे जाणत होते. त्यांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ वारकऱ्यांचा मान्यवर ग्रंथ झाला. ज्ञानेश्वरांच्या कामगिरीमुळे वारकरी सांप्रदायाचा विस्तार आणि उत्कर्ष झाला व ते वारकऱ्यांची 'माऊली' बनले. अशा रीतीने नाथसांप्रदायी ज्ञानेश्वर भागवत धर्ममंदिराचे पाया झाले. ज्ञानेश्वरानंतर तीनशे वर्षांनी महाराष्ट्रातील परिस्थिती बदलली. यवनांचे राज्य सुरू झाले. ज्ञानेश्वरी मागे पडली व भागवत संप्रदाय मंदावला व मागे पडत चालला. त्यावेळी जगाच्या कल्याणाकरिता 'देह ठेवून' बसलेल्या ज्ञानेश्वरांनी एकनाथांना 'अजानवृक्षाच्या मुळीच्या गळ-फासाचा' स्वप्नदृष्टान्त दिला. एकनाथांना जनार्दनस्वामींमुळे दत्तोपासना मिळाली व त्यांचे घराण्याची उपासना विठ्ठलाची. एकनाथांच्या ठायी 'दत्तपरंपरा' व 'भागवत परंपरा' या दोन्हीचे एकीकरण झाले होते. त्यांच्या विशाल दृष्टीत 'दत्त' आणि 'विठ्ठल' यांत नावापलीकडे कोणताच भेद नव्हता. मूलतः दत्तसंप्रदायी एकनाथांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ हाती धरून भागवत संप्रदायाचे कार्य नेटाने पुढे चालू ठेवले. ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध करून त्यातील वेदान्त समाजातील अगदी खालच्या थरातील लोकांप्रर्यंत पोचविला. या त्यांच्या थोर कार्यामुळे एकनाथ हे वारकरी सांप्रदायात ज्ञानेश्वरांच्या बरोबरीने श्रेष्ठता पावले व ज्ञानेश्वरांनी ज्याचा पाया रचिला, त्या भागवत धर्ममंदिराचे ते आधारस्तंभ झाले. वरील दोन्ही संत मूलतः अन्य सांप्रदायाचे असूनही त्यांनी आपापल्या काळात वारकरी सांप्रदायाचे धुरीणत्व पत्करले. त्यांच्या काळात त्यांच्याइतके योग्य संत महाराष्ट्रांत नसल्यामुळे वारकरी सांप्रदाय चालविण्याचे कार्य ईश्वरी प्रेरणेने त्यांचेकडे आले, असे म्हणण्यास काही प्रत्यवाय नाही.

आळंदीला येण्यापूर्वी महाराजांचे वास्तव्य काही काल वारकऱ्यांचे जे माहेरघर-पंढरपूर-त्या ठिकाणी होते. त्या वेळी वारकरी सांप्रदायाची काय अवस्था होती हे श्री. वि. सी. शाळिग्राम यांनी केलेल्या सूक्ष्म वर्णनावरून सहज लक्षात येईल. श्री. शाळिग्राम यांनी महाराजांचे ओवीबद्ध त्रोटक चरित्र तीन अध्यायात 'श्री नवसंत चरित्र' या ग्रंथात वर्णन केले असल्याचा उल्लेख मागे आलाच आहे. महाराज निरनिराळ्या ठिकाणी फिरत फिरत पंढरपुरास आले, त्यासंबंधी ते म्हणतात—

**'मग ते आले पंढरीस। रहिवास तेथ बहुत दिवस। असतां कळला प्रकार त्यांस। जो कां जीवास अप्रिय ॥ ४५ ॥ श्रीपांडुरंग पुजारी बडवे। भुललें असती धनवैभवें। कर्तव्य आपुलें न कळें कायें। ऐसे जन ते असती कांही ॥ ४६ ॥ तुळसीमाळा न घालिती कंठीं। व्रतही न करती एकादशी। त्या स्वामी वदती रीतीं ऐसी। बरवी नसे दयानिधे ॥ ४७ ॥ सुकृत आपुलें थोर म्हणून। पांडुरंगाचें घडते पूजन। सांप्रदाया पूज्य आपण। म्हणून माळा गळां**

**घालिजे ॥ ४८ ॥ मंगलसूत्र न घाली मी गळां । निजकांतास वदे वेल्हाळा । तो केवी पुरवील तिचा लळा । नव्हे प्रेमळा गमे तया ॥ ४९ ॥ तेवी कंठी न मिरवितां तुळसी । आणि व्रत न करितां एकादशी । प्रिय न व्हाल पांडुरंगासी । हें भूदेवाप्ती सांगणें नको ॥ ५० ॥ स्वामी आज्ञा प्रमाण मानून । तैसेच वर्तती सर्व जन । त्यांची आज्ञा उल्लंघन । न करी दुर्जन असला तरी ॥ ५१ ॥ मग हे पृथ्वी तळीचे देव । जे जपतप अवतार सावयव । स्वयें पांडुरंग करी गौरव । ते सदैव केवी न परिसती ॥ ५२ ॥**

अशी होती एकंदर वारकरी सांप्रदायाची स्थिती ! हे सर्व पाहून वारकरी सांप्रदायात महाराजांनी प्रवेश केला असला पाहिजे. जगाच्या कल्याणाकरिता अवतरल्या विभूती '**जीवनमुक्त ज्ञानी जरी झाले पावन । तरी देव तीर्थ भजन न सांडती ॥**' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे स्वत: वर्तन करतात. जगाला सन्मार्गाला लावण्याचे कार्य त्यांना करावयाचे असते. नामदेवांनी म्हटल्याप्रमाणे, '**म्हणोनिया संतीं अवश्य आचरावें । जनां दाखवावें वर्तोनिया ।**' महाराजांनी स्वत: गळयात तुळसीमाळ घातली आणि मुखाने 'विठ्ठल विठ्ठल' असे भजन करण्यास सुरवात केली व 'मध्यंतरीच्या काळात मंदावलेला भजनमार्ग पुन्हा नव्याने सुरू करून आळसलेल्या आळंदी क्षेत्राला त्यांनी उजळा आणला.'

तसेच महाराजांनी पंढरपूरला चंद्रभागेत दंडकमंडलूचे विसर्जन केले ही गोष्ट निराधार आहे, असे आमच्या घरच्या माहितीवरून खात्रीलायकपणे सांगू शकतो. लेखकाचे आजोबास, ते आठनऊ वर्षांचे असताना, महाराजांचे दर्शन झाले होते व पुढेही त्यांना महाराजांचा काही काळ सहवास झाला होता. आजोबा वऱ्हाडात शिक्षणखात्यात नोकरीस होते. पंढरपुरास महाराजांचे आगमन होण्यापूर्वी कित्येक वर्षे आधी त्यांचे वऱ्हाडांतून भ्रमण चालू होते. त्या वेळी मधून मधून महाराजांची व आजोबांची गाठ पडे. वऱ्हाडांतील भ्रमणाचे वेळीच महाराजांजवळ दंडकमंडलू नव्हता, असे आजोबांच्या सांगण्यात येत असे. त्यापूर्वीच त्यांनी कोठेतरी त्यांचे विसर्जन केले असावे. अलीकडे ऐतिहासिक संशोधनाचे वारे सर्वत्र सुरू झाले आहे. श्री. रा. चिं. ढेरे यांना संशोधनाच्या नावाखाली वाटेल तशी विधाने दडपून द्यावयाची सवयच आहे असे दिसते ! हल्लीच्या संशोधन पद्धतीतील दोष व तिचा पोकळपणा श्रीअप्रबुद्ध यांनी आपल्या ग्रंथात निर्भीडपणे दाखवून दिला आहे. अशा तंत्रांतून बाहेर आलेली माहिती वाचून सामान्य लोकांची कित्येक वेळा कशी सपशेल दिशाभूल होते, हे वरील उदाहरणावरून समजून येईल.

महाराजांची वृत्ती पराकाष्ठेची लीन व स्वभाव विनोदी पण पराकाष्ठेचा गंभीर असल्यामुळे एखाद्यावर कृपा करावयाची म्हणजे गुरुबंधु, गुरू किंवा प्रसंगी

शिष्यत्वाचे नाते पत्करून त्यांनी त्याला शिकवावे. पण आपल्या खऱ्या स्वरूपाविषयी किंवा आपण त्याचे काम करणारे आहोत, हे मात्र त्याला कळू द्यावयाचे नाही. रहिमतपूरच्या राधाकृष्णस्वामीवर महाराजांनी, ते स्वामी झोपले असता, त्यांचे पादसंवाहन करून निर्विकल्प समाधी लावण्याची युक्ती त्यांना दाखवून दिली, पण आपली ओळख मात्र होऊ दिली नाही. तसेच वऱ्हाडांतील लोणार येथे समाधिस्थ झालेल्या सच्चिदाश्रमस्वामींना 'तुम्ही आम्ही गुरुबंधू आहोत' असे सांगून योगाभ्यास शिकविला. महाराजांच्या या वृत्तीमुळे व वागणुकीमुळे ते आपल्याच सांप्रदायांतील आहेत असे समजणारे व आपणच त्यांच्यावर कृपा करून पूर्णतेला नेले असे सांगणारे व प्रचार करणारे लोक आजही आढळतात.

महाराजांच्या अक्कलकोटच्या वास्तव्यात श्री अक्कलकोटचे स्वामी व त्यांचा जो काही संबंध आला त्याविषयी सर्वत्र गैरसमज पसरलेला दिसतो. त्यासंबंधी येथे थोडा स्पष्ट उहापोह करणे आवश्यक आहे असे वाटते. श्री अक्कलकोटच्या स्वामींचे चरित्रकार व त्या स्वामींवर भक्ती असणाऱ्या लोकांच्या सांगण्यात नेहमी असे येते की, श्री अक्कलकोटच्या स्वामींनी महाराजांना समाधियोगाचे मार्गदर्शन करून त्यांच्या योगाची पूर्तता केली व दुसऱ्या एका प्रसंगी "क्यौं, रंडी अभी छोडी नहीं ?" असा प्रश्न विचारून महाराजांना ऋद्धिसिद्धीच्या तडाख्यांतून वाचविले. महाराज अक्कलकोटास दोन वेळा गेले होते. त्यावेळी त्यांची व अक्कलकोटच्या स्वामींची भेट झाली होती. पहिली भेट राजवाड्यानजीकच्या भंडारखान्यात झाली. महाराजांना पाहताच अक्कलकोटच्या स्वामींनी आपली दृष्टी त्यांचेवर रोखून योगशास्त्रातील आज्ञाचक्रभेदाचा श्लोक म्हटला असे सांगतात. त्याबरोबर महाराजांची समाधी लागली व त्यांची म्हणे योगसाधना पूर्ण झाली ! दुसऱ्या भेटीच्या वेळी वरील सवाल करून त्यांना सिद्धीच्या तडाख्यांतून सोडविले व भक्तिमार्गास लाविले. वरील प्रसंगाचा चरित्रकारांनी आपल्या मगदुराप्रमाणे अर्थ लावून महाराज हे अक्कलकोटच्या स्वामीचे अनुग्रहीच आहेत, असे प्रतिपादन केल्याचे आढळते. संतसेवेस वाहिलेल्या पुण्याच्या 'माऊली' मासिकाच्या (वैशाख ज्येष्ठ, शके १८७९) श्रीस्वामी अंकातील एका लेखकाने तर महाराजांबद्दल उल्लेख करतांना "हा घडा कच्चा होता, त्यास गुरु लाभला नव्हता, गुरुकृपेचा वरदहस्त नव्हता." इत्यादी स्वयंशोधित उपाधी बहाल केल्या आहेत ! चांगदेव आणि ज्ञानेश्वर किंवा संत नामदेव आणि गोरोबाकाकांचे थापटणे असा भास, सर्व चरित्रकार व त्यांचीच री ओढणाऱ्या नंतरच्या स्वामीभक्त लेखकांनी महाराज आणि श्री अक्कलकोटचे स्वामी यांच्या भेटीच्या प्रसंगी झालेल्या प्रश्नोत्तरावरून, निर्माण केलेला दिसतो. 'रंडी' हा शब्द 'सिद्धि' या अर्थाने श्री अक्कलकोटच्या

स्वामींनी वापरला असे त्यांचे चरित्रकार म्हणतात. नशीब की त्या शब्दाचा व्यावहारिक व ग्राम्य अर्थ अभिप्रेत होता, असे ते म्हणत नाहीत ! दोन थोर पुरुष किंवा साधुसंत यांची भेट झाली असता त्यांच्या भाषणांत कधीकधी सांकेतिक व गूढ अर्थाने वापरलेले शब्द येतात व त्यांचा अर्थ भोवतालच्या सामान्य जनांना समजणे कठीण असते आणि त्यामुळेच गैरसमज मात्र सर्वत्र पसरतात. म्हणूनच '**अंतस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ट जाणती ।**' किंवा '**साधुसंताचिये खुणे । साधुसंत जाणतीं**' अथवा '**जीवन्मुक्तांची लक्षणे । जीवन्मुक्त जाणे ।।**' असे म्हणतात तेच खरे. येरेगबाळे मात्र वाटेल तसा अर्थ काढतात !

श्रीसमर्थ व शिवाजी महाराज यांच्या भेटीचे प्रसंगी समर्थांनी प्रसन्न होऊन महाराजांचे पदरात प्रसाद म्हणून श्रीफळ, मूठभर माती, दोन मुठी लीद व चार मुठी खडे टाकले. या प्रसादाचा अर्थ श्रीशिवरायांनी जिजाबाईस सांगितला तो असा, 'नारळ प्रसाद हा माझे कल्याणार्थ, माती दिली येणेकरून पृथ्वी प्राप्त होईल व खडे दिले येणेकरून बहुत किल्ले ताब्यात राहतील व लीद दिली येणेकरून पागा पदरी पुष्कळ राहतील असे भाव समर्थांनी सुचविले.' त्याच्याऐवजी माझ्यासारख्याने असा अर्थ काढला की, भविष्यकाळात श्रीशिवाजी राजे दरिद्री होणार होते आणि श्रीफळ फोडून भिक्षा मागण्याकरिता उपयोगी पडणाऱ्या दोन नरोटचा घ्याव्या, भिक्षा न मिळाल्यास माती व खडे चरावे, आणखी–पुढील कल्पना न सांगितलेलीच बरी !–असेच समर्थांना शिवरायास सुचवावयाचे होते तर ते हास्यास्पदच नव्हे, तर मूर्खपणाचे होणार नाही काय ?

दुसरे एक उदाहण पाहा. खुद्द श्री अक्कलकोटचे स्वामीमहाराजांचे चरित्रांत श्री. कवठेकरांनी पुढील प्रसंग दिला आहे. स्वामीभक्त चितोपंत टोळ यांचे घरी स्वामी झोपले होते. मध्यरात्रीचे सुमारास एकदम उठून स्वामींनी पुढील लावणी म्हणण्यास सुरुवात केली. "**गोरे ग रूप तुझें । तुजला पाहिले सात ताल माडीवर ।**" लावणी ऐकताच चितोपंत टोळांच्या मनांत विकल्प उत्पन्न होऊन त्यांनी स्वामींना प्रश्न केला, "महाराज, पूर्वाश्रमी आपण गृहस्थ होता असे दिसते. तरी पूर्ववृत्त कृपा करून कथन करावे." त्यावर स्वामींनी, "आमची जात चांभार—" असे उत्तर दिले व पोट धरून हसू लागले. स्वामींचे पूर्ववृत्त कोणालाच माहीत नाही. स्वामींचे जे चरित्र उपलब्ध आहे त्यावरून पाहता स्वामी पूर्वाश्रमी संसारी होते, असे म्हणणे अयोग्य होईल व अन्य कल्पना करणे तर अधमपणाचे होईल. कदाचित वरील प्रसंगी स्वामी मनाच्या अत्यंत उच्च अवस्थेत असतील व त्यांत दर्शन होणाऱ्या ईश्वरीस्वरूपाला अनुसरून वरील उद्गार काढले असावेत. अर्थात् ही कल्पना आहे हे सांगणे नको. वैवाहिक जीवनात अनुभवास येणाऱ्या काही शृंगारिक प्रसंगांचा उपयोग ज्ञानेश्वरांनी

दृष्टान्त देण्यासाठी केला आहे. त्यावरून एका चिकित्सक व सूक्ष्म दृष्टीच्या आधुनिक संशोधकाच्या दिव्य दृष्टीस ज्ञानेश्वर हे लग्नाच्या बोहल्यावर चढल्याची दृश्ये दिसू लागली आहेत !

महाराज व श्रीअक्कलकोटचे स्वामी यांच्याबद्दल असेही सांगणारे लोक भेटतात की महाराज तीन महिने अक्कलकोटास राहिले तरी तेथील स्वामींना त्यांची ओळख पटली नाही. तसेच या दोन स्वामींची भेट झाली म्हणजे मोठ्या कडाक्याचे वाद होत असत असेही म्हणतात. महाराज व अक्कलकोटचे स्वामी यांचेबद्दल श्रीअप्रबुद्धांनी ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांना एका प्रसंगी स्पष्टच विचारले होते. तेव्हा श्रीअण्णासाहेबांनी सांगितले की, " महाराज अक्कलकोटास राहिले होते आणि तेथे असता दोन्हीही स्वामी एकमेकांशी मोठ्या सलोख्याने वागत असत आणि एकमेकाविषयी अत्यंत आदर प्रदर्शित करीत असत. त्याचप्रमाणे इतर लोकांचा संपर्क टाळावा म्हणून निवडुंगाच्या फडावरून उडी मारून निघून जात आणि तासचे तास परत येत नसत वगैरे गोष्टी खऱ्या आहेत." व 'रंडी छोड देव ' याविषयी असा खुलासा केला की, "तो लोकांनी बसविलेला वेडगळ तर्क आहे. महाराज हे त्यापूर्वी कित्येक वर्षे फक्त संस्कृत बोलत असत. संस्कृताशिवाय शब्दही न काढण्याच्या या लहरीमुळे लोकांचा फार तोटा होतो, तेव्हा 'संस्कृत भाषा सोडून द्या ' म्हणून अक्कलकोटच्या स्वामींनी महाराजांना विनंती केली आणि तेव्हापासून महाराजही मराठी भाषा बोलू लागले." अण्णासाहेबांसारख्या अधिकारी व्यक्तीने केलेल्या स्पष्टीकरणात तथ्यांश नसेल असे कोण म्हणू शकेल ? पुढे आळंदीस आल्यावर पुराणाचे वेळी विनोद करण्यापलीकडे संस्कृताचा उपयोग महाराजांनी केव्हाही केला नाही. यावरून श्री. अण्णासाहेबांच्या स्पष्टीकरणाची सत्यता पटेल.

श्रीअक्कलकोट स्वामींच्या चरित्रकारांचा तत्कालीन साधुसत्पुरुषांच्या गुरुत्वाचा मान त्या स्वामींकडे देण्याविषयी जणु हट्टच आहे, असे श्रीमाणिकप्रभूच्या चरित्रांत दिलेल्या हकीकतीवरूनही दिसून येईल. अक्कलकोटचे स्वामी माणिकनगराला येऊन श्रीमाणिकप्रभूच्या सान्निध्यात वास्तव्य करून राहिले होते. उभयतांनी तीन दिवस एकांत केला. त्या वेळी त्यांचे काय काय बोलणे झाले हे कोणासच माहीत नाही. स्वामींची इच्छा श्रीमाणिकप्रभूंच्या जवळ राहण्याची होती. पण प्रभूंनी त्यांना, 'झाडाखाली झाड वाढत नाही. तुम्ही येथून अक्कलकोटास जा.' असे सांगितले असे त्या वेळच्या लोकांच्या सांगण्यात येते. त्याप्रमाणे श्रीमाणिकप्रभूंच्या सांगण्यावरून स्वामी अक्कलकोटास गेले. त्यांचा एकांत संपल्यावर स्वामी व श्रीमाणिकप्रभु त्यांचे दरबारांत एकमेकांचे शेजारी बसलेले

पाहून लोकांना आश्चर्य वाटले. ह्या प्रसंगी अक्कलकोटचे रहिवासी बाबाजी सबनीस उपस्थित होते व त्यांना श्रीमाणिकप्रभूंच्या सांगण्यावरून स्वामी अक्कलकोटास जाणार असल्याचे वर्तमान समजले, असे स्वामींचे चरित्रकार म्हणतात. या दोन स्वामींच्या भेटीचे वर्णन करताना प्रभूंनी स्वामींना किती गौरवाने वागविले हे दर्शविण्याकरिता स्वामींच्या चरित्रकारांनी पुढील ओवी घातली आहे.

**मग माणिकप्रभू समस्तांसी । सांगती हे गुरुस्थानी हृषीकेशी ।**
**साक्षात् दत्तात्रेय आम्हा सर्वांसी । आहेत जगदुद्धारक ।।**

'स्वत:च्या गुरूचा अधिकार किंवा लीला वर्णन करण्याकरिता जरी वरीलप्रमाणे ओवी देणे स्वाभाविक आहे, तरी त्यामुळे कांही जणांनी स्वामी हे प्रभूंचे गुरु होते अशी आपली समजूत करून घेतली असल्याचे आम्हांस दिसून आले आहे' असे श्रीमाणिकप्रभूंच्या चरित्रकारांपैकी एक चरित्रकार स्पष्टच म्हणतात व हे सर्वस्वी विसंगत आहे, असेही त्यांचे म्हणणे आहे. श्रीमाणिकप्रभूंप्रमाणेच महाराजांच्या गुरु–शोधनाचा प्रयत्न केल्यामुळे किंवा त्यांचा स्वामींशी शिष्यत्वाचा संबंध होता असे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केल्यामुळे सामान्य जनात किती गैरसमज पसरलेला आहे हे यावरून दिसून येईल. श्रीअक्कलकोटनिवासी स्वामींच्याकडे महाराजांचे गुरुत्व दिल्यामुळे त्यांच्या चरित्राला उणेपणा येईल असे नाही. 'सर्व विश्वां गुरु' असलेल्या श्रीदत्तात्रेयांनीही आपल्या चोवीस गुरूंचीही नांवे सांगितली व त्यायोगे अखिल विश्वाला आपल्या गुरुत्वाचा मान दिला आहे. श्रीराम व श्रीकृष्ण यांनीसुद्धा '**अवतार होतांचि मानुषी । तयापरी रहाटावे ।।**' या न्यायाने गुरु केले होते तर महाराजांनाही कोणीतरी मानवी गुरु असल्यास त्यांत कमीपणा तो कोणता !

श्रीअक्कलकोटनिवासी स्वामी काय किंवा महाराज काय या दोन्ही असामान्य विभूती आहेत. त्यांचेपैकी श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण हे ठरविण्याचे काम पामरांचे नाही. महाराजांच्या तीन गुरुपरंपरा उपलब्ध झाल्या आहेत व त्यांचा पुढे विचार केला आहे. महाराज 'कच्चा घडा होता' किंवा त्यांना गुरु लाभला नव्हता असा शोध लावणाऱ्या स्वामीभक्तांना त्यावरून पुष्कळ बोध होईल असे वाटते. म्हणून त्यांनी त्या अवश्य पाहाव्या अशी त्यांना नम्र विनंती आहे.

कोणत्याही सांप्रदायातील लोकांनी आपले उपास्यदैवत किंवा त्या संप्रदायाचा प्रवर्तक अथवा संस्थापक यास परमश्रेष्ठ मानणे साहजिकच आहे व ते इष्टही

आहे. परंतु असे करीत असता दुसऱ्या संप्रदायाला हीन लेखणे हे सर्वस्वी गैर नव्हे काय ? आपल्या संप्रदायाची प्रतिष्ठा वाढविण्याकरिता दुसऱ्याबद्दल अनादर उत्पन्न होईल, असा प्रचार का करावा हे समजत नाही. आपल्याकडे निरनिराळ्या संप्रदायांतील झगडे हे काही नवीन नाहीत. शैव व वैष्णव यांच्यातील तेढ तर फार जुनी आहे. गेल्या चाळीस पन्नास वर्षांपूर्वी वारकरी व रामदासी सांप्रदायात एकमेकांच्या श्रेष्ठत्वाबद्दल मोठाच वाद होता, व तो इतक्या हीन कोटीला पोचला होता की काळकर्त्या परांजप्यांनी वारकरी सांप्रदायाविरुद्ध 'विठोबा हा गुलामांचा देव आहे' असा उपहासात्मक लेख लिहून तो संप्रदाय कनिष्ठ आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. सांप्रदायिकत्व स्वीकारल्यामुळे कित्येक वेळा अहंकार, दुराग्रह, एकांतिकपणा व संकुचितपणा हे दोष उत्पन्न होतात. त्यामुळे दुसऱ्या संप्रदायाबद्दल अपप्रचार करण्यापर्यंत मजल जाते. 'भाव तोचि देव' या तत्त्वाला अनुसरून निरनिराळ्या संप्रदायांनी उपास्य दैवते किंवा आकार ही निव्वळ बिरबलाच्या गोष्टींतील 'इमामाच्या जुती' आहेत, हे विसरता कामा नये.

## साक्षात् श्रीदत्तावतार

**कार्याकारण अवतार होती । क्वचित्प्रकट क्वचित्गुप्ती ।**
**ते ब्रह्मज्ञानी जाणती । मूढ मति काय जाणे ॥** गु. च., अ. ३

'संत ही माझी रूपडी आहेत' असा स्वतः भगवंतांनीच निर्वाळा दिला आहे, ईश्वरी योजनेतच साधुसंतांचे अवतार भूतलावर होत असतात व त्याच्याच प्रेरणेने विशिष्ट कार्याकरिता संतमंडळी वेळोवेळी प्रगट होत असतात आणि ते आपले कार्य चोख बजावतात, म्हणून त्यांच्या कार्याचे किंवा अवताराचे खरे स्वरूप एक परमेश्वर किंवा खरे ब्रह्मज्ञानीच जाणू शकतात. जडमूढांना ते कळणे शक्य नसते. भगवान श्रीकृष्ण हे श्रीविष्णूचे अंश आहेत की नाही याबद्दल ब्रह्मदेव, इंद्र यांच्यासारख्या देवादिकांच्या मनात शेवटपर्यंत संदेह घोळत होता, व त्यामुळे त्यांची अखेरीस फजिती पण झाली. आपण नेहमी जगात पाहतो की, काही व्यक्तींना त्यांनी केलेल्या कार्याच्या मानाने जास्त प्रसिद्धी मिळते व त्यांना तसा डांगोरा पिटण्याचीही आवश्यकता भासते. याच्या उलट काही प्रसिद्धीपराङ्मुख लोक असे असतात की, जे आपली कामगिरी निष्ठेने आणि कर्तव्यबुद्धीने अखेरपर्यंत विशेष गाजावाजा न करिता करीत असतात. प्रसिद्धीमुळे ह्यांच्या कामात अनेक अडथळे उत्पन्न होतात. पण या अशा वृत्तीमुळे सामान्य जनांना त्यांच्या कार्याची किंवा त्यांच्या खऱ्या स्वरूपाविषयी थोडीसुद्धा कल्पना नसते. साधुसंतांच्या अलौकिक चमत्कारांवर किंवा त्यांच्या बाह्यस्वरूपावरच

दृष्टी ठेवल्याने त्यांच्या खऱ्या स्वरूपाची यथार्थ कल्पना सामान्य जनांना होत नाही. उलट विपरीत भावना मात्र उत्पन्न होतात. श्रीदत्तप्रभूंनी सहस्रार्जुनाला त्याच्या मनात विकल्प उत्पन्न होईल अशा रूपात दर्शन दिले. सहस्रार्जुनही काही कच्चा नव्हता. तो विकल्प कसोटीत पूर्णपणे उतरला म्हणूनच श्रीदत्तांनी त्याच्यावर कृपा केली.

महाराजांनी या वेळच्या खेळात अशी लीला केली की, लोकांना बाह्य स्वरूपावरून त्यांच्या खऱ्या स्वरूपाची ओळख होऊ शकली नाही. '**जैसा भाव जया पासीं । तैसा देव तयासी ।।**' या प्रमाणे जो ज्या भावनेने त्यांच्याकडे येई त्याच भावनेने महाराज त्याला आपले रूप दाखवीत. त्यामुळे त्यांचे खरे स्वरूप म्हणजे 'पूर्णत्वाचे' स्वरूप फारच थोड्यांना कळत असे.

महाराजांचे शिष्यपरिवारांत व आळंदीच्या परिसरात महाराज हे साक्षात् श्रीदत्तावतार आहेत अशी श्रद्धा आहे. या श्रद्धेस अनुसरून पूर्वी सांगितल्याप्रमाणे दर गुरुवारी महाराजांचे समाधीवर त्रैमूर्तीचा रजत मुखवटा बसवितात आणि मठातील नित्यक्रमांत सूर्यास्तानंतर होणाऱ्या धुपारत्यांचे वेळी श्रीदत्तप्रभूंची आरती म्हणतात. महाराजांवर निष्ठा असणाऱ्या काही भाविक लोकांनी किंवा इतर संतांनी ते दत्तावतार आहेत हीच श्रद्धा व्यक्त केली आहे.

शेरडीच्या साईमहाराजांचे अनुग्रहित श्रीसंत दासगणु महाराजांनी महाराजांचे चरित्र वर्णन करिताना 'अर्वाचीन भक्तलीलामृतांत' म्हटले आहे की,

**असो याच आळंदीत । झाले नरसिंह विख्यात ।**
**जे साक्षात् श्रीदत्त । नमन माझे तयासी ।। ८ ।।**

किंवा

**हे साक्षात श्री दत्तांश म्हणुनी । ओळखिले राधाकृष्णस्वामींनी ।**
**ते अखील तुम्हां लागूनी । सांगता ग्रंथ वाढेल ।। ११ ।।**

किंवा

**स्वामी साक्षात परमेश्वर । दत्तावतार सिद्ध योगी ।। ९१ ।।**

श्री नवसंत चरित्रकार श्री. वि. सी. शाळिग्राम म्हणतात–

**श्रीगुरु नरसिंह सरस्वती । दत्त अवतार प्रगटला क्षिती ।**
**अळंकापूरासी राहुनि प्रिती । केली ख्यातीं अनुपम ।।**

वऱ्हाडांतील लोणार येथील श्रीसच्चिदाश्रम स्वामींना महाराजांनी योगाभ्यास शिकविला व तो त्यांनी 'अंतरानुभाव' नावाच्या ओवीबद्ध ग्रंथांत कथित केला आहे. पहिल्या समासांत नमनातील ओव्यांत गुरु म्हणून महाराजांना नमन करिताना ते म्हणतात–

**असो सर्वांसी माझे नमन । माझा गुरु तोचि दत्त जाण ।**
**नरसिंव्ह सरस्वती नामाभिधान । पूर्णब्रह्म ।। १० ।।**

तसेच पुढे याच ग्रंथाच्या तिसऱ्या समासात, आपल्या स्वरूपाची ओळख पूर्णपणे प्राप्त होण्यात जर काही भय किंवा विघ्ने आली तर त्यांची निवृत्ती करण्याचा जो एक उपाय त्यांनी सांगितलेला आहे त्यात हीच श्रद्धा व्यक्त केली आहे.

**स्वस्थानी वृक्ष औदुंबरू । तेथे दत्तात्रेयाचा अवतारु ।**
**श्री नरसिंव्ह सरस्वती सद्गुरु । त्यांचे पाद ध्यावे ।। ४ ।।**

नागपूरचे राजयोगी श्रीअण्णामहाराज आपदेव यांनी, आपले गुरूंचे आज्ञेवरून, आळंदीत महाराजांजवळ काही योगाभ्यास शिकण्याकरिता वास्तव्य केले होते. त्यांनी महाराजांवर केलेल्या आरतीत आपली श्रद्धा खालीलप्रमाणे व्यक्त केली आहे.

**आरती सद्गुरुची । सोहं ब्रह्मपदाची । नृसिंह सरस्वती । मूर्ती ओतली साची ।। ध्रु० ।। तारावयां जडमूढां । रूप श्रीपाद धरी । अवतीर्ण दत्त राणा । झाला अलंकापुरी ।। १ ।।**

किंवा अभंगात–

**किर्ती स्वामीची ऐकोनी । झालों उताविळ मनीं ।। १ ।।**
**आलों शरण महाराजा । भेटवावें ज्ञानराजा ।। २ ।।**
**नित्य वश तुम्हांप्रति । ऐसी जगीं तुमची ख्याती ।। ३ ।।**
**अहो नृसिंह सरस्वती राया । शिवरूपा दत्तात्रेया ।। ४ ।।**

धुळ्याच्या भिकुबाई पुरंदरे यांनी आळंदीस महाराजांच्या समाधीजवळ बसून तयार केलेल्या अभंगात आपली श्रद्धा व्यक्त करण्याकरिता म्हणतात—

**सद्गुरु ज्ञानाचा सागर । दत्ताचाहि तो अवतार ।**

राधाकृष्ण स्वामींचे शिष्य विष्णुमहाराज यांनी महाराजांची आरती केली आहे. ही आरती मठांत रोज सायंकाळी म्हणतात. त्यात—

**ब्रह्मा हरि महेशा । नुमगसी तूं परेशा ।**

असेच महाराजांबद्दल म्हटले आहे.

वास्तविक पाहता महाराजांची प्रशस्तिपत्रके म्हणून वरील अवतरणे दिली नाहीत, तर निरनिराळ्या लोकांची त्यांच्याविषयी काय श्रद्धा होती हे दर्शविण्याच्या उद्देशाने ती येथे नमूद केली आहेत.

महाराज आपले स्वरूप प्रगट होऊ नये म्हणून नेहमी दक्षता घेत. एका प्रसंगी मात्र त्यांनी आपल्या एका भक्ताला आपली ओळख सहज मौजेकरिता

करून दिली होती. रावजीशास्त्री बेटावदकर हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. एकदा महाराज व रावजीशास्त्री मोक्षपट खेळत बसले होते. मोक्षपटांत निरनिराळी घरे असून त्यांना विष्णुलोक, सत्यलोक अशी नावे होती. त्यातच दत्तलोक असेही एक नाव होते. त्यावरून बोलणे निघून महाराजांनी रावजीशास्त्र्यास ते ते लोक पाहण्यास दृष्टि दिली. तेव्हा ते पाहून रावजीशास्त्री सांगू लागले की "हा विष्णुलोक." तेव्हा महाराजांनी विचारले, "श्री विष्णु तेथे आहेत काय ?" शास्त्री म्हणाले, "होय." असे होता होता दत्तलोकापर्यंत आले. तेव्हा रावजीशास्त्री म्हणाले, "दत्तात्रेय दत्तलोकांत नाहीत." महाराज म्हणाले, "खरे की काय ? कोठे गेले असतील बोला मग ?" शास्त्रीबोवांना दिलेली दृष्टी कायम होती. ते म्हणाले, "मी दाखवू कोठे आहेत ते ?" महाराज म्हणाले, "दाखव पाहू" तेव्हा लागलीच, "हे पहा येथे आहेत" असे म्हणून त्यांनी महाराजांचा हात धरला. तेव्हा, "ढोंगी, लबाड कुठला," वगैरे शिव्या देऊन महाराजांनी आपला हात सोडवून घेतला. त्यावरून महाराजांच्या स्वरूपाविषयी रावजीशास्त्र्यांची खात्री झाली. महाराजांनी हात सोडताच शास्त्रीबोवांची दिलेली दृष्टी नाहीशी झाली. अशाच प्रसंगी पुढे महाराज हे प्रत्यक्ष 'श्रीदत्तमूर्ति' आहेत हे प्रगट होण्याची वेळ झाली तेव्हा त्यांनी अवतारसमाप्तीची लीला केली. ती हकीकत पुढे येईलच.

धुळ्याचे श्री. नारायणबुवा रुद्र उपाख्य पद्मनाभ स्वामी हे महाराजांचे पट्टशिष्य, महाराजांनी त्यांना दत्तोपासना देऊन श्रीदत्तजयंतीचा उत्सव मार्गशीर्ष शुद्ध १४ स व पौर्णिमेस पारणे करण्याची आज्ञा केली. त्या काळच्या मानाने नारायणबोवांना राममंदिराचे पुजारी म्हणून फारच अल्प वेतन मिळत असे. बोवासाहेबांना श्रीदत्तजयंतीचा उत्सव, पारणे एवढ्या उत्पन्नात कसे होईल असे वाटे. तेव्हा महाराजांनी त्यांना सांगितले की, "तू कार्तिक वद्य प्रतिपदेपासून भिक्षेस जात जा. काहीच मिळाले नाही तर एक मूठभर दाणे पाखरांना घालीत जा म्हणजे पारणे होईल." महाराजांच्या कृपेने असा प्रसंग मात्र कधीच आला नाही. आळंदीस दत्तोपंत आठवले हे महाराजांचे परमभक्त होते. त्यांचेही मनात श्रीदत्तजयंतीचा उत्सव व पारणे करण्याचे आले. म्हणून त्यांनी महाराजांना त्याबद्दल विचारले. तेव्हा महाराजांनी त्यांना मार्गशीर्ष पौर्णिमेस दत्तजयंती व मार्गशीर्ष वद्य प्रतिपदेला पारणे करण्यास सांगितले, 'असे का ?' म्हणून विचारताच त्यांनी, "आम्ही पौर्णिमेस धुळ्याला नारायणकडे पारण्यास जाऊं." असे सांगितले. "आम्ही जाऊं" या उद्‌गारांवरून महाराज हे स्वतः दत्तमूर्ति होते व त्यांना भक्ताकरिता पारण्याला हजर राहावयाचे होते अशी कल्पना होते.

आळंदी हे क्षेत्र पुण्यापासून अवघे तेरा मैल दूर आहे. पुण्याचे रहिवासी श्री. रा. चिं. ढेरे यांनी श्रीदत्तप्रभू-श्रीनरसिंव्ह सरस्वती श्रीक्षेप्रभू गाणगापूर यांचे पंचशताब्दिमहोत्सव प्रसंगी (शके १८८० मध्ये) दत्त सांप्रदायाचा इतिहास सांगणारे 'श्री नरसिंव्ह सरस्वती—चरित्र आणि परंपरा' हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. इतिहास संशोधकाच्या भूमिकेवरून लिहिलेल्या या पुस्तकात या दत्तावतारी विभूतीबद्दल पुसटता देखील उल्लेख नसावा याचे आश्चर्य वाटते. हा निर्देश अर्थातच 'दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसते' या मनुष्यस्वभावास अनुसरून श्री. ढेरे यांच्यावर टीका करण्याच्या दृष्टीने केलेला नाही. माहिती गोळा करीत असता अगदी सान्निध्यातील व सहज उपलब्ध होऊ शकणाऱ्या कित्येक महत्त्वाच्या गोष्टींकडे कसा कानाडोळा होतो हे दाखविण्याचाच त्यांत उद्देश आहे हे प्रामाणिकपणे सांगावेसे वाटते.

प्रकरण दुसरे

# श्रीगुरुचरित्र आणि महाराज

### श्रीगुरुचरित्राचे कथासूत्र

सरस्वती गंगाधरविरचित श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ श्रीदत्तसंप्रदायात एक मान्यवर ग्रंथ म्हणून समजला जातो. सांप्रदायिकांमध्ये या ग्रंथाविषयी वेदांइतका पूज्यभाव असून, हजारो लोक त्याची मोठ्या श्रद्धेने नित्य पारायणे करीत असतात. या ग्रंथांत कृतयुगात अत्रिऋषिपत्नी सती अनसूया हिच्या पातिव्रत्याच्या प्रभावाने प्राप्त झालेले श्रीदत्तात्रेय व पुढे त्यांचेच कलियुगात झालेले दोन अवतार श्रीपाद श्रीवल्लभ व श्रीनरसिंव्ह सरस्वती यांचे लीलाचरित्र वर्णन केले आहे. श्रीदत्तप्रभूंचा अवतार हा अविनाशी आहे. "**नाना अवतार होऊनियां गेले। दत्तत्व संचलें जैसें तैसें ॥**" असे म्हणूनच त्यांचेबद्दल म्हटले आहे. परमेश्वराचे इतर अवतार विशिष्ट कार्याकरिता झाले व ते कार्य पूर्ण झाल्यावर ते ते अवतार समाप्तही झाले. अविद्यानाश व जगदुद्धाराचे कार्य हे निरंतर अखंड चालणारे आहे. श्रीदत्तात्रेयांचा अवतार गुरुकार्याकरिता झालेला आहे. अखिल विश्वाचे ते गुरू आहेत. विदर्भस्थ साधू गुलाबराव माधनकर या अवताराचे वर्णन करिताना म्हणतात, "**सहावा सुंदर सर्व विश्वागुरू। अत्रीचा कुमरु दत्तात्रेय।**" श्रीदत्तात्रेयांचा अवतार भूतलावर सदैव, नित्य, निरंतर राहणारा आहे.

ब्रह्मा, विष्णु, महेश्वर या त्रिमूर्तींचे ऐक्य होऊन श्रीदत्तअवतार झाला, '**त्रयमूर्ति ऐक्य होऊन। दत्तात्रेय राहिला आपण ॥**' असे श्रीगुरुचरित्रांत वर्णन आहे. श्रीदत्त हा महाविष्णूचा अवतार मानतात. "**त्रयमूर्ति तोचि जाण दत्त। 'सर्व विष्णुमयं जगत्'। राहील धरोनि तुमचें चित्त। श्री विष्णुमूर्ति दत्तात्रेय ॥**" यावरून ब्रह्मा, विष्णु, महेश्वर यांचे ऐक्य श्रीविष्णूमध्ये झाल्याचे दिसून येईल. ब्रह्मा, विष्णु व महेश्वर हे अनुक्रमे रज, सत्त्व व तम हे तीन गुण दर्शवितात. '**त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्त हा जाणा**' असे एकनाथ महाराजांनी म्हटले आहे. श्रीदत्तप्रभूंचे ठायी या त्रिगुणांचे ऐक्य झाले आहे म्हणजे काय ? व ते कसे ? याविषयीची सुंदर कल्पना दत्तजन्माच्या कथेवर आधारलेल्या एका पोथीत* पाहावयास मिळाली. नारदांनी अपार तप करून श्रीविष्णूला प्रसन्न करून घेतले

* एका वेदान्त सर्वेश्वर पंथांत प्रचलित असलेल्या 'श्रीदत्तजन्म' या हस्तलिखित पोथींत.

व वर मागितला. तो असा--**अवघे रजोगुण तमोगुण । हे द्वय विरहीत करून । मुख्य सत्त्वरुप जाण । दाखवी मजलागी ।।** नारदाचे हे बोलणे ऐकून श्रीविष्णु म्हणतात—**ऐसें बोलता नारदमुनी । सांगता झाला कैवल्यदानी । ऐक सखया चित्त देऊनी । सत्त्वरूपाचा विचार ।। त्रिभुवनीचे सत्त्व रूप जें । तें मीच आहे बा जाणिजे । परि तम मजसी पाहिजे । म्हणोनि सत्त्व कमी हो ।।** त्यावर नारदमुनींनी '**तम कासया सांग पा ।**' म्हणून पृच्छा केली. दैत्यदानवांचा संहार करून सृष्टीचे पालन करणाऱ्या विष्णूंनी सांगितले, '**जरी मी सत्त्वरूपीं राहत । तरी माझेनी हस्तें दैत्य । मरणार नाही सहसाही ।। हें जाणोनियां मानसीं । किंचित सत्त्व विधी हरासी । देवोनिया तमो गुणासी । रजो गुणासी जवळ केले ।।** व शुद्ध सत्त्व स्वरूप हवे असल्यास ब्रह्मा, विष्णु, त्रिनेत्र हे एकत्र केले पाहिजे असा उपाय सुचविला. कळीच्या नारदाने विचार करून अनसूयेच्या पातिव्रत्याची लक्ष्मी, पार्वती आणि सावित्री यांच्या जवळ स्तुती केली आणि त्या तिघींनी आपापल्या पतीजवळ अनसूयेचे सत्त्व हरण करण्याकरिता हट्ट घेतला. त्याप्रमाणे ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर अत्रि ऋषींच्या आश्रमात ब्राह्मण रूपाने येऊन उभे राहिले. अनसूयेच्या प्रभावाने तिन्ही देवांचे रूपांतर अर्भकांमध्ये झाले. कालांतराने नारदांच्या सांगण्यावरून लक्ष्मी, पार्वती आणि सावित्री आपापल्या पतींचा शोध करीत अत्रि आश्रमात उपस्थित झाल्या व अनसूयेजवळ आपापले पती परत मागू लागल्या. तेव्हा त्यांचा अभिमान पार गळाला हे पाहून ब्रह्मा, विष्णु, महेश्वर यांना अनसूयेने पूर्ववत् केले. नारदांनी अकस्मात प्रवेश करून श्रीविष्णूंची प्रार्थना केली की, '**म्हणे आता त्रयमूर्ति एकत्र जाहलां । दाखवा कोठें सत्त्वरूप ।।**' तेव्हा '**ते दिनीं ब्रह्मा विष्णु त्रिनेत्र । तिघे मिळोनी एकत्र । शुद्ध सत्त्व निवडिले ।। आणि त्रिमूर्तीचे सत्त्व मिळोन । मूर्ती केली असे निर्माण । ठेवीते झाले नामाभिधान । दत्तात्रेय अवधूत ।।**' अशा रीतीने त्रयमूर्तीचे ऐक्य होऊन शुद्ध स्वरूपी असा श्रीदत्तात्रेयाचा अवतार झाला. श्रीदत्तात्रेयाच्या अवताराच्या दोन खुणा आहेत. एक न शिकवता आपोआप वेद म्हणणे व दुसरी म्हणजे संसारापासून अलिप्त राहणे. त्रयमूर्ती दत्त, श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनरसिंव्ह सरस्वती हे एकरूप असल्याचे श्रीगुरुचरित्राचे आधारे पुढे दाखविले आहे.

## श्रीदत्तावतार

> **अनसूयेच्या वरीं देखा । त्रयमूर्ति राहिली मूर्ति एका ।**
> **नाम दत्तात्रेय ऐका । मूळ पीठ श्रीगुरुचें ।।**

'गुरुविना देव न दिसे.' सद्गुरुवाचून संसारसागरातून पार नेणारा कोण आहे ? गुरुकार्याकरिता श्रीदत्तात्रयांचा अविनाशी अवतार झालेला आहे. अ–त्रि त्रिगुण किंवा कोणत्याही त्रिपुटीच्या पलिकडे गेलेला आणि अनसूया म्हणजे

जिच्यामध्ये असूया नाही अशी. जेथे असूया आहे तेथे द्वंद्व आलेच. पण अनसूया म्हणजे द्वंद्वाच्या पार गेलेली. म्हणूनच अत्रि-अनसूयेच्या आश्रमात श्रीदत्तात्रेयांचा अवतार झाला. अत्रिऋषींनी अखिल विश्वाला 'दत्त' म्हणजे दिलेला हा पुत्र म्हणूनच त्याचे नाव दत्तात्रेय असे ठेवले. या अवताराचा प्रसंग श्रीगुरुचरित्राच्या अध्याय चारमध्ये सांगितला आहे. **'पाकस्थाना जाऊनि आपण । चिंतन करी पतीचें चरण । वस्त्र फेडोनि झाली नग्न । म्हणे अतिथी बाळ माझे ।।** 'बाळ' म्हटल्याबरोबर सत्त्व पाहावयास आलेल्या ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर या तिन्ही देवांची बाळे झाली. अनसूयेने स्वतंत्र तप केले नव्हते. ती खरी पतिव्रता होती. तिचे पातिव्रत्य हेच तिचे तप होते. तुर्यावस्थेत वरील शब्द उच्चारले म्हणून ती वेदवाणी झाली व तिच्या सामर्थ्याने देवांची बाळे झाली. हा जन्म जरायुज नसून वाणीरूप आहे.

## श्रीदत्तात्रेय हेच श्रीपादश्रीवल्लभ

कलियुगांत जगदुद्धार करण्याकरिता श्रीदत्तात्रेयांचा जो पहिला अवतार झाला तो म्हणजे श्रीपादश्रीवल्लभ. **पीठापूर पूर्वदेशीं । होता ब्राह्मण उत्तमवंशीं । आपस्तंब शाखेसीं । नाम आपळराजा जाण ।। तयाची भार्या सुमता । असे आचार पतिव्रता । अतिथी आणि अभ्यागता । पूजा करी भक्तिभावें ।।** सुमता श्रीदत्ताची आराधना करणारी होती. या पतिव्रतेला श्रीदत्तप्रभूंनी त्रिमूर्तीचे रूप दाखविले. आणि तिने तुम्हासारिखा जगद्वंद्य वेदसदृश पुत्र व्हावा म्हणून वर मागितला. त्याप्रमाणे वर दिला. श्रीदत्त तिचे उदरी आले. 'आम्हासी वर दिधला दत्ता' म्हणून त्या जोडण्याने पुत्राचे नाव 'श्रीपाद' असे ठेवले. मौंजीबंधन झाल्यावर श्रीपादाने चारी वेद म्हणून दाखविले. सोळाव्या वर्षी त्यांच्या मातापितरांनी त्याचा विवाह करण्याचे ठरविले. तेव्हा श्रीपाद म्हणाले, वैराग्यरूपी स्त्रीशी आमचा विवाह झाला आहे. दुसऱ्या स्त्रीशी विवाह कर्तव्य नाही. **'आपण तापसी ब्रम्हचारी । योगस्त्रिये वांचोनि नारी । बोल धरा निर्धारी । श्रीपाद-वल्लभ नाम माझें ।।'** नंतर उत्तर दिशेला तीर्थयात्रेला श्रीपाद श्रीवल्लभ निघाले. चरणस्पर्शाने तीर्थक्षेत्रे पावन करीत व भक्तजनांवर अनुग्रह करीत गोकर्ण क्षेत्रात आले. तेंथे तीन वर्षे गुप्तपणे वास्तव्य करून श्रीगिरीपर्वतावर आले. चार मास तेथे वास करून निवृत्ति संगमावर पुढे कुरवपूर म्हणजे हल्लीचे कुरुगड्डी येथे आले.

कुरवपूर येथे वास्तव्य असता श्रीपाद श्रीवल्लभांचा महिमा फार वाढला. त्यांनी तेथे किती काळपर्यंत वास्तव्य केले हे कळण्यास काहीच मार्ग नाही. पुढे अवतार घ्यावयाचा असल्यामुळे ते तेथेच अदृश्य झाले. **आश्विन वद्य द्वादशी । नक्षत्र मृगराज परियेंसीं । श्रीपाद बैसले निजानंदेसी । अदृश्य झाले गंगेत ।।**

लौकिक दृष्टया श्रीपादस्वामी गुप्त झाले. पण भक्तजनांना '**जे जन असती भक्त केवळ । त्यांसी दिसती निर्मळ ।**' यावरून ते प्रत्यक्षपणे दिसत होते, असे श्रीगुरुचरित्रकारांनी म्हटले आहे.

## श्रीपादश्रीवल्लभ हेच श्रीनरसिंव्ह सरस्वती

श्रीपादश्रीवल्लभ कुरवपुरी असता दोन घटना अशा घडल्या की त्यावरून त्यांना अदृश्य झाल्यावर पुढे अवतार घ्यावयाचा होता असे दिसून येते. कुरवपुरात अंबिका नावाची एक ब्राह्मण विधवा स्त्री होती. तिचा पती वेदशास्त्रसंपन्न होता व ती स्वत: सुशील आचार पतिसेवका होती. तिचा एकुलता एक मुलगा अती मूढ होता. सर्व ब्राह्मण त्याची निंदा करू लागले. शेवटी जीवास कंटाळून त्या मातापुत्रांनीं जीव देण्याचे ठरविले. **मातासुत दु:ख करीत । गेली गंगा प्रवाहात । तेथे देखिलें जगदुद्धरित । श्रीपाद योगी स्नान करितां ॥** श्रीपादश्रीवल्लभांनी तिची व्यथा जाणून घेतली. **वासना असे माझे मनीं । पुत्र व्हावा ब्रह्मज्ञानी । बाळपणींच पाहे नयनी । पूज्यमान समस्तांसी ॥** अशी आपली इच्छा त्या विधवेने बोलुन दाखविली व तसा वर मागितला. कृपामूर्तींनी तिला सांगितले '**तुझें मनीं असेल जरी । होईल पुत्र मज सरी । संशय सांडुनि निर्धारीं । शनि प्रदोषीं पूजी शंभू ॥** शनिप्रदोष व्रतमाहात्म्य वर्णन करून ते व्रत करण्यास तिला सांगितले.

श्रीपादश्रीवल्लभांचा एक धोबी सेवक होता. त्यावर प्रसन्न होऊन तू पुढील जन्मी यवन कुळात जन्म घेऊन राजा होशील व राजवैभव भोगशील असा वर दिला. रजकाने विनंती केली '**अंतरतील तुझे चरण । द्यावें मातें पुनर्दर्शन । तुझा अनुग्रह असे कारण । ज्ञान द्यावें दातारा ॥**' त्यावर श्रीपाद म्हणाले, '**श्रीगुरू म्हणती तयासी । वैदुरा नगरी जन्म घेसी । भेटी देऊ अंतकाळासी । कारण असे येणें आम्हां ॥ भेटी होतांचि आम्हांसी । ज्ञान होईल तुझें मानसीं । न करी चिंता भरवंसी । आम्हां येणें घडेल ॥ आणीक कार्यकारणासी । अवतार घेऊं परियेसी । वेष धरोनि संन्यासी । नाम नृसिंह सरस्वती ॥** या शेवटल्या तीन ओव्यांवरून श्रीपादश्रीवल्लभ हेच पुढे श्रीनरसिंव्ह सरस्वती हे रूप घेते झाले हे स्पष्ट होते.

## श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामींचे लीलाचरित्र

श्रीगुरुचरित्राच्या अकराव्या अध्यायापासून अखेरपर्यंत श्रीनरसिंह सरस्वती स्वामींच्या लीला वर्णन केल्या आहेत. श्रीपादश्रीवल्लभांनी ज्या अंबिका नामक विधवा स्त्रीला 'होईल पुत्र मजसरी ।' म्हणून वर दिला होता, ती पुढील जन्मात वऱ्हाडांतील कारंजा नामक ग्रामात वाजसनेय शाखेच्या विप्र कुळात जन्मास

आली. तिचे नाव अंबाभवानी असे ठेवण्यात आले. तिचे त्याच ग्रामांतील माधव नामक शिवव्रती ब्राह्मणाशी लग्न झाले. दोघेही प्रदोष करीत होती. त्यांचे उदरी श्रीपाद स्वामींनी जन्म घेतला. बालकाचे जन्मनाव शालिग्राम देव व व्यावहारिक नाव नरहरी असे ठेविले. या मुलाने जन्मापासून मौंजीबंधन होईपर्यंत ॐ शिवाय कोणताच दुसरा शब्द उच्चारला नाही. मौंजीबंधनाचे वेळी त्यांनी चारी वेद म्हणून दाखविले. श्रीदत्तात्रय अवताराची आपोआप वेद म्हणण्याची खूण त्यांनी या प्रसंगी प्रकट केली. मौंजीबंधनानंतर त्यांनी आपले मातेस पूर्वजन्मीची स्मृती दिली. '**संन्यासी आम्ही यती । अलिप्त असो संसारी ।**' असे म्हणून दत्त अवताराची दुसरी खूणही त्यांनी दाखविली. काशीक्षेत्राकडे प्रयाण करताना त्यांनी आपल्या आईवडिलांस श्रीपादश्रीवल्लभ या स्वरूपात दर्शन दिले. काशीस 'अष्टांग योगे करूनि' तीव्र तपाचरण केले. काशी क्षेत्रात योगी, संन्यासी, यती अनेक होते. त्या सर्वांमध्ये कृष्णसरस्वती नामक एक वृद्ध ब्रह्मज्ञानी असे संन्यासी होते. श्रीगुरु त्यांचेवर प्रसन्न होऊन त्यांचेपासून त्यांनी संन्यासदीक्षा घेतली.

काशीक्षेत्री काही काळ वास्तव्य करून तीर्थयात्रा करीत करीत आपल्या जन्मभूमीस एकवीस किंवा तीस वर्षांनी म्हणा, परत आले. पुढे कारंजाहून नाशिक, त्र्यंबकेश्वर, मंजरीका, वासरब्रह्मेश्वर, वैजनाथ, भिल्लवडी, इत्यादी ठिकाणी वास करून ते महाराष्ट्रांतील कुरवपूर म्हणजे ज्याला हल्ली नरसोबाची वाडी म्हणतात तेथे आले. तेथे स्वतःस प्रगट न करता बारा वर्षे वास्तव्य करून पुढे गाणगापुरास आले. या काळात त्यांनी आपल्या अद्भुतरम्य लीलांनी हजारो लोकांचा उद्धार केला. श्रीगुरूंचा अवतार महाराष्ट्रांत यावनी सत्तेच्या ऐन अमदानीच्या काळात झाला. मुसलमानी सत्तेखाली प्रजा पार भरडून निघाली होती. अशा वेळी दीनदुबळ्या झालेल्या लोकांत 'आत्मप्रत्यय व आत्मविश्वास आणि चैतन्य' उत्पन्न करून राष्ट्राला यवनांच्या दाढेतून वाचविले व राष्ट्राची 'अस्मिता' टिकवून ठेवली.

श्रीगुरुचरित्रात श्रीगुरूंच्या लीला सविस्तरपणे वर्णन केल्या आहेत. गाणगापुरांत प्रगट झाल्यापासून श्रीगुरूंचा महिमा फार वाढला. त्यांची 'चहूं राष्ट्रांत' ख्याती पसरली आणि साधु, असाधु, धूर्त असे सर्व प्रकारचे लोक "**काम्यार्थ व्हावें म्हणूनि । समस्त येती श्रीगुरुच्या दर्शना ।**" अशी परिस्थिती उत्पन्न झाली. श्रीपादश्रीवल्लभ अवतारी वर दिलेला रजक, बेदरच्या यवन राजवंशात जन्म घेऊन राजविलास भोगीत होता. त्याचा उद्धार होण्याचा काल जवळ येत होता. अशा वेळी श्रीगुरूंच्या मनात वेगळेच विचार येत होते. **श्रीगुरुचरित्रकारांनी ते मोठ्या सूचकतेने प्रगट केले आहे. 'ऐसे असता**

**वर्तमानी । श्रीगुरु होते गाणगाभुवनीं । विचार करिती आपुले मनीं । राजा येईल म्हणोनियां ।। येथे येती म्लेंच्छ लोक । होईल द्विजां उपबाधक। प्रगट झालों आता ऐक । येथे आम्ही असूं नये ।। प्रगट झाली महिमा ख्याति। पहावया येती म्लेंच्छ याति । आतां आम्ही राहावें गुप्तीं । लौकिकार्थ परियेसा ।। आले ईश्वरनाम संवत्सरू । सिंह राशी आला असे गुरु । गौतमी तीर्थं असे थोरू । यात्रा प्रसंगें जावें आतां ।। म्हणती समस्त शिष्यांसी । करा आइती वेगेंसी । येतो राजा बोलवावयासी । जावें त्वरित गंगेला ।।'** स्फोटकाच्या निमित्ताने राजा श्रीगुरूंच्या दर्शनाला गाणगापुरास आला. दर्शन होताच श्री गुरूंनी **'कां रे रजका कोठें असती'** असे विचारले. श्रीगुरूंच्या या प्रश्नाने राजाला आपल्या पूर्व जन्माचे ज्ञान झाले. श्रीगुरूंनी त्याचा उद्धार केला आणि पुढल्याच वर्षी म्हणजे बहुधान्यनाम संवत्सरात आपण **'निजानंदी बैसले'.**

## श्रीगुरूंची श्रीशैल्ययात्रा

बेदरच्या यवन राजाचा श्रीगुरूंनी पूर्वावतारातील भक्त म्हणून उद्धार केला खरा, पण त्यामुळे वेगळाच पेचप्रसंग त्यांचेसमोर उभा राहिला. विधिघटने-प्रमाणे **'पुढे येतील दुर्दिन । कारण राज्य यवन ।'** हे गुरूंना माहीत होते. यवन राजा गुरूंचा भक्त बनला म्हणून समस्त यवन दर्शनास येतील व त्यामुळे **'प्रगट असतां घडे अधर्म । समस्त म्लेंच्छ येथें येती'** हे त्यांना दिसत होतेच. म्हणून श्रीशैल्ययात्रेचे निमित्त करून श्रीगुरूंनी गाणगापूर सोडून जाण्याचे ठरविले. निघताना दु:खी झालेल्या भक्तजनांना आश्वासन दिले की. **'यात्रारूपें श्रीपर्वतासी । निघालों आतां परियेसीं । प्रगट बोल हाचि स्वभावेसीं । गौप्य रूपें राहूं येथेंचि ।।'** आणि **'प्रगट निघो यात्रेसी । वास निरंतर गाणगाभुवनासी । भक्तजन तारावयासी । राहूं आम्ही निरंतर ।।'** अशा रीतीने भक्तपरिवाराचे समाधान करून त्यांना परतविले व गुप्तरूपाने मठात आपण असल्याचा लोकांना दृष्टांत दाखवून ते पाताळगंगेच्या काठावर चार शिष्यांसह आले. तेथे काही काळ राहून बहुधान्य नाम संवत्सरी माघ वद्य प्रतिपदा वार शुक्रवार असा पुण्यदिवस पाहून पुष्पासनावर बसून पाताळगंगेतून अदृश्य झाले. पाताळगंगेच्या पैलतीरावर असणाऱ्या नावाड्यांनी त्यांना पाहिले. शिष्यवर्गाकरिता नावाड्याजवळ निरोप सांगून आपण 'कर्दळीवनात' निघून गेले.

संतचरित्रकार कवी महिपती ताहराबादकर यांनी आपल्या 'भक्तलीलामृत' नामक ग्रंथात ४९ व्या अध्यायी श्रीनरसिंव्ह सरस्वतीस्वामींचे चरित्र अवघ्या १३६ ओव्यांत संक्षिप्तपणे वर्णन केले आहे. त्यात त्यांनी श्रीगुरूंच्या गुप्त होण्याबद्दल फार वेगळी हकीकत दिली आहे. ती अशी : "गाणगापूरहून गुप्त होऊन कृष्णाकाठच्या कुरुंदवाड नामक ग्रामात श्रीगुरू प्रगट झाले व काही काळ

'अघटित विदान' दावून तेथेच अदृश्य झाले." महिपतींनी भक्तलीलामृत हा ग्रंथ नाभाजीच्या 'भक्तमाला'या ग्वालेरी भाषेत लिहिलेल्या ग्रंथाच्या आधाराने रचलेला आहे. नाभाजीला "महाराष्ट्रीय संतांची चरित्रे अगदीच बेताची माहीत असावी असे दिसते, व त्यापासून ऐतिहासिक माहिती बिलकूल मिळण्यासारखी नाही." असे विद्वानांचे मत आहे. सरस्वती गंगाधरकृत श्रीगुरुचरित्रातील कथानक, स्थळे, घटना व वर्णन वगैरे या सर्वांशी महिपतीचे वर्णन ताडून पाहता असे वाटते की श्रीगुरुचरित्र ग्रंथ त्यांचे दृष्टीसमोर बिलकूलच नव्हता. इतका त्यात फरक आहे.

श्रीशैल्यमल्लिकार्जुन हे देवस्थान हल्लीच्या आंध्र राज्यात कृष्णा नदीच्या दक्षिण काठावर सोळाशे फूट उंच अशा श्रीशैल्यपर्वताच्या शिखरावर आहे. त्या भागातील लोकांना श्रीगुरुनरसिंव्ह सरस्वतीचे चरित्र अजिबात माहीत नाही असे आढळून येते. भिन्न भाषा व भौगोलिक अंतर यामुळे ही स्थिती उत्पन्न झाली असावी असे वाटते.

## श्रीअण्णासाहेब व इतर काही लोकांची श्रद्धा

'ईश्वराचे खरे वर्णन करणे म्हणजे वाचा बसणे होय.' अठरापुराणे आणि सहा शास्त्रे यांनाही त्याच्या स्वरूपाचा निश्चय करता आला नाही आणि शेवटी वेदाला 'नेति नेति' असे म्हणण्याची वेळ आली. '**शुक व्यासादिक भुलले। लीला गातां वेडावले।**' मग सामान्य माणसाच्या अल्पबुद्धीचा काय पाड ! म्हणूनच की काय त्या कनवाळू परमेश्वराने प्रतिज्ञेवर सांगितले आहे की, "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्"; जसा भाव असेल तसाच देव दिसेल. भक्ताच्या भावासाठी परमेश्वराने निरनिराळी रूपे घेतल्याचे अनेक प्रसंग दाखविता येतील. **जैसाभाव जयापासीं। तैसा देव तयासी।**' असे श्रीसमर्थांनी म्हटले आहे. जशी वस्तू असेल तशीच तिची प्रतिमा आरशात दिसेल. बिंबासारखेच प्रतिबिंब. म्हणून समर्थांनी सांगितले आहे, "**जैसा भाव प्रतिबिंबला। तयाचाचि देव जाला। जो जैसें भजे त्याला। तैसाचि वोळे॥**" आणि तुकोबाही "एक भावचि कारण देवा" असे स्वानुभवाने सांगतात.

त्रैमूर्ति श्रीदत्तभगवान, श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनरसिंहसरस्वती हे एकरूप असल्याचे मागे दाखविले आहे. ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब यांची दृढ श्रद्धा, पक्की खात्री व स्वतःचा अनुभव होता की श्रीगुरू नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज, ज्यांचे चरित्र श्रीगुरुचरित्रात वर्णिले आहे, तेच श्रीक्षेत्र आळंदी येथील श्रीनरसिंव्हसरस्वती होत. "श्री अलकापुर निवासी (श्रीक्षेत्र आळंदी) श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामी महाराज हेच. हे प्रमाणयुक्त पाहावे," अशी, श्रीअण्णासाहेबांनी

स्वत: श्रीगुरुचरित्रासंबंधी जी टिपणे लिहून ठेवली आहेत, त्यात एक नोंद आहे. 'श्रीगुरुचरित्रात परमेश्वराचा श्रीनरसिंव्हसरस्वती म्हणून जो पूर्णावतार झाला तो अवतार श्रीदत्तात्रेयांनी त्या वेळी समाप्त केला नाही. श्रीशैल्य पर्वतावर गुप्त होऊन महाराज तेथून हिमालयात प्रगट झाले आणि तेथे काही वर्षे राहून यदृच्छेने स्वैर संचार करीत नाना सोंगांनी आणि नाना रूपांनी जगदुद्धार करीत, कोठे अल्प काळ तर कोठे बहुत वेळ असे वास्तव्य करून वऱ्हाड, खानदेश, माले-गाव, पिंपळगाव वगैरे ठिकाणांहून पुण्यास आले. या सर्व काळात कधी जटामंडित, तर कधी शुद्ध मुंडीदंडी वेषाने आणि केव्हा केव्हा तर फकिरी बाण्याने हिंडत.' श्रीगुरुचरित्र कथानायक श्रीनरसिंव्ह सरस्वती हेच प्रत्यक्ष महाराज आहेत, अगदी तोच देह टिकवून—अवतार नव्हे—अशी श्रीअण्णासाहेबांची श्रद्धा होती. 'महा-राजांना कोणी नरसिंव्हसरस्वतींचे अवतार म्हटलेले त्यास रुचत नसे' मात्र याविषयी अण्णासाहेबांनी कोणाशी कधीही वाद घातला नाही. क्वचित् प्रसंगीं थोडे उघड बोलून दाखवीत, असे म्हणतात.

अण्णासाहेबाप्रमाणेच महाराजांचे पट्टशिष्य श्रीपद्मनाभस्वामी तथा श्रीनारायणबोवा रुद्र, धुळे, यांचीही श्रद्धा होती. श्रीपद्मनाभ स्वामींचा उपदेश घेतलेले श्रीभक्त कै. सदाशिव महादेव ऊर्फ बापूसाहेब दांडेकर रा. उमरावती यांनी एकदा बोवासाहेबांना उघडपणे विचारले होते की, "महाराज हे श्रीगुरु-चरित्रातील श्रीनरसिंव्ह सरस्वतीच आहेत की त्यांचे अवतार आहेत ?" तेव्हा बोवासाहेबांनी सांगितले, "नाही रे, सदाशिव. अवतार नाहीत. प्रत्यक्ष तेच आहेत."

श्रीसंत दासगणु महाराजांनी अर्वाचीन श्रीभक्तलीलामृत ग्रंथात महाराजां-बद्दल अशीच श्रद्धा व्यक्त केली आहे. '**श्री गुरुचरित्राचे अंतीं । जें कथिले नरसिंह सरस्वती । तेंच हें निश्चिती । योगबळाने अवतरलें ॥१२॥**' (अध्याय ३०) 'नवसंत चरित्रात', श्री शाळिग्राम यांनी वर्णिलेल्या महाराजांच्या चरित्रात हाच भाव व्यक्त केला आहे. श्री शाळिग्राम म्हणतात, "**असो तीर्थक्षेत्रें फिरत फिरत । स्वामी राहिले आळंदींत । मातापिता कोण असत । हेहि न कळे मज लागीं ॥२२॥ श्रीगुरुचरित्र ग्रंथांत । एकादशावे अध्यायात । श्रीस्वामींचे जन्मवृत्त । असे साद्यंत निवेदिले ॥२३॥ कोणी शंका धरतील मानसीं । की चार शत वर्षे या गोष्ठीसी । झाली ते हे स्वामी असती । मृत्युलोकीं केवी घडे ॥२४॥** अशी प्रस्तावना करून श्रीगुरुचरित्रातील काही घटना व ओव्या यांचे आधारे श्रीगुरु नरसिंह सरस्वती हेच श्रीमहाराज आहेत हे दाखविण्याकरिता '**तेची हे नरसिंव्ह सरस्वती । जगदुद्धार व्हावयासाठी । अळंकापुरासी प्रगट होती । संदेह मानसीं नसावा ॥१२१॥** ही ओवी घातली आहे.

महाराजांच्या भक्तमंडळीत, महाराज हे प्रत्यक्ष श्रीगुरुचरित्र कथानायक द्वितीय दत्तावतार श्रीगुरु नरसिंह सरस्वती होते अशी दृढ श्रद्धा आहे. महाराजांनी आपल्या पूर्व चरित्रात, ज्या लीला गाणगापूर व इतरत्र केल्या त्या सर्व पुन्हा आळंदीस केल्या. मात्र फरक एवढाच ठेवला की, येथे सर्व काम चोरून केले. आपण प्रगट होऊ नये म्हणून अत्यंत दक्षता घेत असत व तेवढ्या प्रत्येक कृत्यात काही तरी पर्याय ठेवून संशयास जागा ठेवीत. कित्येक प्रसंगी, भोवतालच्या लोकांस आपल्या खऱ्या स्वरूपाची कल्पना होत आहे असे महाराजांस आढळल्यास ते आपल्या मायावी भाषणाने लोकांना भ्रमात पाडीत किंवा वेगळयाच गोष्टींकडे त्यांचें लक्ष वेधीत. भोवतालची मंडळी बेताच्या तोलाचीच असल्यामुळे त्यांची फसगत होत असे. लोक '**उगीच लागतील पाठीं**' म्हणून त्यांनी '**जनीं असो द्यावा भ्रम**' असेच वर्तन केले.

## महाराजांच्या स्वमुखातील माहिती

वऱ्हाडात कारंजा नावाचे गाव मूर्तिजापूर तालुक्यात आहे. हे गाव प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. या गावाला 'लाडाचे कारंजे' असेही म्हणतात. कारण लाड जातीच्या सावकारांची घरे येथे आहेत. 'कारंजा बिबी' असे दुसरेही नाव या गावाला आहे. उंटावरील कस्तुरी विकत घेणाऱ्या सावकाराची गोष्ट येथलीच. हे गाव वऱ्हाडातील संपन्न गावांपैकी एक असून व्यापारी पेठ म्हणून आजही प्रसिद्ध आहे. 'कारिंज महात्म्य' नावाची स्थलवर्णनात्मक पोथी आहे. त्यावरून कारंजा प्राचीन काळीही पवित्र क्षेत्र म्हणून फार प्रसिद्ध होते असे दिसते. तेथे कारिंज ऋषींनी व्याधी निवारणार्थ तपश्चर्या करून देवीस प्रसन्न करून घेतले. तिने निर्माण केलेल्या सरोवरात स्नान करताच कारिंज ऋषी व्याधिमुक्त झाले. त्या जलाशयाला 'ऋषी तलाव' म्हणतात व तो आजही तेथे पाहावयास मिळतो.

श्रीगुरुचरित्राच्या अकराव्या अध्यायात श्रीगुरूंच्या जन्माचा वृत्तान्त कथन केला आहे. कारंजा हे श्रीगुरूंच्या जन्माचे ठिकाण. त्यांच्या आईचे नाव अंबाभवानी असे होते. वडिलांचे नाव माधव आणि उपनाव काळे. काळे हे वासिष्ठ गोत्री वाजसेनेय शाखी देशस्थ ब्राह्मण. या काळे घराण्याची त्रोटक माहिती श्रीअप्रबुद्ध यांनी लिहिलेल्या 'द्वितीय दत्तावतार नृसिंहसरस्वती' या पुस्तकात आलेली आहे.

ज्या वाडयात श्रीगुरूंच्या जन्माची जागा आहे त्या वाडयाला 'काळयांची हवेली' म्हणून ओळखतात. गेल्या ५०–६० वर्षांपूर्वी ही जागा ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धन किंवा वासुदेवानंदसरस्वती अशा काही थोडया अधिकारी लोकांनाच माहीत होती. या वाडयातील वरच्या मजल्यावरची आग्नेय कोपऱ्यातील खोली जन्मस्थान म्हणून दाखवितात. या खोलीच्या बाहेर भिंतीवर गंधादि पूजाद्रव्याची पुटे चढलेली आढळतात. या भिंतीला 'नरहरीची भिंत' असे म्हणतात.

ग्रामस्थ लोकांची एके काळी अशी समजूत होती की, हिरण्यकश्यपु वधाशी संबंध असलेल्या उग्र नरसिंव्ह देवतेचा या जागेशी संबंध आहे व त्यामुळे तेथे कोणी फारसे जाण्यास धजत नसे. या भिंतीजवळ बसून श्रीगुरू मौंजीनंतर वेदचर्चा करीत. प्रथम १९१० साली व नंतर १९१३ साली असे दोनदा श्रीवासुदेवानंद सरस्वती हे कारंजास आले असता या वाड्यात येऊन श्रीगुरूंच्या जन्मस्थानाचे त्यांनी दर्शन घेतले.

पूर्वी 'काळे हवेली' काशी येथील काळे सावकारांची होती. त्यांच्या गुमास्त्याने तो वाडा काळ्यांचे आश्रित श्री. घुडे यांना सुमारे १६०० रुपयांस विकला. तेव्हापासून या वाड्यावर कारंजाचे सुप्रसिद्ध नागरिक कै. नरहर रामचंद्र उपाख्य बापूसाहेब घुडे यांची मालकी आहे. कै. बापूसाहेब घुडे यांनी श्रीगुरूंच्या जन्मस्थानासंबंधी काही टिपणे लिहून ठेवली आहेत. त्यांतील पुढील हकीकत कै. बापूसाहेब घुडे यांचे चिरंजीव श्री. वसंत नरहर घुडे यांच्या सौजन्याने मिळाली. त्या हकीकतीने तर महाराज हेच प्रत्यक्ष गुरू होते या श्रद्धेस जास्तच पुष्टी येते.

कै. बापूसाहेब घुडे यांचे एक स्नेही श्री. दादासाहेब थत्ते हे दारव्हा येथे राहत असत. १९१३ साली ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धन व श्री. दादासाहेब थत्ते यांची पुणे येथे भेट झाली. सहज चौकशी करावी म्हणून अण्णासाहेबांनी दादासाहेबांजवळ त्यांच्या गावची माहिती विचारली. त्याकाळी मुर्तिजापूराहून कारंजाकडे जाणारा लोहमार्ग झाला नव्हता. म्हणून दारव्ह्याचा स्थळनिर्देश करताना जास्त परिचित व मोठी गावे म्हणून मूर्तिजापूर, कारंजा इ. ठिकाणांचा थत्ते यांनी उच्चार केला. कारंजाचे नाव निघाल्यावर श्रीअण्णासाहेब म्हणाले, "अहो ! हे तर आमच्या महाराजांचे पूर्व अवतारातील जन्मस्थान. आपण वऱ्हाडात गेल्यावर या गावी महाराजांचे दृश्य स्मारक काही आहे काय याचा तपास करून मला कळवा. मला खुद्द आळंदीच्या महाराजांनी माझा जन्म काळ्यांच्या घरात झाला आहे असे सांगितले आहे. या दृष्टीने तपास करावा." पुढे श्री. दादासाहेब थत्ते यांनी कारंजास येऊन कै. बापूसाहेब घुडे यांचेकडे काळ्यांच्या वाड्याची चौकशी केली. तोपर्यंत, घुडे राहतात तोच वाडा काळ्यांचा आहे ही गोष्ट दादासाहेबांना माहीत नव्हती, व महाराजांचे दृश्य स्मारकही तेथे काहीच नव्हते. पुढे १९१४ साली लोकमान्य टिळक कारावासातून परत आल्यावर त्यांची 'गीतारहस्यावर' पुण्याला प्रवचने झाली. त्या प्रसंगी कै. बापूसाहेब घुडे पंधरा दिवस पुण्याला होते. त्या मुक्कामात कै. बापूसाहेबांना श्रीअण्णासाहेबांच्या दर्शनाचा योग आला. त्या वेळी श्रीअण्णासाहेब कै. बापूसाहेबाजवळ एवढेच म्हणाले की, "महाराजांच्या स्वमुखातील ही माहिती असल्यामुळे मला याबाबत यत्किंचितही शंका नाही."

श्रीअण्णासाहेबांच्या मनात महाराजांच्या जन्मस्थानावर काही स्मारक करण्याची योजना होती. अण्णासाहेबांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी वऱ्हाड विकत घेण्याची मसलत केली होती; पण त्यांचे स्वतःचे येणे या भागात कधीच झाले नाही. महाराजांचे स्मारक कारंजा येथे करण्याचे कार्य त्यांचे हातून झाले नाही. ती सेवा दुसऱ्याकरिता राखून ठेवली होती. पुढे श्रीवासुदेवानंदसरस्वती यांचे गुरुबंधु श्रीब्रह्मानंदसरस्वती हे श्रीगुरूंच्या प्रेरणेने कारंजा येथे आले. तेथे त्यांनी प्रथम संन्यासी वेषातील श्रीगुरूंची एक युवकमूर्ती स्थापन केली व पुढे मंदिर बांधून पूर्ण केले. आजचे श्रीगुरुमंदिर श्रीब्रह्मानंदसरस्वती यांनी केलेल्या सेवेचे दृश्य स्वरूप आहे. श्रीब्रह्मानंदसरस्वती हे, आळंदीचे श्रीनरसिंव्हसरस्वती हेच श्रीगुरू होते, या श्रद्धेचे नसल्यामुळे त्यांचा व कै. बापूसाहेब घुडे यांचा थोडा मतभेदही झाला होता, असे म्हणतात.

## महाराजांनी सांगितलेली आपल्या मातृत्वाची खूण

साधुसंताच्या ठिकाणी अहंकाराचा लवलेशही नसल्यामुळे त्यांनी आत्मचरित्रे होता होईतो त्यांच्या ग्रंथातून सांगण्याचे टाळलेले दिसून येते. ज्यांनी आपली चरित्रे सांगितली आहेत त्यांनी ती उघडपणे सांगितली नाहीत. साधकाच्या भूमिकेतून पूर्णत्वाच्या अवस्थेप्रत जात असता त्यांना जे जे अनुभव आले ते ते त्यांनी काहीशा गूढ किंवा सांकेतिक भाषेत सांगितले आहेत. कित्येक ठिकाणी तर मुद्दामच द्व्यर्थी शब्द योजलेले आढळतात. त्यामुळे वरवर पाहणाऱ्याच्या लक्षात एक अर्थ येऊन तो त्यावरच समाधान मानतो. खरा अर्थ अनधिकारी लोकांच्या लक्षात येऊ नये म्हणून मुद्दामच गूढ भाषेचा उपयोग केलेला आढळतो. अधिकारी लोक मात्र थेट अंतरंगात प्रवेश करून खरा अर्थ काढून घेतात. महाराजांनी लिहिलेल्या 'श्रीस्वात्मसौख्य' या ग्रंथात आत्मचरित्रपर काही उल्लेख केलेले आहेत. पण तेही अगदी गूढ व द्व्यर्थी शब्द योजून. या ग्रंथाच्या ज्ञानकांडात त्यांनी आपल्या आईच्या नावाचा उल्लेख केला आहे, असे पुढील ओवीवरून वाटते—

**ते तुर्या मातृजननी । अंबा रेणुका भवानी ।**
**तियेचा वरदपुत्र होवोनि । सौख्यासनी बैसलों ॥**

ज्ञानकांड ५७

श्रीस्वात्मसौख्य या ग्रंथात साधकाकरिता निरनिराळे अभ्यास सांगितले आहेत. त्या दृष्टीने विचार करिता वरील ओवीचा अर्थ काही वेगळाही होऊ शकेल. श्रीगुरूंच्या आईचे नाव 'अंबाभवानी' होते असा श्रीगुरुचरित्रात उल्लेख आहे.

श्रीपादश्रीवल्लभ अवतारी कुरवपुरच्या ज्या अंबिका नामक विधवा ब्राह्मणीला श्रीदत्तप्रभूंनी 'होईल पुत्र मजसरी' म्हणून वर दिला होता तिचा पुढे कारंजात जन्म होऊन तिचे उदरी श्रीगुरू अवतरले. महाराजांनी आपली आई 'अंबाभवानी' व तिला वराने प्राप्त झालेला पुत्र तो आपणच असे वरील ओवीत सुचविले आहे. 'सौख्य' या शब्दाचा रूढार्थ न घेता शरीर असा घेतला म्हणजे माता अंबाभवानीचा वरदपुत्र होऊन मानवी शरीर धारण केले, असा अर्थ सहज होतो. श्रीगुरुचरित्रातील श्रीनरसिंहसरस्वती स्वामींचा जन्मवृत्तांत आणि वरील ओवीचा अर्थ लक्षात घेता महाराज हे प्रत्यक्ष श्रीगुरू होते याविषयी शंका राहत नाही.

काळे हे वसिष्ठ गोत्री वाजसेनीय यजुर्वेदी ब्राह्मण म्हणूनच श्रीसंत दासगणू महाराजांनी '**हे ब्राम्हण आश्वलायन । गोत्र तयांचे कौंडिण्य ।**' असे जे महाराजांबद्दल म्हटले ते चुकीचे आहे. याबद्दल मागे उल्लेख केला आहे. श्रीगजानन चरित्रात त्यांनी ऐकीव माहितीवरून श्रीअण्णासाहेब अकोल्यास आले होते असे म्हटले आहे, तेही असेच चूक आहे.

'श्रीनरसिंह सरस्वती–चरित्र आणि परंपरा' या पुस्तकाचे कर्ते श्री. रा. चिं. ढेरे यांनी पुनर्जन्मावर विश्वास नसल्यामुळे म्हणा किंवा अन्य भावनेने म्हणा असा 'सत्यशोधकी' इशारा दिला की "कुरवपूरचे अंबिकेचे घराणे आणि कारंजाचे अंबाभवानीचे घराणे यांचा पूर्वानुबंध होता काय, याचा शोध घेतला पाहिजे." अर्थात असा शोध घेणे दुरापास्त आहे. ज्या ठिकाणी श्रीगुरूंचा जन्म झाला तो 'काळे वाडा' ज्या वेळी कै. बापूसाहेब घुडे सावकार यांना विकला, त्या वेळी त्या वाड्याच्या किमतीइतक्या रकमेची काळे घराण्याची जुनी कागदपत्रे रद्दी म्हणून वाण्याच्या दुकानात गेली, ही गोष्ट मागे नमूद केली आहे. आणि नंतर, आणखी जी कागदपत्रे होती तीही नागपूरच्या एका इतिहाससंशोधकाकडे रवाना झाली. पण त्यातून आजपर्यंत काही निष्पन्न झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे श्रीगुरूंच्या घराण्याचा पूर्वइतिहास कळणे फार कठीण आहे. श्रीअप्रबुद्ध यांचे पुस्तकांत दिलेल्या माहितीपेक्षा आज तरी जास्त माहिती उपलब्ध नाही. प्रत्यक्ष काळे घराण्यांतील विद्यमान वंशजांना आपण श्रीगुरूंच्या वंशांतील आहोत हे इतरांनी सांगितल्यावरच कळले, असे ऐकिवात आहे. दुसरे असे की, वासनापूर्तिकरिता पुन्हा जन्म होण्यास दोन घराण्यांचा संबंध असलाच पाहिजे असे कोठे आहे ? हिंदु परीट पुढल्या जन्मात यवन कुलात राजा झाला की नाही ? म्हणावयाचे इतकेच की केवळ स्वतःच्या श्रद्धेवर सरस्वती गंगाधरांनी सर्व गोष्टी लिहिल्या नाहीत, तर श्रीगुरूंच्या अखंड सहवासात असलेल्या सिद्धांची त्यांना साक्ष आहे.

## श्रीगुरूंनी देह-विसर्जन केले काय ?

महाराज हे प्रत्यक्ष श्रीगुरुच होते असे म्हटल्यावर अनेक कूटप्रश्न उभे राहतात. श्रीगुरूंनी अवतार संपविला की नाही ? एकदा धारण केलेला मानवी देह शतकानुशतके टिकवून ठेवणे शक्य आहे काय ? असे अनेक वादाचे प्रश्न उत्पन्न होतात. अशा प्रश्नांचा यथामती येथे विचार करण्याचे योजिले आहे. कृतयुगांत झालेला श्रीदत्तप्रभूंचा अवतार हा अविनाशी अवतार आहे. कारण अज्ञानतम विनाशाचे कार्य अखंडपणे विश्वाच्या अंतापर्यंत चालणारे आहे. श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनरसिंव्हसरस्वती हे श्रीदत्तप्रभूंचे कलियुगातील अवतार मानले जातात. सरस्वती गंगाधर यांनी श्रीगुरुचरित्रात विशेषत: करून श्रीनरसिंव्हसरस्वतीचे चरित्र विस्तृतपणे वर्णिलेले आहे. या ग्रंथाचे रचनाकाली श्रीपादश्रीवल्लभ स्वामींबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध असावी असे वाटते. कारण, श्रीगुरुचरित्राचे दोनच अध्यायात--५ व ९--त्यांचे त्रोटक चरित्र आले आहे. श्रीगुरुचरित्र हा या दोन अवतारांच्या जीवनावर आधारलेला एकमेव चरित्रग्रंथ आहे. म्हणून सरस्वती गंगाधरांच्या वचनांवर विश्वास ठेवूनच वरील प्रश्नांच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. महिपतींनी भक्तलीलामृतांत श्रीगुरूंचे चरित्र वर्णन केले आहे. पण त्यातील माहिती कितपत विश्वसनीय धरावी हा एक प्रश्नच आहे.

श्रीपादश्रीवल्लभ हे तीन वर्षे गोकर्ण क्षेत्री गुप्त रीतीने वास्तव्य करून, श्रीगिरीपर्वत, निवृत्तिसंगम इत्यादी ठिकाणांहून कुरवपूर (कुरुगड्डी) येथे आले. तेथे आल्यावर त्या स्थानाचे माहात्म्य दिवसेंदिवस वाढू लागले. '**श्रीपाद राहिले कुरवपुरीं । ख्याति जाहली भूमीवरी । प्रगट महिमा अपरंपारीं । सांगतां विस्तार असे देखा ।।**' पुढे अवतार घेण्यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण करून महिमा फार वाढला म्हणून आपण अदृश्य झाले. '**आश्विन वद्य द्वादशी । नक्षत्र मृगराज परियेसीं । श्रीपाद बैसले निजानंदेसी । अदृश्य झाले गंगेत ।।**' म्हणजे लौकिक दृष्टया गुप्त झाले; पण देह-विसर्जन केले असे नाही. 'निर्गुणस्वरूपात ऐक्य पावते झाले', गुप्तरूपाने अद्यापपर्यंत कुरवपुरात वास करीत आहेत, अशी भाविकांची श्रद्धा व अनुभव आहे. आपण प्रत्यक्ष त्या ठिकाणी वास्तव्य करून आहोत हे दाखविण्यासाठी, कुरवपूरला द्रव्य घेऊन दर्शनास येणाऱ्या वल्लभेश नावाच्या ब्राह्मणास चोरांनी जिवे मारिले असता त्याला पुन्हा जिवंत केले.

श्रीपादश्रीवल्लभ हेच श्रीनरसिंव्हसरस्वती हे रूप घेऊन पुढे अवतीर्ण झाले. सातवे वर्षी मौंजीबंधन झाल्यावर काशीक्षेत्री दीर्घकालपर्यंत वास्तव्य करून अष्टांग योगे तप केले. त्याकाळी उपेक्षित अशा संन्यासाश्रमाचा उद्धार करण्याकरिता क्षेत्रस्थ इतर संन्याशी लोकांच्या विनंतीवरून संन्यासधर्माची दीक्षा घेतली.

नंतर उत्तरेकडील तीर्थयात्रा करून जन्मभूमीस परत आले व पुढे दक्षिणेकडील तीर्थयात्रा करावयास निघाले. यावेळी केवळ सात संन्यासी शिष्य त्यांच्या समागमे होते. नाशिक, त्र्यंबकेश्वर, मंजरिका, वासरब्रह्मेश्वर अशी गोदातटाकी तीर्थयात्रा करीत परळी वैजनाथ येथे आले. तेथे गुप्त रूपाने राहिले. कारण यावेळपर्यंत श्रीगुरूंचा महिमा फार वाढला आणि कामार्थी लोकांची त्यांच्या भोवती गर्दी झाली. शिष्यांना येथून यात्रेकरिता पाठवून दिले. '**श्रीगुरू राहिले गौप्य गुणू । बैजनाथ सन्निधानीं ।।**' आणि '**संवत्सर एक तया स्थानीं । होते गौप्य श्रीगुरू मुनी ।**' यावरून वैजनाथ क्षेत्री गुप्त रीतीने वास्तव्य केले हे सहज दिसून येईल. पुढे भिल्लवडी येथे भुवनेश्वरीच्या सान्निध्यात येऊन गुप्तरूपानेच राहिले. '**कृष्णावेणी तटाकेसी । भुवनेश्वरी पश्चिमेसी । औदुंबर वृक्षेसी । राहिले श्रीगुरु परियेसा ।।**' हल्लीच्या काळासारखी संतसेवेला वाहिलेली मासिके नव्हती किंवा लोकांना प्रचारतंत्र अवगत नव्हते. पण देवानेच (भुवनेश्वरीनेच) दृष्टांत देऊन श्रीगुरूंना प्रगट केले. भिल्लवडीच्या मंदमती ब्राह्मणाला दृष्टांत देऊन '**औदुंबर वृक्षातळीं । असे तापसी महाबळी । अवतार पुरुष चंद्रमौळी । तुझी वांछा पुरवील ।।**' असे सांगून भुवनेश्वरीने त्याला श्रीगुरूंचे दर्शनास जाण्याचा आदेश दिला. भिल्लवडीला प्रगट झाले म्हणून पुढे निघाले. पंचगंगासंगमावर (हल्लीचे नरसोबावाडी) बारा वर्षे गुप्त रूपाने राहिले. तेथे एका सात्विक गरीब ब्राह्मणाला गुप्त धनाचा ठेवा देऊन संपन्न केले. परंतु आपणाला प्रगट करू नये म्हणून त्याला सांगितले. '**श्रीगुरु म्हणती तयासी । तुम्ही हें न सांगावे कवणासी । अखंड लक्ष्मी तुमचे वंशीं । आम्हां प्रगटतां जाईल ।।**' पुढे १९ व्या अध्यायात औदुंबर महात्म्य वर्णिले आहे. त्यांतही '**वृक्षातळीं अहर्निशी । श्रीगुरु असती गौप्येसी । माध्यान्ह काळ समयासी । समारंभ होय तेथें ।।**' असेच सांगितले आहे. तेथे श्रीगुरूंच्या चौसष्ट योगिनींनी केलेल्या पूजेचा थाट पाहणाऱ्या गंगानुजाला ताकीद दिली की, '**येथील वर्तमान ऐसी । न सांगावें कवणासी । जया दिवशीं प्रकट करिसी । तूंतें हानी होईल जाण ।।**' बारा वर्षांचे वास्तव्यांत कीर्ती वाढली म्हणून, "**विश्व नाटक श्रीगुरुमूर्ति । प्रगट झाली ऐसी किर्ती । श्रीगुरु मनीं विचारती । आतां येथें गौप्य व्हावें ।।**' असा विचार करून तेथून गुप्त झाले. पुढे गाणगापुरास प्रगट झाले. '**गौप्य होती औदुंबरीं । प्रगटरूपें गाणगापुरीं । राहिले श्रीगुरु प्रिती करी । प्रख्यात झाले परियेसा ।।**' नरसोबाचीवाडी येथून निघताना आपल्या 'मनोहर पादुका' तेथे औदुंबराखाली स्थापन केल्या. गुप्त झाल्यावरसुद्धा क्षेत्र महात्म्य वाढविण्याकरिता आपणच त्या ठिकाणी प्रत्यक्ष वास्तव्य करून भक्तकार्य अविरत करीत आहोत याची खात्री करून देण्याकरिता मृतबालकाच्या संजीवनाचा चमत्कार केला (अध्याय २०–२१). गाणगापूरला-

सुद्धा पूर्वीप्रमाणेच सुरवातीस संगमावर गुप्त रूपाने वास्तव्य होते. पण तेथे वांझ महिषीला दुभविण्याच्या चमत्कारामुळे प्रगट झाले.

वरील ओव्यांचा विचार करता श्रीगुरूंच्या अवताराचा एक विशेष सहज लक्षात येईल. जगदुद्धार करीत असता एखाद्या ठिकाणी प्रसिद्धी होऊन जनसंपर्क वाढू लागला की गुप्त होऊन दुसरीकडे प्रगट व्हावे. लोकांकडून मानसन्मान घेणे किंवा कामार्थी लोकांनी देव्हारे माजवून आयुष्य वैभवांत घालविण्याचा श्रीगुरूंना कंटाळा होता. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ते प्रसिद्धिपराङ्‌मुख होते. मानसन्मान, नावलौकिक यांचा त्यांना तिटकारा होता. द्रव्यसंग्रहाची अभिलाषा नव्हती. '**मागें कथन सांगितलें । जें भक्तीं द्रव्य आणिलें । स्वामीं अंगिकार नाहीं केलें । समाराधना करावी म्हणोनी ॥**' (अध्याय ३८) 'द्रव्य आणणाऱ्या भक्तांनी समाराधना घालावी म्हणून आपण ते द्रव्य घेत नसत.' गाणगापूरच्या वास्तव्यात श्रीगुरूंनी केलेल्या अतर्क्य लीलांची विस्तृत वर्णने श्रीगुरुचरित्राचे अध्याय २२ ते ५० मध्ये आली आहेत.

दुसरा विशेष असा की श्रीगुरूंनी अगम्य लीला केल्या, पण त्यात, विधि-घटना उलटवून टाकण्याची ऐट त्यांनी कधीच बाळगलेली दिसत नाही. सती जाणाऱ्या सावित्रीच्या पतीला जीवदान दिले त्या वेळी एक 'धूर्त कुबुद्धिक' ब्राह्मणाने विचारले, "याला तर अपमृत्यु घडला नाही. तेव्हा त्याचा प्राण आला कसा ? ब्रह्मलिखित सत्य किंवा मिथ्या हे काहीच समजत नाही." तेव्हा श्रीगुरू म्हणाले, "पुढल्या जन्मांतील तीस वर्षांचे आयुष्य आम्ही ब्रह्मदेवाजवळून मागून घेतले." विधिलिखित कोण टाळू शकणार ? ब्रह्मलिखित सत्यच. या जन्मीं त्या ब्राह्मणाचे आयुष्य वाढविले, पण त्याच्या पुढल्या जन्मातील तीस वर्षे कमी झाली. एकूण बेरीज वजाबाकी बरोबर. आपली स्वतःची बहीण रत्नाई हिला कुष्टमुक्त करताना सांगितले, '**पुढील जन्मीं भोगिसी । तरी जाईल आताचि ।**' किंवा मौंजीबंधन होईपर्यंत स्वतः श्रीगुरूंनी मौन पाळले. पूर्व अवतारांत मातापितरांना संततीपासून सौख्य नसता त्यांच्या मुलांना ज्ञानसंपन्न केले. **मौन** हा त्या कृत्याबद्दल दंड म्हणावा लागेल. एकूण काय ? प्रारब्ध हे देवसुद्धा टाळू शकत नाहीत. श्रीरामाला होणारे सीता वियोगाचे दुःख, श्रीकृष्णाचे पायाला बाण लागून होणारे त्याचे निर्याण, किंवा अगदी अलिकडचे उदाहरण घेऊन बोलायचे म्हणजे श्रीरामकृष्ण परमहंस यांना झालेला 'कॅन्सर' या सर्व घटना, हेच दर्शवितात की प्रारब्ध ज्याचे त्याला भोगलेच पाहिजे. फार झाले तर संत, साधु, सत्पुरुष यांच्या कृपेने त्यांत तडजोड होऊ शकेल किंवा तो भोग घेण्यास दुसरे कोणी तयार असल्यास त्यांतून सुटका होऊ शकेल. आधुनिक

काळातील स्वयंभू साधुसंतांच्या विधिघटना उलटवून देण्याच्या वल्गना ऐकल्यावर आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

श्रीगुरूंनी स्वतःच्या सामर्थ्याने अनेक चमत्कार केले. पण त्याचे श्रेय मात्र आपल्याकडे घेतले नाही. आपण जणू कोणी त्यातले नाहीत अशी भूमिका स्वीकारलेली दिसते. माहूरनिवासी सावित्रीला 'अष्टपुत्री होय' किंवा 'सुवासिनी होई ध्रुव' असे आशीर्वाद दिले त्या वेळी **"या बोलाचा निर्धारू । करील आतां कर्पूरगौरू ।"** असेच उद्गार काढले. साठ वर्षांच्या वांझ अशा गंगा नामक स्त्रीला तिच्या सेवेने संतुष्ट होऊन तिच्या मनांतील अभीष्ट विचारले त्या वेळी **'तुझ्या मनीची वासना । सांगे त्वरित विस्तारून । सिद्धी पाववील नारायण । गौरी रमण गुरुप्रसादें ।।'** असेंच म्हटले. स्वतः त्रैमूर्तीचा अवतार असून मी माझ्या सामर्थ्याने हे सर्व करीन असे कधीच दर्शविले नाही. सर्व घटनांचे श्रेय त्या अनंत परमेश्वराकडे दिले. माझीच सेवा करा. मी दत्ताचा अवतार आहे असा प्रचार कधीही केलेला दिसत नाही. आर्त जनांवर कृपा करण्यापूर्वी त्यांच्या हातून विशेष व्रतवैकल्ये किंवा तपाचरण करवून त्यांच्या पूर्व दोषांचा किंवा पातकांचा नाश केला आणि मगच त्यांचे मनोरथ पुरविले. श्रीगुरूंच्या लीलांच्या हाही एक विशेष आहे. वरील विशेषांचा विचार करता महाराजांच्या स्वभावाशी त्यांचे कमालीचे साम्य दिसून येते. श्रीगुरूंच्या लीलांमधील आणखी एक विशेष असा आढळतो की त्यांनी शापवाणी, एक प्रसंग सोडून दिला तर, कधीच उच्चारली नाही. यवन राजाचे दरबारांत वेद म्हणणारे व त्याचे आज्ञेने वेदवाद करून अजिक्यपत्र मिळविण्याकरिता फिरणाऱ्या उन्मत्त ब्राह्मणद्वयांना मात्र श्रीगुरूंनी बारा वर्षेपर्यंत ब्रह्मराक्षस व्हाल असा शाप दिला. 'पाहे वाट भक्तांची' अशा वात्सल्याने श्रीगुरूंनी सर्व लीला केल्या. श्रीगुरूमहिमा चहू राष्ट्रांत पसरला. जनसंपर्क फार वाढला व अखेरीस बेदरचा यवन राजा श्रीगुरूंचे दर्शन घेण्याकरिता निघाला. त्याचा पूर्वजन्मींचा ऋणानुबंध लक्षात घेऊन श्रीगुरूंनी त्याचा उद्धार केला. श्रीगुरूंची चरणसेवा घडावी अशी त्या यवन राजाची इच्छा होती, म्हणून त्याला श्रीपर्वतावर भेटीस येण्यास सांगितले. स्वतः राजा आल्यामुळे समस्त यवन जात येईल व उपद्रव होईल हे पाहून श्रीगुरूंनी मूळ स्वभावास धरून गुप्त होण्याचे ठरविले. लौकिकदृष्टया श्रीशैलयात्रेचे निमित्त करून ते गाणगापुराहून निघाले. त्यांच्या श्रीशैलयात्रेचे वर्णन मागे आले आहेच. या यात्रेचे वेळी त्यांचेबरोबर सिद्ध, सायंदेव, नंदी आणि नरहरी हे चार शिष्यही होते. श्रीगुरूंचे पाताळगंगेवर काही काळ वास्तव्य झाले असे वाटते. श्रीमल्लिकार्जुन या देवस्थानापासून सुमारे दोन मैल अंतरावर सोळाशे फूट

खाली आल्यावर कृष्णा नदीचा पूर्वेकडे वाहणारा जो प्रवाह दिसतो, त्याला पाताळगंगा असे नाव आहे.

गाणगापूरहून श्रीगुरु निघाले तेव्हा त्यांच्या भक्तजनांची काय अवस्था झाली याचे कारुण्यपूर्ण शब्दचित्र श्रीगुरुचरित्रकारांनी रंगविले आहे. त्यांना पोचविण्याकरिता निघालेल्या लोकांच्या नेत्रातून अश्रुधारा वाहत होत्या. '**अनाथांसी कल्पतरू । दु:खितासीं कृपासागरू ।**' अशा श्रीगुरूंच्या चरणांचा चिर वियोग होणार या कल्पनेने भक्तजनांना फार दुःख होत होते; तेव्हा त्यांनी श्रीगुरूंची विनवणी करण्यास सुरवात केली. '**बाळकांते माता । केवि जाय अव्हेरितां । तूंचि आमुचा मातापिता । नको अव्हेरू म्हणताती ॥**' अज्ञानी भक्तजनांच्या या कल्पनेने श्रीगुरु हसते झाले. श्रीगुरूंनी फार प्रेमाने आणि मातृतुल्य वात्सल्याने समजूत केली की 'आम्ही गुप्तरूपाने गाणगापुरांतच वास करू. अमरजा संगमात नेहमी स्नान व मठात वास्तव्य करू. प्रात:काळी कृष्णातीरी नरसोबा वाडीत स्नान करून अनुष्ठान सारू व नंतर माध्यान्ही गाणगापुरास येऊ.' "**संगमीं स्नान करोनि । पूजा घेऊं मठीं निर्गुणी । चिंता न करा अंत:करणीं । म्हणोनि सांगती प्रीती करें ॥ अनुमान न धरा हो मानसीं । गाणगाभुवनीं अहर्निशीं । वसों आम्ही त्रिवाचा ॥** " आणखी भक्तजनांना एक फार महत्त्वाची सूचना दिली. ती अशी–'**जे भक्त असती माझ्या प्रेमीं । त्यांसी प्रत्यक्ष दिसों आम्ही । लौकिक मतें अविद्या धर्मी । जातो श्रीशैल्यात्रेसि ॥**' या ओवीवर श्रीगुरुभक्त कै. अण्णा कामत यांनी आपल्या संशोधित प्रतीत पृष्ठ ८७८ व ८७९ वर तळटीपेत सुंदर विवरण केले आहे. ते मुमुक्षु लोकांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. कै. अण्णा कामतांना पाहावयास मिळालेल्या श्रीगुरुचरित्राच्या 'कडगंची' येथील प्रतीत वरील ओवीच्या पुढे '**किं करोमि क्व गच्छामि, किं गृण्हामि त्यजामि किम् । आत्मना पूरितं विश्वं, महाकल्पांबुना यथा ॥**' हा श्लोक आणि '**याप्रमाणें ज्यासीं स्फूर्ती । अंतरीं चित्तें दृढ होतीं । त्यासी आम्ही दिसों दृष्टांतीं । अनुमान न धरा मानसीं ॥**' ही ओवी दिलेली आढळली. त्याचा सारांश असा की प्रलयकाळचे उदक ज्याप्रमाणे धरणीवरील विहिरी, नाले, नद्या, नद, सागर या सर्वांना भरून नभोमंडळापर्यंत व्यापलेले असते, त्याप्रमाणे हे सर्व विश्व आत्म्याने व्यापलेले आहे. अशी धारणा झाली म्हणजे करायचे काय ? जावयाचे कोठे ? घ्यावयाचे काय ? आणि टाकावयाचे काय ? असे संदेह उत्पन्न करणारे प्रश्नच उरत नाहीत. अशी अखंड धारणा ज्याच्या अंत:करणात दृढ झाली आहे, त्याला आम्ही प्रत्यक्ष दर्शन देऊ, यात काही अनुमान धरू नका, असे श्रीगुरूंनी त्यांना पोचविण्याकरिता आलेल्या लोकांना सांगितले. अज्ञानी लोकांची जाणीव त्यांच्या देहापुरतीच असते. साडे-

तीन हातांचा देह म्हणजे 'मी' अशी देहबुद्धि त्यांच्या ठिकाणी असते. ही संकुचित जाणीव नाहीशी होऊन अखिल ब्रह्मांडाला व्यापणारे चैतन्य म्हणजेच 'मी' अशी धारणा जेव्हा अंतःकरणात पक्की होईल तेव्हा वरीलप्रमाणे अनुभव येतील. मनुष्याची जाणीव उच्च अवस्थेत गेल्यावर तिच्यात व्यापकपणा उत्पन्न होईल; व देहात्मबुद्धीचा नाश होईल. "देहबुद्धीच्या घरकुलाने होता पडिला अंधार" तो नष्ट होईल. तुकाराम महाराज उपदेश करतात, "**संकोचोनि काय। झालासी लहान। घेई आपोशन ब्रह्मांडाचें॥**" "देहापुरती संकुचित वृत्ती ठेवल्याने तू लहान झाला आहेस. ब्रह्मांडाचे आपोशन घेऊन विशाल हो, व्यापक हो.' अशी ज्याची अवस्था होईल त्याला श्रीगुरूंचे दर्शन वाटेल तेव्हा होऊ शकेल. आपल्या वचनाने बांधले गेलेले श्रीगुरु आजही गाणगापूर, औदुंबर किंवा नरसोबाची वाडी इत्यादि ठिकाणी निष्ठेने अनुष्ठान करणाऱ्या भक्तांस दर्शन देतात व त्यांचे मनोरथ पूर्ण करतात असा अनेकांचा अनुभव आहे. पण हा झाला भाविक लोकांचा अनुभव. संकटसमयी श्रीगुरू आपल्या भक्तांचे रक्षण कसे करतात याविषयी एक अद्‌भुत आख्यायिका गाणगापूर क्षेत्रस्थ अर्चकाने सांगितली ती अशी. 'निजामाच्या राज्यात–रझाकारांनी धुमाकूळ मांडला होता. हिंदूंचे जीवित सुरक्षित नव्हते. रझाकारांच्या एका टोळीने गाणगापूरजवळ नदीच्या पलीकडल्या काठावर तळ दिला होता. गाणगापूरच्या देवस्थानावर हल्ला करण्याचा त्यांचा विचार होता. क्षेत्रस्थ लोक चिंतातुर झाले होते व काय प्रसंग ओढवेल या कल्पनेने त्यांचे धाबे दणाणले. एक दिवस आज रात्री रझाकार नक्की हल्ला करणार अशी बातमी कळली. रात्र कशी पार पडणार? काय होईल नी काय नाही? लोकांनी 'श्रीगुरु माऊलीच आता काय करील ते खरे' असा विचार केला आणि खरोखरच काय चमत्कार झाला ते एका श्रीगुरूंनाच माहीत. त्या रात्री, 'इस गावमे सैतान रहता है' असे ओरडत रझाकारांनी तेथून हल्ला न करताच पळ काढला. गाणगापूर क्षेत्रावरील संकट टळले. असो. पोचविण्याकरिता निघालेल्या भक्तांची परोपरीने समजूत घालून व आपण मठांतच वास्तव्य करून आहोत असा दृष्टान्त दाखवून श्रीगुरु चार शिष्यांसह श्रीशैलपर्वताकडे जाण्यास निघाले.

पाताळगंगेतून पलीकडे जाऊन कर्दळीवनांत श्रीगुरू अदृश्य झाले. या घटनेचे वर्णन श्रीगुरुचरित्राच्या ५१ व्या अध्यायात आले आहे. श्रीगुरूंच्या गुप्त होण्यासंबंधी निरनिराळ्या लोकांच्या मनात निरनिराळे तर्क असू शकतील. जसे पाताळगंगेतून जाताना जलसमाधी घेणे, कर्दळीवनांत एकांत करून प्राणोत्क्रमण करणे किंवा तेथे भटकत असता हिंस्र श्वापदांकडून हल्ला होऊन देह नष्ट होणे. पण यांपैकी कोणताही एक प्रकार घडला नाही हे निश्चितपणे सांगता येईल.

श्रीगुरूंबरोबर असलेल्या चार शिष्यांपैकी एक म्हणजे सिद्ध हे तर श्रीगुरूंच्या अखंड सहवासांत राहणारे होते. श्रीगुरुचरित्र कथन करणारे तेच आहेत. तेव्हा प्रथम, सिद्ध हे कोण आहेत याविषयी विचार व्हावयास पाहिजे. कारण श्रीगुरु-चरित्रांतील प्रत्येक शब्दाला किंवा घटनेला सिद्ध हेच साक्ष आहेत.

श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ गुरुशिष्य—सिद्ध आणि नामधारक—संवादरूपाने लिहिला आहे. या जोडीपैकी नामधारक म्हणजेच ग्रंथकर्ते सरस्वती गंगाधर होत, हे पहिल्या अध्यायातील पूर्वजांच्या नमनाच्या ओव्यांत सांगितलेली वंश-परंपरा आणि 'काशीयात्रेच्या' अध्यायात नामधारकाने **'आमुचे पूर्वजें कवणें रीतीं । सेवा केली श्रीगुरुची ।'** या प्रश्नाचे उत्तर देतांना सिद्धांनी काढलेले उद्गार **'वोसरग्रामीं होते भले । पूर्वज तुमचे परियेसा । तयाचें नाम सायंदेव । केली पूजा भक्तिभावें ॥'** यावरून स्पष्ट होते. सिद्ध कोण याविषयी कल्पना श्रीगुरुचरित्रातील पुढील उल्लेखांवरून करता येईल. नामधारक म्हणजे सरस्वती गंगाधर आपल्या राहत्या स्थानाहून—कडगंची किंवा उत्तरकांची—श्रीगुरूंच्या दर्शनाची तळमळ लागून गाणगापूरला जाण्यास निघाला. त्या वेळी गाणगापूर-पासून दोन मैल असलेल्या 'सिद्धनाळ' गावी सिद्धांची व त्याची भेट झाली. ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचे श्रीगुरुचरित्रावरील स्फुट विचार सातान्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'हंस' या मासिकात मागे क्रमशः प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत त्यांनी श्रीगुरुचरित्रातील सिद्ध हे रूप श्रीनृसिंव्हसरस्वती स्वामी यांनीच घेतले आहे हे साधार दाखविले आहे. तेराव्या अध्यायात श्रीगुरूंचे जे सात शिष्य प्रथम झाले त्यांच्याविषयी उल्लेख आलेला आहे. "**असतां तेथें वर्तमानीं । प्रख्यात झाली महिमा सगुणी । शिष्य झाले अपार मुनी । मुख्य माधव सरस्वती ॥ त्या शिष्यांचीं नांवें सांगतां । विस्तारेल बहु कथा । प्रख्यात नामें असती सात । सांगतों ऐक एकचित्तें ॥ बाळसरस्वती, कृष्णसरस्वती । उपेंद्र, माधवसरस्वती । पांचवा होता आणिक यती । सदानंदसरस्वती देखा ॥ ज्ञानज्योतीसरस्वती एक । सातवा सिद्ध आपण एक । अपार होते शिष्य आणिक । एकाहूनि एक श्रेष्ठ पैं ॥**' सिद्ध हे सात शिष्यांत सर्वांत श्रेष्ठ. वरील सात शिष्यांपैकी सहा नावापुढे संन्याशाचा पट सरस्वती हा आहे. परंतु सिद्ध नावापुढे काहीच नाही. श्री. रा. चिं. ढेरे यांनी आपल्या 'श्रीनरसिंव्ह सरस्वती—जीवन आणि कार्य' या पुस्तकात, 'संन्यासग्रहण आणि उत्तरयात्रा' या परिच्छेदात वरील सात शिष्यांविषयी माहिती देतांना सिद्धांच्या नावापुढे सरस्वती हे उपपद लावले आहे. म्हणजे त्यांच्या म्हणण्यावरून सिद्ध संन्याशी ठरतात. सहा नावांपुढे सरस्वती हा पट म्हणून सातवे शिष्य सिद्ध यांना 'सिद्धसरस्वती' बनविले. हा केवळ तर्कशास्त्राचा (Deductive Logic) प्रकार झाला. बरे ओवीरचनेच्या सोयीकरिता सरस्वती हा शब्द वरील ओवीत

गाळला म्हणावें तर श्रीगुरुचरित्रात सिद्धांविषयी बोलताना सरस्वती गंगाधरांनी सिद्धसरस्वती असा कोठेच उल्लेख केलेला आढळत नाही. यावरून सरस्वती हा संन्यासपट सिद्धांच्या नावापुढे नाही हे उघड होते. दुसऱ्या अध्यायाच्या सुरु-वातीस नामधारक गाणगापूरला जात असता थकून एका वृक्षाखाली क्षणभर निद्रिस्त झाला, त्या वेळी काय घडले याचे वर्णन आले आहे. '**क्षण एक निद्रिस्त । मनीं श्रीगुरु चिंतित । कृपानिधी अनंत । दिसे स्वप्नीं परियेसा ।। रूप दिसे सुषुप्तींत । जटाधारी भस्मांकित । व्याघ्रचर्म परिधानित । पीतांबर कांसे देखा ।।**' आणि पुढे '**मूर्ति देखिली सुषुप्तींत । तेचि ध्यातसें मनात । पुढें निघाला मार्ग क्रमित । प्रत्यक्ष देखें तैसाचि ।।**' ही मूर्ति म्हणजे सिद्ध होत. वरील वर्णनावरून सिद्ध हे संन्यासी वाटत नाहीत. श्री. ढेऱ्यांनी मात्र त्यांना संन्यासदीक्षा दिली आहे ! सिद्धांविषयी ब्रह्मर्षि श्री. अण्णासाहेब यांचे टिपणा-तील विचार त्यांच्याच शब्दात पुढे दिले आहेत. "यांतील सहा नावांपुढे संन्या-शाचा पट आहे. परंतु सिद्ध या नावापुढे काहीच नाही. यांतील कारण हेच की ते अनादि सिद्ध आहेतच. परब्रह्म परमात्मा महाराज (यांनी) अवतारपरत्वे मनुष्यरूप धरिले. मनुष्यरूपास कृष्णसरस्वती संन्यास देते झाले." "आत्मा मूळ रूप संन्यस्त ते रूप सिद्ध. सदैव अखंड संन्यस्त. परमात्म्याचे गुरू परमात्मा व शिष्य परमात्मा. सबब योग पट नाही. मानुषी काया अमानुषी शक्ती म्हणून सिद्ध. आईबाप ज्यास नाहीत ते सिद्ध त्यासच अच्युत म्हणतात. अयोनि संभव-रूप मानुषी परंतु अवतार नव्हे वागणूक मानुषी."

अध्याय दोन मधील पुढील १२ वी ओवी '**सिद्ध म्हणे आपण योगी । हिंडो तीर्थे भूमी स्वर्गीं । प्रसिद्ध आमचा गुरु जगीं । 'नृसिंहसरस्वती' विख्यात ।।**' यावरून सिद्धांचा संचार '**क्षणें स्वर्ग क्षणें पाताळ । गमन आमुचें त्रिलोकीं ।**' असा होता हे दिसून येते. अध्याय तीनमधील पुढील ओव्या पहा. '**कवणें ठायीं तुमचा वास । नित्य तुम्हां कोठें ग्रास । होईन आतां तुझा दास । म्हणोनी चरणीं लागला ।। कृपानिधि सिद्ध मुनी । तया शिष्या आलिंगोनी । आशीर्वचन देवोनी । सांगे आपुला वृत्तांत ।। जे जे स्थानीं होते गुरु । तेथें असतो चमत्कारू । पुससी जरी आम्हां आहारू । गुरु स्मरणीं नित्य जाणा ।। श्रीगुरुचरित्र महिमान । तेंचि आम्हां अमृतपान । सदा सेवितो याचे गुण । म्हणोनि पुस्तक दाविले ।। इतुकिया अवसरीं । सिद्ध योगी अभय करी । धरोनिया सव्य करी । घेवोनी गेला स्वस्थाना ।। असे ठाव ज्ञानपंथीं । कल्पवृक्ष अश्वत्थीं । बसोनि सांगे ज्ञानज्योती । ऐक शिष्या नामधारका ।।**' ब्रह्मर्षि अण्णासाहेबांच्या मते "हा पुरावा, सिद्ध हे प्रत्यक्ष देव मानुषी कायेत आहेत याचा आहे." अध्याय ५१ मधील ५८ वी ओवी पहा. '**कृष्णसरस्वती बाळसरस्वती । उपेंद्र माधवसरस्वती । पाठविते झाले**

**प्रीतीं । आपण राहिले संगमीं ।।** ' यावरून संगमावर संन्यासी दुसरा कोणीच नव्हता. स्वतः सिद्ध हेच श्रीनरसिंहस्वामी होते हे उघड होते. तिसऱ्या अध्या-याच्या पंधराव्या ओवीतील '**साक्षात्कारें गुरुमूर्ति । भेटलासी मज जगज्योती ।**' आणि पुन्हा २५ व्या अध्यायातील पहिल्या ओवीतील '**तूंचि गुरु शिरोमणी । साक्षी येतसे अंत:करणीं ।**' हे नामधारकाचे उद्‌गार हेच दर्शवितात की सिद्ध हे श्रीगुरूंनीच घेतलेले रूप होते. तसेच अवतरणिकेच्या अध्यायातील शेवटली ओवी पहा. '**श्रीगुरुरूपी नारायणा । विश्वंभरा दिनोद्धारणा । आपुली आपण दावूनि खुणा । गुरुशिष्य रूपें क्रीडसी ।।**' श्रीगुरूंनी स्वतः सिद्धरूप घेऊन सर-स्वती गंगाधराला दर्शन दिले हे सांप्रदायिक रहस्य या ओवीतून प्रगट होते. पहिल्या अध्यायाचे शेवटी जेव्हा प्रत्यक्ष दर्शन झाले तेव्हा त्या प्रसंगाला धरून घातलेली ओवी, '**वत्सलागी धेनु । जैसीये धावोनु । तैसे श्रीगुरु आपणु । आले जवळी ।।**' हेच रहस्य सांगण्याकरिता आहे. सिद्ध रूप घेऊन श्रीगुरूंनीच श्रीगुरुचरित्र नामधारकाला कथन केले आहे व सरस्वती गंगाधरांनी मराठीत त्या चरित्राचा विस्तार केला आहे. तेव्हा एका दृष्टीने 'श्रीगुरुचरित्र' हे श्रीनरसिंह स्वामींचे आत्मवृत्तच आहे. सबब यातील घटनांविषयी शंका घेण्याचे संशोधकांनाही काही कारण पडू नये असे वाटते.

पाताळगंगेवर आल्यावर शिष्यांकडून पुष्पासन करवून घेतले. ते गंगेत घालून श्रीगुरू त्यावर बसले. पुष्पासनावर बसून ते शिष्यांना म्हणाले, "**श्रीगुरु म्हणती शिष्यांसी । जातो आम्ही निज–मठासीं । पावतां खूण तुम्हांसी । प्रसाद पुष्पें पाठवितो ।। येतील पुष्पें सेवंती । घ्यावा प्रसाद तुम्हीं भक्तीं । पुजा करावी अखंडीती । लक्ष्मी वसो तुमच्या घरीं ।। ऐसें सांगोनि शिष्यांसी । श्रीगुरु जहाले अदृश्येसी । चिंता करिती बहुवसी । अवलोकिताति गंगेत ।।**" याप्रमाणे श्रीगुरू पुष्पासनावर बसून वाहात जात असता एकाएकी नाहीसे झाले. म्हणजे गुप्त झाले. पैलतीरावर नावाडी होते. त्यांच्याजवळ श्रीगुरूंनी शिष्यांकरिता निरोप दिला. "**आम्हां सांगितलें मुनी । आपण जातो कर्दळीवनीं । सदा बसो गाणगा-भुवनीं । ऐसें सांगा म्हणितलें ।।**" वरील ओव्या विचारात घेता असे दिसून दिसून येईल की श्रीगुरूंनी पाताळ गंगेत जलसमाधी घेतलेली नाही. ते फक्त पाताळगंगेच्या पैलतीरावर गेले व तेथून कर्दळी वनात निघून गेले.

कर्दळीवन हे श्रीशैल्य माल्लिकार्जुनाचे मंदिरापासून वायव्येस सुमारे दहा मैलावर आहे. या वनात जाण्याकरिता कृष्णा नदी ओलांडून पलीकडे जावे लागते. एकट्यादुकट्याने जाण्याचे धाडस करण्यासारखे हे वन नाही. कर्दळी-वनाच्या थोडे अलिकडे अक्कानागम्माची गुहा आहे. ही गुहा सुमारे पाचशे लोक राहू शकतील इतकी मोठी आहे. तिच्यात एकदा शिरल्यावर बाहेर पडणे कठीण

आहे असे सांगतात. महादेवी अक्का, रेवणसिद्ध अल्लमप्रभू, यांनी या वनातच समाधि घेतली आहे. तंत्रमार्गी लोकांचा अड्डा या भागातच असून नाथसंप्रदायाची उदयभूमी हीच असावी असा सिद्धांत श्री. ढेरे यांनी मांडला आहे. विशेष आश्चर्याची गोष्ट ही की श्रीनरसिंव्ह सरस्वतींचे चरित्र श्रीशैल्यमल्लिकार्जु-नाच्या परिसरांतील लोकांना माहीत नाही. परंतु श्रीगुरूच्या श्रीशैल येथील वास्तव्याला धरून म्हणा किंवा श्रीदत्तप्रभू यांच्या नावाशी निगडित असलेल्या, तीन गोष्टी तिकडील लोकांना माहीत आहेत तेलगू भाषेत लिहिलेल्या मार्गदर्शिकेत याविषयी उल्लेख आहे. ह्या तीन गोष्टी म्हणजे (१) श्रीदत्तात्रे-यांचे निर्याण कर्दळीवनात झाले. (२) श्रीमल्लिकार्जुनाच्या देवळाच्या आवारात फार मोठा व प्राचीन औदुंबरवृक्ष असून त्याचे खाली श्रीदत्तात्रेयांनी तपश्चर्या केली व (३) श्रीमल्लिकार्जुनाच्या आवारातच पश्चिमेस श्रीभ्रमरांबाचे देऊळ आहे. या देवळाच्या दुसऱ्या गोपुराजवळ दक्षिणेस दत्तात्रेयाची गुहा आहे. ही गुहा अलिकडे बंद केली असून गुहेवरील दत्तमंदिरात श्रीदत्ताची मूर्ति नाहीं. या तीन गोष्टी श्रीगुरूंच्या तेथील वास्तव्याला धरूनच असाव्यात असे वाटते.

पाताळगंगेतून जातांना सांगितले होते की, '...**जातो आम्ही निजमठासी । पावतां खूण तुम्हांसी । प्रसादपुष्पें पाठवितो ॥**' यावरून साहजिकच हा निजमठ कोणता असा प्रश्न उत्पन्न होतो. कै. अण्णा कामत यांनी आपल्या संशोधित प्रतींत या शब्दाचा अर्थ तळटीपेत निजधामाला, निजस्थानाला असा दिला आहे. वास्तविक पाहता निजमठ असा प्रत्यक्षात कोठेच अस्तित्वात नाही. "**स्वरूप संप्रदाय अयोध्यामठ । जानकी देवी रघुनाथ दैवत ॥**" यांत उल्लेख केलेला श्रीसमर्थांचा अयोध्यामठ तरी कोठे आहे ? किंवा महाराजांनी 'श्रीस्वात्म-सौख्या'त "**पंचमाम्नाय सुमेरुमठ । काशी सांप्रदाय जो श्रेष्ठ । जनकयाज्ञवल्क्य प्रगट । शुकवामदेवादि ॥**" (ज्ञानकांड, ओ. २२५) यात उल्लेख केलेला 'सुमेरुमठ' कोठे आहे ? अयोध्यामठ किंवा सुमेरुमठ हे शब्दप्रयोग एका विशिष्ट अवस्थेला उद्देशून केलेले आहेत. त्याचप्रमाणे निजमठ हाहि शब्द या अवस्थेला अनुसरून योजिलेला आहे. त्यातील गूढ अर्थ विचारात घेतला पाहिजे. निजधामास जाणे याचा रूढ अर्थ मरणे किंवा दिवंगत होणे असा आहे. पण हे अर्थ एखाद्या सामान्य मनुष्याचे बाबतीत लागू होऊ शकतात. द्वयर्थी शब्द-योजनेमुळे खरा अर्थ कळण्यास कठीण जाते. रामदासांनी '**प्राणापान उर्ध्वचि वहातां । आनंदभुवनीं मन हे रिघे ।**' असे म्हटलेले आहे. येथे आनंदभुवन हा शब्द द्वयर्थी योजिलेला आहे असे अनेकांचे मत आहे. तो मनाची एक उच्च अवस्था दर्शविण्याकरिता वापरला आहे. श्रीगुरु 'निजमठास' गेले याचा अर्थ ते एका विशिष्ट अवस्थेत गेले. सामान्य जनांच्या दृष्टीने अदृश्य झाले असे म्हणता

येईल. आपला पंचभौतिक जड देह त्यांनी नष्ट केला नाही. त्या अवस्थेत पोचल्याची खूण म्हणून शेवंतीची चार प्रसादपुष्पे पाठविली.

श्रीमन्महाभारताच्या शांतीपर्वात–अध्याय २३६–सांख्य व योग यांची तत्त्वे सांगितली आहेत, व ती सांगत असता पंचतत्त्वांवर जय मिळविणाऱ्या योग्याला काय काय फलप्राप्ति होते, हेही पण सांगितले आहे. उदाहरणार्थ, पृथ्वी तत्त्वावर जय मिळविला म्हणजे ब्रह्मदेवांप्रमाणे अक्षोभ्य स्थितीत राहून तो आपल्या शरीरापासून सृष्टि निर्माण करू शकतो. वायुतत्त्वावर मिळाल्यावर वायूचे सामर्थ्य त्यांच्या अंगी येते. हातांच्या बोटाने, अंगठ्याने, किंवा हाताने अथवा पायाने तो पृथ्वी हलवू शकतो. आकाशतत्त्वावर जय मिळविल्याने योग्याला वाटेल तेव्हा अंतर्धान पावण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. त्याचप्रमाणे जल किंवा तेज या तत्त्वांच्या जयामुळे अन्य सिद्धी प्राप्त होतात. योगाभ्यासाने प्राप्त होणाऱ्या सामर्थ्यांचे वरील वर्णन अतिशयोक्तीचे वाटण्याचा संभव आहे. पण काही विशेष सामर्थ्य येते, ही गोष्ट संशोधकांनाही नाकबूल करता येणार नाही. बौद्ध, जैन, किंवा अन्य मतानी योगाचा स्वीकार करण्याचे कारण म्हणजे त्याच्या अभ्यासाने प्राप्त होणारे सामर्थ्य हे होय. योगशास्त्रातील रहस्ये पाश्चात्यांनी निर्माण केलेल्या आधुनिक भौतिक शास्त्राच्या मदतीने कळणे कठीण. कारण योगशास्त्र हे या जड शास्त्राच्या पलीकडचे आहे. श्रीगुरु हे 'योगमार्तंड' होते ही एकच गोष्ट त्यांचे कर्दळीवनातून गुप्त होण्याच्या रहस्यावर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे.

एकनाथ महाराजांचे गुरु जनार्दनस्वामी व श्रीगुरू नरसिंव्हसरस्वती स्वामी यांचे संबंधाने अलिकडच्या काळात संशोधकांनी बरेच विवाद्य प्रश्न उत्पन्न केले आहेत. त्याविषयी मागे उहापोह केला आहेच. मराठवाड्यातील एक विद्वान पंडित ज्योतिः काव्यालंकारभूषण विष्णु बाळकृष्ण जोशी कन्नडकर यांनी जनार्दनस्वामींचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले आहे. त्यात श्रीनरसिंव्हसरस्वतींनी जनार्दनस्वामींना दृष्टांत दिला होता असे सांगितले आहे. व इहलोकीचे वास्तव्य कसे समाप्त केले या विषयी पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे. "स्वामींचे गुरू जे नृसिंहसरस्वती यांच्या कृपेने आत्मसमाधियोगविद्या लाभून त्या मार्गाने धौम्य, पैठण, देवगिरी, चाळीसगाव यातून कोठेही देह न ठेविता हे, शके १४९७ च्या फाल्गुन वद्य षष्ठीला देवगिरी गडावरून गुप्तपणे सूर्यकुंड, श्रीकृष्ण कमलतीर्थ पैठण, चाळीसगाव, धौम्य (खरवंडी) इत्यादि ठिकाणी थोडा थोडा वेळ जाऊन समाधियोग करून दोनप्रहरानंतर ते, मल्लिकार्जुन श्रीशैल्य पातळगंगेवर पुष्पासनांतून योगीजनांच्या वायुदेहमय अवस्थेला पोचले अथवा त्यांच्या अवतार-कार्याच्या पूर्ततेकरिता त्यांच्या गुरूंनी योगसामर्थ्याने त्यांना ओढून घेतले." श्रीगुरूंचे पातळगंगेतून अदृश्य होणे व पंडित कन्नडकर यांनी जनार्दनस्वामींचे

बाबतीत वर केलेले वर्णन यात कमालीचे साम्य आहे हे सहज लक्षात येईल. समर्थांच्या शब्दात ते 'वायुरूप' झाले.

श्रीगुरु जसे अदृश्य झाले तसे होणारे ते काही एकटेच नव्हते. गौरांग चैतन्यप्रभु किंवा तुकाराम महाराज हेही अदृश्य झाले. ज्ञानेश्वर–भगिनी मुक्ताबाई या तापी तीरावर असलेल्या माणगाव किंवा मेहुणगाव येथे वैशाख वद्य द्वादशी शके १२१९ रोजी भयंकर मेघगर्जना होऊन विजेचा कडकडाट झाला त्या वेळी, जागच्या जागी अदृश्य झाल्या असे म्हणतात. संत कबीर, गुरु नानक, सोहिरोबानाथ किंवा पुण्याचे जंगली महाराज इत्यादी संत अदृश्य झाल्याची वर्णने आहेत. त्यांची हाडामासांची शरीरे हाती लागली नाहीत. पंचतत्त्वांनी बनलेला जड देह परत पंचतत्त्वांत विलीन झाला. "**पांचभूतें पांचा ठायीं । मिळोन जातां शून्य पाही ।**" ज्या पंचतत्त्वांचा हा देह बनला आहे ते आपापल्या तत्त्वांत मिळून गेल्यावर देह राहणारच कोठून ? त्याना योगात सांगितलेली परामुक्ती प्राप्त झाली. ते मरूनही अमर झाले आहेत. "सशरीरो दिवंगत:" उदाहरणे पुराणात आढळतात. लक्ष्मण, धर्मराज यांची नावे सहज डोळ्यापुढे येतात. स्तोत्रपुराणांचे अनुकरण करून आपल्याकडील साधुसंतांची चरित्रे हरदास पुराणिक सांगतात अशी ओरड करणाऱ्या श्री. वा. सी. बेंद्रे यांच्यासारख्या इतिहाससंशोधकालाही तुकारामादी साधुसंतांचे देह हाती लागले नाहीत व त्यांची मृत शरीरे अदृश्य झाली आणि योगाभ्यासाने अंतर्धान पावण्याचे सामर्थ्य प्राप्त होऊ शकते या गोष्टी पटलेल्या दिसतात.

तुकाराम महाराजांच्या अदृश्य होण्याविषयी इतिहाससंशोधकांनी निरनिराळी मते प्रतिपादन केली आहेत. '**अंतकाळी विठो आम्हांसी पावला । कुडिसहित जाला गुप्त तुका ॥**' हे स्वत: तुकाराम महाराजांनी अंतकाळी काढलेले उद्‌गार दृष्टीआड करून, संशोधकांचे गुरू इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनी त्यांची शवयात्रा घरापासून काढली. कै. राजवाडे यांचे हे मत कसे साफ चुकीचे आहे हे श्री. भिडे यांनी दाखवून दिले आहे. डॉ. हर्षे यांनी अनेक अनुमानांचा परामर्ष घेऊन असा शोध लावला की, "कीर्तनरंगामध्ये सर्व माणसे दंग असताना तुकाराम तेथून एकदम गुप्त झाला. आसपासच्या अरण्यात त्याने एकदोन दिवस काढले आणि त्यानंतर त्यांनी जलसमाधी घेतली असावी..." किंवा "त्याचा देह हाती लागू नये हे मात्र एक गूढ आहे." म्हणजे काय ? सर्व अनुमाने धसास लावून शेवटी 'गूढ' शिल्लक आहेच. निश्चित विधान काहीच नाही ! साधुसंतांना अध्यात्म मार्गावर मुमुक्षूच्या भूमिकेपासून ते पूर्णावस्थेला पोचेपर्यंत येणारे अनुभव, परमेश्वर प्राप्तीकरिता लागलेली तळमळ, त्यासाठी केलेले प्रयत्न, त्यांची गुरुवचनांवर असलेली अढळ निष्ठा, त्यांनी केलेला

योगाभ्यास व त्यामुळे प्राप्त झालेले अनुभव, इत्यादी गोष्टींना संशोधक पारखे झालेले असल्यामुळे त्यानी काढलेली अनुमाने म्हणजे 'बहुधा', 'बहुतेक', 'असावी' किंवा 'गूढ आहे' अशा शब्दांची नुसती कसरत असते. असल्या संशोधनाने फार झाले तर विश्वविद्यालयीन मानाच्या पदव्या पदरात पडतील हे खरे, पण प्रामाणिकपणे संशोधन केल्याचे समाधान किंवा सत्य हाती लागणार नाही असे मोठ्या नाइलाजाने म्हणावे लागते.

वर निर्देश केलेल्या साधुसंतांनी आपापले जीवितकार्य पूर्ण होताच आपला जडदेह पंचतत्त्वांत विलीन करून टाकला. परंतु श्रीगुरूंनी तसे केले नाही. त्यांचे अवतारकार्य—अविद्या नाश—हे सतत चालणारे असल्यामुळे त्याच्या पूर्ततेसाठीं आपला देह कायम ठेवला. त्याचे विसर्जन केले नाही. भिल्लवडी, नरसोबाची वाडी या ठिकाणी जसे गुप्त झाले, तसेच मूळ स्वभावास अनुसरून मानमरातब, सन्मान, लौकिक, जनसंपर्क इत्यादी टाळण्याकरिता श्रीशैल यात्रेचे निमित्त करून गाणगापूर सोडले व पुढे कर्दळी वनात प्रवेश करून गुप्त झाले. कालांतराने पुढे अगदी त्याच देहाने प्रगट झाले तेच हे महाराज होत. कोठे, कसे वगैरे हकीकत पुढे येणार आहेच.

## परि ते स्वरूपी मिळाले !

श्रीगुरू नरसिंव्ह सरस्वती कर्दळी वनात गुप्त झाले. पण त्यांनी त्याच वेळी अवतार संपविला नाही असे असल्यामुळे महाराष्ट्रात गेल्या शतकात होऊन गेलेले साधुसंत श्रीगुरूंचे अवतार अथवा प्रत्यक्ष तेच आहेत अशी श्रद्धा उत्पन्न झालेली दिसते. प्रस्तुत चरित्रात आळंदीचे स्वामी श्रीनरसिंव्हसरस्वती महाराज हे प्रत्यक्ष श्रीगुरूच आहेत व त्यांचे चरित्र म्हणजे गुरुचरित्राचा उत्तरार्धच आहे असे दाखविले आहे. कै० अण्णा कामत यांनी 'सभाग्य रसिक दत्त भक्तांसाठी प्रेमाच्या दोन सूचना' देताना 'अगदी श्रीगुरुचरित्रभक्तांना सांगावयाचे सांप्रदायिक रहस्य म्हणून' उघडपणे सांगितले आहे की श्रीअक्कलकोटचे स्वामी हेच प्रत्यक्ष श्रीगुरु आहेत. श्रीगुरु कर्दळीवनात बहुधान्यनाम संवत्सरात गुप्त झाले आणि श्रीअक्कलकोट स्वामींचे निर्याणही त्याच संवत्सरात झाले. हा योगायोग व त्याच्या भरीला त्या स्वामींच्या मुखातील, 'आम्ही कर्दळी वनातून निघालो'; 'आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण, आमचे नाव नृसिंहभान, कश्यप गोत्र व मीन राशी' इत्यादी उद्गारांवरून त्या स्वामींच्या भक्तामध्ये वरील श्रद्धा दृढ झाली असली पाहिजे. श्रीअक्कलकोटच्या स्वामींचा पूर्ववृत्तांत कोणालाच माहीत नाही.*

* परंतु या स्वामीचे पूर्वाश्रमीचे उपनाव 'बापट' असल्याचे अहिताग्नि राजवाडे यांच्या तोंडून ऐकल्याचे व हे स्वामी १२ वर्षे भुवनेश्वरीच्या देवळात तपश्चर्या केल्यावर प्रगट झाले अशी माहिती सांगणारे लोक आजही भेटतात.

श्रीगुरुचरित्र कथानायकाचा जन्म काळे उपनावाच्या घराण्यात झाला. काळे हे वाजसेनेय शाखेचे वासिष्ठ गोत्री यजुर्वेदीय ब्राह्मण, श्रीगुरूंचे जन्मनाव 'शाली-ग्रामदेव.' त्यावरून त्यांचे जन्मनक्षत्र शततारका ठरते व जन्मरास कुंभ येते. श्रीअक्कलकोटच्या स्वामींच्या मुखातील माहिती श्रीगुरूंचे व्यावहारिक नाव (नरहरी) किंवा जन्मनाव, शाखा, गोत्र इत्यादींशी न जुळणारी आहेत हे स्पष्टपणे दिसून येईल. श्रीमाणिकप्रभू हे दत्तावतारी विभूती म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा कुलवृत्तांत वगैरे सर्व उपलब्ध असल्यामुळे तेच श्रीगुरु होत असा वाद त्यांचे बाबतीत उत्पन्न होत नाही. श्रीअक्कलकोटच्या स्वामींच्या कृपेने श्रीमाणिक-प्रभू उदयास आले व श्रीमाणिकप्रभूंच्या कृपेने श्रीअक्कलकोटचे स्वामी उदयास आले, अशा परस्परविरोधी व घोटाळ्याच्या समजुती त्या त्या स्वामींच्या संप्र-दायात आहेत. श्रीअक्कलकोटच्या स्वामींच्या चरित्रकारांनी महाराजांबद्दल कसा गैरसमज पसरवून ठेवला आहे याबद्दल मागे उल्लेख केलेला आहेच.

नरसोबाच्या वाडीस दीक्षित घराण्यात शके १७८८ ते १८४९ या कालात होऊन गेलेले 'दीक्षित स्वामी' हे श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंभे स्वामी) यांचे अनुग्रही होते. आपल्या शिष्याला आशीर्वाद देतांना श्रीवासुदेवानंद सरस्वती म्हणाले की, "जे एकमेवाद्वितीय परब्रह्म भक्तोद्धारार्थ भूतली अवतीर्ण झाले, ज्याला श्रीदत्त नरसिंहसरस्वती हे नाम आहे. तेच नरसिंहसरस्वती तुम्ही आहा." तेव्हापासून दीक्षित स्वामींना 'नरसिंहसरस्वती' असे नाव मिळाले. परंतु श्रीगुरुचरित्र कथानायकापासून ते वेगळे आहेत हे दर्शविण्यासाठी 'दीक्षित-स्वामी' असेच त्यांना म्हणत असत. महाराष्ट्रात गेल्या व चालू शतकांत श्रीवासुदेवानंद सरस्वती, श्रीब्रह्मानंद सरस्वती, श्रीनारायण महाराज जालवणकर, केडगावचे नारायण महाराज, दीक्षित स्वामी, देऊळगावराजाकडील श्रीरंगनाथ महाराज इत्यादी विभूतीही दत्तावतारी म्हणून होऊन गेल्या. सर्वच विभूती आपापल्या परी थोर आहेत. श्रीमहाराज काय किंवा श्रीअक्कलकोटचे स्वामी काय हे दोघेही विश्वनाटक श्रीदत्तप्रभूंची एकाच वेळी दोन स्थळी नांदणारी रूपे आहेत असे म्हणणे जास्त योग्य होईल. सर्व संत किंवा साधू अज्ञानी जनांच्या दृष्टीला भिन्न दिसतात पण समर्थांनी म्हटल्याप्रमाणे, '**साधु दिसती वेगळाले । परि ते स्वरुपी मिळाले ।**' अशी वस्तुतः स्थिती असते.

श्रीगुरुचरित्र कथानायक व आळंदीचे स्वामी हे एकच होत अशी सांप्र-दायिक श्रद्धा आहे असे प्रस्तुत प्रकरणात दाखविले आहे. या संबंधात कित्येक लोक अशी शंका काढतात की गुरुचरित्रकथानायक हे शिववरप्रसादाने जन्मलेले व ते शिवाशिवाय कोणालाच मानीत नव्हते असे श्रीगुरुचरित्रावरून दिसते. त्यांनी शरण आलेल्या लोकांना शिवोपासना, शिवव्रते व वैकल्ये सांगितली. तर आळंदीचे

स्वामी श्रीविठ्ठलाला मानीत व 'विठ्ठल विठ्ठल' असे भजन करीत. मग ते दोघे एक कसे ? याचा अर्थ असा. या शंकेखोर लोकांच्या मते शिव श्रेष्ठ व विठ्ठल कनिष्ठ. शिवभक्त नरहरी सोनारास काय अनुभव आला ? शिव आणि विठ्ठल हे एकरूप म्हणूनच तो पुढे विठ्ठलाचे भजनी लागला. श्रीराम व श्रीमारोती याशिवाय इतरांना नमस्कारही न करणाऱ्या रामदासस्वामींना पंढरपुरात आल्यावर काय साक्षात्कार झाला ? श्रीविठ्ठलाने रामरूपाने त्यांना दर्शन दिले. राम व श्रीविठ्ठल—कृष्ण हे एकरूप आहेत असा साक्षात्कार झाला आणि म्हणूनच '**इथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ।**' किंवा '**राम कृपाकर विठ्ठल साकार । दोघे निराकार एकरूप ।**' असे उद्‌गार त्यांचे तोंडून बाहेर पडले. विठ्ठल, राम, शंकर किंवा दत्तात्रय फक्त नावात फरक पण सर्व एकच. राम आणि कृष्ण महाविष्णूचे अवतार व दत्तात्रेय हेही महाविष्णूचेच अवतार. आळंदीचे स्वामी व दत्तात्रेय, पांडुरंग, गजानन किंवा लक्ष्मीनारायण हे सर्व एकच असल्याचे साक्षात्कार काही लोकांना झालेले आहेत. त्या हकीकती पुढे येतीलच. श्रीज्ञानेश्वर व स्वामी हे वेगळे नाहीत अशी दृढ श्रद्धा बाळगणारे लोक आजही आढळतात.

खरे अधिकारी लोक मुमुक्षूचा अधिकार, पात्रता, पूर्वजन्माचा ऋणानुबंध वगैरे ओळखून त्याच्या परमार्थिक कल्याणाकरिता, परमेश्वराच्या कोणत्या स्वरूपाची उपासना फलदायक होईल हे जाणून त्या स्वरूपाचीच उपासना त्याला लावून देतात. एकनाथांचे कुलदैवत एकवीरादेवी. घराण्याची उपासना विठ्ठलाची असे असून जनार्दनस्वामींनी त्यांना दत्तोपासना दिली होती. जी गोष्ट एखाद्या व्यक्तीची तीच गोष्ट थोडयाफार फरकाने बहुजनसमाजाला लागू पडेल. कोणती उपासना समाजाच्या किंवा देशाच्या कल्याणाकरिता, कालमानाचा विचार करता, उपयोगी पडेल हे ओळखून खरे अधिकारी लोक तीच उपासना समाजाला लावून देतात. महाराष्ट्रात स्वराज्य असता श्रीज्ञानेश्वरांनी भक्तिमार्गाचा प्रसार करून श्रीविठ्ठलाची भक्ती वाढविली. एकनाथ–तुकारामादि संतांनी त्याच मार्गाने समाजाला नेले. श्रीनरसिंव्हसरस्वतींनी महाराष्ट्रांत दत्तभक्तीचा प्रसार करून कर्मकांडावर भर दिला. रामदासांनी धामधुमीच्या काळात रामोपासना व बलभीमाच्या भक्तीचा प्रसार करून लोकजागृतीचे महान कार्य केले. काळाची पाउले ओळखूनच त्यांनी तसे केले हे उघड आहे. तसे या चरित्रात, श्रीनरसिंव्हसरस्वतींनी—आळंदीचे स्वामींनी—श्रीविठ्ठल व श्रीज्ञानेश्वर यांच्या सेवेत लोकांना लावून लुप्त होऊ पाहणाऱ्या भजनमार्गात 'विठ्ठल–विठ्ठल' या नामघोषाने नवचैतन्य उत्पन्न केले. ते इतके की 'स्वामी साक्षात पंढरीराव' असा त्यांचा लौकिक झाला.

साधुसंत हे 'भगवंताची रूपडी' आहेत. म्हणून ते कोणत्या ना कोणत्या तरी देवदेवतांचे अथवा पूर्वी होऊन गेलेल्या संतांचे अवतार आहेत, अशी श्रद्धा असल्याचे आढळून येते. जसे श्रीज्ञानेश्वर हे विष्णूचे अवतार, श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनरसिंव्हसरस्वती हे श्रीदत्तात्रेयाचे, रामदास श्रीमारोतीरायाचे वगैरे. या सत्पुरुषांनी स्वतःच्या मुखाने आपण अमक्याचे अवतार आहोत असे कधी सांगितले आहे काय ? बहुजन समाजाची तशी श्रद्धा होती. नाही म्हणायला भगवान रामकृष्ण परमहंसांनी मात्र एका प्रसंगी, रामावतारी जो राम झाला व कृष्णावतारी जो कृष्ण झाला तोच मी आहे असे म्हटल्याचे आढळते. साधुसंतांचे जीवनचरित्र, कार्य, त्यांनी केलेल्या लीला, क्वचित् प्रसंगी त्यांचे मुखांतून निघालेले गूढ व सांकेतिक उद्‌गार किंवा भक्ताच्या आग्रहाकरिता प्रगट केलेले रूप, यावरून ते अमक्या देवाचे अवतार आहेत अशी श्रद्धा लोकात उत्पन्न होते व समाज त्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहू लागतो. अर्थात् अवतार ही कल्पना लोकांच्या श्रद्धेवर आधारलेली असते हे स्पष्टच आहे. एखादा साधू सत्पुरुष अमक्याचा अवतार आहे ही गोष्ट, लोकशाहीमध्ये जसे राष्ट्रपती किंवा मंत्री कोण असावा हे गुप्त मतदान पद्धतीने ठरवितात, तसे बहुमताने ठरविण्याची बाब आहे काय ? रामदास व मारुती यांच्यात 'शक्ती, भक्ती आणि युक्ती' या तिन्ही बाबतीत असलेले विलक्षण साम्य पाहूनच ते मारुतीचे अवतार आहेत अशी श्रद्धा उत्पन्न झाली. जन्मापासून ब्रह्मचारी व न शिकविता वेद म्हणणे या श्रीदत्तात्रेय अवताराच्या खुणा पाहून श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनरसिंव्ह सरस्वती हे दत्त अवतार असल्याचे लोकांना पटले. परमेश्वर एकच आहे म्हणून साधुसंत कोणत्याही देवदेवतांचे—लोकांच्या श्रद्धेप्रमाणे—अवतार असले तरी ते सर्व एकच आहेत.

---

प्रकरण तिसरे

# आयुर्मान

## पाचशे वर्षांवर आयुष्य

मागील प्रकरणात महाराज हे अगदी त्याच देहाने वावरणारे श्रीगुरू होते असे म्हटले आहे. तेव्हा साहजिक असा प्रश्न उत्पन्न होतो की श्रीशैलपर्वतावरून गुप्त झाल्यापासून तो आळंदी क्षेत्री समाधी घेण्याची लीला करीपर्यंत म्हणजे जवळजवळ पाचशे वर्षांचा काळ होतो. इतके त्यांचे आयुष्यमान होते काय ? किंवा इतक्या दीर्घकालपर्यंत एकदा धारण केलेला मानवी देह टिकविता येतो काय ? याच दृष्टीने प्रस्तुत प्रकरणात यथामती थोड़ा विचार करण्याचे योजिले आहे. वरील दोन्ही प्रश्नांस उत्तर 'होय' असेच आहे. इतिहास संशोधकांचे समाधान मात्र नुसत्या शब्दाने होणार नाही. पुरावा पाहिजे. ते म्हणतील हा सर्व अंधश्रद्धेचा खेळ आहे. परंतु एक गोष्ट त्यांना कबूल करावी लागेल की आयुष्यवर्धन करणे किंवा दीर्घकालपर्यंत देह टिकविणे अशक्य नाही. कोणत्याही देशात अगदी वर्तमानकाळातही, ज्यांनी आयुष्याचे शतक गाठले आहे असे लोक, हाताच्या बोटांवर मोजण्याइतके कां होईना पण आढळतात. आपल्या भारतात असे शतायुषी लोक विद्यमान आहेत ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. प. वा. अण्णासाहेब कर्वे यांचा १०३ वा वाढदिवस साजरा झाला. सर विश्वेश्वर अय्या किंवा अमरावतीचे सुप्रसिद्ध वकील सर मोरोपंत जोशी यांचे शंभरावे वाढदिवस झाले. आणि या सर्वांपेक्षा जास्त आयुष्य, म्हणजे दीडशे वर्षे वय असलेल्या एका वृद्ध गृहस्थाबद्दलचे वृत्त 'लोकसत्ता' या मराठी वृत्तपत्राने दिनांक ९-१-१९६१ रोजी प्रसिद्ध केले आहे. सदर्हु गृहस्थ काश्मीरच्या पंतप्रधानांना भेटण्याकरिता पन्नास मैलांचे अंतर पायी तोडत तोडत श्रीनगरला आला होता. 'फिरते मानवी स्मारक' असे तो स्वतःचे वर्णन करतो. जॉन सुभान यांनी 'Sufism–its saints and shrines' या पुस्तकांत, पृ. ३१ वर 'फरीदउद्दीन अत्तर' नामक सुफी साधु कवीचे त्रोटक चरित्र दिले आहे. या साधूचा जन्म इ. स. १११९ मध्ये झाला व मृत्यु इ. स. १२२९-३० मध्ये झाला. चंगीझखानाच्या हाताखालील शिपायांच्या तरवारीला तो बळी पडला. हा तर शतायुषी व्यक्तीबद्दलचा ऐतिहासिक पुरावाच म्हणता येईल. या सर्व व्यक्तींची आयुष्य मर्यादा भारतातील

सरासरी आयुष्यमानापेक्षा कितीतरी जास्त आहे. बरे या सर्वांनी कांही योगाभ्यास केला असावा असे वाटत नाही. वरील जिवंत व्यक्तींपैकी एका व्यक्तीला तर लेखक आपल्या लहानपणापासून पाहात आला आहे. सर्व प्रकारचे विलासी जीवन उपभोगूनहि त्या व्यक्तीला इतके दीर्घ आयुष्य कसे लाभले आहे, याचे आश्चर्य वाटते. भविष्य काळातील लोकांना, दीर्घायुषी लोकांची उदाहरणे म्हणून उपरोक्त व्यक्तीचा निर्देश केला तर त्यांना तरी ते खरे का वाटावे ? कारण हल्लीच्या काळांत मनुष्याच्या आयुष्यमर्यादेचे मान इतके कमी झाले आहे की शंभर किंवा दीडशे वर्षे वयमान म्हणजे अगदी अशक्य कोटीतले वाटते. तेव्हा महाराजांचे आयुष्य पाचशेंच्या वर्षांवर होते ही गोष्ट न पटणे स्वाभाविक आहे.

इ. स. १९३५ मध्ये 'कल्याण' मासिकाने प्रसिद्ध केलेल्या योग विशेषांकात महाराजांचे एक शिष्य श्री. नारायणानंद सरस्वती यांचे त्रोटक चरित्र हिंदी भाषेत छापले आहे. त्यांत महाराजांचे वय समाधिसमयी सुमारे १७५ वर्षांचे असावे अशी माहिती लेखकाने दिली आहे. महाराज खानदेशांत फिरत असतां बेटावद येथील मुक्कामांत रावजी शास्त्री बेटावदकरांजवळ एकदा असे म्हणाले की "पांचशे वर्षे झाली या देहाला; आता अगदी कंटाळा आला आहे." दुसरी एक हकीकत अशी ऐकण्यात आहे की जीवरून महाराजांच्या आयुष्य–मर्यादेबद्दल कल्पना करता येईल. ती आख्यायिका अशी–कामशेत या गावाजवळील एक शेतकरी आपले शेत नांगरीत होता. शेत नांगरता नांगरता नांगराचा फाळ लागून जमिनीतून एक मला मोठा दगड वर आला आणि त्या दिवसापासून त्या शेतकऱ्याच्या अंगात संचार होऊ लागला. काही भूतबाधा असेल असें वाटून त्याच्या घरातील लोकांनी मंत्र, धागेदोरे वगैरे उपाय करून पाहिले. पण व्यर्थ; संचार होणे बंद होईना. तेव्हा कोणीतरी घरातील लोकांना त्याला आळंदीला महाराजांकडे घेऊन जा असा सल्ला दिला. त्यावरून घरच्या लोकांनी त्याला आळंदीस महाराजांकडे आणले. त्यावेळी महाराज चक्रांकित यांचे माडीवर बसले होते. जवळच श्री. अण्णासाहेब पटवर्धन, रंगनाथपंत धोत्रे, वगैरे शिष्यमंडळी बसली होती. महाराजांनी त्या शेतकऱ्याला माडीवरूनच पाहिले आणि जवळच्या तांब्यातील पाणी त्याच्या अंगावर तेथूनच शिंपडले. तेव्हा शेतकऱ्याच्या अंगात संचार होऊन तो बडबड करू लागला. तेव्हा जो कोणी त्याच्या अंगांत संचारला होता त्याला उद्देशून महाराज म्हणाले, "तू मुक्त झाला आहेस, तेव्हा याला सोडून दे." अंगात संचारलेल्या पुरुषाने उत्तर दिले, "महाराज, चारशे वर्षांपूर्वी तुम्ही मला दिलेली समाधि याने भंग करून टाकली. मग मी काय करू !" त्यावरून असेच आणखी काही भाषण झाले व अंगात संचारलेला पुरुष त्या शेतकऱ्याला सोडून गेला. नांगराचा फाळ लागून जो दगड वर आला तो त्याच्या समाधीचा होता.

समाधिस्थ पुरुषाचे उद्‌गार ऐकून जवळ बसलेल्या अण्णासाहेबांनी महाराजांना विचारलें, "चारशें वर्षांपूर्वी तुम्ही समाधी दिली हा काय प्रकार आहे ?" त्यावर महाराजांनी, "तुला काय करावयाचे आहे त्याच्याशी ?" असे म्हणून अण्णासाहेबांना चूप बसविले. या गोष्टीवरूनहि महाराजांच्या दीर्घ आयुष्यमर्यादेबद्दल केलेल्या कल्पनेला पुष्टि मिळते. सर्व लोकांसमोर उघडपणे चर्चा करण्याचे टाळण्या करिता महाराजांनी अण्णासाहेबांना चूप बसविले असावे इतकेच. अण्णासाहेबांची महाराजांबद्दल काय श्रद्धा होती याविषयी मागे सांगितलें आहेच. महाराज हेच श्रीगुरुचरित्रांतील श्रीनरसिंहसरस्वती याविषयी अण्णासाहेबांची स्वानुभव पक्की खात्री होती. प्रसंगविशेषी ते थोडे उघडपणे तसे बोलून दाखवीत. पण चर्चा करीत नसत. जेथे महाराज स्वतः कधीच कोणाला आपल्याविषयी काही सांगत नसत तेथे अण्णासाहेब तरी कसे सांगतील ? अण्णासाहेबांचा बराच काळ महाराजांच्या सहवासांत गेलेला. तेव्हा त्यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीच्या मुखांतून महाराजांबद्दल वेळोवेळी जी कांही माहिती कळली तिचा आधार प्रस्तुत चरित्र लिहितांना जागोजागी घेतला आहे.

प्रत्येक व्यक्तीची इच्छा जास्तीत जास्त काळ जगण्याची असते आणि त्याकरिता माणसाची अहर्निश धडपड चाललेली असते. आजही, जुन्या वळणाच्या घरांत एक गोष्ट चटकन दिसून येईल की वडील माणसांना नमस्कार केल्याबरोबर 'आयुष्यमान भव', 'दीर्घायुषी भव' किंवा 'शतायुषी भव' असा आशीर्वाद मिळाल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक जण, मग तो तरुण असो की वृद्ध असो, अंतर्यामी मृत्यु कसा टाळता येईल याचा विचार करीत असतो. तारुण्यावाचून दीर्घायुष्य म्हणजे एक संकटच ! तारुण्य असेल तर जगातील सर्व सुखाचा उपभोग घेता येईल. कुटुंबात वृद्ध व्यक्ति, विशेषतः करून ज्या पंगू आहेत किंवा दुसऱ्या अनेक कारणांनी परावलंबी आहेत, त्या भारभूत वाटतात असा अनेकांचा अनुभव असेल. दुर्बळ, रोगी, गलितगात्र, अशा लोकांची आयुष्यमर्यादा दीर्घ असूनहि त्यांचा समाजाला किंवा कुटुंबाला काय उपयोग होणार ! मनुष्याच्या तारुण्याचा काळ वाढविण्याकरिता किंवा आयुष्यमर्यादा वाढविण्याकरिता पाश्चात्य लोकांनी कोणकोणते प्रयत्न केले व त्यात त्यांना कितपत यश मिळाले याचा प्रथम आढावा घेऊन मग आपल्याकडील पूर्वीच्या लोकांनी काय केले याचा विचार पुढील परिच्छेदात करण्याचे योजिले आहे.

## पाश्चात्यांचे निष्फळ प्रयत्न

रसायनशास्त्र ही विज्ञानाची एक महत्त्वाची शाखा आहे. या शास्त्राच्या अभ्यासाला खरी सुरुवात गेल्या तीन चार शतकांपूर्वी झाली असे म्हणता येईल.

तत्पूर्वी या शास्त्राने फारशी प्रगती केली नव्हती. अरबांनी आधुनिक रसायन-शास्त्राचा पाया घातला. Alchemists च्या डोळ्यासमोर हलक्या धातूपासून सोने तयार करणे हेच एक ध्येय होते. म्हणून त्यांचे सर्व प्रयत्न 'परीस' (The Philosopher's stone) शोधून काढण्याच्या दृष्टीने होते. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीस Paracelsus (इ. स. १४९३ ते १५४१) नांवाच्या शास्त्रज्ञाने ज्याला Iatro–Chemistry म्हणतात त्या रसायनशास्त्राच्या शाखेची सुरुवात केली. मनुष्याला चिरकाल तारुण्य प्राप्त करून देणारे 'अमृत' (Elixir of life) शोधून काढणे हे एकच ध्येय त्यांच्या डोळ्यासमोर होते. मनुष्याला अमरत्व कसे प्राप्त करून घेता येईल या एकाच ध्येयामागे पूर्वीचे शास्त्रज्ञ लागले होते. त्यांचे हे स्वप्न मात्र सत्य सृष्टीत कधीच उतरले नाही. मात्र पाश्चात्य शास्त्रज्ञांनी त्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे कधीच सोडून दिले नाही. आजतागायत त्यांची धडपड चालू आहेच. ते नित्य नवीन नवीन प्रयोग करून पाहतात; पण यश मात्र मिळत नाही, असे दिसते. Pope Innocent VIII च्या रक्त वाहिन्यात तीन तरुणांचे रक्त घातले. पण या शास्त्रक्रियेनंतर तो थोड्याच दिवसांत मेला. Brown Sequard ने स्वतःच्या शरीरांत वृषणांतील एक प्रकारचा द्रव (a fresh extract of testicle) काढून घातला. त्याला कांही दिवसपर्यंत आपले पुनरुज्जीवन झाले असे वाटले. या त्याच्या प्रयोगामुळे त्याला फार प्रसिद्धीही मिळाली. पण लवकरच तो मेला. वृषण बदलून मनुष्याचे तारुण्य टिकविता येते किंवा त्याचे पुनरुज्जीवन होऊ शकते ही कल्पना पुढील शास्त्रज्ञांनी उचलून धरली. Voronoff ने याहि पुढे एक पाऊल टाकले. त्याने तर वृद्ध माणसाचे वृषण शस्त्रक्रिया करून काढून टाकले व त्या जागी माकडाचे (Chimpanzee) वृषण लावले. पण मानवी शरीरांत माकडाचे वृषण जास्त काळपर्यंत टिकू शकत नाही असे त्याला आढळून आले. तात्कालिक तारुण्य उत्पन्न होऊ शकले. आपल्याकडेही ययाति राजाची अशीच एक आख्यायिका आहे. जन्मभर विषयवासनांचा उपभोग घेऊनही तृप्ति झाली नाही तेव्हा त्याने आपल्या मुलाचे तारुण्य घेतले. म्हणजे हल्लीच्या वैद्यकशास्त्राच्या भाषेत मुलाच्या वृषणाचे आपल्या शरीरावर कलम केले असेल. पंडित मदनमोहन मालवीयजींनी तरुण होण्याकरिता 'कायाकल्पाचा' प्रयोग केल्याचे वाचकांच्या लक्षात असेलच. प्रयोग पूर्ण झाल्यावर मालवीयजी बरेच तरुण झाले असे त्या काळी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या एका छायाचित्रावरून दिसून येत होते. पण पुढे लवकरच त्यांची प्रकृती ढासळून ते स्वर्गवासी झाले.

मनुष्याला, अमरत्व प्राप्त करून घेण्याचे प्रयत्न करण्याचा कधीच कंटाळा येणार नाही. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ Dr. Alexis Carell म्हणतो, " Man will never

tire of seeking immortality. He will not attain it, because he is bound by certain laws of his organic constitution. He may succeed in retarding, perhaps even in reversing in some measure, the inexorable advance of physiological time. Never will he vanquish death." दोन शतकात, पाश्चात्यांनी विज्ञानक्षेत्रात अपूर्व अशी प्रगती केली आहे. नवीन शोध लागत आहेत. नवीन नवीन प्रयोग चालूच आहेत. रोग बरे करण्याकरिता नवीन औषधे काढली जात आहेत. नवीन साधने, नवीन कल्पना, नवीन उपचारपद्धती इतके सर्व असूनही मृत्यूला चुकविता येत नाही. मानवाच्या आयुर्मर्यादेत एका दिवसानेही वाढ झालेली नाही. Dr. Alexis Carell म्हणतो, " This failure of hygiene and medicine is a strange fact. Inspite of the progress achieved in the heating, ventilation and lighting of houses, of dietary hygiene, bathrooms and sports, of periodical medical examinations, and increasing numbers of medical specialists, not even one day has been added to the span of human life." भौतिकशास्त्राने, जड अचेतन पदार्थावर प्रयोग करून त्यात प्रगती केली, पण मानवाबद्दलचे ज्ञान अजूनही प्राथमिक अवस्थेत आहे. त्यामुळे पाश्चात्यांचे आयुर्मर्यादा वाढविण्याचे किंवा अमरत्व प्राप्त करून घेण्याचे सर्व प्रयत्न आतापर्यंत अयशस्वी झाले आहेत.

## आयुमर्यादा आणि तिचे मापन

मानवी आयुष्याच्या कालमर्यादेचे मापन हे केवळ सापेक्ष आहे. उंदीर किंवा माशा यांच्याशी तुलना केल्यास मानवाची आयुर्मर्यादा फार मोठी आहे असे म्हणता येईल. परंतु वटवृक्ष किंवा परदेशातील 'ओक' वृक्षाशी तुलना केल्यास ती फार कमी आहे असे दिसून येईल. घड्याळासारख्या लहानशा साधनाने मानवाच्या आयुष्याच्या लांबीचे मापन केले जाते. सेकंद, मिनिट आणि तास ही कालगणनेची मापे सर्वांनी ग्राह्य ठरविली आहेत. घड्याळाने दर्शविलेल्या कालाचा संबंध पृथ्वीच्या स्वतःच्या आसाभोवती आणि सूर्याभोवती होणाऱ्या भ्रमणाशी आहे. म्हणजे दुसऱ्या शब्दांत सौरकालगणनेच्या मापांनी आपण मनुष्याच्या आयुष्याची लांबी मोजतो. कालगणनेची ही पद्धत केवळ सोयीकरिताच मनुष्याने स्वीकारली आहे. आपण पृथ्वीवर राहतो म्हणून, भूतलावरील प्रत्येक गोष्टीचे मापन करण्याकरिता जी मापे उपयोगात आणतो त्यांचा संबंध पृथ्वीशी असणे किंवा ठेवणे स्वाभाविक आहे. त्यांतील एक मीटर हा पृथ्वीच्या रेखांशाचा सुमारे ४२ दश लक्षांश्वा हिस्सा आहे. त्याचप्रमाणे पृथ्वीचे भ्रमण किंवा घड्याळाने दर्शविलेला तास हा प्रमाण मानून आपण कालगणना करतो. सूर्योदय किंवा

सूर्यास्त यांचाही उपयोग कालगणनेत मनुष्याने केला असून त्यावर आपल्या दैनिक आयुष्याची रूपरेषा आधारली आहे. असाच संबंध चंद्राच्या उदयाशी किंवा अस्ताशी जोडून त्यावरूनही कालगणना करता येईल. समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या कोळी लोकांचा चंद्रोदयाशी तर निकटचा संबंध असतो. सारांश, कालगणना सापेक्ष किंवा तुलनात्मक असून केवळ सोयीकरिता ती आपण मान्य केली आहे.

पौराणिक कालांतील कालगणनेच्या पद्धतीविषयी विद्वानात मतभेद आहेत. दशरथ राजा ६०,००० वर्षे राज्य करीत होता, रामाने ११,००० वर्षे राज्य केले किंवा विश्वामित्राने १,००० वर्षे तप केले यांतील हजार (१०००) निरर्थक आहेत असे 'पुराणनिरीक्षण'कर्ते वैद्य काळे यांचे मत आहे. सूर्यावरून किंवा चंद्रावरून कालगणना करण्याच्या पद्धती फार जुन्या आहेत व म्हणूनच, पांडवांनी तेरा वर्षांचा वनवास व अज्ञातवास कराराप्रमाणे पूर्ण केला की नाही यासंबंधाने तंटा उपस्थित झाला. कालगणना पद्धती निरनिराळ्या असल्याने व्यवहारात कसे घोटाळे उत्पन्न होतात हे दर्शविण्यास वरील उदाहरण फार उत्तम आहे. प्रचलित कालगणना पद्धती ही मनुष्याने आपल्या सोयीकरिता उत्पन्न केली असून त्या पद्धतीनेच तो आयुर्मर्यादेचे मापन करीत असतो. आधुनिक शास्त्रज्ञ या कालाला 'भौतिक काल' (Physical Time) असे म्हणतात. या कालगणनापद्धतीचा, मानवांत अखंड चालणाऱ्या शारीरिक किंवा मानसिक प्रक्रियांशी काहीच संबंध नाही. आयुर्मर्यादा ठरविण्याच्या दृष्टीने, उपरोक्त भौतिक कालापेक्षा मनुष्याच्या शरीरात निरंतर चालणाऱ्या क्रियेचा कसा उपयोग होऊ शकेल हे आपण आता पाहू.

या जगांत, ज्या कालावधीत आपण आपली सर्व कर्मे करतो त्या कालावधीला जीवित असे म्हणतात आणि प्राप्त झालेल्या शरीराचा जो या जगातील अस्तित्वाचा काल त्यालाच आयुष्य असे म्हणता येईल. आयुष्य म्हणजे काय असा विचार केला तर असे दिसून येईल की जोपर्यंत आपण श्वासोच्छ्वासाची क्रिया करतो तो काल. श्वासोच्छ्वासाच्या क्रियेत वायु आत घेणे किंवा बाहेर सोडणे या दोन क्रियांचा समावेश होतो. कोणताही प्राणी श्वासोच्छ्वासाची क्रिया चालू असेपर्यंत जिवंत आहे असे समजतात व ही क्रिया बंद पडली की तो प्राणी मेला असे समजतात. आईच्या उदरातून बाहेर पडताच ज्या क्षणाला आपण पहिला श्वास घेतो तो क्षण आपल्या आयुष्याचा प्रारंभ. मृत्यूप्रसंगी अगदी शेवटचा जो उच्छ्वास टाकतो तो क्षण म्हणजे आयुष्याचा शेवट होय. म्हणून श्वासोच्छ्वासाची ही क्रिया ज्या कालखंडात चालू आहे तो कालखंड म्हणजे आपली आयुर्मर्यादा म्हटली पाहिजे. ही श्वासोच्छ्वासाची क्रिया प्राण्यांत अखंड चालू असते. जितके श्वास घेऊ तितकेच परत बाहेर

सोडले पाहिजेत. एखादा मनुष्य ४० वर्षे जगला याचा अर्थ असा होईल की त्याने ठराविक श्वास घेतले व तितकेच बाहेर सोडले. श्वासोच्छ्वास चालणे हे शरीरात प्राण असल्याचे लक्षण आहे. जर ही क्रिया बंद झाली तर त्या शरीरास मृत शरीर असे समजले जाते. विदर्भातील सत्पुरुष गुलाबराव महाराज माधनकर यांना बद्धकोष्ठतेचा विकार होता व त्याचे पर्यवसान क्षयात झाले. तेव्हा ते पुण्यास श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांचेकडे औषध घेण्यास आले. गुलाबराव महाराजांना पाहण्याकरिता अण्णासाहेब त्याच्या निवासस्थानी रोज जात असत. एक दिवस गुलाबरावांनी अण्णासाहेबांना विचारले, "आयुष्य किती उरले आहे ते सांगा, म्हणजे मी माझी तयारी करतो." त्यावर अण्णासाहेबांनी चटकन् उत्तर दिले की, "अभ्यासी माणसांनी आपला बाहेर जाणारा प्रत्येक श्वास शेवटचाच आहे असे समजून चालावे." हे उत्तर श्वासोच्छ्वास व आयुष्यमापन यांचे समर्थन करणारे आहे. बाहेर टाकलेला श्वास परत आला तरच आपण जिवंत आहोत; नाही तर नाही.

"सतिमूले तद्विपाकोजात्यायुर्भोग:" आयुष्य प्रारब्धानुसार लाभते. जितकी आयुर्मर्यादा ठरली असेल तितकाच कालपर्यंत मनुष्याला या जगांत राहता येते. प्रत्येक मनुष्याला त्याची कर्मे भोगता येतील इतक्या मुदतीचा श्वासनिधी परमेश्वराकडून मिळतो. एखादा मनुष्य या निधीचा फाजील व्यय केल्यामुळे आयुष्य संपण्यापूर्वीच मृत्युमुखी पडतो. शरीर निरोगी ठेवून श्वासोच्छ्वासाच्या क्रियेवर ताबा ठेवल्यास आपल्याला दीर्घायुषी खात्रीने होता येईल. मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा भौतिककाल (Physical Time) गणनापद्धतीनुसार वर्षे, महिने किंवा दिवस या मापांनी न ठरविता त्याला किती श्वासनिधी मिळाला आहे किंवा त्याला किती श्वासोच्छ्वास परमेश्वराने नेमून दिले आहेत त्यावरून पाहता ठरविली पाहिजे. अर्थात् सोयीकरिता आपण, हा श्वासनिधी अमुक इतक्या वर्षांत खर्च केला, म्हणून त्याचे आयुष्य अमुक इतके वर्षे आहे, असे म्हणतो. भौतिक कालगणना पद्धती मानवनिर्मित असून त्याच्या शरीरात चालणाऱ्या प्रक्रियेशी तिचा काही संबंध नाही, ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे. कल्पना करा की एखाद्याला ईश्वराने इतका श्वासनिधी नेमून दिला आहे की तो त्याला १०० वर्षे पुरू शकेल. परंतु त्याने त्याचा फाजील आणि प्रमाणाबाहेर खर्च केला तर तो मुदतीच्या आतच मृत्यु पावेल. उलट तो निधी त्याने काटकसरीने खर्च केल्यास ठरलेल्या मुदतीपेक्षाहि जास्त काल त्याला जगता येईल. म्हणजेच आयुष्यवृद्धी, रोज काही श्वासोच्छ्वास शिल्लक टाकून, प्रयत्नपूर्वक करता येईल. योगाभ्यासाने किंवा प्राणायामाने आयुष्यवृद्धी करता येणे कसे शक्य आहे, याचे थोडेसे विवेचन पुढे केले आहे.

## मृत्यूला जिंकणारा योग

योगशास्त्र अगम्य आहे. पाश्चात्यांनी भौतिकशास्त्रात केलेल्या प्रगतीमुळे जे भारावून गेले आहेत, त्यांच्या दृष्टीने योगशास्त्र हे एक थोतांड आहे. स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, अरविंद घोष किंवा स्वामी कुवलयानंद यांच्यासारख्या योगशास्त्रपारंगत पुरुषांनी केलेल्या प्रयत्नांनी आणि काही पाश्चिमात्त्य विद्वानांनी प्रसंगविशेषी काढलेल्या उद्गारांमुळे, योगशास्त्रात काहीतरी तथ्य असावे असे बुद्धिप्रामाण्यवादी लोकांना अलीकडे वाटू लागले आहे. स्वामी कुवलयानंद यांनी चालविलेले 'योगमीमांसा' मासिक योगशास्त्राची फार मोठी सेवा करीत असून त्याचा प्रसारही करीत आहे. योगाचे चार वेगवेगळे भाग मानण्यात येतात, ते असे. १ मंत्रयोग, २ हठयोग, ३ लययोग व ४ राजयोग. वास्तविक ते भिन्न नसून चारही योगांनी, योगातील गूढतम विषय म्हणूनी समजली गेलेली जी कुंडलिनी शक्ति ती जागृत होते. कुंडलिनी जागृत करण्याच्या मार्गालाच श्रीज्ञानेश्वरानी 'पंथराज' असे संबोधिले आहे. संस्कृत ग्रंथातून या मार्गाला 'महायोग' म्हटले आहे. श्रीकुंडलिनी शक्ती पुढील निरनिराळया उपायांनी जागृत होऊ शकते. १. योगाभ्यासाने किंवा तीव्र वैराग्याने. २. ज्ञानाने किंवा भक्तीने. ३. प्राणायामाने. ४. शक्तिपाताने. गुरुकृपेने कुंडलिनी त्वरित जागृत होते असे अधिकारी लोक म्हणतात. इडा व पिंगला या नाडया कालस्वरूप दर्शवितात. या नाडया सारख्या चालल्या म्हणजे त्यांचा लय सुषुम्ना नावाच्या तिसऱ्या नाडीत होतो. कुंडलिनी अशा वेळी सुषुम्ना नाडीत प्रवेश करते. सुषुम्ना नाडीला योग–शास्त्रात 'कालभक्षक' किंवा 'कालरोधक' म्हटले आहे; कारण योगी सुषुम्ना नाडीत प्रवेश करून महाप्रयाणाची वेळ बदलून टाकतो. कुंडलीनी सुषुम्ना नाडीत प्रवेश करून सहस्रारचक्रात जाते व तेथे शांत झाली म्हणजे जी अवस्था उत्पन्न होते तिलाच समाधी असे म्हणतात. समाधि-स्थितीत योगी असता त्याच्या शरीराचे विकार म्हणजे वर्धन, परिणाम, नाश हे बंद पडतात. नखकेशादि वाढत नाहीत. प्राणक्रिया बंद असल्याने नाडीचे ठोके व हृदयाचे आकुंचन प्रसरण ह्या सर्व क्रिया बंद पडतात. म्हणूनच अशा योग्याला कालांतक किंवा कालभक्षक योगी असे म्हणतात. ज्याची कुंडलिनी–शक्ती जागृत झाली आहे अशा योगी पुरुषाच्या शरीराला प्रत्यक्ष यमही स्पर्श करण्यास भितो. श्रीज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात श्रीकुंडलिनी मूलाधार चक्रापासून सहस्रारचक्रापर्यंत प्रवास करीत असता साधकाच्या शरीरांत कसकसे बदल होतात याचे फार सुंदर वर्णन केले आहे. 'नवी नखे निघतात व ती सतेज दिसतात. दातहि नवे येतात. केसांची अग्रे माणिकाच्या बारीक कण्याप्रमाणे लहान अशी सतेज उद्भवतात आणि साधकाचे **"वार्धक्य तरी बहुडे । तारुण्याची गाठी**

**विघडे । लोपली उघडे । बाळदशा ।।"** –म्हातारपण मागे फिरते, तारुण्याचा वियोग होतो आणि गेलेली बाल्यावस्था पुन्हा प्राप्त होते.' आणि अशा योग्याच्या शरीराला यमही भितो. "**मग देहाकृति बिहे । कृतांतु गा ।।**" ज्ञानेश्वरांनी केलेले हे वर्णन म्हणजे केवळ कल्पनेतील भराऱ्या नाहीत. जो त्या मार्गाने जाईल त्याला तसा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही.* ज्याची कुंडलिनी शक्ती जागृत झाली आहे असा योगी आपला जड देह स्वेच्छेने टाकतो. आणि पंचभौतिक जड देह जरी नष्ट झाला तरी काही दिव्य विभूती सूक्ष्म देहाने नित्य वास करू शकतात व जरूर पडल्यास जड देह धारण करू शकतात. समर्थांना गोरक्षनाथाचे झालेले दर्शन, सोहिरोबानाथांची गैबीनाथाशी झालेली भेट, भगवान रामकृष्ण परमहंस यांची भगवान बुद्ध किंवा येशू ख्रिस्त यांच्याशी झालेली भाषणे, नथूसिंग दादांना झालेला गोरक्षनाथांचा दृष्टान्त किंवा विदर्भांतील एका विद्यमान सत्पुरुषाला नारदानी केलेला उपदेश या गोष्टी कशा शक्य आहेत ? याचा अर्थ असा होतो की वरील सर्व दिव्य विभूती अमर असून त्या मर्त्य लोकातील मानवाशी भाषण, भेट इत्यादि व्यवहार आजही करू शकतात. श्रीचांगदेव योगबलाने चौदाशे वर्षे जगले ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. हल्लीच्या काळातहि तीन चारशे वर्षे वयाचे योगी हिमालयात आढळून येतात. परमहंस योगानंद यांनी 'Autobiography of a Yogi' नावाचे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले आहे. त्यात बाबाजी नावाच्या महाज्ञानी योग्याबद्दल माहिती दिली आहे. बाबाजी बद्रिनारायणाजवळील हिमालयाच्या भागात राहतात व त्यांचा देह कित्येक शतके टिकलेला आहे, असे योगानंदानी आपल्या पुस्तकात म्हटले आहे. चिमणाराजा पिंप्री येथील श्रीब्रह्मानंद महाराज हे दोनशे वर्षे वयाचे होते असे सांगतात. शरीरविसर्जनाची वेळ आल्यावर त्यांनी समाधी लावली व काळाला चुकविले. असा प्रकार दोन वेळा झाला. तिसरे वेळी काळाला हुलकावणी देण्याकरिता त्यांनी आपल्या 'ब्रह्मानंद' गुहेत दडून बसण्याची तयारी केली. त्यावेळी श्रीरंगनाथ महाराज हे त्या गुहेत अचानक आले आणि श्रीब्रह्मानंद महाराजाना उद्देशून म्हणाले, "चोरी किती वेळा करावी ? चोर केव्हा तरी धरला जाईलच." हे शब्द ऐकून श्रीब्रह्मानंद

* जुआना ऑरटेगा व्हिलॅरिया नावाच्या स्पेनमधील एका ११२ वर्षांच्या बाईचे दात पडले होते. पण तिला नवीन दात आता येत आहेत व तिच्या डोक्यावरील पांढरे झालेले केस काळे व्हावयाला लागले आहेत. तिला पुन्हा तारुण्यपद प्राप्त होत आहे. (नवशक्ती, दि. १० फेब्रु. १९६२ वरून) या बाईने काही योगाभ्यास केला असेल असे वाटत नाही. तरी आज तिच्या शरीरात बदल होऊन ती तरुण होत आहे. तर योगाभ्यास करणाऱ्याला तारुण्यप्राप्ती होते किंवा श्रीज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे बाळदशा प्राप्त होते या गोष्टी अविश्वसनीय का वाटाव्या याचे खरोखरच आश्चर्य वाटते !

महाराजांचे मृत्यूला हुलकावणी देण्याचे विचार पार विरघळून गेले आणि त्यांनी लागलीच देहविसर्जन केले.

रहस्यमय भारतात शोध करण्याकरिता आलेल्या Paul Brunton ला अडचार नदीच्या काठी एक संन्यासी भेटला. त्याचे टोपण नाव Brunton ने ब्रह्मा (Brama) असे ठेविले. या संन्याशाच्या गुरूचे नाव 'येरुंबुस्वामी' (मुग्यांचा शिक्षक) असे असून त्याच्याबद्दल थोडी माहिती Brunton ने आपल्या 'A Search in Secret India' या पुस्तकात दिली आहे. युरुंबु-स्वामीचे वय चारशे वर्षांच्या वर असावे असे उपरोक्त पुस्तकात म्हटले आहे !

कोणत्याही मार्गाचा अवलंब करून श्रीकुंडलिनी शक्तियोग साध्य झाल्यावर साधकाला सर्व प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात. साधक इच्छामरणी होतो. भीष्म हे इच्छामरणी होते हे तर सर्वश्रुत आहेच. ही तर पुराणांतरीची गोष्ट झाली. पुण्याचे श्रीअण्णासाहेब पटवर्धन हेही इच्छामरणी होते. अमुक एका वेळी जाणार असे म्हणत असता ती वेळ कुयोगाची आहे असे सांगितल्यावरून 'हरकत नाही; पुढे दोन तासांनी सुयोगावर प्रयाण करू' असे म्हणून 'लाभ'-संज्ञक सुयोग सुरू झाल्यावर त्यांनी देह ठेवला. श्रीमत् वासुदेवानंदसरस्वती (टेंभे स्वामी) यांचे महानिर्याण स्वेच्छेनेच झाले. त्यांना अतिसाराचा विकार होता. तो बळावला आणि शरीर कृश झाले. अंतःकाळ जवळ येऊन ठेपला. ज्येष्ठ व ॥ ८ हा निर्याणाचा दिवस ठरला होता. पण त्यांची इच्छा त्या दिवशी प्रयाण करण्याची नव्हती. त्यांनी अष्टमी सुरू झाल्याचे विचारून घेऊन समाधी लावली. ती तीन तासपर्यंत. समाधीतून भानावर आल्यावर ते म्हणाले, "आजचा निर्याणाचा दिवस टळला." पुढे अमावास्या झाल्यावर येणाऱ्या शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी त्यांनी प्रयाण केले. अमरावतीच्या श्रीशंकर महाराजांचे प्रयाणही असेच स्वेच्छेने झाले. श्रीशंकर महाराजांना पाहिलेले लोक आजही त्या भागात हयात आहेत. अमरावती येथील सुप्रसिद्ध वकील कै. महादेव बळीराम उपाख्य नानासाहेब गणोरकर व त्यांच्या पत्नी असे उभयता श्रीशंकर महाराजांची एकनिष्ठपणे सेवा करीत असत. विशेषतः नानासाहेबांच्या कुटुंबाची शंकर महाराजांचे ठायी फार भक्ती होती. एकदा शंकर महाराजांनी नानासाहेबांना सांगितले की, "तुम्हाला कोर्टाला सुट्टी असेल त्या दिवशी आम्ही जाऊ." हे ऐकल्यापासून नानासाहेबांनी शंकर महाराजांसमोर सुट्टीच्या दिवसाचा चुकूनही उल्लेख केला नाही. रविवारी सुद्धा काहीना काही काम असते असे ते मुद्दामच म्हणत. एके दिवशी काही मंडळी गप्पागोष्टी करीत बसली होती. त्यात नानासाहेबही होते. अनवधानतेने नानासाहेब बोलून गेले की, " उद्या कोर्टाला सर्वपित्री अमावास्येची सुट्टी आहे." हे ऐकल्याबरोबर शंकरमहाराज म्हणाले की, "मग आम्ही उद्या

जाऊ." आणि त्याप्रमाणे खरोखरच त्यांनी सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी देह ठेवला. ही गोष्ट सोमवार २९ सप्टेंबर १९१३ साली घडली. शंकर महाराजांचे समाधीस्थान उमरावती येथील स्मशानभूमीत आहे.

मृत्यूला जिंकणाऱ्या या योगाचे अगदीच त्रोटक विवेचन करण्याचा प्रयत्न येथे केला आहे. माझ्यासारख्या अनधिकारी व्यक्तीने योगासारख्या गहन विषयावर चार शब्द लिहिण्याचा प्रयत्न करणे म्हणजे त्या शास्त्राची प्रतिष्ठा कमी करणे होय. असे साहस केल्याबद्दल विद्वान व अधिकारी लोक मला क्षमा करतील अशी आशा आहे.

## प्राणायामाने आयुष्यवृद्धी

योगाच्या आठ अंगांपैकी चौथे अंग प्राणायाम हे होय. "प्राणायामः परं तपः ।" असे म्हणतात. प्राणायामासारखे दुसरे श्रेष्ठ तप नाही. शास्त्राने सांगितल्याप्रमाणे प्राणायाम केल्याने मनाची एकाग्रता होते. रक्त शुद्ध होऊन नानाप्रकारचे रोग घालविता येतात आणि आयुष्यवर्धन होऊ शकते. प्राणायाम म्हणजे श्वासोच्छ्वासाच्या नियमनाचा अभ्यास होय. श्वासोच्छ्वासाचे जे शास्त्र तेच प्राणायामाचे शास्त्र असे म्हणता येईल. 'संपूर्ण योगशास्त्र' नामक योगाभ्यासावरील एका जुन्या पुस्तकात त्या पुस्तकाचे कर्ते श्री. बाळ, मुंबई यांनी प्राणायामाविषयी माहिती सांगतांना आयुष्यवृद्धीचा प्राणायाम हा एक उपाय कसा आहे, हे खालील दृष्टांत देऊन स्पष्ट केले आहे.

"दुधाचे दही होते व ते दही घुसळून त्याचे रूपांतर ताकात होते. हे घुसळण हेच रूपांतराचे कारण होय. दही घुसळण्याचा माथ्या व दोन बाजूंनी दिसणाऱ्या दोन दोऱ्या पण एकच दोरीची ती दोन टोके होत. तसे श्वासनळी ही रवी किंवा माथ्या, श्वास–उच्छ्वास ह्या त्या रवीला बांधलेल्या एकाच दोरीची दोन टोके होत. प्राण्याचे रूपांतर श्वासोच्छ्वासाच्या घुसळण्याने होत असते. बाल्यपण, तारुण्य, वृद्धावस्था वगैरे, नंतर अन्य देहांतर, हा घुसळण्याचा परिणाम होय. या घुसळण्याने रूपांतर लवकर नको असेल तर प्राणायाम हा अटकाव त्या घुसळण्याला घातला पाहिजे. हे घुसळणे रीतसर चालू ठेवले तर देहाचे रूपांतर लवकर किंवा उशीरा होणे हे आपल्या हातचे होईल; म्हणजे आयुष्यवृद्धी होईल. म्हणून प्राणायाम हा उपाय त्याला सांगितला आहे."

श्वासोच्छ्वासाचा अवधी म्हणजे मनुष्याची खरी आयुर्मर्यादा होय हे मागे दाखविले आहेच. योगशास्त्रात सांगितल्याप्रमाणे जर प्रत्येक मनुष्य २४ तासात २१६०० श्वासोच्छ्वास करील तर तो पूर्णायुषी होईल. या हिशोबाने एका मिनिटांत १५ श्वासोच्छ्वास हे प्रमाण पडते. अर्थात् हे प्रमाण प्राणायाम कर-

णाऱ्या व्यक्तींचे आहे. सामान्यत: असे आढळून आले आहे की नाडीच्या ठोक्यांच्या $\frac{1}{4}$ इतकी श्वासोच्छ्वासांची संख्या असते. आंग्लवैद्यकशास्त्राप्रमाणे सशक्त माणसाचे नाडीचे ठोके दर मिनिटास ६० ते ७२ पडतात. योगशास्त्रात निरनिराळ्या प्रकृतीच्या माणसांचे नाडीचे ठोके किती पडतात याचा तपशील आलेला आहे. जसे, सात्विकप्रधान प्रकृतीच्या सशक्त, निरोगी माणसाच्या नाडीचे ठोके दर मिनिटास ४५ पडतात. तसेच राजसप्रधान प्रकृतीयांचे ६० आणि तामसप्रधान प्रकृतीयांचे ७२ इतके ठोके पडले पाहिजेत. हे प्रमाण अर्थातच मनुष्य स्वस्थ आणि शांत असेल त्यावेळचे आहे. श्रम करतांना, धावतांना, मैथुनप्रसंगी, आतुरकामेच्छेने, भय, अथवा क्रोध उत्पन्न झाला असता श्वासोच्छ्वास वाढतात, ही सर्वांच्या अनुभवाची गोष्ट आहे. मागे म्हटल्याप्रमाणे श्वासनिधीचा फाजील व्यय झाल्यास आयुर्मान कमी होईल. श्वासोच्छ्वासाचे वर सांगितलेले प्रमाण अभ्यासाने पाहिजे तितक्या प्रमाणात कमी करता येणे शक्य आहे व श्वासोच्छ्वास प्रत्येक मिनिटाला कमी होण्याची स्थिती अभ्यास व सवय यांनी कायम करता येते. सरासरी प्रमाणापेक्षा श्वासोच्छ्वासाचे प्रमाण वाढले तर आयुर्मर्यादा कमी कशी होऊ शकते याचे एक उदाहरण समजुतीकरिता घेऊ. योगशास्त्राने ठरविलेल्या प्रमाणापेक्षा समजा एका व्यक्तीचे श्वासोच्छ्वासाचे प्रमाण ५ ने जास्त आहे. या हिशेबाने ५ (पांच) श्वास दर मिनिटास जास्त खर्च होतात. म्हणजे दर ३ मिनिटामागे १ मिनिट फुकट जातो व पर्यायाने तीन वर्षांत १ वर्ष आयुष्य वाया जाते. वरील व्यक्तीला परमेश्वराने दिलेला श्वासनिधी समजा ४० वर्षे पुरण्याइतका आहे. श्वासोच्छ्वासाचे प्रमाण ५ ने जास्त झाल्यामुळे तो निधी त्याला ३० वर्षेच पुरू शकेल. हेच उदाहरण उलटे करून आयुष्यवृद्धी कशी होते हे सहज समजून येईल. प्राणायामाने श्वासोच्छ्वासाचे प्रमाण वाटेल तितके कमी करता येते असा अभ्यासू लोकांचा अनुभव आहे. प्राणायाम करणाऱ्याला अंतर्ज्ञानाने पुढे होणारे अपघात कळतात आणि म्हणून ते त्याला टाळता सुद्धा येतात. अपघातप्रसंगी प्राणायाम करून प्राण ब्रह्मांडी नेऊन अपघातापासून त्याला दूर राहता येणे शक्य आहे. म्हणजेच अपघात चुकविणे त्याच्या हातचे आहे. म्हणून योगी स्वेच्छेने देहत्याग करू शकतो. श्वासोच्छ्वासावर ताबा असल्यास मनुष्याला दीर्घ कालपर्यंत देहत्याग न करता जगता येईल.

सहाशे वर्षांपूर्वी दिल्लीच्या गादीवर सुलतान कुतुबुद्दीन मुबारक शहा होता. त्याच्या दरबारात अमीर खुस्रो नावाचा एक महान कवी आणि संत होता. अमीर खुस्रोने लिहिलेल्या 'नुहसिपेहर' (म्हणजे नऊ आकाश किंवा नवे आकाश) नामक ग्रंथांत हिंदुस्थानची पुष्कळ वैशिष्टये वर्णन करून सांगितली

आहेत. त्यांत 'योगी आपल्या श्वासोच्छ्वासावर ताबा ठेवून तीनशे वर्षांवर जगतात' असा उल्लेख त्याने केला आहे.

निसर्गांतील कांही प्राणी जास्त काल जगू शकतात याचे खरे रहस्य, श्वासोच्छ्वासाच्या क्रियेत आहे, असे आढळून आले आहे. प्रचंड देहधारी हत्ती हा माकडापेक्षा श्वासोच्छ्वास फार हळूहळू करतो. पण त्याचे आयुष्य मात्र माकडापेक्षा किती तरी जास्त असते. तसेच काही मोठे सर्प कुत्र्यापेक्षा जास्त हळूहळू श्वासोच्छ्वास करतात आणि जगतातही जास्त. सर्पाला मारल्या-शिवाय मरण नाही अशी एक समजूत आपल्याकडे प्रचलित आहे. शीतकालांत वटवाघुळे दीर्घ निद्रा घेतात. एकदा श्वास घेतला की पुन्हा श्वासोच्छ्वास करीत नाहीत. निद्रा संपल्यावर पुन्हा श्वास सुरू होतो. हिमालयातील आस्वले याप्रमाणेच हिवाळचात निद्रा घेतात व श्वासोच्छ्वास न करता जिवंत दशेत राहू शकतात. जर खालच्या श्रेणीतील प्राण्यांना श्वासोच्छ्वास काही काल बंद ठेवूनही जिवंत राहता येते तर ते मनुष्याला का शक्य होऊ नये ? प्राणायामाच्या योगाने हृदयक्रिया बंद करूनही जगता येते अशी उदाहरणे आहेत व अनुभवही आहेत.* शिखांचा रणजितसिंग याच्या कारकीर्दीतील उदाहरण प्रसिद्ध आहे.

---

* योगाभ्यासाने हृदयाचे स्पंदन बंद ठेवता येते ही गोष्ट आता, कसोटी घेऊन खरी असल्याचे सिद्ध झाले आहे. अमेरिकन व भारतीय संशोधकांनी या गोष्टीची परीक्षा घेऊन योगी आपल्या हृदयाचे स्पंदन बंद करू शकतो किंवा मंदावू शकतो याची ग्वाही दिली आहे. या संशोधनात कॅलिफोर्निया विद्यापीठातील मानसशास्त्राचे प्राध्यापक एम्. ए. वगैरे, मिशिगान विद्यापीठातील इलेक्ट्रो एन्से हॅलोग्राफीचे प्राध्यापक डॉ. बी. के. बाग्ची व दिल्लीतील ऑल मेडिकल सायन्सचे डॉ. बी. के. आनंद हे होते. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या 'सर्क्युलेशन' या नियतकालिकात, वरील तज्ज्ञांनी आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. भारतातील तीन योग्यांनी, योगमार्गाने आपण हृदयाचे ठोके बंद करू शकतो असे आणि चवथ्या योग्याने आपण ठोके बंद करू शकत नाही पण त्याची क्रिया बरीच मंदावू शकतो, असे सांगितले होते. या संशोधकांनी या चार योग्यांच्या म्हणण्याची कसोटी इलेक्ट्रो कार्डिओग्राफने घेतली. या उपकरणाने हृदयाच्या स्पंदनापेक्षाही हृदयाची विद्युतक्रिया नोंदली जाते.

वरील तज्ज्ञांनी आपल्या अहवालात, योग्याने 'हृदय थांबविले' असा शब्दप्रयोग वापरला नाही. पण ते म्हणतात, "काही सेकंदपर्यंत हृदयाच्या क्रियेत व्यत्यय आणणे व हृदयाच्या विद्युतक्रियेचे केंद्र बदलणे व अत्यल्प काळ कमालीची मंदता आणणे, या गोष्टी योगी साधू शकला. एकदा तर हृदयाच्या दोन स्पंदनात ५॥ सेकंद इतका अवधी होता. वैद्यकशास्त्राने इतकी वर्षे योग्यांचे म्हणणे मान्य केले नव्हते. हृदयाचे स्पंदन आपाततः घडत असते असेच त्यांचे म्हणणे असे. काही योगी म्हणविणारे लोक गळा, हात, शरीराचा वरचा भाग यातील शिरा ताठ करून हृदयातील रक्तप्रवाह कमी करतात व त्यामुळे स्पंदन बंद पडल्यासारखे वाटते. डॉक्टरचे स्टेथास्कोप नावाचे उपकरण अशावेळी साफ फसते. पण वरील कसोटीत वापरलेल्या

( पुढील पानावर )

इ. स. १८३७ मध्ये लाहोर येथे एका फकिराने ४० दिवसपर्यंत स्वतःला जमिनीत गाडून घेतले. शीख सैनिकांनी तेथे अहोरात्र पहारा ठेवला होता. चाळीस दिवसानंतर त्याला काढण्यात आले; तेव्हा तो पूर्वीसारखाच जिवंत होता.

## महाराजांची यौगिक क्रिया

कर्दळीवनांत श्रीगुरु नरसिंहसरस्वती गुप्त झाले. पुढे त्याच देहाने प्रगट होऊन भ्रमण करीत करीत श्रीक्षेत्र आळंदी–देवाची येथे शांत झाले. तेच प्रस्तुत चरित्राचे नायक होत असे मागे म्हटले आहे. महाराजांना योगशास्त्राचे संपूर्ण ज्ञान होते. सर्प कात टाकतो त्याप्रमाणे शरीर जीर्ण झाल्यास जरा टाकून ते पुन्हा तरुण होत असत. त्यामुळे महाराजांचा चेहरा कधी कधी तरुण तर कधी वृद्धत्वाची झाक असलेला असा दिसत असे. तोच देह टिकवून महाराज आयुष्यवर्धन कसे करीत याविषयी थोडी कल्पना, श्रीअप्रबुद्ध यांनी ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्रात दिलेल्या माहितीवरून करता येते. शरीरावर वार्धक्य आले म्हणजे, पोटातील आतडी बाहेर काढून स्वच्छ धुतल्यावर परत आंत खेचून जागच्या जागी बसवीत. या क्रियेने 'जरा' नष्ट करून महाराज तारुण्यसंपन्न होत असत. असा प्रयोग महाराजांनी खानदेशात फिरत असता शिरपूर मुक्कामी केला होता. त्या वेळी चाळीसगाव (पश्चिम खानदेश) येथील वैद्य विठ्ठल जगन्नाथ पंडित यांचे आजोबा कै. बाळकृष्ण विठ्ठल पंडित, धर्माधिकारी हे उपस्थित होते. महाराजांनी आतील सर्व आतडी बाहेर काढून त्यावर पाणी टाकण्याकरिता कै. बाळकृष्ण पंडित यांना सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी पाणी टाकले. आतडी स्वच्छ धुतल्यावर पूर्ववत आत बसविली. पुण्याला श्रीमंत सरदार तात्यासाहेब रायरीकर यांचे घरी, योगी लोक आतडी काढून धुतात कशी, याचा प्रयोग महाराजांनी करून दाखविला. त्याप्रसंगी महाराजांचे एकनिष्ठ भक्त कै. विश्वनाथ नीळकंठ बापट हे स्वतः उपस्थित होते. परातीत आतडी धुतल्यावर, परत आत ओढतांना भोवतालच्या मंडळींच्या हलगर्जीपणामुळे धक्का लागून महाराजांस थोडा त्रास सोसावा लागला होता. संपूर्ण आतडी बाहेर काढून आत खेचण्याचा प्रयोग, अण्णासाहेब पटवर्धन यांना पुण्याला, संगमावरील 'बोडखा' नावाच्या एका उदासी साधूने करून दाखविला होता. हे

---

( मागील पानावरून )

इलेक्ट्रो कार्डिओग्राफला कोणी फसवू शकत नाही. तीन योग्यांच्या बाबतीत या यंत्राने हृदयाच्या क्रियेत विशेष फरक दाखविला नाही पण ज्या चवथ्या योग्याने आपण स्पंदन बंद करू शकत नाही. पण ते मंदावू शकते असे सांगितले होते त्याचे म्हणणे खरे असल्याचे सिद्ध झाले आहे. स्पंदनात ५॥ सेकंदाचा अवधी हा सुद्धा आश्चर्यकारक आहे, असे मानण्यात येते.

( नवशक्ती दि. १४ । २ । ६२ )

प्रयोग कसे केले जातात याची यथायोग्य कल्पना नसल्यामुळे शरीरशास्त्र जाणणाऱ्या अर्वाचीन विद्वानांना ते अविश्वसनीय वाटतात आणि म्हणून ते त्यांचा उपहास करतात. श्रीअण्णासाहेब पटवर्धनांनी पाहिलेल्या दोन प्रयोगांचा उल्लेख श्रीअप्रबुद्धांनी आपल्या पुस्तकात केला आहेच. या प्रयोगांविषयी बोलणे झाले त्या वेळी श्रीअप्रबुद्ध यांनीच अण्णासाहेबांना असे स्पष्ट विचारले होते की, "शरीराचे सर्व कातडे एकसंधी आहे हे तुम्हास माहीत आहे व तुम्ही स्वतः डॉक्टर आहा. असे असता असल्या प्रकारावर तुमचा विश्वास कसा बसतो ? डॉक्टर लोक मात्र या प्रकारास मूर्खपणात व लफंगेगिरीत काढतात." त्यावर अण्णासाहेब हसून म्हणाले की, "तशी ती वेगळी काढून स्वतंत्र दूर ठेवली जातात हा समजच मुळी चुकीचा आहे. ढेकूण वगैरे पाहण्याकरिता बाही उलटी करावी त्याप्रमाणे, तशी ती दोन्ही बाजूंनी कातडीशी एकसंध असताही, प्राण-शक्तीच्या जोराने बाहेर फेकली जातात आणि धुतल्यावर पुन्हा आकर्षित करून शरीरात व्यवस्थित रीतीने बसवून ठेविता येतात. हे मी स्वतः पाहिले आहे." आतडी बाहेर काढणे म्हणजे शरीरापासून अलग करावयाची, अशी काही तरी कल्पना झाल्यामुळे अर्वाचीन लोकांना ही गोष्ट पटत नाही.

श्रीअप्रबुद्ध यांनी केलेल्या उल्लेखासंबंधी अर्वाचीन योगविशारद श्री. कुवलयानंद स्वामी यांनी आपल्या 'योगमीमांसा'मधे असे म्हटले आहे की, "श्रीअप्रबुद्धांचे लिहिणे शरीरशास्त्राच्या विरुद्ध असल्यामुळे असंमजसपणाचे व भोळेपणाचे आहे." श्रीअण्णासाहेबांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या व स्वतःचा अनुभव म्हणून सांगितलेल्या या गोष्टी आहेत. श्रीअण्णासाहेब स्वतः आयुर्वेद आणि आंग्लवैद्यक या दोघांतही निष्णात होते, हीच गोष्ट स्वामी कुवलयानंद नेमकी विसरले असे दिसते. योगमीमांसामध्ये वरील उल्लेख येऊन बरीच वर्षे झाली. स्वामी कुवलयानंद हे थोर अधिकारी आहेत. दीर्घकालच्या अनुभवावरून मात्र आज त्यांना श्रीअण्णासाहेबांनी दिलेले स्पष्टीकरण पटलेले दिसते. कारण, यासंबंधी स्वामीजींकडे पत्र पाठवून मार्गदर्शनार्थ विनंती केली असता त्यांनी धाडलेल्या पत्रात ते म्हणतात, "But I should like to let you know my present view of the matter. It is possible to take out a small ending part of the colon, about a foot and a half, wash it and push it back into the abdomen, although this is a difficult feat. It is, however, within the reach of yogins who have developed themselves considerably." (Lonavala, letter dated the 12th Feb. 1961.) स्वामी कुवलयानंदांच्या म्हणण्याचा आशय असा आहे की, "मलाशयां-तील फूट-दीड फूट लांबीची आतडी बाहेर काढणे, धुणे आणि परत जागच्या

जागी बसविणे शक्य आहे. अर्थात ही क्रिया फार कठीण आहे. परंतु ज्यांनी योगाभ्यासात बरेच प्रावीण्य मिळविले आहे अशा योगी लोकांना मात्र ही क्रिया करणे शक्य आहे." वरील क्रिया करण्याकरिता कडक ब्रह्मचर्य आणि उत्तम तंतुबल असणे अत्यंत आवश्यक आहे.

सांप्रतच्या कालात, योगशास्त्राबद्दल अनुकूल ग्रह तर नाहीतच पण उलट, वाटेल तसे गैरसमज मात्र पसरलेले आढळतात. योगशास्त्र हे एक मोठे खूळ आहे असे सामान्य लोकांच्या तोंडूनही ऐकावयास मिळते. इतर भौतिक शास्त्रांप्रमाणे ते प्रायोगिक शास्त्र (Experimental Science) नाही म्हणून त्यावर नेहमी टीका केली जाते. परंतु, काचेच्या उपकरणांच्या साह्याने जसे विज्ञानांतील प्रयोग दाखविता येतात तसे योगाभ्यासात सांगितलेल्या क्रिया किंवा यम आणि नियम यांचे प्रयोग करून दाखविणे कसे शक्य आहे ? उदाहरणार्थ, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य किंवा अपरिग्रह हे जे मुख्य पाच यम आहेत त्यांचे प्रायोगिक दिग्दर्शन (Demonstration) करता येईल काय ? याचा विचार विद्वानांनीच करावा. योगातील निरनिराळे अभ्यास करीत असता साधकाला प्राप्त होणाऱ्या शक्ती (Powers) ह्याच, त्या शास्त्राची सत्यता पटविणारी प्रमाणे होत. योगशास्त्र हे अनुभव घेण्याचे शास्त्र आहे. जैन, बौद्ध, मुसलमानांचा सुफी पंथ किंवा अमेरिकेतील रोझाशियन पंथ यांनी योगशास्त्रांतील तत्त्वांचा अंगीकार केलेला आहे, ही गोष्ट त्या शास्त्राची महति पटविण्यास पुरेशी आहे. योगशास्त्राबद्दल, त्यातील ज्ञान गुप्त ठेवण्यात येते, म्हणून ओरड करण्यात येते. Sir Francis Younghusband ने म्हटल्याप्रमाणे (The holiest things in life are not bruited abroad in public.) जीवनातील अत्यंत पवित्र व आदरणीय गोष्टींबद्दल उघडपणे समाजात चर्चा किंवा प्रसार कोणी करीत नाही. म्हणूनच योगातील कितीतरी माहिती किंवा अनुभव गुप्त राखण्यात येतात. रामकृष्ण परमहंसांसारखे उघडपणे त्याचा उच्चार करून सांगणारे विरळा ! ‘ That the West has little to learn from present-day--India, I shall not trouble to deny." असे म्हणणाऱ्या Paul Brunton ने योगाविषयी काढलेले पुढील उद्गार चिंतनीय आहेत. पाश्चिमात्त्यांच्या पावलावर पाऊल टाकून योगावर टीका करणाऱ्यांना तर ते खासच मार्गदर्शक ठरतील. ‘ Grant that India has nodded and snored for centuries, grant that even today there exist millions of peasants in this land who suffer the same illiteracy, share the same outlook blended of peruile superstition and Kindergarten religion as did English peasants of the fourteenth century. Grant further the Brahmin pundits in native centres of learning waste their useless years

splitting sacerdotal hairs and drawing metaphysical wire as subtly as our medieval scholastics ever did. Yet there still remains a small but priceless residue of culture classified under the generic term Yoga, which proffers benefits to mankind as valuable bodies nearer the healthy condition which Nature intended them to possess, it can bestow one of modern civilisations most urgent needs-a flawless serenity of mind and it can open the way to enduring treasures of the spirit to those who will labour for them. I admit this great wisdom hardly belongs to India's present, but to her past, that this guarded knowledge of Yoga flourishes little today when once it must have had worthy professors and faithul students. It may be that the secrecy in which it was carefully enshrowded succeeded in killing all spread of this ancient science, I do not know." पॉल ब्रन्टनच्या म्हणण्याचा आशय असा आहे की, "गृहित धरा की भारत देश शतकानुशतके निद्रेत घोरत पडला असेल, या देशांतील लक्षावधी शेतकरी अशिक्षित असतील आणि आपल्या देशांतील शेतकऱ्यांप्रमाणे त्यांच्या धर्मांविषयीच्या श्रद्धा आणि कल्पना क्षुद्र किंवा पोरकट असतील; आणखी असेही गृहित धरा की आपल्या कडील मध्ययुगीन तत्त्वज्ञांप्रमाणे या देशातील ब्राह्मण पंडितांनी धार्मिक प्रश्नावर वितंडवाद करण्यात किंवा वेदान्तावर शाब्दिक कसरत करण्यात अनेक वर्षे व्यर्थ दवडली असतील, तरीही भारतीय संस्कृतीचा अत्यंत श्रेष्ठ व अमोल असा एक भाग अजून बाकी आहे आणि तो म्हणजे 'योग' हा होय. पाश्चात्य विज्ञानशास्त्राप्रमाणे योगानेही मानवजातीचे अनेक तऱ्हेने कल्याण होऊ शकते. मानवी शरीर निसर्गयोजनेप्रमाणे आरोग्यदृष्टचा सुदृढ स्थितीत राहून आधुनिक सुधारणेत, जिची आत्यंतिक गरज आहे, ती निर्दोष मन:शांती योगाने प्राप्त होऊ शकते. मी हे मान्य करतो की योगविद्या हे आजच्या भारताचे वैशिष्टच नसून ते पूर्वीच्या भारताचे आहे. योगविद्या आज जरी नष्ट झालेली दिसत असली तरी एके काळी तिचा सर्वत्र प्रसार झाला असला पाहिजे. कदाचित् योगाबद्दल जी एक प्रकारची गुप्तता राखण्यात येते त्यामुळे त्याचा सर्वत्र प्रसार होऊ शकला नसेल."

---

## प्रकरण चौथे

# गुरुपरंपरा

स्वामींचे वय आणि मूलस्थान यांच्याप्रमाणेच त्यांची गुरुपरंपरा हेही एक मोठे गूढ आहे. या ग्रंथात संशोधनात जास्त शिरावयाचे नाही असे धोरण आहे, तरी या विषयाची थोडीशी चर्चा करावयाची आहे. यासंबंधी ऐतिहासिकांचा घोटाळा काय होतो हे मागे जनार्दनस्वामी आणि चांदबोधले यांच्या उदाहरणावरून थोडे दाखविले आहे. या बाबतींत जी गोष्ट सहज लक्षात येते ती ही की, तर्क म्हटले तरी बहुतेक सर्वच ऐतिहासिकांचे तर्क, मूळ पाश्चात्त्यांनी उपयोगात आणलेल्या 'कल्पनांच्या रूढीं'ना धरूनच होत असतात. त्यांच्यात काही प्रामाणिकपणा, उदात्तता व आवश्यकता इत्यादींना जागाच नसते. असे होण्याचे मुख्य कारण हे आहे की आजच्या आमच्या धारणांवरून आम्ही तत्कालीन घटनांचे मूल्यमापन आणि मीमांसा करू पाहतो. बारीक विचार केला तर असे दिसून येते की, भारतीयांच्या इतिहासाचे पाश्चात्त्यांनी जे शास्त्र बनविले आहे, त्याचा मूळ सिद्धांतच मुळी प्रो. बन्सेनने म्हटल्याप्रमाणे 'आज जशा घटना घडतात तशाच त्या प्राचीन काळात घडत असल्या पाहिजेत' या गृहितकृत्यांवर आधारलेला आहे, त्यामुळे, आज ज्या गोष्टी लेखकाला रुचत नाहीत त्या गोष्टी, तिरस्करणीय वाटाव्या अशा रीतीने लिहिल्या जातात. श्रीतुकारामांना ब्राह्मणांनी विरोध केला, त्याच्या मुळाशी द्वेष आणि मूर्खपणा याशिवाय काही असणे शक्यच नाही, हा तर सिद्धांतच. ते विरोधकही, कदाचित, कांही पवित्र जबाबदारीच्या जाणिवेने प्रवृत्त झालेले असतील, अशी नुसती कल्पनाही इतिहासाच्या प्रांताच्या बाहेर आहे. आपल्या प्रस्तुत संबंधातच पाहावयाचे म्हटले तर चांदबोधल्याचा उल्लेख श्रीनाथांनी मुद्दामच गाळला असावा, कारण ते सुफी होते, अशी कल्पना सरळ मानली जाते. परंतु, नाथांच्या काळच्या विशिष्ट परिस्थितीमुळे देखील चांदबोधल्यांचे शिष्यत्व जनार्दनांचे गळचात बांधले जाणे शक्य आहे, अशी नुसती कल्पनाही अशक्य झाली आहे ! तो काळ, आजच्याप्रमाणेच, ब्रह्मद्वेषाचा होता आणि म्हणून, नाथांची परंपरा मूळ ब्राह्मणाची नाही, असे म्हणण्याचा अट्टाहासही केला असणे अशक्य आहे काय ?

तसे झाले असले तरी त्यांत अस्वाभाविकता व अद्भुतता काय आहे ? तो काळ ब्रह्मद्वेषाचा होता हे तर नाथ वाङ्मयावरूनच दिसते. प्रचलित समजुती-प्रमाणे, चांदबोधल्याच्या प्रेरणेने का होईना एकादशस्कंधावर टीका लिहिण्याचे एवढे मोठे काम करून श्रीनाथांनी भगवंताजवळ मागणे काय मागितले ? तर, **'तेथ म्यां ही केली विनंती । जे ये ग्रंथी ग्रंथार्थी होती । त्यासी ब्रह्मभावें ब्राह्मणभक्ति । नामीं प्रीति अखंड द्यावी ॥ तें न व्हावें ब्रह्मद्वेषीं । निंदा नातळावी तयासी ।'** असे मागणे केवळ निरर्थक असेल असे म्हणता येत नाही.

श्रीस्वामींच्या गुरुपरंपरेविषयी विचार करतानाही त्यांच्या विषयीच्या ज्या दोन कल्पना—की ते दत्तावतार होते अथवा श्रीगुरुचरित्राचे नायक नरसिंहसरस्वतीच होते—या दोन्ही कल्पना लक्षांत घेतल्या पाहिजेत. पहिली कल्पना प्रमाण मानली तर त्यांच्या गुरुपरंपरेची माहिती मिळणे केवळ अशक्यच आहे, हे या पुस्तकात, जे त्यांचे चरित्र वर्णिले आहे, त्यावरून दिसून येईल. ते श्रीगुरुचरित्रनायकच होते म्हटले तरी देखील हा प्रश्न पूर्णपणे सुटत नाही. कारण श्रीगुरुचरित्रावरून आपणास त्यांच्या संन्यासपरंपरेचा बोध होतो. परंतु या ग्रंथांत अन्यत्र सांगितल्या-प्रमाणे संन्यासपरंपरा हीच एक परंपरा आहे असे नाही. 'साधनानाम् अनेकता' हा वैदिक धर्माचा विशेष आहे व त्याला अनुसरून लोकसंग्रह करणाऱ्या महात्म्यांनी एका साधनाने देहसार्थक झाले असताही दुसरी अनेक साधने केल्याचे आढळते. अगदी आजच्या काळचे उदाहरण घ्यावयाचे म्हटले तर भगवान श्रीरामकृष्ण परमहंसांचे घेता येईल. स्वतः परिपूर्ण असूनही त्यांच्या उपास्यदेवतेच्या आदेशा-प्रमाणे त्यानी अनेक साधने केली आणि त्या त्या साधनांचे त्यांचे गुरु म्हणजे अर्थात् त्या गुरुपरंपराही वेगवेगळ्या होत्या. त्यांची परधर्मीय साधने टाकली तरी त्यांची उपासना श्रीरामाची होती. तिचे गुरु कनीराम हे होते. तंत्राची साधने त्यांनी केली ती भैरवी ब्राह्मणीच्या परंपरेप्रमाणे केली. योगाची साधने त्यांनी अशीच इतर परंपरेतून मिळविली. संन्यासाचे त्यांचे गुरू तोतापुरी होते, हे प्रसिद्धच आहे. तशीच गोष्ट इतर कित्येक महात्म्यांसंबंधी दाखविता येईल. संशोधनात या गोष्टीला काही महत्त्व आहे. आपल्या प्रस्तुत विषयासंबंधानेच पाहिले तर श्रीनरसिंव्हसरस्वतींनी काशी क्षेत्रात योगाभ्यास केला असे श्रीगुरु-चरित्रात म्हटले आहे. परंतु त्या विद्येचे गुरू कोण हे सांगितलेले नाही. परंतु गुरू असलेच पाहिजे. कारण गुरुपरंपरेशिवाय साधन प्रभावित होत नाही ही श्रद्धा आजही, बहुजनसमाजांत अढळ आहे. श्रीगुरू नरसिंह मंत्राने उपासना करीत असेही म्हटले आहे. या उपासनामंत्राची परंपरा कोठली हे कळणे अश-क्यच आहे. कारण, कित्येक वेळा, अशा गोष्टी 'गोपयेत् मातृजारवत्' या तांत्रिकांच्या आदेशाप्रमाणे गुप्त ठेविल्या जातात.

आळंदीच्या स्वामींसंबंधी, त्यांच्या बहुरंगी वागण्यामुळे, वस्तुतः निश्चित माहिती कळणे अशक्यच आहे. श्रीगुरुचरित्राचे नायक व ते एकच म्हटले तरी फक्त त्यांच्या परंपरेचाच बोध होतो व तसे पाहिले तर जास्त बोध होण्याची, जिज्ञासेपलीकडे आवश्यकताही नाही. म्हणून त्याविषयी जास्त न लिहिता फक्त एका समजुतीचा थोडा जास्त विचार करतो. 'गुरुपरंपरास्तोत्र' म्हणून एक स्तोत्र उपलब्ध आहे. प्रा. डॉ. दि. का. गर्दे यांनी श्रीस्वामींची पत्रे प्रसिद्ध केली आहेत; त्यात ते दिलेही आहे व या ग्रंथाच्या परिशिष्टांत ते आढळेल. त्याच्यामध्ये शेवटी असे म्हटले आहे की बद्रिकाश्रमवासी कोणा निरंजनाच्या वासुदेव नामक शिष्याचा अनुग्रह श्रीनरसिंव्हसरस्वतींना होता. त्यावरून श्रीस्वामींची परंपरा गुरुचरित्रांतील परंपरेहून भिन्न आहे असे वाटते. परंतु, एक गोष्ट लक्षात घेतली जात नाही की हे स्तोत्र खुद्द श्रीस्वामींचे नाही. त्यांच्या कोणातरी परंपरित शिष्याचे आहे. या स्तोत्रात, सरस्वतीसांप्रदाय, अथर्वणवेद, चैतन्यब्रह्मचर्य आणि अलकनंदा यांची जी गल्लत केली आहे; ती शृंगेरीमठांत उपलब्ध होणाऱ्या परंपरेच्या विरुद्ध आहे. तशीच दुसरी महत्त्वाची गोष्ट ही आहे की ही परंपरा 'योगपट्टा'ची आहे, असे स्पष्ट म्हटले आहे. (योगशास्त्ररतः सदा ॥) म्हणून तिच्याशी श्रीगुरुचरित्राच्या नायकाचा संबंध आहे असे म्हटले तरी गुरुचरित्राशी विरोध असण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे, श्रीस्वात्मसौख्य ग्रंथात असलेल्या परंपरेशीही विरोध येण्याचे कारण नाही. ती परंपरा मंत्रशास्त्राची आहे. या स्तोत्रातील परंपरा उपासनेची नाही, संन्यासपट्टाची नाही, योगपट्टाची आहे.

प्रकरण पाचवे

# भ्रमण

श्रीगुरुचरित्रकथानायक श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामी हेच, देहत्याग न करता पुढे प्रगट होणारे आळंदीचे स्वामी कसे, याविषयी यथामति विचार गेल्या दोन तीन प्रकरणात केला. श्रीशैलयात्रेचे निमित्त करून पूर्व चरित्रात महाराज गाणगापूरहून निघाले व तेथे कांही काल वास्तव्य करून कर्दळीवनाकडे निघून गेले. तेथून गुप्त होऊन पुढे हिमालयात प्रगट झाले. असे ऐकिवात आहे की हिमालयातून जो एक कानफाटयांचा तांडा खाली उतरला त्यांत महाराज होते. गुरुपरंपरास्तोत्रातील बद्रिकाश्रमाच्या उल्लेखावरून महाराजांचे वास्तव्य हिमालयात त्या भागात कोठे तरी असावे असे वाटते. त्यांच्या तेथील वास्तव्यासंबंधी माहिती मिळणे अशक्यप्राय आहे. हिमालयातून खाली उतरल्यावर यदृच्छेने स्वैर संचार करीत आसेतुहिमाचल अनेक वेळा प्रदक्षिणा करून जगदुद्धार करीत राहिले. वऱ्हाड, खानदेश, मालेगाव, पिंपळगाव इत्यादी ठिकाणी हिंडत हिंडत शके १७९५ मध्ये शेवटी आळंदीत आले व तेथेच पुढे बारा वर्षे राहिले. आळंदीत येण्यापूर्वी महाराज वऱ्हाडातील व खानदेशातील खेडोपाडी येऊन गेल्याची माहिती मिळते. एकदोन वर्षाआड त्यांची फेरी व्हायची. या संचारात महाराज एकाच वेषाने कधीच फिरले नाहीत. त्यांच्या बहुरंगीपणामुळे लोकांना त्यांची ओळख पटत नसे व त्यामुळे, त्यांच्याबद्दल सर्व प्रकारचे समज बाळगणारे लोक आजही कसे आढळतात, याविषयी थोडा विचार मागे केला आहेच. या भ्रमणात योग्य अधिकारी असा कोणी मुमुक्षु भेटल्यास, त्याला योग्य मार्गदर्शन करून त्याने योजलेल्याच मार्गाने पुढे नेऊन त्यास ते कृतार्थ करीत. महाराजांचे अनुग्रहित लोक ठिकठिकाणी आढळतात. ह्या भ्रमणकाळांत त्यांचे कोठे कोठे वास्तव्य झाले व त्यांनी तेथे काय काय लीला केली यांची समग्र माहिती मिळवून क्रमवार संकलित करणे ही गोष्ट केवळ अशक्यच आहे. ज्यांचा प्रत्यक्ष महाराजांशी संबंध आला त्यांनी, आजकालच्या पद्धतीप्रमाणे, आपल्या अनुभवाची नोंद ठेवलेली नाही. त्यामुळे इतिहाससंशोधकांच्या अपेक्षेप्रमाणे स्थल, काल आणि वेळ अशा तंत्राला धरून प्रस्तुत प्रकरणातील माहिती लिहिलेली नाही व तसा प्रयत्न करणे हे केवळ मानवी शक्तीच्या पलीकडचे काम आहे, हे कोणीही प्रांजळपणे कबूल करील.

## नैमिषारण्यातील गुहेत

पुराणात नैमिषारण्याचा बारंवार उल्लेख आढळतो. पौराणिक काळातले, नर्मदेच्या उत्तरेस व कुरुदेशाच्या पूर्वेस गोमती नदीजवळ असलेले जे वन, ते नैमिषारण्य म्हणून ओळखले जाते. ब्रह्मदेवनिर्मित चक्राची नेमी जेथे शीर्ण झाली व तपश्चर्येस योग्य जागा दाखविती झाली, ती जागा म्हणजे नैमिषारण्य होय. दुसरी एक व्युत्पत्ती या संबंधात आढळते ती अशी की, एका निमिषांत श्रीविष्णूने दैत्यसंहार केला ते नैमिषारण्य होय. ऋषि, मुनी, योगी यांना तप करण्यास योग्य असे हे वन आहे. श्रीगोंदवलेकर महाराज आपल्या वयाचे नववे वर्षी गुरूच्या शोधात हिंडत हिंडत नैमिषारण्यात गेले होते. गुरुप्राप्ती व अनुग्रह झाल्यावर पुढे ते तीर्थयात्रा करण्यास निघाले. दोन वर्षांपूर्वी त्यांनी नैमिषारण्यात (प्रथम प्रवेशाच्या वेळी) ज्या गुहेत वास्तव्य केले होते तेथेच या वेळीही राहिले. त्या गुहेत सहा योगी ध्यान लावून बसत असत. त्या सहा जणांपैकी एक महाराज होते असा उल्लेख प्रा. के. वि. बेलसरे यांनी लिहिलेल्या श्रीगोंदवलेकर महाराजांच्या चरित्रात आढळतो.

## श्री चिदंबर दीक्षित यांचे यज्ञात

महाराजांचे कर्नाटकात बराच काळ वास्तव्य असावे असे वाटते. त्यांच्या तिकडच्या वास्तव्यासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. व्यंकटरमणासारख्या कानडी वाटणाऱ्या शब्दावरून महाराज हे महाराष्ट्रीय नसून कर्नाटकी असावेत असा कित्येक विद्वान लोकांचा कसा चुकीचा समज झालेला आहे, हे आपण मागे पाहिलेच आहे. पेशवाईच्या अखेरीस शके १६८० ते १७३७ या कालात कर्नाटकातील 'गुर्लहोसर'– गुरुरायाचे नवे गाव-येथे श्रीचिदंबर दीक्षित या नावाचे एक महान सत्पुरुष होऊन गेले. श्रीचिदंबर दीक्षितांनी अग्निष्टोम नामक एक मोठा यज्ञ केला होता. त्या यज्ञप्रसंगी अनेक महात्मे – किमान नऊ – उपस्थित होते. श्रीअक्कलकोटचे स्वामी यांनी ह्या यज्ञांत तूप वाढण्याचे काम केल्याचा निर्देश त्यांच्या बोलण्यात वारंवार येई. त्यावरून अक्कलकोटचे स्वामी यज्ञप्रसंगी उपस्थित होते, त्यात महाराज हेही एक होते असे मिळालेल्या माहितीवरून दिसून येते.

## वीस वर्षांनी आठवण दिली

एकदा महाराज काशीयात्रेस जात होते. मार्गात चांगले गाव पाहून त्यांनी तेथे मुक्काम करण्याचे ठरविले. त्या गावात सदाचारसंपन्न, पवित्र, कुटुंबवत्सल आणि प्रेमळ ब्राह्मण राहत होता. महाराज त्याच्या घरी येऊन मृगाजिन टाकून बसले. मुलाबाळांसकट सर्वांनी महाराजांना नमस्कार केला व त्या सर्वांना महा-

राजांच्या दर्शनाने आनंद झाला. महाराज आले ती वेळ भोजनाचीच होती. म्हणून त्या ब्राह्मणाने भोजनास चलण्याची विनंती केली. महाराजांनी त्याची विनंती मान्य केली. मिष्टान्नाचा खास बेत होता. त्या ब्राह्मणाची सून वाढण्याचे काम करीत होती. ती परोपरीने आग्रह करून पदार्थ वाढत होती आणि महाराज नको नको म्हणत होते. स्वयंपाकातील एक पदार्थ संपुष्टात आला होता. तोच नेमका वाढ म्हणून म्हणू लागले. हे पाहून सून मनात म्हणाली, "संन्यासी स्वामी झाले पण रसनाविषयाला काही जिंकले नाही !" तिच्या मनांतील हे विचार अर्थात कोणालाच कळले नाहीत. भोजन समाप्त झाल्यावर महाराज निघून गेले.

वीस वर्षांचा दीर्घकाळ लोटला, फिरत फिरत महाराज त्या ब्राह्मणाच्या घरी पुन्हा आले. पण महाराजांना कोणीच ओळखले नाही. पूर्वीप्रमाणे या वेळीही महाराजांना भोजनास चलण्याची विनंती केली. पूर्वीची सूनबाई आता मोठी बाई झाली होती. वाढण्याचे काम तीच करीत होती. महाराज तिला उद्देशून म्हणाले, "आम्हांला ओळखले नाही काय ?" आणि, '**तोच स्वामी मी तव असे । संन्यासी झाले अजुनि कसे । रसना विषया नाही जिंकिलें ।। पूर्वी ऐसें मनीं आणिलें । वीस वर्षे असती झाले । स्मरण आपणा नसे राहिलें । पुन्हा आलो तोची स्वामी ।।**' अशा शब्दांनी आठवण करून देताच त्या बाईच्या चित्तात लख्ख प्रकाश पडला. वीस वर्षांपूर्वी तिच्या मनांत आलेले विचार महाराजांनी नेमके बोलून दाखविले. आपले आंतरगुज महाराजांनी कसे ओळखले याचे त्या बाईला फार आश्चर्य वाटले. तिने सर्व हकीकत आपल्या पतीस निवेदन केली. या प्रसंगाने ते सर्व कुटुंब महाराजांचे भक्त बनले. (नवसंत चरित्रावरून)

## लोकविलक्षण याचना

जगदुद्धारार्थ फिरत असता महाराज एकदा एका गावी, मराठे उपनावाच्या ब्राह्मणाच्या घरी गेले. मराठे विद्वान होते पण त्यांना अहंकाराने ग्रासले होते. त्यांच्या स्वभावात नम्रता नव्हती व अंगी अविद्येने ताठरपणा आला होता. काही तरी पूर्वसुकृत म्हणूनच महाराजांचे पाय त्यांच्या घराला लागले. महाराजांना पाहून मराठ्यांचा अहंकार जागृत झाला. 'कोण, कोठले, येण्याचे प्रयोजन काय ?' वगैरे प्रश्न त्यांनी महाराजांना विचारले. आणि त्याचबरोबर, "तुम्ही याचनेच्या उद्देशाने आला आहात. भिक्षा मागणे कोठला धर्म ? आंधळे, पांगळे, अनाथ यांना भिक्षा मागणे शोभते. तुमच्यासारख्या धष्टपुष्टास भिक्षा मागण्यास काय झाले ? येथून जाता की बोलावू नोकराला ?" इत्यादी उद्दामपणाचे शब्द बोलले. मराठ्यांना सर्वत्र अमंगल दिसत असे. महाराज काही न बोलता तेथून

निघून गेले पण लगेच परतून आले व म्हणाले, "वृथा कोपण्यास काय झाले ? तुमची सर्व सिद्धता वाया गेली. आम्ही याचना करण्याकरिता आलो खरे, पण ती कोणती हे मात्र तुम्हाला कळले नाही. द्रव्याची चाड आम्हाला नाही. धर्मरक्षणाचे कार्य आम्हाला प्रिय आहे. चित्त परमार्थी दृढ ठेवा हीच याचना करण्याकरिता आम्ही तुमच्याकडे आलो. अविद्या प्रवाही बुडणारे जन डोळयाने पाहवत नाहीत म्हणून आम्ही ठायी ठायी फिरत असतो. येतो आम्ही. आपला वेळ व्यर्थ जातो." असे म्हणून महाराज तेथून एकाएकी गुप्त झाले. मराठयांनी नंतर पुष्कळ शोध केला. पण व्यर्थ ! मराठयांना पाश्चात्ताप झाला. सर्व अहंकार पार लयाला गेला. घरी कामधेनू चालून आली; पण आपण कमनशिबाने तिला घालवून दिली, या घटनेचा मराठयांवर फार परिणाम झाला. ते संसारात उदासीन झाले. महाराजांनी केलेल्या उपदेशामुळे मराठे सन्मार्गास लागले. (नवसंत चरित्रावरून)

## प्रतिजालंदरनाथ

महाराज एकाचे येथे सहा महिने जालंदरनाथाप्रमाणे राहिले होते, ती कथा अशी. महाराज दोन प्रहरानंतर एकाचे घरी जाऊन त्याचे बायकोस म्हणू लागले की आम्हास भूक लागली आहे. तरी भोजन द्यावे. त्यावरून तिने विनंती केली की 'भोजने तर होऊन गेली. परंतु स्वयंपाक करून वाढते. तोपर्यंत आपण पलीकडे खोली आहे तीत बसावे.' ती खोली कडबा साठविण्याची जागा होती, कडबा संपला होता आणि त्याच दिवशी पुन्हा भरणा व्हावयाचा होता. महाराज जे त्या खोलीत शिरले, ते थेट शेवटच्या कोपऱ्यात बराच अंधार होता तेथे जाऊन निजले. योगायोग असा की इकडे कडब्याच्या गाडया त्याच वेळेस येऊन पोचल्या. तेव्हा घरच्या लोकांनी फारशी चवकशी न करता गाडीवानास खोलीत कडबा रचण्यास सांगितले. त्यांनी लवकर जाण्याच्या ओढीने निष्काळजीपणाने कडब्याच्या पेंढया आणून खोलीत फेकल्या. हां हां म्हणता सर्व खोली कडब्याने भरून गेली. इकडे ती बाई स्वयंपाक तयार झाला म्हणून महाराजांस सांगावयास आली. तो संन्याशी (महाराज) तेथे नाही. तेव्हा तिला ते गेले असे वाटून वाईट वाटले. पुढे ती गोष्ट तितक्यावरच राहिली. कालांतराने, रोज कडबा काढता काढता संपला. इतक्या अवधीत सहा महिने लोटले होते. कडबा संपल्यानंतर एकदा गरज पडली म्हणून एखादी पेंढीबेंढी शिल्लक आहे की काय हे पाहावे म्हणून घरमालक स्वतः आत जाऊन चाचपून पाहू लागला. तेव्हा त्याच्या हातास बसलेले महाराज लागले. तेव्हा घाबरून त्याने 'कोण रे ?' म्हणून विचारले. तेव्हा महाराज म्हणाले, "झाले कां जेवण तयार ?" मग पुढे खरा प्रकार ध्यानांत आला. तेणेकरून त्या गृहस्थास फार वाईट वाटले. त्याने महाराजांचे

पाय धरून घरात आणून पाटावर बसविले व स्वयंपाक करीत आहे, म्हणून सांगितले. परंतु तो स्वयंपाकघरांतून पुन्हा बाहेर येतो तो महाराज गेले होते निघून ! त्या गृहस्थाने महाराजांचा बराच शोध केला पण त्यास पत्ता लागला नाही. पुढे एकदा केव्हा तरी त्याचे घरी येऊन त्यास व त्याचे स्त्रीस अनुग्रह देऊन गेले.

## ब्रह्मास्त्राची कथा

मद्रासकडील एका कर्मठ ब्राह्मणास त्याच्या गुरूच्या कृपेने ब्रह्मास्त्र मंत्र मिळाला होता. ब्रह्मास्त्राचा प्रभाव प्रखर असल्याने अस्त्रवेत्ता पुरुष फारच यतचित्त लागतो. महाभारतीय युद्धाचे वेळी, अठरा अक्षौहिणी सैन्यातील प्रत्येक द्विज, गायत्रीमंत्राप्रमाणे ब्रह्मास्त्राने अर्घ्य देत असे. याप्रमाणे मंत्र सर्वांस ठाऊक होता. पण प्रयोग व उपसंहार यासह अस्त्र फक्त सात जणास ठाऊक होते. आजही हा मंत्र जाणणारे आहेत परंतु प्रयोग मात्र कोणास ठाऊक नाही. एकदा उपरनिर्दिष्ट ब्राह्मणाची त्याच्या भाऊबंदाशी जमिनीबाबत काही तेढ येऊन हायकोर्टात फिर्याद गेली. परंतु भाऊबंदाचे लबाडीमुळे निकाल त्याच्या विरुद्ध लागला. तेणेकरून त्याचे चित्तांत विक्षेप येऊन संतापवृत्ती जागृत झाली. तिचा परिणाम असा झाला की प्रतिपक्षाचे मुलांबाळांचा एकाएकी अंत होऊन त्या भाऊबंदाच्या अंगाची, विस्तव लागावा अशी आग होऊ लागली. कोणाचाही इलाज चालेना. तेव्हा हवालदिल होऊन प्राणोत्क्रमणाची वाट पहात बसला. इतक्यात पूर्वसुकृताने महाराज त्याच्या घराच्या ओटीवर येऊन बसले. घरांतील बाईने बाहेर येऊन नमस्कार करून स्वागत केल्यावर महाराजांनी भोजनास मागितले. तेव्हा, "आपण बसावे. मी भोजन तयार करून देते" असे ती बाई म्हणाली. त्यावर "दोन प्रहर झाले तरी अजून पाकाची तयारी नाही असे कां ?" असे महाराज म्हणाले. मग बाईने खरी हकीकत सांगितली. ती ऐकून महाराज म्हणाले, "काळजी करू नये. आम्ही याचा इलाज करतो. तीन चार घंटे लागतील तोपर्यंत स्वयंपाक करून खाऊ घालावे." इकडे तो ब्रह्मास्त्रवेत्ता आपले गावी असता, याच वेळी, त्याला कोणी धक्का मारून जबरदस्तीने घराबाहेर लोटत आहे, असे त्याला वाटले. धक्का फार जोरदार असल्यामुळे इलाज न चालून तो घराबाहेर पडला. इकडे तिकडे न करता सरळ त्याच्या भाऊबंदाच्या गावची वाट त्या धक्क्याने त्याला लावली, व एखाद्या दौडणाऱ्या घोड्यापेक्षा जास्त गतीने त्याला धावत त्या गावात आणले. तो इसम जरा हळू चालू लागला की त्याला मार बसे. पळतांना जमीन देखील दिसत नसे, इतक्या वेगाने पळत आला. सुमारे तीन चार तासाने तो प्रतिपक्षाच्या दाराशी येऊन उभा राहिला. मग महाराजांनी त्यास आत हाक मारून म्हटले, "चांगला उपयोग केलास

बाबा ! गुरूने एवढ्याकरता का दिले अस्त्र ?" तेव्हा, त्याचे लक्षात सर्व प्रकार येऊन पश्चात्ताप झाला आणि महाराज कोणी तरी फार मोठे अधिकारी आहेत असे जाणून त्याने त्यांची क्षमा मागितली. तेव्हा महाराज त्या आसन्नमरण माणसास म्हणाले, "तुमच्या लबाडीबद्दल तुम्हास चांगले शासन झाले. आता जिवाची आशा असली तर ब्राह्मणास शेताचे परत खत करून द्यावे." तेव्हा त्याने लगेच तसे केले. मग महाराजांनी त्या ब्रह्मास्त्रवेत्त्यास सांगितले की हातात पाणी घेऊन आमचे मागे यावे. पुढे, त्यास गावाबाहेर शमीच्या झाडाजवळ नेऊन, शमीच्या पायाशी ब्रह्मास्त्र दान कर, म्हणून सांगितले. हे ऐकून त्या गृहस्थास फार वाईट वाटले. पण महाराजांपुढे बोलण्याचा धीर होत नव्हता. मुकाट्याने त्याने अस्त्रदान केले. याप्रमाणे सर्व मंत्र परत टाकला व ते अस्त्र त्याचे जवळून नाहीसे झाले. ब्रह्मास्त्र जाणणाऱ्या माणसाची व श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांची पुढे भेट झाली होती. त्यानेच वरील सर्व हकीकत सांगितली आणि ब्रह्मास्त्राची पोथी पण अण्णासाहेबांस दिली होती.

वरील हकीकतीवरून एक गोष्ट लक्षात येईल की शमीच्या अंगी अस्त्रे सांभाळण्याचे सामर्थ्य आहे. पांडवांनी अज्ञातवासात जाण्यापूर्वी शमीच्या झाडावर आपली शस्त्रास्त्रे बांधून ठेवली होती. त्याचे कारण हेच होय.

## पिठले-भाकरीच्या पंगतीत

श्रीभक्त महादेव अनंत उर्फ दादा दांडेकर हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. अगदी लहानपणापासून यांचे आयुष्य महाराजांच्या सेवेत गेले. यांचे त्रोटक पण स्वतंत्र चरित्र, पुढे प्रभावळ या प्रकरणात दिले आहे. दादा दांडेकर हे वऱ्हाडात परतवाडा येथे मास्तर होते. त्यांचा मोठा मुलगा सदाशिव महादेव उर्फ बापू हा मौंजीच्या वयाचा झाला तेव्हा दादास त्याच्या मौंजीची चिंता उत्पन्न झाली. एके दिवशी, परतवाड्यास महाराज त्यांचेकडे आले असता दादांनी मौंजीची गोष्ट त्यांचेजवळ काढली. महाराजांनी प्रत्यक्ष द्रव्य साहाय्य दादांना केले नाही. परंतु खोलीतून दूरवर दिसणारा एक मरतुकडा घोडा धरून आणण्यास दादांना महाराजांनी सांगितले. त्याप्रमाणे दादांनी तो घोडा धरून आणला. एखादा दिवस खाऊ घातल्यावर, परतवाड्यास लष्करी छावणीमध्ये, व्हिक्टोरिया राणीच्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या घोड्यांच्या शर्यतीत भाग घेण्याकरिता तो घोडा घेऊन जाण्यास, महाराजांनी दादास सांगितले. त्याप्रमाणे दादांनी शर्यतीत भाग घेतला. आश्चर्य हे की त्या मरतुकड्या घोड्याचा अनुक्रम विजयी घोड्यात दुसरा आला. त्याप्रीत्यर्थ दादांना सुमारे ६० रुपये बक्षीस म्हणून मिळाले. त्या काळी इतक्या थोड्या पैशात मौंज करणे कठीण नव्हते. नंतर बापूची मौंज करण्याचे ठरले. ती मौंज परतवाड्यास न करता दादांचे बंधु हरी अनंत दांडेकर,

वर्धा जिल्ह्यांतील केळीवेळी या गावी शिक्षक होते, यांचेकडे झाली. मौंजीस अर्थात् महाराजांस आमंत्रण होते. त्याच वेळी महाराजांनी दादांना असे सांगितले होते की मौंजीस आम्ही आलो तरी तुझे घरी जेवणार नाही; पण दादांच्या कुटुंबाने विशेष आग्रह धरला तेव्हा, तुझे घरी पिठले भाकरी खाईन असे आश्वासन दिले.

पुढे मौंज लागली त्या दिवशी महाराज केळीवेळीस आले. त्या प्रसंगी त्यांचा पोषाख प्रवासी थाटाचा असून त्यांच्याबरोबर एक घोडा व एक काळा कुत्रा होता. महाराज तेथे आल्यानंतर कुत्र्यास बरोबर घेऊन ब्राह्मणांकरता वाढलेल्या एका पानावर जाऊन बसले. ब्राह्मणांच्या पंगतीत कुत्रा पाहून, इतर लोकांनी ओरड केली. प्रत्यक्ष दादांनी तर महाराजांना हात धरून पानावरून उठविले. पण महाराज न रागावता घराच्या मागच्या बाजूस, लाकडे फोडणाऱ्या लोकांकरिता पिठले भाकरीची पंगत बसली होती, त्यात जाऊन बसले. वाढण्याचे काम स्वत: दादांच्या पत्नीच करीत असल्यामुळे त्यांनी महाराजांस ताडबतोब ओळखले आणि दादांना महाराज तेथे असल्याबद्दल कळविले. दादांनी महाराजांना घरात आणले व आपण त्यांना ओळखले नाही म्हणून खेद प्रदर्शित केला.

## गाविलगड किल्ल्यातून मुक्तता

इ. स. १८५७ च्या बंडानंतर सर्वत्र धरपकड सुरू झाली. बंडवाल्या लोकांबरोबर साधु, बैरागी, संन्यासी. अशाही लोकांना, संशयित व्यक्ति म्हणून कंपनी सरकारने पकडण्याचा सपाटा सुरू केला. त्याला तसेच कारणही होते. बंडात भाग घेणारे कित्येक लोक आपण पकडले जाऊ नये म्हणून वेष पालटून साधुसंन्याशी बनले होते. त्या सुमारात वऱ्हाडात जी सार्वत्रिक धरपकड झाली तींत महाराज व त्यांच्या सहवासांत नेहमी असणारे दादा दांडेकर हे दोघेही पकडले गेले. त्यांना वऱ्हाडातील चिखलदरा येथील इतिहासप्रसिद्ध गाविलगड नामक किल्ल्यात कोंडण्यांत आले. ज्या ठिकाणी या दोघांना ठेवण्यात आले होते, त्याच ठिकाणीं आणखी एक तिसरा इसमही होता. बंदिवासाचा कंटाळा आला व कोठडीत रात्रीच्या वेळी बरे वाटेना. तेव्हा एके दिवशी रात्री ३॥–४ वाजताचे सुमारास महाराज दादांना म्हणाले, "दादा आपल्याला येथे राहण्याचा कंटाळा आला. आपले सामान गुंडाळ. आपण चालले जाऊ." महाराजांची आज्ञा ऐकून दादांनी सामान गुंडाळले व बाहेर पडण्याची तयारी केली. हे लोक खरेच जाणार असे वाटून खोलीतील तिसरा इसम महाराजांस म्हणाला, "महाराज, बाहेर अंधार फार. जंगलाचा रस्ता व जंगली जनावरांची भीती. तेव्हा तुम्ही कसे जाणार ?" हे ऐकून महाराज म्हणाले, "आमचेकरिता बाहेर घोडे

तयार आहेत." त्यावर तो तिसरा इसम पुन्हा म्हणाला, "मग महाराज मी येऊ कां ?" महाराज म्हणाले, "येणार असलास तर ये. पण मला जास्त विचारायचे नाही व मी सांगेन ते ऐकले पाहिजे." हे सर्व त्या इसमाने कबूल केले. याप्रमाणे बोलणे झाल्यावर तिघे बाहेर जाण्यास सिद्ध झाले. पाहतात तो सर्व पाहरेकरी गाढ झोपलेले व सर्व दरवाजे उघडे. तेव्हा त्यांना अडविणार तरी कोण ? हा देखावा पाहून तो तिसरा इसम आश्चर्यचकित झाला. बाहेर पडतात तो एक इसम दोन घोडे व एक मशाल घेऊन उभा होता. हे पाहून तर त्या तिसऱ्या इसमास अधिकच नवल वाटले. नंतर महाराज म्हणाले, "मी एका घोड्यावर बसतो व दुसऱ्या घोड्यावर दादा बसेल. त्याच्यामागे डोळे मिटून तू त्याला धरून बैस." याप्रमाणे दोन घोड्यांवर तिघेजण स्वार झाले. रस्ता जंगलाचा; पण घोडे इतक्या वेगाने निघाले की उजाडण्याचे आंत ते परतवाड्यात, महाराजांचे शिष्य रा. बापूसाहेब सोहळे वकील (बहिरे) राहत होते त्यांचे घरी आले. महाराजांनी बापूसाहेबांस सांगितले की आम्हाला सूर्योदयापूर्वी उमरावतीस जाणे आहे. पुन्हा पूर्ववत ते तिघेही घोड्यावर बसले व घोडे चालू लागले. दिवस निघण्याचे आत ते तिघेही उमरावतीत दाखल झाले. गाविलगड ते उमरावती हे अंतर सुमारे ६५ मैलांचे आहे. एवढे अंतर तीन तासात घोड्यावरून येणे शक्य नाही असे वाटून त्या तिसऱ्या इसमाने महाराजांस म्हटले, "महाराज, आपण येथपर्यंत तर आणले पण पुन्हा मी पकडला गेलो तर काय करू ?" तेव्हा महाराज त्यास म्हणाले, "तू येथेच राहिलास तर ईश्वर तुला सांभाळील." नंतर महाराज जवळच दत्तमंदिरात उतरले व हा तिसरा इसम, त्यास उतरवून दिले होते त्या ठिकाणीच अखेरपर्यंत राहिला. पुढे त्याने तेथेच समाधी घेतली. वरील हकीकतीतील तिसरा इसम म्हणजे 'विठ्ठलगीरबुवा.' त्यांची समाधी उमरावतीस श्रीनारायणाचे मंदिरात आहे.

## ज्ञानेश्वरीवर प्रवचन

अमरावतीपासून सुमारे ६ मैलावर असलेल्या वलगाव जहागीर पासून दोन मैलावर रेवसा नावाचे एक खेडे आहे. रेवसा येथे एक मठ आहे. या मठात एक संन्याशी राहत असे. तो विद्वान् नव्हता. परंतु ज्ञानेश्वरी मात्र नियमाने वाचीत असे. त्या मठात महाराज जवळ जवळ दोन महिने राहिले होते. जडचर्येप्रमाणे आपल्याला काही येते असे त्यांनी मुळीच दाखविले नाही. एके दिवशी तेथून निघून जावे असे महाराजांच्या मनात आले. तेव्हा त्या संन्याशाजवळून ज्ञानेश्वरीचे पत्र मागून घेतले व आपण आसनावर बसून न्याय आणि वेदान्त यांना धरून ज्ञानेश्वरांचे म्हणणे कसे खरे आहे यावर दोन अडीच तास सतत प्रवचन केले. हे पाहून बिचारा गरीब मठाधिपति स्वामी तर ढळढळा रडून शोक करू

लागला. त्याने परोपरीने तेथे राहण्याकरिता विनविले. मात्र महाराज त्या रात्रीच तेथून निघून गेले.

## श्रीऋणमोचनस्तोत्र रचना

वऱ्हाडांत उमरावती तालुक्यात ऋणमोचन नावाचे एक यात्रेचे ठिकाण आहे. हे गाव पूर्णा नदीच्या काठी असून हिंदूंचे एक पवित्र स्थान समजले जाते. पौष महिन्याच्या प्रत्येक रविवारी येथे मोठी यात्रा भरते. यात्रेच्यावेळी पूर्णा नदींत या क्षेत्री स्नान केल्याने मनुष्याची सर्व प्रकारच्या ऋणातून मुक्तता होते अशी श्रद्धा आहे. महाराजांनी येथील वास्तव्यात श्रीऋणमोचन–स्तोत्र रचले. हे स्तोत्र संस्कृतमध्ये असून त्यात २५ श्लोक आहेत. या स्तोत्राच्या नित्य पठणाने, इहलोकी मनुष्य केवळ आर्थिक ऋणातून मुक्त होतो असे नाही तर जन्मल्यापासून मरेपर्यंत त्याला जे जे ऋण फेडावयाचे असते, त्या सर्व ऋणातून त्याची मुक्तता होते, अशी या स्तोत्राची फलश्रुती आहे. हे स्तोत्र पूर्वी, 'गाणगापूर साक्षात्कार' या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीत छापले होते. जिज्ञासू भाविकांच्या उपयोगाकरिता ते ह्या पुस्तकाच्या परिशिष्टांत दिले आहे.

## महाराजांना ओळखणे कठीण

दादा दांडेकर हे महाराजांच्या सहवासात लहानपणापासून आल्यामुळे त्यांना असा अहंकार झाला होता की महाराजांना ओळखणारा व त्यांची सेवा करणारा जर खरा कोणी असेल तर तो मी एकच ! महाराज नेहमी म्हणत की 'दादा, तू आम्हाला ओळखत नाहीस.' महाराजांनी दादांना सांगितले की 'मी तुझी प्रचीति पाहीन. सांभाळून ठेव.' त्याच महिन्यात, महाराज दादांसह दारव्हा तालुक्यात हिंडत असता त्यांचा मुक्काम लाडखेड येथे पडला. त्या दिवशी वैकुंठ चतुर्दशी होती. गावाबाहेर एक महादेवाचे मंदिर असून त्या काळी तेथे जंगलही फार होते. महाराज रात्री दादास म्हणाले, "आज वैकुंठ चतुर्दशी आहे. रात्रौ बारा वाजता महादेवाच्या देवळात जाऊन महादेवाची पूजा कर. मात्र एवढे कर की घाबरू नकोस." त्याप्रमाणे दादा पूजेचे साहित्य घेऊन गेले. देवळात जाऊन तबक खाली ठेवून पूजा करणार तोच एक भला मोठा सन्नाटा अस्वल कोपऱ्यांत दिसला. त्याला पाहून दादांची पाचावर धारण बसली व पूजासाहित्य फेकून पळत दादा महाराजांपाशी आले. महाराज म्हणाले, "कां रे, घाबरलास !" त्यावर दादा म्हणतात, "केवढा मोठा अस्वल...... !" तेव्हा महाराज म्हणाले, "हात् बेट्या, अखेरीस आम्हाला ओळखलेच नाही ! अरे, आम्ही काय नेहमी नेहमी मनुष्यच व्हावे ? दुसरा देह धरू नये काय ?" मग दादांचे ध्यानात आले की महाराजांस ओळखणे फार कठीण आहे. तेव्हापासून त्यांचा अहंकार पार लयास गेला.

श्रीगुरुचरित्र वाचकांना वरील कथा वाचून एकेचाळीसाव्या अध्यायातील श्रीगुरुसेवेस राहिलेल्या सायंदेवाच्या कसोटीची आठवण होईल. श्रीगुरूंनी स्वतःच्या शक्तीने वादळ निर्माण करून थंडी वाजण्याचे निमित्त केले आणि गाणगापुरातून अग्नि आणण्याकरिता सायंदेवास पिटाळले व परत येताना इकडे तिकडे न पाहता सरळ परत येण्यास सांगितले. श्रीगुरूंनी असे का सांगितले हे मनात येऊन, मनुष्यस्वभावास अनुसरून त्यांनी नको म्हटले असता देखील, संगमाकडे परत येताना आपल्या दोन्ही बाजूस पाहिले. बिचाऱ्या सायंदेवाची भीतीने तर गाळणच उडाली. त्याचे दोन्ही बाजूस प्रचंड नाग होते. जीव घेऊन पळत तो श्रीगुरूपाशी आला. त्याच्या रक्षणाकरिताच श्रीगुरूंनी नागाची योजना केली होती. पण हे सर्व सायंदेवाला समजणार कसे ! परमेश्वराला ओळखणे काय सोपे आहे ? त्याला ओळखण्याकरिता दृष्टीही परमेश्वरानेच दिली पाहिजे. चर्मचक्षूंनी त्याला ओळखणे कठीण !

## श्रीमद्भागवताची अमोल देणगी

महाराज वऱ्हाडात हिंडत असता, कन्हेरगाव जवळील पैनगंगेच्या तीरावरील एका खेड्यात, पिंपळाचे झाडाखाली तीन दिवसपर्यंत समाधी लावून होते. समाधी उतरल्यावर पंचभौतिक देहधर्माप्रमाणे क्षुधा उत्पन्न झाली. पैनगंगेत स्नान करून लवकर भोजन मिळावे म्हणून शोध करीत करीत अचानक वाशीम येथे आले. त्या वेळी सकाळचे नऊ साडेनऊ वाजले होते. माहूर वेशीजवळ राहणारे श्री. गांडागोळे याचे घरी, या वेळेस भोजन कोठे मिळेल, म्हणून महाराजांनी चौकशी केली. श्री. गांडागोळे यांच्या सांगण्यावरून ते, प्रल्हाद अण्णा लोथे गिरोलीकर यांचे राहाते घरी उपस्थित झाले व पुडी घेऊ म्हणाले. प्रल्हाद अण्णांची ती भोजनाचीच वेळ होती. त्यांची पूर्वपुण्याई थोर म्हणून महाराज त्यांच्या घरी आले ! महाराजांची ती दिव्य मूर्ती पाहून अण्णांना अत्यानंद झाला.

महाराजांचे, प्रल्हाद अण्णांच्या घरी तीन दिवस वास्तव्य होते. महाराजांनी कृपावंत होऊन अण्णांना श्रीमद्भागवताचा प्रसाद व त्यावर प्रवचन करण्याची अलौकिक देणगी दिली. तेव्हापासून प्रल्हाद अण्णांची, अखिल विदर्भात, श्रीभागवताबद्दल फार प्रसिद्धी झाली. या मुक्कामात महाराज प्रल्हाद अण्णांना म्हणाले, "वेदान्तसूत्र भाष्य तू का सांगत नाहीस ?" तेव्हा अण्णा म्हणाले, "आपल्यासारखा समर्थ पुरुष समोर असल्याशिवाय मला सांगण्याची बुद्धी होत नाही." "संन्यासधर्माप्रमाणे मला स्थिर राहता येत नाही." असे सांगून महाराज प्रल्हाद अण्णांचे घरून निघून गेले. अधून मधून महाराजांची व अण्णांची भेट होत असे. असेच एकदा, उमरावतीस, श्रीनारायण मंदिराचे समोरील पिंपळाच्या



'सत्-स्वरूप' श्रीमहाराज



' चित्-स्वरूप ' श्रीमहाराज

झाडाखाली भेट होऊन दोघांचा सहवास झाला होता. महाराज आळंदीत स्थिर झाल्यावर प्रल्हाद अण्णा त्यांच्या दर्शनाकरिता गेले होते. त्या वेळी अण्णा त्यांचे सहवासात सात दिवस राहिले होते. प्रल्हाद अण्णांनी पुढे संन्यास दीक्षा घेतली. त्यांचे चतुर्थाश्रमातील नाव 'श्रीसच्चिदानंद सरस्वती' असे होते. प्रल्हाद अण्णा वऱ्हाडात गिरोली येथे शके १८३७ मध्ये समाधिस्थ झाले.

## ही पोरगी आम्हाला आवडते

वाशीमहून महाराज रिसोडगावाबाहेरील श्रीसिद्धेश्वर मंदिरात दोन दिवस थांबून त्याच मार्गे लोणारला पोचले. त्या वेळी लोणारमध्ये श्रीसच्चिदाश्रम नावाचे एक संन्यासी राहत असत. त्यांना योगाभ्यास शिकविण्याच्या निमित्ताने महाराज सुमारे एक वर्षपर्यंत लोणारला राहिले होते. श्रीसच्चिदाश्रम स्वामींचे त्रोटक चरित्र 'प्रभावळ' या प्रकरणात दिले आहे. महाराजांची या काळात स्थिती बालोन्मत्तपिशाच्चवत् अशी होती. त्यांची व सच्चिदाश्रम स्वामींची भेट झाल्यावर त्या स्वामींनी, लोणारपासून सहा मैलावर वेणी गावी राहणारे वामन अप्पा किबहुने यांना तातडीने महाराजांचे दर्शनास येण्याकरिता निरोप पाठविला. वामन आप्पांचा परमार्थाकडे कल होता व ते श्रीसच्चिदाश्रम स्वामींचे शिष्य होते. निरोपाप्रमाणे वामन आप्पा लोणारला आले. महाराजांचे दर्शन घेतल्यावर त्यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की महाराजांनी वेणीस त्यांचे येथे भोजनास यावे. श्रीसच्चिदाश्रम स्वामींनी वामन आप्पांची इच्छा महाराजांजवळ बोलून दाखविली. महाराजांनी, दुसरे दिवशी सकाळी पुढीकरीता त्यांचे येथे येण्याचे कबूल करून वेणी गाव कोणत्या दिशेला आहे, इत्यादी माहिती विचारून घेतली. वामन आप्पा त्याच दिवशी वेणीला परत गेले व भोजन-प्रसंगाच्या तयारीस लागले. गावातील काही प्रतिष्ठित मंडळींना पंगतीस आमंत्रण दिले होते.

दुसरे दिवशी सकाळी दहा वाजता भोजन–प्रसंग होता. पुरणा–वरणाचा थाट होता. भोजनाची वेळी झाली, पण महाराजांचाच पत्ता नव्हता. मंडळी वाट पाहत होती. माध्यान्हाची वेळ झाली. शेवटी वामन आप्पांनी माणसे शोध करण्याकरिता लोणारच्या रस्त्याने दवडली. इकडे महाराज व सच्चिदाश्रम स्वामी असे दोघेजण वेणीच्या रस्त्याने निघाले. थोडे अंतर गेल्यावर महाराजांनी वेणी कोणत्या दिशेस आहे म्हणून स्वामींना विचारले आणि मुख्य वाट सोडून आडवाटेने फिरत फिरत वेणी गावाच्या पश्चिमेस सुमारे एक फर्लांग अंतरावर असलेल्या महादेवाच्या देवळात येऊन पोचले. 'वामन आप्पा वाट पाहत असतील. भोजनाची वेळ तर टळून गेली आहे.' असे विचार स्वामींच्या मनात

येऊ लागले. पण करणार काय ? ते तसेच स्वस्थ राहिले. महाराज म्हणाले, "त्यांना गरज असेल तर ते येथे बोलवावयास येतील." महाराज देवळात येऊन बसले ही गोष्ट वामन आप्पांना कळणार कशी, असे वाटून स्वामींनी वाटेने जाणाऱ्या दोन गुराख्यांबरोबर असा निरोप पाठविला की, "दोन गोसावी महादेवाच्या देवळात आले आहेत." निरोप मिळताच वामन आप्पा काही प्रतिष्ठित मंडळींसह त्यांना घेऊन येण्याकरिता निघाले. देवळात पोचल्यावर महाराज वामन आप्पांना म्हणाले, "काहो, तुम्ही आमची तिकडे वाट पाहिली असेल, पण आम्ही नेहमीच्या वाटेने जाणारे नाही. आडमार्गानेच जाणारे आहोत." अशा तऱ्हेचे बोलणे होऊन सर्व मंडळी वामन आप्पांच्या घरी आली. महाराजांचे स्नान झाल्यावर दोन्ही स्वामींची मंडळपूजा झाल्यावर पंगतीस सुरुवात झाली. पंगतीत कोणी काहीच बोलत नव्हते. महाराजांसमोर कोण काय बोलणार? शेवटी महाराजांनी वाढण्याचा आग्रह सुरू केला. "घ्या. सच्चिदाश्रम स्वामी पोळी घ्या.", "अहो, नको !", "घ्या नरसिंव्हसरस्वती घ्या.", "अर्धी पोळी तरी घेतलीच पाहिजे." अशा तऱ्हेचा स्वतःच स्वतःला आग्रह करीत, थट्टाविनोद करीत पंगत संपली. भोजनानंतर महाराजांनी विश्रांती घेण्यास सुरवात केली. त्या वेळी त्यांनी वामन आप्पांच्या संततीबद्दल चौकशी सुरू केली. वामन आप्पांना पाच मुली होत्या. अहिल्या, काशी, भागीरथी, गंगा व मंदाकिनी अशी त्यांची नावे होती. क्रमाक्रमाने अहिल्या, काशी आणि भागीरथी ह्या तिघींना "तुम्ही काही आम्हाला आवडत नाही." असे महाराज म्हणाले. मग आली गंगेची पाळी. "ही पोरगी आम्हाला आवडते," असे म्हणून महाराजांनी तिला पाय देऊन आपले अंग चेपावयास सांगितले, व मोठ्या प्रेमाने आपल्या मांडीवर बसवून घेऊन "संसारात लक्ष ठेवू नकोस, कशातच तथ्य नाही, हे आमचे म्हणणे लक्षात ठेव बरे." असे गंगेला उद्देशून म्हणाले. वामन आप्पांनी गंगेला महाराजांच्या अंगावर पाय न देता हातांनीच अंग चेपण्यास सांगितले. गंगा यावेळी ५–६ वर्षांची परकरी पोर होती. वामन आप्पा नको म्हणत असता महाराजांनी तिच्याकडून आपल्या अंगावर पाय देववून अंग चेपवून घेतलेच.

दुसरे दिवशी सकाळी निघताना महाराजांनी पूर्वीप्रमाणेच सांगितले की, "संसारात कशातच मन ठेवू नकोस बरे." व आपल्या पायातील खडावा तिला दिल्या. महाराज तिला म्हणाले, "या खडावा चुलीत घाल." त्या पाचसहा वर्षाच्या मुलीला काय समजत होते ! तिने खरोखरच त्या खडावा चुलीत नेऊन घातल्या. वामन आप्पांनी त्या लगेच काढून पुसून घेतल्या व देवपूजेत ठेवल्या.

योगायोग असा की महाराजांना आवडलेली गंगाबाई पुढे संसारात खरोखरच सात्त्विक व धार्मिक प्रवृत्तीच्या निघाल्या. त्यांना चार मुले झाली.

बाबाशास्त्री, गोपाळशास्त्री, प्रल्हादशास्त्री आणि पुरुषोत्तमबुवा. हेही आपल्या मातोश्रीप्रमाणेच धार्मिक प्रवृत्तीचे निघाले. बाबाशास्त्री व गोपाळशास्त्री आज हयात नाहीत. प्रल्हादशास्त्री हे साखरखेर्डा येथे वास्तव्य करून आहेत. त्यांना प्रल्हादमहाराज या नावानेच सर्वजण या भागात ओळखतात. पुरुषोत्तम बुवाही मेहकरला असून तेथील श्रीबालाजीची सेवा करतात.

## समदृष्टी

ज्याचे चित्त शुद्ध झाले आहे अशाला व्याघ्र, सिंह, सर्प, विंचू इत्यादि प्राण्यांपासून भय कसचे ? 'समविषमभावशून्यता' ज्याच्या ठिकाणी उत्पन्न झाली आहे, अशा पुरुषाला कोण बाधा करू शकणार ? एकनाथांना डंख करावयास आलेला काळरूपी सर्प कृपाळू झाला. (तंव तो काळचि जाला कृपाळ।) तुकाराम महाराज म्हणतात, "**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र ही न खाती सर्प तया ।।**" सर्वांभूती समदृष्टी झाल्याने सत्पुरुषाचे पशुपक्षादिकांचे ठायीही तादात्म्य होते. "**मग तो प्राणीभूत । जगाला मानी आप्त । आणि मग तेही मानिती त्याते । सखा सोईरा कीं आमुचा ।।**" अशी स्थिती त्या सत्पुरुषाची होते. अशीच एक गोष्ट प्रत्यक्ष माझ्या आजीने पाहिल्याचे माहीत आहे. महाराज वऱ्हाडात फिरत असता, बुलढाणा जिल्ह्यातील देऊळघाट या गावी एका देवळात सुमारे दोन महिने त्यांचे वास्तव्य होते. त्याच देवळाच्या दुसऱ्या अर्ध्या भागात, आजोबा आपल्या कुटुंबासह राहत असत. त्या वेळी आजोबा शाळामास्तर होते. रोज रात्री देवळात मोठे सुंदर भजन होत असे. महाराजांचा भजनास बसण्याचा नित्यक्रम असे. त्या देवळात एक मोठे हरीण होते. भजनाचे वेळी व एरव्हीही महाराजांची व त्या हरिणाची मोठी गट्टी जमत असे. पण त्यातल्या त्यात, भजनाचे वेळी अशी मौज होत असे की भजन सुरू होऊन 'श्री विठ्ठल' 'श्री विठ्ठल' थोडा वेळ कानी पडले की हरिणाच्या तंगड्या महाराजांचे गळ्यात आणि यांचे हात त्याच्या गळ्यात पडत आणि दोघांचीही तासन्तास समाधी लागत असे. अशा वेळी प्रेक्षकास त्या हरिणाच्या भाग्याचा हेवा करावा की, महाराजांच्या सहजसमाधीबद्दल आश्चर्य करावे, हेच कळत नसे.

## तीन दिडक्यांची दत्तोपासना

धुळ्याचे वकील कै. रामचंद्र श्रीकृष्ण जामखेडकर यांचे वडील श्रीभक्त श्रीकृष्ण बल्लाळ जामखेडकर हे इ. सन १८६० साली सावदे येथे शाळेवर मुख्याध्यापक होते. ते इ. स. १८८८ पर्यंत सावद्यासच राहत असत. इ. १८६२ साली नोकरीचा राजिनामा देऊन दास्यत्वातून मोकळे झाले. त्यानंतर लवकरच महाराज फिरत फिरत सावद्यास आले होते. या कालखंडात, महाराज वऱ्हाड व

खानदेशातील जवळ जवळ प्रत्येक खेडोपाडी येऊन गेल्याचे समजते. सावद्यास महाराज आल्याचे कळल्याबरोबर श्रीकृष्ण बल्लाळ यांनी महाराजांच्या मुक्कामाचा तपास केला. महाराज त्या वेळी सावदा येथील जहागीरदार श्रीमंत देशमुख यांच्या वाड्यात गेल्याचे समजले. कोणाकडेही बोलाविल्याशिवाय आपणहून जाणे हा शिष्टाचार नाही असे वाटून आणि देशमुखांकडून बाहेर पडल्यावर महाराज कोठे जातील याचा काहीच नियम नाही व भेटीचा योग येणार नाही, असे वाटून ते देशमुखांचे वाड्याचे पलीकडील समोरील ओटयावर बसून महाराजांची मार्गप्रतीक्षा करीत राहिले. आतील सर्व प्रकार आटोपून महाराज बाहेर आल्याबरोबर यांनी पुढे होऊन महाराजांचे पायांवर डोके ठेवले. महाराजांनी त्यास उठवून त्याचे गळयात हात घालून मार्गक्रमण करण्यास सुरुवात केली. इतर मंडळीही बरोबर होतीच. त्या सर्वांसह मुक्कामाचे ठिकाणी सर्व मंडळी गेली. श्रीकृष्ण बल्लाळ यांचे एक ओक उपनावाचे स्नेही होते. ते मुलकी खात्यात नोकरीला होते. हे ओक दररोज सूर्यनमस्कार फार घालीत. महाराजांच्या मुक्कामावर हे दोघेही उपस्थित होते. सर्व मंडळी घरोघर निघून गेल्यावर श्रीकृष्ण बल्लाळ यांनी महाराजांस प्रार्थना केली की या ओकावर कृपा करावी. स्वतःवर कृपा करण्याविषयी विनंती करण्याचे त्यांचे मनात मुळीच आले नाही. त्यास कारणेही तशीच होती. त्यांचे आईवडील ह्यात होते. बुद्धिमत्ता प्रथम श्रेणीची होती. मनात आणलेली कोणतीही गोष्ट पार पाडण्याची अंगात धमक होती. अशा परिस्थितीत अहंकार उत्पन्न न झाला तरच नवल ! या अहंकारानेच त्यांना ग्रासले होते. त्यांची विनंती ऐकल्याबरोबर महाराजांनी " श्रीदत्त " असे शब्द फार मोठ्याने उच्चारून खेचरी मुद्रेने आकाशाकडे नजर दिली. त्या अवस्थेत ते जवळ जवळ पांच मिनिटे होते. त्यामुळे या दोघांचे अंगावर शहारे आले. नंतर महाराजांनी यांचेकडे पाहिले व सांगितले की, श्रीदत्ताची इच्छा तुझ्यावर कृपा करावयाची आहे. या सोबतच्या माणसावर कृपा करावयाची नाही. याप्रमाणे प्रथम भेटीचा प्रसंग पार पडला. या भेटीनंतर श्रीकृष्ण बल्लाळ यांचा अहंकाराचा पुंज उतरू लागला व महाराजांची पुन्हा भेट झाल्यास कृपा करण्याविषयी विनंती करण्याचे त्यांनी ठरविले. वर्ष दीड-वर्षाचा काळ लोटल्यावर महाराज पुन्हा सावद्यास आले. बातमी लागल्याबरोबर महाराजांकडे जाऊन त्यानी कृपेची याचना केली. त्याप्रमाणे महाराजांनी एक वस्तू दिली व तिची नित्यनियमाने पूजा करून नेहमी स्वतःजवळ ठेवावी अशी आज्ञा केली. त्याप्रमाणे, ती वस्तू एका पितळी डबीत ठेवून तिची दररोज सकाळी नित्यकर्म आटोपल्यावर पूजा करीत व नंतर ती डबी कमरी ठेवीत. मुख्याध्यापक म्हणून राजीनामा दिल्यावर श्रीकृष्ण बल्लाळ वकिली करू लागले. वकिलीच्या

कामाकरिता न्यायाधीश असेल त्या ठिकाणी यांस उपस्थित व्हावे लागे. त्याप्रमाणे एका कामाकरिता बाहेरगावी गेले असता ती डबी नाहीशी झाली. त्यामुळे यांस फार वाईट वाटले व महाराजांच्या पुनरागमनाची ते वाट पाहू लागले. पुन्हा एक दीड वर्षांनी महाराज सावद्यास आल्याचे कळले. हे त्या ठिकाणी भेटीस जातात तो महाराज फैजपूरास गेल्याचे कळले. फैजपूर सावद्याहून तीन कोस आहे. तसेच ताबडतोब बैलगाडीने फैजपुरास गेले. तपास करिता महाराजांचा मुक्काम तेथील श्रीराम मंदिरात असल्याचे कळले. म्हणून गाडी घेऊन तेथे गेले, हे देवळाच्या पायऱ्या चढतात तोच महाराज स्वतः बाहेर आले. यांनी 'नमो नारायण' करून प्रणिपात केला व "आपण दिलेली वस्तू स्वतः दक्षता घेतली असता सुद्धा मजपासून गेली" असे सांगितले. "मोठ्याचे देणे परंतु विनाशी ठरले !" हे ऐकून महाराज म्हणाले, "आता तुला मी जी वस्तू देत आहे ती कोणासही घेता येणे शक्य नाही." या वेळी महाराज व श्रीकृष्ण बल्लाळ हे दोघेही श्रीराम मंदिराचे बाहेर जो एक औदुंबर वृक्ष होता त्याचे खाली उभे होते. तेथेच, उभ्याउभ्याच उजवे कानात महाराजांनी महामंत्राचा उपदेश दिला व नित्य जप करण्यास सांगितले. उपासना म्हणून दर गुरुवारी सायंकाळी, ज्या ठिकाणी वास्तव्य असेल त्या ठिकाणी औदुंबर वृक्ष पाहून त्यास सव्वा पैशाची खडीसाखर घेऊन तिचा नैवेद्य समर्पण करावा व नासरीचा कापूर घेऊन त्याची आरती ओवाळावी. याप्रमाणे दर गुरुवारी श्रीदत्ताचे नावाने तीन दिडक्या खर्च करण्याची आज्ञा झाली.

त्यानंतर श्रीकृष्ण बल्लाळांनी विनंती केली की आपण मला आता पदरांत तर घेतले आहेच जर मला आपणाला भेटण्याची इच्छा झाली तर मी आपणास कोठे भेटावे ? त्यावर महाराज म्हणाले, "मला सूर्य चंद्र पाहतात. मग मी काय करावे ?" त्यावर उडवाउडवीची उत्तरे दिली व अमळनेरकर, चोपडेकर, धरणगावकर, हेही महात्मे आहेत, त्यांस भेटत जावे असे सांगितले. हे ऐकून श्रीकृष्ण बल्लाळांनी पुन्हा प्रश्न केला की, "आपला अनुग्रहित म्हणावयाचे व वेळ आली तर दुसरीकडे तोंड वेंगाडावयाचे हे मजकडून कधीही होणार नाही." इतकी निश्चयाची भाषा ऐकल्यावर त्यांस महाराजांनी विचारले की, "तू नारायणबोवा रुद्र यांस ओळखतोस काय ?" त्यांनी सांगितले की, "होय, ओळखतो. ते मालेगावी १८५४–५५ साली गवई म्हणून आले होते व त्यांचेकडे गाणे शिकण्यास मी जात असे. एवढा परिचय आहे." हे ऐकून महाराज म्हणाले, "ज्या ज्या वेळी तुला माझी भेट व्हावी अशी इच्छा होईल त्या त्या वेळी त्यांची भेट तू घेत जा, नारायण माझे हृदय आहे." त्यावर यांनी पुन्हा प्रश्न केला की ते मला कसे पत्करतील ? तर उत्तर आले की ती काळजी तुला नको. या

प्रमाणे प्रश्नोत्तरे झाली आणि श्रीराम मंदिरातून फैजपुराहून श्रीकृष्ण बल्लाळ, त्याच गाडीवर परत सावद्यास आले.

## आज्ञापालनाने महाराजांस संतोष

पश्चिम खानदेशातील शिरपूर मुक्कामी महाराजांनी बराच काळपर्यंत वास्तव्य केले होते. त्या गावी महाराजांच्या भक्तगणांपैकी एक कै. बाळकृष्ण विठ्ठल पंडित धर्माधिकारी हे होते. महाराजांनी त्यांना नदीवर नेऊन तेथे त्यांना वाळवंटात बसवून त्यांचे भोवताली एक वर्तुळ काढले व सांगितले की "या वर्तुळाबाहेर जाऊ नये. कोणीही कितीही आमिष दाखवून बोलविले तरी स्थान सोडून जाऊ नये." इतके सांगून महाराज दूरवर लांब निघून गेले. महाराज गेल्यावर एक सुंदर स्त्री दैदिप्यमान असे अलंकार घालून आली व म्हणाली, "या वर्तुळाबाहेर ये. मी तुला पाहिजे ते देईन." पण कै. बाळकृष्ण पंडित या आमिषाला बळी न पडता धीटपणाने म्हणाले की, "मला ही जागा सोडून जाण्याची माझ्या गुरूची आज्ञा नाही." हे ऐकून ती स्त्री नाहीशी झाली. थोड्या वेळाने महाराज परत आले आणि त्यांनी विचारले की, "मी येथून गेल्यावर काय घडले ?" तेव्हा कै. बाळकृष्ण पंडित यांनी घडलेली सर्व हकीकत महाराजांना सांगितली. ती ऐकून आज्ञापालन केल्याबद्दल महाराजांस फार संतोष झाला.

## श्रीराममंदिरातून गुप्त

वरील प्रसंगानंतर काही वेळाने, 'जरा' नाहीशी करून आयुष्यवर्धन करण्यासाठी महाराज जी क्रिया करीत असत असे मागे म्हटले आहे, ती यौगिक क्रिया महाराजांनी केली. आसन मांडून पोटातील सर्व आतडी बाहेर काढली. कै. बाळकृष्ण पंडित यांना आतड्यावर पाणी टाकण्यास सांगितले. आतडी स्वच्छ धुतल्यावर परत आत बसविली. काही दिवसांनी ही गोष्ट शिरपूरनिवासी लोकांच्या कानांवर गेली. त्यामुळे गावकरी लोक महाराजांच्या दर्शनास गर्दी करू लागले. त्या वेळी महाराजांचे वास्तव्य शिरपूरमधील श्रीराममंदिरात होते. पुढे गावातील प्रतिष्ठित लोकांनी महाराजांना जास्त दिवस राहण्याचा आग्रह केला. पण महाराजांनी नकार दिला. तेव्हा गावकरी मंडळींनी कट केला की महाराजांना जाऊ द्यावयाचे नाही. म्हणून श्रीराममंदिर सर्व बाजूंनी बंद करून ते महाराजांस म्हणाले, "आता तुम्ही कसे जाल ?" महाराजांना मंदिरात कोंडल्याबद्दल गावकऱ्यांना फार आनंद झाला ! दुसरे दिवशी लोकांनी मंदिर उघडले आणि आत बघतात तो काय आश्चर्य ! महाराज तेथे नाहीत. दुसऱ्या मजल्यासह सर्व मंदिर धुंडाळले पण महाराज दिसेनात. फक्त तेथे एक कमंडलू

आणि खडावा राहिलेल्या आढळल्या. शोधांती गावकरी लोकांना कळले की ज्या दिवशी महाराजांना मंदिरात कोंडले त्याच दिवशी ते तापी नदीवरून निघून गेले, त्या दिवशी तापीस फार पूर होता. पण महाराजांनी भर पुरात आसन टाकून त्यावर बसून ते पैलतीरावर गेले. हे दृश्य सावळदे गावच्या नावाड्यांनी पाहिले. हा सर्व वृत्तांत ऐकल्यावर शिरपूर गावचे लोक आश्चर्याने थक्क झाले.

## चार गहू चार मुलगे

शिरपुरास मुक्काम असता महाराज कै. बाळकृष्ण पंडित यांचे घरी नेहमी येत. घरी आल्यावर ज्या खांबाला टेकून बसत त्या खांबाची पूजा करण्यास त्यांनी बाळकृष्ण पंडितांना सांगितले. कै. बाळकृष्ण पंडितांना मुलीच जास्त होत्या. पोटी पुत्रसंतान नव्हते. हे महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्यांना चार गहू दिले व ते खाण्यास सांगितले. त्यानंतर महाराजांचा प्रसाद म्हणून बाळकृष्ण पंडितांना चार मुलगे झाले. विश्वनाथ पंडित, जगन्नाथ पंडित, नारायण पंडित आणि वामन पंडित अशी त्यांची नावे ठेवली. महाराजांचे प्रेम जगन्नाथावर विशेष असे. महाराजांच्या प्रसादाचा परिणाम म्हणून पुढे पंडितांच्या घराण्यात मुलीपेक्षा मुलगेच जास्त आहेत.

## आजोबांची परीक्षा पास

माझे आजोबा, वडिलांचे वडील, सुमारे १८–१९ वर्षांचे असतानाची गोष्ट. त्या वेळी ते धुळ्यास राहत असत. महाराजांस तंबाखू खाण्याचा नाद होता व ते आपण त्या व्यसनाचे आधीन आहोत असे दाखवीतही. महाराजांचा मुक्काम धुळ्यास होता. इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या आमदानीचा अंमल सर्वस्वी नव्हे तरी थोडासा आजोबांवरही झाला होता. तेव्हा पूज्य बुद्धीने नाही पण जिज्ञासेने इतर मंडळीप्रमाणे तेही महाराजांच्या दर्शनास गेले. महाराजांनी त्यांना पाहताच "तू मला ओळखतोस काय ?" असे विचारले. आजोबा म्हणाले, "नाही." त्यावर महाराज म्हणाले, "तू आठनऊ वर्षांचा असता काही सोबत्यांसह रस्त्यांत खेळत होतास. तेव्हा एक वेडा रस्त्याने आला. त्याला पाहून सर्व मुले हुर्यो करून पाठीस लागली व धूळ दगड मारू लागली. तेव्हा तू त्यांना 'असेल कोणी बिचारा; दगड काय मारावे उगीच' म्हणून वर्जिलेस. या गोष्टीचे स्मरण आहे काय ?" आजोबा 'होय' म्हणून म्हणाले; कारण ते चित्र खरोखरच पुसटपणे त्यांच्या स्मरणात होते. तेव्हा महाराज म्हणाले, "मीच तो वेडा." तेव्हा आजोबांना फार नवल वाटले. काही वेळाने महाराज म्हणाले, "आम्हांस तंबाखू दे." तेव्हा त्यांनी पुसले की "आपण संन्यासी साधु. आपणास तंबाखू काय करावयाची ?" ते ऐकून महाराज म्हणाले, "तुला परीक्षा पास व्हावयाचे

आहेना ? मग मुकाटयाने तंबाखू दे कसा." हे ऐकून आजोबांना फार आश्चर्य वाटले. कारण त्यांची प्रवेश परीक्षेची दुसरी वारी होती व घरगुती परिस्थितीमुळे परीक्षा उत्तीर्ण होण्याची फार गरज होती. पण हे सर्व महाराजांस कळले कसे हेच त्यांना समजेना. शेवटी त्यांनी मुकाटयाने तंबाखू आणून दिली. कारण परीक्षा पास झाली तर पाहिजेच होती आणि ती झालीच हे सांगणे नकोच.

## 'ब्रह्मचारीबुवा श्रीबुवासाहेबांच्या जागेत राहावयास आले'

खानदेशात महाराजांचे भ्रमण चालू असता त्यांचे अनेक वेळा धुळयास येणे होत असे. श्रीनारायणबुवा रुद्र उर्फ पद्मनाभस्वामी हे धुळयासच राहत होते. यांना योगाभ्यास शिकविण्याकरिता महाराज धुळयास राहिले होते. श्रीबुवासाहेबांचे छोटेसे चरित्र पुढे 'प्रभावळ' या प्रकरणात दिले आहे.

धुळयांत नारायण नावाचे एक ब्रह्मचारी असत. संन्यासाश्रमातील नाव योगानंदस्वामी असे होते. त्यानी एक राम मंदिर बांधण्यास सुरुवात केली. महाराजांनी ब्रह्मचारीबुवास श्रीबुवासाहेब यांना त्यांच्या नवीन होणाऱ्या मंदिरात राहण्यास जागा देण्यास सांगितले. त्या वेळी ब्रह्मचारीबुवांनी 'देऊळ पुरते तर होऊ द्या. मग पाहू.' असे उत्तर दिले. तरीही काही दिवसांनी महाराजांनी त्यास जागा देण्याबद्दल विचारले असता ब्रह्मचारीबुवांनी पुन्हा नकारच दिला. त्यावर महाराजांनी त्यास सांगितले, "बरे, असू द्या. नाही देत जागा तर नाही. तुम्हीच बुवासाहेबांच्या जागेत राहावयास जा." या गोष्टीला ५० वर्षे झाली तरी ब्रह्मचारीबुवाचे मंदिर तयार झाले नाहीच. पुढे श्रीबुवासाहेब यांचे संस्थान झाले आणि मंदिरही झाले. त्यानंतर सन १९०६ मध्ये ब्रह्मचारीबुवाही समाधिस्थ झाले. परंतु त्यांचे समाधीकरिता कोठे जागाच मिळेना. होता होता श्रीबुवासाहेबांच्या मठाच्या आवारात त्यांस जागा दिली व तेथेच त्यांची समाधीही बांधली गेली. अशा तऱ्हेने ब्रह्मचारीबुवा हे श्रीबुवासाहेबांच्या जागेत राहावयास आले !

## प्रसाद-वीणा

खानदेशात महाराज पुष्कळच रमले होते. प्रत्येक खेडयापाडयाला आपल्या चरणस्पर्शाने त्यांनी पुनीत केले आहे. शिरपूर, धुळे त्याच प्रमाणे रावेर, पिंपळनेर, बेटावद, शहादे, प्रकाशे, निजामपूर वगैरे ठिकाणी ते येऊन गेल्याची माहिती मिळते. एका चातुर्मासात निजामपूरला महाराजांचा मुक्काम विद्यमान सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. मुरलीधरबुवा निजामपूरकर यांचे घरी होता. तेथे असता महाराज वीणा घेऊन भजन करीत असत. तो वीणा प्रसाद म्हणून त्यांनी तेथून जातांना निजामपूरकराच्या घरीच ठेवला. आजही तो त्यांच्या घरात असल्याचे कळते.

## विलक्षण गैरसमज

महाराज मालेगावला वारंवार येत असत. सावदा येथील हकीकतीमध्ये उल्लेखिलेले श्रीभक्त श्रीकृष्ण बल्लाळ जामखेडकर यांचे वडील श्री. वे. शा. सं. बल्लाळेश्वर बाबा हे मालेगावीच राहत असत. श्रीकृष्ण बल्लाळ हे १८५७ सालापासून मालेगावाहून बाहेर पडले. दरसाल फक्त श्रीगणेश उत्सवाप्रीत्यर्थ मालेगावास येत व १०–१५ दिवस राहून परत सावद्यास जात. महाराज मालेगावला आले म्हणजे एखाद्या मंदिरात उतरत असत. श्रीबल्लाळेश्वर हे श्रुतिस्मृति–सदाचार याप्रमाणे वागणारे होते. आध्यात्मिक दृष्टीने त्यांचा अधिकार फार मोठा होता असे सांगतात. श्रीबल्लाळेश्वर बाबांच्या नित्यक्रमांतील एक भाग असा होता की संध्याकाळी गावातील सर्व देवळातून देवदर्शनाच्या निमित्ताने एक फेरी मारावयाची व कोणी साधुसत्पुरुष किंवा अतिथिअभ्यागत आढळल्यास त्याला आपल्या घरी भोजनास घेऊन यावयाचे. काही वेळेला महाराजांची व बल्लाळेश्वरबाबांची भेट होत असे. बल्लाळेश्वरबाबांनी त्यांना हात धरून सर्व देवळातून हिंडवून आणावयाचे व घरी भोजनासही बोलवावयाचे. योगाभ्यासामुळे महाराजांची शरीरयष्टी बळकट, तारुण्य मुसमुसलेले डोळे आरक्त दिसावयाचे व त्यावरून बल्लाळेश्वरबाबांच्या मनांत कल्पना उत्पन्न होत असे की महाराज हे कोणी तरी ऐन तारुण्यांत अविचाराने संन्यास घेतलेले प्राणी आहेत ! तेव्हा त्यांच्या हातून काही पुण्यकर्म घडावे म्हणून देवदर्शनास नेत असत. या विलक्षण गैरसमजाचा उल्लेख पूर्वी येऊन गेला आहेच. जितकी एखादी व्यक्ती श्रेष्ठ तितके तिच्याबद्दल गैरसमज जास्त. किंबहुना इमरसनच्या ('To be great is to be misunderstood') या उक्तीप्रमाणे ती थोर पुरुषांची एक कसोटीच आहे असे वाटते.

या ठिकाणी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. श्रीकृष्ण बल्लाळ यांना तीन दिडक्यांची उपासना महाराजांनी सावद्यास दिल्याची हकीकत मागे येऊन गेलीच आहे. कौटुंबिक व्यवस्थेकरिता श्रीकृष्ण बल्लाळ यांना सावदा सोडून धुळ्यास यावे लागले. धुळ्यास प्रत्यक्ष महाराजांच्या पादुका होत्या. म्हणून श्रीनारायणबोवा साहेबांच्या आज्ञेवरून त्यांचा नैवेद्य श्रीराममंदिरात व व पुढे श्रीदत्तमंदिरात श्रीदत्तास होऊ लागला. अनुग्रह झाल्यावर उच्छिष्ट प्रसाद मिळावा म्हणून पुढीस घरी यावे अशी श्रीकृष्ण बल्लाळ यांनी महाराजांस विनंती केली. तेव्हा महाराज म्हणाले, "मी तुझ्या घरी पुष्कळ वेळा पुडी घेतली आहे." हे एकून श्रीकृष्ण बल्लाळांना फार आश्चर्य वाटले. त्यांची आश्चर्ययुक्त मुद्रा पाहून महाराजांनी त्याचे समाधान केले. मालेगाव येथील घराची व माणसांची अगदी बारीक सारीक माहिती महाराजांनी त्यांना सांगितली व

पुढीचा तू आग्रह करू नकोस असेही सांगितले. त्यामुळे तो त्यांना सोडून देणे भाग पडले.

## सात दिवस एकच पुराण

महाराजांची, भजनप्रसंगी 'श्री विठ्ठल' 'श्री विठ्ठल' ह्या नामाचा गजर झाला की कशी समाधी लागत असे, याविषयीची एक गोष्ट मागे सांगितली आहेच. सहज बोलतांनाही त्यांची समाधी लागत असे. आमचे आप्त कै. नारायणराव मुखेडकर मास्तर यांनी महाराजांच्या सहज समाधीचा प्रसंग आपले लहानपणी पाहिलेला आहे. महाराजांचा मुक्काम नाशिक जिल्ह्यांत पिंपळगाव बसवंत येथे होता. या मुक्कामात एकदा पुराण चालले होते. महाराज स्वत: व्याख्यान करीत होते. विषय श्रीगीतेतील 'आत्मवत् सर्वभुतेषु य: पश्यति स पश्यति' हे वचन होते. महाराजांनी थोडे व्याख्यान केले की त्यांचे देहभान जाऊन तीनचार तास समाधी लागावी. असा प्रकार सारखा चालू होता. श्रोते अर्थातच येऊन जाऊन पुराण ऐकत असत. असे होता होता एकदाचे सात दिवसांनी ते एकच पुराण संपले. पुराण संपताच लोकांचा उपसर्ग होऊ नये म्हणून महाराज समोरच पिंपळाचा पार होता त्यावर उडी मारून झाडावर चढून गेले व पुन्हा समाधिवश झाले. शेवटी तीन दिवस पूर्ण झाल्यावर महाराज पूर्ण देहभानावर आले. मग झाडावरून खाली उतरल्यावर सर्व व्यवहार पूर्ववत सुरू झाले.

## अडखळल्या देवास दंडवत कशाला ?

एकदा एक श्रीमंत गृहस्थ घोडयाच्या टांग्यांत बसून संगमनेर गावातून बाहेर पडला. थोडया अंतरावर समोर त्याने महाराजांस पाहिले आणि त्यांना गाठावे म्हणून त्याने घोडयांस पिटाळले. पण महाराज आपले सारखे पुढेच ! घोडे पळून दमले. वाडेगव्हाणपर्यंत महाराज मध्येच प्रगट होत तर मध्येच गुप्त. शेवटी थकून त्या श्रीमंत गृहस्थाने टांगा सोडला. तेथे प्रगट होऊन महाराज त्याला म्हणाले, "व्यर्थ शिणून काय होते ? अश्वांना विनाकारण मारले. उभे राहा म्हणून मला सांगितले असते तर मी उभा राहिलो असतो !" महाराजांचे हे उद्‌गार ऐकून त्या गृहस्थास फारच आश्चर्य वाटले. काही दैव होते म्हणूनच आपणास महाराजांचे दर्शन झाले असे वाटून त्याने महाराजांच्या पायावर लोटांगण घातले. महाराजांच्या पुढयांत त्याने द्रव्याची रास ओतून हातून काही संतसेवा घडावी अशी इच्छा प्रगट केली. तेव्हा महाराज त्यांना म्हणाले, "सेवा अशी असते का ? अडखळल्या देवास दंडवत करणे ही योग्य रीत नाही. जेवून तृप्त झालेल्याला बळेच भोजन घालण्यापेक्षा क्षुधापीडितांना भोजन देणे

जास्त कल्याणप्रद आहे." महाराजांचा उपदेश ऐकून त्या श्रीमंत गृहस्थाने याचक लोकांना बोलावून आणले व ते सर्व धन त्यांना अर्पण केले. (नवसंत-चरित्रावरून)

## प्रसादाचा अर्थ

विश्वनाथ गोविंद महाजन हे मनमाड येथे रेल्वे खात्यांत नोकरीस होते. तेव्हा ते तीस वर्षे एकाच ठिकाणी धुळ्याचे कै. गोविंदराव गरुड यांचे वाड्यांत राहात असत. विश्वनाथपंत महाजन साधु वृत्तीने राहून आल्यागेल्याचे विशेषत: साधुसत्पुरुषांचे आदरातिथ्य यथाशक्ती करीत असत. त्यांच्याकडे ज्याप्रमाणे सरदार विंचूरकर, राजेबहाद्दर, इंदूर व बडोदा या संस्थानाचे खाजगी कारभारी येत जात असत, त्याचप्रमाणे दक्षिणामूर्ती स्वामी, यशवंतराव देवमामलेदार, श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामीमहाराज व इतर साधु लोक येत जात असत. एका मुक्कामात महाराजांनी "आपल्याला ब्रह्मस्व किती आहे व आपला योगक्षेम कसा चालतो." म्हणून विश्वनाथपंतांजवळ चौकशी केली. "ईश्वरकृपेने कर्ज नाही व श्रीअक्कलकोटच्या स्वामींच्या कृपेने सर्व व्यवस्थित चालते" असे विश्वनाथपंतांनी उत्तर दिले व श्रीअक्कलकोटच्या स्वामींनी दिलेल्या आशीर्वादाचा अर्थ विशद करण्याची त्यांनी महाराजांना विनंती केली. श्रीअक्कलकोटच्या स्वामींनी विश्वनाथपंताना दोन खारका व दोन बदाम दिले होते. इतर दर्शनेच्छु मंडळींना त्याचप्रमाणे प्रसाद देऊन त्याचा अर्थ काय ते तुम्हीच विचार करून ठरवा असे सांगितले होते. महाराजांनी या प्रसादाचा अर्थ सांगितला तो असा : "आपल्याला दोन विधवा मुली व दोन मुलगे मरेपर्यंत उपयोगी पडतील. जी खारीक किडकी निघाली ती जवळ राहून त्रास होईल. त्याचप्रमाणे, मोठ्या बदामाचा अर्थ मोठा मुलगा शेवटपर्यंत उपयोगी पडेल व त्याच्या मांडीवर तुम्हाला मृत्यु येईल." याप्रमाणेच सर्व घडले. विश्वनाथपंतांच्या मृत्युसमयी दुसरा मुलगा रजा घेऊन आला. त्याच्या प्रकृतीत बिघाड झाला. रजा वाढविण्यास मुंबईला जात असता इकडे विश्वनाथपंतांचे प्राणोत्क्रमण त्यांचा वडील मुलगा शंकर विश्वनाथ यांचे मांडीवर झाले.

महाराज दरवर्षी विश्वनाथपंताकडे येत असत. अशाच एका मुक्कामात, विश्वनाथपंतांचा मोठा मुलगा शंकर यास बरोबर घेऊन महाराज फिरावयास जात असत. संन्यासधर्माप्रमाणे तिसरी रात्र होण्यापूर्वी महाराज म्हणाले, "आज आम्ही मुक्काम हालविणार." तेव्हा शंकरने "जाऊ नका," असे म्हटले. घरी आल्यावर ज्या खोलीत महाराज शिरले त्या खोलीला "आपण कसे जाता ?" म्हणून बाहेरून कडी घालून कुलूप लाविले. विश्वनाथपंत आल्यानंतर महाराजांची चौकशी करीत, ज्या खोलीत त्यांचे वास्तव्य होते तिकडे हातपाय धुवून गेले.

दाराला कडी कुलूप व शंकर बाहेर उभा. तेव्हा त्याच्या हातातील किल्ली घेऊन विश्वनाथपंतांनी कुलूप उघडले. वेळ संध्याकाळची होती. दिसत नसेल म्हणून खोलीचा कानाकोपरा शोधला. पण महाराज दिसले नाहीत. नित्यकर्म आटोपून रात्री विश्वनाथपंत झोपले. तेव्हा त्यांना पहाटेस स्वप्न पडले की, "मी अंकाईच्या अगस्ति डोंगरावर आहे." त्वरित स्नान व रोजचे आन्हिक आटोपून हातात जेवणाकरिता ताट वाढून घेऊन ते डोंगरावर गेले व सांगितलेला कमंडलू अर्पण केला. तेव्हा महाराज हसून म्हणाले, "संन्यासधर्माप्रमाणे त्या गावातील अन्न ग्रहण करता येत नाही." वाढून आणलेले अन्न तेथे असलेल्या एका पांढऱ्या शुभ्र गाईला अर्पण करावयास सांगून त्यांनी कमंडलू हाती घेतला. नमस्कार करण्याकरिता विश्वनाथपंत खाली वाकले व त्यांनी डोळे मिटले. तत्क्षणी महाराज अदृश्य झाले.

## सातारच्या किल्ल्यातून सुटका

इ. स. १८५७ साली सातारचे किल्ल्यावर काही गडबड झाली. त्यामुळे काही लोक वर अटकेत राहिले. अटकेत राहिलेल्या लोकांत महाराज व त्यांच्या नित्यसहवासात असणारे माधवराव दादा दांडेकर हेही होते. अडकलेल्या सर्व मंडळींना आता पुढे काय होईल व आपली सुटका कशी होईल म्हणून काळजी लागली. तेव्हा महाराज म्हणाले, "त्यात काय आहे ? आम्ही नेतो सर्वांना. चला, ज्यांना यावयाचे असेल त्यांनी यावे आमच्या मागे. आम्ही चाललो रे बुवा." इतके बोलून महाराज कड्यावर गेले. तेथे खोल उडी मारतांना करतात तसे दोन्ही हात वर करून खाली उडी घेतली. सर्व लोक त्यांना वेडा म्हणून उपहास करू लागले. महाराजांबरोबर उडी फक्त दादांनी घेतली. परंतु त्यांना काही झाले नाही. जसे उचलून खाली ठेवावे त्याप्रमाणे अलगद खाली ठेवले गेले. ही हकीकत कळल्यावर मात्र इतर मंडळींना पश्चात्ताप झाला की आपण तसेच केले असते तर बरे झाले असते.

## काही कमी पडले नाही

श्री. गणेश रामचंद्र फाटक, रा. सातारा, हल्ली मुक्काम कोयनानगर, यांचे वडील श्रीभक्त कै. रामचंद्र प्रभाकर फाटक हे महाराजांचे भक्त होते. ते मोजणीखात्यात खानदेशांत नोकरीस होते. त्यावेळी त्यांची व महाराजांची गाठ पडली. "तुला लौकिक दृष्ट्या मंत्रोपदेश नको, तुझी माझी भेट झाली हाच उपदेश. तुझ्यावर माझी पूर्ण कृपा आहे," असे महाराजांनी त्यांना सांगितले. महाराजांनी त्यांना पूजेकरिता लाकडी खडावांचा जोड दिला होता. तो त्यांचे वंशजांजवळ अजून आहे.

काही वर्षांनी रामचंद्र फाटक यास नोकरीचा कंटाळा आला व त्यांनी तसे महाराजांस कळविले. परंतु मुदतीपूर्वी पेन्शन मिळणे अशक्य, संसाराची काळजी. हे महाराजांस कळताच त्यांनी "पेन्शनचा अर्ज दे, पेन्शन मिळेल व निजाम हैद्राबादजवळ 'सतारा' गाव आहे तेथे देवघेवीचा धंदा कर; प्रपंच चालेल," असा आदेश दिला. त्याप्रमाणे पेन्शनचा अर्ज देऊन पेन्शन मिळाले. रामचंद्र फाटक यांचे समजुतीत 'सतारा' ऐवजी 'सातारा' येऊन ते साताऱ्याजवळील 'लिंब' गावी जाऊन राहिले व देवघेवीचा धंदा करू लागले. महाराजांचे सांगण्याप्रमाणे त्यांना काही कमी पडले नाही.

रामचंद्र फाटक यांनी सन १८६९ साली पेन्शन घेतले. मोजणी खात्याच्या अधिकाऱ्याच्या सहीचा पेन्शन ऑर्डरचा कागद अजून त्यांचे चिरंजिवाजवळ आहे. त्यांना ९ रु. २ आणे पेन्शन मिळत असे. ते सर्व ते महाराजांचे चरणी अर्पण करीत. संसारखर्च देवघेवीच्या व्यापारांतून येणाऱ्या व्याजावर होत असे.

महाराज स्वतः तीनचार वेळा लिंब गावी गेले होते. जेव्हा ते येत तेव्हा ते तेथील श्रीलक्ष्मीनारायणाचे अगर इतर देवळात उतरत. पुढीस मात्र फाटक यांचेकडे जात. लिंबास पेठेत एक विठोबाचे देऊळ आहे. तेथे निरूपणे होत. एके वेळी महाराजांनी "**पंढरी पंढरी विठू रायाची नगरी ।**" यावर निरूपण केले. त्या वेळी जनसमुदाय फार मोठा जमला होता.

## कृष्णाबाईचा पूर

पुणे येथील एक गृहस्थ (यांचे नाव बहुधा अण्णा बापट असावे) एके गावी मामलेदार होते. हा गाव कृष्णेच्या काठी असून तेथे एक सत्पुरुष मठ करून राहत असत. एकदा महाराज पंढरपूरला जात असता या गावी उतरले. त्यावेळी ते सत्पुरुष घरी नव्हते. त्यांची मंडळी मात्र घरी होती. त्यांनी महाराजांचे योग्य तऱ्हेने स्वागत केले. त्या दिवशी संध्याकाळी आकाश अभ्राच्छादित झाले व वारा सुटून सपाटून पाऊस पडू लागला. कृष्णेला पूर आला व पाणी चढू लागले. वाढता वाढता पाणी महाराज उतरले होते तेथे शिरू लागले. तेव्हा घरातील मंडळी घाबरली. महाराज म्हणाले की, "कृष्णाबाई आपल्या घरी आली आहे तर चोळी नारळ वगैरे वाण द्या व त्यांचे स्वागत करा." महाराजांचे म्हणणे ऐकून घरातील मंडळींनी त्याप्रमाणे केले. त्या दिवशी कृष्णाबाईस भयंकर पूर आला, पण मठांत एक थेंब आला नाही. मठाच्या बाहेरील भिंती बऱ्याच बुडाल्या होत्या व त्या मानाने मठाच्या आत सर्व जलमय होऊन तो सगळा वाहून जाण्यास पाहिजे होता. पण तसे न होता भिंती बाहेरून मात्र बुडाल्या व आत एकही थेंब आला नाही. अशा रीतीने दोन तास पूर होता. नंतर पूर उतरला तेव्हा महाराज तेथून निघून गेले. पूर उतरल्यावर मामलेदार गावातील परि-

स्थिती पाहण्यास निघाले. त्या वेळेस त्यांना व इतर गावकरी मंडळींना अशी खात्री वाटली की मठ वाहून गेलाच असला पाहिजे. कारण त्याच्यापेक्षा उंची-वरची घरे पुराने वाहून गेली होती. मामलेदार व इतर मंडळी मठाकडे आली. तेव्हा मठांत एकही पाण्याचा थेंब नसून आतील सर्व मंडळी सुरक्षित आहेत असे पाहून फारच आश्चर्य वाटले. बाहेरच्या भिंती पाण्यात बऱ्याच बुडालेल्या पण आत एकही थेंब नाही हे कसे झाले, याचे त्यांना कोडे पडले व त्यांनी बाईस विचारले. तेव्हा बाईंनी सांगितले की, महाराज नरसिंव्ह सरस्वती यांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही कृष्णाबाईस सौभाग्यवाण दिले व त्यामुळे आत एकही थेंब पाणी आले नाही. महाराज इतक्यातच पंढरपूरच्या वाटेने निघून गेले, मामलेदार यांनी ताबडतोब गाडी जुंपली व पंढरपूरचे वाटेने निघाले आणि त्यांनी महा-राजांना गाठले. त्यांनी महाराजांचे दर्शन घेऊन झालेली हकीकत सांगून महा-राजांची स्तुती सुरू केली. तेव्हा महाराज म्हणाले, "छे छे, हे सामर्थ्य त्या सत्पुरुषाचेच आहे. कृष्णाबाईच्या भरवशावर मंडळीस सोडून ते पंढरपूरला गेले. तेव्हा कृष्णाबाई विश्वासघात कसा करील ?" महाराजांचे हे भाषण ऐकून सर्व मंडळी स्तब्ध झाली. पण हे सामर्थ्य महाराजांचेच आहे ह्याबद्दल सर्वांची खात्री झाली.

## विठ्ठरायाच्या नगरीत

अक्कलकोटहून पुढे महाराज पंढरपुरास आले. तेथे श्रीव्यासनारायणाचे मंदिरात गुंफा बांधून एक वर्ष राहिले होते अशी माहिती मिळते. श्रीगुरुचरित्र अध्याय १७ मध्ये असा कथाभाग आहे की भिल्लवडीस श्रीगुरू एका औदुंबर वृक्षाखाली गुप्तपणे वास्तव्य करून होते. पण तेथील भुवनेश्वरी देवीनेच एका मूढ ब्राह्मणाला दृष्टांत देऊन त्यांना प्रगट केले. त्याप्रमाणे पंढरपुरास असताना महाराज निवडुंगाच्या फंट्यात गुप्तपणे पडून होते. पण अखेरीस प्रत्यक्ष श्रीपांडुरंगानेच त्यांना प्रगट केले. तो अपूर्व प्रसंग असा.

विठोबा रघुनाथ बडवे नावाच्या श्रीपांडुरंगाच्या एका भक्ताला त्याच्या सगुणरूपाचे प्रत्यक्ष दर्शन व्हावे असे वाटत होते. तेव्हा पांडुरंगांनी त्याला असा दृष्टांत दिला की गोपाळपुऱ्यात निवडुंगांच्या फंट्यात जे संन्यासी स्वामी पडून राहिले आहेत त्यांना येथे घेऊन ये, म्हणजे तुला माझे दर्शन होईल. ह्याप्रमाणे लोक दिंडी पालखी घेऊन भजन करीत करीत गोपाळपुऱ्यात निवडुंगाच्या फंट्याजवळ आले. महाराज तेथेच पडून होते. लोकांना पाहून महाराज फंट्यात आणखी आत आत जाऊ लागले. तेव्हा लोकांनी त्यांना ओरडून सांगितले की, "आम्ही तुम्हाला त्रास देण्यासाठी आलो नाही. तुम्हाला घेऊन येण्याविषयी पांडुरंगाची आज्ञा आहे; म्हणून आम्ही आलो." त्यावर महाराज फंट्यांतून बाहेर

आले. तेव्हा लोकांनी त्यांना वाजतगाजत भजन करीत पांडुरंगाचे देवळात आणले. भजन समाप्त झाल्यावर सर्व मंडळी आपापल्या घरी निघून गेली, तेव्हा विठोबा बडव्यांनी महाराजांना विनंती केली की, "मला पांडुरंगाच्या सगुण-रूपाचे दर्शन द्या." त्याचा भक्तिभाव पाहून महाराज त्याला देवळात घेउन गेले व दार बंद करून घेतले. विठोबा बडव्याला श्रीपांडुरंगाच्या सगुणरूपाचे दर्शन झाले. त्या प्रसंगी प्रत्यक्ष श्रीपांडुरंगांनी त्याच्याशी भाषणही केले. पुढे विठोबा बडवे, नामदेव आबा बडवे, गंगाराम आबाजी बडवे, पुराजी भाऊ डिंगरे इत्यादि मंडळीस महाराजांनी उपदेश दिला. वरील प्रसंगी महाराजांनी श्रीपांडुरंगाच्या गळयांतील माळ आपल्या गळयात घालून घेतली व तेव्हापासून 'श्रीविठ्ठल', 'श्रीविठ्ठल' या भजनास सुरुवात झाली. पंढरपुरचे बडवे, पुजारी व सेवेकरी मंडळींना महाराजांनी श्रावणात श्रीपांडुरंगाचा सप्ताह करण्यास सांगितले व तेव्हापासून प्रतिवर्षी श्रावणमासी श्रीपांडुरंगाचा सप्ताह करण्याची प्रथा पडली.

महाराज पंढरपुरात व नंतर आळंदीत आल्यानंतर एखाद्या सामान्य वारकऱ्याप्रमाणेच राहात होते. वरील प्रसंगाने वारकरी सांप्रदाय चालविण्याचे कार्य महाराजांचे गळयात पडले असे म्हणण्यात काही चूक होणार नाही. 'ज्ञानोबा माऊली' या पुस्तिकेत श्री. ढेरे यांनी महाराजांसंबंधी जे म्हटले आहे की, 'पंढरीत आल्यावर तेथील भक्तीच्या रंगाने त्यांचे हृदयपरिवर्तन झाले; त्यांनी दंडकमंडलूचे चंद्रभागेत विसर्जन केले आणि गळयात तुळशीची माळ घालून वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतली' ते वरील प्रसंग लक्षात घेता कसे चुकीचे आहे हे सहज लक्षात येईल. संन्यासी राहूनही त्यांनी 'मंदावलेला भजन-मार्ग नव्याने सुरू केला.'

महाराज तेथे असता आणखी एक प्रसंग घडल्याविषयी हकीकत प्रसिद्ध आहे. कोणी दुष्ट यवनाने श्रीपांडुरंगास धोंडा मारून पायास जखम केली. योगायोग असा की अक्कलकोटास त्याच वेळी तेथील स्वामी उदास होऊन '**पंढरीचे लोका । किती मारूं हांका । तेथें माझा सखा । पांडुरंग ॥**' असे पुष्कळ वेळा म्हणत अश्रु ढाळीत बसले होते. या प्रकाराने पांडुरंगाची मूर्ती भंग पावली व आता काय करावे याची चिंता तेथील बडवे पुजाऱ्यांना लागून राहिली. शेवटी त्यांनी सर्व प्रकार महाराजांना सांगितला. महाराज म्हणाले, "आजची रात्र तशीच जाऊ द्या. पाहू आम्हाला काय करता येईल ते." रात्रीतून महाराजांनी काय केले ते त्यांना किंवा एका पांडुरंगालाच माहीत. पण दुसरे दिवशी सकाळी पाहतात तो मूर्ती पूर्ववत् झालेली. पांडुरंगाच्या पायाची जखम महाराजांनी झाडापाल्याच्या किमयेने दुरुस्त केल्याची कथा पंढरपूरच्या बडव्यांच्या तोंडून आजही ऐकावयास मिळते. मूर्ती पूर्ववत् झालेली पाहून सर्वांना फार आनंद

झाला. या प्रसंगाप्रीत्यर्थ महाराजांनी पंढरपुरात 'लक्ष भोजन' घातले. त्यांच्या सांगण्यावरून त्याच सपाटयात दुसऱ्या कित्येक लोकांनी सहस्रभोजने घातली.

आणखी एक गोष्ट अशी ऐकण्यात आहे की संकेश्वर मठाधिपती श्रीनरसिंह भारती (रघुनाथभट्ट जोशी, भिलवडीकर) यांचे समोर पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेसंबंधी जो एक मोठा कडाक्याचा वाद झाला होता, त्याकरिता महाराज पंढरपुराहून पुण्यास आले होते. पण ते पुण्यात पोचण्यापूर्वीच वाद होऊन गेला होता, म्हणून ते पुण्याहून आळंदीस गेले व शेवटी तेथेच राहिले.

परंतु हा तर्क बरोबर दिसत नाही. कारण पंढरपुरात महाराज यतिवेषाने होते ही गोष्ट सहस्रभोजन घालणाऱ्या लोकांच्या सांगण्यात येत असे. आळंदीत आले तेव्हा महाराज जटामंडित असून पुढे त्यांनी त्या काढविल्या असे श्रीअण्णासाहेब पटवर्धन म्हणत असत. यावरून पंढरपुराहून कोठे तरी हिंडत ते आळंदीस आले असावेत. पुढील प्रकरणात दिलेल्या सासवड येथील हकीकतीवरून हा हा समज दृढ होतो. दीर्घकालच्या भ्रमणानंतर महाराज अखेरीस आळंदीत स्थिर झाले. त्यांच्या तेथील वास्तव्यासंबंधी सविस्तर माहिती पुढील प्रकरणात दिली आहे.

---

प्रकरण सहावे

# आळंदींतील बारा वर्षे

**ज्याचें मंगल नाम साधकगणां तापत्रयी तारितें ।**
**मोहाचीं पडळें क्षणांत सगळीं ज्याची कृपा वारितें ॥**
**नाना वेष धरून भूवरि सदा हिंडे न कोणां दुरी ।**
**तो हा श्री नरसिंव्ह सद्‌गुरु सदा राही अलंकापुरी ॥**

**—अप्रबुद्ध**

## श्रीक्षेत्र आळंदी–महिमा

श्रीक्षेत्र आळंदी–देवाची हे स्थान फार पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे. स्कंदपुराणांतील 'सह्याद्रि' खंडांत या क्षेत्राचा उल्लेख आनंदविपिन, वारुण, कपिल, अल्का आणि सिद्धक्षेत्र या निरनिराळया पांच नावांनी आलेला आहे. येथे सिद्धेश्वर नांवाचे अनादी असे महादेवाचे स्थान आहे. एके काळी आळंदी हे शिवपीठ म्हणून मानण्यांत येत असे. या स्थानाचा उल्लेख 'अलक–महात्म्यांत' अलका, आनंदवन, अलकावती असा आहे. नामदेवादि साधुसंतांच्या अभंगांत आळंदीचा निर्देश अलंकापूर, अलंकापुरी, अलकावती या नावांनी केलेला आढळतो. इंद्रायणी नदीच्या तीरावर हे क्षेत्र वसले आहे.

निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई या सर्व भावंडांचा जन्म आळंदींतच झाला. अखिल महाराष्ट्राची माउली म्हणून ज्यांची कीर्ती आहे ते ज्ञानोबा माऊली, याच ठिकाणी देह कायम ठेवून चिर विश्रांति घेत बसले आहेत. आळंदीचा महिमा नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादि संतांनी आपल्या अभंगांतून गायिला आहे. '**नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे । एक वेळा जाइजें अलंकावती ।**' असे संत नामदेव म्हणतात. संतश्रेष्ठ एकनाथ महाराज तर आळंदीला 'संतांचे माहेर' आणि 'विश्रांतीचे स्थान' असे म्हणतात. '**विश्रांतीचे स्थान, संतांचे माहेर । ते या भूमीवर, अलंकापूर ॥**' आणि जन्ममरणाचा फेरा चुकविण्याकरिता सर्व भाविकांना ते हात जोडून सांगतात की, '**एकदां जा रे अलंकापुरा । जन्म येरझारा चुकवा ॥**' श्रीक्षेत्र आळंदीस प्रत्येक महिन्याच्या वद्य एकादशीस यात्रा भरते. स्वतः श्रीपांडुरंगानी आपल्या वचनाप्रमाणे–**कार्तिक शुद्ध**

**एकादशी । पंढरी यात्रा होईल सरशी । दुसरी कृष्णपक्षीं निर्धारिसी । तुज दिधली असे ॥**–कार्तिक वद्य एकादशीचा मान श्रीज्ञानेश्वर महाराजांना दिला आहे.

अशा या पवित्र क्षेत्रांत महाराज प्रथम शके १७९५ (इ. स. १८७३) मध्ये राहावयास आले. त्यापूर्वीही ते या स्थळी येऊन गेल्याचे ऐकिवात आहे. पण त्याविषयी निश्चित माहिती मिळत नाही. आळंदीत ते एकूण बारा वर्षे राहिले. मधून मधून पुण्यास व यात्रेच्या निमित्ताने देहू आणि पंढरपूर येथे जात असत. आळंदीस राहून जगदुद्धाराचे कार्य करीत असता महाराजांनी अद्‌भुत लीला व चमत्कार केले. त्यांनी केलेले हे चमत्कार योग, सिद्धि, मंत्रशास्त्र, तंत्रशास्त्र, काकतालीय न्याय, की अनंताशी साधर्म्य असल्यामुळे किंवा स्वतःच 'अनंत' असल्यामुळे झाले आणि ते कोणकोणत्या वर्गात बसतात ते ठरविणे हे विद्वान आणि त्या त्या विषयात पारंगत असलेल्या तज्ज्ञ व अधिकारी अशा लोकांचे काम आहे. मुक्याला वाचा फोडण्याचे किंवा लंगड्याला गिरीपर्वत ओलांडावयास लावण्याचे सामर्थ्य ज्या परमेश्वराचे ठायी आहे, त्याची लीला वर्णन करतांना माझ्यासारख्या मूढमतीची लेखणी असमर्थ ठरेल यांत काहीच नवल नाही.

## आळंदीत प्रवेश

आळंदीचे रहिवासी तुकाराम नामदेव रानवडे (शेतकरी) यांचे वडील नामदेवबुवा हे एके दिवशी कोर्टाच्या कामाकरिता सासवडला घोड्यावरून गेले होते. त्यावेळी महाराज कोर्टाजवळच्या एका झाडाखाली बसले होते. कोणी तरी सत्पुरुष किंवा दिव्य विभूती तेथे बसलेली आहे असे वाटून नामदेवबुवा त्यांच्या-जवळ गेले आणि त्यांनी त्यांना नमस्कार केला. महाराजांनी नामदेवबुवाला विचारले, "तुम्ही कोठले पाटील ?" ते म्हणाले, "मी देवाच्या आळंदीचा." त्यावर महाराज म्हणाले, "मलाही आळंदीला यावयाचे आहे." तेव्हा नामदेव-बुवा म्हणाले, "मी कोर्टात जाऊन हजेरी लावून माघारी येतो." त्याप्रमाणे ते कोर्टातून लवकरच परत आले आणि म्हणाले, "चला महाराज घोड्यावर बसा." तेव्हा महाराज म्हणाले, "मी घोड्यावर बसत नाही." म्हणून नामदेव-बुवा घोड्यावर स्वार झाले आणि महाराज पायींच पुढे निघाले. नामदेवबुवांनी घोडा सारखा दामटला तरी महाराज त्यांच्यापुढेच दोनतीन फर्लांग अंतरावर असावयाचे. अशा रीतीने महाराज 'थोरल्या पादुका' जवळ येऊन थांबले. काही वेळाने नामदेवबुवा तेथे येऊन पोचले. नंतर बोलत बोलत दोघेही पायीच आळंदीत आले. महाराज नामदेवबुवांना म्हणाले, "मला राहण्याकरिता डोंगरात एका बाजूला जागा दे." त्याप्रमाणे पद्मावती देवीचे बाजूला एका डोंगरात महाराज राहिले. डोंगरावर येणाऱ्या गुराख्यांना महाराज खाण्याकरिता लाडू वगैरे काढून

देत. पाणी पिण्याकरिता मागितल्यास महाराज त्यांना झाडाखाली उकरून पाहण्यास सांगत. थोडे उकरल्यावर पाणी लागत असे. पण पुढे लगेच ते पाणी नाहीसे होई. नामदेवबुवांनी क्षेत्रस्थ ब्राह्मण मंडळींना महाराजांबद्दल सांगितले व त्यांना गावात राहण्यास आणावे, अशी विनंती केली. त्याप्रमाणे बाळाबुवा चक्रांकित वगैरे ब्राह्मण मंडळी महाराजांना गावात आणावयास गेली. गावात आल्यावर काही दिवस गोपाळपुऱ्यांत माणकेश्वर यांचे वाड्यात राहून पुढे चक्रांकितांच्या माडीवर राहावयास गेले. याच ठिकाणी महाराज अखेरपर्यंत राहिले व ज्या दिवशी १२ वर्षे पूर्ण झाली त्या दिवशी आज जेथे त्यांची समाधी आहे तेथे आले.

## आळंदी क्षेत्रास उजाळा

श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीसारखा अमोल ग्रंथ लिहून वर्णाश्रम धर्माचे खरे स्वरूप काय आहे हे समाजाला सांगितले. त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार सर्वत्र केला. त्यामुळे सामान्य लोकांना स्वतःची आध्यात्मिक उन्नती करून घेण्याचा मार्ग मोकळा झाला. ज्ञानेश्वरानंतर परिस्थिती बदलली. लोकांना ज्ञानेश्वर आणि त्यांची शिकवण यांचा विसर पडला. यवनांचे राज्य झाले. हिंदु संस्कृतीवर अंतर्बाह्य संकट येऊन कोसळले. श्रीएकनाथ महाराजांनी ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण करून वरील संकट थोपविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून तुकाराम महाराजांनी केलेल्या कार्यामुळे ते भागवत धर्ममंदिराचे कळस झाले.

पंढरपुरात महाराज आले त्या वेळी वारकरी सांप्रदायातील लोकांची स्थिती कशी होती याविषयीचे विवेचन मागे केलेच आहे. श्रीपांडुरंगाचे पुजारी बडवे हे धनलोभी झाले होते. एकादशी व्रत करणे किंवा गळयात तुळसीमाळ घालणे, या गोष्टीही ते करीत नसत. म्हणून महाराजांनी त्यांना उपदेश केला की, '**सुकृत आपुले थोर म्हणून । पांडुरंगाचे घडतें पूजन । सांप्रदाया पूज्य आपण । म्हणून माळा गळा घालिजे ।।**' आणि '**तेवीं कंठी न मिरवितां तुळसी । व्रत न करितां एकादशी । प्रीय न व्हाल पांडुरंगासी । हें भूदेवासी सांगणे नको ।।**' ह्या उपदेशाने भानावर येऊन त्यांनी त्याप्रमाणे वर्तन करण्यास सुरुवात केली. '**स्वामी आज्ञा प्रमाण मानून । तैसेची वर्तती अवघे जन । त्यांची आज्ञा उल्लंघन । न करी दुर्जन असला जरी ।। मग हे पृथ्वीतळीचे देव । जे जपतप अवतार सावयव । स्वयें पांडुरंग करी गौरव । ते सदैव केवी न परिसती ।**' बडव्यांची ही स्थिती, तर बाकीच्या सांप्रदायिकांची काय असेल याची सहज कल्पना करता येते. स्वतः श्रीपांडुरंगानेच पंढरपुरात महाराजांना प्रगट केले आणि तेव्हापासून भक्तिमार्ग चालविण्याचे कार्य त्यांच्याकडे आले.

भागवत धर्ममंदिराचा पाया ज्या आळंदी क्षेत्रात आहे तेथील परिस्थिती कशी होती हे पाहिले तर भजनमार्ग अगदी मंदावला होता असे दिसते. लोकांत विलास करण्याची बुद्धी उत्पन्न झाली होती. भजनाऐवजी नाचतमाशांची गोडी त्यांना लागली होती. हे सर्व पाहून आळंदीत आल्यावर महाराजांनी जी गोष्ट प्रथम केली ती ही की, लोकांत भजनाविषयी आवड उत्पन्न केली. नादब्रह्माने आळंदी क्षेत्र आनंदमय करून सोडले. त्यांनी टवाळ लोकांना हाती धरून आळंदीतील भजनमंडळ तयार केले. महाराजांच्या वरवर दिसणाऱ्या रंगेल राहणीमुळे व विनोदी स्वभावामुळे आळंदीतील लोकांनी त्यांना सुरुवातीस फार विरोध केला; पण पुढे सर्वांची महाराजांवर श्रद्धा बसली व ते त्यांच्या भजनी लागले. त्याकाळी कुऱ्हाडे तालमीतील मंडळी तमाशा करीत असत. रामभाऊ हवेली, रंगू वस्ताद जोशी, पंढरीनाथ पोफळे, अप्पामामा केसरी वगैरे मंडळी तमाशा-प्रेमी होती. तमाशाच्या नादापासून या मंडळींना परावृत्त करून त्यांच्यात भजनप्रेम उत्पन्न करावे असे महाराजांच्या मनात आले. महाराजांच्या दर्शना-करिता वरील मंडळी कधीच येत नसत. एके दिवशी महाराजांनी त्यांना चक्रांकितांचे माडीवर बोलावून सांगितले की, "तमाशाच्या चालीवर अभंग बसवून मला म्हणून दाखवा." या मंडळींनी ते मान्य करून त्याकरिता आठ दिवसांचा अवधी मागून घेतला व त्याप्रमाणे त्यांनी अभंगाला तमाशाच्या चाली लावल्या. या तमासगिरांच्या भजनाचा कार्यक्रम एके दिवशी ठरला. त्या दिवशी नेहमीचे भजन बंद होते. भजन ऐकण्यास पुष्कळ मंडळी जमली होती. तमाशाप्रमाणे गणापासून प्रारंभ होऊन भजन अखेरपर्यंत फारच बहारीचे झाले. भजन समाप्त झाल्यावर मंडळींनी महाराजांना नमस्कार केला त्या वेळी महाराजांनी त्यांना सांगितले की, "आजपासून तमाशा बंद करून पुढे रोज येथे येऊन भजन करावयाचे." आणि याचबरोबर असाही धाक घातला की, "तसे जर न कराल तर काय होईल ते सांगता येत नाही. मग माझ्यावर बोल ठेवू नका. श्रीज्ञाने-श्वरांना व श्रीपांडुरंगाला तुमचे भजन आवडले आहे." रंगो वस्ताद यांनी 'होय' म्हणून म्हटले. त्याप्रमाणे ही मंडळी महाराजांकडे येऊन भजन करीत असत. ते सर्व पुढे महाराजांचे भक्त बनले. महाराज समाधिस्त झाल्यावरही ही मंडळी पुष्कळ वर्षे भजन करीत. या मंडळींपैकी रामभाऊ हवेली भजन विशेषेकरून फार चांगले करीत. त्यांच्या स्वतःच्या संबंधात घडलेले दोन चमत्कार याच प्रकरणात पुढे दिले आहेत.

लोकांमधील नाचतमाशाची आवड कमी झाली आणि ते महाराजांच्या मागे लागले. भजनाच्या जोडीला महाराजांनी नाथभागवत, ज्ञानेश्वरी यांवर नित्य प्रवचने करून लोकांना धर्मज्ञान दिले. त्यांच्या या धर्मजागृतीच्या कार्याचे वर्णन

'चित्रमय-आळंदी' या मार्गदर्शक पुस्तिकेच्या प्रकाशकांनी फार स्पष्ट शब्दात केले आहे—'मध्यंतरीच्या काळात मंदावलेला भजनमार्ग पुन्हा नव्याने सुरू करून आळसलेल्या आळंदी क्षेत्राला त्यांनी उजाळा आणला. उपनिषदे, शांकर-भाष्य, ज्ञानेश्वरी व नाथभागवतावर प्रवचने व वादसंवाद करून पुण्यातील विद्वानांना व मुमुक्षु साधकांना भागवतधर्मातील भक्तिज्ञानवैराग्याचे सिद्धांत पटवून देऊन व प्रसंगी काही योगमार्गाचे चमत्कारही दाखवून मुग्ध केले.' परमेश्वराची भक्ती कशी करावी हे त्यांनी लोकांना स्वतःच्या उदाहरणाने शिकविले. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकास ते श्रीज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेण्यास सांगत. स्वतः सर्व तऱ्हेची अद्भुत लीला करूनही आपल्याकडे कोणत्याही गोष्टीचे श्रेय न घेता ते श्रीज्ञानेश्वरांच्याकडे लावून देत. महाराजांनी श्रीज्ञानेश्वरांच्या स्तुतिपर केलेले 'श्रीज्ञानेश्वराष्टक' स्तोत्र जिज्ञासूंकरिता परिशिष्टात दिले आहे.

## महाराजांचे भजनप्रेम

महाराजांचे भजनप्रेम विलक्षण होते. संन्यासी असून श्रीविठ्ठलनामाचा गजर पाचदहा मिनिटे कानावर पडला की त्यांची भावसमाधी लागत असे. ते भजनात अगदी रंगून जात आणि तासन् तास भजन करीत. असे सांगतात की भजन करीत असतांना श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचा डोल होत असे. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीसमोरील ओवरीत दररोज रात्री महाराज हातात तंबोरी घेऊन भजन करण्यास उभे राहत. त्या वेळी भजनास फारशी मंडळी जमत नसे. गावातील टारगट लोकांनी त्यांची निंदासुद्धा करावी. '**को न याति वशं लोके मुखे पिंडेन पूरितः ॥**' हे तत्त्व महाराजांना चांगले माहीत होते. म्हणून ते भजन समाप्त झाल्यावर जमलेल्या मंडळीस प्रसाद म्हणून पेढे, बर्फी, कलाकंद वगैरे वाटीत. मग गर्दी काय विचारावी ! मध्यंतरी बर्फी वाटण्याचे त्यांनी बंद केले आणि गर्दीही ओसरली. म्हणून पुन्हा प्रसाद वाटण्यास सुरुवात केली आणि त्याबरोबर गर्दी पूर्ववत वाढू लागली. बर्फी पेढ्यांच्या आशेने का होईना पण भजनास या, ज्ञान ऐका आणि आपला उद्धार करून घ्या, हाच त्यात उद्देश होता. महाराजांनी आपल्या विलक्षण भजनप्रेमाने आळंदीकरांना आपल्या कच्छपी लावले. त्याविषयीची माहिती मागे आली आहेच.

## निंदकांचे हृदयपरिवर्तन

महाराजांची राहणी थाटामाटाची व रंगेल अशी होती. स्वभाव विनोदी होता. त्यामुळे आळंदीत आल्यावर प्रारंभी त्यांच्याविषयी लोकांच्या मनात निरनिराळे विकल्प उत्पन्न होऊ लागले. लोकांनी त्यांना सुरुवातीस फार विरोध

केला. पुढे सर्वच वातावरण निवळून निंदकही त्यांचे सेवक बनले. महाराज संन्यासी असून भोजनोत्तर तांबूल सेवन करीत. रंगोपंत चिंचोरे विडा कुटून द्यावयाचे काम करीत असत. दुपारी ज्ञानेश्वरीवर प्रवचन झाल्यावर महाराज फिरावयास निघत तेव्हा त्यांचा वेष विचित्र असावयाचा. कधी डोक्यावर टोपी तर कधी छाटी गुंडाळलेली असावयाची. कधी कधी अंगात कफनी घालून वर छाटी घेतलेली, मुखात तांबूल अशा थाटात महाराज फिरण्यास निघत. फिरून आल्यावर श्रीज्ञानेश्वरांना प्रदक्षिणा करून महाराज चक्रांकिताचे माडीवर जात असत. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या देवळाच्या आवारात कोपऱ्यातील ओवऱ्यात त्या वेळी श्री. बापू जोशी व श्री. हरीभाऊ जोशी राहत होते. हे दोघेही वेदशास्त्रसंपन्न असे विद्वान होते. त्यांनी महाराजांची, संन्यासी असून विडा खातात म्हणून थट्टा करावी. 'जरीचे कपडे घालतात, डोक्यास टोपी घालतात तेव्हा हे खरे संन्यासी नसून राजयोगी संन्यासी आहेत' असे म्हणून महाराजांची कुचेष्टा करण्यास त्यांनी कमी केले नाही. या जोशीद्वयांनी कधी चुकूनही महाराजांस नमस्कार केला नाही.

एका कठीण प्रसंगाने मात्र बापू जोशांचे हृदयपरिवर्तन होऊन ते महाराजांचे भजनी लागले. बापू जोशांचे पत्नीस काही आजार झाला. डॉक्टर, वैद्य यांचे औषधोपचार झाले पण गुण काही आला नाही. महाराजांकडे ज्ञानेश्वरी ऐकण्याकरिता त्या वेळी मार्तंड मामा नावाचे एक विद्वान गृहस्थ नित्य येत असत. ते नेहमी एका कोपऱ्यात ज्ञानेश्वरी ऐकण्यास बसत व ज्ञानेश्वरी समाप्त झाल्यावर महाराजांना नमस्कार करून निघून जात. यावरून महाराज मार्तंडमामांना म्हणत, "रामायण चालले असता मारुती जसा एका कोपऱ्यात बसून ऐकतो तसे तुमचे आहे." या मार्तंडमामांनी बापू जोशांना अनेक वेळा सांगितले की तुम्ही महाराजांची थट्टा करू नका. पण जोशी आपल्या विद्वत्तेच्या घमेंडीत होते. त्यांच्या पत्नीची प्रकृती जास्त बिघडून तिला अंथरुणांत उठून सुद्धा बसता येईना. मार्तंडमामांच्या मनात आले की बापू जोशी आता तरी ताळ्यावर येतील म्हणून सहज सुचवून पाहावे या हेतूने ते बापू जोशाकडे जाऊन म्हणाले, "तुम्ही महाराजांना शरण जा व विनंती करा की कुटुंबाला आजारातून बरे करा." त्याच दिवशी पूजेच्या वेळी बापू जोशांना गुंगी येऊन त्यात, आपण महाराजांची पूजा करीत आहोत, असे त्यांनी पाहिले. तेव्हा बापूंनी महाराजांना शरण जाण्याचे ठरवून ते त्यांच्याकडे आले. आपण त्यांची निंदा करतो तेव्हा महाराज काय म्हणतील हा विचार मनात न आणता महाराजांच्या पायावर डोके ठेवून त्यांनी प्रार्थना केली की, "कुटुंबाला आजारातून उठवा. तुमच्या दर्शनास येण्याची सुद्धा ताकद त्यांचे अंगात नाही. माझे अपराध पोटात घाला व कृपा

करा. आपण सांगाल ते मी करीन." महाराज दयाघन होते. त्यांनी बापूंना सांगितले, "उद्यापासून कुटुंबाला पाठीवर घेऊन जेवढ्या होतील तेवढ्या प्रदक्षिणा श्रीज्ञानेश्वर महाराजांना घाला, म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराज त्यांना बरे करतील. दुसरे काहीही औषध नको." बापू जोशांनी महाराजांचे वचनावर विश्वास ठेवून प्रदक्षिणा घालण्याचा उपचार केला आणि आश्चर्य हे की आठ दिवसात त्यांच्या कुटुंबाची प्रकृती पूर्णपणे सुधारली. तेव्हापासून बापू जोशी महाराजांचे एकनिष्ठ सेवक बनले.

महाराजांच्या येथे रोज भजन होत असे. भजन संपल्यावर लोकांना भरपूर प्रसाद मिळत असे. आळंदी क्षेत्रातील तमाशाप्रेमी लोकांमध्ये भजनाची गोडी महाराजांनी कशी निर्माण केली, हे मागे येऊन गेले आहेच. भजन संपल्यावर ज्याप्रमाणे भरपूर खिरापत वाटली जात असे त्याचप्रमाणे दोन प्रहरी होणाऱ्या भोजनाचे वेळी मिष्टान्नाची चंगळ असावयाची. भोजनाला आळंदी क्षेत्रातील पुष्कळ मंडळी असायची. मराठी शाळेतील एक ब्राह्मण शिक्षक हा काय प्रकार आहे हे पाहण्यास रोज येत असे. त्यांच्या डोक्यात एकदा महाराजांची परीक्षा पाहण्याची कल्पना आली. त्याने विचार केला की ही मंडळी रोज गोड खातात. आपण एक दिवस भजनाच्या वेळी प्रसाद आणून वाटू व तो ते कसा खातात ते पाहू. तेव्हा तो महाराजांच्या भोवतालच्या मंडळींना म्हणाला, "मी आज खिरापत आणून वाटणार आहे." तेव्हा मंडळी म्हणाली, "तुम्ही महाराजांना सांगा." त्याप्रमाणे मास्तर महाराजांकडे गेले व त्यांनी आपला हेतू बोलून दाखविला. महाराजांनी त्याचा मानस अंतर्ज्ञानाने ओळखला व त्याला प्रसाद आणण्यास सांगितले. मास्तरांनी प्रसाद आणला तो दिवस म्हणजे तमाशाप्रेमी लोकांनी महाराजांपुढे पहिले भजन केले तोच होय.

मास्तरांनी कडुलिंबाचा पाला कुटून त्याचे गोळे तयार केले व परातीत भरून प्रसाद म्हणून वाटण्याकरिता घेऊन आले. भजन संपल्यावर प्रसाद वाटण्याची वेळ आली तेव्हा महाराज म्हणाले, "कोणीही प्रसाद घेतल्याशिवाय जावयाचे नाही. मास्तरांची इच्छा सर्वांनी प्रसाद घ्यावा अशी आहे." एक गोळा मास्तरांजवळून घेऊन महाराजांनी खाल्ला व म्हणाले, "वा मास्तर वा! प्रसाद तुम्ही फारच चांगला करून आणला. काय उत्तम आहे! असा आजच्यासारखा प्रसाद मंडळींना पुन्हा खावयास मिळणार नाही. आता तुम्ही ताट घ्या व सर्वांना वाटा." त्याप्रमाणे मास्तरांनी प्रत्येकाला एकेक गोळा दिला. सर्वांनी मोठ्या आनंदाने तो खाल्ला. लिंबाचा गोळा आहे म्हणून कोणी म्हटले नाही किंवा ओकले पण नाही. प्रसाद वाटता वाटता एक गोळा राहिला. तेव्हा महाराज म्हणाले, "मास्तर, तो गोळा तुम्ही घ्या." तेव्हा मास्तर कां कूं करू लागले. ते

मनात खजील झाले. महाराज म्हणाले, "तुम्ही प्रसाद घेतल्याशिवाय तुम्हाला त्याचे श्रेय कसे मिळणार ?" मास्तरांना नाही म्हणायची सोय नव्हती. शेवटी त्या गोळ्यातील थोडा भाग तोंडात टाकला. मास्तरांना उलटी व शौचास होण्यास सुरुवात झाली. महाराजांनी सर्व गोळ्यांतील कडुपणा त्या एका गोळ्यात आणून ठेवला होता. मास्तरांनी महाराजांचे पाय धरले व म्हणाले, "महाराज, मी चुकलो, मरतो. मला वाचवा. मला माझ्या कर्माचे प्रायश्चित्त मिळाले. मी आता असे करणार नाही." मास्तर रडू लागले. तेव्हा महाराज म्हणाले, "काय हो मास्तर, तुम्हाला पाहवत नव्हते तर गप्प बसायचे होते. अशी खोडी कां केली ? प्रसाद कसला होता ते सांगा." मास्तरांनी खरा प्रकार निवेदन केला. सर्वजण मास्तरांची निर्भर्त्सना करू लागले. महाराजांना त्यांची दया आली. त्यांनी मास्तरांच्या पाठीवर हात ठेवून सांगितले की तो गोळा नदीत नेऊन टाकून द्या. त्याप्रमाणे केल्यावर मास्तर बरे झाले. तेव्हापासून ते रोज महाराजांचे दर्शनास येत असत. याप्रमाणे अनेक निंदक, विरोधक किंवा परीक्षा पाहणाऱ्यांच्या हृदयात पालट पडून त्यांची महाराजांच्या ठायी श्रद्धा जडली.

## १४ ऋषींची स्थापना

आळंदीतील वास्तव्यात महाराजांनी गोपाळपुऱ्यातील श्रीविठ्ठल रखुमाईचे मंदिर, इंद्रायणीचा घाट, ज्ञानेश्वरांचा रथ, श्रीमुक्ताबाईचे मंदिर वगैरे मोठमोठी कामे शिष्यमंडळींकडून करून घेतली. मुक्ताबाईचे मंदिर महाराजांनी इ. स. १८८१ मध्ये बांधले. या मंदिराच्या मंडपाचा एक खांब, जो बाजूच्या तुळशी-वृंदावनाच्या ओट्यावर आहे, तो स्वतः महाराजांनी आपल्या हाताने बसविला आहे, असे सांगतात. त्याचप्रमाणे इंद्रायणीच्या काठावर वड, पिंपळ व नांदुरकी मिळून एकूण चौदा वृक्ष एका ओळींत स्वतः महाराजांनी लावले. आळंदी क्षेत्रात येणाऱ्या यात्रेकरूना या वृक्षांच्या शीतल छायेत विश्रांती मिळावी या इच्छेने हे वृक्ष लावण्यांत आले. याविषयी कोणी विचारल्यास महाराज सांगत की पुढे ब्राह्मणभोजनास त्यांचा उपयोग होईल. आत्मज्ञानाने लावलेल्या या वृक्षांच्या छायेत पुढे महाराज समाधिस्थ झाल्यावर, हजारो लोकांच्या पंगतीच्या पंगती महाराजांचा प्रसाद ग्रहण करण्यास त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी बसत.

या वृक्षांसंबंधी अशी एक आख्यायिका ऐकण्यात आहे की या चौदा वृक्षांच्या रूपाने, खाली दिलेल्या प्रातःस्मरणातील श्लोकांत ज्यांची नावे आलेली आहेत अशा ऋषींची स्थापना केली व तशी त्यांना नावेही पण दिली.

प्रल्हाद नारद पराशर पुंडरीक । व्यासांबरीष शुकशौनक भीष्मदाल्भ्यान् ।
१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ १०
रुक्मांगदार्जुन वसिष्ठ बिभिषणादीन् । पुण्यानिमान् परम भागवतान् स्मरामि ॥
११ १२ १३ १४

नंतरच्या काळांत वरील चौदा वृक्षांपैकी एक वृक्ष उन्मळून पडला.

## श्रीज्ञानेश्वर महाराजांचा रथ

महाराजांनी आपल्या भक्तमंडळींच्या साह्याने श्रीज्ञानेश्वर महाराजांचा रथ तयार केला. रथाचे काम चालू असता कित्येक वेळा भक्त मंडळींकडून पैसे वेळेवर येत नसत. त्यामुळे काम करणारे सुतार, गडी वगैरे लोकांची मजुरी देण्यास मोठी अडचण पडे. अशा प्रसंगी महाराज उपरण्यातून मूठ भरून काढून त्यांच्या हातावर ठेवीत. त्यांच्या मजुरीइतकी नेमकी रक्कम त्यातून निघे. त्यामुळे मजूर वेळचे वेळेवर कामावर येत. रथाचे काम पूर्ण झाले. शके १८०३ मधील कार्तिकांत महाराजांनी रथोत्सव सुरू केला. रथ प्रचंड व जड आहे. त्यामुळे इंद्रायणीच्या वाळवंटातून हजारो भक्तांनी तो ओढण्यास सुरुवात केली. चाके वाळूत रुतून बसली. त्यामुळे रथ जागचा हालेना. यावेळी महाराज ज्ञानेश्वरांच्या मंदिरात होते व त्यांची भावसमाधी लागली होती. भक्तांनी त्यांना रथ हालत नाही ही बातमी सांगितली. बातमी ऐकताच महाराज स्वगत म्हणाले, "पूर्वी कृष्णावतारी आमचे (अर्जुनाचे) सारथ्य करून दमून गेल्यामुळे आपण रुसलेले दिसता. भगवन्! आपले मनोगत समजतो. हे पहा आम्ही आलोच आपले सारथी, होऊन........." असे म्हणून महाराज भावावेशांतच रथावर चढून सारथ्यासारखे बसले. "पुंडलीक वरदा हारि विठ्ठल! श्रीज्ञानदेव तुकाराम" असा गजर करताच चैतन्य भरल्याप्रमाणे तो जड रथ वाळवंटांतून निघून रस्त्यावर येऊन उभा राहिला. भक्त मंडळींनी मग तो ओढून गावप्रदक्षिणा पूर्ण केली. समाधिअवस्थेत, वरील प्रसंगी काढलेल्या संदिग्ध आणि सांकेतिक उद्‌गारांवरून आळंदीनिवासी लोकांची अशी एक समजूत होऊन बसली आहे की महाराज हे अर्जुनाचे अवतार आहेत.

## महाराजांचे भोजन

महाराज जेवतांना कोणालाही जवळ येऊ देत नसत. लक्ष्मणबोवा गांधी हे ताट वाढून आणीत व दूर जाऊन उभे राहत. काही झाले तरी मध्ये बोलू नये, अशी महाराजांची त्यांना आज्ञा होती. त्याप्रमाणे लक्ष्मणबोवांनी करावे. भोजनप्रसंगी होणारा प्रकार त्यांनी पाहिला तो असा :

जेवणाचे ताट वाढून आणले की महाराजांनी 'चलो आव !' असे म्हणावे. त्याबरोबर कित्येक राघू व एक मोठा बोका यांनी यावे. हे कोणीकडून येत हे काहीच कळत नसे. त्यांनी महाराजांचे पानातील अन्न खावयास सुरुवात करावी व महाराजांनीही त्यातील खावे. याप्रमाणे महाराजांचे भोजन त्यांच्या संगतीत होत असे. बोक्याने राघूंवर कधीच झडप घातली नाही व राघूही त्याला मुळीच

भीत नसत. त्यांचे भांडण होत असे ते महाराज मजेने पाहत, व कधीकधी तर आपणही त्यांच्यात भांडण लावीत. याप्रमाणे तास दोन तास खेळ चाले. पुढे महाराजांनी 'जाव' म्हटले की सर्व राघू उडून जात व बोकाही निघून जाई. ते कोणीकडे जात याचा काही पत्ता नसे. ते सर्व निघून गेल्यावर लक्ष्मणबोवांनी ताट परत न्यावे. याप्रमाणे महाराजांचा भोजनक्रम रोज चाले.

एकनाथांनी वर्णन केल्याप्रमाणे '**उच्छिष्ट प्रसाद सेवूं धणीवरी । मत्स्यरूप निर्धारी घेती सर्व ॥**' श्रीकृष्णाचे उष्टे मिळावे म्हणून इंद्रादि सुरवर गोपाळपुत्रांची अथवा जलचरादिकांची रूपे घेऊन येत असत, त्याप्रमाणे कोणीतरी भाग्यवान जीवन्मुक्त महाराजांचा प्रसाद मिळावा म्हणून महाराजांच्या आज्ञेवरूनच राघू व बोका या रूपांनी येत असले पाहिजेत यांत शंका नाही.

बुंधल ग्रामी रेवणनाथावर मात करण्याकरिता मच्छिंद्रनाथांनी – '**विहंगमादि श्वापदगण । सहज घेतसे पाचारून । तेही येती संशय सांडून । भेटी लागी तयाच्या ॥ करिस्कंधी करून आरोहण । अन्नोदकाते सेववून । जा म्हणता करिती गमन । तृप्त मना मिरवोनी ॥**' असा प्रकार केला; तसाच महाराजांचे भोजनाचे वेळी रोज होत असे. ज्याची सर्वाभूती समदृष्टी झाली आहे, अशा ब्रह्मवेत्त्यालाच असा खेळ करणे शक्य आहे.

## विठोबाचे दर्शन

मागील कथेत उल्लेखिलेल्या लक्ष्मणबोवा गांधींना आबाकाका असेही म्हणत. ते महाराजांचे एकनिष्ठ सेवक होते. महाराज समाधिस्थ झाल्यावरही समाधीची सेवा त्यांचेच हातून होत असे. वसंतऋतूतील चंदनाच्या उटीच्या वेळी समाधीस निरनिराळ्या रूपाने चंदनाने नटविण्याचे काम हेच करीत असत. त्यांतील त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते.

महाराज दरवर्षी पंढरपुरास विठोबाच्या दर्शनास जात असत व लक्ष्मणबोवा हे मागे आळंदीस राहत असत. एकदा लक्ष्मणबोवास पंढरीस जाण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणे त्यांनी महाराजांस विनंती केली. महाराज 'ठीक आहे' असे म्हणाले. पण निश्चयपूर्वक असे काहीच उत्तर दिले नाही. पंढरपूरची यात्रा जेव्हा निघाली तेव्हा महाराज लक्ष्मणबोवास म्हणाले, "तू व मी असे दोघेही पंढरपुरास गेलो तर येथे कोण आहे ? याकरिता तुला जावयाचेच असेल तर जा. मी घरी राहतो." महाराजांचे हे शब्द ऐकून आपण पंढरपुरास जावे अशी महाराजांची इच्छा नाही असे बोवास वाटून ते म्हणाले, "महाराज, असे कशाला करता ? आपण आपला नियम मोडू नये. मी राहतो. आपण पंढरपूरला जावे." बोवाचे भाषण ऐकून महाराज म्हणाले, "ठीक आहे." याप्रमाणे बोलून महाराज यात्रेकऱ्यांच्या बरोबर निघाले. विठोबाचे दर्शन होत नाही म्हणून लक्ष्मणबोवास

वाईट वाटले. पण, "महाराजांची इच्छा नाही; आपण काय करणार !" असे म्हणून त्यांनी आपल्या मनाचे समाधान करून घेतले.

इकडे यात्रेकऱ्यांबरोबर महाराज काही दूर गेल्यावर त्यांना म्हणाले, "जरा थांबा. मी आता जाऊन येतो." असे म्हणून महाराज परत आपल्या बिऱ्हाडी आले. तेथे लक्ष्मणबोवा एकटेच खिन्न चित्ताने बसले होते. महाराज लक्ष्मणबोवास म्हणाले, "तुला पंढरपुरास जाऊन विठोबाचे दर्शन घ्यावयाचे आहे की यात्रा पाहावयाची आहे ?" लक्ष्मणबोवा म्हणाले, "महाराज, मला विठोबाचे दर्शन घ्यावयाचे आहे. यात्रा पाहून काय करावयाचे आहे ?" त्यावर महाराज म्हणाले, "ठीक आहे. डोळे झाक व काही वेळाने उघड." लक्ष्मणबोवांनी त्याप्रमाणे डोळे झाकले व काही वेळाने उघडले, तो तेथे महाराज नसून विठोबाची एक मूर्ती, विटेवर उभी असलेली, त्यांच्या दृष्टीस पडली. लक्ष्मणबोवाने विठोबाच्या पायांवर डोके ठेवले व डोळे झाकून पुन्हा उघडले तो विठोबाची मूर्ती नसून महाराज उभे असलेले दिसले. "झाले विठोबाचे दर्शन !" असे महाराज म्हणताच, "होय महाराज" असे लक्ष्मणबोवांनी उत्तर दिले; तेव्हा "आता आम्ही जातो. तू तेथे रहा." असे म्हणून महाराज निघून गेले.

महाराज समाधिस्थ झाल्यावर लक्ष्मणबोवा पंढरपुरास गेले. तेव्हा महाराजांनी जे दर्शन त्यांना दिले होते तसेच दर्शन पंढरपुरास आहे, अशी त्यांची समक्ष खात्री झाली !

## लक्ष्मीनारायण-दर्शन

पुण्यास गणपतराव सोहनी म्हणून एक गृहस्थ राहत असत. त्यांनी तात्यासाहेब कर्वे (श्रीमंत पेशवे यांचे कुलगुरू) यांना विचारल्यावरून तात्यासाहेबांनी गणपतरावाला गायत्रीचे एक अनुष्ठान सांगून त्याच्या योगाने सहा महिन्यात लक्ष्मीनारायण-दर्शन होईल, असे सांगितले होते. त्यावरून सोहनी यांनी ते अनुष्ठान यथापूर्वक केले. मुदत संपत आली तरी दर्शन होईना म्हणून ते साशंक असत. अशा स्थितीत पुढे ते आळंदीस गेले. वेळ दिवसाची होती. महाराज माडीवर पलंग टाकून बसले होते. सोहनी यांनी जाऊन नमस्कार चमत्कार केल्यावर ते तेथेच बाजूला बसले. त्या माडीस दार तेवढेच असून मागच्या अंगाला गच्ची होती. तिला ज्ञानेश्वरांच्या बाजूने पायऱ्या नव्हत्या. तेव्हा माडीवर येणे झाल्यास ते याच म्हणजे सोहनी बसले होते त्याच दारातून शक्य होते. असे असता एकाएकी गच्चीकडील दारातून सुमारे चौदापंधरा वर्षांची नखशिखांत अलंकारांनी लदलदलेली, अत्यंत सुंदर अशी एक स्त्री ठुमकत ठुमकत व तोऱ्याने येऊन थेट महाराजांच्या मांडीवर बसली. तेव्हा महाराजांनी देखील तिचे तोंडावरून हात फिरविला व चुंबन घेतले. तिला मांडीवर बसलेले पाहताच

बावरलेले सोहनी अर्थातच मनात साशंक झाले व महाराजांनी चुंबन घेतले तेव्हा शरम वाटून त्यांनी तोंड एकीकडे फिरविले. ताबडतोब महाराजांनी त्या स्त्रीस 'तुमचे काम झाले' म्हणून सांगितले व ती उठून गेली. इकडे महाराज सोहनींना म्हणतात की, "वा ! गणपतरावजी, माणूस असावा तर आपल्यासारखाच. तोंड काय पण तुम्ही अगदी नेमक्या वेळेवर फिरविले !" त्या भाषणाने जास्तच चिडून गणपतराव काही न बोलता पुण्यास परत आले. नंतर थोड्याच वेळाने तात्यासाहेब कर्वे यांजकडून त्यांचेबद्दल (महाराजांबद्दल) माहिती मिळवावी म्हणून त्यांचेकडे गेले. तात्यासाहेबांनी विचारले, "व्रताचे काय झाले ?" तेव्हा गणपतराव म्हणाले की लक्ष्मीनारायणाचे दर्शन काही झालेच नाही परंतु एक चमत्कार पाहावयास मिळाला. असे म्हणून त्यांनी आळंदीस महाराजांचे येथे घडलेली सारी हकीकत सांगितली आणि पुढे म्हणाले की, "मला म्हातारा (महाराज) असा म्हणतो की, वा ! गणपतरावजी, तोंड काय वेळेवर फिरविले ?" तेव्हा कर्वे म्हणाले, "खरोखरच तू अभागी ! खरेच अगदी वेळेवर तोंड फिरविलेस." तात्यासाहेबांनी त्यांना सारा प्रकार समजावून सांगितला. तेव्हा गणपतरावाच्या लक्षात आले की ती स्त्री म्हणजे खुद्द लक्ष्मीच होती व मग त्यांना गच्चीत पायऱ्या वगैरे नाहीत असे असता ती तिकडून कशी आली, त्याचप्रमाणेच पुढे तेथून गेली कशी वगैरे साध्या गोष्टी आपणास का सुचू नयेत, म्हणून आश्चर्य वाटले.

## आबाकाकाशी विनोद

पूर्वी द्वापारयुगात श्रीकृष्ण भगवान यांनी नंदयशोदादिकांस आपले परमात्मस्वरूप दाखविले, परंतु ते त्यांस वारंवार मोह घालीत असत असे पुराणांतरी वर्णन आढळते. तसाच प्रकार महाराज याचे संबंधीही होत असे. कित्येक वेळा असे होत असे की आबाकाका (लक्ष्मणबोवा गांधी) हे महाराजांचे बरोबर खिडक्या वगैरे बंद करून बाहेर पडत व महाराज गेले असे पाहून दारास आपल्या हाताने कुलूप लावून नदीवर जात. तेथे जाऊन काही वेळ झाला नाही तोच त्यांना कोणी तरी, महाराज बोलावतात म्हणून सांगत येई. हे जाऊन पाहतात तो महाराज कोंडलेले असून रागाने शिव्या देत आहेत असे आढळून येई. "आम्ही काय तुझ्या बापाचे नोकर आहोत ? आम्हाला कोंडून चालला होतास" वगैरे वगैरे शब्द कानी येत असताच त्याने दार उघडून महाराजांना बाहेर काढावे. आबाकाका यांना, झालेल्या प्रकारावरून महाराजांच्या स्वरूपाविषयी खरी कल्पना येऊ लागावी व ते पूज्य भावनेने झालेल्या प्रकाराबद्दल क्षमा मागून महाराजांचे पाय धरीत व कृपा करा म्हणून म्हणत. तोच त्यांच्या पाठीवर थाप पडे आणि 'कां लक्ष्मण कसे काय आहे ?' असे महाराजांचे शब्द

ऐकू येत. याप्रमाणे कधी पाठीवर थाप मारून तर कधी प्रेमाने गळी पडून महाराजांनी आबाकाकाशी भाषण करावे. त्यामुळे त्यांना लगेच भुरळ पडावी. असे प्रकार पुष्कळ वेळा घडत.

## महाभूतांवर ताबा

महाराजांच्या शिष्यमंडळीत महाराजांचा फोटो काढावा अशी कल्पना निघाली. परंतु महाराज तसे करण्यास परवानगी देईनात. तेव्हा त्यांना फसवून फोटो काढावा असे ठरले व त्याप्रमाणे श्रीमंत बाबासाहेब सांगलीकर यांनी फिरावयाचे निमित्त करून महाराजांना पुण्यातील प्रसिद्ध फोटोग्राफर बरजोरजी यांचेकडे नेले. स्टुडिओत जाऊन बसताच सारा प्रकार महाराजांच्या लक्षात आला. महाराज नेहमीच्या हास्यमुद्रेने स्वस्थ बसले. फोटोग्राफरने फोटो काढण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! प्रत्येक वेळेस काच खराब होई. कारण, त्यावर महाराजांची प्रतिमा उमटलेली नसे. याप्रमाणे दहा पंधरा काचा वाया गेल्या. सांगलीकरांसारखे श्रीमंत गिऱ्हाईक नाराज होईल आणि फोटोग्राफर म्हणून असलेल्या प्रसिद्धीस बट्टा लागेल म्हणून बरजोरजींना फार वाईट वाटले. फोटोग्राफरला खेद होत आहे हे पाहून महाराज म्हणाले, "शेटजी, तुम्ही का वाईट वाटून घेता ? हा आमच्या चेहऱ्याचाच गुण आहे. त्याला तुम्ही काय करणार ? आज वेळ नाही. येईल एखादे वेळेला." या शब्दाने बरजोरजींचे समाधान करून महाराज परतले. समाधिस्थ होण्यापूर्वी स्वतःहून श्रीमंत बाबासाहेब सांगलीकर यांचेबरोबर महाराज त्याच फोटोग्राफरकडे गेले व स्वतःचा फोटो काढविला. त्याच वेळी आसनमांडी घालून बसलेला, उघडा लंगोटीचा व दरबारी थाटात बसलेला अशा तीन अवस्थांचे फोटो काढविले.

या तीन छायाचित्रांत एक रहस्य आहे. यांतील महाराजांची तीन रूपे सत्, चित् व आनंद या अवस्थांची द्योतक आहेत. लंगोटीचे छायाचित्र 'सत्'रूप, पोषाख घातलेले छायाचित्र 'चिद्रूप' आणि आसनमांडी घालून बसलेले 'आनंदरूप' आहे. या पुस्तकात दिलेल्या छायाचित्रात महाराजांचे या तिन्ही अवस्थांत दर्शन होईल.

## डोळ्यावाचून पाहणे

एका प्रसंगी महाराज व अण्णासाहेब पटवर्धन यांचे दृष्टी व डोळ्याची रचना यासंबंधी बोलणे चालले होते. महाराज म्हणाले, "डोळ्यावाचून पाहणे ते खरे पाहणे." अण्णासाहेबांनी विचारले, "हे कसे घडेल ?" तेव्हा जवळच पडलेला एक कागदाचा तुकडा घेऊन त्यास एक भोक पाडले व "काय तुला पाहावयाचे आहे, पहा" असे सांगितले. काबूलमध्ये त्या वेळी लढाई चालू होती

व तीच पाहावी असे अण्णासाहेबांच्या मनांत आले. तोच लढाईचा सर्व देखावा अण्णासाहेबांना दिसू लागला. त्याची सत्यता, पुढे वर्तमानपत्रात तसेच लिहून आले, त्या वेळी पटली. महाराजांनी थोड्या वेळाने तो कागद फाडून टाकला.

## नाडीपरीक्षा

एकदा महाराजांना हिवताप आला होता. भोवतालची मंडळी त्यांना औषध घेण्याविषयी आग्रह करू लागले. महाराजांनी औषध घेण्याचे साफ नाकारले. पण मंडळींचा फारच आग्रह पडला तेव्हा जरा रागावूनच महाराज म्हणाले, "आणा पाहू तुमचा नामांकित वैद्य कोणता आहे तो; म्हणजे मी त्याला आपली नाडी दाखवितो." वैद्यबुवा आले. शरीरातील सर्व नाड्या बंद करून महाराज वैद्यबुवास म्हणाले, "तुम्ही आमची नाडी पाहता ना ? पहा बरे आम्हास काय होते ते !" वैद्यबुवांनी नाडीस हात लावला तो काय आश्चर्य ! महाराज आपल्याशी प्रत्यक्ष बोलत असून नाडीचा तर अजिबात पत्ता नाही, असे त्यांस आढळून आले. त्यांनी महाराजांच्या पायावर डोके ठेवून म्हटले, "महाराज, आपण अविनाश, अनंत. आपली नाडी म्यां मूढाने पाहिली याबद्दल क्षमा करा." तेव्हा महाराजांनी वैद्यास उपदेशाच्या चार गोष्टी सांगून त्याचे समाधान केले.

## अदलाबदल

श्रीअण्णासाहेब पटवर्धन पुणे म्युनिसिपालटीचे सभासद होते तेव्हा एक इंग्रज अधिकारी म्युनिसिपल कार्पोरेटर म्हणून होता. त्याला तत्त्वज्ञानाची आवड असून त्याचा त्या विषयाचा व्यासंगही दांडगा होता. इंग्लंडमधील एक विद्वान प्रोफेसर त्याचा गुरु होता. अण्णासाहेब व सदर गृहस्थ यांची वेदान्तविषयक प्रश्नांवर नेहमी चर्चा होत असे. त्याला वेदान्तासंबंधी काही शंका होत्या व त्याचे समाधान काही होईना. तेव्हा अण्णासाहेबांनी सांगितले की, "माझे गुरु आळंदीस आहेत व ते तुझ्या शंकांचे निरसन करू शकतील. पण त्यांना इंग्रजी भाषा येत नाही." तरी त्या दोघांचे आळंदीस महाराजांकडे जाण्याचे ठरले. ज्या वेळी ते दोघे व्हिक्टोरियामधून आळंदीस पोचले तेव्हा महाराज, चक्रांकित यांच्या माडीवर तोंडावर उपरणे घेऊन ध्यानस्थ बसले होते. ते दोघेजण समोर येतांच महाराजांनी तोंडावरील उपरणे काढून टाकले व तो इंग्रज गृहस्थ ज्या शंका मनांत धरून आला होता त्यांची उत्तरे क्रमाने इंग्रजीत देण्यास सुरुवात केली. अण्णासाहेबांना फार आश्चर्य वाटले आणि तो इंग्रज गृहस्थ तर स्तंभितच झाला. शंकानिरसन झाल्यामुळे तो समाधान पावला. अण्णासाहेब व तो गृहस्थ पुण्यास परत गेले. वाटेत त्याने अण्णासाहेबांना "आपल्या गुरूला इंग्रजी भाषा येत नाही म्हणून खोटेच कां सांगितले" असे विचारले. त्याने आणखी एक

आश्चर्य व्यक्त केले; आणि ते म्हणजे महाराज बोलत असता त्याला असे वाटले की त्याचा इंग्लंडमधील गुरूच प्रत्यक्ष त्याच्या प्रश्नांची उत्तरे देत आहे. कारण महाराजांचा त्यावेळचा आवाज त्याला हुबेहूब त्याच्या गुरू-सारखा वाटला.

पुढे अण्णासाहेबांनी आळंदीस आल्यावर या प्रसंगाविषयी विचारले तेव्हा महाराज म्हणाले, "तुम्ही दोघे पुण्याहून निघालात हे मला समजले व येण्याचा उद्देशही कळला. त्यावेळी त्या गृहस्थाचा गुरू इंग्लंडमध्ये झोपला होता. तेव्हा त्याचे जागी मी गेलो व त्याला इकडे पाठवून दिले." ही प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी महाराजांचे एक भक्त कै. रंगनाथपंत धोत्रे हेही तेथेच उपस्थित होते.

## पिशाच्चास जलसमाधी

चक्रांकिताकडे राहण्यास येण्यापूर्वी महाराजांचे वास्तव्य काही दिवस गोपाळपुऱ्यांत माणकेश्वर यांचा एक वाडा होता त्यात होते. या वाड्यात कोणीही राहण्यास धजत नसे, कारण तेथे एक पिशाच्च राहत होते. पिशाच्चाच्या भयाने तो वाडा ओसाड पडला होता. एक दिवस लक्ष्मणबोवा गांधी गोपाळ-पुरास प्रदक्षिणा घालून येत होते. महाराजांनी त्यांना, "अरे लक्ष्मण, इकडे ये." म्हणून हाक मारली. लक्ष्मणबुवांनी वर पाहिले तेव्हा त्या वाड्याच्या खिडकीतून महाराज त्यांना हाक मारीत असल्याचे दिसले. तेव्हा ते माडीवर गेले व महाराजांना नमस्कार केला. महाराजांनी त्यांना कमंडलूतून पाणी आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते कमंडलू घेऊन निघाले. तेव्हा तेथील पिशा-च्चाने त्यांना एकदम उचलून खालच्या चौकात आणून ठेवले. या प्रकाराने लक्ष्मणबोवा घाबरून गेले व हा भुताटकीचा प्रकार आहे हे लक्षात येताच पाणी न आणता कमंडलू तेथेच टाकून ते जाऊ लागले. महाराजांनी हे सर्व ओळखून लक्ष्मणबोवांना न घाबरता पाणी आणण्यास सांगितले. महाराजांच्या शब्दावर विश्वास ठेवून त्यांनी पाणी आणले. चौकात आल्याबरोबर पुन्हा पिशाच्चाने त्यांना उचलून वर महाराजांसमोर आणून ठेवले. त्यामुळे लक्ष्मणबोवा तर फारच घाबरले. तेव्हा महाराजांनी त्यांना तेथेच बसून राहण्यास सांगितले. इतक्यात गोपाळपुऱ्यांतील शास्त्री, पुराणिक मंडळी महाराजांकडे आली. महाराजांचे व त्या पिशाच्चाचे संस्कृतमध्ये संभाषण झाले. पिशाच्च मुक्ति देण्याविषयी महाराजांना विनवीत होते. हो नाही करिता करिता महाराज 'बरे' म्हणाले. सर्व मंडळी अगोदर खाली आली, व नंतर पिशाच्च व महाराज आले. खाली येतांना पिशाच्च पाय आपटीत येत होते. हे फक्त महाराजांनाच दिसत होते. पण बाकीच्यांना पायाचा किंवा बोलण्याचा आवाज ऐकू येत होता. गोपाळपुऱ्याच्या घाटावर ही सर्व मंडळी आली. महाराजांनी तेथे पिशाच्चास

उडी टाकण्यास सांगितले. त्याबरोबर पाण्यांत कोणी तरी धपकन पडल्याचा आवाज होऊन पाणी वर उसळले. तेव्हा महाराजांनी बरोबरच्या मंडळींना सांगितले की त्या वाड्यांतील पिशाच्चास मुक्ती मिळाली आहे. आता काही भय नाही. महाराजांना नमस्कार करून सर्व मंडळी निघून गेली. महाराज लक्ष्मणबोवांना म्हणाले "तू येत जा." तेव्हा लक्ष्मणबोवा म्हणाले, "मी आता आपले चरण सोडणार नाही. मी तुम्हाला कधी पाहिले नाही. तुम्ही मला 'लक्ष्मण' म्हणून हाक मारली. मजकडून सेवा करून घेतली. आता मी आपणास सोडून जाणार नाही." तेव्हापासून लक्ष्मणबोवा महाराजांच्या सेवेस राहिले. या प्रसंगा-नंतर महाराज बाळाबुवा चक्रांकित यांचेकडे येऊन राहिले व संस्कृत ऐवजी प्राकृत बोलू लागले.

## सातशे वर्षांचा ब्रम्हसमंध काढला

एके दिवशी सायंकाळी महाराजांचे येथे पोथी चालू होती. त्या वेळेस अण्णासाहेब पटवर्धन तेथेच होते व इतर मंडळीही पुष्कळ जमली होती. एकाएकी सोसाट्याचा वारा वाहू लागला व आकाश अभ्राच्छादित होऊन अंधार पडला. तेव्हा महाराज बाळाबोवा यास म्हणाले, "बाळाबोवा आपल्या गावात जर कोणी अशा वेळी अनाथ, दीन असा पाहुणा आला तर त्याचा आपण सत्कार केला पाहिजे. याकरिता तुम्ही दिवा घेऊन जा व धर्मशाळेत कोणी असेल तर त्याला इकडे घेऊन या." असे ऐकताच बाळाबोवा धर्मशाळेकडे दिवा घेऊन गेले व तेथे 'कोण आहे ?' म्हणून विचारले. तेव्हा एक संन्यासी, अंगावर कपडा नाही असा, एका कोपऱ्यांत थंडीपासून बचाव व्हावा म्हणून पाय पोटाशी घेऊन पडला होता, त्याने आवाज दिला. 'कोण आहे ?' म्हणून बाळाबोवाने विचारतांच "मी संन्यासी आहे. थंडी वाजते. कपडा नाही." म्हणून संन्याशाने उत्तर दिले. तेव्हा बाळाबोवा म्हणाले, "चला. महाराजांनी तुम्हाला बोलाविले आहे." संन्यासी म्हणाला, "मीही त्यांच्या दर्शनाकरिताच येथे आलो. पण अंधार असल्यामुळे व रस्ता माहीत नसल्यामुळे येथे पडलो आहे." नंतर बाळाबोवांनी स्वामीस बरोबर घेतले व ते निघाले.

इकडे स्वामी येण्यापूर्वी महाराज मंडळीस म्हणाले की त्या खिडकीजवळ एक पाट ठेवा. त्याप्रमाणे मंडळींनी एक पाट ठेवला. स्वामी वर आले तो दरवाजापासून पाटापर्यंत बरीच मंडळी बसली होती. त्या मंडळींच्या डोक्यावरून स्वामी हातमागातील धोट्याप्रमाणे अंतरिक्षांत उडून पाटावर बसले, व 'हुं हूं' करून ओरडू लागले. सर्वांना आश्चर्य वाटले. महाराज म्हणाले, "यांना कांही संचार आहे असे दिसते. आमच्या गुरूंनी आम्हाला एक मंत्र शिकविला आहे. त्याच्या योगाने भुते पळतात. त्याचा उपयोग करून पाहण्याची बरी संधी आली

आहे." असे म्हणून त्यांनी मंत्रोच्चार केल्याप्रमाणे दाखविले व संन्याशी यांचे-जवळ हकीकत विचारली. तेव्हा स्वामीच्या अंगात आलेले भूत बोलू लागले. ते भूत म्हणाले. "मीहि संन्यासीच आहे. माझा या स्वामीच्या पूर्वजाने फार मोठा अपराध केला आहे. म्हणून मी यांच्या वंशास लागलो आहे. आज या गोष्टीस सातशे वर्षे झाली आहेत. मी याचा निर्वंश करणार. निर्वंश करता करता फक्त हा एकटाच या वंशात राहिला आहे. यानेही माझ्या भीतीने लहानपणीच संन्यास घेतला. आता याला शेवटाला पोचविले म्हणजे माझा राग शांत होईल." महाराज भुतास म्हणाले, "आपण श्रेष्ठ आहांत. आपणाला हे योग्य नाही. बिचाऱ्याला फार त्रास दिला. आता सोडा." महाराजांचे हे सौम्य शब्द ऐकून ते भूत जास्तच जोरास आले व 'नाही, नाही' करीत ओरडले. तेव्हा महा-राजांनी किंचित् कडक शब्दांनी सांगितले की, "आपण आमचे ऐकणार नसला तर आम्हाला कडक उपाय योजवा लागेल." तेव्हा त्या भुतास महाराजांचे खरे स्वरूप कळून आले व त्यामुळे त्याने एकदम किंकाळी फोडली व म्हटले, "नको, नको. मी अक्कलकोटाहून जाऊन येतो. मग काय करावयाचे ते करीन." महाराज निर्धाराने म्हणाले, "नाही, नाही. आता जाण्याचे नाही. आता आपली काय काय इच्छा असेल ती तृप्त करून घ्या व येथेच शांत रहा." तेव्हा आपले कांही चालत नाही असे पाहून ते भूत मोठ्याने ओरडून म्हणाले, "काय करावे ? या स्वामीने मला फसविले. तुझ्याकडे यावयाचे मला कळविले नाही. आता काय उपाय ! तू नरहरि आहेस. तुझ्यापुढे कोणाचे काय चालणार !" पिशाच्च योनीला अवताराचे खरे स्वरूप कळते. मनुष्यास मात्र कळत नाही. त्याप्रमाणे या पिशाच्चाने महाराज नरहरि आहेत हे ओळखले व त्याप्रमाणे ते बोललेही. पण ही गोष्ट इतर श्रोत्यांच्या लक्षांत येऊ नये म्हणून महाराज ताबडतोब मंडळीस म्हणाले, "जाऊ द्या. पिशाच्चे मनांत येईल ते बडबडतात. आपली पोथी चालू द्या." या प्रमाणे पिशाच्चाच्या भाषणाचा खरा अर्थ मंडळींच्या लक्षांत येऊ नये म्हणून महाराजांनी कांही वेळ पोथी चालविली व पुन्हा त्या पिशाच्चास 'जा' म्हणून सांगितले, तेव्हा पिशाच्च म्हणाले, "मी जातो. पण मला तुझ्या पायाचे तीर्थ दे व एक छाटी दे." तेव्हा, "फार थोडयावर निभले." म्हणून महाराजांनी आपल्या पायाचे तीर्थ स्वामीच्या अंगावर शिंपडले व आपली एक छाटी त्याच्या अंगावर पांघरविली. नंतर महाराजांनी त्या पिशाच्चाने पछाडलेल्या स्वामीचा हात पकडला व त्याला घेऊन श्रीज्ञानेश्वर महाराजांचे पायरीपाशी गायमुखाजवळ आणले, व "येथे ज्ञानोबाच्या चरणाजवळ अखंड रहा बरे" असे म्हणून त्या स्वामीच्या पाठीवर चापट मारली. त्या सरशी

स्वामींनी गायमुखावरून ताडकन उडी मारली. त्याच्या अंगातील संचार नाहीसा झाल्यामुळे त्याला फार हलके वाटू लागले.

याप्रमाणे ७०० वर्षांचा जुना समंध महाराजांनी काढला. पिशाच्च निघून गेल्यावर त्या स्वामींनी सांगितले की या पिशाच्चाच्या भीतीने मी संन्यास घेतला व मला असे वाटले की निर्वंश स्थिती झालीच आहे असे समजून मला हा समंध त्रास देणार नाही. पण संन्यास घेतल्यावरही याने मला त्रास दिला. याने मज-कडून हिंदुस्थानातील सर्व तीर्थयात्रा पायी करविल्या. नाही जात म्हटले की माझे अंग शिशाप्रमाणे जड पडत असे व अत्यंत वेदना होत. जातो म्हटले की अंग अत्यंत हलके होई व अत्यंत वेगाने जात असे. असे होता होता मला कोणी आळंदीस जाण्यास सांगितले. पण पिशाच्चाने अक्कलकोटास चल म्हणून सांगितल्यावरून तिकडे निघालो. मार्गात आळंदी असल्यामुळे येथे आलो व अनायासे महाराजांच्या कृपेने मुक्त झालो.

मागील दोन्ही चमत्कार वाचून श्रीगुरुचरित्रातील २३ व्या अध्यायात गाणगापुरातील पिंपळाच्या वृक्षावरील ब्रह्मसमंधास मुक्ती दिल्याचा जो कथा-भाग आहे तो दृष्टिसमोर उभा राहील.

## कोटी तीर्थ

इ. स. १८७६-७७-७८ या तीन वर्षी पाण्याचा फार मोठा दुष्काळ पडला होता. आळंदीच्या पंचक्रोशीत पाण्याचा एक थेंब देखील नाही अशी परिस्थिती उत्पन्न झाली. तेव्हा महाराजांनी कृपाळू होऊन तेथे एका पिंपळाच्या झाडा-खाली 'कोटीतीर्थ' काढले. ती जागा श्रीअण्णासाहेब पटवर्धन नेहमी दाखवीत असत. त्या झऱ्यात वेगवेगळ्या दिशेने बारीक अशा असंख्य धारा पडत होत्या. त्या स्वत: श्रीअण्णासाहेबांनी पाहिल्या होत्या. एके दिवशी असा वाद निघाला की यातील पाणी वेगवेगळ्या तीर्थांचेच कशावरून? तेव्हा महाराज म्हणाले, "तुमच्या इंग्रजी पद्धतीप्रमाणे घटक द्रव्यांच्या वर्गीकरणाने परीक्षा करावी." ते ऐकून बडोद्याचे हायकोर्ट जज्ज रा. जनार्दन सखाराम गाडगीळ या गृहस्थाने, महाराजांनी कृष्णेच्या गंगेच्या म्हणून सांगितलेल्या धारांचे पाणी धरून परीक्षा (analysis) करविली. पुढे त्या त्या नद्यांची जले आणवून परीक्षा पाहता तंतोतंत साम्य आढळले. तेणेकरून सर्वांस फार नवल वाटले. हे तीर्थ तेथे एक वर्ष होते. पुढे पाऊस वगैरे पडल्यावर एक दिवस महाराजांनी आपल्या हातांनी त्यात मूठभर माती लोटून बुझविले. ती बातमी लोकांस समजून तो झरा पुन्हा उकरावा म्हणून त्यांनी त्या ठिकाणी दीड दोन पुरुष जागा ऐसपैस चांगल्या विहिरी-सारखी खोदून काढली, पण उपयोग झाला नाही.

हे तीर्थ कलियुगाच्या मध्यभागी प्रसिद्ध व्हावयाचे आहे व तेथे जगाच्या उद्धारार्थ अवतरलेल्या महाराजांचा पुन्हा वास होणार आहे. त्याबद्दलची हकीकत अशी की, एकदा तेथे महाराज, अण्णासाहेब व आणखी एक गृहस्थ असे तिथे बसले असता महाराज म्हणाले की, "या तीर्थाचे अवतीभोवती संगमरवरी दगडी इमारत बांधावीशी वाटते. तीर्थावर देखील एक मजला असावा व तेथे राहावे, गावांतून भिक्षा मागून जेवावे, दोन काळे कुत्रे येथे असावेत, त्यांचेबरोबर पडून राहावे. तसेच तीर्थास सर्वांनी यावे, इमारत अशी असावी..." वगैरे. असे भाषण चालू असता अण्णासाहेब जवळ बसलेल्या गृहस्थाला बोटाने टोचून म्हणत होते की, "अरे, तू म्हण मी बांधतो महाराज, म्हणून." असामी चांगली श्रीमंत होती, पण गडचाला हो म्हणण्याची बुद्धी काही होईना. हा प्रकार महाराजांचे लक्षात येऊन त्यांना हसू आले. रात्री त्यांनी अण्णासाहेबांस स्वतः सांगितले की हे सर्व खरे; पण इतक्यात व्हावयाचे नाही. अजून अवकाश आहे. कलियुगाचे मध्यभागी हे प्रगट होईल. हे तीर्थ तेथे आहे म्हणून पुराणांतरी लिहिले आहे. परंतु पाहू जाता मिळावयाचे नाही. अशा शंकेवरून झालेल्या बोलण्यात, पुराणांतरीच्या हकीकतीसंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. पुराणे ही सबंध कलिकालाकरिता आहेत. व त्याप्रमाणे त्यातील वर्णने व इतिहास सर्वच मागे झाले आहेत असे समजता कामा नये. पुराणात तीर्थक्षेत्रे वर्णिली आहेत त्यातील काही प्रगट होऊन लुप्तमाहात्म्य झाली आहेत, काही प्रगट आहेत व काही प्रगट होणार आहेत. परंतु यासंबंधी सर्व खुलासा त्यात नसल्यामुळे ते सर्व मागे झाले असे समजून आज तेथे ते माहात्म्य व ते स्थळ नाही म्हणून पुराणांचे वर्णन खोटे म्हणणे चूक होईल. कोटीतीर्थाची गोष्टही अशीच आहे. ते तेथे आहे असे नुसते मोघम वर्णन पुराणात आहे, परंतु आज पाहू गेले असता दिसणे शक्य नाही. कारण ते पुढे प्रगट व्हावयाचे आहे. परंतु आजही तेथे, ज्याप्रमाणे अनुवंशिक रोग रक्तात परिपूर्ण असून कालांतराने व्यक्त होतो, पण मुळापासूनच असतो त्याप्रमाणे हे तीर्थ परिपूर्ण असून अव्यक्त दशेत आहे. महाराजांनी आपल्या सामर्थ्याने एक वर्ष बळेच व्यक्त केले एवढेच.

## श्रीगुरुचरित्रातील ३८ व्या अध्यायाची पुनरावृत्ती

आळंदीस महाराज बाळाबोवा चक्रांकित यांच्या येथे राहत असतांनाची गोष्ट. माघ शु. चतुर्थी शके १७९८ इंग्रजी दि. १८–१–१८७७ रोजी सायंकाळी महाराज बाळाबोवास म्हणाले, "बाळाबोवा तुमचा मुलगा मुंजीचा झाला आहे. त्याची मुंज करून टाकावी." बाळबोवा म्हणाले, "महाराज, मुंज करणे जरूर तर आहेच पण पैशाची सोय नाही." महाराज म्हणाले, "ब्राह्मणाचे मुंजीस काही खर्च लागत नाही. उद्या मुहूर्त असल्यास करून टाका." तेव्हा पंचांगात पाहिले

तो माघ पंचमीला मुंजीचा मुहूर्त नव्हता. तेव्हा महाराज म्हणाले, "ज्योतिषाला जाऊन विचारा." त्याप्रमाणे विचारता ज्योतिषाने सांगितले की अर्धी घटका मुहूर्त आहे. महाराज म्हणाले, "पुष्कळ वेळ आहे. बाळाबुवा, तयारी करा." तेव्हा बाळाबोवा फार संकटात पडले. कारण मुंजीच्या मुहूर्तास रात्रीचाच वेळ होता. तेव्हा महाराज म्हणाले, "तुम्ही भोवतालच्या गावी जाऊन सर्वांस पानसुपारीस बोलवावे." त्याप्रमाणे बाळाबोवांनी ताबडतोब माणसे पाठवून शेजारच्या गावच्या लोकांना मुंजीचे बोलावणे धाडले व आपणही एका गावी गेले. परत येऊन पाहतात तो घरासमोर टोलेजंग मंडप पडला आहे. साहित्य वगैरे सर्व तयार असून स्वयंपाकाची तयारीही चालली आहे. हे पाहून बाळाबोवास आश्चर्य वाटून ते जास्त विचार करू लागले तोच महाराज म्हणाले, "बाळाबोवा, तुम्हा गृहस्थांच्या युक्त्या तुम्हासच माहीत ! पैसा नाही, साहित्य नाही वगैरे आम्हास सांगितले; पण ही केवढी तयारी चालविली आहे. तुम्ही लोक मोठ्या आतल्या गाठीचे असता." महाराजांचे हे शब्द ऐकून 'मी महाराजांशी खोटे बोललो' असे यांना वाटते म्हणून बाळाबोवास वाईट वाटले व ते म्हणू लागले, "महाराज मी अगदी खोटे बोललो नाही. माझ्या घरी काहीही साहित्य नाही आणि हे कोठून आले हे माहीतही नाही." महाराज म्हणाले, "ते ठीक आहे. तुमचे घरी साहित्य नाही पण तुमचे निरोपावरून (नाव घेऊन) यांनी गाड्या धाडल्या. त्या उतरून घेण्यास माणूस देखील कोणी नव्हता. तेव्हा मला ते सर्व करावे लागले." महाराजांचे हे भाषण ऐकून बाळाबोवास महाराजांना फार श्रम झाले म्हणून फारच वाईट वाटले, पण महाराजांच्या मायेने त्यांच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान झाले नाही. वास्तविक पाहता एवढ्या थोड्या वेळात साहित्य कसे येणार; आले तरी ते इतके तयार कसे होणार; नुसता मंडप घालावयाचा तरी त्याला दोन तीन दिवस लागावयाचे; पण सर्व मंडप चार तासातच तयार ! इतकेच नव्हे तर शेकडो माणसांची जेवणाची सामग्री तयार असून स्वयंपाकही चालू झालेला ! या सर्व गोष्टी उघड उघड दिसत असून केवळ महाराजांच्या मायिक भाषेने, बाळाबोवास महाराजांचे अघटित घटना समजण्याचे ज्ञान न होता महाराजांस पोते उचलण्याचे श्रम झाले म्हणूनच वाईट वाटले. असो. मुंज झाली. सुमारे दोन प्रहराचे वेळेस पंगती बसल्या. त्यावेळेस महाराज मंडपाच्या पुढे विटांचा ढीग होता त्यावर बसले होते. तेथून जेवणाऱ्या मंडळीस आग्रह करीत होते.

जेवणाच्या पंगती बसण्याच्या सुमारास श्रीअण्णासाहेब पटवर्धन चासेहून पुण्यास परत जाताना मुद्दाम आडवाट करून आळंदीस महाराजांच्या दर्शनास आले. महाराजांचे दर्शन घेतले तेव्हां महाराज म्हणाले, "दादा बरे झाले

आलास. जेवावयास बैस. आज आपल्या त्रिंबकाची मुंज झाली." आज्ञेप्रमाणे अण्णासाहेब स्नान करून जेवावयास बसले. त्या वेळेस, वाढणाऱ्या मंडळींना सोयीचे पडावे म्हणून तूप, दूध, दही वगैरेची भांडी पंगतीत मंडपाच्या खांबास टेकून ठेवली होती. वाढणारी मंडळी त्यांतून भांडी भरून नेत व पंगतीत वाढत असत. श्रीअण्णासाहेब ज्या ठिकाणी जेवायला बसले होते, त्या ठिकाणचे खांबा-जवळ दुधाचे भांडे ठेवले होते. जेवणाची धूम चालली होती. महाराज आग्रह करीत व मंडळी प्रेमाने वाढीत आणि जेवणारी मंडळी वरकांती नको म्हणत उत्साहाने जेवीत होती. त्या वेळी, जवळच असलेल्या दुधाच्या भांड्याकडे अण्णासाहेबांचे सहजच लक्ष गेले. तेव्हा त्यांना असे दिसले की वाढणारी मंडळी भरभर आपापली भांडी भरून दूध नेतात पण खांबाजवळच्या भांड्यातले दूध कमी होतच नाही. इतर मंडळी कामात दंग असल्यामुळे त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली नाही. पण अण्णासाहेबांचे लक्ष गेले व त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली. तेव्हा काय चमत्कार म्हणून अण्णासाहेब मनाशी विचार करतात तोच महाराज एकदम ओरडले, "दादा इकडे तिकडे काय पहातोस ? समोर पाहून जेव. जेवतांना दुसरीकडे लक्ष देऊ नये." महाराजांचे हे शब्द ऐकून अण्णासाहेबांची खात्री झाली की सर्व प्रभाव महाराजांचा आहे; पण तो त्यांना लोकात प्रकट करू द्यावयाचा नाही. म्हणून अण्णासाहेब मुकाट्याने जेवू लागले. जेवण झाल्यावर, झालेला प्रकार कोणाच्या लक्षात येऊ नये अथवा कोणाला त्याबद्दल विचार करण्यास सवड मिळू नये म्हणून महाराजांनी बाळा-बोवांची सर्व मंडळींत थट्टा करण्यास आरंभ केला. सर्व मंडळी गेल्यावर अण्णासाहेब वगैरे शेलकी दोनतीन मंडळी असताना महाराज म्हणाले, "अरे, ही मडकी आहेत. मोडणे व घडणे आपल्या स्वाधीनचे आहे." त्या दिवशी रात्री सर्वत्र निजानीज झाल्यावर महाराजांनी अण्णासाहेबांस सांगितले की "दादा, ती माणसेही येथली नव्हती आणि ती सामग्रीही येथील नव्हे !"

श्रीगुरुचरित्राच्या ३८ व्या अध्यायात, गुरुभिक्षा करण्याकरता दोन-तीन माणसांना पुरेल इतकी अन्नसामग्री घेऊन आलेल्या भास्कर ब्राह्मणाच्या निमि-त्ताने श्रीगुरूंनी चार हजार पान जेवू घातले, असा कथाभाग आहे, तीच लीला महाराजांनी पुन्हा त्रिंबकाच्या मुंजीच्या प्रसंगी आळंदीत करून दाखविली.

## चिंतामणशास्त्री व ज्ञान-यक्षिणी

पुण्यास डेक्कन कॉलेजमध्ये पूर्वी चिंतामणशास्त्री वरुडकर म्हणून एक संस्कृतचे अध्यापक होते. शास्त्रीबोवांस ज्ञान यक्षिणी साध्य असून त्यायोगे वाद करतांना प्रतिपक्षावर जय मिळविता येई. महाराजांची विद्वान म्हणून सर्वत्र ख्याती पसरली होती, तेव्हा त्यांच्याशी वाद करून त्यांची परीक्षा करावी, या

हेतूने शास्त्रीबोवा आळंदीस आले. परंतु मौज अशी की माडीचे आत शिरल्या-बरोबर शास्त्रीबोवांची सिद्धी नष्ट झाली. त्यांना वाद करण्याचे काहीच सुचेना. म्हणून त्यांनी आजूबाजूला पाहिले. तेव्हा नेहमी बरोबर असणारी ज्ञान यक्षिणी दाराबाहेर रस्त्यावर उभी होती. तिने महाराजांकडे पाठ फिरविली होती. कारण तिला महाराजांचे तेज सहन होईना. शेवटी तिने खूण करून शास्त्री-बोवांस सांगितले की, 'मला आत येणे शक्य नाही तेव्हा आपण बाहेर यावे.' यावरून महाराज हे आपणापेक्षाही जास्त मांत्रिक आहेत अशी शास्त्रीबोवांची समजूत झाली. मत्सराने जळफळत, महाराजांना शिव्या देत चिंतामणशास्त्री पुण्यास परतले.

त्यानंतर सुमारे सहा महिने चिंतामणशास्त्री वेडाच्या अवस्थेत होते. शेवटी एक दिवस तीच यक्षिणी स्वप्नात आली व तिने सांगितले की, "मी स्वामींच्या आज्ञेने एकदा आले आहे. आता मी पुनः दिसणार नाही. तुझे भाग्य मोठे आहे. आमच्या नादी लागून मेल्यानंतर काय भुताखेताच्या जन्मास जाणार ? जा स्वामींचे पाय धर. त्यांनी तुझ्यावर कृपा केली आहे." तेव्हा शुद्धीवर येऊन चिंतामणशास्त्री परत स्वामींकडे आले. नमस्कार करून बसत नाही तोच स्वामी-महाराजांनी विचारले, 'काय रे ! मरून भुताखेताच्या जन्माला जायचे आहे काय ?' स्वप्नाची अशी साक्ष पटताच शास्त्रीबुवांचा अभिमान गळून पडला व लीन होऊन त्यांनी महाराजांचे पाय धरले.

## धोंडोपंत सहस्रबुद्धे यांच्या प्रश्नांची उत्तरे

धोंडोपंत सहस्रबुद्धे हे गृहस्थ पुण्यात प्रसिद्ध असून एके वेळी सुधारक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांनी श्रीएकनाथ महाराजांचे चरित्र व इतर काही पुस्तके लिहिली आहेत. ती सर्व प्रसिद्ध आहेत. महाराजांची कीर्ती ऐकून त्यांची प्रचीती पाहावी या विचाराने सुप्रसिद्ध आगरकर आणि आपल्या एका स्नेह्या-सह वर्तमान ते आळंदीस आले. त्यांनी आपल्या विद्वत्तेस साजेल अशा रीतीने परमार्थविषयक सुमारे चाळीस पन्नास प्रश्नांचे एक टाचण करून बरोबर आणले होते. पुढे रीतीप्रमाणे नमस्कार चमत्कार झाल्यावर महाराजांनी जवळ कोणी गृहस्थ बसले होते त्यांच्याशी बोलण्यास सुरुवात केली व त्या बोलण्यात धोंडोपंत यांच्या प्रश्नांची उत्तरे क्रमशः दिली. तेणेकरून हे तिघेजण अगदी थिजून गेले व त्यांस पुढे बोलण्याचे भानच राहिले नाही. नंतर महाराजांचे चरणी विनम्र भावाने साष्टांग नमस्कार करून ते तिघे पुण्यास परत गेले. पुण्यास येताच धोंडोपंत आपल्या स्नेह्यास सोडून आळंदीस परत गेले. महाराजांनी त्यांच्यावर कृपा केली. आगरकरांवर मात्र काही परिणाम झाला नाही ! 'स्वामी काय विद्वान' असे वाटून ते चकित झाले ! !

## एकाच वेळी आळंदीत व परळीत

एकदा आळंदीस पुराण चालले असता एकाएकी महाराज म्हणाले, "आज कोणती तिथी आहे ?" तेव्हा माघ वद्य नवमी आहे म्हणून कळले. महाराज म्हणाले, "तर मग परळीस आज मोठीच मौज असेल. छबिना निघाला असेल !" गोष्ट त्या दिवशी इतक्यावरच राहिली. पुढे काही दिवसांनी परळीच्या उत्सवांतील लोक आळंदीस आले. त्यांनी महाराजांस पुराणास बसलेले पाहून म्हटले की हे महाराज नवमीस छबिन्याबरोबर चालत होते. त्यावरून वाद निघाला. आळंदीचे लोक म्हणत की महाराज आळंदीस त्या वेळी पुराण ऐकत होते व परळीचे लोक म्हणत की ते छबिन्याबरोबर होते. शेवटी हा वाद महाराजांचे कानी गेला. तेव्हा त्यांनी त्या लोकांना बोलावून सांगितले की, "अरे, माणसासारखी माणसे पुष्कळ असतात. उगीच तंटा काय करता ?"

त्याचप्रमाणे महाराज एकाच वेळी साताऱ्याच्या किल्ल्यात लोक कोंडले होते त्यात होते व ब्रह्मावर्तीही होते. तसेच एके प्रसंगी आळंदीत व खानदेशांतील एका भक्ताच्या घरी पुडीस एकाच वेळी उपस्थित होते. ही हकीकत पुढे दिली आहे.

## खानदेशांत पुडीला

महाराज चक्रांकितांचे घरी राहू लागल्यावर भक्त मंडळींनी त्यांना रोज पुड्या कराव्या, ब्राह्मणभोजने घालावीत, पंचपक्वान्ने करावीत असा प्रकार नित्य होत असे. महाराज आपले भोजन आटोपून पंगतीत येत आणि श्रीविठ्ठलनामाचा जयघोष करून मंडळींना आग्रह करून पक्वान्ने वाढीत. एके दिवशी सर्व मंडळी भोजन आटोपून आपापल्या घरी निघून गेली. दुपारचा एक वाजला होता. महाराजांनी लक्ष्मणबोवांना सांगितले, "मला आता विश्रांती घ्यावयाची आहे. तू दार लावून घे. आणि मी जेव्हा हाक मारीन तेव्हाच दार उघड. मध्येच दार उघडू नकोस." महाराजांना पलंगावर निजलेले पाहून लक्ष्मणबोवांनी दार लावून घेतले. महाराज खोलीतून गुप्त होऊन कबूल केल्याप्रमाणे खानदेशांत एका भक्ताचे घरी पुडी घेण्यास गेले. त्याचे घरी भोजन केले आणि त्यास समाधान देऊन परत चार वाजता खोलीत आले. "लक्ष्मण दार उघड" याप्रमाणे महाराजांनी आतून म्हणताच लक्ष्मणबोवांनी दार उघडले पुढे चार दिवसांनी, ज्याचे घरी खानदेशांत पुडी घेण्यास महाराज गेले होते, तो गृहस्थ आळंदीस आला; कारण त्याने महाराजांना दिलेली छाटी ते तेथेच विसरून आलेले होते. ती छाटी देण्याकरिता तो गृहस्थ आळंदीस आला होता. "आपण आमचेकडे विसरलेली ही छाटी घ्या." असे म्हणून त्याने महाराजांना छाटी परत दिली,

पुढे भक्तमंडळीत गप्पागोष्टी करीत असता त्याने सांगितले की, "चार दिवसांपूर्वी महाराज आमचे घरी भोजनास आले होते. त्या वेळी ते छाटी विसरले व ती मी घेऊन आलो." इतर मंडळींनी विचार केला की चार दिवसांपूर्वी पंगतीच्या वेळी दुपारी महाराज तर आळंदीतच होते आणि या गृहस्थाचे म्हणणे असे की ते खानदेशात त्याचे घरी होते; हे कसे घडले ? या गोष्टी चालू असता महाराज पलंगावर बसले होते. ते तेथूनच म्हणाले, "काय चालले आहे ? मी काय गारुडी आहे ? गारुडी जसा पेटाऱ्यांतून मुलगा नाहीसा करतो तसे आहे काय? " इतके बोलून महाराज हसले. मंडळी घरी निघून गेली. आणि पुढे तो भक्त आपल्या घरी खानदेशात निघून गेला. मंडळींना हा काही तरी विशेष प्रकार आहे असे वाटून त्यांनी लक्ष्मणबोवांकडे पृच्छा केली. लक्ष्मणबोवांच्या लक्षात खरा प्रकार आला होता, पण महाराजांच्या आज्ञेशिवाय ते कोणालाच काही सांगत नसत. त्यांनी इतकेच उत्तर दिले की महाराजांनी जेवण झाल्यावर रोजच्याप्रमाणे विश्रांती घेतली. त्यांनी दार बंद करून घेण्यास सांगितले त्याप्रमाणे मी केले आणि पुन्हा उघड म्हटल्यावर दार उघडले. पण खरा प्रकार खानदेशांतील भक्ताने सांगितल्याप्रमाणेच घडला होता.

एकाच वेळी आळंदीत व परळीत असणे किंवा वरील प्रकार हे पूर्वचरित्रात—गुरुचरित्रांत—४७ व्या अध्यायात महाराजांनी धनत्रयोदशीच्या दिवशी संध्याकाळी एकाच वेळी ८ ठिकाणी उपस्थित राहून भिक्षा केल्याच्या प्रसंगाचे जे वर्णन आहे त्याची आठवण करून देतात. श्रीसमर्थ एकाच वेळी अकरा घरी भोजनास उपस्थित असल्याचे लोकांना दिसले; किंवा श्रीमाणिकरावप्रभूंनी एकाच वेळी बेदरांत अनेक भक्तांच्या घरी प्रगट होऊन पूजा घेतली. 'पंचमहाभूतांचा पडदा' फाटून ज्यांचे ठिकाणी शिवशक्तीचे ऐक्य झाले आहे अशा महाभागांच्या हातूनच असे चमत्कार होणे शक्य आहे.

## त्रिकालदर्शित्व

मागील प्रकरणात 'कृष्णाबाईचा पूर' या हकीकतीमध्ये ज्यांचा उल्लेख आला आहे ते मामलेदार सेवानिवृत्त झाल्यावर काशीयात्रेला गेले होते. त्या वेळी त्यांची व एका गृहस्थाची तेथे गाठ पडली. त्या गृहस्थाने मामलेदारांना विचारले की दक्षिणेत कोणी सत्पुरुष आहेत काय ? मामलेदार म्हणाले, "सत्पुरुष पुष्कळ आहेत पण त्यांत आळंदी येथील श्रीनरसिंह सरस्वती अगदी पूर्ण ब्रह्म आहेत." तेव्हा ते म्हणाले, "ठीक आहे. तर मग मी त्यांना खडावाचा एक जोड देतो. तो पोचवून द्यावा. हा जोड मी हौसेने स्वतःकरिता केला पण तो इतका चांगला झाला आहे की आपण तो स्वतः घालण्यापेक्षा कोणी तरी सत्पुरुषाने घालावा असे मला वाटते. मी अद्यापि तो वापरलाही नाही. तेव्हा हा एवढा त्यांना पोचवून

द्यावा व त्यांना माझे नमस्कार सांगून झालेल्या सर्व हकीकतीचे एक पत्र मला पाठवावे." मामलेदार म्हणाले, "ठीक आहे. हा जोड मी त्यांना देईन व सर्व हकीकतही सांगेन. पण हे लक्षात ठेवा की झालेली सर्व हकीकत महाराजांना कळलीच म्हणून समजा. महाराज त्रिकालज्ञ आहेत व ते येथेही आहेत आणि ते सर्व जाणतात." ते गृहस्थ म्हणाले, "असा प्रकार जर आपणास समजला तर मला सविस्तर हकीकतीचे पत्र पाठवाच." मामलेदार म्हणाले, "बरे आहे." नंतर त्यांनी तो जोड त्या गृहस्थापासून घेतला. यात्रा पूर्ण करून ते पुण्याला आले. जुन्या पद्धतीप्रमाणे ते घरी न येता गावाबाहेर उतरले व तेथून सायंकाळी मिरवीत मिरवीत गावात यावयाचे होते. मामलेदार पुण्यास आले त्याचे आदले दिवशीच महाराज आळंदीस मंडळींना म्हणाले, "आमचे एक स्नेही काशीस राहतात. त्यांनी आमचेकरिता मामलेदारांबरोबर खडावांचा जोड पाठविला आहे. तो एक दोन दिवसात येईल. तो कोणी तरी घेऊन यावा. आम्हाला त्या स्नेह्याचे पत्र आले आहे." महाराजांनी असे सांगितल्यावर एक जण पुण्यास आला व त्याने मामलेदारांचा त्यांच्या घरी जाऊन शोध केला. तेव्हा घरच्या मंडळींनी त्याला सांगितले की काशीहून ते आले आहेत व त्यांना मिरवीत आणण्याकरिता मंडळी गेली आहे. तेव्हा ते येईपर्यंत आळंदीचे गृहस्थ थांबले. मामलेदार मिरवीत आले तेव्हा या गृहस्थाने त्यांना नमस्कार करून म्हटले की, "काशीहून एकाने महाराजांना पाठविलेला खडावाचा जोड आणण्याकरिता महाराजांनी मला धाडले आहे. तेव्हा तो खडावा द्यावा." हे ऐकून मामलेदारांना फार आश्चर्य वाटले व ते म्हणाले की, "मी स्वतःच उद्या खडावा घेऊन महाराजांच्या दर्शनास येतो." असे म्हणून आळंदीहून आलेल्या गृहस्थाची त्यांनी रवानगी केली व काशीतील गृहस्थास ताबडतोब पत्र लिहिले की घरी येण्यापूर्वीच महाराजांकडून खडावा नेण्याकरिता मनुष्य आला होता. दुसरे दिवशी मामलेदारांनी आळंदीस जाऊन महाराजांचे दर्शन घेतले व खडावा अर्पण करून सर्व हकीकत सांगितली.

## सर्वसाक्षित्व

श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या धाकट्या बंधूचे कुटुंब चासेकर यांचे घराण्यांतील असून चासेस असतानाच वारले. परंतु ती गोष्ट अण्णासाहेबास कळली नव्हती. दुसरे दिवशी नेहमीप्रमाणे महाराजांस जेवणास बोलवावे असा विचार करून, ते पुण्यास आले होते त्यांच्याकडे अण्णासाहेब गेले व आमंत्रण दिले. तेव्हा महाराज म्हणाले, "काय राजा, आमचे थोडे लक्ष चुकले. त्यामुळे जेवावयास येता येत नाही." अण्णासाहेबांनी पुष्कळ आग्रह केला पण महाराज आले नाहीत. दुसरेच दिवशी चासेहून पत्र आले व अशौच आहे असे कळले.

त्यावरून महाराज का आले नाहीत याचा उलगडा झाला व त्यांच्या सर्वांतर-साक्षित्वाची साक्ष पटली.

## काळबुवा

पुण्यास काळबुवा म्हणून एक सत्पुरुष होते. त्यांचे नाव श्री. विष्णुबुवा नारायण असे होते. पुण्यांत येण्यापूर्वी ते श्रीक्षेत्र पंढरपूर येथे राहत असत. आपणास कोणी त्रास देऊ नये म्हणून जवळपास येणाऱ्यांचा ते धिक्कार करीत असत. "काळ सर्वांचा बाप आहे" असे ते वारंवार बडबडत म्हणून त्यांचे नाव काळबुवा पडले. हे श्रीदत्तात्रेयांचे भक्त होते. पुण्यात नागवे हिंडत व लोकांना दगड मारीत असत म्हणून पोलिसांनी त्यांना अशा स्थितीत फिरण्याबद्दल पकडले. तेव्हा चौदा दिवसपर्यंत हे एकाच आसनावर निश्चल दृष्टी करून बसले. खाणेपिणे इत्यादी सर्व शारीरिक व्यवहार त्यांनी बंद करून टाकले. तेव्हा पोलिसांना आश्चर्य वाटले व भीतीही वाटली. ग्रामस्थांनाही आश्चर्य वाटले व व त्यांनी पोलिसांची परवानगी घेऊन त्यांना मिरवीत मिरवीत गावांत आणले. श्रीअण्णासाहेब पटवर्धन नेहमी त्यांचे दर्शनास जात. मुंबईहून आले की यांचे दर्शन घेऊन मग आळंदीस महाराजांचे दर्शनास जात. एकदा अण्णसाहेबांना काही कार्याकरिता पुष्कळ धन मिळाले. ते मुंबईहून महाराजांच्या दर्शनाकरिता पुण्यास आले. नेहमीप्रमाणे काळबुवांच्या दर्शनास गेले असता यांना पाहतांच काळबुवा म्हणाले, "आम्ही सतरा पोळया खातों, त्या आम्हाला कोण वाढतो, बोलाचा भात बोलाची कढी" हे संदिग्ध भाषण ऐकूण अण्णासाहेबांनी त्यांना त्याचा खुलासा विचारला, तेव्हा 'आळंदीस जाऊन स्वामींना विचारा' असे काळबुवा म्हणाले. पुढे आळंदीस गेल्यावर नमस्कार करताना महाराज उद्गारले, "भाताबरोबर कढी बरी लागते. मनाच्या पुऱ्या आणि मनाचे मांडे खाऊन कोणाला तृप्ती झाली. लोकांच्या मनांत कुडे असते......." हे ऐकून अण्णा-साहेबांनी जे कार्य हाती घेतले होते त्या संबंधीच वरील उद्गार असले पाहिजेत व त्यांत लोकांचे केवळ दिखावू साह्य होते अशी त्यांनी कल्पना केली आणि पुढे त्यांना अनुभवही तसाच आला.

अण्णासाहेब मद्रासहून श्रीकंचीस्वामी बरोबर पुण्यास परत आले त्यावेळची गोष्ट. नित्यक्रमाप्रमाणे ते श्रीओंकारेश्वराला दर्शनासाठी गेले तेव्हा काळबुवा तेथेच बसले होते. त्यांनी आळंदीकडे तोंड करून, "स्वामी, दादा आला," असे तीनदा म्हटले. अण्णासाहेब श्रीकंचीस्वामींना बरोबर घेऊन आळंदीस गेले. महाराजांच्या पायावर डोके ठेवताच "आज सकाळी कोठे गेला होतास ?" असे महाराजांनी विचारले. काळबुवांनी अण्णासाहेब आल्याचा संदेश जणू कांही

नभोवाणीवरूनच महाराजांकडे पाठविला. यावरून दिक्कालावछिन्न असे महाराज आहेत हे स्पष्ट दिसते.

## काका महाराज पुराणिक

कोकणात राजापूरला श्रीकाका महाराज पुराणिक या नावाचे सत्पुरुष होऊन गेल्याचे सर्वश्रुत आहे. दोन वर्षे महाराजांच्या सहवासात आळंदीत राहून एक कोकणचे गृहस्थ परत कोकणात जावयास निघाले. तेव्हा महाराजांच्या सहवासास आपण आता अंतरणार या जाणिवेने त्या गृहस्थास फार दुःख झाले व व त्याने "आता माझी वाट काय ?" असे महाराजांना विचारले. तेव्हा महाराज म्हणाले, "धोपेश्वरी काका महाराज पुराणिक म्हणून एक महा साधु आहेत. त्यांना शरण जा. ते तुला कृतार्थ करतील." काका पुराणिक या गृहस्थाचे कोकणातील उपाध्याय होते. त्यामुळे या गृहस्थाची खात्री होईना. पण महाराजांनी त्याची खात्री करून दिली. काही खूण अथवा भेट म्हणून महाराजांनी श्रीज्ञानेश्वर महाराजांचा अंगारा पुडीत बांधून त्या गृहस्थाजवळ दिला. राजापूरला आल्यावर हे गृहस्थ रोज काका पुराणिकांच्या भेटीस जात होते. त्याच्या दृष्टीने काका केवळ ब्रह्मकर्म सांगणारे एक उपाध्याय होते. शेवटी एक दिवस काकांनीच त्यांना विचारले, "आपण रोज मजकडे कशाकरिता येता ?" तेव्हा त्यांनी महाराजांनी दिलेला श्रीज्ञानेश्वरांचा अंगारा काकापुढे ठेवला. काकांनी मोठ्या भक्तिभावाने तो अंगारा मस्तकी धारण केला आणि म्हणाले, "अहो, मी तुमचा उपाध्याय. मजमध्ये तुम्ही म्हणता ते सामर्थ्य कोठचे ? तसे असते तर मग मी भीक का मागतो ? पालखीत बसलो असतो. मी गरीब ब्राह्मण. स्वामी महाराजांनी तुमचे जवळ विनोद केला. झाले !" पण अशा उत्तरांनी त्या गृहस्थाचे समाधान झाले नाही. महाराज अशी भलतीच थट्टा करणार नाहीत अशी त्याची खात्री होती. शिवाय काकामहाराजांकडे रोज जात असता त्यांना शरण जावे अशी आतून प्रेरणा होत होती. त्याप्रमाणे त्यांनी काकामहाराजांचे पाय धरले व त्यांचेकडून अनुग्रह मिळविला. काकामहाराज पुराणिक धोपेश्वरी आपला मोठेपणा लोकांस समजू नये अशा रीतीने राहत असता अखेरीस महाराजांनी त्यांना प्रगट केलेच.

## विकटोपर्यंत शिकलेला उत्तम पुराणिक झाला

महाराजांचे ठायी निष्ठा ठेवून शक्तिनुसार त्यांची सेवा करणारा एक ब्राह्मण होता. त्याचे अध्ययन म्हटले तर विकटोपर्यंतच झाले होते. परंतु महाराजांची कृपा व्हावी अशी मात्र त्याची इच्छा होती. एकदा असे झाले की नाशकास एका उत्तम पढलेल्या शास्त्रीबोवाची गरज होती. म्हणून कोणीतरी

माणूस पाठवा अशी महाराजांच्या तेथील शिष्यांनी महाराजांना विनंती केली. महाराज पट्टीचे विद्वान आहेत असा त्यांचा लौकिक होता. तेव्हा त्यांच्या परीक्षेचा माणूस तसाच असला पाहिजे अशी शिष्यमंडळींची समजूत होती. परंतु आळंदीत एवढा विद्वान कोण असणार म्हणून महाराजांनी या ब्राह्मणाला हाक मारून सांगितले, "तू जा." तेव्हा तो म्हणाला, "मला काहीच येत नाही. मी जाऊन काय रडणार" तेव्हा महाराज म्हणाले, "त्याची काळजी तुला कशाला ? आम्ही जा म्हणतो तेव्हा जावे." असे म्हणून त्याला नाशकास जाण्यास सांगितले. पुढे असा चमत्कार झाला की हा ब्राह्मण महाराजांचे स्मरण करून पुराण सांगू लागला की कोणी हात धरणार नाही असे पुराण त्याला सांगता येऊ लागले. एकदा आसनावर बसला की काय पाहिजे ते विचारून घ्या. त्याचे उत्तर तयार. परंतु आसनावरून खाली आला की तो अवतार संपलाच. मग मात्र त्याला विकटोच्या पुढे काही यावयाचे नाही. पुढे त्याची उत्तम पुराणिक म्हणून फार कीर्ती झाली व त्यामुळे सांपत्तिक स्थितीही सुधारली. पुढे हे पुराणिकबोवा भागवत फारच अप्रतिम सांगत. यांचे नाव रावजीशास्त्री बेटावदकर. यांनाच महाराजांनी एकदा मोक्षपट खेळत असता आपल्या खऱ्या स्वरूपाची ओळख दिली होती.

## अलौकिक शक्तिपात

महाराज आळंदीला आल्यावर त्यांनी टवाळ लोकांचे जे एक भजन मंडळ तयार केले त्यांतील रामभाऊ हवेली हे महाराजांचे एकनिष्ठ सेवक बनले. त्यांचा आवाज फार गोड असून ते भजन फार प्रेमळ करीत. रामभाऊ हवेली नियमितपणे रोज रात्री भजनास उपस्थित राहत असत. महाराजांना त्यांच्या शिवाय भजनांत गोडी वाटत नसे. रामभाऊ हवेली यांचे नुकतेच लग्न झालेले असून ऋतुप्राप्त स्त्री जवळ असल्याने भजनासंबंधी त्यांचेकडून बरेच दुर्लक्ष होऊ लागले. शेवटी ते भजनास जाण्याचा कंटाळा करू लागले. एकदा भजनास जाणे अत्यंत जरूरीचे होते. परंतु स्त्रीमोह सुटेना. तेव्हा सुधन्वासारखी स्थिती होऊन अशुद्ध अशा स्थितीत ते भजनास गेले. भजन रंगात आले परंतु शिरस्त्याप्रमाणे महाराजांस शेवटी नमस्कार करण्याचे वेळी मात्र त्यांची त्रेधा उडाली. अखेरीस दुरून दुरून नमस्कार करू लागले. हे पाहून महाराज स्वत: त्यांचेजवळ आले व पाठीवर थाप मारून म्हणाले, "कां राजा, कसे काय ?" या गोष्टीचा म्हणजे पाठीवर थाप मारण्याचा असा परिणाम झाला की भजनास गेल्याशिवाय त्यांना स्त्रीसुख भोगणे अशक्य झाले. महाराजांच्या इच्छेविरुद्ध त्यांनी प्रयत्न करून पाहिला, पण भजन झाल्याखेरीज तो केव्हाही सफल झाला नाही.

## रामभाऊ हवेलीचा पुनर्जन्म

एकदा आळंदीस महामारीचा आजार होऊन फार हाहा:कार उडाला. त्या वेळी रामभाऊही हा रोग होऊन दोनचार तासात दुपारी चार वाजण्याच्या सुमारास त्याचा प्राण गेला. परंतु नेण्यास कोणी मिळाले नाही म्हणून त्याचे प्रेत रात्रौ नऊ वाजेपर्यंत तसेच पडले. इकडे नऊ वाजता भजनाच्या वेळी महाराज म्हणाले, "आज रामा कां आला नाही ?" तेव्हा मंडळींनी सांगितले की, "रामा आता येणे शक्य नाही." महाराज म्हणाले, "खोटी गोष्ट. त्याला यावयाचे नसेल इतकेच." नंतर कोणास म्हणाले की रामाकडे जाऊन महाराज बोलावतात म्हणून सांग. त्याप्रमाणे माणसाने जाऊन सांगितले पण रामा उठला नाही. तेव्हा महाराज म्हणाले, "खरेच, रामाला रोग झालेला दिसतो. आमच्यापाशी एका वैद्याने चांगली मात्रा देऊन ठेवली आहे. ती देऊन पाहूं." "मंडळींनी सांगितले की रामाचा प्राण जाऊन पाचसहा तास झाले आहेत. आता मात्रा कसली देता ?" परंतु त्यांचे म्हणणे न ऐकता महाराजांनी आंतून तीन गंधाच्या गोळ्या आणल्या आणि म्हणाले, "ही मात्रा श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या तीर्थांतून द्यावी." नाइलाज म्हणून मंडळींनी जाऊन गोळीचे पाणी रामाच्या तोंडात बळेच घातले. पण उपयोग झाला नाही. तिसऱ्या गोळीचे पाणी पोटात जाताच रामभाऊ उठून बसले. इतकेच नाही तर त्या दिवशी त्यांनी कडाक्याचे भजन केले. ही गोष्ट रामभाऊंनी स्वत: श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचेसमोर श्रीअप्रबुद्ध यांस १९१० साली मठात सांगितली. रामभाऊ हवेली यांना पाहिलेले लोक आजही आंळंदीत हयात आहेत. श्री. वि. वि. धोत्रे यांनी ('माउली'चा 'अक्कलकोट' विशेषांक) कोणा भावड्या तेल्याच्या नावाने ही गोष्ट दिली आहे. ते चूक आहे. ऐकीव माहितीवर भरवसा ठेवल्याने असे झाले असावे !

## जन्मभूमीकडील धर्मपत्नी

रा. वि. वि. धोत्रे, नारायण पेठ पुणे २, यांचे आजोबा–वडिलांचे वडील– कै. हरी उद्धव धोत्रे महाराजांचे परमभक्त होते. हरि उद्धव धोत्रे अल्पवयी असता त्यांचे वडील स्वर्गवासी झाले. त्यांची बरीच मालमत्ता त्यांच्या बहिणीने गिळंकृत करून हरिपंतांचे फार हाल केले. हालास कंटाळून हरिपंत व त्यांचे भाऊ अनुक्रमे १६ व १४ वर्षांच्या वयाचे असताना कऱ्हाडहून पायी प्रवास करीत करीत आळंदीस आले. त्या वेळी महाराजांची व त्यांची औदुंबराच्या झाडाखाली प्रथम भेट झाली. अत्यंत प्रेमाने त्यांना जवळ घेऊन महाराजांनी त्यांचे सांत्वन केले व म्हणाले, "हरिपंत तुझे घराण्यांत सहा पिढ्या शिवोपासना तीव्रतर झाली आहे आणि त्यायोगे तुमचे पालनपोषण, संगोपन

करण्याची श्रीशिवशक्तीची आम्हांस आज्ञा झाली आहे. आम्ही तुमचे प्रारब्ध भोक्तृत्व सांभाळून तुम्हांस शिवलोकी नेऊ ! निश्चित असा ! श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन हेच आपणास काशीविश्वेश्वराचे दर्शन असून त्यांचेच पंचक्रोशीत आम्ही आपला योगक्षेम चालवू ! तुम्ही आपली वडिलोपार्जित सहा पिढ्या चालत असलेली पार्थिवपूजा अनन्य भक्तीने चालू ठेवा. त्यांत व श्रीज्ञानेश्वरांचे समाधीचे वद्य एकादशीचे दर्शनांत कोणत्याही संकटाने अंतर पडू देऊ नका."

पुढे महाराजांच्या कृपेने हरिपंतांना आळंदीसच शिक्षकाची नोकरी लागली. नोकरी सांभाळून सकाळ संध्याकाळ महाराजांच्या सान्निध्याचा व प्रवचनाचा लाभ त्यांना मिळून लहान वयांतच अध्यात्मशक्ती वृद्धिगत झाली. आपली वडिलोपार्जित लाखो रुपयांची मालमत्ता जाऊन आपण जन्मभूमीस अंतरलो हे दुःख हरिपंताना वेळोवेळी होई, पण निदान जन्मभूमीची स्मृती म्हणून पत्नी तरी जन्मभूमीकडील मिळावी अशी त्यांची इच्छा होती. परंतु 'दरिद्राणाम् मनोरथाः । ' या न्यायाने ती कशी सफल होणार ? अशा विचारात ते असता महाराजांनी अंतर्ज्ञानाने सर्व ओळखून एका संध्याकाळी त्यांना सांगितले, "हरिपंत खेद करू नका. आम्ही तुम्हास जन्मभूमीजवळील मुलगी धर्मपत्नी म्हणून देऊ !" योगायोग व महाराजांची त्यांच्यावरील कृपा एवढी थोर की, कऱ्हाड जवळील एक सद्गृहस्थ आळंदीस श्रीज्ञानेश्वरांचे दर्शन घेऊन महाराजांच्या दर्शनास आले असता महाराज त्यांना म्हणाले, "इनामदार, मुलीच्या लग्नाच्या चिंतेत आहात कां ? तुमची लक्ष्मी आमचे हरिपंतास द्या ! त्यांत कल्याण आहे." महाराजांच्या आज्ञेनुसार श्री. धरणीधर इनामदार, दाळमोडीकर यांनी आपली मुलगी हरिपंतांना दिली. अशा रीतीने हरिपंतांच्या मनांतील हेतू महाराजांच्या कृपेने सफल झाला.

## भीमाभाईने वाचविले

महाराजांचे कृपाछत्राखाली हरिपंतांचा आध्यात्मिक गृहस्थाश्रम चालू झाला. आळंदीजवळील फुलगाव गावी श्री. मरकळे यांनी आपल्या व ग्रामस्थांच्या मुलांना शिकविण्यासाठी हरिपंतांना पाचारण केले व सांगितले की स्वतंत्रपणे हा व्यवसाय सांभाळून तुम्हांस आपली उपासनाही चालविता येईल. चार कोसांवर आळंदी असल्याने वद्य एकादशीची श्रीज्ञानेश्वर माऊलींची वारी पण चुकणार नाही. तेव्हा आपण चलावे. त्रिवेणी संगमावर (भीमा, भामा व इंद्रायणी) गाव वसलेले असून श्रीमंत पेशव्यांचे घाट व श्रीशंकराचे मंदिर तेथे आहे. तेव्हा आपणास महाराजांची परवानगी मिळेल व उपासनेत खंड पडणार नाही. श्री. मरकळे सावकार यांनी महाराजांना विनंती केली व त्यांनी परवानगी पण दिली. श्री. मरकळे यांनी दोनतीन खण जागा बांधून देऊन हरिपंतांच्या राहण्याची सोय

केली व चावडीत हरिपंतांची स्वतंत्र शाळा सुरू झाली. महाराजांच्या कृपेने आज सुमारे १०० वर्षांत, 'हरि उद्धव धोत्रे मोफत विद्यालय, फुलगांव' या नावाने ती चावडीत सुरू झालेली शाळा स्वत.च्या १०० खणांत उत्तम प्रकारे चालत असून हजारो विद्यार्थी तेथे ज्ञानदान घेऊन गेले आहेत.

हरिपंत म्हणजे निश्चयाचे महामेरू होते. '**देह आपदेने पीडिला । क्षुधा तृषेने ओसावला । परी निश्चयो राहिला । तोचि सत्वगुण ॥**' या निर्धाराने हरिपंतांनी महाराजांचे मार्गदर्शनाखाली आपली उपासना चालू ठेवली. लहानपणच्या कठीण परिस्थितीने त्यांना पोहणे वगैरे शिकता आले नाही. फुलगाव ते आळंदी यामध्ये मरकळ गावी भीमा ओलांडावी लागते. हरिपंत दर महिन्याच्या वद्य एकादशीस आळंदीस जात असत. एका श्रावणात भीमेला मोठा पूर आला होता. शाळेचे काम संध्याकाळपर्यंत संपवून हरिपंत नियमाप्रमाणे आळंदीस जावयास निघाले. मरकळ गावी भीमाबाईने आपले उग्र रूप दाखवून हरिपंतांना परत फिरण्याची वेळ आणली. पण महाराजांची आज्ञा प्राण गेला तरी मोडावयाची नाही आणि पोहता तर येत नाही; तेव्हा काय करणार ? एका भोयाजवळून दोन भोपळे घेऊन कमरेस बांधले व महाराजांची आणि शिवशंकराची प्रार्थना करून हरिपंतांनी देह भीमेत टाकला. अर्धे पात्र पंत गेले तोच पूर वाढून एका भयंकर भोवऱ्यात ते सापडले. 'हे नृसिंह सरस्वते-हे स्वामी ! हे स्वामी ! !' असे उद्गार त्रिवार त्यांचे मुखातून निघाले. भोपळे सुटले आणि हरिपंत तळास गेले ! वेळ संध्याकाळची होती. हरिपंत बुडाले हे पाहून गावातील लोक गोळा झाले. भीमाबाईचे उग्र रूप पाहून कोणी आत उडी टाकण्यास धजेना. अशा स्थितीत अर्धा तास गेला. शेवटी फुलगावी श्री. मरकळे यांचेकडे गावकरी लोक येऊन त्यांनी त्यांना हरिपंत बुडाल्याची बातमी दिली. हरिपंतांची तपश्चर्या कसोटीस आली. त्याच वेळी आळंदीत चक्रांकितांचे माडीत महाराज बसले होते. त्यांनी "अरे, हरिपंत बुडाला–काढा काढा –ये, हरिपंता ये !" असे विचित्र उद्गार काढले. इकडे एका अज्ञात व्यक्तीने हरिपंतांना भीमाबाईचे तळातून काढून दुसऱ्या काठावर आणून ठेवले व ती व्यक्ती गुप्त झाली ! हरिपंतांना ही महाराजांचीच लीला वाटली व ते तसेच आळंदीस नियमात खंड पडू नये म्हणून गेले. श्रीज्ञानेश्वरांचे दर्शन घेऊन ते महाराजांचे दर्शन घेण्यासाठी आले तोच महाराज म्हणाले, "काय हरिपंत, भीमाबाईने सुखरूप काठावर आणून ठेवले ना ?" हरिपंत काय उत्तरणार ! त्यांनी महाराजांचे पाय घट्ट धरून सांगितले, "महाराज, हा हरिपंत आणि त्याचा दरिद्रीनारायण प्रपंच सर्वस्वी या पायावर वाहिला आहे. त्याची चिंता आपणास. मी देह जावो अथवा राहो या निश्चयाने आपले पाय धरले आहेत ते

सोडणार नाही. उपासनेत खंड पडणार नाही." पुढे फुलगावी शिष्याहाती निरोप पाठवून महाराजांनी हरिपंतांना आपलेजवळ ठेवून घेतले आणि 'उपासना कांड' समजावून दिले.

## प्रत्यक्ष नागरूपाने परीक्षा

दुसऱ्या एका प्रसंगी महाराजांनी हरिपंतांच्या उपासनेची कसोटी पाहिली. सहा पिढ्या चालू असलेली मंत्रोक्त पार्थिवपूजा चालू ठेवण्यास हरिपंतांना महाराजांनी सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी देह ठेवण्याचे वेळेपर्यंत ती अव्याहत अखंड चालू ठेवली. पार्थिवपूजेत एक नियम असा आहे की एकदा मृत्तिका मळून शिवलिंग करण्यास मंत्राने सुरुवात केली की उत्तरपूजा, आरती, वगैरे होईपर्यंत ती थांबता उपयोगी नाही वा लिंग खाली ठेवावयाचे नाही. एक वेळ हरिपंतांची पूजा चालू असता त्यांना अष्टभाव जागृत होऊन ते मंत्र म्हणता म्हणता तदाकार झाले. तोच एका मोठ्या नागराजाने त्यांच्या हातास प्रेमाने विळखा घालून शिवलिंगावर छाया धरली व तो डोलू लागला. हे दृश्य हरिपंतांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांनी पाहिले व त्या घाबरून ओरडल्या. त्यामुळे हरिपंतांची तदाकार स्थिती भंग पावली. व त्यांनी समोर पाहिले. तो नागमहाराज आपल्या दैवतावर छत्र धरून आहेत ! पत्नीकडे तीव्र नजरेने पाहून तिला खुणेनेच गप्प राहण्यास सांगितले. नैवेद्याची वाटी हातावर धरून श्रीशंकराची आरती न घाबरता म्हटली. विसर्जनाचे मंत्र म्हणताच नागराजाने दूध भक्षण करून ते निघून गेले. पुढे आळंदीस हरिपंत गेल्यावर त्यांना महाराज म्हणाले, "हरिपंत. आमच्या कसोटीस आपण उतरलात ! आम्ही प्रसन्न झालो. मागा काय हवे ते. नागरूपाने केलेला विळखा मारून व्यत्यय आणण्याचा प्रयत्नही आपण धैर्याने निष्फळ करून आपली उपासना भंग होऊ दिली नाही. धन्य आहात आपण ! मागा, काय वाटेल ते मागा." हरिपंत म्हणाले, "आपली चरणसेवा घडून माझे घराण्यावर आपली कृपादृष्टी असू द्या यापेक्षा कांही नको." महाराजांनी सांगितले, "हरि-पंत, आम्ही सात पिढ्या आपले घराण्यावर लक्ष ठेवू !!" '**श्रीनृसिंह सरस्वती गुरुनाथ। रक्षी त्यांचे वंशोवंशी ॥**' हे अगदी सत्य आहे.

## सदाशिवाची मौंज

हरिपंतावर महाराजांची पूर्ण कृपा होती. पण त्यांच्या घरात अठरा विश्वे दारिद्र्य होते. वडील मुलगा सदाशिव हा मुंजीच्या वयाचा झाला. पण परिस्थिती अनुकूल नव्हती. नेहमीप्रमाणे ते आळंदीस एकादशीस महाराजांच्या दर्शनास गेले. पण महाराजांच्याजवळ मौंजीसंबंधी गोष्ट काढण्याचा धीर झाला नाही. ते तसेच परत आले. मनात म्हणत होते की, "महराज सर्वसाक्षी आहेत. ते

सर्व जाणतीलच." चमत्कार असा की दुसरे दिवशी दोन शिष्य महाराजांचे पत्र घेऊन बैलगाडीने हरिपंताकडे आले. पत्रात पुढीलप्रमाणे मजकूर होता. 'चि. हरिपंत व सौ. लक्ष्मी यांस–चि. सदाशिवाची मुंज करणे आहे. तुम्ही या गाडीने आळंदीस निघून येणे.' पत्र वाचून हरिपंताचे हृदय भरून आले. त्यांचेजवळ फक्त एक रुपया व थोडेसे धान्य होते. ते घेऊन आलेल्या बैलगाडीने ते आळंदीस गेले. सदाशिवाला महाराजांच्या मांडीवर ठेवले. महाराजांच्या कृपेने सदाशिवाची मौंज पार पडून त्याप्रसंगी थोड्याशा स्वयंपाकांत हजारो ब्राह्मण वगैरे जमातीचे भोजन झाले.

## अंगारा कोणी लावला ?

महाराजांचे भक्त रामचंद्र प्रभाकर फाटक हे महाराजांचे आज्ञवरून सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर साताऱ्याजवळील लिंब गावी राहात असत. दरवर्षी ते आळंदीस महाराजांच्या दर्शनास जात असत. एके वेळी त्यांचा मुलगा अत्यंत आजारी होता. रामचंद्रपंत पत्नीस म्हणाले, "काही झाले तरी मी जाणारच." त्याप्रमाणे ते आळंदीस गेलेच. नंतर इकडे त्याच दिवशी सायंकाळी आठचे सुमारास एक कोणी तरी पुरुष येऊन रामचंद्रपंताच्या मुलास अंगारा लावून म्हणाला, "बरे वाटेल." त्या प्रमाणे त्यास बरे वाटले.

## महाराजांनी ओटी भरली

रामचंद्रपंत फाटक यांची मुलगी सौ. गोदूताई–शंकर रघुनाथ दिवेकर यांचे कुटुंब–सर्व मंडळीसह आळंदीस आली. महाराजांनी या मंडळीस माडीवरून पाहिले. त्यांनी गोदूताईला कधीच पाहिले नव्हते. परंतु शिष्यास महाराजांनी सांगितले, " ती रस्यांतून जात असलेली मुलगी रामभाऊ फाटक यांची आहे. तिला माडीवर घेऊन या." त्याप्रमाणे शिष्याने जाऊन तिला बोलावून आणले. गोदूताई माडीवर आल्यावर महाराजांनी खण नारळ देऊन तिची ओटी भरली.

## रूळ मारला पण बढतीच झाली

श्री. रघुनाथ लक्ष्मण बंदे, सेवानिवृत्त चित्रकला शिक्षक, रा. उमरावती (विदर्भ) यांचे वडील कळवणला नोकरीत असता त्यांची व महाराजांची गाठ पडली. त्यावेळी महाराज मालेगाव, कळवण, मुल्हेर वगैरे ठिकाणी नेहमी जात असत. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी महाराज आळंदीस स्थिर झाले. लक्ष्मणराव बंदे, कळवणचे रामचंद्रबुवा व मालेगावचे पेठे मास्तर असे तिघेजण महाराजांकडे आळंदीस गेले. त्यावेळी महाराजांचे वास्तव्य चक्रांकित यांचे माडीवर होते.

महाराजांनी लक्ष्मणराव बंदे यांस अनुग्रह दिला. तसेच रामचंद्रबुवासही उपदेश दिला. पण पेठे मास्तरास उपदेश दिला नाही. त्याचे कारण महाराजांनी सांगितले की, "त्याच्या नशिबी नाही." पुढे लक्ष्मणराव भगूर गावी फौजदार कचेरीत कारकून होते. त्या वेळी त्यांना महाराजांचा उपदेश झाला होता. लक्ष्मणरावांची पूजाअर्चा फार कडक होती. एके दिवशी त्यांचे ऑफिस तपासण्याकरिता त्यांचा अधिकारी आला. तो डी. एस्. पी. असावा. लक्ष्मणरावांना कचेरीतून शिपाई बोलावण्यास घरी आला. त्या वेळी ते पूजेत होते म्हणून कचेरीत गेले नाहीत. पूजा आटोपून कचेरीत गेले तेव्हा डी. एस्. पी. ने त्यांना शिवीगाळ केली. लक्ष्मणराव स्वभावाने फार संतापी होते. त्यांना हे काही सहन झाले नाही. त्यांच्या हातात त्या वेळी एक रूळ होता. तो त्यांनी एकदम त्या अधिकाऱ्याच्या डोक्यात मारला. लघवीचे निमित्त करून ते कचेरीतून बाहेर पडले व जी गाडी साधली तिने ताबडतोब आळंदीस निघून आले. महाराजांचे दर्शन घेतले. महाराजांनी त्यांना का आलास म्हणून विचारले. लक्ष्मणराव उत्तरले, "आपणास सर्व समजतेच ! मी काय सांगू ? मला नोकरी करावयाची नाही." त्यावर महाराजांनी सांगितले, "जा. तुला बढती मिळणार आहे." त्याप्रमाणे खरोखरच लक्ष्मणरावांना बढती मिळाली. पुढे महाराजांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची बदली पेठेस झाली. त्याच वेळी महाराजांनी त्यांना सांगितले होते की, "तू एक वर्ष पेठेस राहशील. नंतर तू यशवंत महाराजांच्या हाताखाली नाशकास येशील." पुढे काही दिवसांनी लक्ष्मणरावांनी आळंदीस येऊन महाराजांची महापूजा केली. त्या वेळी विठ्ठल मंदिराचे म्हणजे आज ज्या ठिकाणी महाराजांची समाधी आहे तेथे, बांधकाम सुरू होते. लक्ष्मणरावांनी त्या प्रसंगी आपल्या पत्नीच्या गोठ, पाटल्या, सरी वगैरे असा सुमारे हजार रुपयांचा ऐवज महाराजांना अर्पण केला आणि त्याच वेळी हट्ट करून महाराजांचे कानात दोन दोन मोती घातले. तेच मोती फोटोत दिसतात.

## आंतरसाक्षित्व

महाराजांचे भक्त दामूतात्या रानडे वकील हे वऱ्हाडात मलकापुरास राहत असत. सन १८७९ मध्ये महाराजांनी त्यांना उपदेश दिला. तेव्हापासून बहुतेक दरवर्षी ते महाराजांच्या दर्शनास आळंदीस जात असत. दामूतात्यांना निळकंठराव नावाचा एक पुतण्या होता. निळकंठराव यास महाराज सूक्ष्म दृष्टीत दर्शन देत असत आणि अनेक प्रकारे त्याला मदत करीत. हा प्रकार महाराज समाधिस्थ झाल्यावरही होत असे.

एके वेळेस दामूतात्या महाराजांच्या दर्शनाकरिता आले असता त्यांच्या मनात असे आले की आपल्याला महाराजांच्या पादुका मिळाव्या. मनात आले

पण बाहेर बोलून दाखविण्याचे धैर्य होईना. महाराज आंतरसाक्षी असल्यामुळे त्यांनी ते ओळखले व दामूतात्यास सांगितले की, "आमचेकरिता पादुकांचा एक जोड आणावा." तात्यांनी महाराजांच्या सांगण्याप्रमाणे एक जोड आणला. तो जोड महाराजांनी काही वेळ पायात घातला व नंतर तात्यांना म्हणाले, "हा घेऊन जा." तात्यांनी जोड घेतला. पण तो महाराजांनी पूजा करण्याकरिता दिला आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही. प्रसाद म्हणून त्यांनी तो जोड घेतला व घरी नेऊन ठेवून दिला. पुढे काही दिवसांनी निळकंठराव यास स्वप्नस्थितीत महाराज दर्शन देऊन म्हणाले, "तात्याने मागितला. आम्ही दिला. त्याची पूजा का करीत नाहीत !" निळकंठरावांनी तात्यास महाराजांचा हा दृष्टांत सांगितला. तेव्हा तात्यांच्या लक्षात आले की महाराजांनी आपले मनोगत ओळखून तो जोड पूजा करण्याकरिता दिला होता. तेव्हापासून हा जोड दामूतात्यांच्या घरात आजपर्यंत पूजेत आहे.

## कुटुंबास दागिने व दर्शन

उपदेश घेतल्यापासून दामूतात्या रानडे आळंदीस महाराजांचे दर्शनास येत असत म्हणून मागे सांगितले आहेच. तात्यांची वकिली त्या काळात जेमतेम चालत असे. म्हणून ते एकटेच दर्शनास येत असत. एकवेळ महाराज म्हणाले की, "दर्शनास आपल्या कुटुंबासही घेऊन यावे." त्या वेळी तात्या काहीच बोलले नाहीत. पण मनात विचार करू लागले की दर्शनास कुटुंबास आणावयाचे तर आपले उत्पन्न खर्चाच्या मानाने अगदीच जेमतेम. त्यामुळे कुटुंबाचे अंगावर दागिनेही नाहीत. तेव्हा अशा स्थितीत दर्शनास कसे आणावे ? तात्यांच्या मनातील विचार महाराजांस कळला. पुढे महाराजांच्या कृपेने त्या सालात तात्यांची वकिली चांगली चालून पैसाही पुष्कळ मिळाला. त्या पैशांतून तात्यांनी कुटुंबास दागिने केले व महाराजांची कृपा झाली अशी पक्की खात्री बाळगून दुसरे वर्षी कुटुंबासह दर्शनास गेले व पुढेही नेहमी जात असत.

## ती मुलगी आमची आहे

दामूतात्या रानडे यांना मुले झाली पण ती सर्व बाळंतपणातच वारली. तरीही तात्यांना मनाला समाधान वाटत असे. व्याप नसेल तितका बरा अशी त्यांची वृत्ती असे. त्यामुळे मुलगा पाहिजे अशी मागणी त्यांनी महाराजांस कधीही केली नाही. एक वेळेस तात्यांच्या स्नेह्याने महाराजांना म्हटले की, "तात्यांना मुलगा नाही. तरी कृपा व्हावी." महाराज त्यावर म्हणाले, "तुम्ही त्यांचे वतीने म्हणता पण त्यांना काय वाटते हे विचारले काय ?" त्यावर तात्यांचे कुटुंबास गर्भ राहिला. योग्य काळी बाळंतपण झाले व मुलगी झाली. तिचे नाव बगूताई

असे ठेवले. तिचा विवाह होऊन ती परशुरामपंत गोखले यास दिली होती. एकदा तात्यांच्या मनात आले की आपल्या मुलीचे सासरी कसे व्हावे ? कालमान बदललेले. आपण जुन्या चालीचे, तेव्हा आपल्या मुलीचे वर्तन सासू, सासरा, पती यास पसंत पडते की नाही ? असा विचार करून तात्यांनी आपला पुतण्या निळकंठराव यास सांगितले, "महाराजांना विचारावे की याबद्दल मुलीकडून काही जपानुष्ठान वगैरे करवू काय !" निळकंठरावाने त्याप्रमाणे महाराजांस विचारले. तेव्हा महाराज म्हणाले, "ती मुलगी आमची आहे. आम्ही दिलेली आहे. तेव्हा कसले अनुष्ठान सांगता ? तुम्ही निष्काळजी असा." याप्रमाणे महाराजांनी सांगितल्यावर दामूतात्या निश्चित झाले.

## आळंदीची महामारी गेली

एकदा आळंदीत महामारीचा अतिशय उपद्रव सुरू झाला. त्या वेळी महाराज आळंदीस नसून पुण्यास होते. आळंदीस येण्याविषयी लोकांनी महाराजांस पुष्कळ निरोप पाठविले. पण महाराज काही येईनात. तेव्हा आता महाराजांस आणल्याशिवाय परत यावयाचे नाही असा निश्चय करून आळंदीचे लोक दिंडी घेऊन भजन करीत पुण्यास आले. महाराजांचे मुक्कामी येऊन त्यांनी भजन करण्यास प्रारंभ केला. महाराजांनी काय आहे म्हणून विचारले. तेव्हा लोक म्हणाले, "आळंदीस महामारीचा उपद्रव फार आहे. तेव्हा आपण तेथे आले पाहिजे. आपण येईपर्यंत आम्ही असेच भजन करीत राहू." "ठीक आहे. चला," असे म्हणून त्या लोकांचे बरोबरच महाराज आळंदीस जाण्याकरिता पायी निघाले. आळंदीस आल्यावर आपल्या बिऱ्हाडी न जाता भजनी मंडळीसह गावास प्रदक्षिणा केली व मग आपल्या बिऱ्हाडी आले. त्या दिवशी गावचे महारणीचे अंगात महामारी आली व म्हणू लागली की, "हा बुवा सोटा घेऊन मला मारीत आहे. मला भीती वाटते. आता मी राहत नाही. मला पूजा द्या. मी जाते." त्याप्रमाणे लोकांनी पूजा दिली. त्या दिवसापासून महामारी अजिबात बंद झाली. कोणीही आजारी पडला नाही व जे कोणी पूर्वी आजारी होते ते सर्व ठीक झाले.

## भागूबाईचे हीव

भागूबाई नावाची एक बाई महाराजांची शिष्यीण होती. ती नेहमी पंढरपुरास जात असे. एके वेळी वाटेत तिला अतिशय थंडी वाजून ती कुडकुडू लागली. शेवटी तिने हिवास महाराजांची शपथ घातली आणि तत्क्षणी तिची थंडी बंद झाली. इकडे त्या वेळी आळंदीस महाराज पुराण सांगत होते. त्यांना हीव वाजून आले. परंतु त्यांचे पुराण सुरू होते म्हणून त्यांनी ते खुंटीवर एक

धाबळ होती तेथे ठेवले. तेव्हा धाबळ उडू लागली. काही वेळाने पुराण संपल्या-वर महाराज थंडीने कुडकुडू लागले. पुढे जेव्हा ती बाई पंढरपुराहून परत आली तेव्हा महाराज तिला म्हणाले, "सटवे, तुझे काय नोकर आहोत, भोग भोगायला काय झाले होते ?" तेव्हा तिची चूक तिला कळून आली व लोकास धाबळ उडण्याचा उलगडा झाला.

महाराजांची लीला अनंत आणि अगम्य आहे. सांगता सरणार नाही. बारा वर्षे आळंदीस वास्तव्य करून लोकांना सन्मार्गाला लावले. महाराजांनी श्रीज्ञानेश्वरांचेच कार्य पुढे चालू ठेवून भक्तिमार्गाचा प्रसार केला. त्यामुळे मागे म्हटल्याप्रमाणे 'स्वामी साक्षात् पंढरीराव' अशी त्यांच्याविषयी लोकांची श्रद्धा होती. राधाकृष्ण स्वामी यांचे शिष्य श्रीविष्णुमहाराज यांनी महाराजांच्या लीलांसंबंधी काढलेले खालील उद्गार अगदी यथार्थ आहेत.

**'दयानिधि अवतरे जग उद्धराया ।**
**उमगेना ज्याची लीला गातां शेषराया ॥'**

---

प्रकरण सातवे

# महानिर्याण (?)

अलंकापूर क्षेत्र पाहुनी पवित्र । व्यापक सर्वत्र तेथे वसे ॥ १ ॥
चला चला चला भाविक हो चला । सद्गुरू अचला पाहूं डोळा ॥ २ ॥
नरसिंह सरस्वती ज्याचे नाम । ठायींच अनाम यतिवर्य ॥ ३ ॥
पौष शुक्लपक्ष पौर्णिमा सुदीन । होय ब्रह्मीं लीन अद्वय जो ॥ ४ ॥
जग तारावया पूर्ण कृपानिधी । घेत जो समाधी आळंदींत ॥ ५ ॥

**–श्रीविष्णुमहाराज**

## प्रत्यक्ष श्रीदत्तमूर्ती म्हणून प्रगट

कर्दळी वनात गुप्त झाल्यावर महाराज ठिकठिकाणी हिंडत शके १७९५ मध्ये आळंदीत आले. ते बाळाबोवा चक्रांकित यांचे घरी बारा वर्षे राहिले. ज्या दिवशी बारा वर्षे पूर्ण झाली त्या दिवशी गोपाळपुऱ्यातील विठ्ठल मंदिरात, म्हणजे ज्या ठिकाणी त्यांची समाधी आहे तेथे, आले. या काळात गाणगापूर व इतरत्र ज्या लीला आपल्या पूर्वचरित्रात केल्या , त्याच त्यांनी आळंदीत किंवा आळंदीत येण्यापूर्वी केल्या. पूर्वचरित्रातील म्हणजे गुरुचरित्रातील लीला महाराजांनी उघडपणे केल्या; पण आळंदीत सर्व काम अगदी चोरून केले व तसे करीत असता प्रगट होऊ नये म्हणून फार दक्षता घेत असत. कित्येक प्रसंगी निकटवर्ती शिष्यमंडळींना त्यांच्या सत्य स्वरूपाविषयी कल्पना होत असे; पण महाराज आपल्या मायावी भाषणाने लोकांना मोहात पाडीत आणि संशयास जागा निर्माण करून ठेवीत असत. महाराजांचा स्वभाव व राहणी यामुळे त्यांच्याविषयी लोकांच्या निरनिराळ्या कल्पना कशा झाल्या होत्या याविषयी पूर्वी विवेचन केले आहे. तत्कालीन इतर संप्रदायांशी या नाही त्या नात्याने महाराजांचा संबंध आल्यामुळे तर त्या त्या संप्रदायांनी त्यांना आपलेच म्हटले आहे.

अखेरीस एका प्रसंगाने त्यांचे खरे स्वरूप उघडकीस आले व त्यामुळे महाराजांनी अवतारसमाप्तीची लीला केली. ७०० वर्षांच्या एका जुन्या ब्रह्म-समंधाला महाराजांनी मुक्ती दिल्याची कथा वाचकांचे स्मरणात असेलच. तसाच

एक फार मोठा समंध कोणा एकास त्रास देत होता. म्हणून त्याच्या घरच्या लोकांनी त्याला महाराजांकडे आणले. सर्व मंडळींच्या मध्यभागी महाराज बसले होते. समंध 'झाडास' सोडून जाण्यास तयार नव्हता. म्हणून महाराज त्याच्याशी बोलत होते व पुन:पुन्हा विनंती करून परोपरीने जाण्यास सांगत होते. पण त्या समंधाची काही इच्छा होती. ती पूर्ण केल्याशिवाय तो जाण्यास तयार नव्हता. शेवटी रागावून महाराजांनी त्याला म्हटले, "आम्ही तुला सांगतो तू जा. श्रीज्ञानेश्वरांचे पादुकांवर मस्तक ठेवून चालता हो. ते तुझे मनोरथ पूर्ण करतील." त्यावर तो समंध चवताळून म्हणाला, "तेथे जाऊन काय करू ? तू येथे एवढा बसला आहेस ना ? मग मला दगडावर डोके आपटावयास का सांगतोस ?" तेव्हा महाराज रागाने आरक्त मुद्रा करून म्हणाले, "खबरदार, एक शब्द जास्त बोललास तर !" असे म्हणून मंडळीस त्यांनी त्या माणसास न्यावयास सांगितले. त्याच्या अंगातील समंध तर गेलाच, पण या प्रसंगाने महाराज प्रत्यक्ष श्रीदत्तमूर्तीच होत अशी भावना आळंदीकरात निर्माण झाली. आता जास्त राहणे योग्य नाही असे पाहून सोवळे नेसून बांधलेल्या विठोबाचे मंदिरात, श्रीविठ्ठलाचे चरणांजवळ जागा तयार करून ठेवली होती तेथे महाराजांनी समाधी घेतली.

## पूर्वसूचना

आळंदीत बारा वर्षे वास्तव्य करून पुढे अवतार समाप्त करावयाचा हे अगोदरच ठरले होते, असे पुढील एक दोन हकीकतींवरून वाटते. सातार्‍या-जवळील लिंब गावी राहणारे महाराजांचे भक्त रामचंद्रपंत फाटक हे दरवर्षी आळंदीस महाराजांच्या दर्शनास येत असत. समाधिस्थ होण्यापूर्वी महाराजांची व त्यांची जी भेट झाली त्यावेळी त्यांनी रामचंद्रपंत यांना सांगितले की, "तू आळंदीस येऊ नकोस. येणेचे कारण नाही." आणि त्याच वर्षी महाराज समाधिस्थ झाले.

आळंदीत येण्यापूर्वी वर्‍हाड खानदेशातून महाराजांचे भ्रमण चालू होते. वर्‍हाडात लोणार येथे वास्तव्य असताना तेथे राहणार्‍या श्रीसच्चिदाश्रम स्वामींना काही योगाभ्यास शिकविला होता. हा सर्व अभ्यास महाराजांचे सांगण्यावरून त्या स्वामींनी 'अंतरानुभव' नामक ओवीबद्ध ग्रंथात सांगितला आहे. या ग्रंथाचा समाप्तिकाल कार्तिक वद्य पक्ष शके १७९४ असा आहे. (तिथीचा निर्देश आढळला नाही.) यावरून महाराज शके १७९४ च्या आसपास लोणार येथे होते हे दिसून येते. लोणारहून निघताना महाराजांनी श्रीसच्चिदाश्रम स्वामींना आज्ञा केली होती की, "बारा वर्षे दक्षिणेत येऊ नकोस." अशी आज्ञा देण्यास काही विशेष कारण होते. त्यासंबंधी उल्लेख पुढे येईल. आज्ञेप्रमाणे

बारा वर्षांचा काल समाप्त झाल्यावर श्रीसच्चिदाश्रम स्वामी दक्षिणेत आले. फिरत फिरत आल्यावर त्यांना महाराज समाधिस्थ झाल्याचे समजले. सच्चिदाश्रम स्वामींना आपले खरे स्वरूप समाधिस्थ होईपर्यंत कळू नये म्हणून व बारा वर्षांनीच पुढे समाधी घ्यावयाची आहे हे अगोदरच ठरले असल्यामुळे महाराजांनी त्यांना तशी आज्ञा दिली होती.

## समाधी

ब्रह्मसमंधाने काढलेल्या उद्‌गारांमुळे भोवतालच्या लोकांना आपल्या खऱ्या स्वरूपाची कल्पना आली आहे असे पाहून जनसंपर्क टाळण्याच्या मूळ स्वभावास धरून महाराजांनी समाधी घेण्याची लीला केली. अवतार समाप्त करावयाचे महाराजांच्या मनात होतेच. पण त्याचे निमित्त मात्र भोवतालच्या लोकांवर ठेवले असे दिसते. महाराजांच्या निर्याणासंबंधीची हकीकत श्रीअप्रबुद्ध यांनी ब्रह्मर्षी श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचे जे चरित्र लिहिले आहे त्यांत आली आहे. त्याच माहितीच्या आधाराने पुढील भाग लिहिला आहे. आळंदीत गोपाळपुऱ्याचे रस्त्यावर श्रीविठ्ठल मंदिर बांधण्याचे काम महाराजांनी सुरू केले होते. महाराजांचे एक शिष्य दत्तोपंत आठवले हे महाराजांच्या आज्ञेवरून भिक्षेस जात असत. त्याप्रमाणे ते बाहेरगावी गेले होते. महाराजांनी बाळाबोवा चक्रांकित यांचे माडीवर स्वत:ला कोंडून घेतले. बाळाबोवा लक्ष्मणबोवा इत्यादि शिष्यांना अशी आज्ञा केली की आंतून दार उघडा म्हटल्याशिवाय दार उघडावयाचे नाही. आठ दिवस झाले. महाराजांचे खाणेपिणे यासारखे शारीरिक व्यवहार बंद झाले होते. बाहेरगावी गेलेले दत्तोपंत आठवले परत आले. तेव्हा त्यांना महाराजांनी आरंभलेला प्रकार समजला. तेव्हा दत्तोपंतानी " तुम्ही असे कसे केले ? महाराजांनी म्हटले म्हणून काय झाले ?" अशा शब्दात इतर मंडळीस दोष देऊन त्यांनी खोलीचे दार उघडले. महाराज आसनस्थ होऊन काही यौगिक क्रिया करीत होते. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे याही वेळेस त्यांनी पोटातील आतडी बाहेर काढली होती. त्यावरून असा तर्क होतो की शरीराचे वार्धक्य टाकून आयुष्यवर्धन करण्याचा त्यांचा मानस असावा. अर्थात् हा केवळ तर्क आहे. त्यांच्या मनात काय होते हे सांगणे कठीण ! दत्तोपंतांनी दार उघडल्याबरोबर महाराजांनी क्रोधाने डोळे लाल केले व म्हणाले, " तुला हा कारभार कोणी सांगितला ? असो. झाले ते झाले. आता आम्हास राहावयाचे नाही. विठ्ठल मंदिरात नेऊन ठेवून द्या." बाहेर काढलेली आतडी पूर्ववत आत ठेवून महाराज तसेच आसनस्थ टकमक पहात बसले. मौनवृत्ती स्वीकारलेली आणि श्वासोच्छ्वास बंद. त्यामुळे उपस्थित असलेल्या मंडळींना महाराज आहेत की नाहीत हे ठरविण्याची पंचाईत पडली. या लोकांना झालेल्या प्रकाराने फार वाईट

वाटले. पण कोण काय करू शकणार ! महाराजांच्या आज्ञेप्रमाणे भक्त मंडळींनी त्यांना पालखीतून श्रीविठ्ठल मंदिरात नेऊन तेथील सोप्यांत ठेवून दिले.

श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांना मंडळींनी लगेच झालेल्या प्रकारासंबंधी निरोप पाठविला. ते लागवणकर वैद्यास घेऊन तातडीने आळंदीस आले. अण्णासाहेबांना समोर पाहतांच महाराजांनी हास्यमुद्रा केली व कुस्तींत ज्याप्रमाणे दंड थोपटतात तसा आविर्भाव करून दंड थोपटला आणि उगाच राहिले. अण्णासाहेबांनी जवळ जाऊन महाराजांचे पाय धरले व "हे काय मांडले आहे ? चला, हे सोडून द्या," असे म्हटले आणि चांदीच्या वाटीतून थोडे दूध आणले होते ते महाराजांच्या तोंडास लावले व 'प्यायलेच पाहिजे' म्हणून विनंती केली. त्याप्रमाणे महाराजांनी दूध पिऊन टाकले. महाराजांचा श्वासोच्छ्वास पूर्ववत सुरू झाला. काही वेळाने लघुशंका झाली. पण मौनवृत्ती कायम होती. अण्णासाहेबांस महाराजांच्या अंगांत ताप असल्याचे आढळून आले. दुसरे दिवशी सकाळी श्रीअण्णासाहेब त्यांच्या मुलीच्या मुलीचे बारसे असल्यामुळे पुण्यास निघून गेले.

अण्णासाहेब गेल्यावर इकडे महाराजांनी मोठ्या क्रोधाने स्वतःस समाधींत ठेवण्यास मंडळींना सांगितले आणि तसे न केल्यास आपण सर्वांस शापून टाकू असा वर धाक घातला. महाराजांच्या उद्गाराने भोवतालची मंडळी घाबरून गेली. त्यांनी महाराजांना समाधींत ठेवले व वर दगड बसविला.

त्याचवेळी पुण्यात अण्णासाहेब बारशाचे जेवण आटोपून श्रीगुंडाचे गणपतीस दर्शनाकरिता गेले होते. तेव्हा त्यांना असे दिसले की आळंदीच्या बाजूने एक तेजाचा गोळा येऊन श्रीगणपतीचे हृदयांत शिरला. तेव्हाच अण्णासाहेब मनात उमजले की आळंदीत नक्कीच काही तरी घोटाळा झाला आहे. पुढे आळंदीस आल्यावर त्यांना सर्व हकीकत समजली. अण्णासाहेबांप्रमाणेच महाराजांच्या कृपेतील दुसरे एक अधिकारी सत्पुरुष यशवंतराव महाराज देवमामलेदार यांचेकडे नाशकास, बाळाबोवा 'आता काय करावे ?' हे विचारण्याकरिता गेले होते. तेव्हा यशवंतराव महाराज बाळाबोवांना म्हणाले, "सर्व व्यवस्था होऊन गेली. आता काय त्याचे ?"

याप्रमाणे पौष शुद्ध पौर्णिमा शके १८०७ बुधवार दिनांक २० जानेवारी १८८६ रोजी महाराजांचे निर्याण झाले. लौकिक दृष्टीने महाराजांनी समाधी घेतली तरी श्रीसंत दासगणू महाराजांनी म्हटल्याप्रमाणे,

**'आळंदी निजानंदा त्यागिलें । परी न कोठे लांब गेले ।**
**निज भक्तांच्या रक्षणा भले । आहेत स्वामी सन्निध ।।'**

आळंदीत महाराजांचा अखंड वास आहे !

## आवेश

।। श्री ।।

स एव धन्यः तव भक्तिभाग्यः ।
तवार्चको यः सुकृतिः स एव ।।
तव स्तुतिं यः कुरुते सदैव ।
सः स्तूयते दुश्चवनादिदेवैः ।।

—काशीखंड, उत्तरार्ध, धर्मेश्वराख्यान

**प्रश्न**—प्रत्येक वस्तु किंवा सर्व ब्रह्म आहे असे कोणी म्हणावे ?

**उत्तर**—ज्याला प्रत्येक वस्तूकडून ब्रह्माचे कार्य करविता येईल त्याने म्हणावे. बाकी कोणी म्हणणे म्हणजे व्यवहार आहे." —श्रीमहाराज

श्री. रा. रा. कृष्णाजी हरि देसाई, राजापूरकर यांना खुद्द महाराज यांनी स्वप्नात सांगितलेल्या ब्रह्मनिरूपणातील शेवटचे महत्त्वाचे वाक्य वरीलप्रमाणे होय. सदर निरूपण पौष शुद्ध पौर्णिमा शके १८०७ रोजी रात्रौ दोन ते पांच झाले. निरूपण झाल्यानंतर बारा तास पर्यंत आवेश होता. आवेश म्हणजे, जरी प्रत्यक्ष काळ आला तरी त्याला भस्म करून टाकीन इतकी मनाची निर्भय स्थिती होती आणि ती दुसरे दिवशी झोप लागेपर्यंत होती. यांत आश्चर्याची आणि महत्त्वाची गोष्ट ही की पौष शु. पौर्णिमा शके १८०७ याच दिवशी आळंदीस महाराजांनी समाधी घेतली व त्याच दिवशी रात्रौ राजापूर येथे स्वप्नांत कृष्णाजी हरि देसाई यांना ब्रह्मनिरूपण सांगितले.

हेच देसाई स्वतः पौष मासी महाराजांचे उत्सवात, त्यांचे आज्ञेवरून आळंदीत, प्राकृत 'काशीखंड' वाचीत असत.

वरील गोष्टी स्वतः देसाई यांनी श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांना सांगितल्या, त्या वेळी श्रीअप्रबुद्ध हेही तेथे उपस्थित होते.

## स्वप्नमंत्रोपदेश

धुळ्याचे भाऊसाहेब गणपुले हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांचे त्रोटक चरित्र पुढे प्रभावळ या प्रकरणांत दिले आहे. महाराजांनी यांना उपदेश देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु भाऊसाहेब धुळ्यास असता महाराजांनी आळंदीस समाधिलीला केल्याचे समजले. तेव्हा भाऊसाहेबांना अत्यंत वाईट वाटून 'मला उपदेश दिल्यावाचून गेलात कसे ?' असे म्हणून अन्नपाणी वर्जून महाराजांच्या तसबिरीपाशी बसले. तेव्हा महाराजांनी त्यांना स्वप्नमंत्रोपदेश दिला. परंतु यथाशास्त्र काम करण्याकरिता आणि श्रीबुवासाहेब—श्रीपद्मनाभ-स्वामी, धुळे—व आपण यांत फरक नाही हे प्रत्ययास आणून देण्याकरिता त्या

मंत्रोपदेशांतील फक्त एक अक्षर वगळले; कारण मंत्रोपदेश देण्याचा अधिकार आपल्या मागे महाराजांनी, ज्यांना त्यांनी 'आपले हृदय' म्हणून म्हटले होते, त्या श्रीबुवासाहेब यांस देऊन ठेवला होता. तेव्हा त्यांचा हक्क बुडू नये म्हणून एक अक्षर वगळले. पुढे ते अक्षर बुवासाहेबांनी सांगून मंत्रोपदेश पूर्ण केला.

## गुराख्यांस दर्शन

महाराजांच्या पहिल्या पुण्यतिथीला मोठा समारंभ होऊन भोजने चालली होती. इतक्यात गुराख्यांच्या पोरांची सुमारे १५०–२०० जणांची एक टोळी अकस्मात तेथे येऊन थडकली. त्यामुळे तेथे मोठीच गडबड उडाली. गुराख्यांच्या पोरांपैकी कित्येक आसपासच्या गावचे होते व कित्येक खुद्द आळंदीचे होते. पुढे त्यांच्या जेवणाची सोय केली. त्यांस तुम्ही येथे कसे आलात म्हणून विचारता त्यांनी सांगितले की नदीपलिकडच्या झाडाखाली महाराज बसले असून त्यांनीच 'तुम्हांला मठांत बोलावतात' म्हणून सांगितले. गावच्या गुराख्यांनीही हेच सांगितले, परंतु अल्पवयामुळे महाराज समाधिस्त होऊन वर्ष झाले व आता दिसतात कसे हे त्यांना सुचले नसावे, असे मठातील लोकांना वाटले. नंतर काही मंडळी गुराख्यांच्या पोरांनी सांगितल्याप्रमाणे नदीकडे जाऊन पाहून आली तो तेथे कोणीच नव्हते !

## दशमीच्या नैवेद्याची आठवण

महाराज असताना त्यांच्या दिनचर्येतील एक भाग असा होता की, दुपारी ज्ञानेश्वरीवर प्रवचन झाल्यावर, गांधी यांचे घरून येणाऱ्या दुधातल्या बाजरीच्या दशमीचा ते फराळ करीत असत. ह्या गोष्टीला अनुसरून अजूनही रोज दुपारी ३–३॥ चे सुमारास महाराजांना बाजरीच्या दशमीचा नैवेद्य दाखविला जातो. महाराज समाधिस्थ झाल्यावर एकदा असा प्रसंग घडला की लक्ष्मणबोवा गांधींनी महाराजांना लागोपाठ तीन दिवस दशमीचा नैवेद्य अर्पण केला नाही. मठांत मारुतीच्या शेजारी जे देवघर आहे तेथे महाराज स्वतः श्रीविठ्ठल मंदिराचे—हल्लीचा मठ—बांधकाम पाहण्यास बसत असत. त्या देवघराजवळ महाराजांची काही भक्तमंडळी दुपारी बसली होती. त्या मंडळींत लक्ष्मणबोवा पण सामील झाले होते. गप्पागोष्टी चालू होत्या. बोलण्याच्या नादात लक्ष्मणबोवांना झोपेची गुंगी आली. त्या गुंगीत लक्ष्मणबोवांना महाराजांचा दृष्टांत झाला. त्या दृष्टांतात महाराजांनी लक्ष्मणबोवाचे श्रीमुखांत खाडकन् थप्पड मारली व म्हणाले, "अरे ! मी तीन दिवस उपाशी आहे. लौकर दशमी आण." लक्ष्मणबुवांची गुंगी उतरली व ते मंडळींतून उठून जाऊ लागले. तेव्हा मंडळींनी त्यांना 'काहो जाता ?' म्हणून विचारले. 'आता येतो' असे सांगून ते सरळ

त्यांचे गावातील घरी आले आणि आपल्या मातोश्री काशीताई यांना म्हणाले, "लवकर दशमी कर." त्यावर काशीताईंनी विचारले, "काय रे, आज तीन दिवस झाले तूं दशमी नेली नाहीस." तेव्हा लक्ष्मणबोवा उत्तरले, "ते मी मग सांगेन." काशीताईंनी लगेच दुधातील बाजरीची दशमी करून त्यावर लोणी, चटणी, भाजी, वगैरे घालून ती लक्ष्मणबोवांजवळ दिली. लक्ष्मणबोवा महाराजांचे समाधीपुढे आले व नेहमीप्रमाणे दशमीचा नैवेद्य दाखविला आणि प्रार्थना केली की, "मजकडून चूक झाली. क्षमा करा. पुन्हा अशी चूक होणार नाही." तेथे बसलेल्या मंडळींनी हा सर्व प्रकार पाहिला व त्यांनी लक्ष्मणबोवाजवळ काय झाले ते सांगण्याबद्दल आग्रह धरला. तेव्हा लक्ष्मणबोवांनी लोकांसमोर आपला गाल केला. गालावर पांच बोटे उमटलेली मंडळींना दिसली. तेव्हा तुम्हाला कोणी मारले म्हणून मंडळी विचारू लागली. लक्ष्मणबोवा म्हणाले, "मी ज्याची सेवा करण्यास चुकलो त्यांनीच माझ्या तोंडांत मारले. मी मधाशी उठून गेलो त्याचे कारण हेच." "तुम्ही खरोखर भाग्यवान आहांत ! तुम्हांला महाराजांचे दर्शन झाले." असे म्हणून मंडळींनी लक्ष्मणबोवांचे पाय धरले.

## दहीकण्या खाल्ल्या

पंढरपूरच्या वाटेवर आष्टी नावाचे एक गाव आहे. पूर्वी रेल्वे नव्हती तेव्हा पंढरीचे यात्रेकरू वाटेत आष्टीस मुक्काम करीत. तेथील ओढ्यावर स्नान, भोजन वगैरे कार्यक्रम आटोपून संध्याकाळी ते पंढरपूरच्या वाटेस लागत. आष्टीस डंके उपनावाचे महाराजांचे एक भक्त राहत होते. डंके यांना ज्ञानेश्वर नावाचा एक कर्तासवरता मुलगा होता. तो एके दिवशी अचानकपणे मृत्यु पावला. या घटनेने त्याच्या आईला फार दुःख झाले. तिने महाराजांचा धावा सुरू केला. "महाराज, असे कां व्हावे ? माझे काय चुकले ? माझा मुलगा आता मेला आहे. या ताककण्या कोण खाणार ?" **'अनाथासी कल्पतरू । दुःखितासीं कृपासागरु ।'** असे दयाघन महाराज तिच्या घरी संध्याकाळी चार पाचचे सुमारास प्रगट झाले. बाईचे सांत्वन करून 'तुला वंश आहे. काळजी करू नकोस' असे महाराज म्हणाले. अशा शब्दांनी त्या बाईचे समाधान केल्यावर महाराज तिला पुढे म्हणाले, "तू म्हणालीस ना की दहीकण्या कोण खाईल; तर दे." ज्ञानेश्वरची आई म्हणाली, "महाराज, मी कशा करूं ?" त्यावर महाराज म्हणाले, "तुझी नणंद आहे. तिला करावयाला सांग." त्याप्रमाणे नणंदेने कण्या शिजविल्या व महाराजांनी त्या पोटभर खाल्ल्या. बाईचा निरोप घेऊन महाराज घराबाहेर पडले आणि मग ज्ञानेश्वराच्या आईच्या डोक्यात प्रकाश पडला. महाराज समाधिस्थ झाले असून आपण आळंदीस पुण्यतिथीचे उत्सवास उपस्थित राहून प्रसाद घेऊन येत असतो. तेव्हा महाराज आता आले कसे ? घराबाहेर येऊन तिने

चहूकडे शोध केला. पांथस्थांना या वाटेने कोणी संन्यासी गेले काय म्हणून विचारले पण महाराज कोणासच दिसले नाहीत.

## प्रज्ञावर्ध स्तोत्राची दुरुस्ती

ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांना प्रज्ञावर्धन स्तोत्राचे दुरुस्तीसंबंधी महाराजांचा जो अनुभव आला त्यावरून महाराजांचे 'ईश्वरत्व म्हणजे सर्वज्ञत्व, सर्वसाक्षीत्व व सर्वव्यापकत्व' हे दिसून येते व ते 'विश्वव्यापक, अखंड, सदैव-नित्य' आहेत हे प्रत्ययास येते. या स्तोत्रासंबंधीची हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

एके दिवशी अण्णासाहेब पुण्यास बुधवार पेठेतून जात असता तेथील एका पुस्तकाच्या दुकानात शिरले. तेथे काही पुस्तके चाळता चाळता एक लहानसे पुस्तक त्यांनी सहजच उचलून पाहिले. त्या पुस्तकात स्कंदपुराणातील प्रज्ञावर्धन स्तोत्र छापलेले आढळले. त्याच क्षणी अण्णासाहेबांच्या मनात ते स्तोत्र म्हणावे असे आले. छोट्याशा पुस्तकांत व्यवस्थेशीरपणा नसून मुद्रणदोषही होते. पण त्यांतील चुका व्याकरणाच्या नव्हत्या. म्हणून त्या अण्णासाहेबांच्या लक्षात आल्या नाहीत. ही घटना फाल्गुन वद्य प्रतिपदा शके १८१३ रोजी घडली. फाल्गुन वद्य पंचमी शके १८१३ पासून ते स्तोत्र म्हणण्याचा अण्णासाहेबांनी आपल्या मनाशी संकल्प केला. महाराज समाधिस्थ झाल्यावर पुढे सहा वर्षांनी घडलेला हा प्रसंग आहे, ही गोष्ट या संबंधात प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे.

फाल्गुन वद्य द्वितीया किंवा तृतीयेचे दिवशी महाराजांचे भक्त व अण्णासाहेबांचे गुरुबंधु दादा दांडेकर हे कोकणात दाभोळ गावी वेदशास्त्रसंपन्न केशवभटजी केळकर यांचे घरी निजले होते. झोपेतून त्यांना कोणीतरी जागे केले. पण कोण जागे करीत आहे त्याची दादांना कल्पना आली नाही, कारण जवळपास कोणीच दिसत नव्हते. आपणास महाराज जागे करीत आहेत असे त्यांना वाटले कारण त्यावेळी त्यांना महाराजांचे शब्द स्पष्टपणे ऐकू येत होते. महाराज दादांना सांगत होते, "उठ. मी सांगतो ते लिहून घे आणि पुण्यास जाऊन शनिवारी दादाला (अण्णासाहेबांना) नेऊन दे." दिव्याच्या उजेडात महाराजांनी जे काय सांगितले ते दादांनी लिहून घेतले. पण आपण काय लिहून घेत आहोत हे मात्र दादांना समजले नाही. दुसरे दिवशी केशवभट केळकर यांचे बंधु ब्रह्मचारी भिकंभट यांचेकडून दादांनी रात्री लिहिलेल्याची एक प्रत तयार करून घेतली. पुढे पुण्यास कसे जावे या विवंचनेत दादा पडले. कारण त्यांचेवर महाराजांची कृपा होती तरीं आर्थिकदृष्ट्या दादांची परिस्थिती हलाखीची होती. महाराजांचे शब्द तक्रार न करता पाळण्याचे दादांचे जणू काही व्रत होते. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे आपण करावे; पुढचे त्यांचे त्यांना ठाऊक ! असा विचार करून दादा दाभोळ बंदरावर आले. खिशांत बोटीच्या भाड्याइतके

सुद्धा पैसे नव्हते. इतक्यात त्यांच्या ओळखीचा एक गृहस्थ तेथे आला. या गृहस्थाला मुंबईलाच जावयाचे होते. ऐनवेळी काही जरूरीचे काम निघाल्यामुळे त्याला मुंबईस जाता येणे शक्य नव्हते. मुंबईला एकाकडे मोती पोचविण्याच्या कामावर तो गृहस्थ निघाला होता. दादांना पाहून तो गृहस्थ म्हणाला, "दादा, तुम्ही मुंबईला का जाता आहात ! बरे झाले. माझे आयतेच काम झाले !" दादा म्हणाले, "जावयाचे तर आहे, पण कसे जावे या विवंचनेत मी आहे," तेव्हा त्या गृहस्थाने म्हटले की, "माझे तिकीट घेऊन जावे. मुंबईस मोती पोचविण्याचे काम करावे आणि मग कोठे जावयाचे असेल तेथे जावे." दादांनी तावडतोब त्या गृहस्थाचे म्हणणे मान्य केले. महाराजांच्या योजनेचे कौतुक वाटून दादा बोटीवर चढले. मुंबईस पोचल्यावर मोत्यांचे काम करून बोरीबंदर स्टेशनवर आले. त्यांना कोणी तिकीट विचारले नाही की गाडीत अडविले नाही. पुण्यास गाडीतून उतरल्यावर ते सरळ तिकीट कलेक्टरच्या अंगावरून बाहेर पडले व अण्णासाहेबांच्या घरी आले. त्या दिवशी फाल्गुन वद्य पंचमी असून वार शनिवार होता. दादांनी काय लिहून आणले आहे हे अण्णासाहेब पाहतात तो ते प्रज्ञावर्धन स्तोत्र असल्याचे त्यांना कळले. बुधवार पेठेत घेतलेल्या छापील पुस्तकाशी ताडून पाहताच सर्व प्रकार अण्यासाहेबांच्या लक्षात आला. या घटनेविषयी स्वतः अण्णासाहेबांनी लिहिलेल्या टिपणात पुढीलप्रमाणे नोंद आहे.

"फाल्गुन व॥ प्रतिपदा शके १८१३ चे दिवशी पंचमीपासून छापील प्रतीवरून स्तोत्र म्हणावे असे मनात आले. हा हेतु व छापील प्रतीची अशुद्धता ही श्रींनी अप्रार्थित व अचिंतपणे जाणली व स्तोत्राचा शुद्ध पाठ अशरीर वाणीने दांडेकर यास सांगितला हे श्रींचे ईश्वरत्वाचे प्रमाण..." "१४–९–१९०२ श्रीप्रज्ञावर्धन स्तोत्र ॐ श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या प्रत्यक्षतेचे प्रमाण व कृपेचेही हेच. वे. शा. सं. केशवभटजीं केळकर हे दाभोळास राहत होते. त्यांचे घरी दांडेकर निजले असता, महाराजांनी त्यांस जागे करून, त्यांस स्तोत्र सांगितले. शिसपेन्सिलने लिहिले. फक्त शब्द कानी पडले. दिव्यांचा उजेड होता. मला दिलेली प्रत केशवभट केळकर यांचे हातची आहे. केशवभटजीस पूर्वी श्रींचे दर्शन झाले होते. त्या स्तोत्राची प्रत दांडेकर यांनी यथाश्रुत लिहून मजकडे प्रथम फाल्गुन व॥ पंचमी शनिवार दिवशी आणून ठेवली. गुडघे गावाहून कोकणातून आणली. या स्तोत्राची प्रत स्वहस्ताने करून दांडेकर यास फाल्गुन व॥ अष्टमी मंगळवार शके १८१३ या दिवशी दिली व त्यांनी मला दिली. या स्तोत्राची दुसरी प्रत वैशाख व॥ अष्टमी शके १८१४ शुक्रवारच्या रात्री पहाटेस करून शनिवार व॥ दशमी रोजी दांडेकर यास दिली. पहिल्या प्रतीत 'धी' अक्षर चुकून राहिले होते ते घातले. नामे २८ च तीस (३०) नाहीत. हे सिद्ध.

तीस नावांच्या छापील प्रतीवरून नित्य स्तोत्र म्हणावे असे माझ्या मनात पुणे येथे सुमारे तीन दिवसांपूर्वी आले व शनिवार फाल्गुन व॥ पंचमीस आरंभ करण्याचे माझे ठरले. हे दांडेकर यास कोकणात माहीत पडण्याचे मुळीच कारण नाही. असे असून त्यांनी शनिवारी ही प्रत आणून दिली. यावरून श्रींचे ईश्वरत्व म्हणजे सर्वज्ञत्व, सर्वसाक्षीत्व, सर्वव्यापकत्व इत्यादि व दांडेकर यांची योग्यता व श्रींचे ठिकाणी भक्ती ही सर्व दिसून येतात." पुढे याच संबंधी अण्णासाहेबांनी आणखी एक नोंद करून ठेवली आहे. ती येणेप्रमाणे–

"आज मंगळवार उजाडण्यापूर्वी (५–७–१९०९) प्रज्ञावर्धन स्तोत्र पूर्वी शके १८१३ वर्षी दिले आणि परमात्मा म्हणजे श्रीनरसिंह सरस्वती सद्‌गुरुदेव सर्व व विश्वव्यापक अखंड सदैव नित्य आहे हे प्रत्ययाला आणून दिले. त्याच-प्रमाणे त्याचा दुसरा भाग असा दाखविला की, तो असा आहे व असतो हे जीवाला व त्यांच्या अंतःकरणाला कळत नाही म्हणूनच तो सर्व क्रिया करतो व त्यालाच सर्व सदैव समजते. व तो केवळ ज्ञानस्वरूप आहे व...सर्वं ज्ञानाचे झाले आहे म्हणून तो देव असे स्मरावे."

मग भाडे वगैरे देऊन अण्णासाहेबांनी दादा दांडेकर यांना परत पाठविले. पुढे एके दिवशी महाराजांनी अण्णासाहेबांना सांगितले की, 'रेल्वे कंपनीचे कर्ज ठेवू नकोस. उगीच अनेक पट द्यावे लागेल.' असे सांगण्याचे कारण म्हणजे महाराजांनी दादा दांडेकरांना मुंबईहून पुण्यापर्यंत रेल्वेने फुकट आणले होते. महाराजांच्या आज्ञेवरून अण्णासाहेबांनी पुणे ते मुंबई असे एक तिकीट काढून आणले आणि रेल्वेच्या कर्जाची अशा रीतीने परतफेड केली. या घटने संबंधी बोलताना अण्णासाहेब ते तिकीट दाखवीत असत. ते त्यांचेजवळ शेवटपर्यंत होते. ज्या प्रज्ञावर्धन स्तोत्राच्या संबंधात वरीलप्रमाणे घटना घडली ते जिज्ञासु वाचकांकरिता पुढे दिले आहे.

**श्रीगणेशायनमः**

**अस्य श्रीप्रज्ञावर्धनस्तोत्रमंत्रस्य सनत्कुमार ऋषिः स्वामी कार्तिकेयो देवता अनुष्टुप् छंदः मम सकलविद्यासिध्यर्थं जपे विनियोगः । स्कंद उवाच ।**

**योगीश्वरो महासेनः कार्तिकेयोग्निनंदनः ।**
**स्कंदः कुमारः सेनानीः, स्वामीशंकरसंभवः ॥ १ ॥**
**गांगेयस्ताम्रचूडश्च, ब्रह्मचारी शिखिध्वजः ।**
**तारकारिउमापुत्रः क्रोंचारातिः षडाननः ॥ २ ॥**
**शब्दब्रह्मस्वरूपश्च, सिद्धः सारस्वतोगुरुः ।**
**सनत्कुमारो भगवान् भोगमोक्षप्रदप्रभुः ॥ ३ ॥**

शरजन्मा गणाधीशपूर्वजो मुक्तिमार्गकृत् ।
सर्वगणप्रणेता च, वांछितार्थप्रदर्शनः ॥ ४ ॥
अष्टाविंशति नामानि, मदीयानि च यः पठेत् ।
प्रत्यूषे श्रद्धया युक्तो मूको वाचस्पतिर्भवेत् ॥ ५ ॥
महामंत्रमयानीति, मम नामानि कीर्तयेत् ।
महाप्रज्ञामवाप्नोति, नात्रकार्या विचारणा ॥ ६ ॥
इति श्रीस्कंदपुराणे कार्तिकेयमाहात्म्ये प्रज्ञावर्धनस्तोत्रं संपूर्णम् ।

(या स्तोत्रांतील सारस्वतोगुरुः हे एक नाव, भोगमोक्षप्रदप्रभुः हेही एकच नाव समजावे. एकूण नावे अठ्ठावीस. तीस नाहीत.)

## प्लेग व देवाची खोली

महाराज पुण्यात श्रीअण्णासाहेबांकडे आले म्हणजे बहुतेक माडीवरील लहान खोलीत जेवीत किंवा देवघरात बसत. त्यांच्या जेवणाच्या पद्धतीचे वर्णन मागे केलेच आहे. पुण्यातील प्लेगाने उडविलेला कहर अजून लोकांच्या लक्षात असेलच. त्या वेळी गोऱ्या सोजिरांनी घरेच्या घरे उध्वस्त करून लोकांना अगदी हैराण केले होते. रंग देण्याचे निमित्त करून त्यांनी अण्णासाहेबांच्या वाड्यातही धामधूम केली. घरातील सामान इकडे तिकडे करणे, बूटाच्या पायाने वाटेल तेथे संचार करणे आणि वाटेल तसा भ्रष्टाकार करणे हे त्या वेळचे सोहाळे सर्वांना माहीत असतीलच ! तेव्हा देवघराचे रक्षण कसे होईल म्हणून श्रीअण्णासाहेब यांस काळजी पडली. दहावीस सोजीर घेऊन डॉक्टर आले व अण्णासाहेब त्यांना घर दाखवू लागले. देवघरापाशी येताच अण्णासाहेबांनी सांगितले की येथे देव आहेत. हे ऐकताच इन्स्पेक्टरने आपल्या लोकांस दूर होण्यास सांगितले व आपण दारात उभा राहून अण्णासाहेबांस म्हणाला की आपण स्वतः रंग लावा. देवघर म्हणजे सुमारे चार हात लांब व अडीच ते तीन हात रुंद अशी खोली. होती. इकडून तिकडे सहज फलांग टाकून जाता येईल इतकी ती खोली लहान होती. पण इन्स्पेक्टरने आत पायही दिला नाही. अण्णासाहेबांनी स्वतः रंग दिला व ते माडीवर आले. दिवाणखान्यास रंग दिल्यावर सोजीर लोक महाराज जेवीत त्या त्या खोलीजवळ आले. तेव्हा असा चमत्कार झाला की केवळ आत डोकावून तो इन्स्पेक्टर म्हणाला की 'या खोलीला रंग देण्याची काहीच गरज नाही. राहीना का तशीच.' इतके म्हणून तीत पायही न देता ती तशीच ठेवून इन्स्पेक्टर सोजिरांसह चालता झाला !

महाराजांच्या चरित्रातील अनेक गूढ घटनांपैकी समाधिलीला ही एक अशीच गूढ घटना आहे. समाधी घेतल्यानंतरही आपण अखंडपणे असल्याची

साक्ष त्यांनी लोकांना अनेक प्रकारे दिलेली आहे. म्हणून महाराज पूर्वचरित्रात श्रीगुरुचरित्रात-सांगितल्याप्रमाणे जसे '**लौकिक मतें अविद्या धर्मी। जातों श्रीशैल यात्रेसि।**' किंवा '**लौकिक मतें आम्ही जातो। ऐसे दृष्टान्ती दिसतो।**' असे सांगून कर्दळी वनात गुप्त झाले त्याच प्रसंगाची पुनरावृत्ती आळंदीत झाली असे वाटते. समाधी म्हणजे लौकिक दृष्टया अवतारसमाप्तीचा खेळ! संत दासगणु महाराजांनी म्हटल्याप्रमाणे "आहेत स्वामी सन्निध।" असा अनेकांचा वर्तमान काळातही अनुभव आहे. ब्रह्मर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तींचा अनुभव, महाराज 'नित्य' आहेत असाच होता. त्यांच्या सांगण्यात तर असे येत असे की आजही समाधी खणून पाहिले तर त्या ठिकाणी महाराजांच्या पार्थिव देहाचा एकही भाग हाती लागणार नाही. यावरून, भक्तमंडळी पौष पौर्णिमेस पुण्यतिथीचा उत्सव करतात तो एक लौकिक प्रकार आहे अशी कल्पना येते. श्रीअप्रबुद्धांनी महाराजांच्या निर्याणासंबंधी अण्णासाहेबांना स्पष्टच विचारले की, "महाराजांना अशा स्थितीत टाकून केवळ बारशाकरिता म्हणून जाणे तुमच्या स्वभावास धरून नाही; असे असता तुम्ही कसे गेला? महाराज त्यांची स्वतःची इच्छा असल्याखेरीच कालवश होणे शक्य नाही अशी तुमची श्रद्धा असता तुम्ही परत आल्यावर काहीच कसे केले नाही?" त्यावर अण्णासाहेब म्हणाले, "महाराजांस आंत ठेवून मंडळीनी तोंड देखील बंद करून घेतले. तेव्हा मग काय करावयाचे? त्यांच्या इच्छेपुढे कोणाचा हट्ट चालणार? म्हणून स्वस्थ बसलो." हे ऐकून श्रीअप्रबुद्धांनी पुन्हा विचारले, "तुम्हांस दुःख झाले किंवा नाही?" तेव्हा अण्णासाहेब म्हणाले, "छे, त्यांत दुःखाचे काय कारण होते? तरी पण भाषण लट्ठालठ्ठी यांची मौज गेली हे खरे!" तेव्हा अप्रबुद्धांनी विचारले, "आता नाही का भाषण?" अण्णासाहेब म्हणाले, "आताही आहे. पण ती मौज काही वेगळी होती!" शेवटी श्री अप्रबुद्धानी स्पष्टपणे बोलून दाखविले की, "तुमचे सांगणे पटत नाही. बारशाचे उगीच निमित्त आहे. त्या दिवशी महाराजांची व तुमची काही तरी कानगोष्ट होऊन त्यांनी तुम्हास परत पाठविले. म्हणून त्याचे काही तुम्हास वाटले नाही आणि तुम्ही प्रयत्न केला नाही." हे ऐकून श्रीअण्णासाहेब थोडे हसले व चूप बसले. त्यांच्या चूप बसण्यामागे केवढे गूढ आहे!

जसे पूर्वचरित्रात श्रीशैल यात्रेला निघताना महाराजांनी, दुःख करीत त्यांना पोचविण्यास आलेल्या भक्तमंडळीना सांगितले होते की, '**जे भक्त असती माझ्या प्रेमीं। त्यासी प्रत्यक्ष दिसो आम्ही।**' तसेच श्रीअण्णासाहेब यांच्या टिपणात अशी एक नोंद आहे की महाराजांनी त्यांना सांगून ठेवले होते की 'जेव्हा तू

मला हाक देशील तेव्हा मी तुझ्या भेटीला येईन.' अण्णासाहेबांसारख्या अधिकारी व्यक्तीचा अनुभवही तसाच होता. अण्णासाहेब थोडे हसून चूप बसण्यामागे जे गूढ दडले आहे म्हणून वर म्हटले आहे ते हेच तर नसेल ना ! समाधिलीला केल्यावरही महाराजांची व श्रीअण्णासाहेबांची भेट होत असे यासंबंधीचा उल्लेख श्रीबुवासाहेब रुद्र, धुळे, यांच्या समाधिस्थानाच्या हकीकतीत पुढे येणार आहे.

जनसंपर्क वाढला म्हणून गाणगापूरच्या वास्तव्यात महाराज कर्दळीवनात गुप्त झाले तसेच आळंदीत, ते प्रत्यक्ष 'श्रीदत्तमूर्ती' आहेत हे प्रगट झाले म्हणून, त्यांनी समाधिलीला केली.

महाराजांच्या लौकिक निर्याणानंतर भक्तमंडळींनी त्यांचे संस्थान केले आणि उत्सव वगैरे कार्यक्रम सुरू झाले. त्याची समग्र हकीकत पुढे येईलच.

---

प्रकरण आठवे

# संप्रदाय व सांप्रदायिक ग्रंथ

## संप्रदायाचे स्वरूप

महाराष्ट्रात परमार्थाला वाहून घेतलेले अनेक संप्रदाय आहेत. त्यांत वारकरी संप्रदाय, दत्तसंप्रदाय, रामदासी संप्रदाय, आणि नाथ संप्रदाय इत्यादिकांचा प्रामुख्याने उल्लेख करावयास पाहिजे. नाथ संप्रदाय बराच जुना असून त्याचा भर योगाभ्यासावर फार होता. संसारी लोकांना किंवा सामान्य जनतेला योग-मार्गाचे अवलंबन करणे फार कठीण. म्हणून श्रीज्ञानेश्वरांनी भक्तिमार्गाचाच प्रसार केला. 'नाथ संप्रदायास आपल्यात सामावून घेऊन वारकरी संप्रदायाचा झपाटयाने विस्तार केला.' श्रीअप्रबुद्धांनी म्हटल्याप्रमाणे वारकरी, दत्तसंप्रदाय आणि रामदासी संप्रदाय हे तिन्हीही 'एकाच महत्कार्याची तीन अंगे आहेत.' उपासना किंवा उपास्य दैवत या दृष्टीने संप्रदायात वरवर पाहणाऱ्यास भिन्नता दिसत असली तरी धर्माचे रक्षण करणे हे तिन्ही संप्रदायांतील मुख्य कार्य आहे. अलिकडच्या काळात गावोगावी स्वयंभू गुरु व त्यांचे व्यक्तिनिष्ठ संप्रदाय निर्माण होत आहेत. त्यामुळे इतर ठिकाणी आढळून येणारा गोंधळ परमार्थातही शिरला आहे.

नाथ संप्रदायाचा इतिहास लिहिणारे श्री. ढेरे यांनी महाराष्ट्रातील सर्व गुरुपरंपरा व सर्व संप्रदाय यांचा संबंध नाथ संप्रदायाशी येनकेन प्रकारेण जोडला आहे. आणि महाराष्ट्रातील सर्व संप्रदाय हे नाथ संप्रदायाच्याच शाखा आहेत, असे दर्शविण्याचा त्यांचा अट्टाहास दिसतो. गुरूच्या नावात 'नाथ' हा शब्द असल्यामुळे मारकीनाथांची परंपरा देखील नाथ संप्रदायात दडपून दिल्याचा प्रकार त्यांच्या संशोधनांत दिसून येतो. भाग्य हे की श्रीनरसिंहसरस्वती प्रणीत दत्तसंप्रदायावर नाथ संप्रदायाचा काहीही परिणाम झाला नाही हे त्यांनी प्रांजळ-पणे मान्य केले आहे. महाराष्ट्र सारस्वतांत, देवनाथांची परंपरा नरसिंहसरस्वती-पासून दिली आहे व त्यायोगे नरसिंहसरस्वतींना नाथपंथी म्हटले आहे. अशा काही गोंधळांचा उल्लेख गुरुपरंपरा प्रकरणात पूर्वी केला आहे.

निरनिराळ्या संप्रदायांचे अंतिम ध्येय जरी एक असले तरी त्यांच्यात वरकरणी पाहणाऱ्यास जी भिन्नता आढळून येते तिचे रहस्य स्वतः महाराजांनी, श्रीस्वात्मसौख्य ग्रंथाच्या ज्ञानकांड ओवी क्रमांक ९६— '**ऐक्यता नव्हे विभक्त। सांप्रदाय वागवी मत। सुखदुःखाचा घटितार्थ। वोढवे जेणें॥**' यांत सांगितले आहे. पूर्वकर्मबंधानुसार सुखदुःखाचा भोग भोगीत असता मनुष्याला ज्या विशिष्ट कार्याकरिता ईश्वराने जन्माला घातले असते ते कार्य करण्याकरिता जी दैवी शक्ती लागते ती ज्या देवतेकडून प्राप्त होणारी असेल ती देवता ज्या संप्रदायाची उपास्यदैवत असेल, त्या संप्रदायांत मनुष्य ओढला जातो आणि यामुळे, वरकरणी संप्रदायांत विभक्तपणा उत्पन्न झालेला आढळून येतो.

महाराज श्रीदत्तात्रेयाचे अवतार व श्रीगुरुचरित्रांत वर्णन असलेले श्रीगुरुच असल्यामुळे त्यांचा संप्रदाय म्हणजे दत्त संप्रदायाचाच एक भाग आहे, हे निराळ्या प्रकारे सांगण्याची आवश्यकता नाही. त्यांच्या स्वतःच्या संन्यास, योग व उपासना या तीन्ही मार्गातील गुरुपरंपरांबद्दल विवेचन पूर्वी केले आहे. अनेक कारणांनी लोकांची शरीरे क्षीण व दुर्बळ झालेली असून योगाभ्यास करण्यास व तडीस नेण्यास लायक नसल्यामुळे हठयोगाच्या मार्गाचे अवलंबन सांगू नये, असे महाराजांचे धोरण होते. उपासना, भक्ती किंवा ध्यान अशा सौम्य मार्गांनीच सांप्रदायिकांना पुढे नेऊन त्यांनी त्यांना कृतार्थ केले. महाराजांच्या शिष्यांत हठयोगातील षट्चक्रभेदाच्या मार्गाने पूर्णतेस गेलेले श्रीपद्मनाभस्वामी, धुळे, हे एक होते. उपासना, अभ्यास किंवा मंत्र या बाबतीत काही संप्रदायांत एक ठराविकपणा आढळून येतो. प्रत्येक साधकाला ठराविक मंत्र व उपासना त्याच्या पारमार्थिक कल्याणाच्या दृष्टीने उपयोगी पडेलच असे नाही. साधकाचा जसा अधिकार असेल तसाच त्याला महाराजांनी अभ्यास किंवा उपासना लावून दिली. महाराजांनी कोणाला ध्यानयोग, कोणाला हठयोग, तर कोणाला 'अक्षरसाक्षीत्व' सांगितले. कोणाला नरसिंह उपासना दिली तर कोणाला 'तीन दिडक्यांची' दत्तोपासना सांगितली. आणि कुणाला पिढयान् पिढया चालत आलेली शिवोपासना पुढे चालू ठेवण्यास सांगितले. अशी ज्याची तळमळ असेल किंवा जो मार्ग मुमुक्षूने योजला असेल किंवा अन्य शब्दांत सांगावयाचे म्हणजे, ज्याचे जे पूर्वकर्म असेल ते ओळखून त्याने योजलेल्या मार्गानेच महाराजांनी त्याला पुढे नेलेले दिसून येते. पूर्वकर्मांचा संबंध लक्षात न घेता काही गुरु साधकाला एका ठराविक साच्याचीच उपासना सांगतात. त्यामुळे साधकाची अध्यात्मिक दृष्टया काहीच प्रगती होत नाही. तसा प्रकार महाराजांजवळ नव्हता व आजही तसा प्रकार संप्रदायात नाही. त्यांच्या स्वतःच्या वागण्यात जसा बहुरंगीपणा होता तसाच साधकांचे कल्याण करण्याच्या

साधनातही होता. सांप्रदायिक महामंत्र षोडशाक्षरी आहे. महाराजांच्या भजन प्रेमामुळे त्यांच्या संप्रदायाची वारकरी संप्रदायाशी एक प्रकारे सांगड जुळते. अगदी थोडक्या शब्दांत महाराजांच्या संप्रदायाचे स्वरूप 'सांप्रदाय शुद्ध भक्ती' असे त्यांच्याच शब्दांत म्हणावे लागेल.

## उत्तराधिकारी

महाराजांच्या पश्चात् संप्रदाय चालविण्याचा अधिकार त्यांचे पट्टशिष्य श्रीनारायणबुवा रुद्र उपाख्य श्रीपद्मनाभस्वामी, धुळे, यांचेकडे आला. महाराजांनी स्वतः बुवासाहेबांना हठयोगाच्या मार्गाने नेऊन त्यांना कृतार्थ केले होते. तरी महाराजांच्या सूचनेप्रमाणे बुवासाहेबांनी इतर सांप्रदायिकांना मात्र ध्यानधारणा-सारख्या सोप्या मार्गानेच पुढे नेले. महाराजांच्या मागे बुवासाहेबांनी जवळ जवळ पंधरा वर्षे संप्रदाय चालविण्याचे काम केले आणि अंतकाल जवळ आला आहे हे जाणून एके दिवशी त्यांनी "आपण आता जाणार. संप्रदाय तुम्ही चालवावा," असे म्हणून संप्रदाय चालविण्याची कामगिरी श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचेवर सोपविली. त्याच वेळी संप्रदाय चालविण्याच्या दृष्टीने काही विशेष सूचनाही त्यांनी देऊन ठेवल्या होत्या. श्रीबुवासाहेबांच्या पश्चात् संप्रदाय चालविण्याचा अधिकार श्रीअण्णासाहेब यांचेकडे आला तरी ते त्यांच्या स्वभावा-नुसार ही गोष्ट कोणालाच सांगत नसत. पण त्या काळातले त्यांचे एकंदर वर्तन पाहिले असता असे दिसून येते की ते 'सर्व सांप्रदायिकांची एक सामान्य धात्री' होते. अण्णासाहेबांनी श्रीबुवासाहेबांप्रमाणे पुढील पंधरा वर्षे संप्रदाय चालविला. असे सांगतात की हे पंधरा पंधरा वर्षांचे टप्पे महाराजांनीच नेमून दिले होते ! अण्णासाहेबांनी संप्रदाय चालविला खरा, पण स्वतःकडे गुरुत्वाचा मान कधीच घेतला नाही. प्रसंगी कोणाला काही विशेष लिहून दिले किंवा तोंडीच अमुक एखादी गोष्ट कर असे फार झाले तर सांगितले असेल; परंतु सांप्रदायिक दीक्षा देण्याची वेळ आल्यास ते लोकांना आळंदी अथवा धुळे येथील संस्थानांकडे पाठवीत. एखाद्या मनुष्याने महाराजांच्या संप्रदायाची दीक्षा घेतली म्हणजे त्यांना त्याच्याविषयी फार आपलेपणा वाटत असे. मुमुक्षु साधकाने महाराजांच्याच संप्रदा-याची दीक्षा घेतली पाहिजे असा त्यांचा हट्ट नव्हता. उलट एखाद्या परक्या संप्रदायां-तील साधक महाराजांच्या संप्रदायाची दीक्षा घेण्यास आल्यास 'तुला उपदेश घेण्याची गरज नाही' असे सांगत असत. खरा संप्रदाय कोणता आणि खोटा कोणता हे निवडण्याचे धोरण त्यांचे त्यांनाच माहीत होते. अशा रीतीने स्वतःकडे मोठेपणाचा कोणताही मान न घेता महाराजांचा संप्रदाय चालविण्याचे कार्य त्यांनी केले. वर्तमानकाळात संप्रदाय चालविण्याचे काम धुळे व आळंदी येथील संस्थानांचे अधिपती करीत आहेत.

## श्रीस्वात्मसौख्य : ग्रंथपरिचय

महाराजांनी सांप्रदायिकांच्या कल्याणाकरिता श्रीस्वात्मसौख्य हा ग्रंथ सांगितला आहे. तो महाराजांचे नारायणस्वामी नावाचे कोणी शिष्य होते त्यांना सांगितलेला असून त्यांनीच तो उतरून घेतला आहे. हा ग्रंथ 'करंज' ग्रामी पूर्ण झाला. विदर्भातील करंज ग्राम म्हणजे ज्याला लाडाचे कारंजे म्हणतात ते गाव होय. या गावीच महाराजांचा जन्म झालेला आहे ही गोष्ट वाचकांच्या लक्षात असेलच. श्रीस्वात्मसौख्य ग्रंथ ओवीबद्ध असून ओवीसंख्या एकूण ५१६ आहे. आध्यात्मिक उन्नतीचे तीन प्रमुख मार्ग आहेत आणि ते म्हणजे '**पिपीलिका मीन विहंगम । कर्म उपासना ज्ञानोत्तम ।**' या ओवीत सांगितल्याप्रमाणे कर्म, उपासना आणि ज्ञान हे होत. हे तीन मार्ग सांगणारी कर्मकांड, उपासना–कांड आणि ज्ञानकांड अशी तीन कांडे सदर ग्रंथांत आहेत. कर्मकांड–ओवी संख्या १३१; उपासनाकांड–ओवी संख्या १४० व ज्ञानकांड–ओवीसंख्या २४५; या प्रमाणे एकूण ५१६ ओव्या होतात. स्वत: महाराजांनी म्हटल्याप्रमाणे '**पांच शतक पंचदशका ओवी । झाली त्रिकांडाची बरवी ।**' या ग्रंथात ५१५ ओव्या आहेत म्हणून मूळ ओव्यांपेक्षा एक ओवी जास्त आहे. ज्ञानकांडामधील ओवी क्रमांक २४३– '**पूर्ण झाला करंजग्रामीं । विदर्भ देशामाजी स्वामी । नरसिंह सरस्वती यति नामी । नारायणासी बोधिला ।।**' ही ओवी ज्या नारायणस्वामीला महाराजांनी हा ग्रंथ करंजग्रामी सांगितला त्यांना स्फुरली व त्यांनी ती नंतर ग्रंथांत समाविष्ट केलेली आहे, म्हणून ओवीसंख्या एकने वाढलेली आहे.

'**दत्तात्रे गुरुप्रसाद । उपदेश वरद लाधला ।**' (ज्ञा. कां. ओ. २१५.) आणि '**त्या प्रसादाचा महिमा । सकल व्युत्पत्ति आली आम्हा । अनंतशास्त्रे मनोरमा । ध्यानासी आली ।।**' (ज्ञा. कां. ओ. क्र. २१६) या ओव्यांत श्रीदत्तात्रेयाचा उपदेश होऊन स्वात्मसौख्यात सांगितलेले सर्व ज्ञान झाले, असे महाराजांनी म्हटले आहे. '**अनंत वेद अनंत शास्त्रें । स्वतां बोलिलों मूळ सूत्रे ।।**' याप्रमाणे स्वात्मसौख्यांतील ज्ञान सूत्ररूपाने सांगितले असून ते '**वदतां झालों प्रगट गुप्त**' म्हणजे काही गुप्तपणे व काही उघडपणे अशा रीतीने सांगितले आहे. सांप्रदायिक व सत् असा शिष्य आढळल्यास त्यालाच हा ग्रंथ द्यावा, इतरांस देऊ नये अशी महाराजांची आज्ञा होती.

या ग्रंथाची भाषा सांप्रदायिक आहे. ज्या अधिकारी पुरुषाला तो पूर्णपणे समजला आहे अशाच्या तोंडून ऐकल्यास तो समजण्यासारखा आहे. परंतु हा ग्रंथ नित्यपठणात ठेवल्यास हळूहळू अर्थाची उकल होते व ग्रंथ समजतो, असा काहींचा अनुभव आहे. महाराजांनी, ते असेपर्यंत हा ग्रंथ बाहेर काढण्याची बंदी केली होती. म्हणून त्यांच्या शिष्यमंडळीतही पुष्कळ गैरसमज आहेत. यातील

शब्दांचे अर्थ कठीण आहेत. त्यामुळे ते निरर्थक वाटतात आणि असले निरर्थक महाराज कसे लिहितील असे समजून हा ग्रंथ महाराजांनी लिहिलेला नाही असे मानणारे पुष्कळ लोक आढळतात.

ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याविषयी पूर्वी महाराजांची परवानगी नव्हती. त्यामुळे ग्रंथाची हस्तलिखित प्रत करून त्यावरून तो वाचण्याची प्रथा आहे. ज्याला ग्रंथ वाचावयाचा असेल त्याने स्वहस्ताने ग्रंथाची प्रत तयार न करता दुसऱ्याने लिहून दिलेल्या प्रतीवरून तो वाचावा, असा एक अलिखित नियम संप्रदायात आहे. महाराजांच्या गादीवरील विद्यमान अधिकारी श्रीभक्त माधवबुवासाहेब गोडबोले यांनी स्वत: या ग्रंथांच्या अनेक हस्तलिखित प्रती करून किंवा दुसऱ्याकडून तसे करवून मागणी करणाऱ्या भाविकांस पुरविल्या आहेत. त्याचप्रमाणे दादा दांडेकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव कै. श्रीभक्त सदाशिव महादेव उपाख्य बापूसाहेब दांडेकर, रा. अमरावती यांनीही या ग्रंथाच्या अनेक हस्तलिखित प्रती करून वाचणाऱ्यास दिलेल्या मला माहीत आहे. फार पूर्वी ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांनी या ग्रंथाची कर्म व उपासना ही दोन कांडे 'मुमुक्षु' नावाच्या साप्ताहिकांत छापली होती. त्याचप्रमाणे काव्येतिहास-संग्रहासारख्या कोणा मासिकातून ज्ञानकांड छापले गेले होते. ग्रंथ छापण्याविषयी महाराजांची परवानगी नसल्यामुळे आतापर्यंत वरील दोन अपवाद सोडल्यास तो छापला गेला नव्हता. परंतु भोर संस्थानच्या युवराजांनी शके १८६१ च्या चैत्र शु. नवमीस ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. त्या पुस्तकांत महाराजांनी रचलेले 'श्रीज्ञानेश्वराष्टक' व श्रीज्ञानेश्वरीतील नित्यपाठाच्या ओव्याही छापल्या आहेत. मठांतील या ग्रंथाच्या मूळ प्रतीशी ही छापील प्रत ताडून न पाहिल्यामुळे तीत बरीच अशुद्धे राहिली आहेत. हल्लीचे मठाधिपती प. पू. श्री. माधवबुवा यांच्या आज्ञेनुसार श्रीअप्रबुद्धांनी नुकतेच 'सार्थ श्रीस्वात्मसौख्य' प्रकाशित केले आहे.

इतर सांप्रदायिक ग्रंथाप्रमाणे या ग्रंथात ज्ञानकांडाच्या शेवटच्या बारा ओव्यांत ग्रंथाची फलश्रुती सांगितली आहे. या ग्रंथाच्या नित्य पठणाने ऐहिक कामना तर पूर्ण होतीलच पण '**ज्ञान अबाधित होईजे । सिद्ध पुरुषासारखे ॥**' असे सांगितले आहे.

या ग्रंथातील भाषापद्धतीविषयी आणखी थोडा खुलासा करणे आवश्यक आहे. ग्रंथाची भाषा अगदी स्वतंत्र आहे. शब्दांचे अर्थ नेहमीच्या रूढ अर्थापेक्षा फार वेगळे आहेत आणि योगशास्त्रे, उपनिषदे वगैरेतील संदर्भ माहीत असल्या-शिवाय अर्थबोध होणे शक्य नाही. उदाहरणार्थ, 'व्यंकटरमणा' हा शब्द महाराजांनी ज्या अर्थी योजला आहे तो लक्षात न आल्यामुळे महाराज हे महा-

राष्ट्रीय नसून कर्नाटकी असावेत असा एक गैरसमज त्यांच्याविषयी होऊन बसला आहे. त्याचप्रमाणे लेखक व वक्ता यांना उद्देशून वापरलेले 'कृष्णचैतन्य', 'कृष्णानंद', 'निरंजन' किंवा 'रामचंद्र' वगैरे शब्द या ठिकाणी निराळ्या अर्थाने योजिले आहेत. आणि त्यामुळे, हा ग्रंथच मुळात महाराजांचा नसावा असेही म्हणणारे लोक आढळतात म्हणून मागे निर्देश केलेला आहे. कोणत्याही संताचे ग्रंथ पाहिले तर असे आढळून येईल की त्यांनी सर्वच गोष्टींचा उघडा बाजार करून सांगितलेला नाही. त्यांनी कित्येक ठिकाणी द्व्यर्थी शब्द किंवा रूढ अर्थापेक्षा वेगळे अर्थ होऊ शकतील असे शब्द मुद्दाम वापरल्याचे दिसून येईल. तसे करण्यात त्यांना समाजापासून काही लपवून ठेवावयाचे होते असे नसून खऱ्या जिज्ञासू अधिकारी लोकांनाच अर्थ कळावा, अशी त्यांची इच्छा होती. अधिकार नसलेल्या लोकांना अर्थ कळल्यास काहीही फायदा न होता उलट त्यांचे नुकसान होईल, हे संतांना पक्के ठाऊक होते. श्रीस्वात्मसौख्यांतील शब्दांचे अर्थ नीट न लागल्यास कसे गोंधळ होऊ शकतात हे दाखविण्याकरिता एक उदाहरण पुढे दिले आहे.

गोस्वामी पृथ्वीगीर हरिगीर, यवतमाळ, यांनी १९२६ साली 'गोसावी व त्यांचा संप्रदाय' भाग १ हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले आहे. त्यांत पृष्ठ १५८ वर महाराजांनी लिहिलेल्या स्वात्मसौख्य या ग्रंथासंबंधी काही माहिती दिली आहे. गोस्वामीजींनी या ग्रंथाचे मुळातच नाव बदलून टाकले व 'स्वात्मसौख्य'-च्या ऐवजी 'स्वात्मबोध' असे पदरचे नाव दिले आहे. या ग्रंथाच्या लेखका-विषयी माहित देताना ते म्हणतात—

"स्वात्मबोध नामक पोथीतील परंपरा—

"सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीनृसिंहसरस्वती यांचा शिष्य कृष्णचैतन्य, त्याचा व्यंकटेशचैतन्य, त्याचा स्वानंदचैतन्य, त्याचा कृष्णानंद. हा कृष्णानंद वऱ्हाडातील कारंजाचा राहणार. याने 'स्वात्मबोध' नामक वेदान्तपर ग्रंथ लिहिला. तो अजून अप्रकाशित आहे......वगैरे" गोस्वामीजींनी स्वात्मसौख्याला स्वात्मबोध हे नाव दिले पण त्यापासून कोणताच बोध न होता उलट त्यांचा कमालीचा गैरसमज झालेला दिसतो. 'कृष्णानंद' हा शब्द या ग्रंथांत 'डोळ्याच्या आतील काळा भाग या संबंधी एक विशेष अभ्यास आहे' त्याला उद्देशून योजला आहे, हे न समजले तर कृष्णानंद हा कारंजा येथे राहणारा शिष्य होणारच !

शके १८७६ च्या पौष मासात सर्व भक्त मंडळी महाराजांच्या पुण्यतिथीच्या उत्सवाकरिता आळंदीस जमली होती. त्या वेळी स्वात्मसौख्याविषयी गोष्ट निघाली. स्वात्मसौख्य हा ग्रंथ सांप्रदायिक असल्यामुळे तो त्या पद्धतीने लावला असता समजतो. परंतु ती पद्धत कोणती याचे बहुतेकांस ज्ञान नाही. तो सर्वांना

समजावा म्हणून त्यावर काही स्पष्टीकरण करून ती पद्धत इतर सर्वांस कळावी म्हणून चर्चा झाली. त्या प्रसंगी संप्रदायाचे एकनिष्ठ भक्त 'अप्रबुद्ध' यांनी तशी एक प्रत तयार करण्याची तयारी दर्शविली. परंतु ती प्रत छापून काढावी की नाही हा प्रश्न उत्पन्न झाला. तेव्हा महाराजांची परवानगी मिळवून ती छापण्याच्या खर्चाची सोय तेथल्या तेथेच झाली. 'श्रीअप्रबुद्ध' यांचा काही काळ ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या निकट सहवासात गेलेला आहे, व त्यांना अण्णासाहेबांच्या तोंडून स्वात्मसौख्याबद्दल अनेक वेळा ऐकण्याचा योग आलेला आहे. त्यांच्याकडून स्पष्टीकरणासह तो ग्रंथ तयार होऊन जिज्ञासू भाविक लोकांच्या हाती तो नुकताच पडला आहे.

## श्रीस्वात्मसौख्य व श्रीबोवासाहेब धुळे

श्रीस्वात्मसौख्यांतील शब्दांची परिभाषा न समजल्यामुळे पुष्कळांची अशी समजूत आहे की हा ग्रंथ महाराजांचा नाहीच. याशिवाय आणखी एक समज असा आहे की हा ग्रंथ महाराजांचा असता तर धुळयाच्या श्रीबोवासाहेबांच्या पाठांत तो आला असता. श्रीबोवासाहेबांच्या नित्यपाठांत तो ग्रंथ नव्हता किंवा त्यांच्या तोंडून स्वात्मसौख्याचा कधीही उल्लेख कोणी ऐकला नाही एवढयावरूनच तो ग्रंथ त्यांना माहीत नव्हता असे म्हणणे चुकीचे होईल. ग्रंथ श्रीबोवासाहेबांना माहीत तर होताच पण तो त्यांनी पूर्णपणे आत्मसात केला होता हे पुढील प्रसंगावरून दिसून येईल.

एके दिवशी रात्री काही भक्त मंडळी नेहमीप्रमाणे गप्पागोष्टी करीत बसली होती. त्यांत महाराजांचे नाव निघाले व त्याबरोबरच काही चमत्कारिक गोष्टी निघाल्या. गप्पागोष्टींचे रूपांतर वादांत झाले व तो वाढण्याची वेळ आली. श्रीबोवासाहेब जवळच बसले होते. बोवासाहेबांचे बोलणे अगदीच अल्प पण रेखीव असे. एखादा शब्द किंवा फार झाले तर एखादे वाक्य यापेक्षा ते जास्त बोलत नसत. मंडळींचा वाद वाढत चालला असे पाहून स्वात्मसौख्य उपासनाकांड यातील पुढील ओवी श्रीबोवासाहेबांनी श्रीभक्त गंगाधरपंत आंबडेकर उपाख्य महंत यांना म्हणून दाखविली.

**'अनन्य भावें सद्गुरुशीं शरण । रिघोनि कीजे विकल्प हरण ।**
**जेणे होइजे निर्बंध हरण । स्वस्थता मन पाविजे ॥'**

**—उपासना कांड, ओवी क्र. ५३**

ओवी संपताच श्रीबोवासाहेब म्हणाले, "काय लाख किंमतीची ओवी आहे ! परंतु विषयी जीवांना काय राख आहे," आणखी एका अशाच प्रसंगी श्रीबोवासाहेबांनी ज्ञानकांडातील ओवी क्रमांक २०५ म्हणून दाखविली होती. ती ओवी अशी—

'निवेदन करी सकळांसी । प्रतीति दावी निज भक्तांसी ।
लक्ष लाविलें चिदाभासीं । विश्व दृष्टीसी नातळे ॥'

वरील ओव्या व त्यांतील सखोल अर्थावरून हा ग्रंथ त्यांना पूर्णपणे माहीत होता हे निश्चित. कित्येक लोकांच्या कल्पनेप्रमाणे, बोवासाहेब गवई म्हणून बरीच वर्षे वऱ्हाड–खानदेशात फिरत होते. अशाच एका प्रसंगी वऱ्हाडांतील कारंजा या गावी महाराजांची व त्यांची गाठ पडली. त्या वेळी महाराजांनी स्वात्मसौख्य ग्रंथ त्यांना उपदेशिला आणि तो अखेरपर्यंत प्रसिद्ध करू नकोस अशी त्याच वेळी आज्ञा केली. बोवासाहेबांनीही ती आज्ञा अखेरपर्यंत कडक रीतीने पाळली. परंतु ही कल्पना बरोबर नाही, हे श्रीअप्रबुद्ध यांच्या 'सार्थ श्रीस्वात्मसौख्या'वरून समजून येईल.

## श्रीबोवासाहेब रुद्र यांच्या तीन जन्मांचे रहस्य

पूर्ण झाला करंजग्रामीं । विदर्भ देशामाजी ।
नरसिंह सरस्वती यति नामी । नारायणासी बोधिला ॥

—ज्ञानकांड, ओ. २४३

श्रीस्वात्मसौख्य ग्रंथ महाराजांनी आपल्या नारायण नामक शिष्यास सांगितला व तो विदर्भातील कारंजा येथे पूर्ण झाला. तेव्हा हा नारायण शिष्य कोण याविषयी साहजिकच कुतुहल जागृत होते. त्याविषयीचे सांप्रदायिक रहस्य पुढीलप्रमाणे आहे.

ग्रंथ उपदेशिल्यावर महाराजांनी सदर नारायण स्वामींना त्याचा अभ्यास करीत राहण्यास सांगितले व आपण स्वत: भ्रमणास निघून गेले. पुढे नारायण स्वामी फिरत फिरत नरसोबाचे वाडीस गेले. या वेळी त्यांचे वय सुमारे ९० वर्षांच्या वर असावे व ते अतिवृद्धत्वामुळे फार थकलेले होते. नरसोबाचे वाडी येथील लोकांना नारायण स्वामीबद्दल काहीच माहिती नव्हती. पुढे एक कुष्ठरोगी रोगमुक्त होण्याकरिता नरसोबाचे वाडीस आला असता त्यास असा दृष्टांत झाला की 'नारायण स्वामींचे तीर्थ घे म्हणजे तू रोगमुक्त होशील.' त्याप्रमाणे तो कुष्ठी नारायण स्वामींकडे येऊन तीर्थ मागू लागला. तेव्हा नारायणस्वामी म्हणाले, "आम्हाला काही हे माहीत नाही." असे म्हणून तीर्थ देण्याची गोष्ट त्यांनी टाळली. परंतु नारायणस्वामी नदीवर स्नान करीत असता ह्या कुष्ठ्याने त्यांच्या अंगावरून पडणारे पाणी हळूच मागून जाऊन आपल्या ओंजळीत घेतले व आपल्या अंगावर शिंपडले व प्राशन केले. दृष्टांताप्रमाणे तो व्याधिमुक्त झाला. नारायणस्वामींनी सहजच मागे वळून पाहिले आणि कुष्ठी दिसताच सारा प्रकार त्यांच्या लक्षात आला. "असे का !" इतकेच फक्त नारायणस्वामी उद्गारले. नारायणस्वामींनी त्याच दिवशी देह ठेवला. लोकांनाही हे स्वामी

एकाएकी नाहीसे झाल्याबद्दल आश्चर्य वाटले. पुढे नारायणस्वामींचा जो जन्म झाला तो म्हणजे नारायणबुवा रुद्र हा होय. याही जन्मात त्यांनी महाराजांची इतकी सेवा केली की महाराज प्रसन्न होऊन त्यांना आपले 'हृदय' म्हणत असत. पुढेही त्यांचा जन्म होणार असून त्या जन्मातही त्यांचे नाव 'नारायण' असेच राहील. त्यांचे हातून धर्माची विस्कटलेली घडी नीट बसविण्याचे कार्य होणार असून त्याकरिता 'नारायणस्मृती' या नावाचा मनुस्मृतीसारखा ग्रंथ त्यांचे हातून निर्माण होईल !

## श्रीस्वात्मसौख्य व श्रीअण्णासाहेब

महर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांची महाराजांच्या स्वात्मसौख्य ग्रंथावर फार श्रद्धा होती. ते या ग्रंथाची योग्यता वेदवाणीप्रमाणे मानीत असत. श्रीगुरुचरित्राची पारायणे केल्याने ज्याप्रमाणे सर्व कामना पूर्ण होतात, त्याप्रमाणे या ग्रंथाच्या पारायणानेही होतात असा त्यांचा दृढ विश्वास होता. निदान या ग्रंथाची एक ओवी तरी रोज वाचलीच पाहिजे असा त्यांचा नियम होता. ह्यासंबंधी स्वत: अण्णासाहेबांनी असे लिहून ठेवले आहे की, "**स्वात्मसौख्य ग्रंथस्य नित्यं एका ओवी वाचनिया, इति क्रमे तद्दिन क्रमागता उपासना कांडस्य**" वगैरे.

स्वात्मसौख्याची हस्तलिखित प्रत प्रथम अण्णासाहेबांकडे शनिवार दिनांक २२-४-१८९३ रोजी रजिष्टर्ड पोस्टाने दाभोळ येथून केळकर भटजी यांचेकडून आली, अशा मजकुराची एक नोंद त्यांच्या कागदपत्रात आहे. अण्णासाहेबांचे बहुतेक बोलणे श्रीगुरुचरित्र व श्रीस्वात्मसौख्य या दोन ग्रंथांना धरून असे. श्रीबोवासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे स्वात्मसौख्याचा अर्थ न कळल्यामुळे 'लाखांची राख' व्हावयाची वेळ आली असती. पण अण्णासाहेबांनी शब्दांचे अर्थ, त्यात आलेले उपनिषदांतील संदर्भ वगैरे गोष्टी सांगितल्यामुळे संप्रदायातील लोकांचा पुष्कळच फायदा झाला आहे.

१९१४ साली लोकमान्य टिळकांना सरकारने कारागृहातून मुक्त करून बुधवारी मध्यरात्री पुण्यात आणून सोडले. त्यांची मोटार घरी पोचण्यापूर्वीच ही बातमी अण्णासाहेबांना कळली. ती ऐकून त्यांना मोठा आनंद झाला. निजलेल्या लोकांना जागे करून "अरे, बळवंतराव आले !" "महाराजांनी मोठी कृपा केली," असे म्हणून त्यांनी बाकीच्या लोकांना लोकमान्यांना पाहण्याकरिता पाठविले व आपण स्वत: श्रीस्वात्मसौख्याची पोथी काढून पाठ करीत बसले. पुढेही तो ग्रंथ संपूर्ण वाचण्याचा त्यांचा नित्यनेम होता. लोकमान्यांच्या कल्याणाकरिता ते स्वात्मसौख्याचे अनुष्ठान करीत होते अशी कल्पना अण्णासाहेबांच्या त्या वेळच्या वर्तनावरून होते.

## ‘अंतरानुभव’ : ग्रंथपरिचय

वऱ्हाडात लोणार येथे राहणाऱ्या श्रीसच्चिदाश्रम स्वामींना महाराजांनी योगाभ्यास शिकविला होता आणि त्याकरिता महाराज लोणारला सुमारे एक वर्ष राहिले होते. महाराजांच्या सांगण्यावरून हा अभ्यास ‘अंतरानुभाव’ नामक ग्रंथांत ग्रथित केला आहे. शके १७९४ च्या कार्तिक महिन्याच्या वद्य पक्षात हा ग्रंथ लिहून पूर्ण झाला असा उल्लेख श्रीसच्चिदाश्रम स्वामींचे कागदपत्रात आढळतो. या ग्रंथांतील अक्षरन् अक्षर स्वत: महाराजांनी सांगितलेले असून त्यांच्या कृपेने मी ग्रंथ लिहीत आहे असे सच्चिदाश्रम स्वामींनी म्हटले आहे.

**त्यांच्या मुखांतील वाचामृत । हा अंतरानुभव ग्रंथ ।**
**गुरुकृपें आम्ही प्राशित । कर्ण द्वारे ॥ १४ ॥**
**ऐका तुम्ही भाविक । गुरु सांगति अक्षर एक एक ।**
**तैसा लिहितो गंगेचा बाळक । गुरुकृपे ॥ १६ ॥**

**—अंतरानुभव, समास १ ला**

प्राकृत, अज्ञान मुमुक्षु लोकांचा उद्धार करावा ह्या हेतुने महाराजांनी हा ग्रंथ सांगितला आहे. या ग्रंथांत पांच समास असून प्रत्येक समासांत त्रेसष्ट ओव्या आहेत. एकूण ओव्या ३६५ आहेत. पहिल्या समासात मंगलाचरण, या ग्रंथाचे अधिकारी, मुमुक्षु व ज्ञानाधिकाऱ्यांची लक्षणे इत्यादी विषय आहेत. आणि पुढील चार समासांत योगाभ्यास, आसनादी प्रकार, योगाभ्यास करीत असता भय किंवा विघ्न उत्पन्न झाल्यास त्यांच्या निवारणाचे उपाय, अमनस्क योग, ईश्वरस्थितीचा निवाडा, परोक्षज्ञान, वगैरे विषय आले आहेत. या अंतरानुभवाचा अभ्यास करतील त्यांना शीघ्र ब्रह्मप्राप्ती होईल अशी या ग्रंथाची महती आहे. ‘**असो अंतरानुभव अभ्यासिती । त्याशी शीघ्रची होय ब्रह्मप्राप्ती ।**’ या ग्रंथाच्या पठणाची जी फलश्रुति सांगितली आहे. त्यातील विशेष पुढीलप्रमाणे आहे.

**आतां पठणाची ऐका फलश्रुती । जे नित्यनेमें एकांतस्थळीं वाचिती ।**
**त्यासी श्रीनृसिंव्हसरस्वती । प्रत्यक्ष भेटती भक्तालागी ॥ ६२ ॥**

**समास ५ वा**

महाराजांच्या शिष्यमंडळीत, अंतरानुभवाचा अभ्यास त्यांनी कै. विश्वनाथपंत बापट यांना सांगितला होता, अशी माहिती मिळाली आहे. हा ग्रंथ अजून अप्रकाशित असून हस्तलिखित सुद्धा फारच थोड्या लोकांजवळ असावे. या ग्रंथाची एक प्रत नागपूरला श्री. राजेश्वर मनोहर उपाख्य राजाभाऊ काटे यांच्याजवळ आहे.

## इतर

महाराजांनी आपल्या भक्तांना लिहिलेल्या काही पत्रातील उताऱ्यांचा संग्रह प्रा. डॉ. दि. का. गर्दे यांनी पुस्तकरूपाने शके १८७६ मध्ये प्रसिद्ध केला आहे. या पुस्तकात पत्रांतील उताऱ्यांशिवाय 'अंतरानुभव' या ग्रंथाचा गद्य सारांश, खानदेशांतील शिरपूर येथील श्री. निरंजनस्वामींचा शिष्य गोपाल याने महाराजांस वेदान्तप्रकरणी विचारलेल्या शंका व महाराजांनी त्यास दिलेली उत्तरे मिळून झालेली 'वेदान्तसार प्रश्नोत्तर माला', समाधीचा अर्थ, वैराग्य व त्याचे प्रकार, श्रीगायत्रीमंत्राचा थोडक्यात अर्थ इत्यादि विषय आलेले आहेत. महाराजांनी पत्रातून मुमुक्षूंना अमोलिक असा उपदेश केला आहे. या पत्रातील निवडक वाक्यांचा संग्रह पुढील प्रकरणात दिला आहे. त्यावरून महाराजांच्या संप्रदायांतील लोकांना कोणती शिकवण होती याची थोडी कल्पना करता येईल.

महाराजांनी रचलेले 'श्रीज्ञानेश्वराष्टक' व 'श्रीऋणमोचन स्तोत्र' ही पूर्वीच प्रसिद्ध झाली असून जिज्ञासूंकरिता या पुस्तकाच्या परिशिष्टांत ती दिली आहेत.

नागपूरचे राजयोगी श्री. आपदेव महाराज यांना महाराजांनी 'लखोटचाचे अभंग' म्हणून पांच अभंग करून दिले होते. आपदेवांनी ते अभंग अर्थ टीपांसह सुमारे चाळीस वर्षांपूर्वी पुणे येथील बालोद्यान छापखान्यात पुस्तकरूपाने छापून प्रसिद्ध केले होते. आज हे पुस्तक दुर्मिळ आहे.

प्रकरण नववे

# मुक्ताफळे

"श्रीसद्‌गुरु नरसिंव्हसरस्वती स्वामी महाराज यांच्या काही पत्रातील उतारे" या पुस्तकात महाराजांच्या एकूण पन्नास पत्रांतील उतारे घेतले आहेत. पत्रद्वारे भक्त आणि देव, भक्ती व ज्ञान, भक्तीचे रहस्य, ऐहिक विषयसुखाची मीमांसा, संतसमागमाचे माहात्म्य, योगाभ्यास, नरदेहाची महती इत्यादि विविध विषयांवर महाराजांनी मुमुक्षूंना उपदेश केला आहे. या संग्रहांतून काही वाक्ये निवडून ती मुक्ताफळे या सदराखाली संकलित केली आहेत.

**पत्र क्रमांक १**

'भक्त भक्त नाहीत. देव देव नाहीत. देव तोच भक्त. भक्त तोच देव. बाबा देव भक्त निराळे मानून कोणता भक्त भजतो व कोणता देव देवपणा मिळवितो ?'

'ज्ञात्यांची खाण ही पुढील प्रजाच आहे. ती खाण शाबूत राहून सर्व व्यापार चालावे म्हणोन विहित कर्मे आचरोन साक्षीत्वाने सकल व्यवहार करतात व देह वगैरे जड आहे व सर्व वृक्षादिक जड आहेत हे पक्के लक्षात वागवितात.'

**पत्र क्रमांक २**

'भक्ती आणि ज्ञान ही मुळीच निराळी नाहीत. भक्तीलाच पारिभाषिक शब्द ज्ञान आहे.'

'भक्ती, ज्ञान, वैराग्य इत्यादि गोष्टी जर तू चालविशील तरच तुला पुढे स्वस्वरूपाची प्राप्ती होईल.'

'देहाला जड म्हणून जरी कित्येक स्थळी कारणपरत्वे म्हटले आहे तरी देहाला सोडून परमार्थप्राप्ती संभवत नाही.'

**पत्र क्रमांक ४**

'भक्तीशिवाय ज्ञान ते ज्ञान नव्हे व ज्ञानाशिवाय भक्ती ती भक्ती नव्हे. ज्ञान्याला भक्ती केली पाहिजे म्हणून तुकारामाने वरील अभंगाने (घोटवीन

लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं । ) म्हटले ते मुक्तांच्या संबंधाने म्हटले आहे. ते केवळ भक्ताचा महिमा लोकांना दाखवावा म्हणून आहे. कारण मुक्त म्हणून काही वेगळी चीज नाही.'

**पत्र क्रमांक ५**

'अमृतानुभवातील दृश्य, द्रष्टा हे शब्द फार जपून लक्षात आणीत जा. कारण त्यांत बहुतकरून स्थूलमानाचा दृश्य, द्रष्टा घेतलेला नसतो.'

**पत्र क्रमांक ९**

'अभिमान नाश, निष्काम कर्म, वर्णाश्रमधर्म, नवविधा भक्ती आचरण करितात परंतु अभिमान जास्ती वाढतो. तरी सद्‌गुरुकृपेखेरीज काही होणे नाही.'

**पत्र क्रमांक १४**

'अती सन्मार्गास न (?) लागावे. सन्मार्गावाचून न राहणे. भोग (?) सेवनावाचून न राहणे. भोग सेवन करणे. द्रव्यसंग्रहावाचून न (?) राहणे. द्रव्यसंग्रह न करणे.'

**पत्र क्रमांक १७**

'काळ भयंकर आहे. रात्रंदिवस विचारवान असावे.'

**पत्र क्रमांक २७**

'चांगला शहाणा, अंतरलक्षात सद्‌गुरुस्वरूपाची ज्याला आठवण आहे असा. मध्यम चतुर, जो भजन कीर्तनीं प्रवर्तक. अधम सामान्य, जो सन्मार्गी लोकांमध्ये फिरतो.'

**पत्र क्रमांक ३५**

'श्रीभगवत्पदी चिंतनी निमग्न झाले असता शरीरादि दुःखाविषयी बेपर्वा होईल हे आश्चर्य नाही.'

**पत्र क्रमांक ४५**

'ज्ञात्या पुरुषाला सर्व संसार परमेश्वरस्वरूपच.'

## वेदान्तसार प्रश्नोत्तरमाला

'अनुभव ज्ञानाचे तप निराळेच व सिद्धीचे तप निराळे. ज्ञानाचे ठिकाणी सिद्धीचा उपयोग अगदी नाही.'

'अवतार होणे हे सिद्धीचे बीज आहे.'

## श्रीनृसिंहसरस्वतीकृत तीन वेडे

१. या दुनियेत भूतांचा लय प्रत्यक्ष पाहून आपली कालगती न लक्षांत घेता दिवस काढणारा.

२. संगती, संपत्ती, राजविद्या, वैभवादिक यांचे शिथिलत्व पाहून माझे म्हणून खुषीत वागणारा.

३. उत्तम प्रकारची बुद्धी, सर्वोत्तम, जगात वंद्य, मानुष देह व सज्जनांनी केलेले ग्रंथादिक इतकी सोय असून आळस करणारा.

## श्रीनृसिंहसरस्वतीकृत तीन शहाणे

१. पुढच्या आपल्या सद्गतीबद्दल द्रव्य, दारा, स्वजाती, राज्य वगैरेवर विश्वास न ठेवून आपल्या उद्धाराचा यत्न आपणच करणारा.

२. संसाराची अडचण सोसून त्या त्या कालाला यथोचित परमार्थ साधतो आहे. जी प्राचीन वृद्धाचार वहिवाटी ती बिघडू देत नाही.

३. भक्ती, ज्ञान, वैराग्य, योग, मुक्ती हे रस्ते मात्र माहीत आहेत परंतु अनुभवास आले नाहीत, तो तिसरा शहाणा.

**उपाय**– सारांश, साधुमार्गाने सर्व कामे होणारी आहेत. सबब हुशारी असावी.

प्रकरण दहावे

# संस्थान

## संस्थानाचा ठराव

'इंदुप्रकाश' मध्ये एका भक्ताने प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून असे दिसते की महाराजांचे निर्याणानंतर एका वर्षाने म्हणजे पौष पौर्णिमा शके १८०८ मध्ये भक्तमंडळी एकत्र जमून त्यांनी महाराजांचे संस्थान करण्याचा ठराव केला व त्याच वेळी पंचांची योजना केली. या ठरावावर बापूसाहेब गाडगीळ, बाबासाहेब सांगलीकर, श्रीपद्मनाभस्वामी, धुळे, तर्फे एकाने, अशा २१-२२ लोकांच्या सह्या आहेत. जे पहिले पंचमंडळ सर्वांच्या अनुमतीने निवडले गेले. त्यांत पुढील भक्त मंडळी सभासद म्हणून होते. १. गणपतराव विनायक पटवर्धन उर्फ बाबासाहेब सांगलीकर, २. नामदेव अप्पाजी उर्फ बाबासाहेब बडवे, पंढरपूर, ३. बाळाजी वामन उर्फ भाऊसाहेब गणपुले-श्रीदत्त मंदिर, धुळे, ४. शंकर नथ्थु पैठणकर-कुळकर्णी, ५. जनार्दन सखाराम उर्फ बापूसाहेब गाडगीळ.

श्री. अण्णासाहेब पटवर्धन हे प्रारंभी पंचमंडळात नव्हते. पण पुढे काही कालाने ते त्याचे सभासद झाले होते.

भक्तमंडळींनी एकत्र येऊन संस्थान करण्याचा जो ठराव केला त्यांतील एक महत्वाचा भाग सर्वांनाच सर्वकाळी मार्गदर्शक होईल असा आहे. सबब तो मुद्दाम खाली देत आहे.

'श्रीसद्‌गुरु महाराजांचे शिष्यवर्गाने व भक्तजनाने एक चित्ताने मंदिरात पूजा, नैवेद्य, भजन, कीर्तन ही सदोदित यथाक्रम चालतील व शुद्ध परमार्थ वासना सर्वांचे हृदयी ठसून जन्मास आल्याचे सार्थक होईल अशाविषयी अंतःकरणपूर्वक श्रीसद्‌गुरुची अहर्निश प्रार्थना करून आपले आचरण शुद्ध ठेवण्याविषयी झटावे.' (मिती पौष व।। १ ।। शके १८०८ मुक्काम श्रीक्षेत्र आळंदी, जिल्हा पुणे.)

## मठवर्णन

निर्याणापूर्वीच महाराजांनी इंद्रायणीच्या काठी गोपाळपुऱ्याचे रस्त्यावर श्रीविठ्ठलाचे मंदिर बांधण्याचे काम सुरू केले होते. या मंदिरात अगोदर करून

ठेवलेल्या जागेत महाराजांच्या आज्ञेप्रमाणे भक्तमंडळींनी त्यांना ठेवून दिले. या घटनेची सर्व हकीकत मागे आलीच आहे. पुढे हळूहळू समाधिमंदिर बांधून पूर्ण करण्यात आले. महाराजांच्या समाधीच्या मागे श्रीविठ्ठल रखुमाईच्या मूर्तींची स्थापना झाली. समाधीच्या पुढच्या अंगास विस्तृत सभामंडप आहे. सभामंडपाच्या भोवती मोठाले सोपे आहेत. गोपाळपुऱ्याच्या रस्त्यावर प्रवेशस्थळी तीन कमानी आहेत. मधल्या कमानीत श्रीअण्णासाहेब पटवर्धनांची पायरी असून ती संगमरवरी दगडाने बांधली आहे. प्रवेशद्वारातून आंत आल्यावर एका अंगास गरुड व दुसऱ्या अंगास मारुती यांच्या मूर्ती कोनाडयांतून बसविलेल्या दिसतात. उजव्या अंगास सोप्यांतील कोपऱ्यात महाराजांचे शेजघर असून तेथे त्यांच्या पादुका ठेवल्या आहेत. पूर्वी विठ्ठलमंदिराचे बांधकाम पाहण्याकरिता महाराज याच ठिकाणी बसत असत. मुख्य समाधिमंदिराच्या मागे प्रदक्षिणेच्या मार्गावर औदुंबर वृक्ष आहे. सोप्याचे वर माडया आहेत आणि प्रवेशस्थळी असलेल्या मधल्या कमानीच्या वर नगारखाना आहे. तेथे तिन्ही त्रिकाळी चौघडा वाजतो.

मठाभोवती मोठा तट असून आवारही मोठे आहे. आवारात बगीचा, विहिरी वगैरे आहेत. मठाच्या मागे इंद्रायणीचे पात्र असून महाराजांचा घाट आहे. मठास लागूनच इंद्रायणीच्या काठाने महाराजांनी स्वत: लावलेल्या १४ वृक्षांची रांग आहे. मठात पाकशाळा असून आल्यागेल्याचे आदरातिथ्य तेथे उत्तम प्रकारे केले जाते. संस्थानांत एक मोठा रथ असून त्यातूनच पौष शु० १४ ला संध्याकाळी महाराजांची मिरवणूक निघते.

मठातील एकंदर वातावरण अत्यंत शुद्ध व पवित्र असे असून मुमुक्षूंचा भक्तिभाव वृद्धिगत होईल असेच आहे. मठातील व्यवस्था अत्यंत चोख व टापटिपीची आहे. पौष महिन्यातील उत्सवाचे गर्दीचे दिवस सोडल्यास इतर वेळी मठात शांतता असते. अशा वेळी साधकाला सर्व प्रकारचे आध्यात्मिक अनुभव घेण्यास अत्यंत योग्य असे हे ठिकाण आहे.

## महाराजांचे गादीवरील अधिकारी

पौष व० प्रतिपदा शके १८०८ रोजी भक्त मंडळींनी महाराजांचे संस्थान करण्याचा ठराव करून मठाच्या व्यवस्थेकरिता पंचांची योजना केली. तेव्हापासून मठाची व्यवस्था पाहणारे पंच आहेत व सर्व कारभार त्यांचेमार्फत चालतो. पंचांच्या तर्फे कारभारी नेमला जातो. महाराजांची गादी चालविण्याचा हक्क त्याचेकडे असल्याने सांप्रदायिक दीक्षा देणे वगैरेचे काम त्यांजकडे असते. आळंदीच्या संस्थानाप्रमाणेच धुळे संस्थानाकडूनही संप्रदाय चालविण्याचे काम होत असते.

महाराज शांत झाल्यावर त्यांच्या गादीवर श्रीभक्त दत्तोपंत आठवले यांची नेमणूक झाली. त्या वेळी पूजाअर्चेचे काम लक्ष्मणबोवा गांधी उपाख्य आबा काका हे करीत असत. दत्तोपंत आठवले हे ब्रह्मचारी होते. हे आळंदी येथेच ९–१०–१९०८ रोजी वैकुंठवासी झाले. पुढे पौष मासातील महाराजांचे पुण्यतिथीचे उत्सवाचे वेळी मंडळी जमली, तेव्हा चिठ्ठी टाकून मिळालेल्या आज्ञेने श्रीभक्त शंकरबोवा धर्माधिकारी सोनगीरकर यांना महाराजांचे गादीवर बसविले.

शंकरबोवा सोनगीरकर हे यजुर्वेदीय शाखेचे देशस्थ ब्राह्मण. मुंबई–आग्रा रोडवर धुळे शहराचे उत्तरेस बारा मैलावर सोनगीर हे एक जुन्या वस्तीचे गाव आहे. शंकर बोवा हे ह्या गावचे राहणारे व तेथील धर्माधिकारी व वतनदार होते. यांचेवर श्रीपद्मनाभस्वामी, धुळे, यांचा अनुग्रह होता. शंकरबोवांवर त्यांच्या सद्गुरूची कृपा अल्पवयांतच झाली. पद्मनाभस्वामींनी (बोवासाहेबांनी) त्यांना भक्तिमार्गाला लावून कृतार्थ केले. धुळ्यास श्री. बोवासाहेबांचे येथे होणाऱ्या उत्सवाच्या प्रसंगी दरवर्षी शंकरबोवा तेथे आगाऊ येत व उत्सवाच्या तयारीस सर्वप्रकारे मदत करीत. श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, गोकुळ अष्टमी, भाद्रपद शु० पौर्णिमा, गुरुद्वादशी, माघ व० प्रतिपदा यावेळीही शंकरबोवा उपस्थित असत. हे श्रीबोवासाहेबांचे बरोबर भिक्षेस जात. त्याचप्रमाणे महाराजांची पुण्यतिथी व वैशाखातील उटी याकरिता ते आळंदीस येत. यांना जयदेव कवींनी रचिलेल्या अष्टपद्या पाठ असून श्रीबुवासाहेबास साथ फार चांगली करीत. रात्री भजनाचे वेळी तंबोरी अगर झांज घेऊन भजन उत्तम रीतीने करीत. श्रीभक्त दत्तोपंत आठवले स्वर्गवासी झाल्यावर महाराजांच्या गादीवर कोणाला बसवावे असा प्रश्न उपस्थित झाला. श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांनी पुण्यतिथीच्या दिवशी उमेदवारांची नावे निरनिराळ्या चिठ्ठ्यांवर लिहून त्या महाराजांचे समोरील चांदीच्या चौरंगावर टाकल्या. ज्या चिठ्ठीवर माशी बसेल ते पुढे संस्थानचे कारभारी होतील अशी महाराजांची आज्ञा समजावी असे श्रीअण्णासाहेबांनी सांगितले व ते उत्सवास आलेल्या सर्व मंडळींसह सभामंडपात बसले. थोड्या वेळाने एका चिठ्ठीवर माशी बसली. चिठ्ठी उघडून पाहतात तो त्यात शंकरबोवांचे नाव निघाले. त्याप्रमाणे त्यांचे डोक्यास महाराजांचे अंगावरील प्रसादछाटी गुंडाळली व महाराजांचे गळ्यातील पुष्पहार त्यांचे गळ्यात घालून साखर वाटली व शंकरबोवा मठाचे कारभारी झाले आहेत असे जाहीर केले. श्रीबोवासाहेबांचे कृपाछत्राखाली बरीच वर्षे तपश्चर्या झालेली असल्यामुळे व सद्गुरूची पूर्ण कृपा असल्यामुळे संस्थानचे कारभारी या नात्याने शंकरबोवांनी कामगिरी उत्तम रीतीने बजावली. अष्टपद्यांचा थाट ते हो ते तोपर्यंत धुळ्या-

प्रमाणे आळंदीसही दररोज होत असे. महाराजांचे पुजारी श्रीपादबोवा गांधी हेही श्रीबोवासाहेबांचे अनुग्रहीत असल्यामुळे व त्यांना गाण्याचे अंग असल्यामुळे अष्टपद्यांचे वेळी श्रीशंकरबोवास साथ चांगली करीत असत. या काळात उटीचे समारंभ फार मोठ्या प्रमाणात होत असत. जवळजवळ एक तप महाराजांचे संस्थानचे कारभारी म्हणून त्यांनी महाराजांची सेवा केली व शेवटी सेवेतच दिनांक २३–४–१९२० रोजी इहलोकीची यात्रा संपवून कृतार्थ झाले. श्री. शंकरबोवांचे वेळी संस्थानचा सर्व कारभार श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या सल्ल्याने होत असे.

श्रीभक्त शंकरबोवा सोनगीरकर यांचे मागून हल्लीचे अधिपती श्रीभक्त माधवबोवासाहेब गोडबोले हे गादीवर आले. धुळे येथील सुप्रसिद्ध वकील श्री. गोविंदराव गोडबोले यांचे माधवबोवा हे चिरंजीव. माधवबोवा हे मुंबई विश्व-विद्यालयाचे पदवीधर असून त्यांनी वकिलीचा अभ्यास केला आहे. त्यावेळचे कालमान लक्षात घेता वकिली करून सर्व प्रकारे ऐहिक ऐश्वर्याचा माधवबोवांना उपभोग घेता आला असता. परंतु स्वत: वडिलांनी केलेल्या उपदेशाप्रमाणे ते संसाराच्या भानगडीत पडले नाहीत. वडिलांच्या सांगण्यावरून ते श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचेकडे मार्गदर्शनार्थ आले. श्रीअण्णासाहेबांचे आज्ञेवरून १९१० साल-पासून ते आळंदीस राहू लागले. श्रीमाधवबोवा हे श्रीबोवासाहेब, धुळे, यांचे पुतणे श्रीभक्त वासुदेवबोवा रुद्र यांचे अनुग्रहीत आहेत. १९२० सालपासून संस्थानाचा कारभार पाहण्याचे काम श्रीमाधवबोवांकडे आले. गेल्या दहाबारा वर्षांपासून संस्थान सरकारी कायद्याप्रमाणे रजिस्टर्ड झाले असून श्रीमाधवबोवा सरपंच म्हणून काम पाहतात. श्रीमाधवबोवा हे अत्यंत नि:संग व नि:स्पृह वृत्तीचे आहेत. संस्थानच्या सर्व कारभारात अति दक्ष असून सर्व व्यवहार अगदी चोख चालवितात. यांची महाराजांवरील निष्ठा जबर असून महाराजांची सेवा करण्यात दुसऱ्यांना सुद्धा सर्व तऱ्हेने मदत करण्यास सदैव तत्पर असतात. आज श्रीमाधवबोवा वयाने ७५ चे आहेत आणि वयोमानाप्रमाणे ते दिवसेंदिवस थकत चालले आहेत. तरी त्यांचा उत्साह व सेवापरायणता पाहून अंत:करण त्यांचेविषयी भक्तिभावनेने भरून येते. प्रस्तुत चरित्र हे त्यांच्या प्रेरणेनेच तयार झाले असून त्याचे सर्व श्रेय त्यांनाच आहे. लेखक केवळ निमित्त आहे.

गेल्या सुमारे चाळीस वर्षांपासून श्रीभक्त भाऊ (बाळकोबा) तेरेदेसाई हे मठात वास्तव्य करून आहेत. महाराजांची सर्व प्रकारे सेवा करून श्रीमाधवबोवा यांना संस्थानच्या कारभारात हरतऱ्हेने मदत करीत असतात. श्रीपादबोवा उपाख्य दादा गांधी हे आपल्या चुलत्याच्या मागे कित्येक वर्षांपासून महाराजांच्या पूजाअर्चेचे काम करतात.

## मठांतील उत्सव व नित्यक्रम

मठात श्रीगुरुपौर्णिमा, श्रीदत्तजयंती यासारखे उत्सव व निरनिराळे सण साजरे होतात. वसंत ऋतूत चंदनाच्या उटीचा उत्सव होतो. पूर्वी लक्ष्मणबोवा हे महाराजांच्या समाधीस चंदनाच्या उटीने नटविण्याचे काम फारच अप्रतिम करीत असत. त्या वेळी ते गणपती, कृष्ण, शंकर, शेषशायी भगवान वगैरे रूपे फार उत्तम करीत. पण ज्या दिवशी महाराजांचे रूप देत त्या वेळी तर प्रत्यक्ष महाराजच बसले आहेत की काय असा भास होत असे. त्यांच्याच तालमीत तयार झालेले श्रीपादबोवा हे त्यांच्या मागे चंदनाच्या उटीचे काम तितक्याच कौशल्याने करतात.

पौष पौर्णिमेला महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव साजरा करण्यात येतो. त्या वेळी दूरदूरचे भक्त लोक आळंदीस जमतात व मोठ्या उत्साहाने उत्सवात भाग घेतात. त्या वेळचा सोहाळा प्रेक्षणीय असतो. ह्या उत्सवास पौष शु।। नवमी पासून प्रारंभ होतो व पौष व।। पंचमीस प्रक्षाळपूजा होऊन तो समाप्त होतो. नवमीपासून नामसप्ताहास सुरुवात होते. पौष शु।। चतुर्दशीस सायंकाळी रथातून महाराजांची मिरवणूक निघते. पौर्णिमेस अन्न-संतर्पण फार मोठ्या प्रमाणात होते. पौष व।। प्रतिपदेच्या दिवशी रात्री महाराजांची पालखी निघते. श्रीज्ञानेश्वर महाराजांचे मंदिरास प्रदक्षिणा घालून पालखी मठात परत येते.

पौष पौर्णिमेस महाप्रसाद होतो. त्यावेळी प्रसादास मुक्तद्वार असते. त्या दिवशी होणारा अन्नोत्सव व त्याची प्रचंड तयारी पाहून महाराजांच्या सत्तेची साक्ष पटते व भाविकांस आनंद वाटल्याशिवाय राहात नाही. आंधळे, पांगळे, अनाथ, दुबळे या सर्वांनाच प्रसाद वाटण्यात येतो. काही वर्षांपूर्वी महाराजांनी लावलेल्या वृक्षांच्या छायेत चार चार पाच पाच हजार लोकांच्या पंगती प्रसादास बसलेल्या लोकांनी पाहिल्या आहेत. चवदा पोती तांदुळाचा भात किंवा एके वर्षी दाळवांग्याकरिता वऱ्हाडांतून आलेली पस्तीस पोती वांगी किंवा चारपांच पोती रव्याच्या गुळाचा शिरा प्रसादास केलेला इत्यादि आठवणी ऐकून अन्नसंतर्पणाच्या प्रचंडतेची सहज कल्पना येईल.

मठात पहाटेपासून रात्रीपर्यंत पुढीलप्रमाणे नित्यक्रम असतो. प्रातःकाळी काकडारती होते. ती झाल्यावर महाराजांची पूजा होते व नंतर दुधारत्या म्हणतात. त्या म्हणजे श्रीपांडुरंगाची व श्रीज्ञानेश्वरांची अशा दोन आरत्या होत. माध्यान्ही महाराजांना महानैवेद्य होतो. दुपारी तीन वाजता बाजरीच्या दशमीचा नैवेद्य दाखवितात. सूर्यास्तानंतर धूपारत्या होतात. त्या वेळी श्रीपांडुरंगाची, श्रीज्ञानेश्वर महाराजांची, श्रीदत्ताची आणि श्रीमहाराजांची अशा चार आरत्या

म्हणतात. नंतर पुष्पांजली झाल्यावर प्रदक्षिणेची तयारी होईपर्यंत श्रीआद्यशंकराचार्य विरचित 'श्रीगोविंदाष्टकम्' स्तोत्र म्हणतात. (हे स्तोत्र परिशिष्टात दिले आहे.) आरती घेऊन मुख्य देवळास 'धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची' ही प्रदक्षिणा म्हणत तीन प्रदक्षिणा घालतात. नंतर आरती रस्त्यावर प्रवेशस्थळी असलेल्या श्रीअण्णासाहेबांच्या पादुका, श्रीगरुड, श्रीमारोतीकडे जाऊन नंतर शेजघरांतील महाराजांच्या तसबिरीपाशी ठेवलेल्या त्यांच्या पादुकांकडे येते. त्याच वेळी सभामंडपांत महाराजांच्या पुढे बसून 'इंदुकोटिकीर्णतेज' हे व इतर स्तोत्रे, भजने व पदे इत्यादि म्हणतात. त्याच वेळी धूपारतीचा प्रसादही वाटण्यात येतो.

रात्री शेजारतीचा शेवटचा उपचार होतो. त्या वेळी विडा, दोन शेजारत्या व अभंग म्हणण्यात येतात. इतके झाल्यावर महाराज निद्राधीन होतात. मठांतील नित्यक्रमाचे एक छोटेसे स्वतंत्र पुस्तक श्री. बाबा इंदूरकर यांनी पौष पौर्णिमा शके १८७८ रोजी प्रसिद्ध केले आहे, म्हणून त्याचा अंतर्भाव प्रस्तुत पुस्तकात केला नाही.

प्रकरण अकरावे

# प्रभावळ

श्रीमहाराजांचा शिष्यपरिवार फार मोठा आहे. जगदुद्धाराचे कार्य करीत असता निरनिराळ्या वेषाने त्यांनी सर्व भारतात अनेकदा संचार केला. अनेक लोकांचा त्यांच्याशी संबंध आला असेल ही गोष्ट निश्चित आहे. काही लोकांची जगाला माहिती असेल तर त्यापैकी काही असे लोक असू शकतील की ज्यांची नांवे सुद्धा ऐकूनही ठाऊक नसतील. काही असेही असतील की ज्यांची खरी योग्यता आपल्याला ज्ञात नसणार. महाराजांनी अनेकांवर कृपा करून त्यांना या भवसागरातून पार केले असेल. तेव्हा महाराजांच्या अगणित शिष्यपरिवाराची माहिती तरी कशी मिळणार आणि ती सांगणार तरी कोण ? अशा परिस्थितीत अल्पसंतुष्ट राहून ज्या व्यक्ती महाराजांच्या सहवासात आल्या त्यांपैकी ज्यांच्या-बद्दल माहिती मिळू शकली अशा काही लहानथोर व्यक्तींची त्रोटक चरित्रे या प्रकरणांत देण्याचे योजिले आहे. यांतील सर्वच व्यक्ती महाराजांच्या संप्रदायातील असतील असे नाही. पण त्यांचा काही ना काही तरी ऋणानुबंध महाराजांशी आला आणि त्यामुळे महाराजांच्या चरित्राचा एखादा पैलू जरी दिसून आला तरी फार मोठे काम झाले असे म्हटले पाहिजे.

## १. ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन

ब्रह्मर्षि विनायक रामचंद्र उपाख्य अण्णासाहेब पटवर्धन यांचे श्रीअप्रबुद्ध यांनी लिहिलेले स्वतंत्र चरित्र उपलब्ध आहे. त्यांतील माहितीच्या आधाराने थोडाफार फरक करून हे त्रोटक चरित्र लिहिले आहे. यात अण्णासाहेबांच्या इतर गोष्टींचा उल्लेख विशेष न करता फक्त महाराजांशी त्यांचा जो संबंध आला त्याविषयीच प्रामुख्याने लिहिले आहे.

यांचा जन्म वैशाख वद्य चतुर्थी रोज मंगळवार शके १७६९ व वैकुंठवास माघ शु॥ एकादशी रोज शुक्रवार शके १८३८ ला झाला. हे फार उच्च कोटीस पोचलेले आधुनिक संत होते. आंग्लविद्याविभूषित असून त्यांनी एल्‌एल्. बी., एल्. एम्. अँन्ड एस्., आणि एल्. सी. ई. अशा तिन्ही परीक्षांचा अभ्यास केला

होता. परंतु मुंबई विश्वविद्यालयाच्या नियमानुसार त्यांना तिन्ही परीक्षा एकाच वेळी देता आल्या नाहीत. पितृ आज्ञेप्रमाणे त्यांनी वकिलीची परीक्षा दिली. अण्णासाहेब आयुर्वेद आणि आंग्ल वैद्यक या दोन्ही शास्त्रांत निष्णात होते. वकिली पोटाचा धंदा म्हणून केली व परोपकाररूप सेवा करण्याकरिता वैद्यकीही केली. आंग्लवैद्यांनी असाध्य म्हणून सोडून दिलेले अनेक रोगी अण्णासाहेबांकडून जीवदान घेऊन गेले आहेत. अण्णासाहेब हे वैदिक संस्कृतीचे कट्टर अभिमानी व द्रष्टे होते. यांच्या आयुष्याचा पूर्वकाल देशाच्या स्वातंत्र्याच्या उलाढाली करण्यात व उत्तरकाल परमार्थात गेला. अण्णासाहेबांचे जीवनचरित्र म्हणजे राजर्षि, महर्षि आणि ब्रह्मर्षि अशा चढत्या भाजणीने उत्क्रांत झालेले आढळून येते. अण्णासाहेबांच्या तपश्चर्येविषयी त्यांचे चिरंजीव कै. बाबासाहेब पटवर्धन यांनी काढलेले उद्गार हे 'सांगे वडिलांची कीर्ति' या लक्षणाला धरून काढलेले नसून अण्णासाहेबाच्या जीवनाचे यथार्थ दर्शन घडविणारे आहेत. अण्णासाहेबांविषयी ते म्हणतात, "निराधाराने निराहार व अनिद्रित राहून शुद्धाचरणाने वागणारा, हौसेने अकिंचनत्व पत्करणारा, ज्याची गरज जहाल–मवाळ, हिंदु–मुसलमान, पारशी–खिश्चन या सर्व लोकांना होती, पण ज्याला कोणाकडून कसल्याही लाभाची अपेक्षा नव्हती असा अत्यंत दृढनिश्चयी सत्पुरुष."

अण्णासाहेब लहान असताना महाराज त्यांच्या वाड्यात भिक्षेच्या निमित्ताने गेले होते आणि त्या वेळी त्यांना महाराजांचे दर्शन झाले होते असे सांगतात. पुढे श्रीमंत सरदार तात्यासाहेब रायरीकर यांच्यामुळे अण्णासाहेबांचा महाराजांशी प्रत्यक्ष परिचय झाला. महाराजांचा अण्णासाहेबांवर फार लोभ होता व ते त्यांना 'दादा' असे म्हणत असत. 'ही मंडळी आमचे लष्करी खाते आहे', किंवा 'इकडला डोंगर तिकडे उचलून ठेवण्याचे काम यांच्याकडे आहे' असे नेहमी अण्णासाहेबांविषयी महाराज बोलत असत व त्यांचे कौतुक करीत. महाराज म्हणजे प्रत्यक्ष देव किंवा परमात्मा ही भावना प्रथमदर्शनीच अण्णासाहेबांच्या ठिकाणी जागृत झाली नाही. महाराज म्हणजे कोणी विद्वान किंवा योगी अथवा सिद्ध पुरुष असावेत अशी त्यांची सुरुवातीस कल्पना होती. पण पुढे अनुभव येऊन अण्णासाहेबांची खात्री झाली की महाराज म्हणजे प्रत्यक्ष देवच. महाराजांचे ठायी त्यांची भक्ती वाढत वाढत इतक्या कोटीस गेली की ते व महाराज अगदी एकरूप झाले.

सुरुवातीस महाराजांचा व यांचा संबंध म्हणजे केवळ लठ्ठालठ्ठी. प्रत्येक बाबतींत महाराजांशी त्यांचे वाद होत पण असे फार दिवस चालले नाही. महाराजांच्या ठिकाणी असलेले 'अपार्थिव ज्ञान व सामर्थ्य' याबद्दल अण्णासाहेबांची लवकर खात्री झाली व महाराज म्हणजे श्रीगुरुचरित्र कथानायक श्रीनरसिंह-

सरस्वतीच प्रत्यक्ष होत हा विश्वास पटला. श्रीअण्णासाहेब यांच्या घराण्याची उपासना श्रीगजाननाची. त्यामुळे पुष्कळ दिवसपर्यंत महाराज वेगळे व गणपती वेगळा असे द्वैत त्यांच्या मनात होते. एक दिवस अशी शंका घेऊन ते आळंदीस महाराजांच्या दर्शनास गेले आणि पाहतात तो महाराजांचे नाक बेंबीपर्यंत लोंबत असलेले त्यांना दिसले. या दृश्यावरून महाराजांच्या पूर्णत्वाबद्दल अण्णासाहेबांची खात्री होऊन त्यांच्या मनांतील द्वैत नाहीसे झाले.

महाराजांचा व अण्णासाहेबांचा निकट असा संबंध जवळ जवळ एक तप होता. महाराजांच्या सहवासामुळे अण्णासाहेबांच्या आयुष्यांत फार मोठी क्रांती झाली. श्रीअप्रबुद्ध यांनी म्हटल्याप्रमाणे, "वैदिक संस्कृती म्हणजे काय, वैदिक आचार–विचार यांच्या मुळाशी कोणती तत्त्वे आहेत इत्यादि गोष्टींची हृद्गते अवगत होण्यास महाराजांची मदत झाली. विश्वाच्या दृश्य पसाऱ्यावर अदृश्य असे अनंत विश्व आहे व ह्या दोन विश्वाचा परस्पर आश्रय आहे या गोष्टीचे नुसते बौद्धिक आकलन नव्हे तर सानुभव खात्री श्रीमहाराजांमुळेच अण्णासाहेबांस झाली."

महाराजांबद्दल अण्णासाहेबांच्या मनात नितांत आदर वसत असे. आळंदीस दर्शनास गेल्यावर श्रीमंती पोषाख टाकून साध्या कपड्यांनी ते महाराजांच्यासमोर जात असत. त्रिंबकाची मुंज व प्रज्ञावर्धन स्तोत्राची दुरुस्ती यावरून महाराजांचे ईश्वरत्व अण्णासाहेबांच्या प्रत्ययास आले. महाराज शांत झाल्यावरही अण्णासाहेबांच्या दृष्टीने ते अखंड होते. परमेश्वराविषयी 'जिवंत भाव' कसा असावा हे अण्णासाहेबांच्या काही कृतींवरून दिसून येते. महाराजांची पूजा, त्यांना नैवेद्य दाखविणे किंवा प्रत्येक वेळी महाराजांना नमस्कार करणे या गोष्टी वरपांगी नसून त्या 'जिवंत भाव' दर्शविणाऱ्या आहेत. महाराजांची तसबीर म्हणून कोणी उल्लेख केल्यास अण्णासाहेबांना ते आवडत नसे. कारण महाराजांची तसबीर म्हणजे प्रत्यक्ष महाराजच आहेत अशी त्यांची श्रद्धा होती.

श्रीअण्णासाहेब यांच्या मुलीचा मुलगा बागलू म्हणून होता. त्याच्या मुखाने महाराज नेहमी बोलतात, अशी अण्णासाहेबांची श्रद्धा होती. या संबंधातले त्यांचे दोनतीन अनुभव उल्लेखनीय आहेत म्हणून ते पुढे दिले आहेत.

श्रीअण्णासाहेब यांच्या कुटुंबाच्या मृत्युसमयीचा प्रसंग. पत्नीचे प्रेत घराबाहेर नेण्याची वेळ आली त्या वेळी बागलूने अण्णासाहेबांस एका बाजूला नेऊन म्हटले, "चार आण्यांचा हार आणून आधी महाराजांची पूजा करा" व मग इतर गोष्टी करा. मंगल व आनंदमयप्रसंगी ज्याप्रमाणे महाराजांचे अस्तित्व असते त्याचप्रमाणे असल्या शोकमय प्रसंगीही महाराज तेथे उपस्थित असले पाहिजेत व त्यांची नेहमीप्रमाणे अर्चा झाली पाहिजे, ही कल्पना डोक्यांत येण्याइतक्या

बयाचा बागलू नव्हता. असेच एकदा अण्णासाहेब, त्यांचे एक स्नेही रा. मोडक व बागलू हे टांग्याने आळंदीस जात होते. वाटेत रा. मोडकांनी अण्णासाहेब यांस विचारले, "काय केले म्हणजे महाराज बोलू लागतील ?" बागलूनेच उत्तर दिले, "सकाळी उठल्याबरोबर राम, नारायण किंवा महाराज असे काही नाव मुखाने घ्यावे म्हणजे महाराज बोलू लागतील. मात्र नाव मनात घ्यावे म्हणजे बरे." बागलूचे हे उत्तर ऐकून रा. मोडक यांना फारच आश्चर्य वाटले.

श्रीअण्णासाहेब यांची श्रीगुरुचरित्रावर फार श्रद्धा होती. सातारा येथील 'हंस' साप्ताहिकात प्रसिद्ध झालेले त्यांचे श्रीगुरुचरित्रावरील स्फुट विचार वाचले म्हणजे अण्णासाहेबांचा या ग्रंथाविषयी बोलण्याचा अधिकार किती मोठा होता याची कल्पना येते. ते स्वत: किंवा दुसऱ्याकरवी या ग्रंथाची नेहमी पारायणे करून घेत. त्यांच्या श्रीगुचरित्रावरील या उत्कट श्रद्धेमुळे त्यांच्या निकटवर्ती मंडळींपैकी कित्येक लोक त्यांना श्रीगुरुचरित्रकाराचे पूर्वज सायंदेव याचाच अवतार मानतात. एका प्रसंगी काही मंडळी व अण्णासाहेब यांची श्रीगुरुचरित्रा-संबंधी चर्चा चालली होती. श्रीगुरुचरित्राची मूळ प्रत सायंदेवाच्या घराण्यातून मिळवून त्याचे शुद्धीकरण करावे व या कामात अण्णासाहेबांनी पुढाकार घ्यावा असे त्यांच्याकडे आलेल्या मंडळींचे म्हणणे होते. त्याप्रमाणे अण्णासाहेबांनी गाणगापूरला जाऊन मूळ प्रत मिळविण्याची कामगिरी करण्याविषयी तयारी दर्शविली. ही चर्चा चालू असता बागलू जवळच होता. चर्चेचा विषय त्याच्या बालबुद्धीच्या पलीकडचा होता. असे असता बागलूच्या मुखातून पुढील उद्‌गार उत्स्फूर्तपणे बाहेर पडले. "दारू आणि माती एका ठिकाणी करून पेटविली तर दारू जळून जाते आणि माती खाली राहते." बागलूच्या मुखांतून निघालेल्या या उद्‌गारांचा अर्थ बाकीच्या मंडळींच्या लक्षात आला नाही पण अण्णासाहेब मात्र समजून चुकले की 'ग्रंथ वाचावा. जे शब्द महाराजांचे असतील ते काम करतील. बाकीचे नुसते वाचले म्हणून काय नुकसान झाले ?' बागलूच्या मुखाने महाराजांनी दिलेल्या या सूचनेनुसार अण्णासाहेबांनी श्रीगुरुचरित्राच्या शुद्धी-करणाचा विचार सोडून दिला.

महाराजांच्या निर्याणानंतर त्यांचे संस्थान झाले. सुरुवातीस अण्णासाहेब त्या संस्थानचे पंच नव्हते. पण पुढे पंच झाले. शंकरबोवा सोनगीरकर गादीवर असता संस्थानचा कारभार अण्णासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली चालत असे. श्रीनारायणबोवा रुद्र यांच्या पश्चात अण्णासाहेबांनी महाराजांचा संप्रदाय सुमारे पंधरा वर्षे चालविला. महाराजांच्या सेवेत अण्णासाहेब दरवर्षी रुपये एकशे एक खर्च करीत असत. महाराजांच्या पुण्यतिथीच्या उत्सवात एखाद्या सामान्य सेवकाप्रमाणे लहानसहान कामे करून ते महाराजांची सेवा करीत असत. शेण-

गोळा करून जेवणाची जागा स्वच्छ करण्यापासून तो पंगतीत वाढण्यापर्यंत सर्व कामे करण्याची अण्णासाहेबांची तयारी असे. त्यांच्या या वर्तनाचे सौ. भागीरथी-बाई बापट यांनी 'माझी पुष्पमाला' या छोट्याशा काव्यात फार सुंदर रीतीने वर्णन केले आहे. **'पीतांबराची कांस घातली। पात्रें झरझरा उचलली। वाढण्याची लगबग उडाली। अंगीं शोभती घर्मबिंदू ॥'** महाराजांविषयी अण्णासाहेबांची श्रद्धा व भक्ती कशी होती याचेही सौ. भागीरथीबाईंनी आपल्या काव्यात फार सुंदर वर्णन केले आहे.

**श्रीगुरु नृसिंहसरस्वती। हे साक्षात दत्तमूर्ति ॥**
**शिष्य विनायक नमिती। 'मी न' सर्व महाराज! ॥६०॥**
**चित्त गुरु, मन गुरु। गुरुचि त्यांचा अहंकारु ॥**
**नेत्री भरला सद्गुरु। सर्वस्व ते महाराज ॥६१॥**
**महाराज रोमरोमांतरी। सर्वदा वदे वैखरी ॥**
**महाराजाविणें कांहीच न करी। किंचिन्मात्र काज ॥६२॥**

श्रीअण्णासाहेबांचे समाधिमंदिर पुण्यास ओंकारेश्वरावर मुळामुठा नदीच्या पात्रात आहे. बारा जुलै १९६१ रोजी पानशेतचे धरण फुटून मुळामुठा नदीच्या काठावरील सर्व इमारती वाहून गेल्या; पण श्रीअण्णासाहेबांचे समाधिमंदिर मात्र कायम राहिले. इतकेच नव्हे तर असे सांगतात की धरण फुटण्याच्या आदल्या दिवशी त्यांच्या समाधीस लावलेले गंध पूर ओसरल्यावरही कायम असल्याचे आढळून आले! माघ शु. एकादशीस प्रतिवर्षी त्यांच्या पुण्यतिथीचा समाधि-मंदिरात उत्सव साजरा होत असतो.

## २. श्रीनारायणबोवा रुद्र, धुळे

श्रीनारायणबोवा रुद्र यांच्या तीन जन्मांची रहस्यमय हकीकत श्रीस्वात्म-सौख्य ग्रंथाच्या संबंधात मागे निवेदन केली आहे. फार वर्षांपूर्वी, धुळे येथील श्री. पुरंदरे यांनी नारायणबोवांचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले आहे. त्याचप्रमाणे ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्रात नारायणबोवांचे त्रोटक चरित्र आले आहे. या दोन्ही पुस्तकांच्या आधाराने थोडाफार फरक करून खालील चरित्रा-त्मक लेख लिहिला आहे.

पूर्व जन्मात अवतार समाप्त केल्यावर नारायणस्वामींनी पुढे जो दुसरा जन्म घेतला तो म्हणजे नारायबोवा रुद्र हा होय. यांचा जन्म मोगलाईत जालवण-कडे झाला. यांच्या वडिलांचे नाव रघुनाथ व मातोश्रीचे भागीरथीबाई होते. रुद्र हे त्यांचे उपनाव होते. नाशिक येथे काही उद्योगधंदा करून नारायणबोवा पुढे धुळे येथे पुरंदरे यांच्या श्रीराममंदिरांत रामाचे पुजारी म्हणून राहावयास

आले. यांचे वडील स्मार्त आणि मातुलपक्ष वैष्णव मार्गी. नारायणबोवांनी वैष्णवमार्ग स्वीकारला होता. हे महाराजांच्या सहवासात आल्यावर महाराजांचा त्यांच्यावर अनुग्रह होऊन ते श्रीदत्ताची उपासना करू लागले. तेव्हापासून ते श्रीदत्तजयंतीचा उत्सव करीत असत. श्रीनारायणबोवांची अशी श्रद्धा होती की महाराज हेच श्रीगुरुचरित्रातील श्रीगुरु नरसिंहसरस्वती होत.

महाराजांच्या सहवासात येण्यापूर्वी नारायणबोवा श्रीरामचंद्राची उपासना करीत. त्यांचा ध्यानाभ्यासही चांगला होता. महाराजांची गाठ पडल्यावर त्यांचे ठायी नारायणबोवांची भक्ती जडली. पण कित्येक वेळा मनात महाराज मोठे की श्रीराम मोठे, असे द्वंद्व उत्पन्न होऊन त्यांचे मनास मोठा त्रास होई. एके दिवशी नित्याप्रमाणे ध्यान करीत असता असे दिसले की श्रीमारोतीरायाचे खांद्यावर श्रीरामप्रभू बसले असून त्यांनी आपले स्कंधावर श्रीमहाराज यांना घेतले आहे. हे दृश्य पाहिल्यावर नारायणबोवांचा संशय फिटला व त्यांची श्रीदत्तोपासना प्रसिद्ध झाली.

नाशिक येथे असता नारायणबोवा प्रसिद्ध कीर्तनकार त्र्यंबकबोवा नाशिककर यांच्या सहवासात आले. त्यामुळे त्यांचा गायनाचा अभ्यास झाला. त्याचप्रमाणे प्रसिद्ध गवई लखुनाना पटवर्धन यांच्याजवळ ते काही दिवस गायन शिकले. धुळ्यास आल्यावर श्रीराममंदिरात रंगशास्त्री पुराणिक यांच्या मुखाने योगवर्णने ऐकून त्यांचे लक्ष योगाभ्यासाकडे लागले. त्या मार्गात त्यांनी चांगलीच प्रगती केली. पुढे महाराजांची कृपादृष्टी होऊन महाराजांनी त्यांना हठयोग शिकविला व त्याच मार्गाने त्यांना पूर्णत्वास नेले. त्या काळी धुळ्यात तीन वेडे प्रसिद्ध होते. त्यापैकी एकाजवळ महाराजांच्या आज्ञेवरून नारायणबोवा योगाभ्यास शिकले. यांना योगाभ्यास शिकविण्याकरिता महाराज स्वतः धुळ्यास वास्तव्य करून होते.

महाराजांची कृपा झाल्यावर नारायणबोवा फाल्गुन महिन्यात आळंदीस जाऊन महाराजांबरोबर देहूस तुकाराम महाराजांचे पुण्यतिथीस जात असत. त्याच वेळी महाराजांनी त्यांना सांगून ठेवले होते की, "मी केव्हातरी वेगळ्या वेषात येऊन भेटेन आणि कसोटी घेतल्यावर पूर्ण कृपा होईल." यासंबंधीतील हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

एक दिवस महाराज डोक्यावर फकिरासारखे लांब केस, मध्ये भांग, अंगात पायघोळ भगवी कफनी व पायात पुणेरी जोडा अशा फकिरी थाटात नारायण-बोवांना दर्शन देण्याकरिता धुळे येथील राममंदिरात आले आणि म्हणाले, "नारायण किधर है ? भूक लगी." त्या वेळी नारायणबोवा वामकुक्षी करीत

होते हे पाहून त्यांची आई म्हणाली, "चलावे, मी भोजनास वाढते." त्यावर महाराज म्हणाले, "नहीं माई. मेरेकु नारायण चाहिये." फकिराचा आग्रह पाहून आईने नारायणबोवांस उठविले. नारायणबोवा म्हणाले, "यावे महाराज नारायण मीच आहे. मी आपणास भोजन घालतो." तेव्हा महाराज म्हणाले, "अच्छा नारायण. हम तो हातसे भोजन नहीं करते. तुम भोजन कैसे देयेंगे ? तुम तो अंधे हो और मेरेकु भोजन खिलाते ! कैसी बात होगी ?" नारायणबोवांनी मनात पक्के ओळखले की फकीर म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून खुद्द महाराजच आहेत. महाराजांकरिता वेगळा भात शिजविण्यांत आला व तो तयार झाल्यावर फकीर महाराज मंदिरात गेले.

नाराणबोवांना योगाभ्यास करीत असतांना दृष्टिहीनत्व आले होते व यावरूनच महाराजांनी 'तुम अंधे हो और मेरेकु भोजन खिलाते !' हे उद्‌गार काढले होते. महाराजांच्या आज्ञेवरून मंदिराचे माडीवर राहणारे माधवराव कुळकर्णी यांना नारायणबोवांनी खाली बोलावून घेतले व महाराजांस हाताने जेवू घालण्याविषयी सांगितले. माधवरावांनी त्याप्रमाणे केले. जेवत असता महाराज ताम्हणाने पाणी प्याले. फकीर महाराज मंदिरात सुमारे १५ दिवस होते. सूर्योदय व सूर्यास्ताचे वेळी वरील प्रकारे त्यांचे भोजन होत असे. स्नान, शौचमुखमार्जनादी व्यवहार महाराजांचे मर्जीवर अवलंबून असत. भोजन घालणाऱ्यास एखादे वेळी फकीर महाराजांच्या मुखाचा केशरकस्तुरीसारखा वास येई आणि त्या सुगंधाने तो मोहित होऊन तल्लीन झाला की मध्येच अगदी निराळा वास येई आणि त्यामुळे जवळ बसणे अशक्य होई. फकीर महाराज आपल्या वास्तव्यात 'लहाळल लहाळल' या शब्दांनी नेहमी भजन करीत. हे शब्द कोणत्या भाषेतील आहेत याविषयी कोणालाच तर्क करता आला नाही.

एक दिवस रात्रौ नऊ वाजण्याचे सुमारास अचानक फकीर महाराज मंदिरातून जाण्यास निघाले. जाताना नारायणबोवांना म्हणाले, "नारायण, येतो आता." तेव्हा नारायणबोवा म्हणाले, "महाराज, आपण चालला काय ?" महाराज म्हणाले, "होय. तुझी भक्तिमार्गाची व्यवस्था पाहून फार संतोष पावलो. तुजवर पूर्ण कृपा झाली." या प्रसंगी इतर मंडळीही उपस्थित होती. महाराजांच्या वियोगाने नारायणबोवांचे अंत:करण भरून आले. आणि त्यांनी फकीरमहाराजांचे चरणावर मस्तक ठेवले. दोघांच्या नेत्रातून प्रेमाश्रू वाहात होते. फकीर महाराजांना पोचविण्याकरिता जमलेली मंडळी रस्त्यापर्यंत आली. कमेटीच्या कंदिलाच्या उजेडात येताच फकीर महाराज एकाएकी अदृश्य झाले. पुढे अशी माहिती मिळाली की ज्या वेळी महाराज सडकेवर अदृश्य झाले त्याच वेळी ते अमळनेर येथे सखाराममहाराज यांच्या समाधीजवळ उपस्थित होते.

पुढे एका फाल्गुन महिन्यात नारायणबोवा नेहमीप्रमाणे आळंदीस आले असता महाराजांनी मोठ्या आनंदाने सर्वांस सांगितले की, "नारायण माझे हृदय आहे." या प्रसंगी महाराजांना डोळ्यांनी पाहता येत नाही म्हणून नारायणबोवांस फार वाईट वाटले. तेव्हा महाराजांनी त्यांच्या डोळयांवरून हात फिरविला. त्याबरोबर नारायणबोवांना दृष्टी प्राप्त झाली ! नारायणबोवांनी महाराजांना डोळे भरून पाहून घेतले. लगेच महाराजांनी विचारले, "आणखी काय इच्छा आहे ?" नारायणबोवा म्हणाले, "एकदा आपल्याला पाहिल्यावर जग पाहण्याची इच्छा नाही; तेव्हा डोळे पूर्ववत करावे." महाराजांनी पुन्हा तोंडावरून हात फिरविताच नारायणबोवांची दृष्टी पूर्ववत झाली. त्याच वेळी महाराजांनी नारायणबोवांना, "दृष्टीवाचून तुझे अडणार नाही." असा आशीर्वाद दिला आणि प्रपंचात अडचण पडू नये म्हणून एक सिद्धीही पण देऊन ठेवली. अडचणीच्या प्रसंगी एका डबीतून नारायणबोवांना पाहिजे तितकी रक्कम मिळत असे. परंतु त्यांनी या सिद्धीचा उपयोग फारसा केला नाही.

नारायणबोवांचे हातून इतर सिद्ध पुरुषांप्रमाणे अनेक चमत्कार झाले आहेत. नारायणबोवांचा अधिकार फार मोठा होता. ब्रह्मर्षी अण्णासाहेब पटवर्धन तर असे म्हणत की, "नारायणबोवांसारखा संत अवघ्या हिंदुस्थानात पाहिला नाही." महाराजांच्या मागे नारायणबोवांनी त्यांचा संप्रदाय सुमारे पंधरा वर्षे चालविला आणि अनेक लोकांचे कल्याण केले.

वैशाख शु ।। ३ शके १८२३ पासून श्रीनारायणबोवांची प्रकृति ज्वर-विकाराने बिघडत गेली. वैशाख शु ।। १२ स प्रातःकाळी इतर शिष्यांना श्रीदत्ता-समोर भजन करावयास लावून आपण स्वतः पद्मासन घालून बसले. त्याच वेळी त्यांनी संन्यासदीक्षा घेतली. भजन चालू असता नऊ वाजण्याचे सुमारास इहलोकीचा त्याग केला. समाधिस्थ झाले त्या वेळी त्यांनी पद्मासन घातले होते. यावरून त्याचे नाव पद्मनाभस्वामी पडले असे सांगतात. धुळ्यात पांझरा नदीच्या काठी नारायणबोवांचे समाधिमंदिर आहे. या समाधिस्थानाची अद्‌भुत हकीकत खाली दिल्याप्रमाणे आहे.

नारायणबोवांच्या समाधीची जागा स्वतः महाराजांनीच, त्या जागी काही वेळ वास्तव्य करून आणि तेणेंकरून त्या जागेस पावित्र्य आणून नियोजित केली होती. महाराजांनी ती जागा श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांना ध्यानात दाखवूनही ठेवली होती. महाराज लौकिकदृष्ट्या पौष शु ।। १५ शके १८०७ रोजी समाधिस्थ झाले. तेव्हापासून श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचा असा नियम होता की महाराज भूतलावर ज्या ठिकाणी संचार करीत असतील त्या ठिकाणी योगबलाने आपला लिंगदेह नेऊन महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन घ्यावयाचे. याप्रमाणे

१८९२ साली श्रीदत्तजयंतीचे दिवशी अण्णासाहेब नित्यनियमाप्रमाणे महाराजांच्या शोधास निघाले. आज ज्या ठिकाणी श्रीनारायणबोवाची समाधी आहे त्याच विवक्षित जागी महाराज, आपल्या अंगावरील छाटीने ती जागा साफ करून छाटी टाकून आणि दृष्टी ऊर्ध्व करून पहुडले होते. एक गुडघा उभा ठेवून त्यावर दुसरा पाय ठेवला होता. अशा स्थितीत अण्णासाहेबांस महाराजांचे दर्शन झाले. महाराजांस नमस्कार करून ते जवळच बसले. नंतर दोघेही आज ज्या ठिकाणी पांझरा नदीच्या काठी श्रीगणपतीचे मंदिर आहे त्या ठिकाणचे समोरील नदी-प्रवाहात स्नान करून नदीकाठच्या रस्त्याने परतले. या दिवसात नारायणबोवा खोलगल्लीतील श्रीराममंदिरात राहत होते. तो दिवस श्रीदत्तजयंतीच्या पारण्याचा होता. महाराज व अण्णासाहेब श्रीमारुतीचे वडाच्या पारावरून मागच्या गल्लीने राममंदिरात शिरले. ही गोष्ट नारायणबोवांना अंतर्ज्ञानाने कळली. श्रीमहंत यांना मंदिराचे दक्षिणबाजूस असलेल्या औदुंबर वृक्षाखाली दोन पाने मांडून ती वाढण्यास नारायणबोवांनी सांगितले. त्या दिवशी नैवेद्यास जिलबी केली होती. श्रीदत्तजयंतीच्या पारण्याचा प्रसाद घेऊन महाराज आपल्या संचारास निघून गेले आणि अण्णासाहेब परत आपल्या ठिकाणी आले. या प्रसंगी महा-राजांनी अण्णासाहेबांस सांगितले की ही सर्व जागा श्रींची असून त्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात श्रीपरमेश्वराचे भजनकीर्तन होऊन अन्नसंतर्पण होणार आहे. ही गोष्ट घडल्यावर पुढे जवळ जवळ आठ वर्षांनी श्रीनारायणबोवा समाधिस्थ झाले. या घटनेची दुसरे कोणास माहिती नसता महाराजांनी योजून ठेवलेल्या जागीच नारायणबोवांचा देह ठेवण्यात आला.

१९०० साली झालेला श्रीदत्तजयंतीचा उत्सव हा श्रीनारायणबोवांच्या हातून झालेला असा शेवटचाच. श्रीअण्णासाहेब या उत्सवाकरिता मुद्दाम आले होते. धुळे स्टेशनवर टांगा करून आधी पांझरा नदीवरील पुलापर्यंत येऊन महाराजांनी नियोजित केलेली जागा प्रत्यक्ष पाहून घेतली आणि मग ते श्रीदत्तमंदिरात आले.

नारायणबोवांच्या एका शिष्याने त्यांची आरती केली आहे. या आरतीतील पाचवे कडवे पुढीलप्रमाणे आहे.

**श्रीनरसिंह सरस्वती । व्यापी सर्वत्र जगती ।**
**प्रत्यया आणिती जे । ब्रह्मानंदीं लीन होती ।**

शिष्याने रचलेल्या मूळ आरतीत हे कडवे नव्हते. नारायणबोवांनी स्वतः स्वप्नांत त्या शिष्यास ते घालण्यास सांगितले. या कडव्याचा अर्थ श्रीअण्णा-साहेबांनी सांगितला तो असा की, 'नरसिंहसरस्वती महाराज हे सर्वव्यापक आहेत असा जो अनुभव घेतो तो ब्रह्मानंदी लीन होतो.'

## ३. श्रीयशवंतराव महाराज-देव मामलेदार

यांचे संपूर्ण नाव यशवंत महादेव भोसेकर असे होते. हे गृहस्थाश्रमी होते. यांच्या कुटुंबाचे नाव सुंदराबाई असे होते. वयाच्या सोळाव्या वर्षापासून अठ्ठावन वर्षापर्यंत यांचे आयुष्य सरकारी नोकरीत गेले.

यांचे घरी श्रीनृसिंहाची उपासना फार कडक होती. महाराजांनीच त्यांना ही उपासना पूर्वी केव्हा तरी दिली होती. पण ती गोष्ट लोकांना फारशी माहीत नाही. काशी क्षेत्रातील एक संन्यासी यांचे गुरू होते.

पुण्याचे श्रीमंत सरदार तात्यासाहेब रायरीकर यांना महाराजांनी संन्यास दिला त्या दिवशी घडलेला प्रसंग. महाराजांच्या मनात गाडीत बसून बाहेर फिरावयास जावयाचे होते. पण तो बेत रहित करून त्यांनी लोकांना बैठक टाकण्यास सांगितले आणि म्हणाले, "यशवंतराव भेटीस येत आहेत." त्याप्रमाणे लोकांनी बैठक टाकून सर्व व्यवस्था केली. थोडया वेळाने खरोखरच यशवंतराव महाराज तेथे येऊन पोचले. नमस्कार वगैरे झाल्यावर महाराजांनी तात्यासाहेब रायरीकरांची फार प्रशंसा केली. ती ऐकून यशवंतराव महाराजांना वाईट वाटले. आणि त्यांनी महाराजांची अशी प्रार्थना केली की, "महाराज, तात्यासाहेबांचे तर सार्थक झाले. पण आता या शरीराचे काय करणार ? एक तर आता पुरे तडीस लावा, नाही तर आपल्या हाताने कोठे तरी आडात लोटून द्या." या प्रसंगी महाराजांच्या आणि त्यांच्या एकांतात काही गोष्टी झाल्या आणि त्यामुळे समाधान पावून यशवंतराव महाराज आनंदाने परतले. याच वेळी किंवा लवकरच पुढे केव्हा तरी महाराजांनी यशवंतराव महाराजांना परोपकार करण्याची आज्ञा केली. महाराजांना यशवंतराव महाराजांचे या संबंधात एक पत्र आले होते. या पत्राची एक प्रत आळंदीस महाराजांच्या मठात आहे. त्यात असा स्पष्ट उल्लेख आहे की, "परोपकाराची आज्ञा झाली त्याप्रमाणे प्रारंभ केला आहे."

यशवंतराव महाराजांचे घरी कोणाचेही आणि केव्हाही स्वागत होत असे. कोणी आला तरी ते त्यास खावयास देत असत आणि त्याशिवाय त्यांच्या घरून कोणीही तसा परतला नाही. परोपकार करण्याची महाराजांनी केलेली आज्ञा त्यांनी अखेरपर्यंत पाळली. पुढे यशवंतराव महाराजांचा आध्यात्मिक क्षेत्रात अधिकार फार वाढून त्यांची कीर्ती सर्वदूर पसरली. हे साधु-कोटीचे असल्यामुळे लोक यांना 'देव मामलेदार ' असे म्हणू लागले. १८८७ साली यशवंतराव महाराज नाशिक क्षेत्री वैकुंठवासी झाले. यांचे समाधिमंदिर तेथे गोदावरी नदीच्या घाटावर आहे.



खानदेशात हिंडतांना



श्रीबुवासाहेब



श्रीमाधवबुवा
गोडबोले

## ४. श्रीराधाकृष्णस्वामी, रहिमतपूर

थोड्या दिवसांपूर्वी श्रीराधाकृष्णस्वामी यांच्या समाधीच्या पुण्यतिथीचा शतसांवत्सरिक उत्सव रहिमतपूर येथे झाला. त्या प्रसंगी श्रीराधाकृष्ण स्वामींचे एक अल्प चरित्र ह. भ. प. सोनोपंत दांडेकर यांचे हस्ते प्रकाशित झाले. त्यात आलेली चरित्रविषयक माहिती आणि अन्यत्र मिळालेली माहिती यांच्या आधारे हे त्रोटक चरित्र लिहीत आहे. राधाकृष्ण स्वामींच्या प्रकाशित झालेल्या छोट्याशा चरित्रात महाराजांचा उल्लेख नाही हे येथे नमूद करणे आवश्यक आहे.

राधाकृष्ण स्वामींचे पूर्वज तुळजोपंत कुळकर्णी हे सुमारे २५० वर्षांपूर्वी कोल्हापूरकडील चिकुरडे या गावी राहत असत. बद्रीकेदार ते रामेश्वर आणि रामेश्वर ते काशी–प्रयाग अशा तीर्थयात्रा केल्यावर तुळजोपंतांनी प्रयागहून अक्षय–वटाची एक फांदी आणून कृष्णा–वेण्णा संगमावर लावली. आणि तेथेच ते तपाचरण करीत राहिले. शाहू महाराज प्रतिनिधीबरोबर मकरसंक्रांतीच्या पर्वकाळात संगमावर स्नानास आले, त्या वेळी संगमावरील अरण्याचे दान त्यांनी प्रतिनिधीला दिले. संगमावर प्रयागसारखे क्षेत्र व्हावे या इच्छेने प्रतिनिधींनी तेथे एक घर बांधले आणि ते तपश्चर्या करणाऱ्या तुळजोपंतांना दिले. तुळजोपंतांना त्यांनी पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारावयास लावले. तुळजोपंतांच्या मुखी नेहमी शिवनाम असे म्हणून यांचे उपनाव 'शिवनामे' असे पडले.

तुळजोपंतांच्या वंशात पुढे बाळकृष्ण उर्फ बापू, पत्नी आनंदीबाई या दांपत्याच्या पोटी वृद्धापकाळी श्रीमेरुलिंगाच्या कृपेने शके १७११ मध्ये एक मुलगा झाला. त्याचे नाव सदाशिव. सदाशिवाचे आईवडील त्याच्या वयाच्या अनुक्रमे १२ आणि १८ व्या वर्षी स्वर्गवासी झाले. हा सदाशिव म्हणजेच राधाकृष्ण स्वामी. यांचे संन्यासाश्रमातील नाव सदानंद असे होते. ते राधाकृष्ण या नामाचे अखंड भजन करीत म्हणून त्यांचे नाव 'राधाकृष्ण स्वामी' असे पडले. असे सांगतात की वडिलांच्या तेराव्या दिवशी सदाशिव बाळ टाळ्या वाजवून राधाकृष्ण असे भजन करीत असताना लोकांना आढळला. वडिलांच्या मृत्यूनंतर घर व शेत यांचे ब्राह्मणांना दान करून हे माहुलीस ज्योतिपंत महाभागवत यांचे शिष्य शंकरस्वामी म्हणून होते, त्यांचेकडे आले. सहवासात आल्यावर राधाकृष्ण स्वामी शंकरस्वामींचे शिष्य बनले. शंकरस्वामींनीच यांना संन्यासदीक्षा दिली. यांची संप्रदाय परंपरा पुढीलप्रमाणे आहे. विष्णु–ब्रह्मदेव–नारद–व्यास–ज्योतिबुवा शंकर. राधाकृष्ण–शंकरस्वामींनी आश्विन शु॥ ११ शके १७३४ रोजी समाधी घेतली. आपल्या गुरूंच्या आज्ञेप्रमाणे राधाकृष्ण स्वामी तीर्थयात्रा व तपश्चर्या

करण्यास माहुली सोडून गेले. राधाकृष्ण स्वामींच्या 'भक्ती आणि योग' या विषयावरील अभंगात हठयोगातील षट्चक्रांचे वर्णन आले आहे. त्यावरून त्यांचा हठयोगाचा अभ्यास होता असे दिसते. गुर्वाज्ञेप्रमाणे तीर्थयात्रा व तपश्चर्या पूर्ण करून हे हिंडत हिंडत अखेरीस रहिमतपूरला आले. येथे हे चाळीस वर्षे राहून जगदुद्धाराचे कार्य करीत राहिले. रहिमतपुरात महामारीचा उपद्रव सुरू झाला त्या वेळी हे रागावून माहुलीस गेले होते. राधाकृष्ण स्वामींचे मराठीचे शिक्षण बेताचेच होते आणि संस्कृताचा तर त्यांना गंधही नव्हता. यांचे आचरण अतिशय शुद्ध होते. जगदुद्धाराची तळमळ आणि भगवद्भक्ती पराकोटीला गेली होती, असे त्यांच्या चरित्रावरून दिसून येते. यांनी केलेल्या चमत्कारांची थोडी माहिती त्यांच्या अल्पचरित्रात आढळते. चाळीस वर्षे जगदुद्धाराचे कार्य केल्यावर त्यांनी देहत्याग करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे आश्विन वद्य ११ शके १७८१ रोजी इहलोक सोडून जाण्याचे निश्चित केले. त्या वेळी त्यांची प्रकृती फार क्षीण झाली होती. सकाळी भजन सुरू झाले. मोठ्या प्रयासाने राधाकृष्ण स्वामी भजनास उभे राहिले. मोठ्या आवेशाने 'राधाकृष्ण' अशी आरोळी ठोकली व त्यांनी भजनास प्रारंभ केला. शरीरात त्राण उरले नव्हते. थोड्या वेळातच ते खाली पडले ते अखेरचेच ! राधाकृष्ण स्वामींची समाधी रहिमतपुरास आहे. राधाकृष्ण स्वामींचे लौकिक चरित्र एकूण असे आहे. महाराजांचा व त्यांचा जो ऋणानुबंध आला त्याविषयी तिकडील लोकांत पुष्कळ तपास करूनही काहीच पत्ता लागला नाही. फक्त असा एक उल्लेख आढळला की दोन अज्ञात ब्राह्मण राधाकृष्ण स्वामींच्या भेटीस आले होते व तसा त्यांना पूर्वदृष्टान्तही झाला होता. त्या दोन व्यक्तींच्या नावांचा मुळीच पत्ता लागत नाही. असो.

राधाकृष्ण स्वामींच्या चरित्राशी संबंध असणारी पण आतापर्यंत अज्ञात असलेली, आणि ज्यामध्ये महाराजांचा ऋणानुबंध आलेला आहे अशी घटना पुढीलप्रमाणे आहे.

राधाकृष्ण स्वामी त्या वेळी माहुलीस राहत होते. त्यांचे वास्तव्य गावाबाहेरील मठात होते. हा मठ बहुधा त्यांचे गुरु शंकरस्वामी उपाख्य अखंडानंद यांचा असावा. राधाकृष्ण स्वामी त्या वेळी बरेच वयातीत असावेत. कारण त्यांना डोळ्यांनी नीट दिसत नव्हते. त्यांचा योगाभ्यास चांगला होता परंतु सविकल्पसमाधीच्या पुढे त्यांना जाता येत नव्हते. याबद्दल त्यांना नेहमी वाईट वाटे व तेथपर्यंत नेऊन घालणारा कोण भेटेल म्हणून त्यांच्या जिवाला तळमळ लागली होती. त्यांना कोणाकडून तरी कळले होते की नरसिंहसरस्वती स्वामी आहेत; त्यांची भेट होईल तर कार्यभाग साधेल. परंतु या वेळी महाराज एकसारखे फिरत होते. आळंदीत महाराज स्थिर होण्यापूर्वी वीस वर्षे अगोदर ही

हकीकत घडलेली आहे. महाराजांचे नाव ऐकल्यापासून त्यांची भेट कधी होईल या चिंतेत राधाकृष्ण स्वामी नेहमी असत. असे होता होता भाग्योदयाचा काळ जवळ आला. महाराज फिरत फिरत एके दिवशी दादा दांडेकर यांचेसह राधाकृष्ण स्वामी राहत होते त्या मठात मुक्कामास आले. मठात ज्या कोपऱ्यात महाराज उतरले होते त्याच्या समोरचेच अंगास राधाकृष्ण स्वामी पलंगावर निजले होते. विष्णु नावाचा एक शिष्य राधाकृष्ण स्वामींची चरणसेवा करीत होता. प्रहर रात्रीचा सुमार झाला. मठाबाहेर अगदी सामसूम झाली होती. त्या दिवशी मठात दादा दांडेकर व महाराज यांच्याशिवाय दुसरे कोणी उतारू नव्हते म्हणून अगदीच शांतता होती.

इकडे त्या गुरु-शिष्यांचा संवाद सुरू झाला. तो महाराज कोपऱ्यातून ऐकत आहेत हे त्यांच्या लक्षात आले नाही. दादा दांडेकर वयाने लहान म्हणजे फार तर १० वर्षांचे असतील. त्यामुळे तो संवाद त्यांच्याही लक्षात पुढे राहिला नाही. संवाद होता होता त्यांच्या नेहमीच्या विषयावर वाद सुरू झाला. विष्णु म्हणाला, "आपण कृपाळू होऊन इतके शिकविले तसे निर्विकल्पाची खूण दाखवावी." त्यावर राधाकृष्ण स्वामी म्हणाले, "मी इतर गुरूंसारखा नाही. मला येते तर खरोखरच शिकविले असते. पण काय करू ? मलाच मुळी येत नाही." अशी प्रश्नोत्तरे चालू असता नरसिंहसरस्वती स्वामी महाराज भेटत नाहीत म्हणून राधाकृष्ण स्वामींना वाईट वाटून त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. हे दृश्य पाहून महाराज करुणावंत झाले व असा योगायोग झाला की राधाकृष्ण स्वामीस झोप येऊन ते अर्धवट गुंगीतच विष्णूशी बोलू लागले. तेव्हा महाराज हळूच जागेवरून उठले व विष्णूपाशी जाऊन म्हणाले की, "मला थोडी तंबाखू द्या. तंबाखू वाचून फार अडते व नसली म्हणजे एक क्षण देखील जीव राहत नाहीसे होते." तेव्हा विष्णु म्हणाला की, "तंबाखू जवळ नाही. आपण गडबड करू नये. गुरुमहाराजांची झोपमोड होईल. मी पाहिजे तर पैसा देतो. गावात जाऊन विकत घ्यावी." तेव्हा अधिकच गडबड करून महाराज म्हणाले, "तुम्ही आणावी. माझा पाय उचलत नाही. गाव दूर आहे, बरे तंबाखू मिळाली नाही तर जीव घाबरा होईल व गडबड होऊन गुरुजी जागे होतील." शेवटी अशा पेचात सापडून विष्णू जाण्यास तयार झाला. जाताना त्याने महाराजांस सांगितले की, "निदान मी येईपर्यंत पाय चेपीत बसावे." तेव्हा 'बरे' म्हणून महाराजांनी अर्ध-निद्रिस्त राधाकृष्ण स्वामींचे पाय चेपण्यास सुरुवात केली व विष्णू गावात तंबाखू आणण्यास निघून गेला. इकडे राधाकृष्ण स्वामी मधूनमधून होकार देत काही बोलत होते. त्यांत महाराजांनी पुन्हा काही त्याचविषयी बोलणे काढून आपण त्यांची निर्विकल्प समाधी लावून दिली. काही वेळाने विष्णू परतला व

त्याने महाराजांस तंबाखू दिली. ती घेऊन लगेच अर्धी तोंडात टाकली आणि अर्धी पुन्हा उपयोगी पडेल म्हणून लंगोटीचे टोकास बांधून लगबगीने ते दादा दांडेकर यास म्हणाले, "चल रे दादा. आता येथे थांबून उपयोग नाही. आपल्यापासून दुसऱ्यास त्रास झाल्यावर तेथे राहण्यात काय मजा ?" असे म्हणून त्यांनी दादांना हाती धरून उठविले. विष्णूने आपण रात्रीचे जाऊ नये. बरोबर लहान पोर आहे वगैरे सांगितले. पण महाराजांनी ऐकले नाही व लागलीच ते मठांतून बाहेर पडले.

काही वेळाने राधाकृष्ण स्वामींची समाधी उतरून ते देहभानावर आले आणि आनंदातिशयाने पाय चेपणाऱ्या विष्णूस म्हणाले, "शाबास ! आज तूच माझा गुरू झालास. धन्य तू !" विष्णूस हे काहीच कळेना. तेव्हा स्वामींनी त्यास सांगितले, "आता पाय दाबतांना तूच मला युक्ती सांगितलीस व तिने माझी समाधी लागून मी आनंदात होतो. असे असून तू नाकबूल का होतोस ?" त्यावरून विष्णूने राधाकृष्ण स्वामींना समग्र हकीकत सांगितली. तेव्हा त्यांना कळले की ते नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज होते आणि आपल्यावर कृपा करून त्यांनी आपली ओळख दिली नाही. हे पाहून राधाकृष्ण स्वामींना फार वाईट वाटले. ते लगेच महाराजांच्या शोधार्थ निघाले. पण कित्येक वर्षे पत्ता लागला नाही. पुढे केव्हा भेट झाली वगैरेची माहिती नाही.

## ५. श्रीविष्णु महाराज, रहिमतपूर

श्रीराधाकृष्ण स्वामींच्या निर्विकल्प समाधीच्या गोष्टीतील विष्णू नामक शिष्यच पुढे विष्णू महाराज म्हणून प्रसिद्धीस आले. राधाकृष्ण स्वामींनी आपल्या निर्वाणीच्या अभंगात विष्णु महाराजांचा उल्लेख 'जगदुद्धारी' शिष्य असा केला आहे. विष्णू महाराजांचे चरित्र कोणातरी शिष्याने लिहिले असून ते अजून अप्रकाशित आहे. विष्णू महाराजांनी बरीच पद्यरचना केली असून ती अद्यापि छापली गेली नाही. यांचे पुष्कळ शिष्य आजही हयात असून एकाजवळ त्यांच्या अभंगांचा संग्रह आहे. राधाकृष्ण स्वामींच्या कृपेने महाराज व विष्णू महाराज यांची भेट झाली होती. यांनी महाराजांची आरती केली असून ती आळंदीस मठात रोज म्हणतात. या आरतीइतकी सुंदर आरती मराठीत दुसरी नाही असे अतिशयोक्ती न करता म्हणता येईल. सदर आरतीच्या शेवटच्या कडव्यात महाराजांची व त्यांची भेट झाली तो प्रसंग फार बहारीच्या शब्दांत वर्णन केला आहे.

**'राधाकृष्ण स्वामी कृपे । भेटी देसी यतिरूपे ।**
**निर्विकल्पे कवटाळितां । होय विष्णु दृश्य लोपे ॥'**

महाराज समाधिस्थ झाल्यावर विष्णू महाराज आळंदीस दर्शनाकरिता येऊन गेले होते. त्यांनी महाराजांवर अभंगात्मक रचना केली आहे. ते सहा अभंग खाली दिले आहेत. प्रत्येक अभंगाच्या समोर दिलेला अंक हा विष्णू महाराजांच्या अभंगसंग्रहातील अभंग क्रमांक आहे.

**अभंग क्रमांक ७०८**

चला पाहूं गुरुराज नरसिंह सरस्वती ।
निजभक्तां आत्मस्थिति देत सर्वस्व ती ॥ १ ॥
योगियांचा योगी पूर्ण अद्वय अचल ।
देही असोनि विदेहि तो नेणेंचि चंचळ ॥ २ ॥
सर्वकाळ स्वरूपस्थ निजानंदे डोले ।
अनन्यासी तारीतसे स्वानुभव बोले ॥ ३ ॥
दयानिधि अवतरे जग उद्धराया ।
उमगेना ज्याची लिला गातां शेषराया ॥ ४ ॥
राधाकृष्ण स्वामी कृपे ज्याची भेट होत ।
विष्णुमूर्ति भरला तो विश्वी ओतप्रोत ॥ ५ ॥

**अभंग क्रमांक ७१९**

सदोदित वस्ती ज्यांची अद्वय सदनीं ।
श्री विठ्ठल विठ्ठल गर्जत वदनीं ॥ १ ॥
तोच नरसिंह स्वामी सद्गुरु दयाळ ।
निजबोधें दवडीत दूर भवव्याळ ॥ २ ॥
निरापेक्ष शांत पूर्ण फिरे जनीं वनीं ।
निजानंदे डोलतसे सेवित उन्मनी ॥ ३ ॥
राधाकृष्ण स्वामी कृपे ज्याची गांठ पडे ।
विष्णुभक्ता ज्याचे यश वर्णाया आवडे ॥ ४ ॥

**अभंग क्रमांक ७२०**

नरसिंह सरस्वती । गुरुवर्य ब्रह्ममूर्ति ॥ १ ॥
करूं तयांसी नमन । करी स्वरूपी उन्मन ॥ २ ॥
जो कां पूर्ण जगदोद्धारी । पोचवीत निराधारी ॥ ३ ॥
तोडी निजा द्वैत दावीं । विष्णु राधाकृष्ण दावी ॥ ४ ॥

**अभंग क्रमांक ७२१**

अलंकापुरीत इंद्रायणी तटीं । समाधि गोमटी ज्याची पहा ॥ १ ॥
सकळांसी आम्ही सांगितलें गुह्य । सद्गुरु बाह्य अवलोका ॥ २ ॥

पौषशुक्लपक्षी पाहोनी पौर्णिमा । विश्वात्माचा आत्मा निजी ऐक्य ॥३॥
राधाकृष्ण स्वामी कृपें ध्याना येत । विष्णुभक्ता देत स्वात्मसुख ॥ ४ ॥

**अभंग क्रमांक ७२७**

विश्वाचें चालन ज्याचे सत्तें होत । विश्वीं ओतप्रोत भरला असे ॥ १ ॥
तोचि नरसिंह स्वामी गुरुराज । निर्विकार आज ब्रह्ममूर्ति ॥ २ ॥
अव्यय एकला संकल्पा वेगळा । अद्वय सकळां सुखरुप ॥ ३ ॥
राधाकृष्ण स्वामी प्रसादे भेटत । आत्माचि वटात विष्णुभक्ता ॥ ४ ॥

**अभंग क्रमांक ७२८**

अलंकापूर क्षेत्र पाहुनि पवित्र । व्यापक सर्वत्र तेथें वसे ॥ १ ॥
चला चला चला भाविक हो चला । सद्गुरु अचला पाहूं डोळा ॥ २ ॥
नरसिंह सरस्वती ज्याचे नाम । ठायींच अनाम यतिवर्य ॥ ३ ॥
पौष शुक्लपक्ष पौर्णिमा सुदीन । होय ब्रह्मीं लीन अद्वय जो ॥ ४ ॥
जग तारावया पूर्ण कृपानिधि । घेत जो समाधि आळंदींत ॥ ५ ॥
राधाकृष्ण स्वामी कृपा जयावर । भेटत सत्वर विष्णुमूर्ति ॥ ६ ॥

राधाकृष्ण स्वामींच्या या 'जगदुद्धारी' शिष्याने भजनमार्गाचा पुष्कळ प्रचार केला व नवे मठ स्थापन केले. शके १८२० (सन १८९८) च्या प्लेगमध्ये यांनी देह ठेवला. विष्णुमहाराजांची समाधी रहिमतपुरास आहे.

## ६. श्रीपादस्वामी, पुणे

श्रीपादस्वामी हे पुण्याला सदाशिवपेठेत श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांचे सासुरवाडीस म्हणजे दामले यांचे घरी राहत असत. श्रीपादस्वामींना लहाणपणी एक जिवावरचे दुखणे झाले. त्या काळच्या प्रचलित समजुतीप्रमाणे त्या दुखण्या-वर तोडगा म्हणून त्यांना संन्यास दिला. या वेळी श्रीपादस्वामींचे वय अवघे अठरा वर्षांचे असावे. तोडगा बरोबर लागू पडला व ते दुखण्यातून बरे झाले. पुढे त्यांनी आश्रमधर्म कडकडीतपणे पाळला पण त्यामुळे समाधान झाले नाही. ईश्वरी अनुग्रहाचा ओलावा काही वेगळाच ! अशा परिस्थितीत त्यांनी एकदोन वेळा जीव देण्याचा प्रयत्न केला. श्रीपादस्वामींची शरीरयष्टी व रूप दोन्ही चांगले होते. त्यामुळे त्यांच्यावर एकदोन वेळा विषप्रयोगही झाला. पण त्या सर्व संकटातून ते वाचले.

पूर्वभाग्याने महाराजांची व श्रीपादस्वामींची गाठ पडली. परमेश्वर भावाचा भुकेला. सत्पात्र पाहूनही तो प्रसन्न झाला नाही असे कधी झाले आहे काय ? महाराजांनी आपल्या नेहमीच्या प्रद्धतीप्रमाणे स्वत:बद्दलची माहिती श्रीपाद-स्वामींना कधीच दिली नाही. भाषणाच्या भरात "तुमची काय इच्छा आहे ?"

असे महाराजांनी श्रीपादस्वामींना विचारले. श्रीपादस्वामींना आपण कोणाशी बोलतो आहोत याची कल्पना नव्हती. प्रेमळ आणि वडील माणसाजवळ मन मोकळे करून बोलावे त्याप्रमाणे त्यांनी महाराजांस सांगितले की, ज्याप्रमाणे नामदेवाला पांडुरंगाचा सहवास होता व देव प्रत्यक्ष त्याच्याशी बोलत असे त्याप्रमाणे श्रीदत्तप्रभूचा प्रत्यक्ष सहवास असावा असे आपणास वाटते. पण ते आपल्या नशिबी कोठून असणार म्हणून त्यांना वाईट वाटले. त्यावर महाराज म्हणाले, "आम्ही हिमालयावर गुरूचे आश्रमात असता सहज कित्येक गोष्टींनी आमचे कान बाटत असत. परंतु आमचा स्वभाव असा छंदीफंदी पडल्यामुळे आमच्या हातून काही घडणे शक्य नव्हते. त्या वेळी जेणेकरून श्रीदत्तात्रेयांचा साक्षात सहवास होईल असा मंत्र आमच्या गुरूंनी आम्हांस सांगून ठेवला होता. आमच्या हातून तर काही झाले नाही, परंतु तुम्ही कराल असे वाटते. तुमचा आचार वगैरे मोठा संतोषकारक आहे. तुमच्या हातून ते होईल."

महाराजांनी सांगितल्याप्रमाणे श्रीपादस्वामींनी काही अनुष्ठान केले. त्यामुळे त्यांची इच्छा पूर्ण झाली. श्रीदत्तप्रभूंशी सहवास, भाषणे वगैरे होत असत. अर्थात् इतर लोकांना त्याची मुळीच कल्पना नव्हती. एखाद्या सामान्य संन्याशा-प्रमाणे त्यांनी उर्वरित आयुष्य काढले. देहत्याग करण्याची महाराजांकडून आज्ञा आल्यावर श्रीपाद स्वामींनी वैशाख शु॥ ९ रोज शुक्रवार शके १८२४ ला समाधी घेतली. श्रीपादस्वामींची समाधी पुण्यास ओंकारेश्वरावर आहे.

## ७. श्रीसच्चिदाश्रम स्वामी, लोणार

वऱ्हाडातील मेहकर तालुक्यात मेहकर पासून १४ मैलांवर लोणार या नावाचे एक गाव आहे. येथे खाऱ्या पाण्याचे मोठे सरोवर असून अखंड वाहणारी एक मोठी धार आहे. पुराणात लोणारचा उल्लेख 'विरज-क्षेत्र' या नावाने केलेला आढळतो. अखंड वाहणाऱ्या धारेला 'गंगा-भोगावती' असे म्हणतात. भगवान विष्णूंनी लवणासुर नावाच्या दैत्याचा संहार या ठिकाणी केला. त्यावरून या गावाचे नाव 'लोणार' असे पडले आहे. हे एक अत्यंत पवित्र क्षेत्र असून या स्थलाचे वर्णन 'विरज महात्म्य' या संस्कृत पोथीत आढळते. पुरातन काळी तेथे अठरा तीर्थे होती. त्यापैकी अनेक तीर्थांचा जीर्णोद्धार करणारे एक अधिकारी सत्पुरुष या ठिकाणी सुमारे ५७ वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांचे नाव श्रीसच्चिदाश्रम स्वामी असे आहे. या स्वामींचे चरित्र कै. यादव माधव काळे, वकील, बुलढाणा यांनी १९०३ साली प्रसिद्ध केलेल्या 'लोणारवर्णन' नामक लहानशा पुस्तकात आले आहे. त्यातील माहिती व काही स्वतः गोळा केलेली माहिती यांच्या आधारावर स्वामींचे चरित्र पुढे दिले आहे.

श्रीसच्चिदाश्रम स्वामींचे पूर्वाश्रमीचे नाव वासुदेव असे होते. पित्याचे नाव शिवराम व उपनाव भट होते. हे सावंतवाडी प्रांतातील आरोसी या गावचे राहणारे. हे काश्यप गोत्री चित्पावन कोकणस्थ दशग्रंथी वैदिक ब्राह्मण होते. स्वामी धिप्पाड बांध्याचे, दीर्घदेही व आजानुबाहू होते. त्यांचे पायास एक कोंब फुटला. त्याच्या व्यथेने व प्रपंचातील त्रासाने कंटाळून स्वामी काशीस जाण्याचा विचार करून पायीच आपल्या गावाहून निघाले. शके १७७८ म्हणजे सन १८५६ मध्ये ते लोणार येथे येऊन पोहचले. लोणारच्या लोकांनी त्यांना तेथील तीर्थ-महात्म्य सांगितले. एक महिना त्रिकाल धारेचे स्नान केल्यास व्याधिमुक्त व्हाल असे ग्रामस्थांनी सांगितल्यावरून स्वामींनी तेथेच राहून तसे केले व ते एक महिन्यात व्याधिमुक्त झाले. त्यामुळे त्यांची लोणार क्षेत्रावर फार श्रद्धा बसली. पुढे संकल्पाप्रमाणे काशीयात्रा करून ते घरी आरोसीला पोहचले. काही दिवसांनी त्यांची पत्नी निवर्तली. त्यांना दोन मुली होत्या. एक इंदूरला गोगटे यांचे घरी व दुसरी आरोसी येथे बर्वे यांचे घरी दिली होती. स्वामींना मुलगा नव्हता. अशा रीतीने कौटुंबिक पाशातून मुक्त झाल्यावर आधीच विरक्त असलेल्या त्यांच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले व ते पुन्हा काशीस गेले. तेथे त्यांनी स्वामी विष्णवाश्रम यांजपासून संन्यासदीक्षा घेतली. त्यांची संन्यासपट्टाची परंपरा पुढील-प्रमाणे आहे. अच्युताश्रम – वासुदेवाश्रम – विश्वेश्वराश्रम – विष्णवाश्रम आणि सच्चिदाश्रम.

संन्यास स्वीकारल्यावर स्वामी लोणारला भोगावती तीर्थाचे जवळ येऊन राहिले. भोगावतीचे स्नान, कुमारेश्वराची पूजा व वेदपठण यात त्यांचा सर्वकाळ जात असे. स्वामी अत्यंत निःस्पृह होते. स्वतःविषयी कोणास माहिती मिळू नये म्हणून ते फार दक्षता घेत. कधी कोणास त्यांनी आपला फोटो काढू दिला नाही, की राजकारणाबद्दल एक अक्षरही कोणाजवळ ते बोलले नाहीत. स्वामींच्या या तऱ्हेच्या वागण्यावरून यांच्याविषयी लोकांत असा समज होता की ते पेशवे राजघराण्यातील असून १८५७ सालच्या लष्करी क्रांतीची सूत्रे हलविणाऱ्या प्रमुखांपैकी ते एक होते. स्वामींकडे कित्येक वेळी रात्री अपरात्री धिप्पाड असे घोडेस्वार येत असत व त्यांचेबरोबर खलबत करून पहाटेपूर्वीच निघून जात. स्वामींच्या खांद्यावर एक मोठा घाव होता. तो शस्त्राचा असावा असे सांगतात.

महाराज वऱ्हाडांत फिरत असता लोणार येथे आल्याचे मागे सांगितलेच आहे. श्रीसच्चिदाश्रम स्वामींसारखे सत्पात्र पाहून महाराजांची कृपादृष्टी त्यांचेकडे वळली. महाराजांनी आपल्या स्वभावाप्रमाणे आपण कोण आहोत हे स्वामींना कळू दिले नाही. महाराजांनी त्यांना, "तुम्ही आम्ही गुरुबंधु आहोत." असेच सांगितले. स्वामींना योगाभ्यास शिकविण्याकरिता लोणार येथे ते जवळ जवळ

एक वर्ष राहिले होते. महाराजांना राहण्याकरिता तेथे जी जागा मठ म्हणून दिली होती ती लोणारमधील जुनी मंडळी दाखवितात. आज त्या जागेवर मठाचे एकही चिन्ह नसून ग्रामस्थांची घरे मात्र त्या जागेवर उभी आहेत. महाराजांनी सांगितलेल्या 'अंतरानुभव' या ग्रंथाचा अल्पपरिचय पूर्वी करून दिला आहे. लोणारहून जाताना महाराजांनी स्वामींना आज्ञा केली होती की बारा वर्षे दक्षिणेत जावयाचे नाही. ही मुदत संपल्यावर स्वामी दक्षिणेत फिरत फिरत आळंदीस गेले. यावेळी महाराज समाधिस्थ झाले होते. महाराजांच्या मठात गेल्यावर आपल्याशी गुरुबंधूचे नाते जोडून आपल्यावर कृपा करणारे खरोखर कोण होते हे स्वामींना तेव्हा कळले. त्यामुळे 'अरे, आपल्याला फसविले!' असे उद्गार स्वामींच्या तोंडून साहजिकच बाहेर पडले व महाराजांनी बारा वर्षे दक्षिणेत येऊ नकोस असे का सांगितले असावे याचा उलगडा झाला. स्वामींची महाराजांचे ठायी भक्ती होती. महाराज हे प्रत्यक्ष दत्तावतार आहेत अशी स्वामींची श्रद्धा होती हे अंतरानुभवांतील पूर्वी उद्धृत केलेल्या काही ओव्यांवरून दिसून येते. स्वामींची संन्यासपरंपरा जरी भिन्न होती तरी त्यांचे योगविद्येचे गुरू महाराजच होते. श्रीसच्चिदाश्रम स्वामींचे थोड्या दिवसांपूर्वी कैलासवासी झालेले एक शिष्य वे. शा. सं. अनंतबाबा कुऱ्हे यांनी महाराजांना पाहिले होते. सच्चिदाश्रम स्वामी जवळ जवळ ४० वर्षे लोणारला होते. त्यांनी फारसे शिष्य केले नाहीत. चातुर्मास्यात लोणारला राहून बाकीच्या काळात ते तीर्थयात्रा करीत असत. स्वामी स्वतः उत्तम कवि होते. त्यांनी १५–१६ ओवीबद्ध ग्रंथ रचले आहेत. आज ते सर्व अप्रकाशित आहेत. 'विरजमाहात्म्य' या पोथीवरून, लोणार येथील पुराणात सांगितलेली तीर्थस्थाने निश्चित करण्यात स्वामींना महाराजांचे मार्गदर्शन झाले होते.

साताराचे व्यायामाचार्य कै. दामोदर बळवंत भिडे उपाख्य 'भटजी' यांनी आपल्या आत्मवृत्तात स्वामींचा एक स्वानुभव वर्णन करून सांगितला आहे. रॅण्डसाहेबाच्या खुनानंतर भटजीवर पकड वारंट निघाल्यामुळे ते आपले घरदार सोडून पोलिसांना चुकवीत वऱ्हाडात मलकापूरला महाराजांच्या एका भक्ताकडे आले. पण तेथे सोय न लागल्यामुळे फिरत फिरत औरंगाबादेस गेले, व तेथून लोणारला श्रीसच्चिदाश्रम स्वामींचे दर्शनास आले. भटजी लोणारमध्ये रात्री पोचले. रात्र अंधारी व अपरिचित रस्ता. तेव्हा ठोकरा खात ते स्वामींच्या मठापाशी आले. "महाराज येथेच आहेत काय?" म्हणून भटजींनी विचारले. आतून सिंव्हासारखा आवाज आला. "होय, कोण आहे?" भटजी म्हणाले, "मी एक वाटसरू आहे. महाराजांचे दर्शनास आलो आहे." स्वामी म्हणाले, "इतक्या रात्री?" "होय." असे म्हणून भटजी पुढे झाले व त्यांनी स्वामींच्या

पायावर डोके ठेवले. कुशल प्रश्न विचारणे झाल्यावर भटजींनी काही खाण्यास मिळेल काय म्हणून चौकशी केली. तेव्हा स्वामी म्हणाले, "मजजवळ सत्तू आहे." "पाणी पाहिजे," असे भटजी म्हणाले. त्यावर स्वामी म्हणाले, "त्या कमंडलूतील पाणी घ्या." भटजी कमंडलूजवळ गेले पण कमंडलूत पाण्याचा एक थेंबही नव्हता. हे पाहून भटजी म्हणाले, "यांत पाणी नाही." त्यावर स्वामी म्हणाले, "आणा इकडे पाहू." कमंडलू हाती घेऊन स्वामी म्हणाले, "आई भोगावती, पांथस्थाला फार तहान लागली आहे." स्वामींनी असे म्हटल्याबरोबर कमंडलू पाण्याने भरून आला. भटजींनी ते पाणी घेऊन सत्तू कालविला व चार घास पोटात ढकलले. त्यांना कल्पनातीत आनंद झाला.

श्रीसच्चिदाश्रम स्वामींनी फारसे चमत्कार केले नाहीत. प्रकृति स्वास्थ्यामुळे स्वामींनी समाधीपूर्वी ७–८ वर्षे दंड विसर्जन केला. ज्येष्ठ शु॥ ६ शके १८२६ क्रोधीनाम संवत्सरे रविवार दिनांक १९–६–१९०४ रोजी दुपारी १२ चे सुमारास स्वामींनी इहलोकीची यात्रा संपविली. शिष्यमंडळींनी नंतर त्यांच्या पार्थिव देहाचे छायाचित्र घेतले. पुढे २०–२१ वर्षांनी स्वामींच्या शिष्यांनी त्यांचे समाधिमंदिर लोणार येथेच बांधले.

## ८. श्रीमंत सरदार तात्यासाहेब रायरीकर, पुणे

इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणाऱ्या व देशाच्या स्वातंत्र्यासाठी आयुष्यभर तळमळणाऱ्या या सरदाराचा आजच्या स्वतंत्र भारताला अगदी विसर पडला आहे. तात्यासाहेबांचे नाव चिंतो विठ्ठल असे होते. त्यांच्या एका पूर्वजाने देशद्रोह केला होता. त्या पूर्वजाचे व यांचे नाव एकच होते. त्यामुळे ती गोष्ट यांच्या अंतःकरणात नेहमी सलत असे. पूर्वजांच्या कृत्यामुळे कुलाला लागलेला कलंक धुवून टाकण्याचा तात्यासाहेबांनी निश्चय केला. ऐहिक ऐश्वर्याचा व सुखाचा त्याग करून त्यांनी घोर तपश्चर्या केली. हिंदुस्थान इंग्रजांचे अंमलाखाली आहे तोपर्यंत एका भुइमुगाशिवाय दुसरा कोणताच पदार्थ तोंडात घालावयाचा नाही अशी त्यांनी प्रतिज्ञा केली. नरहरस्वामी नावाच्या एका सत्पुरुषाच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काही विशेष अनुष्ठान केले. जगदंबेची कृपा होऊन त्यांना एक खड्ग मिळाले. पण त्याचा उपयोग करण्याची वेळ निघून गेली होती. पुढे नरहरस्वामी समाधिस्थ झाल्यावर तात्यासाहेबांच्या मनातील तळमळ तशीच कायम राहिली. कोणातरी प्राप्त पुरुषाची आपल्यावर कृपा व्हावी असे तात्यासाहेबांना वाटू लागले. या मार्गात अनेक बऱ्यावाईट लोकांचा अनुभव घेतल्यावर योगायोगाने त्यांची व महाराजांची गाठ पडली. महाराजांचे ठायी तात्यासाहेबांची भक्ती हळूहळू वाढू लागली. महाराज त्यांचेकरिता अनेक वेळा पुण्यास येऊन राहत असत.

महाराजांची भेट झाल्यावरही त्यांचे तपाचरण पूर्ववत चालू होते. आयुष्याचा शेवट जवळ आला असे त्यांना वाटावयास लागले, तेव्हा त्यांनी संन्यास घेण्याची इच्छा दर्शविली. महाराजांनी त्यांना संन्यासदीक्षा दिली. प्रसाद म्हणून महाराजांनी एका चमच्यात थोडे दूध घेऊन ते तात्यासाहेबांच्या तोंडाशी नेले. तात्यासाहेबांना अतिशय दु:ख झाले व त्यांनी आपल्या घोर प्रतिज्ञेची महाराजांना आठवण करून दिली तेव्हा महाराज म्हणाले, "मला माहीत आहे. परंतु तात्यासाहेब, तुम्ही आता नारायणरूप झाला आहात. रागद्वेष टाकून द्या." तेव्हा तात्यासाहेबांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. मोठ्या आवेशाने ते महाराजांस म्हणाले, "महाराज, असे असेल तर हा तुमचा संन्यास मला नको. तो आपला परत घ्या कसा? माझे व्रत पूर्ण झालेच पाहिजे." इतके बोलून तात्यासाहेबांनी दूध घेण्याचे नाकारले. तेव्हा महाराज मोठ्या संतोषाने म्हणाले की, "तात्यासाहेब, तुमची धन्य आहे! तुमचे व्रत पूर्ण झाले. तुमच्या हातूनच हे कार्य पुढे होईल. आता हा प्रसाद घ्या." तात्यासाहेबांची महाराजांवर फार निष्ठा होती. महाराजांनी दिलेल्या आश्वासनाने त्यांना फार समाधान झाले व त्यांनी 'नारायण' म्हणून प्रसाद घेतला. महाराजांना फार आनंद झाला व त्यांनी तात्यासाहेबांची फार प्रशंसा केली. या प्रसंगी श्रीअण्णासाहेब पटवर्धन हे उपस्थित होते व थोड्याच वेळाने पुढे श्री. यशवंतराव महाराज देवमामलेदार हेही तेथे आले होते. पुढे तीन दिवसांनी तात्यासाहेब इहलोक सोडून गेले. ओंकारेश्वरावर नरहरस्वामींच्या समाधीजवळच तात्यासाहेबांची समाधी आहे.

## ९. श्रीभक्त भाऊसाहेब गणपुले, धुळे

यांचे पूर्ण नाव बाळाजी वामन गणपुले असे होते हे मुलकी खात्यात नोकर होते. खानदेशात एदलाबाद येथे महालकरी म्हणून काम करीत होते. तेथे नोकरीवर असता महाराजांची गाठ पडली. महाराजांनी त्यांच्यावर अनुग्रह करून त्यांना कृतार्थ केले. एदलाबादेस तापी पयोष्णि संगमावर महाराज आले होते. तेथे एका औदुंबर वृक्षाखाली महाराज राजशाही पोषाख करून पाय खाली सोडून बसले आहेत असे चित्र भाऊसाहेबांनी काढविले होते. या वेळी महाराजांचा चेहरा तारुण्यसंपन्न असा दिसत होता. महाराजांनी भाऊसाहेबांना श्रीदत्ताची उपासना दिली होती. भाऊसाहेब हे विद्वान, कर्मठ व चांगले उपासक होते. त्यांचा स्वभाव अत्यंत तापट व शिस्तही फार कडक होती. यांचा चेहरा अत्यंत उग्र होता. प्रपंचात राहूनही भाऊसाहेबांनी परमार्थ उत्तम प्रकारे साधून घेतला होता. त्यांना मूलबाळ काहीच नव्हते. असे असता एखाद्या मुलास दत्तक घेऊन आपल्या मालमत्तेस त्यांनी वारसदार केले नाही. दत्तकपुत्र चांगला निघाला तर सुदैव, नाही तर कष्ट करून संपादन केलेली मालमत्ता अल्पकाळात उडवून

व्यर्थ गेल्याची अनेक उदाहरणे त्यांच्या डोळ्यासमोर होती. म्हणून एखाद्या मुलास दत्तक घेण्याच्या भानगडीत न पडता अव्यंग, अव्यय व सर्व मनोरथ पूर्ण करणारा परमात्मा यासच दत्तक घेण्याचे त्यांनी मनात योजिले. धुळ्यास खोलगल्लीत पश्चिमेकडील दुसऱ्या ब्लॉकमध्ये एक दुमजली घर बांधले व आपले उपास्य दैवत श्रीगुरुदत्तात्रेय यासच त्यांनी आपल्या सर्वस्वाचे मालक करून ठेवले. राहत्या घरात त्यांनी लहानसे दत्तमंदिर बांधून घेतले. महाराजांचे ध्यान योग्य रीतीने करता यावे म्हणून एक तैलचित्र, महाराजांच्या प्रत्यक्ष आकारा-एवढे मोठे, रंगवून ठेवले होते. आज हे तैलचित्र त्या दत्तमंदिरांतील उजव्या बाजूच्या एका खोलीत ठेवलेले आढळते.

महाराजांचा व यांचा पत्रव्यवहार होता, त्या पत्रात हल्लीच्या महाराजांच्या मठाचे काम सुरू झाल्यावर किती काम झाले व कोणकोणते काम व्हावयाचे राहिले याचा उल्लेख आढळतो. एका पत्रात आळंदीच्या मठात लावण्याकरिता औदुंबर वृक्ष मिळाला तर त्याचा रोपा एका कुंडीत जतन करून ठेवण्याविषयी लिहून आल्याचे सापडले. भाऊसाहेबांची महाराजांचे ठायी फार निष्ठा होती. आपल्या मालमत्तेस व्यसनी, दरिद्री व अल्पायुषी वारस न करता श्रीदत्तात्रेयास आपल्या मिळकतीचे वारस करण्यात भाऊसाहेबांनी आपल्या जन्माचे सार्थक केले हे खास !

महाराज समाधिस्थ झाल्यावर संस्थान करण्याचा जो ठराव झाला त्यावर भाऊसाहेबांची सही आहे. पहिले पंचमंडळ स्थापन झाले त्यात भाऊसाहेब हे एक सभासद होते. महाराजांनी यांना दिलेल्या स्वप्न–मंत्रोपदेशाची हकीकत महा-निर्याण या प्रकरणात पूर्वी आली आहे.

## १०. श्रीभक्त दादा दांडेकर

महादेव अनंत उपाख्य दादा दांडेकर हे महाराजांच्या सहवासात फार लहानपणापासून आले होते. यांचे वडील कोकणांतील दाभोळ जवळील गुडघे या गावचे होत. अनंतराव यांना एक मुलगा झाला. घरची अत्यंत गरिबी व नाते-वाईकांचा त्रास, अशा परिस्थितीला कंटाळून अनंतराव आपली पत्नी व मुलास घेऊन देशावर नशीब काढण्यास निघाले. धौम महाबळेश्वराचे जंगलातून जाताना पतिपत्नींनी आत्महत्त्या करण्याचा विचार केला. चार महिन्याच्या अर्भकास एका झाडाच्या पारावर ठेवून जवळच्या तळ्यावर जीव देण्याकरिता ते दोघे गेले. अगोदर जीव कोणी द्यावा याविषयी त्यांच्यात वाद उत्पन्न झाला. महाराज फिरत फिरत नेमके ते बालक ज्या झाडाखाली होते तेथे येऊन पोचले. मुलास उचलून घेऊन त्याच्या आईबापांचा शोध करीत तळ्यापाशी आले. त्यांची

हकीकत विचारून घेतल्यावर महाराजांनी त्यांना जीव देण्याच्या विचारापासून परावृत्त केले व 'कल्याण होईल' असा आशीर्वाद देऊन त्यांना घरी परत पाठविले. अनंतराव यास दम्याची व्यथा होती. अनंतरावांच्या पत्नीने दम्याबद्दल याच वेळी महाराजांजवळ तक्रार केली. तेव्हा महाराज म्हणाले, "जर दुसरा कोणी हा दमा घेईल तर अंतूभटजीचा विकार जाईल." तेव्हा त्यांच्या पत्नीनेच अनंतरावांचा दमा घेतला व अनंतराव त्यांतून बरे झाले. मूल परत करताना महाराज त्यांना म्हणाले, "हा आमचा मुलगा आहे. तुम्ही यास वाढवा." याची मुंज झाली की याला आम्ही घेऊन जाऊ." अनंतराव घरी परत गेले. महाराजांनी दिलेल्या आशीर्वादाने त्यांचे भाग्यच पलटून त्यांना चांगले दिवस आले. यथा-काली अनंतरावांनी त्या मुलाची मुंज केली. पुढे सुमारे चार महिन्यांनी सांगितल्याप्रमाणे महाराज अचानक आले व त्या मुलास बरोबर घेऊन गेले. हा मुलगा म्हणजेच दादा दांडेकर होत.

दादा महाराजांच्या सहवासात सुमारे बारा वर्षे होते. त्यामुळे महाराजां-बरोबर पुष्कळ प्रवास घडून महाराजांच्या अनेक लीला पाहण्याचे भाग्य दादांना लाभले. बारा वर्षांचा काळ संपल्यावर महाराजांनी त्यांना गृहस्थाश्रम स्वीकार-ण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे विवाह करून दादांनी पुढे वऱ्हाडात शाळाखात्यात शिक्षकाची नोकरी धरली. यांच्या अनुभवाच्या काही गोष्टी मागे सांगितल्या आहेत. वऱ्हाडात नोकरी करीत असता लीवॉर्नर साहेब व यांचा तंटा होण्याचा प्रसंग आला. त्यावेळी दादा दारव्हाजवळील लाडखेड या गावी शिक्षक होते. एकदा दादा शिकवीत असता महाराज थेट शाळेतच आले व टेबलावर पाय टाकून तंबाखू खात बसले. त्याच वेळी अचानकपणे लीवॉर्नर साहेब शाळेत येऊन पोचले. साहेबास पाहून महाराज उठले तर नाहीतच पण हसत हसत तंबाखू खाऊ लागले. या दृश्याने साहेब मजकुराचा पारा चढला व तो रागाने महाराजांस काही तरी अपमानकारक बोलला. दादांना ते सहन न होऊन त्यांनी टेबलावरील रूळ उचलला व तो त्यांनी साहेबावर उगारला. साहेब या प्रकाराने चांगलाच नरमला व त्याने तेथून पाय काढला. मुक्कामावरून दादांना साहेबाचे बोलावणे आले, तेव्हा नोकरी जाणार हे तर दादांना उघड दिसत होते. महाराजांची आज्ञा घेऊन दादा साहेबास भेटावयास गेले. साहेबाच्या भेटीत अपेक्षेच्या अगदी उलट झाले. साहेबांनी दादांना पोलीस खात्यात नोकरी देतो म्हणून सांगितले. दादांना या गोष्टीने फार आनंद झाला. पण कोणतीही गोष्ट महाराजांना विचारल्याशिवाय करावयाची नाही असे दादांचे व्रत होते. महाराजांना दादांनी पोलीस खात्यातील नोकरीसंबंधी विचारताच महाराजांनी ती गोष्ट साफ उडवून दिली. त्यामुळे दादांना जन्मभर शिक्षकाच्या नोकरीतच राहावे लागले.

महाराजांनी दादांना ध्यानयोग शिकविला होता. स्वतः अनुग्रह देऊन त्यांना उपासनेसही लावले होते. महाराजांच्या कृपेच्या जोरावर त्यांनी आपली संसारयात्रा चालविली होती. अण्णासाहेब पटवर्धन व दादा यांचा संबंध गुरु-बंधूसारखा होता. प्रज्ञावर्धन स्तोत्राच्या दुरुस्तीच्या प्रसंगापासून अण्णासाहेब दादांना गुरुस्थानी मानीत होते.

महाराजांनी कृपावंत होऊन आपली स्वतःची एक लंगोटी, त्यांच्या सहीची चांदीची सीलची मुदी व खास त्यांचे हाताने लिहिलेला त्यांच्या नावाचा महामंत्र, इतक्या वस्तू दादांना दिल्या होत्या. याशिवाय महाराजांचे हात ज्याला लागले आहेत अशा दोन वस्तू, म्हणजे पाच रुपये व चांदीचे दोन कडे, दादांना मिळाल्या होत्या. आजही त्या सर्व वस्तू दादांच्या नातवाजवळ अमरावतीस असून त्या पूजेत ठेवल्या आहेत. महाराजांनी आपली लंगोटी दादांना 'सहेतुक व साभि-प्रायपणे' दिली होती असे सांगतात. अंतकाळी दादा आळंदीस जाऊन राहिले होते व तेथेच त्यांनी महाराजांच्या चरणी देह ठेवला.

## ११. श्रीभक्त श्रीधरपंत, पोष्टमास्तर

यांच्याविषयी फार थोडी माहिती मिळते. महाराजांच्या शिष्यपरिवारातील हे एक झाकले माणिक होते. श्रीधरपंत चांदवड जवळील एका खेड्यात राहणारे. हे जातीने विदुर होते. शरीराने सुदृढ व वर्णाने निमगौर. हे दृढनिश्चयी व पूर्ण-पणे विरक्त होते. पोष्टखात्यात नोकरीस असल्यामुळे यांना अनेक ठिकाणी वास्तव्य करण्याचा योग आला. यांची व महाराजांची केव्हा भेट झाली व महाराजांचा त्यांच्यावर अनुग्रह केव्हा झाला हे कळण्यास मार्ग नाही. धुळ्याचे श्रीबोवासाहेबांना मात्र हे महाराजांचे अनुग्रहीत असल्याचे निश्चितपणे माहीत होते.

योगायोगाने यांची बदली धुळ्यास झाली. श्रीबोवासाहेब यांचे गुरुबंधु असल्यामुळे साहजिकच ते बोवासाहेबांकडे राममंदिरात आले. बोवासाहेबांनी त्यांना दुसरीकडे न राहता महाराजांचा प्रसाद घेऊन श्रीराममंदिरातच राहण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्रीधरपंतांनी बोवासाहेबांच्या म्हणण्यास रुकार दिला. बोवासाहेबांच्या येथील प्रसादाचा थाटमाट पाहून विरक्तवृत्तीच्या श्रीधर-पंतांना ती गोष्ट आवडली नाही व त्यांनी सहा महिन्यातच आपली बदली दुसरीकडे करून घेतली.

श्रीधरपंत विवाहित असून त्यांना एक मुलगी होती. पत्नी लवकरच वारली आणि मुलीला दुर्दैवाने बाळपणी वैधव्य प्राप्त झाले. अशा परिस्थितीत महा-राजांची भेट झाली असता श्रीधरपंतांनी त्यांना विनंती केली की "आता ही

नोकरी कशाकरिता आणि कोणाकरिता करावयाची ? सबब नोकरी सोडून आपले सहवासात सेवा करून आयुष्य घालवावे अशी इच्छा आहे." ह्यावर महाराज म्हणाले, "ही नोकरी म्हणजे आमचीच सेवा आहे. तुला हीच नोकरी केली पाहिजे." महाराजांचे आज्ञेप्रमाणे श्रीधरपंतांनी तहहयात पोष्टातील नोकरी केली, परंतु महाराजांची सेवा म्हणून केली. ती कशी, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. याचे उत्तर असे की सेवा महाराजांची तर नोकरीतून मिळणारा पगार हाही महाराजांचाच. या श्रद्धेमुळे पहिल्या तारखेला पगार हातात पडल्याबरोबर तो मनीऑर्डरने आळंदीस महाराजांकडे रवाना करावयाचा. आळंदीस महाराजांनी श्रीज्ञानेश्वरासमोर दररोज रात्री भजन करण्याचा उपक्रम सुरू केला होता. हातात तंबोरी घेऊन महाराज स्वत: भजन करीत असत. सुरुवातीला भजनास लोक जमत नसत हे पाहून महाराजांनी भजन समाप्त झाल्यावर प्रसाद म्हणून मिठाई वाटण्यास सुरवात केली. या कार्यक्रमात खंड पडत नसे. पण एखादे वेळी गर्दी इतकी व्हावयाची की प्रसाद पुरत नसे. अशा वेळी जवळच्या हलवायाच्या दुकानातून लक्ष्मणबोवा गांधी किंवा दत्तोपंत आठवले तयार असलेली मिठाई घेऊन येत व प्रसादाची पूर्तता करीत. महाराज त्या वेळी सांगत असत की मिठाईच्या उधारीचे पैसे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दिले जातील, व त्याप्रमाणे, श्रीधरपंतांकडून वर सांगितल्याप्रमाणे पगाराची मनीऑर्डर आली की हलवायाचे पैसे दिले जात. त्यामुळे, दुकानदारांची व आळंदीकरांची महाराज हे पूर्वाश्रमी नोकरीत असले पाहिजेत व विशेषेकरून सरकारी पेन्शनर असले पाहिजेत अशी गैरसमजूत झाली होती. सरकारी पेन्शनर असल्याशिवाय इतक्या नियमितपणे पैसे येणे कसे शक्य आहे ? दर महिन्याचा पगार महाराजांकडे रवाना केल्यावर मग स्वत:स लागणारा खर्च कोठून करावयाचा ? त्यावेळी, पोष्टकार्ड, पाकिटे वगैरेंचा खप वाढावा म्हणून पोष्टमास्तरांस एका रुपयामागे एक दिडकी कमिशन सरकारने ठेवले होते. या कमिशनवर श्रीधरपंत आपला उदरनिर्वाह करीत असत. महिन्याकाठी ३–४ रुपये कमीशनचे मिळावयाचे व ते त्यांना मासिक खर्चास त्या काळाच्या मानाने पुरत असत. अशा स्थितीत श्रीधरपंत असता त्यांची मुलगी वारली. म्हणून हे माध्यान्ही दोन चानक्या कशा तरी भाजून पोटपूजा करीत असत. श्रीधरपंतांची नोकरीची शेवटची सात आठ वर्षे खानदेशात सावदे येथे गेली. तेथे पोष्ट ऑफीसच्या वर असणाऱ्या माडीतच ते राहत असत. त्या वेळी श्रीकृष्ण बल्लाळ जामखेडकर हे सावद्यास राहात असत. यांच्याविषयीची हकीकत मागे आली आहे. हे दोघेही महाराजांचे परमभक्त. महाराजांची लीला अशी विलक्षण की या दोघांना आपण गुरुबंधु आहोत ही जाणीव अखेरपर्यंत होऊ दिली नाही. तसे महाराजांविषयी भाषण

किंवा गप्पागोष्टी या दोघांच्या नेहमीच चालत. योगायोग असा की महाराज समाधिस्थ झाले त्या दिवशी या दोघांच्या मनास विलक्षण अस्वस्थता वाटून एक प्रकारचा धक्का बसला व त्याप्रमाणे दोघांनीही एकमेकांजवळ बोलून दाखविले. पुढे दोन तीन दिवसांनी महाराज समाधिस्थ झाल्याची वार्ता त्यांना कळली व त्या दोघांनी स्नाने केली. तेव्हा कोठे दोघे गुरुबंधु असल्याचे त्यांना समजले.

श्रीधरपंतांच्या मनात महाराजांचे एक छायाचित्र आपल्याजवळ असावे असे होते. परंतु त्या काळात छायाचित्र तयार करून घेण्यास फार खर्च पडत असे. म्हणून श्रीधरपंतांचे विनंतीवरून महाराजांनी आपले हस्ताक्षर दोन ठिकाणी लिहून त्यांना दिले होते. त्या हस्ताक्षराचीच श्रीधरपंत रोज पूजा करीत असत. श्रीधरपंतांना दिलेल्या हस्ताक्षरामुळे ते इतरांना पाहण्याचे भाग्य लाभले आहे.

इ. स. १८९१ साली श्रीधरपंत व श्रीकृष्ण बल्लाळ जामखेडकर हे दोघेही बरोबरच आळंदीस महाराजांच्या पुण्यतिथीस गेले होते. श्रीधरपंतांचे वैराग्य पराकोटीचे होते. ढेकूण डसावयास लागल्यास अंगावरील वस्त्र बाजूला ठेवून ते ज्ञानेश्वरी वाचत बसावयाचे. पण हातून हत्या मुळीच होऊ द्यावयाचे नाहीत. याप्रमाणे श्रीधरपंतांनी जीवन्मुक्त स्थितीत आयुष्य काढले. आळंदीहून परत येतांना श्रीधरपंत मनमाड येथे उतरून आपल्या गावी गेले. तेथे त्यांना नवज्वर झाला व त्या आजारातच त्यांनी महाराजांच्या चरणी देह ठेवला.

## १२. श्रीआपदेव महाराज, नागपूर

श्रीअण्णासाहेब आपदेव या नावाचे एक राजयोगी सत्पुरुष नागपूरला होऊन गेले. यांचा जन्म सिद्धार्थ संवत्सरात शके १७८१ मध्ये झाला. हे गृहस्थाश्रमी होते. यांचे गुरू लक्ष्मणनाथ महाराज. गुरूचे आज्ञेवरून हे काही काळ आळंदीस येऊन महाराजांजवळ राहिले होते. महाराजांची सेवा करून कृपा संपादन केल्यावर हे परत गेले. महाराजांनी यांचे नाव 'गुलाम अण्या' असे ठेवले होते. नागपूरला श्रीआपदेव महाराजांनी 'श्रीज्ञानमंदिर' या नावाची एक संस्था स्थापन केली होती. आज ते मंदिर अस्तित्वात नाही. यांचे वास्तव्य पुढच्या काळात कधी नागपूरला तर कधी चांद्यास असावयाचे. शेवटी हे चांद्यास श्रीमंत वासुदेवराव सराफ या शिष्याचे घरी असता वैकुंठवासी झाले.

महाराजांनी श्रीआपदेवांना पाच अभंग करून दिले होते. त्या अभंगांना 'लखोटचाचे अभंग' असे म्हणतात. श्रीआपदेवांनी हे अभंग अर्थटीपांसह सुमारे चाळीस वर्षांपूर्वी पुस्तकरूपाने छापून प्रसिद्ध केले होते. सदर पुस्तक आज दुर्मिळ असल्यामुळे अभंग तेवढे पुढे दिले आहेत.

## लखोट्याचे अभंग

अभंग १

म्हणती ब्रह्म दावी नयनी । ऐसा गुरु नाहीं जनीं ॥ १ ॥
ते मूढ वेषासी भुलले । शरण जावोनी नाडले ॥ २ ॥
पाहुनी दंभ शास्त्र मते । म्हणती लाभेल ते येथें ॥ ३ ॥
म्हणे नृसिंह सरस्वती । ऐशा भ्रमे बुडले किती ॥ ४ ॥

अभंग २

जारे व्हा व्हा शरण तया । भुलता का सोंगा वाया ॥ १ ॥
खऱ्या गुरुसी शरण गेले । ब्रह्म तयासी लाधले ॥ २ ॥
रक्त श्वेत कृष्णी नीळ । दावी श्री गुरुकृपाळ ॥ ३ ॥
पूर्व पश्चिम दावुनी मार्ग । करी देहोचि श्रीरंग ॥ ४ ॥
म्हणे नृसिंह सरस्वती । झाले मुक्त याचि रिती ॥ ५ ॥

अभंग ३

ब्रह्म संपत्तिचे धनी । दंभ नेणती ते स्वप्नी ॥ १ ॥
वेष पडतांही पाया । ने घेतीची मुक्त तया ॥ २ ॥
असोनि संसारी जनवत । होऊनी भोगिती भगवंत ॥ ३ ॥
आल्या शरण करिती कृपा । पूजा नेणती जपातपा ॥ ४ ॥
म्हणे नृसिंह सरस्वती । तेचि सद्‌गुरु निश्चिती ॥ ५ ॥

अभंग ४

जेथे दंभ वेष तेथे । न वसेची ब्रह्म ते ते ॥ १ ॥
जाय तेहि वाया कृपा । ऐसा घातक दंभ बापा ॥ २ ॥
जेथे नाही दंभ सोंग । वसे तेथेचि श्रीरंग ॥ ३ ॥
तया आतांचि शरण । जारे नका खोवूं क्षण ॥ ४ ॥
म्हणे नृसिंह सरस्वती । व्हा व्हा शरण तयाप्रती ॥ ५ ॥

अभंग ५

नव्हता उपदेशा पात्र । शिष्या देऊं नये मंत्र ॥ १ ॥
आल्या शरण पूजनें । स्वीकारावे समर्पणे ॥ २ ॥
आधी लावावे सेवनी । घ्यावा चोख परिक्षुनी ॥ ३ ॥
धर्म करवावे श्रवण । वळता संप्रदाया पूर्ण ॥ ४ ॥
करी आज्ञेचें वर्तन । अर्पी देह जीव प्राण ॥ ५ ॥
होऊनियां अहर्निशी । सबाह्य श्रीगुरुची दासी ॥ ६ ॥

नीच सर्व करी दास्य । मग द्यावा उपदेश ।। ७ ।।
सांगे नृसिंह सरस्वती । संतो उपदेशाची रीती ।। ८ ।।

श्री आपदेवांनी महाराजांवर अभंग, पदे, आरती इत्यादि काव्यरचना केली आहे. त्यापैकी काही वानगीदाखल पुढे दिली आहे.

अभंग १

जेणें बोलविले सिद्ध । शिपियाच्या मुखें वेद ।। १ ।।
दाविला सोन्याचा पिंपळ । उठविले मृत बाळ ।। २ ।।
कुष्टी मुक्तकुष्ट केला । कोण वर्णी त्याची कळा ।। ३ ।।
ऐसा नृसिह सरस्वती । सद्‌गुरु श्रीमदार्ण्णी चित्ती ।। ४ ।।

अभंग २

कीर्ति स्वामीची ऐकोनि । झालो उताविळ मनी ।। १ ।।
आलों शरण महाराजा । भेटवावे ज्ञानराजा ।। २ ।।
नित्य वश तुम्हां प्रति । ऐसी जगीं तुमची ख्याति ।। ३ ।।
अहो नृसिह सरस्वती राया । शिवरूपा दत्तात्रेया ।। ४ ।।

पद १ (ताल–पंजाबी ठेका)

नको प्रणता । तुज कारण देव मता ।। धृ० ।। होतो वदलो शिष्या रे तव कल्याणार्थ तुज उपाय । देईल दर्शन षण्मसातची श्रीज्ञानेश्वर गुरुराय ।। १ ।। ज्ञानेशे तुज देऊन दर्शन दाखविला निज ठाय । गुरुसेवेविण जपतप दासा न लगेचि शिणसी काय ।। २ ।। ज्ञानेशे श्रीमदार्ण्णा कृपा केली तुजवरि धाय । जाण भोगिशी करिशी ते गुरुपूजन होईल जाय ।। ३ ।। संसारीचि ज्ञानेश्वर गुरु सेवी यासचि गाय । सार वदे गुरुसेवन हेचि नृसिह सरस्वति राय ।। ४ ।।

पद २ (जल्द–तिताला)

नमन नृसिह सरस्वती चरणा । सतत करी भज दत्त दिगंबर तारकपद नत जन उद्धरणा ।। धृ० ।। प्रकटत ताराया प्रिय रतरत । कलिमल यम भय तम निस्तरणा ।। १ ।। सेवीं नित्य मनोभ्रमरा मम । हेचि हरी अघ संसृति मरणा ।। २ ।। ज्ञानराऽज निज वरदीं अक्षय । विहरी याचि करी अनुसरणा ।। ३ ।। श्री मदार्ण्णं निज वरद कृपाघन । सुरमुनि हरणां ।। ४ ।।

## १३. श्रीभक्त बापूसाहेब गाडगीळ

यांचे संपूर्ण नाव जनार्दन सखाराम गाडगीळ असे होते. हे बडोद्यास हायकोर्ट जज्ज होते. बापूसाहेबांचे कुटुंब वारल्यावर त्यांचे मनात आपण पुर्नविवाह का करू नये असे विचार येऊ लागले. त्या संबंधात पुष्कळ शंका कागदावर लिहून घेऊन ते आळंदीस महाराजांकडे येण्यास निघाले. त्या काळी पुण्याहून

आळंदीस जाण्याकरिता मोटारी नव्हत्या म्हणून बापूसाहेब घोड्याच्या शिग्रामात बसून आळंदीस आले.

महाराजांच्या येथे चक्रांकित यांचे माडीवर रोज श्रीज्ञानेश्वरीवर प्रवचन व्हावयाचे. प्रवचन चालू असता श्रोत्यांच्या मनात काही शंकाकुशंका असल्यास त्याबद्दल खुलासा महाराज प्रवचनाच्या ओघांतच करून टाकीत. कोणास महाराजांना विचारण्याची वेळच येत नसे. बापूसाहेब आळंदीस आले त्या वेळी नेहमीप्रमाणे प्रवचन चालू होते. बापूसाहेब माडीवर आले व पाहतात तो माडी श्रोत्यांनी गच्च भरलेली. शिष्टाचारास धरून त्यांना कोणी या, बसा असे म्हटले नाही. बापूसाहेब एका कोपऱ्यात बसले. महाराजांनी बोलता बोलता श्रोत्यांना म्हटले, "आजचा विषय सर्वांनी नीट ऐकावा, कारण वातावरण निराळे होत चालले आहे" महाराजांच्या या उद्गारावरून श्रोत्यांना काहीच बोध होईना. महाराजांनी, पुनर्विवाह न करता लग्नच केले पाहिजे, याबद्दल शास्त्राधार दाखवून थोडी चर्चा केली. थोड्या वेळाने प्रवचन संपले. सर्व मंडळी महाराजांना नमस्कार करून आपापल्या घरी निघून गेली. शेवटी बापूसाहेब महाराजांना नमस्कार करण्यास पुढे झाले तेव्हा महाराजांनी विचारले, "बापूसाहेब तुम्ही केव्हा आलात ? तुम्ही खिशात जे काही लिहून आणले आहे ते काढा. त्याचा आता आपण विचार करू." त्यावर बापूसाहेब, म्हणाले, "महाराज मी पोथी चालू असतानाच आलो. माझ्या मनातील शंकेचे निरसन झाले. आता दाखविण्याचे कारण नाही. माझी व आपली ही पहिलीच भेट. आपण मला बापूसाहेब म्हणून हाक मारली. आता पदरात घ्या. मला आता लग्न करावयाचे आहे. देहाचे सार्थक होण्याचा मार्ग दाखवा." तेव्हा महाराज म्हणाले, "आता तुम्ही प्रसाद घ्या आणि उद्याच जा. मुलगी घरी आलेली आहे. घरची मंडळी तुमची वाट पाहात आहे. लग्न करा नि मगच मला भेटा." महाराजांच्या आज्ञेप्रमाणे बापूसाहेब घरी गेले. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी लग्न केले व नंतर ते महाराजांच्या दर्शनास आले. महाराजांनी त्यांना उपदेश देऊन सन्मार्गास लावले. बापूसाहेबांना पुढे दोन मुली झाल्या. त्यांची नावे वेणू आणि कृष्णा अशी होती.

महाराजांच्या निर्याणानंतर त्यांचे संस्थान करण्यात बापूसाहेबांनी फार पुढाकार घेतला. पहिल्या पंचमंडळाचे ते एक सदस्य होते. महाराज समाधिस्थ झाल्यावरही बापूसाहेब दरवर्षी आळंदीला पुण्यतिथीच्या उत्सवाकरिता येत असत. एके वर्षी बापूसाहेबांनी श्रीनारायणबोवा रुद्र उपाख्य श्रीपद्मनाभ स्वामी, धुळे यांचेजवळ असे बोलून दाखविले की, "बुवासाहेब, महाराज असतांना काही चमत्कार दृष्टीस पडत होते. आता तसे काहीच होत नाही." हे बोलणे झाले त्या वेळी सकाळचे दहा वाजले असावेत. दुपारी भोजन झाल्यावर सभामंडपातील

समोरच्या माडीत बापूसाहेबांची बायको आपल्या मुलीला घेऊन बसली होती. खेळण्याच्या नादात मुलगी खिडकीतून डोकावून पाहू लागली. एकाएकी तोल जाऊन मुलगी मंडपासमोरच्या गल्लीत खाली पडली. मुलगी पडल्याचे पाहून लोक धावून त्या स्थानी गेले व एकाने मुलीला पटकन उचलून घेतले. मुलीला काहीच लागले नव्हते. तिच्या कमरेला असलेल्या सोन्याच्या साखळीचे मात्र तुकडे झाले होते. अपघातासंबंधी पद्मनामस्वामींना समजताच ते चटकन बापूसाहेबांस म्हणाले, "बापूसाहेब महाराज गेले नाहीत बरे ! आपण पुन्हा असे बोलू नका." वरील प्रसंगाने महाराजांच्या ठायी बापूसाहेबांची जास्तच श्रद्धा बसली. महाराजांच्या सेवेत सर्व आयुष्य खर्च करून त्यांनी आपल्या देहाचे सार्थक करून घेतले.

## १४. श्रीनारायणानंद सरस्वती स्वामी, गव्य-लोर्दीपूर

'कल्याण' मासिकाच्या सन १९३५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'योगांकात' काशीक्षेत्रनिवासी श्रीकेशवसुत यांनी हिंदी भाषेत लिहिलेले श्रीनारायणानंद सरस्वती स्वामी यांचे त्रोटक चरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्याच्या आधाराने थोडा फेरफार करून प्रस्तुत चरित्र लिहिले आहे.

श्रीनारायणानंद सरस्वती हे महाराजांचे शिष्य होते. आपल्या गुरूप्रमाणेच यांचेही जीवनचरित्र अद्भुत व गूढ असे आहे. महाराजांच्या कृपेने यांचा जन्म श्रीक्षेत्र गोकर्ण येथील एका ब्राह्मण कुटुंबात झाला. पूर्वी ठरल्याप्रमाणे यांच्या आईवडिलांनी आपल्या बालकाला जन्मल्याबरोबर महाराजांच्या चरणी अर्पण केले. यांच्या बाल्यावस्थेत महाराजांच्या एका शिष्यिणीने यांचे पालनपोषण केले. महाराजांनी यांना अगदी बालपणी म्हणजे वयाचे पाचवे वर्षी संन्यासदीक्षा दिली व तेव्हापासून नारायणानंदाची आध्यात्मिक साधना म्हणजे निरंतर गुरुसेवा, सात घरी माधुकरी मागणे व ती नदीत बुडवून मग भोजन करणे आणि मनातल्या मनात अखंड प्रणवाचा जप करणे. या कालापर्यंत त्यांची वाचा बंद असल्यामुळे ते कोणाशीही भाषण करीत नसत. गुरूपदेशाचे श्रवण व त्यांचे सतत मनन करणे याशिवाय अन्य वार्तालाप ते करीत नसत !

नंतर महाराजांनी त्यांना योगाभ्यास सांगितला आणि नर्मदाकाठी ॐकारेश्वर ज्योतिर्लिंगाचे सान्निध्यात एकांतात राहून साधना करण्याची आज्ञा केली. याप्रमाणे शिष्यास आपल्यापासून दूर तपश्चर्येस पाठवितांना त्यांचे मौन नष्ट केले. ॐकारेश्वर येथे आल्यावर जवळ जवळ ७-८ महिने ते तेथील एका धर्मशाळेत राहत असत व माधुकरी मागून तपाचरण करीत असत. एके दिवशी ॐकारेश्वराचे राजे दौलतसिंहजी यांनी नारायणानंदांना पाहिले व ते कोणीतरी महात्मे असावेत अशी श्रद्धा त्यांचे मनात उत्पन्न झाली, म्हणून त्यांनी त्यांची

काही सेवा करण्याची आज्ञा मागितली. नारायणानंदांच्या आज्ञेनुसार राजाने त्यांना नर्मदाकाठी एक कुटी बांधून दिली व त्याचबरोबर त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्थाही पण करून दिली. या सेवेने प्रसन्न होऊन नारायणानंदांनी राजे दौलतसिंहजींना आशीर्वाद दिला. या आशीर्वादाचे फळ म्हणजे दौलतसिंहजींना एका पुत्ररत्नाचा लाभ झाला. नारायणानंद सरस्वतींनी नर्मदातटाकी सात वर्षे वास्तव्य करून गुरुआज्ञेप्रमाणे योगाभ्यास केला. असे सांगतात की ते रोज बारा ते अठरा तासपर्यंत पद्मासन घालून योगाभ्यास करीत असत. अशा तऱ्हेने योगाभ्यास चालू असता त्यांना निरनिराळ्या योगसिद्धी प्राप्त झाल्या.

पुढे गुरुदर्शनाची इच्छा उत्पन्न होऊन ते महाराजांकडे यावयास निघाले. या वेळपर्यंत महाराज भ्रमण संपवून आळंदीत स्थिर झाले होते. काही दिवस महाराजांच्या सहवासात राहिल्यावर महाराजांनी त्यांना नर्मदा प्रदक्षिणा व सर्व भारतभर भ्रमण करण्याची आज्ञा दिली. आज्ञेप्रमाणे नारायणानंदांनी तीन वेळा नर्मदाप्रदक्षिणा केली. रेवातटाकी काही वर्षे निवास व भारतभर संचार करून ते पुन्हा आळंदीत महाराजांजवळ आले. या भ्रमणात श्रीतैलंगस्वामी, श्रीवासुदेवानंद सरस्वती, इत्यादि तत्कालीन महात्म्यांच्या दर्शनाचा लाभ नारायणानंद सरस्वतींना झाला.

या वेळचे वास्तव्यात महाराजांनी त्यांना सतत २१ दिवसपर्यंत आत्मज्ञानपर उपदेश केला. नारायणानंद सरस्वती हे योगसिद्ध जीवन्मुक्त आत्मदर्शी अशा अवस्थेप्रत पोचलेले पाहून महाराजांनी त्यांना सांगितले की, "आजपासून काही दिवसांनी मी या शरीराचा त्याग करणार आहे. तू कोणत्या तरी नवीन स्थानी जाऊन वास्तव्य कर. एका वृक्षाखाली दुसरा वृक्ष वाढत नसतो. सत्पात्र अधिकारी अशा लोकांस ते शरण आल्यास मोक्षमार्गाला लाव." नारायणानंदांना सांगितल्याप्रमाणे पुढे काही दिवसांनी महाराजांचे महाप्रयाण झाले.

गुरुसमाधी गमनानंतर नारायणानंद सरस्वती अपरिचित अशा स्थळाच्या शोधार्थ निघाले. अनेक ठिकाणी फिरत फिरत ते मोंघीर या ठिकाणी आले. तेथून पुढे जुन्या ई. आय्. आर्. रेल्वेच्या गया–क्यूल या फाट्यावरील शेखपुरा स्टेशनपासून ६ मैल दूर असलेल्या 'गव्य–लोदीपूर' या गावी येऊन स्थिर झाले. पुढे त्यांच्या भक्तमंडळींनी त्यांना तेथे एक आश्रम बांधून दिला. तो 'योगाश्रमधाम' या नावाने ओळखला जातो. या ठिकाणी सुमारे चाळीस वर्षे स्वामी नारायणानंद सरस्वतींनी वास्तव्य केले. अनेक भक्त व जिज्ञासू मुमुक्षूंचे कल्याण करून १५ फेब्रुवारी १९३४ रोजी नारायणानंद सरस्वतींनी या नश्वर देहाचे विसर्जन केले. यावेळी त्यांचे वय जवळ जवळ १४० वर्षांचे होते !

प्रकरण बारावे

# साधुसंतांची देशभक्ती

श्रीआळंदीचे स्वामी नरसिंहसरस्वती महाराज यांचे लौकिक चरित्र गेल्या अकरा प्रकरणात सांगून पूर्ण झाले. कोणत्याही साधुसंताचे किंवा सत्पुरुषाचे चरित्र अखिल साधुसंतांनी केलेल्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय पूर्ण व्हायचे नाही. प्रत्येक मनुष्याला जी निरनिराळी ऋणे जन्माला आल्यानंतर फेडावी लागतात त्यातील एक ऋषींचे ऋण होय. ऋषींनी राष्ट्रावर जे अनंत उपकार करून ठेवले आहेत ते फेडण्याचा एक अल्पसा मार्ग म्हणजे किमानपक्षी त्यांनी केलेल्या कामगिरीची जाणीव जागृत ठेवून त्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा होय. साधुसंतांच्या कामगिरीबद्दल मोठमोठ्या विद्वान लोकांतही गैरसमज असलेला दिसून येतो. त्यांची कामगिरी राष्ट्राला उपकारक अशा स्वरूपाची होती की नाही याविषयी वाद असलेला आढळून येतो. साधुसंतांना देशाच्या उन्नतीविषयी किती तळमळ होती हे आधुनिक संत श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांनी एका प्रसंगी दिलेल्या उत्तरावरून स्पष्ट दिसून येईल. एकदा राष्ट्राच्या कल्याणाविषयी आळंदीस मठात चर्चा चालू असता अप्रबुद्धांनी अण्णासाहेबांस प्रश्न केला की, "तुम्हाला देशाच्या उद्धाराविषयी खरोखरच वाटते काय ?" तेव्हा अण्णासाहेबांनी पृच्छकाला तत्काल उत्तर दिले की, "हो हो, खरोखरच वाटते; आणि ते किती वाटते हे तुला काय सांगू ? आधी येथील मुक्ती आणि मग तेथील मुक्ती. येथल्या मुक्तीशिवाय ती मुक्ती मिळाली तरी तिची शोभा नाही." आध्यात्मिक उन्नतीस देशाचे पारतंत्र्य विघातक असते, असाच अर्थ अण्णासाहेबांच्या उत्तरांतून निघतो. अशाच अर्थाचे उद्गार पंडित जवाहरलाल नेहरूंनीही आपल्या आत्मचरित्रात काढले आहेत. ते म्हणतात, "Thus even for inner development external freedom and a suitable environment become necessary." 'विश्वचि माझे घर' असे म्हणणाऱ्या साधुसंतांच्या अंतःकरणात स्वतःच्या देशाविषयीच काय पण साऱ्या जगाचे कल्याण व्हावे अशी अखंड तळमळ असते. तेव्हा प्रचलित देश-भक्तीच्या कल्पनेपेक्षा साधुसंतांच्या कार्याचे स्वरूप भिन्न असले तरी त्यांनी

केलेली कामगिरी खऱ्या अर्थाने देशसेवा किंवा देशभक्तीच कशी होती हे पुढील विवेचनावरून दिसून येईल.

## देशभक्तीची कल्पना

प्रत्येक व्यक्तीला आपल्या जन्मभूमीविषयी प्रेम वाटणे अगदी स्वाभाविक आहे. घोडा किंवा पक्षी यांच्यासारख्या खालच्या वर्गातील प्राण्यांनाही आपल्या निवासस्थानाविषयी किती ओढ असते हे पाहिल्यावर बुद्धिवान मनुष्यप्राण्यात ती भावना असावी हे काही आश्चर्य नाही. ज्या भूमीवर आपण जन्मास येतो, जेथे उत्पन्न होणाऱ्या अन्नपाण्यावर आपला देह पोसला जातो आणि शेवटी ज्या भूमीत आपली माती पडते त्या मातृभूमीचे आपण ऋणी आहोत. कौटुंबिक ऋण फिटेल, पण जन्मभूमीचे ऋण फिटणे फार कठीण. आणि ते फेडणे हे प्रत्येकाचे परम कर्तव्य आहे. सुप्रसिद्ध कवी सर वॉल्टर स्कॉट यांनी म्हटल्याप्रमाणे ज्याला आपल्या मातृभूमीविषयी थोडीशी देखील प्रेमाची भावना नसते तो दोन वेळा मृत्यु पावतो. एक शारीरिक मृत्यू (Physical death) आणि दुसरा म्हणजे लोकांच्या स्मरणातून तो जातो हा होय. थोर व्यक्तींना फक्त एकच मृत्यु येतो!

स्वदेशाची सेवा करून प्रत्येकाला आपल्या जन्मभूमीच्या ऋणातून मुक्त होता येईल. प्रत्येक व्यक्तीचा देशसेवा करण्याचा मार्ग भिन्न असू शकतो. स्वातंत्र्योत्तर कालाला धरून भारताविषयीच बोलावयाचे झाले तर देशसेवा करण्याचे मार्ग भिन्न कसे असू शकतात हे पुढील उदाहरणावरून दाखविता येईल. कारखानदार किंवा व्यापारी लोकांनी प्रामाणिकपणे कारखान्यात उत्तम माल बनवून तो परदेशात पाठवून जगाच्या बाजारपेठेत भारताची पत वाढविणे, इतर भारतीयांनी देशात तयार झालेला माल वापरून देशाचा पैसा देशाबाहेर जाऊ न देणे किंवा ज्यांना अगदी कनिष्ठ लेखले जाते अशा सरकारी नोकरांनी लाचलुचपत न खाता आपले काम प्रामाणिकपणे करणे इत्यादी सर्व गोष्टींचा समावेश देशसेवेतच होतो. हे सर्व लोक असे करण्यात देशभक्तीच करीत असतात.

देशभक्तीची प्रचलित कल्पना ही अगदी अलिकडल्या काळांतील असून अत्यंत संकुचित आहे. १८५७ साली स्वातंत्र्याचा लढा जो सर्व देशभर झाला तो काय केवळ देशप्रेमाने प्रेरित होऊन झाला? काळ्या फौजा भडकल्या त्यामागे धार्मिक भावना होती. काडतुसाने त्यांच्या धार्मिक भावना दुखविल्या गेल्या होत्या. ब्रिटिश राज्यसत्ता हिंदुस्थानातून घालवून देण्याकरिता देशात लोकांनी जे जे कार्य केले त्यालाच आपण देशभक्ती म्हणू लागलो. गेल्या शेपाऊणशे वर्षांत भारतात ज्या राष्ट्रीय चळवळी झाल्या त्यांच्या कार्याचे स्वरूप लक्षात आणले तर असे दिसून येईल की राज्यसत्तेशी असहकार करणे,

राजद्रोही भाषणे करणे, कायदा मोडणे, सत्याग्रह करणे, इंग्रजी अंमलदारांचे खून पाडणे किंवा 'चले जाव'ची नुसती गर्जना करणे, या सर्व गोष्टी देश-भक्तीच्या कक्षेत येत होत्या. क्रांतिकारकांनी केलेल्या दहशतवादी हालचालींना देशभक्तीच म्हणावे लागेल. आज काळ बदलला आहे. कोणत्याही का कारणाने भारत स्वतंत्र झाला आहे. आज कोणी व्यक्ती किंवा पक्ष न्याय्य गोष्टी प्राप्त करून घेण्याकरिता वरील स्वरूपाच्या चळवळी करील तर तो देशद्रोह ठरणार नाही काय ? याचा अर्थ असा की देशभक्तीची कल्पना सर्वांशी सापेक्ष आहे. देशाचे कल्याण किंवा उन्नती होण्याकरिता जे जे कार्य होत असेल किंवा झाले असेल त्या सर्वांना देशसेवाच म्हटले पाहिजे. या दृष्टीने विचार करता गेल्या सात आठशे वर्षांत साधुसंतांनी देशकल्याणार्थ जी कामगिरी केली तिलाही देशभक्तीच म्हटले पाहिजे.

## धर्मभक्ती हीच देशभक्ती

प्रत्येक भाषेत काही काही शब्द असे असतात की अनेक तऱ्हेने सांगूनही त्यांचे नक्की अर्थ काय याविषयी मोठमोठ्या विद्वान म्हणविणाऱ्या लोकांतही मतभेद आढळतो. प्रत्येकजण स्वतःच्याच दृष्टिकोनातून त्या शब्दाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. धर्म हा शब्द अशापैकीच आहे. 'धारणात् धर्म-मित्याहुः धर्मो धारयते प्रजाः ।' असे महाभारतात म्हटले आहे. लोकांची सर्व प्रकारची धारणा व्हावी म्हणून धर्म ही संस्था जन्मास आली आहे. धर्माची आवश्यकता प्रत्येक व्यक्ती, समाज किंवा राष्ट्र यांना आहे ही गोष्ट निर्विवाद. परंतु कालमहिमा असा की वर्तमानकाळांत धर्माचे महत्त्व किंवा आवश्यकता उरलेली नाही. धर्माविषयी किती विपरीत कल्पना उत्पन्न झालेल्या आहेत हे पुढील एकदोन उदाहरणांवरून दिसून येईल. 'धर्म म्हणजे एकप्रकारची अफू' असे मानणारे काही लोक आढळतात. जी. के. चेस्टरटन याने धर्माला जमिनीत फार दिवस पुरून राहिलेल्या प्राण्याच्या अवशिष्ट भागाची (Fossil) उपमा दिली आहे. Fossil मध्ये ज्याप्रमाणे महत्त्वाचा भाग गळून जातो पण दुसराच पदार्थ त्या जागेत भरला गेल्यामुळे त्याचा आकार मात्र कायम असतो, तसाच धर्म आहे. धर्माची आवश्यकता एकीकडे पटत असता दुसरीकडे मात्र कायद्याने धर्माची हकालपट्टी आपल्या देशातून होत आहे. महात्मा गांधी म्हणतात, "No man can live without religion" (कोणताही मनुष्य धर्मावाचून जगू शकत नाही आणि "Those who say that religion has nothing to do with politics do not know what religion means." (जे असे म्हणतात की धर्माचा राजकारणाशी काही संबंध नाही त्यांना धर्म म्हणजे काय हेच समजत नाही.) भारताच्या राष्ट्रीय जीवनात धर्माला कोणते

स्थान आहे हे काही थोर लोकांच्या वचनांतून स्पष्ट दिसून येते. स्वामी विवेकानंद म्हणतात, "त्या भाग्यवान भारतभूमीत मानवी जीवनाचा पाया, कणा व केंद्र म्हणजे धर्म–केवळ धर्मच होय ! आपली जीवनशक्ती व पिढयानुपिढया चालत आलेली राष्ट्रीय जीवनदृष्टी जर एखाद्या राष्ट्राने दूर फेकून दिली तर ते राष्ट्र नाश पावते." साऱ्या राष्ट्राची शक्ती धर्मात साठविली आहे. राष्ट्रांतून धर्माचे उच्चाटन केल्यास ते राष्ट्र म्हणून न राहता केवळ गतवैभवाची स्मृती करून देणारा एक भूखंड म्हणून राहील. भारतात हिंदुधर्माचे काय स्थान आहे व धर्माला वगल दिल्यामुळे भारताचे भवितव्य काय होईल, यासंबंधी श्रीमती अॅनी बेझंट बाईंनी काढलेले उद्गार विचार करण्यासारखे आहेत. त्या म्हणतात, " Make no mistake. Without Hinduism India has no future. Hinduism is the soil into which India's roots are stuck and torn out of that she will inevitably wither as a tree torn out from its place. Many are the religions and many the races which are flourishing in India, but none of them stretches back into the far down of her past, nor is necessary for her endurance as a nation. Every one might pass away as they came and India would still remain. India lived before their coming, India could live after their passing. But let Hinduism vanish and what is she ? A ' Geographical expression ' of the past a dim memory of a perished glory. Her history, her literature, her art, her monuments, all have Hinduism written across them." बेझंट बाईंच्या म्हणण्याचा आशय असा की "चूक करू नका ! हिंदुधर्माशिवाय हिंदुस्थानला भवितव्य नाही. हिंदुस्थानरूपी वृक्षाची पाळेमुळे हिंदुधर्माला चिकटलेली आहेत. आणि त्यापासून जर त्याला तोडून दूर केला तर जमिनीतून उपटून काढलेल्या एखाद्या वृक्षाप्रमाणे तो सुकून जाईल. हिंदुस्थानात अनेक धर्म आणि जाती यांचे पोषण होत आहे. पण त्यांचा हिंदुस्थानच्या पूर्वेतिहासाशी काही संबंध नाही किंवा त्याच्या अस्तित्वासाठी त्याची गरज पण नाही. ते धर्म किंवा त्या जाती जशा हिंदुस्थानांत आल्या तशा कदाचित् नष्टही होतील. पण हिंदुस्थान मात्र तसाच राहील. पण जर का हिंदुधर्म हिंदुस्थानातून नष्ट झाला तर काय होईल ? गतवैभवाची आठवण करून देणारा केवळ एक भूखंड शिल्लक राहील. हिंदुस्थानचे वाङ्मय, कला, स्मारके या सर्वांवर हिंदुधर्माचा छाप आहे."

सनातन धर्म हाच खरा भारताचा राष्ट्रधर्म आहे. गीतेत सांगितल्याप्रमाणे धर्माचा जेव्हा जेव्हा ऱ्हास होतो किंवा साधुसज्जन यांचा छळ होतो तेव्हा तेव्हा भगवान श्रीकृष्ण धर्मरक्षणार्थ अवतार घेतात. कारागृहांतून सुटल्यावर उत्तरपारा

येथे केलेल्या भाषणात, योगी अरविंद घोषांनी भगवान श्रीकृष्णाचा संदेश अखिल भारताला दिला. त्याचा सारांश असा की, "धर्म हाच हिंदुस्थानचा आत्मा आहे. धर्माकरिताच हिंदुस्थानचा उदय व धर्माने चालेल तो पर्यंत हिंदुस्थान टिकणार आहे. हिंदुस्थानच्या बाबतीत धर्मविस्तार म्हणजे देशविस्तार." या संदेशाचे महत्त्व वर्तमान परिस्थितीत किती आहे हे वाचकांच्या लक्षात येईलच. ईश्वरी प्रेरणेने धर्माचे संरक्षण करण्याकरिता साधुसंत, सत्पुरुष यांचे अवतार होत असतात. श्रीसमर्थ म्हणतात, '**धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।**' साधुसंतांनी आपापल्या काळात सनातनधर्मरक्षणाचे कार्य केले याविषयी दुमत होण्याचे कारण नाही. त्यांनी केलेल्या चळवळीत धर्माला प्राधान्य दिले. याचे कारण असे की धर्मभक्ती ही फार व्यापक व विस्तृत भावना असून देशभक्ती त्याचा एक भाग आहे. गेल्या ७०–७५ वर्षांत झालेल्या राष्ट्रीय चळवळी केवळ देश या संकुचित भावनेला धरून झालेल्या आहेत. साधुसंतांनी केलेली धर्मभक्ती म्हणजे राष्ट्रभक्ती किंवा आजकालच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे देशभक्ती होय. देशाकरिता मरा असे न म्हणता 'धर्माकरिता मरावे' असा संदेश देणारे समर्थ रामदासस्वामी हे काय आजच्या दृष्टीने कमी देशभक्त होते? धर्माकरिता मृत्यूला कवटाळणारा संभाजी किंवा धर्माकरिता हिंदुपदपातशाही स्थापन करणारे शिवाजी महाराज हे काय देशभक्त नव्हते? धर्मभक्ती ही व्यापक कल्पना सोडून विचार केल्यामुळे साधुसंत देशभक्त न ठरता देशबुडवे ठरले आहेत!

## संतावरील काही आक्षेप

'जगाच्या कल्याणा संताच्या विभूति!' संतांनी आपले जीवन समाजाचे, देशाचे किंबहुना अखिल जगाचे कल्याण करण्यात खर्च केले. त्यांनी समाजाला जो उपदेश दिला किंवा आपल्या वाङ्मयातून जो परमार्थ सांगितला त्याविषयी सुशिक्षित आणि विद्वान म्हणविणाऱ्या लोकांत गैरसमज झाल्याचे दिसून येते. संत हे निवृत्तिपर असून त्यांना परिस्थितीची जाणीव नव्हती असे त्यांच्याविषयी नेहमी बोलले जाते. संतांच्या या परिस्थितिपराङ्मुखतेमुळे 'हिंदु समाजात एक प्रकारचे दौर्बल्य उत्पन्न झाले होते,' किंवा 'संताळचांनी' राष्ट्र बुडविले अशा प्रकारचे काही आक्षेप साधुसंतांवर वेळोवेळी करण्यांत येतात. संत म्हणजे निव्वळ टाळकुटे किंवा देशबुडवे. एखाद्याला संतती दे किंवा एखाद्याचा रोग बरा कर, किंवा एखाद्या दरिद्र्याला धनलाभ करून दे किंवा काकतालीय न्यायाने एखादा दुसरा चमत्कार कर, यापेक्षा देशोपयोगी अशी कोणतीच कामगिरी संतांनी केली नाही, अशी समजूत झालेली दिसते. काही लोकांच्या दृष्टीने तर संत म्हणजे समाजाचे रक्तशोषण करणाऱ्या जळवाच किंवा समाजरूपी वृक्षावर

पोसले जाणारे बांडगुळ. जगातील इतर कोणत्याही समाजापेक्षा हिंदुसमाजात आणि त्यांतूनही सुशिक्षित अशा मराठी भाषिकांत, देवदेवता, साधुसंत यांची होत असलेली विटंबना प्रखरतेने जाणवते. संत तुकाराम महाराज यांचे चित्र विडीबंडलावर बोधचिन्ह म्हणून वापरणे किंवा भक्त प्रल्हाद यांचे नाव केश-कर्तनालयाला देणे किंवा शिवाजीसारख्या छत्रपतीला मांसाहारी उपहारगृहाच्या फलकावर शोभायमान व्हावे लागणे किंवा श्रीगणेशासारख्या मंगलमय देवतेला हिडिस स्वरूपात सार्वजनिक स्थळी दहा दिवसपर्यंत जनमनरंजनार्थ प्रेक्षणीय वस्तू म्हणून बंदिस्त व्हावे लागणे, हे सर्व प्रकार वरील विधानाच्या पुष्ट्यर्थ पुरेसे आहेत. इतर धर्मीय समाजाने मात्र अशा तऱ्हेचे विटंबनेचे प्रकार होऊ नये म्हणून दक्षता घेतलेली दिसून येते. येशू ख्रिस्ताचे चित्र एका ठराविक साच्यापलीकडे रंगविलेले कोणी पाहिले आहे काय ? त्याचप्रमाणे, आपल्या धार्मिक भावनांवर कोणी शिंतोडे उडविल्यास त्याचा परिणाम काय होतो हे श्री. कन्हैयालाल मुन्शीच सांगू शकतील. अशा गोष्टी भारतात—फक्त हिंदु समाजात—घडू शकतात.

संतांच्या कार्याविषयी दूषित दृष्टिकोन निर्माण होण्यास दोन कारणे असू शकतात. एक तर मागे म्हटल्याप्रमाणे, भूतकालातील घटनांचे परीक्षण वर्तमान काळातील कसोटचा लावून करावयाचे व त्यावरून आपल्या तर्कबुद्धीस पटतील अशीच अनुमाने काढावयाची. उदाहरणार्थ, आजच्या सामान्य माणसाचे आयुष्यमान व त्याच्या कर्तबगारीचे टप्पे पुढीलप्रमाणे आढळून येतात. विशी विद्यार्जन, तिशी निर्धन आणि चाळिशी निधन. असा हा सामान्य माणसाच्या जीवनाचा आराखडा पाहून 'अवघ्या २२ ते २५ वर्षांच्या अवधीत आपले अवतारकृत्य समाप्त करणाऱ्या ज्ञानेश्वरास, एवढे ग्रंथावलोकन, अध्यात्मशास्त्राचे सखोल ज्ञान, व सांसारिक जीवनाचा प्रदीर्घ अनुभव इतक्या अल्पावधीत मिळविणे शक्य आहे, यावर त्यांचे लोकोत्तर बुद्धिमत्त्व मान्य करूनही सामान्यांची श्रद्धा बसू शकत नाही.' असे डॉ. हर्षे यांनी म्हणावयाचे किंवा दुसऱ्या एखाद्या संशोधकाने एकाचे दोन ज्ञानेश्वर करावयाचे. सामान्य मनुष्य म्हटला म्हणजे बुद्धीने कमीच. तेव्हा त्याची श्रद्धा सहज बसेल. उलट असामान्य व बुद्धिप्रामाण्यवादी म्हणविणाऱ्या इतिहाससंशोधकांची श्रद्धा बसणे कठीण ! सामान्य माणसाला पुढे करून डॉक्टरमजकुरांनी आपली स्वतःची श्रद्धा मात्र व्यक्त केली आहे असे सामान्य बुद्धीचा कोणीही मनुष्य म्हणेल. तसेच, वर्तमान-काळात देशात जे अनेक वाद उत्पन्न झालेले दिसून येतात किंवा नवविचारांचे वारे वाहताना आढळून येतात त्यांचे मूळ संतांच्या जीवनांतील एखाद्या घटनेशी चिकटवून द्यावयाचे किंवा आपली स्वतःची हीन विचारसरणी त्यांचेवर लादून

द्यावयाची, अशी आजकालच्या संशोधकांची एक टूम आहे. जातीजातीमधील कलह, द्वेष, तंटे, भांडणे हे सर्व ब्रिटिश राजनीतीचे खेळ आहेत. ब्राह्मणवर्गाचा मत्सर समाजातील इतर जातींनी करावयाचा ही इंग्रजांची करामत. वर्णव्यवस्था दुष्ट आहे ही अलिकडची विचारधारा. संतांना, मग ते कोणत्याही जातीचे, कोणतीही भाषा बोलणारे किंवा भारतातील कोणत्याही भागात वास्तव्य करणारे असोत, वर्णाश्रम-धर्म मान्य होता व त्यांनी त्याचे संरक्षणही केले. तुकाराम महाराजांनी समाजातील ढोंगधतुऱ्यावर किंवा दांभिक ब्राह्मणांवर कठोर टीका केली असेल, पण ब्राह्मणवर्गाच्या अधिकाराविरुद्ध प्रतिकार मात्र केला नाही. पण, हॅवेलसारख्या पाश्चिमात्याचा हवाला देऊन 'इस्लामी संस्कृतीचे क्रांतिकार्य' (Historical Role of Islam) या मानवेंद्रनाथ रायकृत पुस्तकातील 'कबीर, नानक, तुकाराम चैतन्य वगैरे संतांनी ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध केलेल्या प्रतिकाराचे मूळ बीज महंमदाच्या विजयाने केलेल्या सामाजिक परिवर्तनातच आहे,' हे विधान वाचल्यावर हा उघड उघड दुष्टप्रचार आहे असे म्हटल्याशिवाय राहवत नाही. महंमदाच्या विजयाने सामाजिक परिवर्तन काहीही घडले असो पण वरील संतांनी ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध प्रतिकार केला असे म्हणणे अयोग्य आहे. रॉय हे जन्माने भारतीय असले तरी युरोपियन संस्कृतीत वाढलेले आहेत. तेव्हा त्यांच्या डोक्यात असे विचार येणे शक्य आहे. पण मराठी भाषेत अनुवाद केलेल्या ह्याच पुस्तकाची प्रस्तावना लिहिणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनाही हा तर्क पटवा ही आश्चर्याची गोष्ट आहे. तुकाराम महाराजांनी दंभस्फोट केला पण जर खरोखरच त्यांनी ब्राह्मणांच्या वर्चस्वाचा प्रतिकार केला असता तर '**मर्कटें आंघोळी लावियेले दिवे । ब्राह्मणाचे लीळे वर्तू नेणे**' किंवा '**जरी ब्राह्मण जाला कर्मभ्रष्ट । तुका म्हणे श्रेष्ठ तिही लोकी ।।**' असे उद्‌गार त्यांनी कशाला काढले असते ? हीन मनोवृत्ती-द्योतक कल्पना थोर विभूतींच्या चरित्रावर लादण्याचा हा प्रकार आहे.

दुसरी एक विचारसरणी अशी आढळून येते की जसे पाश्चिमात्य देशात घडले असेल तसेच ते आपल्या देशात घडले असलेच पाहिजे, असा आग्रह धरावयाचा. उदाहरणार्थ, वारकरी पंथाची चळवळ आपल्याकडील विद्वानांना युरोपमधील 'रेफर्मेशन'सारखी वाटावी ही गोष्ट वरील विचारसरणीची द्योतक आहे. परमार्थ हा संतांच्या शिकवणुकीतील मोठा दोष मानला जातो ! परमार्थ म्हणजे श्रेष्ठ असा अर्थ डॉ. शं. दा. पेंडसे यांनी म्हटल्याप्रमाणे, साधुसंतांनी समाजासमोर परमेश्वराप्रमाणे प्रत्येकाने परिपूर्ण व्हावे हे उच्च ध्येय ठेवले. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने समाजांतील प्रत्येक व्यक्ती परिपूर्ण असणे हे किती

जरूरीचे आहे हे लक्षात घेतले तर परमार्थ हा संतांच्या शिकवणुकीतील दोष आहे असे कोणीही म्हणणार नाही.

संत स्वत: विरक्त होते. स्वत:च्या संसाराविषयी त्यांनी उदासीनता दाखविली. पण दुसऱ्या लोकांना संसाराचा त्याग करण्याचा उपदेश केला नाही.

गेल्या शे-पन्नास वर्षात भारतात झालेल्या राष्ट्रीय चळवळीसारख्या चळवळी साधुसंतांनी केल्या नसतील, प्रचंड सभा घेऊन त्यात राजद्रोही भाषणांची झोड उठविली नसेल, एखाद्याने आमरण उपोषण केले नसेल, किंवा राजांच्या मनात दहशत बसेल अशा गुप्त हालचालीही केल्या नसतील म्हणून काय त्यांनी राष्ट्र बुडविले ? त्यांनी केलेले उपकार स्मरण्याचे सोडून संत देश-बुडवे आहेत असे म्हणणे केवळ कृतघ्नपणाचे आहे.

## संत-कार्यांचा संक्षिप्त आढावा

परमेश्वरी योजनेने विशिष्ट कार्याकरिता साधुसंतांचे अवतार होत असतात. कोणत्याही संताने केलेल्या कार्याचा विचार करताना त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या संतांच्या कामगिरीचा विचार व्हावयास पाहिजे. या कामगिरीच्या पार्श्वभूमी-वरच पुढच्या संतांनी केलेले कार्य उभारलेले असते, ही गोष्ट या संबंधात लक्षात ठेवली पाहिजे. ह. भ. प. कै. ल. रा. पांगारकर म्हणतात, "वेद सर्वांचे मूळ आहे. हिंदुधर्म वेदशास्त्रपुराणात्मक आहे. सकल ऋषीमुनी व संतविभूती ह्या वेदमहासागरावरच्या लाटा आहेत...सर्व लाटात एकच धर्मप्रेमाचे व लोकोद्धारक बुद्धीचे निर्मळ पाणी भरले आहे...कोणतीच लाट स्वयंभू, अगदी स्वतंत्र अशी नाही..." पूर्व इतिहास, व वर्तमान परिस्थिती यांचे सूक्ष्म अवलोकन करून मगच साधुसंतांनी समाजाच्या कल्याणाची कामगिरी केली. साधुसंत हे परिस्थिती-पराङ्मुख नसून देशाची परिस्थिती पूर्णपणे ओळखून होते. भावी परिस्थिती ओळखूनच श्रीज्ञानेश्वरांनी भगवंताचा संदेश प्राकृत भाषेत समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत पोचविला. क्षात्रधर्म, त्याचे महत्त्व आणि कर्तव्य ग्रंथद्वारे क्षत्रियवर्णीयांना त्यांच्याच भाषेत समजावून सांगून पुढे येणाऱ्या संकटाकरिता लोकांना तयार केले. श्रीज्ञानेश्वरानंतर राष्ट्रावर यवनांचे अतिभयंकर असे संकट आले व स्वातंत्र्यनाश झाला. यवनाक्रान्त काळात श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनरसिंव्ह-सरस्वती या दत्तावतारी विभूतींनी कर्मावर जोर देऊन समाजात आत्मविश्वास व निर्भयपणा उत्पन्न केला. आणि राष्ट्राला यवनांच्या विक्राळ दाढेतून वाचविले. त्या काळात समाजाचा पुढारीवर्ग म्हणजे ब्राह्मण. त्याचे अध:पतन किती झाले होते त्याचे शब्दचित्र श्रीगुरुचरित्रात सरस्वती गंगाधराने स्पष्टपणे रेखाटले आहे. ब्राह्मणवर्गाची ही अवस्था तर इतरांची विचारायलाच नको ! एकनाथ

तुकारामादि संतांनी श्रीज्ञानेश्वरांनी दाखवून दिलेल्या मार्गानेच वारकरी संप्रदायाचे कार्य पुढे चालू ठेवले. कथा, कीर्तन, पुराण यातून धर्मोपदेश करून लोकांत जागृती केली व संस्कृतिनाश टाळला. असंख्य लोकांना धर्मांतरांतून वाचविले. भक्तिमार्गावर फार भर दिल्यामुळे बहुजनसमाज कर्मदुर्बळ बनला. पुढे श्रीसमर्थांचा अवतार झाला. रामोपासना व मारुतीची भक्ती त्यांनी सुरू केली. 'जय जय रघुवीर समर्थ' या जयघोषाने सर्व देशभर जागृती केली. त्यामुळे, श्रीअप्रबुद्धांनी म्हटल्याप्रमाणे "वारकरी धारकरी बनले" आणि 'हर हर महादेव' अशी गर्जना करीत श्रीशिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली त्यांनी म्लेंच्छांचे बंड मोडून काढले. धर्मरक्षणार्थ स्वराज्याची पुन: स्थापना झाली. या कालखंडात, केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतर भागातही साधुसंतांचा उदय होऊन त्यांनी धर्मरक्षणाचे महत् कार्य केले. त्यामुळे बहुसंख्य प्रजा हिंदुधर्मालाच चिकटून राहिली. प्रा. ओतुरकर यांनी संतांच्या कामगिरीबद्दल काढलेले उद्‌गार उल्लेखनीय आहेत. ते म्हणतात, "संत राजकारणात पडले नाहीत. पण राजकीय क्षेत्रात मधून मधून अपयशाचे तडाखे सहन ावे लागत असता समाजाची हिंमत खचू न देण्याचे व समाजाची वृत्ती धैर्यनिष्ठ ठेवण्याचे अतिशय अवघड कार्य संतांनी केले." संतांच्या कार्याला तोड नाही, असेच कोणीही कृतज्ञ म्हणेल.

अगदी अलीकडच्या काळात, ब्रिटीश अमदानीत साधुसंतांनी केलेल्या थोर कामगिरीचा उल्लेख प्रस्तावनेत आलेलाच आहे. या काळात नवीन संस्था व नवे संप्रदाय सुरू झाले. भगवान् रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, दयानंद सरस्वती, स्वामी रामतीर्थ, श्रीमसूरकर महाराज इत्यादि संतांनी धर्मभक्तीच्या स्वरूपात केलेली देशभक्ती लोकांच्या स्मरणातून गेली नसेल. वर्णाश्रमधर्माचा लोप झाला असता सर्व भरतखंडात अनवाणी संचार करून लोकांना उपदेश करणारे व धर्ममार्गाची स्थापना करणारे श्रीवासुदेवानंद सरस्वती उपाख्य टेंभेस्वामी यांनी केलेल्या कार्याविषयी शृंगेरी मठाचे श्रीशंकराचार्य यांनी श्रीरंग मुक्कामी असे उद्‌गार काढले आहेत की, "आद्य शंकराचार्यांप्रमाणे (टेंभेस्वामी) धर्मसंस्थापनेचे कार्य करीत आहे. वर्णाश्रम धर्माचे परिपालन कडकडीतपणाने करून अनेक लोकांचा उद्धार यांचेकडून झाला आहे. आसेतुहिमाचल पायानेच सर्वत्र यात्रा करून कर्म, उपासना व ज्ञान यांचा अधिकारी जीवांना उपदेश करून त्यांना कृतार्थ केले."

'संताळ्यांनी राष्ट्र बुडविले' अशी ओरड करणाऱ्या इतिहासाचार्य कै. राजवाड्यांनीच संतांच्या कामगिरीबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत. हा उतारा बराच लांबलचक असला तरी जसाचा तसा देणे अनाठायी होणार नाही.

"अठरापगड जातीचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र स्वधर्मभ्रष्ट झाले असता ते बहुतेक मुसलमान बनल्यासारखेच झाले, इतकेच की, त्यांनी सुन्तेची दीक्षा मात्र घेतली नाही. तीही त्यांनी घेतली असती, परंतु त्यांच्या आड एक मोठी धोंड आली. ती धोंड म्हणजे महाराष्ट्रातील साधुसंत होत. भांडणे, तंटे, अपेयपान, अभक्ष्यभक्षण यांचे साम्राज्य सर्वत्र माजलेले पाहून ही बजबजपुरी ताळ्यावर यावी या सद्हेतूने, साधुसंतांनी सर्वांना सहजगम्य व सुलभ असा भक्तिमार्ग सुरू केला. प्रजा आर्यधर्माला, सनातन संस्कृतीला सोडून जावयाच्या पंथास लागली होती, बरेच लोक सोडून गेले होते. बाकी राहिलेल्या लोकांचा मगदूर पाहून साधुसंतांनी परमकारुणिक बुद्धीने भक्तिमार्ग सुरू केला. अशा सदहेतूने की कसेही करून हे लोक हिंदुत्वात राहावे आणि सदाशेने की, पुढे मागे लोकोत्तर अवतारी पुरुष निपजलाच तर त्याच्या द्वारा हे लोक: पुनः धर्मकर्मनिष्ठ बनण्याचा संभव रहावा. 'अज्ञं छन्दानुवृत्तेन' असा प्रकार साधुसंतांनी केला. स्नान, संध्या, जपजाप्य, दंड, प्रायश्चित्त, धर्माधर्म, यांचा द्वेष अज्ञलोकांच्या ठायी होताच. त्या द्वेषाला साधुसंतांनी गुणांचे स्वरूप दिले. 'स्नानसंध्या टिळेमाळा' या ढोंगाची आमच्या या भक्तिमार्गात जरूरी नाही असा पुकारा त्यांनी केला आणि भगवन्नामस्मरणाचा साधा मंत्र जो भेटेल त्याला देण्याचा सपाटा चालविला. मुमुक्षु नामस्मरणाने आकृष्ट झाला म्हणजे, त्याला ते नवविधा भक्तीची माहिती देत. त्यात शुचिर्भूतपणे कसे राहावे, सत्य, अहिंसा इत्यादी धर्म कसे पाळावे वगैरे हिंदुधर्मातील विधिनिषेधाची ओळख करून दिली जाई. वर्णाश्रमधर्माचे फारसे नाव काढीत नसत. फक्त, कुलधर्म, जातिधर्म, पितृधर्म पाळण्यात पुण्य आहे एवढेच सांगितले जाई. अशा रीतीने साधुसंतांनी या भक्तिमार्गाच्या द्वारा वर्णाश्रमधर्मलोपप्रधान अशी ही महाराष्ट्रातील दुर्दैवी प्रजा, दोन अडीचशे वर्षे स्वधर्मात मोठ्या शिताफीने थोपवून धरिली आणि आर्य संस्कृतीचे संरक्षण केले. तेव्हा आपल्या देशावर त्यांचे उपकार बिनमोल झाले ह्यांत शंका नाही. जर भरतखंडात व महाराष्ट्रात त्या काळी भक्तिमार्ग नसता तर अफगाणिस्थान, इराण, वगैरे देशांतल्याप्रमाणे ह्या देशांतील सर्व प्रजा एकवर्णी मुसलमान झाली असती आणि आर्य संस्कृती, आर्य सारस्वत, आर्य समाज, आर्य चातुर्वर्ण्य, आर्य शील ह्या जगातून समूळ उच्छिन्न झाले असते." कै. राजवाडे यांनी संत कामगिरीचे केलेले हे वर्णन यथार्थ नाही असे कोण म्हणेल !

शेवटी श्रीएकनाथ महाराजांच्या शब्दांत संतमहिमा गाऊन साधुसंतांच्या देशभक्तीसंबंधीचे विवेचन पूर्ण करू.

संतांच्या विभूती । धर्मालागी अवतरती ॥ १ ॥
धर्मरक्षणाकारणें । साधु होताती अवतीर्ण ॥ २ ॥
जगा लावावें सत्पंथीं । हेचि साधूची पैं कृती ॥ ३ ॥
एका जनार्दनीं साधु । हृदयीं वसे ब्रह्मानंदु ॥ ४ ॥

[ समाप्त ]

# परिशिष्ट

## (१)

## आरती श्रीमहाराजांची

(ही आरती श्रीराधाकृष्ण स्वामी, रहिमतपूर यांचे शिष्य श्रीविष्णुमहाराज यांनी केलेली आहे.)

जयदेवा गुरुमूर्ति । नरसिंहसरस्वती ॥
यतिवर्या दिनोद्धारा । ओवाळूं मंगलारती ॥ ध्रु० ॥
मायागुणनियामका । परमात्मया व्यापका ॥
सच्चिदानंदकंदा । अद्वया स्वयंप्रकाशका ॥ १ ॥
ब्रह्मा हरि महेशा । नुमगसी तूं परेशा ॥
वेदशेषा मौन पडे । वर्णितां नव यशा ॥ २ ॥
गुरूक्षराक्षरातीत । आत्माराम तूं निश्चित ॥
विश्व हा विलास तुझा । ऐसे श्रुतिप्रणीत ॥ ३ ॥
जगदुद्धारासाठीं । अवतरसी या सृष्टीं ॥
अनन्यशरणागतां । तारिसी कृपादृष्टी ॥ ४ ॥
बालोन्मत्तजड । स्थिति दाविसी उघड ॥
विदेहपणें विचरसी । निजरूपीं अखंड ॥ ५ ॥
भक्तिज्ञानवैराग्य । स्वीकारिसी शांतियोग ॥
भाविका बोध करिसी । हरिभक्ति महद्भाग्य ॥ ६ ॥
राधाकृष्ण स्वामीकृपें । भेटी देसी यतिरूपें ॥
निर्विकल्पें कवटाळितां । होय विष्णु दृश्य लोपें ॥ ७ ॥

## (२)

## श्री ज्ञानेश्वराष्टकं स्तोत्रम् ।

कलावज्ञजीवोद्धरार्थावतारं, कलाकांततेजोधिकामोदिवक्त्रम् ।
खलानीशवादापनोदार्थदीक्षं, समाधिस्थमूर्तिं भजे ज्ञानदेवम् ॥ १ ॥

'अलंका' पुरीरम्यसिंहासनस्थं, पदांभोजतेजस्फुरद्दिक्प्रदेशम् ।
विधींद्रादिदेवैः सदा स्तूयमानं, समाधिस्थमूर्ति० ॥ २ ॥

गदाशंखचक्रादिभिर्भावितांगं, चिदानंदसंलक्ष्यनाट्यस्वरूपम् ।
यमाद्यष्टभेदांगयोगप्रवीणं, समाधिस्थमूर्ति० ॥ ३ ॥

लुला यस्य वक्त्रात् श्रुति पाठयन्तं, प्रतिष्ठानपुर्यां सुधीसंगसेव्यम् ।
चतुर्वेदतंत्रेतिहासादिपूर्णं, समाधिस्थमूर्ति० ॥ ४ ॥

सदापंढरीनाथपादाब्जभृंगं, निवृत्तीश्वरानुग्रहात्प्राप्ततत्त्वम् ।
महेन्द्रायणीतीरभूमौ वसंतं, समाधिस्थमूर्ति० ॥ ५ ॥

रणे कृष्णबीभत्सुसंवादभूतो, रुगीतार्थबोधाय ज्ञानेश्वरी वै ।
कृतिर्निर्मिता येन च प्राकृतोक्त्या, समाधिस्थमूर्ति० ॥ ६ ॥

चिराभ्याससंयोगसिद्धेर्बलाढ्यो, बृहद्व्याघ्रशायी महान् चांगदेवः ।
नीरीक्ष्याग्रकुड्यागतं वीतगर्वः; समाधिस्थमूर्ति ॥ ७ ॥

क्वचित्तीर्थयात्रामिषेणेति नीत्वा, स्वसंवेद्यतत्त्वं न जानासि विष्णोः ।
यतः प्रेषितः खेचरं नामदेवः, समाधिस्थमूर्ति० ॥ ८ ॥

स्तवं भावभक्त्यादिभिः सौख्यदेयं, पठंतोऽर्थजातं ह्यवाप्यापि विष्णोः ।
पदं यांति ते ज्ञानदेवस्य नित्यं, भवाब्धिं तरन्त्यंतकाले च भक्ताः ॥ ९ ॥

॥ इति श्रीमत्परमहंस–परिव्राजकाचार्य श्रीनरसिंह–सरस्वतीस्वामी-
विरचितं श्रीज्ञानेश्वरस्तोत्रं संपूर्णम् ॥

(३)

॥ श्री ॥

## श्रीऋणमोचनस्तोत्र

### श्रीगणपतिर्जयतु ।

सद्वंद्य ध्रुवप्रल्हादशुकशंकरनारदैः
दुर्ज्ञेयं भगवद्रूपं ध्येयंस्यान्मे धियः कथम् ॥ १ ॥

तथापि मे मनश्चाद्य पौर्वसंस्कारजस्मृतेः
ध्यातुं यतति तद्रूपं नेदं चित्रमिहोच्यते ॥ २ ॥

सदामात्यबुधा ये तु भूपसान्निध्यगा अपि ।
स्प्रष्टुं न शक्यते तैस्तु भूपांगं शिशुना यथा ॥ ३ ॥

तथैवार्भकतुल्योऽहं ध्यायामि हृदयांबुजे ।
शंखचक्रगदापद्मकीरीटांगदनूपुरैः ॥ ४ ॥

कुंडिदंडाजिनकषायाच्छादनसुशोभितम् ।
भस्मोद्धूलितसर्वांगं स्वर्णयज्ञोपवीतिनम् ॥ ५ ॥
निरंजनम् निर्विकारं नित्यं शुद्धं निरामयम् ।
निष्प्रपंचं निरीहं च स्वप्रकाशं सनातम् ॥ ६ ॥
गुणातीतं गुणाधारं गुणज्ञं गुणरंजितम् ।
सर्वरूपममं देवं सर्वाधिष्ठानकारणम् ॥ ७ ॥
कूटस्थमिंद्रियाभासं गुह्यं गुह्यविवर्जितम् ।
तत्त्वमस्यादिलक्ष्यार्थं पूर्णमेकं च सर्वदा ॥ ८ ॥
आधारादिषु चक्रेषु भासमानं हि योगिनाम् ।
नित्यनैमित्तिकैः कृत्यैर्भाव्यं योगिहृदिस्थितम् ॥ ९ ॥
नवधाभक्तिसंप्राप्यं ज्ञेमं ज्ञानस्वरूपकम् ।
सर्वांतःस्थं च सर्वेशं सर्वशक्तिसमन्वितम् ॥ १० ॥
भक्ताभीष्टप्रदातारं भक्तिज्ञानप्रियं प्रभुम्
आनंदं केवलं शांतमुपाधिरहितम् परम् ॥ ११ ॥
ध्यानाधारं ध्यानगम्यं ध्येयं ध्यानस्वरूपकम् ।
पद्माननं पद्मनेत्रं पद्माभं पद्मजाप्रियम् ॥ १२ ॥
वासुदेवं जगन्नाथं यशोदानंदवर्धनम् ।
वेणुनादप्रियं शौरिं गोपालचयशोभितम् ॥ १३ ॥
श्रीवत्सांकं जगद्योनिं विष्णुं कृष्णं हरिं शिवम् ।
नीलांबुधचयाभं च विद्युत्कोटिसमप्रभम् ॥ १४ ॥
सहस्रवदनांभोजं सहस्रवदनोज्वलम् ।
सहस्ररूपदांगं च सहस्रादित्यसंनिभम् ॥ १५ ॥
विश्वहेतुं विश्वरूपं विश्वसंहारकारणम् ।
श्रीधरं श्रीनिधिं श्रीदमात्रेयं उच्युतं हरिम् ॥ १६ ॥
अनसूयावधूगर्भवर्धनं दत्तयोगिनम् ।
इंद्रनीलनिभांगं च जटामुकुटमंडितम् ॥ १७ ॥
रघुवंशाब्धिसंदोहं राकाचंद्रसुनिर्मलम् ।
रामं राजीवनयनं रमाहृदयवासिनम् ॥ १८ ॥
भावातीतं भवहरं भावाभावकल्पदम् ।
भाव्यं भक्तानुगं भीमं क्वचिद्भक्तपरीक्षदम् ॥ १९ ॥
गोगालयं गोगिगम्यं योगिहृद् पद्मसंस्थितम् ।
अस्त्यादिनश्यतीत्यंतषड्र्मिरहितम् मुनिम् ॥ २० ॥

ब्रह्मादिसुरमौलिस्थरत्नभास्वत्पदद्वयम् ।
त्रिविक्रमं त्रिलोकेशं त्रिष्ववस्थासु साक्षिणम् ॥ २१ ॥
त्रयीविद्याशिरोरण्यमयूरसदृशं गुरुम् ।
गोपीजनहृदोत्तुंगसागरानंदपानुजम् ॥ २२ ॥
गोवृंदल्हादसंदोहमंदिरं स्मरसुंदरम् ।
कंसाद्यसुरसंघाब्धिशोषणे कुंभसंभवम् ॥ २३ ॥
स्वसंवेद्यं स्फुरद्रूपं सर्वशक्त्युपबृंहितम् ।
दत्ताख्यं वैष्णवं रूपं ध्यायामि हृदि संततम् ॥ २४ ॥
यो वै स्तुतिमिमां भक्त्या त्रिकालं पठते यदि ।
तत्क्षणात्सिद्धिमाप्नोति ध्यानात् हृदि फलं किमु ॥ २५ ॥

॥ इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमन्नृसिंहसरस्वतीविरचितं ऋणमोचनस्तोत्रम् संपूर्णम् ॥

## (४)

## श्रीगोविंदाष्टकम्

(रोज रात्री धूपारत्या झाल्यावर प्रदक्षिणेची तयारी होईपर्यंत हे स्तोत्र म्हणतात.)

श्रीगणेशाय नमः । सत्यं ज्ञानमनन्तं नित्यमनाकाशं परमाकाशं गोष्ठ प्राङ्गणरिङ्गण लोलमनायासं परमायासं । मायाकल्पित नानाकारमनाकारं भुवनाकारं क्षमामानाथमनाथं प्रणमत गोविन्दं परमानन्दम् ॥१॥ मृत्स्नामत्सीहेति यशोदाताडनशैशवसंत्रासं व्यादित वक्त्रालोकितलोकालोक चतुर्दशलोकालम् । लोकत्रयपूरमूलस्तम्भं लोकालोकमनालोकं लोकेशं परमेशं प्रणमत गोविन्दम् परमानन्दम ॥२॥ त्रैविष्टपरिपुवीरघ्नं क्षितीभारघ्नं भवरोगघ्नं कैवल्यम् नवनीताहारमनाहारं भुवनाहारं । वैमल्यस्फुटचेतोवृत्ति विशेषाभासमनाभासं शैवं केवलशान्तं प्रणमत गोविन्दं परमानन्दम् ॥३॥ गोपालं भूलीलाविग्रहगोपालं कुलगोपालं गोपीखेलनगोवर्धनधृतिलीलालालितगोपालम् । गोभिर्निगदित गोविन्दस्फुटनामानं बहुनामानं गोपीगोचरदूरं प्रणमत गोविन्दं परमानन्दम् ॥४॥ गोपीमण्डलगोष्टीभेदं भेदावस्थम भेदाभं शश्वद्गोखुर निर्धूतोत्कृतधूलीधूसरसौभाग्यम् । श्रद्धाभक्तिगहीतानन्दमचिन्त्यं चिन्तितसद्भावं चिंतामणिमहिमानं प्रणमत गोविन्दं परमानन्दम् ॥५॥ स्नानव्याकुलयोषिद्वस्त्रमुपादायागमुपारूढं व्यादित्सन्तीरथदिग्वस्त्राद्युपदातुमुपाकर्षन्तम् । निर्धूतद्वयशोकविमोहं बुधबुद्धेरध्यन्तस्थम् सतामात्रशरीरं प्रणमत गोविन्दं

परमानन्दम् ॥६॥ कान्तं कारणकारणपादिमनादिं कालमनाभासं कालिन्दीगत-कालियशिरसि मुहुर्नृत्यन्तं च सुनृत्यन्तं । कालं कालकलातीतं कलिताशेषं कलि-दोषघ्नं कालत्रयगतिहेतुं प्रणमत गोविन्दं परमानन्दम् ॥७॥ वृन्दावनभुवि वृन्दारकगणवृन्दाराधित वंदेऽहं कुन्दाभामलमन्दस्मेरसुधानन्दं सुहृदानन्दम् । वन्द्याशेषमहामुनिमानस वन्द्यानन्दपदद्वंद्वं वन्द्याशेषगुणाब्धि प्रणमत गोविन्दं । परमानन्दम् ॥८॥ गोविंदाष्टकमेतदधीते गोविन्दार्पितचेता यो गोविन्दाच्युत माधव विष्णो गोकुलनायक कृष्णेति । गोविन्दांघ्रिसरोजध्यानसुधाजल धौत-समस्ताघो गोविन्दं परमानन्दामृतमन्तस्थं स समभ्येति ॥९॥

इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं
गोविन्दाष्टकस्तोत्रं संपूर्णम ॥

## (५)

## श्रीगुरुपरंपरास्तोत्र

हिमाचलसमीपस्थं बदर्याश्रमवासिनं ।
वन्दे नारायणं देवं लोकानुग्रहकारिणम् ॥ १ ॥
तच्छिष्यो भारतीनाथस्तस्मात् वासिष्ठदेशिकः ।
शक्तिः पराशरो व्यासः तच्छिष्यः शुकयोगिराट् ॥ २ ॥
तस्मात् सौमार्ययोगीन्द्रः तस्य शिष्यः प्रभाकरः ।
प्रभाकरस्य शिष्याः स्युः रघुनाथादिसंज्ञकाः ॥ ३ ॥
निरंजनो द्वितीयः स्यात् अद्वितीयपरात्परः ।
अष्टाविंशति शिष्याः स्युस्तस्य पादाब्जचिंतकाः ॥ ४ ॥
तेषां मध्ये वासुदेवो वासुदेवपरायणः ।
तस्यानुग्रहयोगेन श्रीनृसिंव्हसरस्वती ॥ ५ ॥
भक्तिज्ञानविरक्त्यादियोगैः पूर्णो विचक्षणः ।
सौमार्यस्य गुरोरन्यः शिष्यः सुज्ञः सुदर्शनः ॥ ६ ॥
तस्य शिष्याद्यौत्तरेया योगशास्त्ररतः सदा ।
गुरोः परंपरामेतां स्मृत्वा पश्चात् मुहुर्मुहुः ॥ ७ ॥
नृसिंहाख्यगुरोः पादपंकजे मे रतिः सदा ।
जानेहं तत्पदान्नान्यत् त्रिषु लोकेषु किंचन ॥ ८ ॥
नारायणाश्रमो यत्रालकनंदा प्रवाहिनी ।
चैतन्यरूपोस्यानंदब्रह्मचर्यादिलक्षणः ॥ ९ ॥

सरस्वती संप्रदाय: तत्र वेदो ह्यथर्वण: ।
सत्तामेषां पीठिका स्यात् तितीर्षूणां हि श्रेयसे ।। १० ।।

इति श्रीसद्गुरु परंपरासंप्रदाय: समाप्त: ।

(वरील स्तोत्र ब्रह्मर्षी श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या संग्रहातील कागदपत्रातून उपलब्ध झालेले आहे. या योगपरंपरेत 'तस्माद्' (श्लोक ३) हे पद आले आहे, ते विशेष अर्थाने योजिले आहे. मधली शिष्यांची पुष्कळ नावे सांगितली नाहीत. 'शुकयोगिराट् तस्मात् सौमार्ययोगीन्द्र' 'सौमार्ययोगीन्द्र' हे शुकांचे साक्षात् शिष्य नाहीत. शुकांचे शिष्य–त्याचे शिष्य–असे अनेक शिष्य झाल्यावर मग सौमार्ययोगीन्द्र हे शिष्य झाले. गुरुपरंपरा या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे वरील गुरुपरंपरा ही महाराजांच्या योगपट्टाची परंपरा आहे.)

# संदर्भ साहित्य


| | |
|---|---|
| १. श्रीगुरुचरित्र | चित्रशाळा प्रेस, पुणे |
| २. श्रीगुरुचरित्र-प्रस्तावनेसह | श्री. कामत प्रत |
| ३. श्रीगुरुचरित्र व वेदान्त विषयावरील स्फुट विचार | संग्रा. श्री. का. त्र्यं. बागदरीकर |
| ४. श्रीस्वात्मसौख्य | श्रीनरसिंहसरस्वतीस्वामी, आळंदी |
| ५. श्रीसद्गुरु नरसिंहसरस्वती स्वामी महाराज यांच्या काही पत्रांतील उतारे | प्रकाशक– डॉ. दि. का. गर्दे |
| ६. श्रीनरसिंहसरस्वती महाराज यांचे मठातील नित्यक्रम | प्रकाशक– श्री. बाबा इंदूरकर |
| ७. श्रीसद्गुरु नरसिंहसरस्वती स्वामी महाराज यांच्या आठवणी | संग्रा. श्रीपादबुवा गांधी |
| ८. श्रीअंतरानुभाव हस्तलिखित, अप्रकाशित | श्रीसच्चिदाश्रम स्वामी, लोणार. |
| ९. ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन चरित्र | श्री. अप्रबुद्ध |
| १०. श्रीनारायणबुवा (धुळे) यांचे चरित्र | श्री. पुरंदरे |
| ११. श्रीनरसिंहसरस्वती–चरित्र आणि परंपरा | श्री. रा. चिं. ढेरे |
| १२. द्वितीय दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वती | श्री. अप्रबुद्ध |
| १३. भक्तलीलामृत | महिपती |
| १४. अर्वाचीन भक्तलीलामृत | श्रीसंत दासगणु महाराज |
| १५. श्रीनवसंतचरित्र, भाग १ व २ | श्री. शाळिग्राम |
| १६. श्रीगोंदवलेकर महाराज चरित्र | प्रा. के. वि. बेलसरे |
| १७. श्रीरामानंद बीडकर महाराज यांचे चरित्र | श्री. ल. ग. बापट |
| १८. विष्णु कृष्ण पुराणिक यांचे विवेचक चरित्र | श्री. स. कृ. फडके |
| १९. श्रीरंगनाथ महाराज यांचे चरित्र | चिन्मयानंद सरस्वती |
| २०. श्रीगुरुलीलामृत | कै. वामनरावजी वैद्य |
| २१. श्रीस्वामी समर्थदर्शन | वि. अ. कवठेकर |

२२. श्रीअक्कलकोटनिवासी स्वामी महाराज यांचे चरित्र — ग. ब. मुळेकर
२३. महाराष्ट्र कविचरित्र, भा. ५ — ज. र. आजगांवकर
२४. प्राचीन मराठी संतकवी — ज. र. आजगांवकर
२५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खं. २ व ३ — ल. रा. पांगारकर
२६. भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश — श्री. सि. वि. चित्रावशास्त्री
२७. भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश — श्री. सि. वि. चित्रावशास्त्री
२८. सुलभ विश्वकोश, भाग ३ — प्रसाद प्रकाशन, पुणे
२९. कै. व्यायामाचार्य दा. ब. भिडे उर्फ भटजी यांचे आत्मवृत्त व चरित्र — भिडे गुरुजी स्मारक समिती, सातारा.
३०. श्रीएकनाथ महाराज यांच्या अभंगांची गाथा — इंदिरा प्रकाशन, पुणे
३१. लोणारवर्णन — या. मा. काळे
३२. योगसिद्धि आणि ईश्वरसाक्षात्कार — डॉ. वि. म. भट, पुणे
३३. परमहंस श्रीराधाकृष्ण स्वामी चरित्र आणि लेखसंग्रह — —
३४. महाराष्ट्र जीवन, खंड १ व २ — संपादक– गं. बा. सरदार
३५. आळंदी दर्शन — वि. रा. दीक्षित
३६. चित्रमय आळंदी — प्रकाशक–सरपंच श्रीज्ञानेश्वर संस्थान, आळंदी
३७. ज्ञानोबा माऊली — रा. चिं. ढेरे
३८. श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराजकृत श्रीमद्भगवद्गीतेचा अभंगात्मक अनुवाद अथवा मंत्रगीता — वा. सी. बेन्द्रे
३९. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास — डॉ. शं. दा. पेंडसे
४०. महाराष्ट्रांतील संत व त्यांचे साक्षात्कार — रा. स. भागवत
४१. श्रीशंकराचार्य व त्यांचा संप्रदाय — म. रा. बोडस
४२. तुकारामबोआ — बा. अ. भिडे
४३. गोसावी व त्यांचा संप्रदाय, भा. १ — गोस्वामी पृथ्वीगीर हरिगीर
४४. पुराणनिरीक्षण — वैद्य त्र्यं. गु. काळे
४५. श्रीमाणिकप्रभु चरित्र — ग. र. कुळकर्णी
४६. नवनाथभक्तिसार — —
४७. महाभारताचा उपसंहार — चिं. वि. वैद्य
४८. इस्लामी संस्कृतीचे क्रान्तिकार्य — मानवेन्द्रनाथ रॉय

| | |
|---|---|
| ४९. कुंडलिनी शक्तियोग | त्र्यं. भा. खरे |
| ५०. वज्रकाया अथवा यौगिकबल पद्धति | — |
| ५१. वेदान्तरत्नमाला | प्रकशक– रा. पां. देशपांडे |
| ५२. ब्रह्मज्ञान व बुवाशाही | महादेवशास्त्री दिवेकर |
| ५३. श्रीएकनाथी भागवत | संपादक–साखरेमहाराज |
| ५४. श्रीज्ञानेश्वरी | संपादक–प्रा. शं. वा. दाण्डेकर |
| ५५. तुकाराम महाराज यांचे संतसांगाती | वा. सी. बेन्द्रे |
| ५६. श्रीगुरु गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा | रा. चिं. ढेरे |
| ५७. ती धन्य बंदिशाळा | प्र. न. जोशी |
| ५८. मराठी वाङ्मयाचा परामर्श | गं. भा. निरंतर |
| ५९. भारताचा सांस्कृतिक इतिहास | प्रा. रा. वि. ओतुरकर |
| ६०. माउली (मासिक, वैशाख–ज्येष्ठ अंक शके १८७९) | |
| ६१. विवेक विशेषांक, आक्टोबर १९५० | |
| ६२. योगांक, कल्याण मासिक १९३५ | |
| ६३. श्रीदत्तजन्म, हस्तलिखित | पंथ– एक्का वेदांत सर्वेश्वर |
| 64. Amraoti District Gazetter | |
| 65. An Autobiography | Jawaharlal Nehru |
| 66. Man the unknown | Dr. Alexis Carell |
| 67. A Search in secret India | Paul Brunton |
| 68. Sufism– it's saints & shrines | John A Subhan |
| 69. India & Western Philosophy " A Study of Contrast " | Betty Hemans |
| 70. Shakti and Shakta | Sir John Woodroff |

श्री

लोकमान्य टिळकांचे राजकीय गुरू, क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान, आयुर्वेद व आंग्ल वैद्यकात निष्णात, राजर्षि ते महर्षि असे जीवनप्रवासी व पुण्यातील विख्यात विभूती—

# ब्रह्मर्षि श्री अण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्र

**(श्री नरसिंहसरस्वतीस्वामीमहाराज आळंदी यांचे शिष्य)**

पुनर्मुद्रित होत आहे– प्रकाशन समय डिसें. ८५

(सचित्र पृष्ठसंख्या ४७५ पेक्षा जास्त–मूल्य रु. ६० /–)

**लेखक—श्रीअप्रबुद्ध**

प्रत्यक्ष योगानुभवी गाढे व्यासंगी, चतुरस्र स्वतः प्रतिभासंपन्न लेखक 'वैदिक संस्कृतीची पुनर्घटना', 'ऋग्वेदाचा संदेश', 'Science of Yoga', 'दोन साम्यवाद', 'Marxism X-Rayed' इत्यादि विद्वन्मान्य ग्रंथांचे कर्ते व ब्रह्मर्षिंचे साक्षात शिष्य.

**ग्रंथावरील काही अभिप्राय**

- जवळजवळ श्री. अण्णासाहेबांचे आत्मचरित्र...स्वतः लेखक
- ग्रंथाची वर्णनशैली व भाषा राष्ट्राच्या प्रचलित स्थितीविषयी अंतःकरण तुटून बाहेर आली असल्यामुळे भेदक, उद्बोधक आणि सूचक अशी झाली आहे. —वैदर्भीय श्रीमंत दादासाहेब खापर्डे
- विभूतिपूजा व विवेचकता याचा सुंदर मेळ असलेले आदर्श चरित्र–डॉ. अ. ना. देशपांडे यांचा मराठी साहित्याचा इतिहास.

**प्रकाशनपूर्व सवलतीची किंमत ४५ /–**

संपर्क

**श्री अप्रबुद्ध विचार साधना**

(पंजीकृत न्यास क्र. E ११४८)

द्वारा, श्री. श्रीनिवास गोटे, ३५०, हनुमाननगर, नागपूर ४४० ००९